मा 2015
४८ 9

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(जिल्हा वाचनालय)

मासिकाचे नांव —

संपादक —

मासिक क्रमांक —                सन —

अंक —

(महिने)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
जुनी मासिके (संदर्भ)

सं.मा.क्र.
ता.

# कन्याशिक्षक.

वर्ष १२ वें. ] मार्च ते जून १९२६ [ अंक १ ते ४

पुणें एथें 'आर्यभूषण' छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन
यांनीं छापिलें व मिस् आर. नवलकर, बी. ए., लेडी
सुपरिंटेन्डन्ट ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें,
यांनीं पुणें एथें प्रसिद्ध केलें.

वार्षिक वर्गणी
ट. हा. सह १॥ रुपया.

या अंकाची
किंमत १२ आणे.

२० आगस्ट १९२६.

# अनुक्रमणिका.


| | | पानें. |
|---|---|---|
| १ | स्फुट विचार ... ... ... ... | १—३ |
| २ | वाक्यरचना ... ... ... ... | ३—८ |
| ३ | चित्र-लेखन ... ... ... ... | ९—२४ |
| ४ | बालवर्गांचें वाचन ... ... ... ... | २५—५४ |
| ५ | लगबगा (कविता.) ... ... ... | ५५—५६ |
| ६ | " " ... ... ... ... | ५७—५८ |
| ७ | घुणें " ... ... ... ... | ५८—५९ |
| ८ | पांच पोपट " ... ... ... ... | ५९—६० |
| ९ | झोला " ... ... ... ... | ६०—६१ |
| १० | चार गाई (शिशुवर्गाकरितां धडा.) ... ... | ६१—६२ |
| ११ | कुंभाराचें गाढव " " ... ... | ६३—६४ |
| १२ | साम्राज्यपरिषद् ... ... ... ... | ६५—६७ |
| १३ | न्यूफाउंडलंड ... ... ... ... | ६८—६९ |
| १४ | न्यूझीलंड ... ... ... ... | ७०—७१ |
| १५ | वर्तमानसार ... ... ... ... | ७२—७८ |
| १६ | जगदेव परमार (गोष्ट) ... ... ... | ७९—९४ |
| १७ | पोंच आणि अभिप्राय. ... ... ... | ९५—९६ |
| १८ | जाहिराती ... ... ... ... | ९७— |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
33
ता.

सं.मा. ८०/१२

मराठी ग्रंथ संग्रहालय
ता..........



वृद्ध राजमाता आलेक्झांड्रा.

कन्याशिक्षक मंडळानें चालविलेलें मासिक पुस्तक

# कन्याशिक्षक

वर्ष १२ वें

( मार्च १९२६ ते फेब्रुआरी १९२७ )

( हें पुस्तक पुणें एथें 'आर्यभूषण' छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें व मिस् आर. नवलकर, बी. ए. लेडी " सुपरिंटेंडेंट ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें यांनीं पुणें एथें प्रसिद्ध केलें. )

१९२७

किंमत रु. १॥.

२० ३

# अनुक्रमणिका.

## वर्ष १२ वें


| | | |
|---|---|---|
| १ वाक्यरचना | ३–८ | म. का. कारखानीस |
| " | १२६–१३० | " " |
| " | २६५–२६७ | " " |
| २ शिशुवर्गाकरितां धडे | | म. का. कारखानीस |
| चार गाई | ६१–६२ | " " |
| कुंभाराचें गाढव | ६३–६४ | " " |
| आमच्या गांवची नदी | १२३ | " " |
| गांवचा बाजार | १२४ | " " |
| आमचा मळा | १२५–१२६ | " " |
| ३ बालवर्गाचें वाचन | २५–५४ | " " |
| ४ व्याकरण. सर्वनाम | २८५–२८६ | " " |
| ५ मुलांकरितां कविता | | म. का. कारखानीस |
| लगबगा | ५५–५८ | " " |
| घुगें | ५८–५९ | " " |
| पांच पोपट | ५९–६० | " " |
| झोला | ६०–६१ | " " |
| अलगुजवाला | १९५–१९७ | " " |
| संपत्तीचा लोभ | १९६–२०१ | " " |
| वादळ | २८६–२८९ | " " |
| ६ मुलांकरितां गोष्टी | | |
| जगदेव परमार | ७९–९४ | म. का. कारखानीस |
| बुलबुल पक्षी | १३०–१३६ | गो. व. मोकाशी |
| राजपुत्र माधव | १३७–१४४ | " " |
| विचित्रराचाची लीला | १४९–१५१ | रा. भा. ठोसर |
| गुळा | १५१–१९२ | म. का. कारखानीस |

| | | |
|---|---|---|
| हरवलेला चेंडू | २५८ | रा. डॉ. व्हॉ. भोंडे |
| बिनमोल साडी | २६९–२७४ | गो. ब. मोकाशी |
| पळरे भोपळ्या टुणुक् टुणुक् | २७५–२७९ | म. का. कारखानीस |
| खाईन शेवया मटक मटक | २७९–२८२ | ,, ,, |
| ७ गणित. संख्यालखन व वाचन | २५९–२६४ | म. का. कारखानीस |
| ८ चित्रलेखन | ३–८ | ,, ,, |
| ९ इतिहास व चरित्रें | | |
| साम्राज्यपरिषद् | ६५–६७ | रा. भा. ठोसर |
| न्यूफाउंडलंड | ६८–६९ | ,, ,, |
| न्यूझीलंड | ७०–७१ | ,, ,, |
| शिवजयंतीचा वाद | १०९–१११ | वि. स. वाकसकर |
| गोपिकाबाई | ११९–१२२ | सौ. हौसाबाई शिंदे |
| जगदीशचंद्र बोस | २४९–२५७ | गो. ब. मोकाशी |
| १० भूगोल व स्थलवर्णनें | | |
| विमानें | १६०–१६४ | रा. भा. ठोसर |
| इराणांतील राज्याभिषेक | १८४–१८५ | स. वि. वैसास |
| गलफ स्ट्रीमची कामगिरी | १८६ | ,, ,, |
| गौरीशंकरआरोहण | १८८–१८९ | रा. भा. ठोसर |
| इंग्लिश खाडी पोहून जाण्याचे प्रयत्न | १९०–१९१ | ,, ,, |
| शिवनेरी किल्ला | २०१–२०६ | लक्ष्मीबाई बोरकर |
| चिनी लोकांच्या रीतिभाती (मिस सॉयरच्या लेखाचें भाषांतर) | २३७–२४२ | म. का. कारखानीस |
| प्राचीन तक्षशीला | २४६–२४८ | रा. भा. ठोसर |
| कायदेमंडळाकरितां नवीन इमारत | २८२–२८४ | ज्ञानप्रकाश |
| ११ शिक्षण | | |
| खेड्यांतील मुलींचें शिक्षण | ९७–१०२ | म. का. कारखानीस |
| ऑस्ट्रेलियांतील प्राथमिक शाळा (प्रि. ह्याम्ले यांच्या व्याख्यानाचा सारांश) | १०२–१०९ | ,, ,, |

| | | |
|---|---|---|
| हिंदुस्थानांतील प्राथमिक शिक्षण | ११५–११८ | म. का. कारखानीस. |
| भारतीय स्त्रीशिक्षण परिषद | १२१–२३६ | ज्ञानप्रकाश |
| ,, ,, परिषदेचे ठराव | २६७–२६८ | ,, |
| १२ आरोग्य व सृष्टिनिरीक्षण | | |
| कृत्रिम लोकर व रेशीम | १४४–१४५ | रा. मा. ठोसर |
| माशी | १४६–१४८ | ,, ,, |
| व्हिटयामिन | १५२–१५४ | ,, ,, |
| ट्यापिओका | १५४–१५९ | ,, ,, |
| अनपेक्षित आरोग्य | १८३–१८४ | रा. घैसास |
| कृत्रिम रेशीम | १८५ | ,, ,, |
| ससा | २४२–२४४ | रा. ठोसर |
| ताऱ्यांचें निरीक्षण | २८९–२९२ | रा. कारखानीस |
| १३ मुलांकरितां खेळ | | |
| सुशीला एक अंकी नाटक | १६६–१८२ | म. का. कारखानीस |
| १४ वर्तमानसार | ७२–७८ | रा. ठोसर |
| ,, ,, | १५६–१५९ | ,, ,, |
| १५ किरकोळ | | |
| स्फुट विचार | १—३ | रा. कारखानीस |
| दृढनिश्चय | १८७–१८८ | रा. घैसास |
| कोहिनूर | २०६–२०९ | का. प. साने |
| मुलींच्या हस्तकौशल्याचें प्रदर्शन | २०९–२१५ | ज्ञानप्रकाश |
| १६ पोंच व अभिप्राय | ९५–९६ | |
| १७ जाहिराती | २१६–२२० | |

# कन्याशिक्षक.

जरि असेल रसज्ञपणा पुरा । जरि परोपकृतीच मनोहरा ।
जरि असे चतुरत्व, तरी मुला । शिकविण्यासम छंद नसे भला ॥

वर्ष १२ वें. ] मार्च ते जून १९२६. [ अंक १ ते ४

## स्फुट विचार.

नवीन सुधारणा जेव्हां सन १९१९ सालीं अमलांत आल्या तेव्हां स्त्रियांना मत देण्याचा देखील अधिकार नव्हता. या अन्यायाची जाणीव मुंबईइलाख्याच्या पहिल्याच कायदे कौन्सिलला झाली. मुंबई इलाख्यांतील सुशिक्षित स्त्रियांनीं आपणांस मतदानाचा हक्क मिळावा, म्हणून बरीच चळवळ केली. सन १९२१ च्या जुलै महिन्यांत मुंबईच्या कायदे कौन्सिलांत स्त्रियांना मतदानाचा अधिकार देण्याचें बिल रावसाहेब हरिलाल देसाई यांनीं आणिलें व तें विशेष विरोध न होतां पास झालें. म्युन्सिपालिटींत प्रतिनिधि म्हणून निवडून येण्याचाही हक्क स्त्रियांना मिळाला व मुंबई म्युन्सिपालिटीच्या मागील कॉर्पोरेशनमध्यें स्त्रीप्रतिनिधि निवडून आले व सध्यांच्या कार्पोरेशनमध्येंही स्त्रीप्रतिनिधि काम करीत आहेत. गेल्या कार्पोरेशनच्या स्त्रीसभासदांनीं आपलीं कामें चांगलीं केलीं. सध्या स्थापन केलेल्या जिल्हा–स्कूलबोर्डमध्यें एक तरी स्त्री सभासद असावा अशी योजना केली आहे व त्याप्रमाणें जिल्हा–स्कूलबोर्डमधून व म्युन्सिपल स्कूल बोर्डमधून स्त्रिया काम करीत आहेत. गेल्या ऑगस्टांत एथें भरलेल्या कौन्सिलमध्यें स्त्रियांना प्रतिनिधि म्हणून निवडून येण्याचा हक्क मिळावा, म्हणून डॉक्टर परांजपे यांनीं बिल

आणिलें व तें विशेष विरोध न होतां पासही झालें. या बाबतींत मुंबई इलाख्यानें आघाडी मारली आहे. हिंदुस्थानांतील पुष्कळ प्रांतांत अद्यापि स्त्रियांना मतदानाचाही अधिकार मिळाला नाहीं. मुंबईच्या प्रांतिक कौन्सिलनें जी मनाची उदारता दाखविली तिजबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करितों.

* * *

गेल्या कौन्सिलनें बजावलेली महत्त्वाची कामगिरी म्हटली म्हणजे 'साठे परांजपे स्कीम' पास करणें ही होय. शिक्षक लोकांच्या पगाराचा प्रश्न आज कित्येक वर्षें भिजत पडलेला होता. कौन्सिलनें शिक्षकांच्या विनंतीचा सहानुभूतिपूर्वक विचार करून शिक्षकाच्या पगाराची स्कीम मंजूर केली याजबद्दल शिक्षकवर्ग त्यांचा नेहमीं ऋणी राहील.

* * *

इस्लामधर्मीय राष्ट्रांतील स्त्रियांत विलक्षण जागृति उत्पन्न झाली आहे. इजिप्तमधील स्त्रियांनीं आपली कित्येक शतकांची गाढनिद्रा सोडून सामाजिक, औद्योगिक व राजकीय कार्यांत भाग घेण्याला सुरुवात केली आहे. इजिप्तमधील मुलींच्या शाळांच्या एक इन्स्पेक्ट्रेस हिंदुस्थानांत आल्या आहेत. त्या या देशांतील मुलींच्या शाळा पाहात आहेत. त्यांनीं एका वर्तमानपत्राला इजिप्तमधील जागृतीची मोठी मनोवेधक हकिकत सांगितली. त्या म्हणाल्या, "सुमारें पांच वर्षांपूर्वी इजिप्तमधील आम्हां स्त्रियांना एकत्र जमण्याचीही संधि मिळत नसे. बुरख्याची चाल फार जोरांत असे. यामुळें स्त्रिया बहुधा घर सोडून फार लांब जात नसत. या वेळीं कांहीं स्त्रियांनीं मुलींच्या शिक्षणाकडे समाजानें व सरकारनें लक्ष दिलें पाहिजे अशी पुस्तकद्वारा व वर्तमानद्वारा ओरड चालविली होती, पण समाज किंवा सरकार यांनीं या चळवळीकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. सन १९२३ सालीं इजिप्तमधील लोकप्रिय पुढारी झगलूल पातशाहा याला इजिप्त सरकारनें इंग्लंडमध्यें जाण्याची परवानगी दिली नाहीं, तेव्हां सरकारच्या या कृत्याचा निषेध प्रदर्शित करण्याकरितां

ठिकठिकाणीं मिरवणुकी काढण्यात आल्या होत्या. त्यावेळीं सुमारें एक हजार स्त्रियांनीं आपले बुरखे फेकून देऊन कायरो शहरांतील रस्त्याममधून आपली मिरवणूक काढिली. पोलिसानें ही मिरवणूक फारशी पुढें जाऊं दिली नाहीं. त्यांनीं स्त्रियांना आपल्या घरीं परत लावलें. पण तेव्हांपासून या स्त्रियांनीं आपला बुरखा कायमचा फेकून दिला. या स्त्रियांनीं आपली एक संस्था स्थापन केली व देशाच्या व समाजाच्या हिताकरितां झटण्याचा निश्चय केला. कांहीं स्त्रियांनीं मुलींच्या शाळा काढल्या. कांहींनीं स्त्रियांना शिवण वगैरे काम शिकविण्याचे वर्ग काढले. कांहींनीं गरीब स्त्रियांना साहाय्य करण्याचें काम हातीं घेतलें. कांहीं स्त्रिया राजकीय चळवळींत भाग घेत आहेत."

तुर्कस्थानांत स्त्रियांनीं बुरख्याला केव्हांच रजा दिली आहे. तुर्की प्रजासत्ताक राज्याचे अध्यक्ष केमाल पातशहा यांनीं मुलींकरितां प्राथमिक व दुय्यम शिक्षणाच्या पुष्कळ शाळा स्थापन केल्या. तुर्कस्थानातील नागरिकानें एका पेक्षां जास्त पत्नी करूं नयेत असा कायदा केला व बहुपत्नीकत्वाची शेंकडों वर्षें चालत असलेली पद्धति बंद केली.

इराकमध्येंही स्त्रीशिक्षणाचें पाऊल हळू हळू पुढें पडत आहे.

* * *

---

## वाक्यरचना.

### इयत्ता ४ थी.

गेल्या महिन्यांत प्राक्टिसिंग स्कूलमधील ४ थ्या इयत्तेला वाक्यरचनेचा पाठ दिला होता. तो वर्गाला व त्यावेळीं ट्रेनिंग कॉलेजमधील शिक्षणपद्धति पाहाण्याकरितां आलेल्या असिस्टंट डेप्युटींनाही मनोरंजक वाटला, म्हणून त्यांची हकिकत पुढें दिली आहे.

प्रथम शिक्षकानें पुढील वाक्य फळ्यावर लिहिलें. 'आपल्या प्रेमळ आईबापांला आपण फसविलें, म्हणून त्या मुलाला फार वाईट वाटलें.' नंतर मुलांना 'आज आपणांस या वाक्यावरून एक मजेदार गोष्ट चरा-

वयाची आहे, तेव्हां हें वाक्य लक्षपूर्वक पहा व तुम्हाला जें कांहीं सुचेल तें मला सांगा ' असें सांगितलें. मुलांनीं तें वाक्य वाचून आपल्या मनाशीं बराच वेळ विचार केला, पण त्यांना ती गोष्ट कांहीं सुचेना. तेव्हां शिक्षकानें, ' बरें तर, या वाक्यांत काय सांगितलें आहे तें पहिल्यानें पाहूं या, म्हणजे आपणांस गोष्ट सुचेल असें सांगितलें. ' नंतर शिक्षकानें मुलांचें लक्ष ' त्या मुलाला वाईट वाटलें ' या वाक्याकडे वेधलें. त्याबरोबर मुलांनीं 'ही गोष्ट एका मुलाची आहे. या मुलानें आपल्या आईबापांस फसविलें म्हणून त्याला फार वाईट वाटलें, ' ही कल्पना सांगितली. ' प्रेमळ शब्दावरून तुम्हांला काय वाटतें, ' असें विचारतांच त्या मुलाचे आईबाप त्याजवर फार ममता करीत असत, असें सांगितलें. ' बरें तर या मुलाचा स्वभाव कसा होता हें तुम्हांला सांगता येईल काय ?' असा प्रश्न विचारतांच 'तो मुलगा अतिशय वाईट स्वभावाचा असला पाहिजे, त्याचे आई-बाप त्याजवर अतिशय ममता करीत होते, तरीही त्या मुलानें आईबापांस फसविलें. तेव्हां तो अतिशयच वाईट असला पाहिजे', असें सर्व मुलांनीं सांगितलें. मग शिक्षकानें त्याला फार वाईट वाटलें', या शब्दांकडे पुन्हा मुलांचें लक्ष वळविलें व तो मुलगा खरोखरीच वाईट होता का म्हणून मुलांना विचारलें. त्याबरोबर एक मुलगी उभी राहिली व म्हणाली, 'तो मुलगा खरोखरी वाईट नव्हता. वाईट असता तर त्याला आपल्या आई-बापांना फसविल्याबद्दल दुःख झालें नसतें. त्या मुलानें चुकून आपल्या आईबापांना फसविलें असेल.' या मुलीची ही कल्पना सर्व वर्गाला पसंत पडली. यानंतर शिक्षकानें 'एथपर्यंत आतां आपण आपली गोष्ट रचूं' असें मुलांस सांगितलें. मुलांनीं गोष्ट रचण्यास प्रारंभ केला. 'मुंबई शहरांत एक मनुष्य राहात असे,' असें एका मुलीनें सांगितलें. या वाक्यांतील मनुष्य हा शब्द कांहीं मुलींना पसंत पडला नाहीं. त्यांनीं गृहस्थ हा शब्द सुचविला व एका मुलीनें गृहस्थाचें नांव कृष्णराव असें होतें ही सुधारणा केली. कृष्णरावाची घरची स्थिति कशी होती हा प्रश्न

पुढें आला. तेव्हां बरीच भवति न भवति होऊन ते घरचे गरीब होते असें ठरलें. कांहीं मुलींनीं सांगितलें कीं, गरीब आईबापच जास्ती ममताळू असतात, म्हणून कृष्णराव फार गरीब होते असेंच आपण धरूं. आणखी एक प्रश्न उपस्थित झाला. कृष्णरावाला किती मुलें होतीं? पण या प्रश्नाचें उत्तर सर्वानुमतें असें ठरलें कीं, एकच मुलगा होता. कारण एकुलत्या एक मुलावर आईबापांचें प्रेम फार असतें. मुलाचें नांव सदू असें मुलांनीं ठरविलें. नंतर एका मुलीनें पुढें दिल्याप्रमाणें एथपर्यंत झालेली गोष्ट सांगितली.

मुंबई शहरांत कृष्णराव नांवाचे एक गृहस्थ राहात होते. ते घरचे गरीब होते. त्यांना सदू नांवाचा एकुलता एक मुलगा होता. सदूच्या आईबापांचें त्याच्यावर फार प्रेम होतें.

इतक्यांत एका मुलीनें 'ते त्याला जीव कीं प्राण करीत' हें सांगितलें व तें वाक्य सर्व मुलांना फार आवडलें.

' सदू उद्योग काय करीत होता ' असें विचारतांच ' तो शाळेंत जात असे ' असें सांगितलें. सदूनें ' आपल्या आईबापांला फसविलें. तें त्यानें आपण होऊन फसविलें असेल ? का दुसऱ्याचे सांगण्यावरून फसविलें असेल ? ' असें विचारतांच मुलांच्या मनात तेव्हाच कल्पना आली कीं, शाळेंतील वाईट मुलांचे सांगण्यावरून त्यानें आपल्या आईबापांला फसविलें असेल. ही कल्पना त्यांच्या पुस्तकांतील धड्यावरून सुचली असेल. त्यानंतर या गोष्टीचा पुढील भाग त्यांनीं रचला.

सदू हा शाळेंत जात असे. तो स्वभावानें चांगला होता, पण तो भोळा असे. त्याच्या शेजारीं रामा नांवाचा एक मुलगा राहात होता, तोही त्याच शाळेंत जात असे.

वाईट मुलें नियमानें शाळेंत जातात का ? तीं नियमितपणें अभ्यास करतात का ? हे प्रश्न विचारतांच ' वाईट मुलें शाळेंत जाण्याकरितां

घरून निघतात, पण तीं शाळेंत न जातां बाहेर खेळतात व संध्याकाळीं घरीं परत जातात. तीं घरचे पैसे चोरून आणतात किंवा आईला थाप देऊन आणतात. त्या पैशांची मेवामिठाई आणून खातात, असें मुलांनीं सांगितलें. वाईट मुलें दुसऱ्या मुलांनाही आपल्या नादीं लावतात हीही गोष्ट एका मुलीनें सांगितली. यानंतर एका मुलीनें पुढील गोष्ट मी सांगते असें म्हणून पुढें दिल्याप्रमाणें ती सांगितली.

रामा हा शाळेंत जाण्यास निघत असे पण तो शाळेंत न जातां गांवांत भटकत असे. तो संध्याकाळीं आपल्या घरीं परत येई, तो घरचे पैसे चोरीत असे व त्यांची मेवामिठाई आणून खाई. रामानें सदूला आपल्या नादीं लावलें. तो त्याला मेवामिठाई देत असे. सदू भोळा असे. त्याला वाटे कीं रामा फार चांगला मुलगा आहे. त्याचे आईबाप त्याला सांगत कीं, तूं रामाचे नादीं लागूं नकोस, तरी त्यानें रामाची संगत सोडली नाहीं.

एथपर्यंत गोष्ट आल्यानंतर पुढील प्रश्न, आईबापांला त्यानें कसें फसविलें, याबद्दलचा आला. पण मागील भागावरून आतां तें सांगण्यास फारसें कठीण गेलें नाहीं. प्रथम कांहीं मुलींनीं सांगितलें कीं, ‘ रामाचे सांगण्यावरून सदूनें आपल्या घरचे पैसे चोरून आणले. पण ही गोष्ट बाकीच्या मुलींना पटेना. त्यांनीं सांगितलें कीं सदू स्वभावानें फार चांगला होता. तेव्हां तो चोरी करणार नाहीं. सदूनें आपल्या बापाच्या खिशांतून त्याला न कळत एक रुपाया काढून घेतला, ’ असें एका मुलीनें सांगितलें. ‘ पण ही तर चोरी झाली, ’ असें बाकीच्या मुलींनीं सांगितलें. ‘ सदूनें आईजवळ फीचे पैसे मागितले व ते रामाला नेऊन दिले, ’ असें एका मुलीनें सांगितलें पण ही ही गोष्ट मुलींना पसंत पडली नाहीं. “ सदूनें आईला सांगितलें कीं, ‘ मला एक नवें पुस्तक पाहिजे व गुरुजीनें तें आजच्या आज विकत घ्या असें आम्हांला सांगितलें आहे, म्हणून तूं आतांच मला एक रुपाया दे. आईला तें खरें

वाटलें व तिनें त्याला एक रुपाया दिला, " असें एका मुलीनें सांगितलें व तें मुलींना पटलें. यानंतर सदूनें आईजवळ पैसे मागितले का बापाजवळ पैसे मागितले याजविषयीं मोठा मजेदार वाद झाला. कांहीं मुलींनीं सांगितलें कीं ' त्यानें आपल्या बापाजवळच पैसे मागितले. बापाजवळ पैसे मागितले असतां ते लवकर देतात. आई पैसे मागितल्याबरोबर देत नाहीं. ' मुलींच्या या वादावरून एक गोष्ट दृष्टोत्पत्तीस आली. ती ही कीं मुलीचे लाड पुरविण्यास बाप जितका तयार असतो तितकी आई नसते. कांहीं मुलींनीं सांगितलें कीं ' सदूनें आपल्या बापाजवळच पैसे मागितले नसतील. कारण बाप चवकशी केल्याशिवाय पैसे देणार नाहीं.' मग सर्वानुमतें त्यानें आपल्या आईजवळ पुस्तकाकरितां पैसे मागितले असें ठरलें. मग एका मुलीनें पुढें दिल्याप्रमाणें त्या गोष्टीचा पुढचा भाग जुळवून सांगितला.

एके दिवशीं रामानें सदूला सांगितलें कीं, ' सदू, तूं आपल्या घरून उद्यां रुपाया घेऊन ये. आपण जत्रेला जाऊं. मेवामिठाई खाऊं व गंमत पाहूं. संध्याकाळीं शाळा सुटल्यावर घरीं परत येऊं तुझ्या आईबापांला आपण कोठें गेलों होतों हें कळणार नाहीं. ' सदूचा बाप दहा वाजतां कामावर गेला. मग सदू आईला म्हणाला, ' आई मास्तरनें आज एक नवीन पुस्तक विकत घेण्यास सांगितलें आहे. मीं तें आज घेतलें नाहीं, तर मास्तर मला रागावतील. पुस्तकाची किंमत एक रुपाया आहे. तूं मला रुपाया दे, म्हणजे मी पुस्तक विकत घेईन. ' आईचा मुलावर विश्वास होता, म्हणून तिनें त्याला एक रुपाया दिला. तो घेऊन सदू रामाकडे गेला. ते दोघे शाळेंत न जातां जत्रा पाहण्यास गेले. तेथें त्यांनीं दिवसभर मौज पाहिली, रुपायाची मेवामिठाई घेऊन खाल्ली. संध्याकाळीं ते आपल्या घरीं परत आले.

आतां गोष्टीचा शेवट करावयाचा होता. तो कसा करावा याजबद्दल विचार सुरू झाला. एका मुलीनें सांगितलें कीं, या मुलांना जत्रेंत एका

गृहस्थानें पाहिलें. तो गृहस्थ सदूच्या बापाचा मित्र होता. संध्याकाळीं त्यानें सदूच्या बापाला येऊन सांगितलें कीं, ' तुमचा मुलगा जत्रेंत भटकत होता, मग सदूच्या बापानें त्याला शिक्षा केली.

शिक्षकानें मुलांचें लक्ष ' आपल्या प्रेमळ आईबापांना फसविलें, म्हणून त्या मुलाला फार वाईट वाटलें, ' या वाक्याकडे वळविलें व सदूला शिक्षा मिळाल्यानंतर वाईट वाटलें हें तुम्हांला बरें वाटतें का ? अथवा त्याला स्वतांलाच वाईट वाटलें हें तुम्हांला बरें वाटतें असें विचारलें. या प्रश्नामुळें मुलांच्या विचारांना चालना मिळाली. एका मुलीनें सांगितलें कीं, ' घरीं गेल्यावर सदूला त्या दिवशीं फार वाईट वाटलें. आपण आज फार वाईट गोष्ट केली अशी त्याची खात्री झाली. ' यानंतर शिक्षकानें विचारलें, 'मग सदूनें आपला अपराध कोणाजवळ कबूल केला असेल. ' या प्रश्नानें गोष्टीचा शेवट करण्यास मुलांना चांगलीच मदत झाली एकामागून एक उत्तरें मिळालीं व पुढें दिल्याप्रमाणें मुलांनीं जुळवून गोष्ट सांगितली. ' सदूला घरीं गेल्यावर फार वाईट वाटलें. त्याला जेवणही सुचेना. तो आपल्या अंथरुणावर पडला, पण त्याला झोंप येईना. आपण आज फार वाईट गोष्ट केली. आपल्या प्रेमळ आईबापांला आपण आज फसविलें. आतां आई आपणांवर विश्वास ठेवणार नाहीं, बाबाही आपणावर विश्वास ठेवणार नाहींत, असें त्याला वाटलें. त्याचे डोळे पाण्यानें भरून आले. तो आईकडे गेला व तिला रडत रडत म्हणाला,' आई, मीं आज फार वाईट गोष्ट केली. पुन्हा मी असें कधींही करणार नाहीं. " त्यानें आईला सर्व हकिकत सांगितली व तो रडूं लागला. आईनें त्याला क्षमा केली. मग त्याला समाधान वाटलें. दुसऱ्या दिवसापासून त्यानें रामाची संगत सोडून दिली. पुन्हा त्यानें आपल्या आईबापांला कधींही फसविलें नाहीं. '

नंतर शिक्षकानें गोष्टीला नाव देण्यास मुलांना सांगितलें. ' वाईट संगतीचा परिणाम, ' ' भोळा मुलगा, ' ' प्रेमळ आईबापांचा मुलगा, ' ' अपराधाची कबुली, ' वगैरे नांवें मुलांनीं सुचविलीं. नंतर शिक्षकानें मुलांकडून संपूर्ण गोष्ट सांगवून घेतली व दुसऱ्या दिवशीं ती वहींत लिहून आणण्यास सांगितलें.

33

# चित्रकला.

आपल्या देशांत फार प्राचीन काळापासून चित्रकलेला अतिशय मान आहे. प्राचीन काळाच्या शिक्षणक्रमांत या कलेचा अंतर्भाव केला जात असे व मुलांप्रमाणेंच मुलींनाही चित्रकलेचें शिक्षण देत असत. चित्रकलेचें साधारण ज्ञान बहुतेकांना असेच. संस्कृत वाङ्मयांत या कलेचा ठिकठिकाणीं उल्लेख केलेला आढळतो. मध्यंतरीच्या अज्ञान युगांत अनेक प्रकारच्या आपत्तींमुळें इतर कलांबरोबर व शास्त्रांबरोबर या कलेचीही अवनति झाली. १९व्या शतकांत नवीन शिक्षणक्रमाला जेव्हां सुरुवात झाली, तेव्हां इंग्लिश शाळेच्या अभ्यासक्रमांत चित्रकलेला स्थान मिळालें. कांहीं वर्षांनीं प्राथमिक शाळेच्या अभ्यासक्रमांतही चित्रकलेचा अंतर्भाव करण्यांत आला. जरी प्राथमिक व दुय्यम प्रतीच्या शाळांतून हा विषय शिकविण्याचा क्रम सुरू झाला, तरी पुष्कळ वर्षेंपर्यंत पालक, शिक्षक व विद्यार्थी यांना या विषयाचें महत्त्व वाटत नसे. ज्या विद्यार्थ्यांना चित्रकलेची अभिरुचि असे किंवा ज्यांना चित्रकलेच्या साधनानें द्रव्यार्जन करण्याची इच्छा असे, तेच विद्यार्थी या विषयाचा मन लावून अभ्यास करीत व शिक्षक याच विद्यार्थ्यांना हा विषय मनःपूर्वक शिकवीत. या विषयाबद्दल विद्यार्थ्यांच्या मनांत अनास्था वाटण्यास आणखी एक कारण असे. तें म्हटलें म्हणजे हा विषय शिकविण्याची नीरस व कंटाळवाणी पद्धति हें होय. चित्रकला शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रारंभीं कित्येक महिने अनेक प्रकारच्या रेषा व भूमितींतील आकृति काढाव्या लागत. मग ठरलेल्या आकृतींची नक्कल करण्यांत त्यांचा काल फार जात असे. निरनिराळ्या प्रकारच्या वेलबुट्टींचीं चित्रें शिक्षकानें फळ्यावर लावावीं व मुलांनीं त्यांची नक्कल करावी असाही क्रम सारखा चालत असे. या सर्व गोष्टींमुळें विद्यार्थ्यांना या विषयांत बिलकूल गोडी वाटत नसे व चित्रकला म्हणजे दुसऱ्याच्या आकृतींची नक्कल असाच त्यांचा ग्रह होत असे. अलीकडे चित्रकला या विषयाचें शिक्षणदृष्ट्या असणारें महत्त्व शिक्षणशास्त्रज्ञांच्या लक्षांत आल्यामुळें प्राथमिक शाळांतही या विषयाला महत्त्वाचें स्थान मिळालें आहे.

चित्रकला ही अत्यंत सुखदायक कला आहे. चित्रकार आपल्या कलेनें आपलें मनोरंजन तर करतोच; पण तो आपल्या कौशल्यानें हजारों प्रेक्षकांचीं अंतःकरणें आनंदानें भरून टाकितो. सर्व माणसांना चित्रकार होणें शक्य नाहीं. सर्वांनाच ही कला साध्य होणें अशक्य आहे, तरी देखील चित्रकलेच्या शिक्षणानें या कलेची आवड उत्पन्न होते. ही कलाभिरुचि व सौंदर्याची आवड शुद्ध

आनंदाचा लाभ करून देते. ज्याला चित्रकलेची गोडी आहे त्याला सृष्टिसौंदर्याबद्दल अत्यंत प्रेम वाटतें. अशा प्रकारें या कलेचें शिक्षण उच्च भावनांचा विकास करण्याचें एक साधन होतें. या कलेच्या अध्ययनानें शिक्षणदृष्ट्या महत्त्वाचे असे चार फायदे होतात. १ ज्या वस्तूचें चित्र काढावयाचें असतें तिचें पूर्ण व झटकन् निरीक्षण करावें लागतें, यामुळें या विषयाचे योगानें मुलांच्या निरीक्षणशक्तीला भरपूर व्यवसाय मिळतो व तिची वाढ होते. २ स्मरणानें चित्र काढतांना ज्या वस्तूचें आपण चित्र काढीत आहों तिची लांबी व रुंदी यांचें प्रमाण, तिचें आकारमान व आकार, तिचा रंग व घाट वगैरे गोष्टींचें चांगलें स्मरण असल्याशिवाय चित्र काढणें शक्य नसतें. ग्रहण, धारणा व स्मरण या तिन्ही क्रिया उत्तम झाल्याशिवाय स्मरणानें चित्र काढतां येत नाहीं. ३ वर्णनाबरहुकूम चित्रें काढावीं लागल्यानें किंवा स्वतःच्या कल्पनेनें चित्रें काढावीं लागल्यामुळें कल्पनाशक्तीला विचारशक्तीच्या अनुरोधानें नेहमीं काम करावें लागतें, यामुळें तिची योग्य व हितकारक वाढ होते व मुलांची कल्पकताही वाढते. ४ चित्रकलेनें सदभिरुचीची वाढ होते.

मनुष्य आपले विचार, कल्पना व भावना दुसऱ्या माणसाला आपल्या वाणीनें अगर लेखणीनें व्यक्त करून दाखवितो. आपले विचार, कल्पना व भावना व्यक्त करून दाखविण्याचें चित्र हें उत्कृष्ट साधन आहे. चित्रकार आपल्या कुंचलीनें एकाद्या व्यक्तीचें, प्रसंगाचें किंवा देखाव्याचें चित्र काढतो. तें चित्र पाहिल्याबरोबर प्रेक्षकाला चित्रकाराची कल्पना स्पष्टपणें कळते. हीच कल्पना व्यक्त करून दाखविण्याला लेखकाला कित्येक पानें लिहावीं लागतीं व तितकेंही करून चित्रकार ज्याप्रमाणें आपली कल्पना चित्रानें स्पष्ट करतो, तितक्या स्पष्टपणें लेखकाला आपली कल्पना मांडतां येईल किंवा नाहीं याची शंकाच आहे. उत्तम चित्राची गोष्ट सोडून दिली, तरी साधारण चित्रानें एकाद्या गोष्टीचें जितकें ज्ञान होतें तितकें वर्णनानें होत नाहीं, याचा अनुभव वारंवार शिक्षकाला येतो. एकाद्या वस्तूची आकृति काढल्याबरोबर त्या वस्तूची जितकी स्पष्ट कल्पना मुलांना होते, तितकी ती निव्वळ वर्णनानें होत नाहीं. शास्त्रीय शिक्षणामध्यें, तर आकृतीशिवाय बिलकूल चालत नाहीं. या शास्त्रीय युगांत विद्यार्थ्यांना स्वतः आकृति काढतां येणें व दुसऱ्यानें काढलेल्या आकृति समजणें या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत आणि म्हणूनच त्याला चित्रकला साधारण तरी अवगत असली पाहिजे. सुतार, सोनार, नक्षीकाम करणारे कारागीर वगैरे लोकांना धंद्याचे दृष्टीनें चित्रकलेचें थोडेंसें तरी ज्ञान असणें इष्ट आहे.

या कलेच्या अभ्यासाला अगदीं खालच्या इयत्तेंत सुरुवात करण्यास हरकत नाहीं. पण लहान मुलांना शिकवितांना शिक्षकानें मुलांची स्वाभाविक प्रवृत्ति

लक्षांत घेतली पाहिजे. चित्रें काढण्याला निरीक्षण उत्तम लागतें. ज्या वस्तूचें चित्र काढावयाचें तिचें निरीक्षण सर्व बाजूंनीं करावें लागतें. तिची लांबी, रुंदी, उंची, आकार, आकरमान, तिचें अंतर, तिची स्थिति या सर्व गोष्टींचें निरीक्षण केल्याशिवाय चित्र काढणें शक्य नसतें. मुलांची निरीक्षणशक्ति अगदीं अपूर्ण असते. कोणत्याहि गोष्टीकडे अवधान देण्याची शक्ति त्यांच्यांत नसते. वस्तूमध्यें जो कांहीं आकर्षक भाग असेल तोच त्यांच्या लक्षांत राहातो. बाकीच्या गोष्टींकडे त्यांचें लक्षच जात नाहीं. एका इंग्लिश ग्रंथकारानें प्राथमिक शाळेंतील १००। १२५ मुलांना त्यांच्याभोंवतीं वावरणाऱ्या व्यक्तींचीं, प्राण्यांचीं व त्यांच्या अतिशय परिचयाच्या वस्तूंचीं चित्रें काढण्यास सांगितलें. त्या चित्रांत मुलांचें निरीक्षण किती अपुरें असतें व वस्तूच्या किंवा प्राण्याच्या एकाद्याच भागाकडे त्यांचें लक्ष कसें जातें हें फार चांगलें दिसून आलें. मुलींना आपल्या ओळखीच्या बाईचें चित्र काढावयास सांगितलें होतें. एका मुलीनें त्या बाईचे केस एवढे मोठे काढले होते कीं, त्या योगानें तिच्या शरिराचा सर्व भाग व्यापून गेला होता. एका मुलीनें शरिरापेक्षांही जास्त मोठी अशी टोपी आपल्या बाईच्या डोकीस घातली होती. दुसऱ्या एका मुलीनें आपल्या बाईच्या बुटांच्या खोटा किती तरी मोठ्या काढल्या होत्या. शिपायाचें चित्र काढतांना एका मुलानें आपल्या शिपायाचें हातांतील दंडुकेंण त्याच्या शरिरापेक्षांही मोठें काढलें होतें. एका मुलानें शिपायाच्या कोटाच्या गुंड्या एवढ्या मोठ्या काढल्या होत्या कीं, त्यांनींच त्याचें शरीर झांकून गेलें. मुलांचें निरीक्षण अपुरें असतें व त्यांना कोणतीही गोष्ट एकसारखी फार वेळ करितां येत नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवून शिक्षकानें आपल्या मुलांना हा विषय शिकवावा. ज्या वस्तूचें निरीक्षण करावयाचें असेल तिची लांबी, रुंदी, आकार, रंग, भाग इत्यादिकांसंबंधानें प्रश्न विचारून त्यांच्याकडे मुलांचें लक्ष वेधून घ्यावें. नंतर मुलांना आकृति काढण्यास सांगावें. अशा रीतीनें हळूहळू मुलांना काळजीपूर्वक निरीक्षण करण्याची संवय लागेल. खालच्या वर्गांत चित्रकला या विषयाचे धडे १५—२० मिनिटांपेक्षां जास्त वेळाचे नसावेत. चित्रकलेचे धडे मनोरंजक केले, तरच त्यांच्याकडे त्यांचें लक्ष लागेल. याजकरितां जी वस्तु मुलांना आवडते किंवा ज्या वस्तूचा उल्लेख गोष्टींत आला आहे अशाच वस्तूचें चित्र मुलांना काढण्यास सांगावें.

चित्र काढण्यास दुसरी आवश्यक गोष्ट म्हटली म्हणजे स्नायूंचें चलन ही होय. चित्रकाराच्या हाताचे व बोटांचे स्नायु त्याच्या इच्छेप्रमाणें काम करीत असतात. मुलांचे स्नायूंना हें शिक्षण मिळावयाचें असतें, म्हणून ते त्यांच्या इच्छेप्रमाणें काम करीत नाहींत. या स्नायूंना हळूहळू शिक्षण दिलें पाहिजे. याकरितां प्रारंभीं

मुलांकडून मुक्तबाहु चित्रलेखन काढून घ्यावें, नंतर मुक्तहस्त चित्रलेखनास सुरुवात करावी.

चित्रकलेची आवड मनुष्याच्या अंतःकरणांत अगदीं स्वाभाविक आहे. रानटी लोकही आपलें मनोरंजन करण्याकरितां जनावरांचीं, माणसांचीं व आपल्या परिचयाच्या वस्तूंचीं चित्रें दगडावर काढतात. लहान मुलेंही आपल्या भावाची अगर बहिणीची पाटी घेऊन तिजवर काऊ, माऊ काढतांना दृष्टीस पडतात. चित्रकलेच्या या स्वाभाविक आवडीचा शिक्षकानें परिपोष केला पाहिजे. तो करण्यास शिक्षकानें आपले धडे मनोरंजक केले पाहिजेत. मुलांच्या निरीक्षणशक्तीचा विकास केला पाहिजे, मुलांच्या हाताच्या व बोटांच्या स्नायूंना शिक्षण दिलें पाहिजे व मुलांना आपल्या कल्पनाशक्तीचा उपयोग करण्याची व कल्पकता दाखविण्याची संधि दिली पाहिजे.

चित्रकलेच्या अभ्यासाला पुष्कळ प्रकारचें साहित्य लागतें व हें साहित्य फार महाग असतें, यामुळें हा विषय आमच्या शाळेंत घेतां येत नाहीं असें पुष्कळ शिक्षकांचें म्हणणें असतें. चित्रकलेच्या प्रारंभीं प्राथमिक शाळेंत या विषयाला फारसें साहित्य लागत नाहीं. H. B. ची पेन्सिल, रीव्हच्या रंगाची पेटी, ब्राऊन पेपर व स्केलपट्टी एवढें सामान असल्यास कोणत्याही गोष्टीची अडचण पडणार नाहीं. रंगीत खडूच्या कांड्या महाग आहेत, म्हणून जर मुलांना त्या विकत घेतां आल्या नाहींत, तर त्याऐवजीं साधा पांढरा खडू, पिवडी, गेरू, कोळसा यांचा उपयोग करितां येईल. जमिनीवर तांबडी माती, पिवडीची पूड, काळी माती, रांगोळी, गुलाल यांच्या साहाय्यानें वेलबुट्टी काढतां येईल. जुनीं पाकिटें, रद्दी ब्राऊन पेपर, वह्यांचे पुठ्ठे वगैरे कागदांचा चित्रलेखनाला उपयोग करितां येईल. वड, बाभूळ वगैरे झाडांच्या काड्या काढून त्यांचीं टोकें ठेंचून साधारण ब्रश तयार करितां येतील. वस्तुचित्रलेखनाकरितां ज्या वस्तू वर्गापुढें ठेवावयाच्या त्या स्थानिक व सहज मिळणाऱ्या असाव्या. फुलें, डाहाळ्या, लहान झाडें, पिसें, किडे वगैरे पदार्थ व प्राणी सहज मिळवितां येतील. अशा प्रकारें उद्योगी व उत्साही शिक्षकाला चित्रकलेचें साहित्य थोडक्याशा श्रमानें व थोडक्याशा पैशानें सहज मिळूं शकेल.

## मुक्तबाहु चित्रलेखन.

चित्रलेखनाची सुरुवात या पद्धतीनें व्हावी हें मागें सांगितलेंच आहे. * "या पद्धतींत हाताची हालचाल खांद्यापासून सुरू होते. खडू हाताच्या पंजांत धरावयाचा असतो व बोटांना खडू धरण्यापलीकडे कोणतीही हालचाल करण्याचें काम नसतें.

---

* रा. गोविंद विष्णु गोखलेकृत चित्रकला.

त्यामुळें कोणत्याही प्रकारचें वाईट वळण हातास न लागतां लिहिण्याचें काम मात्र होतें. या रीतींतील वळणाच्या पद्धतीपासून आणखी एक फायदा आहे. तो असा कीं, कोणतेंही चित्र जलद, बरोबर व सहज काढण्याची संवय लागते." या पद्धतींत हात ताठ ठेवणें ही महत्त्वाची गोष्ट असते. मुक्तबाहु चित्रलेखनास भिंतींत फळे लावलेले असल्यास मुलांना चित्र काढण्यास सोपें जातें. फळे मुलांच्या उंचीप्रमाणें भिंतीस लावलेले असावे. प्रत्येक मुलास चित्र काढण्यास व तें दूर उभें राहून पाहण्यास पुरेशी जागा असावी. पण अशा प्रकारची व्यवस्था असणारी प्राथमिक शाळा बहुतेक कोठेंही दृष्टीस पडत नाहीं. आपल्या शाळांतून प्रत्येक वर्गाला एकेकच फळा असतो. एवढ्याकरितां वर्गाची जमीन चांगली सारवावी व मुलांनी बसूनच या पद्धतीनें चित्रलेखन करावें. चित्रें खडूनें किंवा कावेनें काढावीं. * "सुरुवातीचीं चित्रें वर्तुलाकार असावीं व मुलांस डावे व उजवे अशा दोन्ही बाजूंनीं तीं काढण्यास लावावीं. हाताचें वळण जलद असावें पण त्यांत कापरेपणा नसावा. चित्रांचा क्रम वर्तुळ, अर्धवर्तुळ, दीर्घवर्तुळ या आकारांच्या वस्तूंचीं चित्रें असा असावा."

मुलांच्या लक्षांत निरनिराळे आकार यावे, म्हणून जाड पुठ्ठ्यांच्या निरनिराळ्या आकृति कापाव्या. गाय, घोडा, मांजर, कुत्रा वगैरे जनावरें; पक्ष्यांच्या सोप्या आकृति, पळसाच्या किंवा फणसाच्या पानासारख्या साध्या पानांच्या आकृति कापाव्या. मुलांनीं या आकृति भुईवर ठेवाव्या व खडू, गेरू किंवा पिवडी या आकृतींभोंवतीं फिरवून बाह्याकृति काढावी. मग ती भरून काढावी. अशा रीतीनें एकाद्या जनावराचें, पक्ष्याचें किंवा पानाचें चित्र तयार होईल. बाह्याकृति काढतांना व आंतील भाग भरून काढतांना शक्य तितकें वस्तूच्या रंगाचाच उपयोग करावा. उ० पानाची आकृति काढावयाची असल्यास ती हिरव्या खडूनें भरावी. कधीं कधीं मातीचा, पिवडीचा किंवा खडूच्या पुडीचा थर पसरून त्याची आकृति तयार करावी.

## मुक्तहस्त चित्रलेखन.

मुक्तबाहु चित्रलेखनांत प्रगति झाल्यानंतर मुक्तहस्तचित्रलेखनास सुरुवात करावी. या पद्धतींत हाताची हालचाल मनगटापासून सुरू होते व पेन्सिलिला किंवा खडूला वळण बोटांपासून मिळतें. ब्राऊन पेपरवर किंवा रंगीत कागदावर खडूच्या कांडीनें या पद्धतीनें चित्रें मुलांना चांगलीं काढतां येतात व रंगीत कांड्यांनीं चित्रें काढण्यांत मुलांना आनंद वाटतो. पण खडूच्या कांड्या मिळत नसल्यास

* रा. गोविंद विष्णु गोखलेकृत चित्रकला.

किंवा त्या विकत घेणें शक्य नसल्यास मुलांनीं साध्या खडूचा, कावेचा किंवा कोळशाचा उपयोग करावा. पेन्सिलीचा उपयोग करावयाचा असल्यास ती आखूड असूं नये. मुलांनीं चित्र काढतांना बोटांत पेन्सिल दाबून धरूं नये.

चित्रकलेचे पुढें दिलेले प्रकार प्राथमिक शाळेंत घ्यावयाचे असतात:—

१ वस्तुचित्रलेखन.

२ निसर्गचित्रलेखन.

३ स्मृतिचित्रलेखन.

४ कल्पनाचित्रलेखन.

या प्रत्येक प्रकाराचा आपण क्रमशः विचार करूं.

## वस्तुचित्रलेखन.

चित्र काढण्याकरितां प्रारंभीं अगदीं सोप्या वस्तु घ्याव्या, नंतर क्रमाक्रमानें जास्त कठीण वस्तु चित्र काढण्याकरितां पसंत कराव्या. खालच्या वर्गाकरितां पसंत केलेल्या वस्तु एकरंगी असाव्या. एकापेक्षां जास्त रंगांची वस्तु असल्यास ते रंग चांगले स्पष्ट असावे. पसंत केलेल्या वस्तूला नक्षी नसावी. काठी, मुसळ, ऊस, लाटणें यांसारख्या वस्तूंचा खालच्या वर्गांत उपयोग करावा. नंतर पतंग, निशाण, पाटी, चेंडू, नारिंग, अगदीं साधें पान अशा वस्तु घ्याव्या. यानंतर पानें व फळें यांचा जास्त उपयोग करावा. ज्यांची जाडी न दाखविली, तरी जे ओळखतां येतील असे गोल व दीर्घगोल पदार्थ यानंतर घ्यावे. हें झाल्यावर घमेलें, पातेलें, कुंडी, कुंकवाची करंडी यांसारख्या गोल व दंडगोल वस्तु व पेटीसारख्या काटकोन चौकोन वस्तु मुलांच्या डोळ्याच्या रेषेंत ठेवून चित्रें काढून घेण्यास सुरुवात करावी. पूर्वींपेक्षां जास्त कठीण अशीं पानें व तीन चार पानें असलेल्या डाहाळ्या हीं काढून घ्यावीं. यानंतर पदार्थ मुलांच्या डोळ्याचे पातळीचे वर किंवा खालीं ठेवून त्यांचीं चित्रें मुलांना काढण्यास सांगावें. पदार्थ निरनिराळ्या स्थितींत ठेवून त्यांचीं चित्रें काढणें, वस्तूंचा समूह पुढें ठेवून त्याचें चित्र काढणें हीं कामें वरील इयत्तांत घ्यावीं.

चित्राकरितां वस्तु पसंत करितांना जी वस्तु आयत्या वेळीं सांपडेल ती वर्गापुढें ठेवावयाची असें करूं नये. प्रत्येक सहामाहीचे प्रारंभीं शिक्षकानें, वर्गानें ज्यांचीं चित्रें काढावयाचीं त्यांची यादी तयार करावी व या यादींत अगदीं विशेष कारणाखेरीज फरक करूं नये. मुलांना ज्या वस्तु परिचित असतील त्याचें चित्र काढण्याकरितां पसंत कराव्या. चित्र काढण्याकरितां अगदीं नवीन वस्तु पाहिजे

असें नाहीं. जुन्या अथवा मोडलेल्या वस्तु देखील चालतील. भूगोल, इतिहास, आरोग्यशास्त्र, सृष्टिनिरीक्षण वगैरे विषयांत ज्या वस्तूंचा संबंध येतो अशा वस्तु चित्रलेखनास घेतल्या असतां विद्यार्थ्यांस जास्त फायदा होतो.

चित्र काढावयाची वस्तु लहान असल्यास प्रत्येक मुलास एक एक, निदान दोन मुलांमिळून एक द्यावी. वस्तु मोठी असल्यास ती जेथून सर्व वर्गाला नीट दिसेल अशा ठिकाणीं ठेवावी.

पाठ देतांना ज्या वस्तूचें चित्र काढावयाचें असेल, तिजसंबंधीं शिक्षकानें मुलांना थोडीशी माहिती विचारावी. नंतर त्या वस्तूचें निरीक्षण करण्यास मुलांना सांगावें. मुलांनीं हें निरीक्षण केल्यानंतर शिक्षकानें त्या वस्तूचा आकार, तिचे भाग, त्या भागांचें एकमेकांशीं असलेलें प्रमाण, आकारमान, वस्तूचा रंग यांजबद्दल प्रश्न विचारून घेऊन मुलांच्या कल्पना काढून घ्याव्या. पूर्वीं मुलांनीं ज्या वस्तु काढल्या असतील, त्यांपैकीं कोणत्या वस्तूच्या आकाराशीं मुलें चित्र काढीत असलेल्या वस्तूच्या आकाराचें साम्य आहे हें मुलांना विचारावें. मुलें कोणत्या क्रमानें चित्र काढणार आहेत हेंही त्यांजकडून काढून घ्यावें. नंतर मुलांनीं चित्र काढण्यास सुरुवात करावी. मुलें आपल्या वह्या आपल्या समोर सरळ धरीत आहेत व तिरप्या धरीत नाहींत यांजकडे लक्ष द्यावें. मुलें चित्र काढीत असतांना वर्गांत फिरून मुलांची कृति लक्षपूर्वक पाहावी. एकाद्या मुलाची चूक होत असल्यास प्रश्न विचारून ती चूक त्याचे नजरेस आणावी; पण शिक्षकानें ती स्वतः दुरुस्त करूं नये. सर्वांचें काम झाल्यावर वर्गाचीं चित्रें मुलांपुढें ठेवावीं व त्या चित्रांत उत्तम चित्र कोणतें व कां हें मुलांना विचारावें. नंतर निरनिराळ्या चित्रांत कोणत्या चुका झाल्या हेंही मुलांकडून काढून घ्यावें. शिक्षकाला एवढें करण्यास वेळ नसल्यास त्यानें स्वत: वर्गांत फिरून प्रत्येक मुलाला त्याच्या चुका दाखवाव्या. वर्गांतील सर्वसाधारण चुका सर्व वर्गाला समजावून द्याव्या.

शिक्षकानें मुलांना काढावयास दिलेल्या वस्तूचें चित्र स्वतां काढून दाखवूं नये. वस्तूचें चित्र फार कठीण असेल व तें मुलांना साधत नसेल, तर मात्र शिक्षकानें मुलांचे समोर त्या वस्तूचा प्रत्येक भाग क्रमाक्रमानें सावकाश काढून दाखवावा व मुलांनीं तो लक्षपूर्वक पाहावा. अशा प्रकारें पूर्ण चित्र काढल्यानंतर व मुलांनीं तें लक्षपूर्वक पाहिल्यानंतर आपलें चित्र शिक्षकानें पुसून टाकावें व मुलांनीं आपल्यापुढें ठेवलेली वस्तु पाहून तिचें चित्र काढण्यास सुरुवात करावी.

प्रारंभींचीं सर्व चित्रें भरीव चित्रलेखनपद्धतीनें काढून घ्यावीं. भरीव चित्र असलें कीं, लहान मुलाला तें तावडतोब ओळखतें. भरीव चित्रांच्या योगानें

पदार्थांच्या जाडीची कल्पना मुलांच्या मनावर बिंबते व पुढें जेव्हां छायाप्रकाशांत पदार्थांची जाडी दाखवावी लागते तेव्हां ती पद्धति त्यांना कठीण वाटत नाहीं. रंगाचा उपयोग करण्याची मुलांना फार हौस वाटते, म्हणून शक्य तेथें मुलांना तो करूं द्यावा. रंगीत खडूच्या कांड्या मिळाल्यास बरें, नाहींतर साधा खडू, काव, पिवडी, कोळसा यांचा उपयोग मुलांनीं करावा. चित्रांत रंग भरतांना मुलें योग्य त्या रंगाचा उपयोग करीत आहेत किंवा नाहींत इकडे शिक्षकानें लक्ष द्यावें. मुलांना भडक रंग देण्याचा व आपल्या चित्रांत निरनिराळे रंग निष्कारण वापरण्याचा फार मोह होतो. कुत्र्याला हिरवा रंग देणें किंवा कावळा काढतांना त्याचे पायाला तांबडा रंग देणें ही गोष्ट चित्रकलेच्या दृष्टीनें अक्षम्य आहे हें मुलांच्या मनावर ठसलें पाहिजे.

पाहणाऱ्यापासून वस्तूच्या असलेल्या अंतराप्रमाणें त्या वस्तूच्या चित्राचें आकारमान बदलतें ही कल्पना मुलांना देणें आवश्यक आहे. सारख्या आकाराचे दोन चेंडू घेऊन एक जवळ ठेवावा व एक लांब ठेवावा व मुलांना दोहोंचीं चित्रें काढण्यास सांगावें. दोन सारख्या आकाराच्या व सारख्या लांबीच्या व जाडीच्या काठ्या घेऊन एक जवळ व एक लांब ठेवावी व मुलांना त्या दोहोंचें चित्र काढण्यास सांगावें, म्हणजे वर सांगितलेली कल्पना मुलांचे लक्षांत येईल.

ज्या वस्तूचें चित्र मुलांना काढावयास सांगितलें असेल ती उठावदार दिसण्याकरितां तिच्या रंगाला साजेल असा कागद अथवा कपडा तिचेमागें ठेवावा. उदाहरणार्थ, मुलांना पपनसाचें चित्र काढावयास सांगितलें असल्यास वर्गापुढें ठेवलेल्या पपनसाचे मागें निळ्या रंगाचा कागद ठेवला, म्हणजे त्या फळाचा रंग अधिक उठावदार दिसेल. कलिंगडाच्या मागें गर्द हिरवा कागद व तांब्याच्या गडव्यामागें काळसर ब्राउन पेपर ठेवला असतां हे पदार्थ जास्त उठावदार दिसतात. वस्तु काळ्या रंगाची असल्यास तिच्यामागें पांढरा कागद ठेवावा. वस्तु पांढऱ्या रंगाची असल्यास तिच्यामागें काळा कागद अथवा फळा ठेविला म्हणजे ती उठावदार दिसेल. ज्या वेळेस वस्तूंच्या समूहाचें चित्र मुलांना काढावयाचें असेल त्या वेळेस त्या वस्तूंची मांडणी व्यवस्थित दिसेल अशी करावी.

## निसर्गचित्रलेखन.

पानें, कळ्या, फुलें, झाड, वेल, कीटक, पक्षी वगैरे सृष्टपदार्थांचीं व प्राण्यांचीं चित्रें काढणें याला निसर्गचित्रलेखन म्हणतात. मनुष्यकृत पदार्थांपेक्षां सृष्टपदार्थांत अधिक सौंदर्य असतें. मुलांना हे पदार्थ काढण्याची गोडी लागली कीं,

त्यांच्या सौंदर्याभिरुचीची वाढ होत जाते. निसर्गचित्रलेखन अगदीं साध्या व सोप्या पानापासून करावें. रुईचें, पांढऱ्या चाफ्याचें अगर पिंपळाचें पान काढण्यास फार सोपें असतें. त्याचप्रमाणें मोसंबीं, संत्रें, पेरू यांसारखीं फळेंहि काढण्यास फार सोपीं असतात. तेव्हां प्रारंभीं सांगितलेल्या पानांप्रमाणें साधीं पानें व फळें घ्यावीं. हळूहळू जास्त कठीण आकाराचीं फळें व पानें घ्यावीं. यानंतर क्रमाक्रमानें तीन चार पानें, कळी व फूल असलेली फांदी, कापशी, तुती, एरंड यांसारखीं पानें, रंगांचीं पिसें, लहान झाडें, कीटक, पाकोळ्या, पक्षी व जनावरें हीं घ्यावीं.

निसर्गचित्रलेखनाचे धडे सृष्टिनिरीक्षण या विषयाला जोडून घेतल्यानें फार फायदा होतो. निसर्गचित्रलेखनाला ऋतुमानाप्रमाणें वनस्पति, प्राणी व कीटक यांची निवड करितां येईल. निसर्गचित्रलेखनाचे वेळीं त्या सृष्टवस्तूचें किंवा प्राण्याचें चित्र किंवा नमुना वर्गापुढें ठेवून चित्र काढण्यास सांगूं नये. निसर्गचित्रलेखनांत रंगाचा उपयोग करण्यास मुलांना फार आनंद वाटतो. पुढें असलेल्या फुलाचे किंवा कीटकाचे निरनिराळे रंग मुलें लक्षपूर्वक पाहातात व तसेच रंग आपल्या चित्रांत आणण्याचा प्रयत्न करतात.

## स्मृतिचित्रलेखन

स्मृतिचित्रलेखन हा भाग महत्त्वाचा आहे. या लेखनांत ज्या वस्तूचें चित्र काढावयाचें ती वस्तु मुलांच्या समोर नसते. त्या वस्तूचे भाग, त्यांचें प्रमाण, त्या वस्तूचा आकार या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांना आठवाव्या लागतात. मुलें स्मृतीनें चित्रें काढूं लागलीं कीं, आपलें निरीक्षण कसें बरवर असतें याची साक्ष त्यांच्या मनाला पटते. नंतर त्यांना वस्तु काळजीपूर्वक निरीक्षण करण्याची संवय लागते. स्मृतिचित्रलेखनाचे तीन प्रकार आहेत:—(१) वस्तु मुलांना तीन चार मिनिटें दाखवून ती स्मृतिआड करणें व तिचें चित्र स्मरणानें काढण्यास सांगणें. (२) मुलांनीं पाहिलेल्या एकाद्या वस्तूचें चित्र काढण्यास सांगणें. (३) मुलांनीं जें चित्र मागील धड्यांत काढलें तेंच स्मरणानें पुन्हा काढण्यास सांगणें. यांतील तिसरा प्रकार एकादे वेळींच घ्यावा. मुलानें स्मरणानें चित्र झटपट काढावें. या पाठाला ५–१० मिनिटांपेक्षां जास्त वेळ देऊं नये. शिक्षकानें वर्गांत हिंडून कोणाचें चित्र चुकत आहे हें पाहावें. सर्वांचें चित्रलेखन झाल्यावर ती वस्तु वर्गांत आणून मुलांना निरीक्षण करण्यास सांगावें व त्यांच्या कोणत्या चुका झाल्या आहेत हें प्रश्न विचारून त्यांच्याकडूनच काढून घ्यावें.

## कल्पनाचित्रलेखन.

मुलांना आपण गोष्ट सांगितल्यानंतर त्यांना त्या गोष्टींतील आवडेल त्या वस्तूचें, प्राण्याचें किंवा व्यक्तीचें चित्र काढण्यास सांगावें. मुलें मोठ्या आवडीनें हीं चित्रें काढतात. अर्थात् हीं चित्रें ओबडधोबड असतात; पण आपल्या मनांतील कल्पना चित्रद्वारें व्यक्त करून दाखविण्याचा हा उत्तम प्रारंभ आहे. गद्य, पद्य, इतिहास, भूगोल वगैरे विषयांना जोडून हें कल्पनाचित्रलेखन घेतां येईल. शिक्षकानें मुलांचें चित्र कितीहि ओबडधोबड असलें, तरी त्यांचा हिरमोड करूं नये. चुका थोडक्यांत दुरुस्त होण्याजोग्या असल्यास त्या मुलांकडून दुरुस्त करून घ्याव्या. एकाच गोष्टींतील, निरनिराळीं मुलें निरनिराळीं चित्रें काढतात. या चित्रलेखनांत मुलांना सर्वस्वीं आपल्या कल्पनाशक्तीवर अवलंबून राहावें लागतें, यामुळें त्या शक्तीला चांगला व्यवसाय मिळतो. या व्यवसायामुळें दुसऱ्यांचींहि चित्रें समजण्यास मदत होते.

## प्रमाणचित्रलेखन.

आरंभीं खालच्या वर्गांत पोष्टाचें कार्ड, पोष्टाचें पाकीट, पाटी, पुस्तक, काड्यांची पेटी अशा वस्तूंचीं चित्रें पट्टीनें आखून काढण्यास शिकवावीं. म्हणजे पुढें वरच्या वर्गांत मोजमापाचीं चित्रें काढावयास शिकविण्याला सोपें जाईल. मुलांना वर्तुळ, अर्धवर्तुळ वगैरे आकृति सहज काढतां येतात; पण प्रारंभीं कांहीं दिवस सरळ रेषा काढणें त्यांना फार जड जातें आणि म्हणूनच कांहीं दिवस त्यांना सरळ रेषा काढण्यास पट्टीचा किंवा आखणीचा उपयोग करूं द्यावा. पुढें कांहीं दिवसांनीं प्रमाणाचीही कल्पना मुलांना द्यावी. पट्टीचा उपयोग करतां येऊं लागला व प्रमाणाची कल्पना आली, म्हणजे या गोष्टी हस्तव्यवसायाला व नकाशे आणि आराखडे काढण्याला फार उपयोगी पडतील. वस्तूचें रेषाचित्र आपणांला तीन प्रकारांनीं काढतां येईल. त्या वस्तूची लांबीरुंदी मोजून तेवढ्या रेषा मोजून चित्र काढतां येईल. परंतु ती वस्तु फार मोठी असली, म्हणजे मग तेवढ्याच लांबीरुंदीचें रेषाचित्र आपणांस आपल्या लहान कागदांत काढतां येणार नाहीं, म्हणून आपणांला आपल्या कागदाच्या मानानें मूळ रेषांच्या अर्ध्या, पाव, आठव्या हिश्शाइतक्या किंवा दुसऱ्या कोणत्या तरी हिश्शाइतक्या रेषा काढून चित्र काढावें लागतें. उलट पक्षीं वस्तु लहान असेल, तर आपणांला मूळ वस्तूपेक्षां मोठें चित्र काढावें लागतें. मग आपण चित्राच्या लांबीच्या, रुंदीच्या वगैरे रेषांच्या दुप्पट, तिप्पट किंवा अशीच कोणती तरी पट घेऊन चित्र काढावें लागतें. या सर्व गोष्टी शिक्षकानें मुलांच्या लक्षांत आणून द्याव्या. प्राथमिक शाळांतून यांपैकीं पाहिले दोन प्रकार शिकवावयाचे असतात.

प्रमाणचित्रलेखनांत प्रारंभीं जेवढी वस्तु असेल तेवढीच काढून घ्यावी. उदाहरणार्थ, पत्राचें पाकीट जर मुलांकडून प्रमाणांत काढून घ्यावयाचें असेल, तर प्रथम मुलांनीं त्या पाकिटाचें साधारण रेषाचित्र काढावें. नंतर एका मुलानें त्या पाकिटाची लांबी व रुंदी मोजावी व तीं मापें मुलांनीं आपल्या आकृतीच्या रेषांवर लिहावीं. नंतर पट्टीच्या साहाय्यानें दिलेल्या मापाच्या लांबीरुंदीच्या रेषा काढून आपली आकृति पुरी करावी. अशा प्रकारें लहान लहान वस्तूंच्या आकृति त्या वस्तूंच्या मूळ प्रमाणांत मुलांना काढतां येऊं लागल्यावर ज्यांचें चित्र मूळ वस्तूपेक्षां लहान काढावें लागेल, अशा वस्तु प्रमाणचित्रलेखनाकरितां घ्याव्या. उदाहरणार्थ, पेटी. ही पेटी मुलांच्या डोळ्यांच्या समोर ठेवून (मुलांना पेटीचा वरचा पृष्टभाग न दिसेल अशी मात्र काळजी घ्यावी.) समोरील बाजूचें साधारण रेषाचित्र त्यांना काढण्यास सांगावें. मग एका मुलानें त्या बाजूची लांबी व उंची मोजावी व तीं मापें मुलांनीं आपल्या आकृतीच्या रेषांवर लिहावीं. एवढ्या मापाचें चित्र आपल्या कागदांत काढणें शक्य नाहीं, म्हणून कांहीं तरी प्रमाण धरून लहान आकृति काढावी लागेल ही गोष्ट मुलांचे लक्षांत येईल. हें प्रमाण मुलानें आपल्या कागदाच्या मानानें ठरवावें. पेटीची लांबी २ फूट व उंची १॥ फूट असल्यास व चित्र आपल्या नेहमींच्या साध्या वहींत काढावयाचें असल्यास एक फुटास २ इंच हें किंवा याच बेताचें दुसरें एकादें प्रमाण मुलांनीं ठरवावें. हें प्रमाण मुलांनीं आपल्या वहींत लिहावें. नंतर या प्रमाणांत लांबीच्या व उंचीच्या रेषा पट्टीनें मोजून काढून आपली आकृति पुरी करावी. नंतर वरील पृष्ठभागाची व बाजूची ही आकृति याप्रमाणेंच काढावी. पुढें पेटीचा वरील पृष्ठभाग समोरचा भाग व बाजूचा भाग हे एकमेकांशेजारीं व्यवस्थितपणें काढण्यास शिकवावे, म्हणजे ही घनभूमितींतील आकृति काढण्याची तयारी होईल.

नक्षी किंवा वेलबुट्टी हा चित्रकलेंतील कौशल्याचा एक प्रकार आहे. वेलबुट्टीनें किंवा नक्षीनें पदार्थाला शोभा येते व तो सुंदर दिसतो. पानांचे भोंवतीं घातलेली रांगोळी, देवाचे पुढें रांगोळीचे काढलेले गालिचे हेही याच प्रकारच्या चित्रकलेचे नमुने होत. वेलबुट्टी अथवा नक्षी यांचा उपयोग निरनिराळे कारागीर आपल्या धंद्यांत करितात. सोनार डागिन्यावर व चांदीच्या भांड्यावर सुंदर नक्षी काढतो. सुतार लाकडावर सुंदर नक्षी खोदतो. विणकरी आपल्या वस्त्राच्या कडेला मनोहर वेलबुट्टी काढतो. पुस्तकांत फोटोचे भोंवतीं, चित्राचे भोंवतीं, भिंतीवर, छतावर देखील आपण सुंदर नक्षी पाहतों. नक्षी मुख्यतः दोन प्रकारची असते. वर्तुळ, अर्धवर्तुळ, चौरस, काटकोन, चौकोन, त्रिकोण वगैरे भूमितीच्या आकृतीच्या साहाय्यानें नक्षी काढतात किंवा पानें, फुलें, फुलपाखरें वगैरे

सृष्ट पदार्थ व प्राणी यांच्या चित्रांचे आधारानें नक्षी काढतात. या चित्रलेखनाची आवड मुलांच्या मनांत पहिल्यापासून उत्पन्न करावी. भूमितींतील ठिपके, रेषा, वर्तुळ, काटकोनचौकोन वगैरे आकृति यांचे साहाय्यानें होणारी साधी नक्षी आरंभीं काढण्यास शिकवावी. वर्तुळ, चौरस, काटकोन, चौकोन, बदामचा एक्का आणि चौकटचा एक्का यांसारख्या आकृति पुठ्ठयाच्या कापाव्या. मुलांनीं वर्तुळें घेऊन तीं एकमेकांना लावून ठेवावीं व त्यांच्या कडेच्याभोंवतीं खडू फिरवून या आकृति रांगोळीनें भराव्या. अशाच रीतीनें बदामच्या एक्क्याच्या आकृति भरून नक्षी तयार होईल. अशाच प्रकारें साध्या पुठ्ठयांचीं साधीं पानें कापून त्याचीही सुंदर नक्षी तयार करितां येईल. मधून मधून रांगोळीचेही कांहीं नमुने शिक्षकानें मुलांकडून काढून घ्यावे. भिंतीवर कोणती नक्षी शोभेल, भुईवर रांगोळीचा कोणता नमुना शोभेल, फोटोफ्रेमच्याभोंवतीं कोणता नमुना शोभेल याची माहिती मुलांना द्यावी. दिवाळी व इतर सणावाराच्या दिवशीं रांगोळीचे नमुने काढण्याला मुलांना उत्तेजन द्यावें. साधारणपणें प्राथमिक शाळांत या बाबतींत यापेक्षां जास्त करणें पुष्कळ शाळांत शक्य नसतें.

प्राथमिक शाळांत कुंचलीनें रंगीत चित्रें काढण्याची संवय मुलांना लावावी. कुंचलीचा उपयोग अगदीं खालच्या इयत्तांत मुलांना करितां येत नाहीं. साधरणपणें तिसऱ्या, चौथ्या इयत्तेपासून कुंचलीचा उपयोग मुलांनीं करावा. प्रथमतः पिवळा, निळा, तांबडा व काळा हे रंग मुलांनीं उपयोगांत आणावे. पहिल्या तीन रंगांच्या मिश्रणानें हिरवा, केशरी, जांभळा वगैरे रंग कसे तयार करावे हें मुलांना शिकवावें व मग त्यांचा उपयोग मुलांनीं करावा. आरंभीं कुंचलीनें काढावयाच्या आकृति अगदीं सोप्या असाव्या. वड, फणस, पिंपळ, पांढरा चाफा यांचीं पानें, संत्रें, पेरू यांसारखीं फळें हीं आरंभीं कुंचलीनें काढावीं. बाह्य रेषा प्रथम न काढतां भरीव चित्रलेखनपद्धतीनें हीं चित्रें काढावीं. यानंतर क्रमाक्रमानें जास्त अवघड वस्तु कुंचलीचे चित्रलेखनास घ्याव्या. खेडेगांवच्या सर्व शाळांतून असल्या प्रकारचें चित्रलेखन घेण्याची सोय नसते. जेथें शक्य असेल तेथें मात्र तें अवश्य घ्यावें.

चित्रकलेची आवड मुलांच्या मनांत उत्पन्न करण्याकरितां शिक्षकानें मुलांना आपल्या कल्पना व विचार व्यक्त करण्याची पुष्कळ संधि दिली पाहिजे. आपल्या आवडी व आपल्या कल्पना लादून केवळ यंत्राप्रमाणें त्यांच्याकडून धडे तयार करून घेतल्यानें या विषयाचा तिटकारा मुलांना येण्याचा संभव असतो. मुलांना जो पदार्थ आवडत असेल त्याचें चित्र काढण्यास उत्तेजन द्यावें. प्रत्येक मुलानें आपल्याजवळ एक वही बाळगावी व त्या वहींत आपण जो पदार्थ पाहिला

असेल अथवा जो प्राणी पाहिला असेल त्याचें चित्र काढावें व त्या चित्राखालीं तारीख घालावी. गोष्ट सांगून त्या गोष्टींतील प्रसंगासंबंधानें किंवा गोष्टींतील पदार्थ, व्यक्ति किंवा प्राणी यांचीं चित्रें काढण्यास सांगावें. वहीवर, नकाशा-भोंवतीं, वर्गाच्या वेळापत्रकाच्या भोंवतीं मुलांना वेलबुट्टी काढण्यास सांगावें. मुलांच्या कल्पकतेला उत्तेजन द्यावें. वस्तुचित्रलेखनाकरितां नमुने गोळा करण्यास मुलांना उत्तेजन द्यावें. मुलांचीं उत्तम चित्रें वर्गात लावावीं. झाडें, पानें, फुलें, पांखरें यांचीं चित्रें काढण्यास उत्तेजन द्यावें. चित्रकलेचे धडे शक्य तितके मनोरंजक करावे. चित्रकलेचा तास हा एक मनोरंजनाचा तास अशीच मुलांची भावना व्हावी.

वरील विवेचनावरून चित्रकलेसंबंधानें पुढील महत्त्वाच्या गोष्टी शिक्षकाच्या ध्यानांत येतील:—

१ चित्रकलेची आवड स्वभाविकपणें मनुष्याच्या अंतःकरणांत असते.

२ चित्रकलेच्या शिक्षणानें मुलांच्या सहृदयता व सदभिरुचि या दोन भावनांचा विकास होतो. सृष्टिसौंदर्याबद्दल प्रेम उत्पन्न होतें व कलाकौशल्याच्या कामानें मनोरंजन करण्याची पात्रता अंगीं येते.

३ चित्रकलेच्या शिक्षणानें मुलांची निरीक्षणशक्ति वाढते, स्मरणशक्तीला उत्तम व्यवसाय मिळतो व कल्पनाशक्तीची व कल्पकतेची वाढ होते.

४ चित्रकलेच्या शिक्षणानें आपले विचार, भावना व कल्पना चित्रद्वारा प्रकट करतां येतात व दुसऱ्याचेहि चित्रद्वारा प्रकट केलेले विचार, कल्पना व भावना समजतात.

५ धंद्याच्या व शास्त्राच्या दृष्टीनें मुलांना चित्रकलेचें साधारण तरी ज्ञान असणें इष्ट आहे.

६ चित्रें काढण्याला प्रत्यक्ष वस्तु पुढें ठेवावी. दुसऱ्यानें काढलेल्या चित्राची नुसती नक्कल मुलांकडून करून घेऊं नये.

७ या विषयाला अगदीं खालच्या इयत्तेपासून सुरुवात करावी. प्रथमतः मुक्तबाहूचित्रलेखन घ्यावें; मग मुक्तहस्तचित्रलेखन घ्यावें.

८ स्मृतिचित्रलेखन व कल्पनाचित्रलेखन यांनाहि स्थान असावें.

९ शक्य तितक्या स्थानिक व सहज मिळणाऱ्या साहित्याचा व वस्तूंचा उपयोग करावा.

१० हा विषय शिकवितांना मुलांना शक्य तितकें स्वातंत्र्य द्यावें व आपल्या कल्पना चित्रद्वारा प्रकट करण्यास संधि द्यावी.

मुंबई इलाख्यांतील प्राथमिक शाळांतील चित्रकलेचा अभ्यासक्रम साधारण पुढें दिल्याप्रमाणें आहे.

शिशुवर्ग व पहिली इयत्ता. वाळूंत बोटानें अगर काडीनें, जमिनीवर, भिंतीवर, अगर जाड पुठ्यावर खडूनें चित्र काढणें. तसेंच जेव्हां शक्य असेल तेव्हां रंगीत खडूनें किंवा कुंचलीनें चित्र काढणें.

चित्र काढावयाची वस्तु मुलांच्या परिचयाची असावी. ती प्रत्यक्ष पुढें ठेवून चित्र काढावें. ती एकरंगी असावी. तिला नक्षी नसावी. वस्तूला एकापेक्षां जास्त रंग असल्यास ते ठळक असावे.

मुलांच्या नेहमीं पाहाण्यांत येणाऱ्या वस्तूंच्या पुठ्ठ्यांच्या कापून तयार केलेल्या आकृतीवरून आराखडा काढून घेऊन त्यांत रंग भरावयास सांगणें.

वेगवेगळ्या रंगाच्या बिया, मणी यांचे साहाय्यानें मुलांना रंगांचीं नांवें शिकवावीं. एकाशेजारीं दुसरा कोणता रंग चांगला दिसतो तें पाहण्यास सांगावें.

लहान मुलांना ऐकलेल्या गोष्टींतील त्यांना आवडेल तीं चित्रें कल्पनेनें काढण्यास सांगणें. स्वतः एकादें चित्र काढून तें कशाचें आहे, काय आहे हें मुलांना सांगण्यास उत्तेजन देणें.

दुसरी इयत्ताः—मागील इयत्तेंतील अभ्यासक्रम पुढें चालू ठेवणें. ज्या वस्तूंना जाडी नाहीं व फक्त लांबी रुंदी आहे अशा वाटोळ्या व अंड्यासारख्या 'आकाराच्या' वस्तु व सोपीं पानें, फळें काढण्यास सांगणें. शक्य असल्यास चित्र काढण्याचे वेळीं पेन्सिल व फुटपट्टी यांचा उपयोग करण्यास शिकवावें.

स्मृतिचित्रलेखन व कल्पनाचित्रलेखनः—मुलांच्या माहितीच्या पण ज्यांचें चित्र मुलांनीं वर्गांत काढलें नाहीं अशा वस्तूंचीं ५ ते १० मिनिटांत चित्रें काढणें. कधीं कधीं काढलेल्या वस्तूंचीं चित्रें काढणें.

इयत्ता ३ रीः—मागील इयत्तांतील अभ्यासक्रम चालू ठेवावा. दंडाकृति, शंखाकार, लांबट चौरस अशा वस्तु डोळ्याच्या रेषेंत ठेवून काढणें.

निसर्गवस्तुचित्रलेखनः—तीनचार पानें असलेली डहाळी, संयुक्त पान.

पोष्टाचें पाकिट, काड्यांची पेटी यांसारख्या वस्तूंचें माप मुलांना सांगून त्याच वस्तूएवढ्या आकाराचें चित्र काढावयास शिकवावें.

इयत्ता चवथीः---डोळ्याचे रेषेखालीं किंवा वर असलेल्या वस्तूंचें चित्र काढणें. निसर्गवस्तुचित्रलेखनाला मागील इयत्तेपेक्षां जास्त कठीण वस्तु द्याव्या.

इयत्ता ५ वीः---उभ्या, आडव्या, तिरप्या स्थितींत ठेवलेल्या पदार्थांचीं चित्रें.

इयत्ता ६ वी ७ वीः---वस्तूंच्या समूहाचीं चित्रें काढणें.

चित्रें काढण्याकरितां पुढें कांहीं वस्तूंची यादी दिली आहे. एका गटांत त्याच प्रकारच्या वस्तु दिल्या आहेत. गटांचा अनुक्रम कठिणपणाचे मानानें ठरविलेला आहे.

गट १ लाः---( बाल वर्गाकरितां ) पिंवळा चेंडू, निळा चेंडू, काळा चेंडू, तांबडा चेंडू, लिंबू, कौठ, बोर, सोंगटी, कागदाची गुंडाळी ( रंगीत ), रंगीत खडूची कांडी, वरवंटा उभा.

निसर्गचित्रलेखनः---संत्रें, पेरू, कांदा, अंजीर, उंबर, केळें, वडाचें पान, फणसाचें पान, कुंम्याचें पान, पळसाचें पान, विड्याचें पान, पांढऱ्या चाफ्याचें पान.

पुठ्ठयाच्या तयार केलेल्या आकृतिः---वर दिलेल्या पानांचे आकार, उंदीर, हरण, मांजर, पाकोळ्या.

गट २ राः---तवा, ताट, वेळणी, पितळी, पाकीट ( पोस्टाचें ), चौरस फळी, निशाण, पंखा ( चौकोनी ), पाटी, पतंग.

निसर्गचित्रलेखनः---बांबू, ऊस, शेवग्याची शेंग, मुळा, गाजर, काकडी, दुध्या भोपळा, खरबूज, तुतीचें पान, कापशीचें पान, पिंपळाचें पान, पेरूचें पान.

गट ३ राः---कंदिलाची वाटोळी कांच, चौरस फळी, आयताकृति फळी, पाटी, आरसा.

निसर्गचित्रलेखनः---वांगें, नारळ, दोडका, आंबा, तुतीचें पान, काकडीचें पान, भोपळीचें पान, घेवड्याचें पान, जास्वंदीची कळी, गुलाबाची कळी.

गट ४ थाः---वाटोळा डबा, कुंडी, बादली, घमेलें, कढई, पातेलें, नसराळें, तपेलें, हंडी, बरणी, बाटली.

निसर्गचित्रलेखनः---संयुक्त व कठीण आकाराचीं साधीं पानें, कळ्या.

# मुलांकरितां कविता.

## सकाळची प्रार्थना.

### दिंडी.

दिवस आतां उगवला गार वारा ।
वाहुनियां सुख देत आपणांला ॥
मधुर सुटला हा वास किति फुलांचा ।
गोड भारी हा वेळ सकाळींचा ॥ १ ॥

पक्षि उठुनी लागले गावयाला ।
गाइ निघती रानास जावयाला ॥
चला आतां सोडुनी आळसाला ।
काम लागूं आपुलें करायाला ॥ २ ॥

हात अपुले चिमकुले जोडुनीयां ।
करूं आधीं या नमन देवराया ॥
सदां बालांवर असो तुझी माया ।
रक्षि बालांना कृपा करूनियां ॥ ३ ॥

असें विनवोनी तया देवराया ।
चला आतां या काम करायाला ॥
मनापासुनि तें काम करित जावें ।
मायबापां गुरुजींस तोषवावें ॥ ४ ॥

# बालवर्गाचें वाचन.

गेल्या वर्षी या ट्रेनिंग कॉलेजांत बालवर्गाला वाचन शिकविण्याचे कांहीं प्रयोग केले होते, त्याची हकिकत आमच्या वाचकांना मनोरंजक व उपयुक्त वाटेल असें समजून ती आम्हीं या अंकांत देण्याचें योजिलें आहे.

बालवर्गात एक वर्ष राहून मुलांना वाचनाची गोडी लागली पाहिजे व न अडखळतां एकादी लहान व जोडाक्षरें नसलेली साधी गोष्ट वाचतां आली पाहिजे. इतकी प्रगति या वर्गात न झाली, तर मुलांचा वेळ व उत्साह यांचा योग्य उपयोग शिक्षकानें केला नाहीं ही गोष्ट उघडच होईल. या दृष्टीनें बालवर्गाला वाचन शिकविण्याच्या पद्धतींत कांहीं सुधारणा करितां येईल कीं नाहीं हें पाहण्याकरितांच हे प्रयोग करून पाहिले होते

पंजाबांतील शिक्षणशास्त्रज्ञ मि. म्याकि यांची गोष्टीच्या साहाय्यानें वाचन शिकविण्याची पद्धति आपल्या मराठी भाषेला कितपत उपयोगी पडेल याचा पहिल्यानें काळजीपूर्वक विचार केला. 'मुलांना अक्षरें शिकण्यांत गोडी वाटत नाहीं व नुसते शब्दही वाचण्यांत त्यांना गोडी वाटत नाहीं आणि त्यांचा अर्थही त्यांना नीट कळत नाहीं. मुलांना वाक्याचा अर्थ चांगला कळतो व लहान लहान वाक्यें असणारी गोष्ट ऐकण्यांत व वाचण्यांत त्यांना फार आनंद वाटतो. तेव्हां पहिल्यानें मुलांना गोष्ट सांगावी, मग ती वाचून दाखवावी. तिच्या साहाय्यानें गोष्टींतील वाक्यें मुलांना ओळखण्यास व वाचण्यास शिकवावें. नंतर वाक्यांतील शब्द व शेवटीं मूळाक्षरें ओळखण्यास व वाचण्यास शिकवावें. प्रथम गोष्ट, नंतर वाक्यें, मग शब्द व शेवटीं अक्षरें असा वाचन शिकविण्याचा क्रम असावा ' असें मि. म्याकि व दुसरे त्यांच्या पद्धतीचे अनुयायी यांचें

म्हणणें आहे. आपल्या शाळांतून वाचन शिकविण्याचा क्रम याचे अगदीं उलट आहे. आपण प्रथम अक्षरें, मग शब्द, नंतर वाक्य व शेवटीं गोष्ट घेतों.

मि. म्याकि यांची वाचन शिकविण्याची पद्धति जशीच्या तशीच घेणें इष्ट वाटलें नाहीं; कारण मराठी भाषेची देवनागरी लिपी व इंग्लिश व उर्दू या भाषांची अपूर्ण लिपी यांत महदंतर आहे. देवनागरी लिपीमध्यें वर्णांची संख्या भरपूर आहे. इंग्लिशमध्यें व उर्दूमध्यें ती अपुरी आहे. देवनागरी लिपीमध्यें एका वर्णाला एकच स्वतंत्र उच्चार असतो. इंग्लिश वगैरे लिपींचें तसें नसतें. देवनागरी लिपींत अचा उच्चार अ हाच असतो, त्या वर्णाला दुसरा कोणताही उच्चार नाहीं. क या वर्णाचा क हाच उच्चार ठरलेला आहे. या वर्णाचा दुसरा कोणताही उच्चार होत नाहीं. इंग्लिशमध्यें A या स्वराचा उच्चार कधीं ए होतो, कधीं आ उच्चार होतो, कधीं ऑ असा उच्चार होतो, तर कधीं अ असाही उच्चार होतो. कोणत्या वेळीं कोणता उच्चार व्हावा याजबद्दल ठरलेले नियम नाहींत. C या वर्णाचा कधीं क हा उच्चार होतो, तर कधीं स होतो. देवनागरी लिपीमध्यें एका उच्चाराला एकच वर्ण येतो, दुसरा कधींही येत नाहीं. प या उच्चाराला प या वर्णाचाच उपयोग होतो, दुसऱ्या कोणत्याही वर्णाचा उपयोग कधींही करतां यावयाचा नाहीं. इंग्लिशमध्यें असें नसतें. ए हा उच्चार करण्यास कधीं A या स्वराचा उपयोग करावा लागतो, तर कधीं E चा उपयोग करावा लागतो, कधीं Ai या दोन स्वरांचाही उपयोग करावा लागतो. देवनागरी लिपींत वर्णाचें जें नांव तोच त्याचा उच्चार असतो. वर्णाचें नांव ग व त्याचा उच्चारही ग, वर्णाचें नांव प तर उच्चारही 'प' च असतो. इंग्लिशमध्यें वर्णाचें नांव एक, तर त्याचा उच्चार भलताच असतो. वर्णाचें नांव डब्ल्यु, तर त्याचा उच्चार व, वर्णाचें नांव

एच् तर त्याचा उच्चार ह, वर्णाचें नांव यू, तर त्याचा उच्चार अ, असा प्रकार असतो. देवनागरी लिपींतील अक्षरें ओळखतां आलीं कीं, त्या भाषेंतील कोणताही शब्द किंवा वाक्य वाचतां येतें, तशी स्थिति इंग्लिश लिपीची नाहीं. लिपींतील २६ अक्षरें मुलांना चांगलीं वाचतां आलीं, तरी त्यांना त्या भाषेंतील एकही शब्द वाचतां येणार नाहीं, किंवा त्याचा अर्थही कळणार नाहीं. मुलानें C a t हीं अक्षरें वाचलीं व तोंडानें, सी ए टी असें म्हटलें, तरी हा शब्द क्याट आहे हें कांहीं त्याच्या लक्षांत येणार नाहीं. दोन लिपींतील हा सर्व फरक लक्षांत घेऊन गटाचे पद्धतीनें मुलांना अक्षरओळख करून देण्याचें ठरविलें.

इंग्रजी भाषा गोष्टीच्या पद्धतीनें शिकविण्यांत एक गोष्ट शिक्षकाला व मुलांना अत्यंत साहाय्यकारक असते. इंग्रजीमध्यें सामान्यरूपें व विभक्तींचे प्रत्यय ( षष्ठीखेरीज ) नाहींत व क्रियापदांचीं रूपें काळ, लिंग, वचन, अर्थ यांच्या अनुरोधानें फारशीं बदलत नाहींत. यामुळें क्रियापदाचें किंवा नामाचें तेंच तेंच रूप नेहमीं मुलांच्या समोर राहातें व तें कित्येक वेळां त्यांच्या दृष्टीसमोरून गेल्यामुळें तें त्यांला ओळखण्याचा बराच संभव असतो, पण मराठींत तसें नसतें. मराठी भाषेंत सामान्यरूप व प्रत्यय यांची गर्दी असते. एकाद्या गोष्टींत 'घोडा' शब्द असला, तर त्याचीं, घोड्याचा, घोड्या, घोड्याहून, घोड्यांत, घोड्यास, घोड्याला, घोड्यानें अशीं अनेक रूपें मुलांच्या दृष्टीस पडतात, पण इंग्लिशमध्यें तसें नसतें. शब्दयोगी अव्ययाच्या साहाय्यानें विभक्तींचें कार्य इंग्लिशमध्यें होत असल्यामुळें शब्दाचें मूळरूप बहुतेक बदलत नाहीं, जसें:—

a horse, by a horse, for a horse वगैरे. इंग्लिशमध्यें सामान्यरूपें व विभक्तिप्रत्यय नसल्यामुळें शब्दाचें एकच रूप अनेक

वेळां मुलाचे नजरेस पडतें व तें त्याला ओळखतां येण्याचा पुष्कळ संभव असतो.

दुसरी एक गोष्ट अशी आहे कीं, इंग्रजी, उर्दू वगैरे अपूर्ण लिपींमध्यें वर्णांची संख्या कमी असते. इंग्लिशमध्यें फक्त २६ वर्ण आहेत. हेच वर्ण वारंवार मुलांच्या डोळ्यांपुढें आल्यानें कांहीं दिवसांनीं गोष्टी व वाक्यें वाचतां वाचतां मुलांना ते ओळखतां येण्याचा संभव असतो, पण मराठीची तशी स्थिति नाहीं. १६ स्वर व ३६ बाराखड्यांचीं ३६×१२=४३२ अक्षरें, यांशिवाय शेंकडों जोडाक्षरें व बाराखडीमुळें होणारीं त्यांचीं असंख्य रूपें मराठींत येतात. साधारणपणें मुलांकरितां लिहिलेल्या अतिशय सोप्या पुस्तकांत देखील ६०० पर्यंत निरनिराळीं अक्षरें येतात. इतकीं अक्षरें, मूळाक्षरें आणि बाराखड्या न शिकतां, मुलांचे लक्षांत राहाणें शक्य नाहीं.

मि. म्याकि यांच्या गोष्टीच्या पद्धतीनें वाचन शिकविण्याचा प्रयोग संयुक्त प्रांतांत हिंदी शाळांत करून पाहिला होता व तो त्या ठिकाणीं यशस्वी झाला नाहीं. हिंदी व मराठी या दोन्ही भाषांत देवनागरी लिपीचाच उपयोग करीत असल्यामुळें, मि. म्याकि यांची पद्धति जशीच्या तशीच स्वीकारणें इष्ट नव्हतें, पण मुलांना वाचनाची गोडी लावण्याकरितां व वाचन सोपें करण्याकरितां मि. म्याकि यांच्या पद्धतींत जीं साधनें होतीं त्यांचा शक्य तितका उपयोग करण्याचें ठरविलें.

कांहीं शिक्षकांचें म्हणणें असें आहे कीं, मुलांना शब्द कळतात, अक्षरें कळत नाहींत म्हणून प्रथम मुलांना वड किंवा कमळ यासारखा एकादा शब्द ओळखण्यास व लिहिण्यास शिकवावें. मग ह्या शब्दाचें पृथक्करण करून क, म, ळ अशीं तीन निरनिराळीं अक्षरें ओळखण्यास व लिहिण्यास शिकवावें. मग दुसरा शब्द घ्यावा. तो प्रथम ओळखण्यास व लिहिण्यास शिकवून मग त्याचें पृथक्करण करून त्यांतील अक्षरें मुलांस लिहिण्यास

व वाचण्यास शिकवावीं. अशा प्रकारें भाषेंतील सर्व मूळाक्षरें घ्यावीं. देवनागरी लिपींत शब्दांतील अक्षरें ओळखणें फार सोपें असतें. अक्षराचा जो उच्चार तेंच त्या अक्षराचें नांव असल्यामुळें शब्दाचें पृथक्करण करणें, मुलांना कठीण वाटत नाहीं. गवत यांतील पहिलें अक्षर ग ओळखण्यास शिकविणें व कमळ यांतील क, म व ळ हीं तीन अक्षरें ओळखण्यास शिकविणें या दोन्ही पद्धतींत वास्तविक पाहातां कांहीं विशेषसा फरक नाहीं. गटाचे पद्धतींत अगदीं सोपीं अक्षरें प्रथम येत असल्यामुळें व अक्षरांचा अनुक्रम युक्तीला धरून असल्यानें ही पद्धति मुलांना फार उपयोगी होते. गटांचे पद्धतीवर आणखी कांहीं जणांचा असा आक्षेप आहे कीं, मुलांना वैषम्य अथवा भेद कळतो, पण मुलांना साम्य कळण्यास फार अवघड जातें; म्हणून गचे पुढें म न येतां प किंवा ळ यावा, पचे पुढें ण न येतां ज किंवा ध सारखें एकादें अक्षर यावें. अगदीं लहान मुलांना साम्य कळत नाहीं ही गोष्ट खरी आहे. पण आपल्या शाळांतून युरोपांतील बालोद्यान शाळांप्रमाणें तीन-चार वर्षांचीं मुलें येत नाहींत. साधारणपणें आपल्याकडे मुलें सहाव्या अगर सातव्या वर्षीं शाळेंत येतात. या मुलांना साम्य कळत नाहीं हें म्हणणें बरोबर नाहीं. शिवाय प, ब, क किंवा ग, म, न हीं अक्षरें अगदीं सारखीं आहेत असें नाहीं. त्यांच्यांत पुष्कळ फरक असतो. यामुळें मूळाक्षरांत असणारें साम्य व भेद ओळखण्यास मुलांना फारसें अवघड जात नाहीं.

गटाचे पद्धतीनें मुलांना अक्षरओळख करून देण्याचें ठरल्यावर साधारणपणें ६ इंच लांब व ४ इंच रुंद असे कार्डबोर्डाचे तुकडे कापले व प्रत्येक तुकड्यावर एक एक मूळाक्षर वळणदार असें काढलें. एका गटाच्या अक्षरांना एक रंग दिला होता. ग,म,न,भ हीं अक्षरें एका रंगांत काढिलीं होतीं. र,स हीं दुसऱ्या रंगांत काढिलीं होतीं. त,ल,ळ यांना तिसरा रंग दिला होता. हीं अक्षरें गटांच्या अनुक्रमानें मुलांना सहज दिसतील

एवढ्या उंचीवर एकसारखीं ओळीनें भिंतीला टांगून ठेविलीं होतीं. प्रत्येक कार्डाखालीं त्या अक्षरानें प्रारंभ होणाऱ्या प्राण्याचें अगर पदार्थाचें चित्र व त्याखालीं त्या चित्राचें नांव असणारा कार्डबोर्डाचा तुकडा टांगून ठेविला. उदाहरणार्थ 'र' च्या कार्डाखालीं रथाचें चित्र व रथ शब्द असणारा कार्डबोर्डाचा लहान तुकडा टांगलेला होता. 'स' च्या कार्डा-खालीं सशाचें चित्र व ससा हा शब्द असणारा कार्डबोर्डाचा लहान तुकडा टांगला होता. चित्रावरून शब्द व शब्दावरून त्या शब्दाचें पहिलें अक्षर कळावें अशी ही योजना होती. अक्षरांचे व चित्रांचे कार्डबोर्ड नेहमीं समोर असल्यामुळें मुलांना अक्षरें ओळखण्याचा एक खेळच झाला व या खेळांत त्यांना आनंद वाटूं लागला. सुटीचे वेळीं चित्र पहावें व चि-त्राचें नांव सांगावें व त्या नांवाच्या साहाय्यानें वरील अक्षर ओळखावें हा एक सुटींतील त्यांचा व्यवसाय बनला.

मुलांना अक्षरओळख करून देण्यास 'न' हें अक्षर प्रथम घेतलें. नथ, नळ, नख, नगारा हीं चित्रें एका तक्त्यावर एकाखालीं एक चिकटविलेलीं होतीं. प्रत्येक चित्रापुढें त्या चित्राचें नांव लिहिलें होतें व त्या नांवाचें पहिलें अक्षर न हें मोठें काढलें होतें मुलांनीं चित्रें ओळखून त्यांचीं नांवें सांगितलीं व शब्दांतील पहिलें अक्षर न आहे हें उच्चारावरून ओळखलें. पुष्कळसे 'न' पाहिल्यावर त्यांना 'न' ची कल्पना आली. नंतर 'न' चें एक मोठें कार्ड फळ्यावर लाविलें. त्यावरून मुलांनीं बोट फिरवून पाहिल्यावर मुलांना 'न' ची अधिक स्पष्ट कल्पना आली. मग ज्यांत न आहे असे निरनिराळे फळ्यावर लिहिलेले शब्द मुलांना दाखविले व त्यांतील न त्यांना ओळखण्यास सांगितलें. फळ्यावर लिहिलेल्या शब्दांत कित्येक शब्दांचे प्रारंभीं न होता, कित्येकांचे मध्यभागीं न होता व कित्येकांचे शेवटीं तो होता. जसें:—

नमन, मन, गमन वगैरे.

'न' चे नंतर म हें अक्षर घेतलें. त्यावेळीं मका, मगर, मखर, मडकें हे शब्द घेतले होते. प्रारंभीं म, पुढें चित्र, पुढें त्या पदार्थाचें नांव असा तक्ता तयार केला होता. खालीं एका ओळींत कांहीं म व दुसऱ्या ओळींत न लिहिले होते. मागील धड्यांत मुलांचे दृष्टीसमोर आलेले मन, नमन, नम हे शब्द या धड्यांतही घेतले होते. त्यांतील 'म' व 'न' मुलांकडून ओळखून घेतला. नंतर शिक्षकानें मुलांना एक गोष्ट सांगितली. एक दिवस पाडव्याचा सण होता. त्या दिवशीं सकाळींच एका लहान मुलाला त्याचे आजीनें अंघोळ घातली व त्याला नविन पोषाक घातला. मग ती त्याला म्हणाली, 'बाळ देवाला नमन कर, बाबाला नमन कर, आईला नमन कर.' मग मुलांनीं आपल्या शब्दांत ती गोष्ट शिक्षकाला सांगितली. 'आजीनें मुलाला जें काय सांगितलें तें मीं एथें लिहिलें आहे. तें आतां आपण वाचूं,' असें शिक्षकानें सांगितलें. नंतर तो तक्ता फळ्यावर लाविला. शिक्षकानें शब्दावर पट्टी ठेवून एक एक वाक्य वाचून दाखविलें. नंतर शिक्षकानें शब्दावर पट्टी ठेवीत वाक्य वाचावें व त्याचे मागून मुलांनीं तें वाक्य वाचावें अशा प्रकारें ४।५ वेळां हीं वाक्यें वाचून घेतलीं. यानंतर शिक्षकानें मुलाना या वाक्यांतील नमन व मन हे शब्द ओळखण्यास सांगितलें. कार्डावर नमन, मन हे शब्द लिहिलेले होते. एक एक कार्ड घेऊन तें फळ्यावरील त्याच शब्दाचे खालीं ठेवण्यास शिक्षकानें मग मुलांस सांगितलें. मुलांनीं कार्डावरील नमन, मन हे शब्द पाहून आपल्या पाटीवर ते शब्द चार पांच वेळां लिहिले. 'कर' हा शब्दही मुलांचे दृष्टीसमोर बऱ्याच वेळां आल्यानें तोही त्यांचे चांगला लक्षांत राहिला. वाक्यांतील इतर शब्द देवाला, बाबाला, आईला, लावून, काम हे मुलांना ओळखतां येणें शक्य नव्हतें. शब्दांचा उपयोग वाक्यांत केल्यामुळें मुलांना त्या शब्दांचा अर्थ कळत असे. वाक्यांत संगति ठेवल्यामुळें व वाक्यांचा एकमेकांशीं संबंध

ठेविला असल्यामुळें साधारणपणें एक पूर्ण कल्पना मुलांचे दृष्टीपुढें येई व मुलांना धड्यांत गोडी वाटे.

'म'चे धड्यांतील वाक्यें पुढें दिलीं आहेत.

देवाला नमन कर.

बाबाला नमन कर.

आईला नमन कर.

मन लावून काम कर.

यानंतर 'ग' हें अक्षर घेतलें. त्यावेळीं गवत, गरूड, गणपति, गवळण हे शब्द व त्यांचीं चित्रें घेतलीं होतीं. 'आतां आपण एका मुलाची गोष्ट वाचली. त्याचे आजीनें त्याला काय सांगितलें हेंही आपण वाचलें. त्या मुलाचें नांव मगन होतें, त्याची गोष्ट आज आपण पुन्हा वाचूं, असें सांगितलें. आधीं तुम्ही तुमचे झालेले शब्द मला वाचून दाखवा असें शिक्षकानें मुलांना सांगितलें व शब्दांचा तक्ता फळ्यावर लावला. तक्त्यांत मग, मगन, मन, नमन हे शब्द लिहिले होते. एक एक कार्ड सर्व वर्गाला दाखवून मग, मगन, मन, नमन हे शब्द शिक्षकानें मुलांकडून ओळखून घेतले. शिक्षक एक कार्ड उचलून मुलांना दाखवी व मुलें तो शब्द कोणता आहे हें सांगत व तक्त्यांतलि शब्दाशेजारीं कार्ड ठेवून दोन्ही शब्द एकच आहेत हें दाखवीत. या धड्यांत पुढील वाक्यें दिलीं होतीं.

मगन, देवाला नमन कर.

मग बाबाला नमन कर.

मग आईला नमन कर.

मग काम कर.

मगन, मन लावून काम कर.

या वाक्यांत मागील धड्यांतील शब्द पुन्हा यावेत अशी योजना

केली होती. मागें सांगितल्याप्रमाणें हा धडा वाचल्यानंतर मगन, मग, मन, नमन व कर हे शब्द मुलांच्या चांगल्या परिचयाचे झाले व ते त्यांना लिहितां व वाचतां येऊं लागले.

भ या अक्षराला निरनिराळे शब्द व वाक्यें देणें शक्य नव्हतें, कारण 'भ' नें प्रारंभ होणारा भटजी हाच एक शब्द मुलांच्या परिचयाचा असतो. ' र ' हें अक्षर शिकवितांना रथ व रवी हे शब्द व त्यांचीं चित्रें घेतलीं होतीं. र व मागील ग, म,न, भ हीं अक्षरें यांच्या साहाय्यानें पुढील शब्द तयार करून तक्त्यावर लिहिले होते.

मगर, भरभर, गरगर.

या धड्यांत पुढील वाक्यें घेतलीं होतीं.:

मगर भरभर पोहतो.

मगन भरभर पळतो.

मगर गरगर फिरतो.

मगन गरगर फिरतो.

वाक्यांत जे नवीन शब्द असतील ते पुन्हा पुन्हा यावे, वाक्यांत संगति राहावी, त्यांत मुलांना कांहीं गोडी वाटावी व त्यांत मुलांना आवडणाऱ्या पळणें, धांवणें वगैरे क्रियांचा उल्लेख यावा अशी काळजी वाक्यें तयार करितांना घेतली होती. या वाक्यांतील पळतो, पोहतो, फिरतो हे शब्द मुलांना ओळखतां येण्याजोगे नव्हते. 'स'या अक्षरानें होणारे पुढील शब्द दिले होते.

रस, सर, सरसर, सगन.

या धड्यांत पुढील वाक्यें दिलीं होतीं.

सगन रस भरतो.

सगन भरभर रस भरतो.

साप सरसर पळतो.

त या अक्षराला तलवार व तराजू हीं चित्रें तक्त्यांत लिहिलीं होतीं. आतांपर्यंत ग, म, न, भ, र, स व त हीं अक्षरें झालीं होतीं. कर व पळतो हे शब्द पुष्कळ वेळां मुलांचे पुढें आले होते. यामुळें या धड्यांतील पुढील वाक्यें शिक्षकानें वाचून दाखविल्यावर मुलांना तीं सहज वाचतां आलीं व पळतो हा शब्दही त्यांना ओळखतां आला.

भरत भरभर पळतो.

सगन भरभर पळतो.

मगन भरभर पळतो.

'प' पासून पुढील अक्षरांच्या धड्यांतील वाक्यें अगदीं सोपीं व मुलांना स्वतांच वाचतां येतील अशीं तयार केलीं होतीं. एकदा शब्द नवीन असल्यास व मुलांना तो ओळखतां येण्याजोगा नसल्यास शिक्षक तो स्वतांच सांगत असे. 'प' च्या धड्याची गोष्ट शिक्षकानें प्रथम सांगितली. मगन, सगन, भरत व गणपत हे चार लहान मुलगे होते. ते एकादा खेळ खेळूं लागले. पहिल्यानें भरतनें डाव घेतला. त्याच्या ताईनें त्याचे डोळे झाकले. मग ती म्हणाली, ' मगन लप. सगन लप. गणपत लप. भरत पळ. मुलांना धर? ' असें म्हणून तिनें त्याचे डोळे सोडले? ताई मुलाला काय म्हणाली तें आपण वाचूं, असें शिक्षकानें सांगितलें. मग शिक्षकानें वाक्यांचा तक्ता फळ्यावर लावला 'प'चीं वाक्यें पुढें दिलीं आहेत.

मगन लप.

सगन लप.

गणपत लप.

भरत पळ.

मुलांना तक्त्यावरील शब्द व वाक्यें पाहून लिहिण्याची फार आवड दिसून आली. अक्षर मोठें, सुढाळ व सुंदर असलें कीं, मुलानाही न कळत तसेंच काढण्याची संवय लागते. ३/४ इंच अंतर असलेल्या दोन ओळी काढून

त्यांत अक्षरें लिहिण्याची मुलांना संवय लाविली, यामुळें तीं अक्षरें मोठीं काढूं लागलीं व मोठें अक्षर काढल्यानें त्यांच्या बोटाला वळणही लागलें. हस्तव्यवसायाच्या वेळीं कागदाच्या पुष्कळशा लहान लहान पेटचा मुलांकडून करून घेतल्या. ज्यांचेवर चित्र व त्या चित्राचें नांव खालीं लिहिलें आहे असें 'ग' नें प्रारंभ होणारे गणपति, गवळण, गवत, गरूड या शब्दांचे तुकडे एका डबींत ठेविले होते. त्याचप्रमाणें मका, मगर, मखर, मडकें या शब्दांचे चार तुकडे दुसऱ्या डबींत ठेविले होते. हे सर्व तुकडे एकत्र करावयाचे मग ते प्रारंभींच्या अक्षराप्रमाणें जुळवून ज्या त्या पेटींत व्यवस्थित ठेवावयाचे, हा एक मुलांना मोठा मौजेचा खेळ वाटे. १०।१२ अक्षरें झाल्यावर आणखी एक व्यवसाय मुलांना दिला. चित्र नसलेले व नुसतेच शब्द लिहिलेले कागदाचे तुकडे प्रारंभींच्या अक्षराप्रमाणें जुळवून पूर्वींप्रमाणेंच कागदाच्या पेटचांत ठेविले. मुलें या पेटींतील एक एक शब्द काढीत व चित्राच्या पेटींतील शब्दांशीं त्याची तुलना करून तो वाचीत. पुढें पुढें मुलें एक एक पेटी घेऊन कार्डबोर्डचे तुकडचावरील शब्द पाहून तो आपल्या पाटीवर लिहीत. अशा प्रकारें १५।२० मिनिटांत एक मूल १०।१२ शब्द लिहीत असे. हे शब्द लिहीत असतांना मुलें गणपति या शब्दांतील 'ति' हें अक्षर, मका या शब्दांतील का हें अक्षर इत्यादि त्यांना अद्यापपर्यंत न गेलेलीं अक्षरें देखील काढीत असत. याशिवाय मुलांच्या परिचयाचे मग, नमन, सगन वगैरे शब्द व वाक्यें मुलें तक्त्यावरून लिहीत असत. प्रत्येक मुलाला एक एक तक्ता मिळेल असे कार्डबोर्डचे लहान लहान तक्ते केले होते. एक तक्ता एका मुलाला दिला कीं तो आपल्या पुढें ठेवून या तक्त्यांतील शब्द व अक्षरें तें मूल आपल्या पाटीवर काढीत असे. मुलांना ज्यांत आनंद वाटतो असें काम त्यांना करावयास सांगितलें असतां तीं किती आनंदानें करतात व त्यांत गढून जातात, हें या धडयाचे वेळीं चांगलें निदर्शनास येई.

यानंतरच्या धडचांत नाना, मामा, बाळ हे आकार असणारे शब्द

पुन्हा पुन्हा उपयोगांत आणले होते. मुलांची न, म, भ, ळ हीं अक्षरें झालीं असल्यामुळें हे आकार असणारे शब्दही त्यांना ओळखतां येऊं लागले. आकार असणारे शब्द अगदीं थोडेच म्हणजे ४।५ यावे अशी धड्यांची योजना केलेली होती. गटांतील 'आ' हें अक्षर झाल्यावर आकारांत शब्दांचा एकच धडा घेतला. मात्र आकारांत शब्द मुलांकडून फारसे लिहून घेतले नाहींत. आकार मुलांना कळला म्हणजे संगतवार गोष्ट देण्यास फार सोपें जातें, म्हणूनच आकार आधीं घेतला होता. कांहीं शिक्षकांचें असें म्हणणें असतें कीं, मुलांना अक्षरें शिकवीत असतां हळूहळू बाराखडी घ्यावी. ग, म, भ, न हीं अक्षरें झाल्यावर आकार शिकवावा. र, स झाल्यावर इकार घ्यावा. त, ल, ळ झाल्यावर दीर्घ ईकार घ्यावा. अशाच प्रकारें गटांतील सर्व अक्षरें होई तोंपर्यंत बाराखड्या पुऱ्या कराव्या. परंतु यायोगानें मुलांचें शिकण्याचें काम सोपें होत नाहीं. अक्षरें व बाराखड्या एकदम शिकाव्या लागल्यामुळें मुलांच्या समोर अनेक रूपें येतात व त्यांचा घोटाळा होतो. थोडींच अक्षरें झाल्यामुळें आकार, इकार, ईकार वगैरेंचा उपयोग करून मनोरंजक धडे तयार करणें हें फार अवघड असतें. एकाच खुणेनें मुलांचा घोटाळा होत नाहीं. आकार असलेला एक धडा पुढें दिला आहे.

बाळ, बस.

नाना, बाळाला पान आण.

कमळ, बाळाला भात आण.

बाळ, वरणभात कालव.

बाळ, वरणभात खा.

मामा, माऊला आणा.

माऊ, बस.

माऊ, माऊ, वरणभात खा.

ह या अक्षराचे धड्यात पुढील वाक्यें होतीं.

हा पाऊस आला.
नरहर, हरण पकड.
हरण आंत आण.
हरणाला गवत टाक.
नरहर, हळद आंत आण.
हा पहा पाऊस आला.

याच्याचपुढें पुढील धडा घेतला होता.

बाळ, हा पहा आपला हरण.
नरहर, हरण पकड.
हरण बाळाला दाखव.
बाळ, हरणाला हात लाव,
बाळ, हरणाला गवत टाक.
हरणा, हरणा, गवत खा.
पहा, हरण कसा पळाला.

गटांचीं सर्व अक्षरें होई तोंपर्यंत मुलांना वाक्यें वाचण्याची संवय बरीच झाली.

हे धडे देतांना नवीन शब्द फारसे येऊं दिले नव्हते.

पुनरावृत्तीचा शक्य तितका उपयोग केला होता.

वाक्यांतील संगति कायम राखली होती. नवीन शब्द मुलांचे पुढें पुन्हा पुन्हा आणिले होते.

वाक्यें लहान लहान घेतलीं होतीं. एकच कल्पना मुलांचे पुढें यावी व धडा विस्काळित होऊं नये अशी काळजी घेतली होती. बहुतेक धडे गोष्टीपारूनें दिले होते. एका ओळींत एकच वाक्य दिलेलें असे व वाक्यांचे प्यारेग्राफ केलेले नसत.

मुलांचीं अक्षरें झाल्यानंतर गोष्टींच्या साहाय्यानें वाचन शिकविण्यास प्रारंभ केला. मि. म्याकि यांच्या इंग्लिश गोष्टींचें मराठींत भाषांतर केलेलें आहे व या गोष्टी पुष्कळ ठिकाणीं उपयोगांत आणीत आहेत. पण या गोष्टींत जोडाक्षरें असल्यामुळें व त्या इकडील मुलांच्या आयुष्यक्रमाला परिचित अशा न वाटल्यामुळें त्यांचा उपयोग केला नाहीं. बालवर्गाकरितां नवीनच गोष्टी रचल्या. या गोष्टींपैकीं पहिली गोष्ट खालीं दिली आहे.

## कामाला लाग.

सकाळ झाली
आई उठली व कामाला लागली.
ताई उठली व कामाला लागली.
दादा उठला व घडे करूं लागला.
बाबा उठले व फुलें तोडूं लागले,
पण मधू उठला नाहीं
व कामाला लागला नाहीं.
मधूचे खिडकींत चिमणी आली.
चिमणी बोलली, ' चिव, चिव, चिव.
मधू, सकाळ झाली.
ऊठ व कामाला लाग.'
मधूचे अंगणांत कावळा आला.
कावळा बोलला, ' काव, काव, काव.
मधू, सकाळ झाली.
ऊठ व कामाला लाग.'
मधूचे अंगणांत झाडावर कोकीळ आला.
कोकील बोलला, ' कुहू, कुहू, कुहू.

मधू सकाळ झाली.
ऊठ व कामाला लाग.'
मग मधू उठला
व कामाला लागला.

ही गोष्ट जरी लांबलचक दिसते, तरी तिच्यांत शब्द फार थोडे आहेत. २५।२६ शब्दांची ही गोष्ट बनविलेली आहे. तींत तेच तेच शब्द व तींच तींच वाक्यें पुन्हा पुन्हा आलेलीं आहेत, यामुळें ती मोठी झाली आहे. बहुतेक शब्दांत आकार आहे. ईकार असणारे शब्द पांच सहा आहेत. कांहीं थोडे ऊकार, एकार व ओकार असणारे शब्द आहेत. ऊकार असणारा मधू हा शब्द ५।६ वेळां आलेला आहे. मधूचे हा एकार असणारा शब्दही ५ वेळां आलेला आहे. मूळाक्षरें शिकतांनाच आकार असणारे शब्द मुलांना ओळखतां येऊं लागले होते. या धड्याचे योगानें आकार व ईकार मुलांना चांगले ओळखतां यावे हा हेतु धडा शिकवितांना लक्षांत ठेविला होता.

गोष्ट तक्त्यावर मोठ्या अक्षरांनीं लिहिली होती. दोन ओळींमध्यें व दोन शब्दांमध्यें अंतर बरेंच ठेविल्यामुळें एका तक्त्यांत गोष्ट मावणें शक्य नव्हतें व तें इष्टही नव्हतें. गोष्टीचे संदर्भाला अनुसरून दोन भाग केले होते. पहिल्या भागांत ११ ओळी होत्या व दुसऱ्या भागांत १० ओळी होत्या. दोन तक्त्यांत ही गोष्ट पुरी केली होती. प्रारंभीं गोष्टीचे तक्ते हातानेंच लिहिले, पण पुढें ते शिळा टाइपावर छापून आणले. छापील तक्त्यांवरून मुलांना फार लवकर वाचतां येतें व वळणदार आणि मोठें अक्षर मुलांच्या नजरेपुढें राहिल्यामुळें त्यांच्या अक्षराला चांगलें वळण लागतें.

प्रथम शिक्षकानें मुलांना ही गोष्ट सांगितली. ' तुम्ही आपल्या बापाला काय म्हणतां ? आईला काय म्हणतां ? थोरल्या बहिणीला

हाक कशी मारतां ? थोरल्या भावाला काय म्हणता ? ' हे प्रश्न विचारून शिक्षकानें गोष्टीला सुरुवात केली. मधू नांवाचा एक मुलगा होता. तो आपल्या बापाला बाबा म्हणत असे. आईला आई म्हणत असे. थोरल्या भावाला दादा म्हणत असे व थोरल्या बहिणीला ताई म्हणत असे. एकदा सकाळ झाली. आई उठली व कामाला लागली. वगैरे, वगैरे. सर्व गोष्ट शिक्षकानें सावकाश योग्य स्वरांत दोनदा सांगितली व प्रश्न विचारून ती मुलांकडून काढून घेतली. गोष्ट सांगत असतांना तक्त्यांतील वाक्यांचा व शब्दांचा शक्य तितका उपयोग शिक्षकानें केला. आतां तुम्हीं ऐकलेली गोष्ट या तक्त्यावर लिहिलेली आहे, ती तुम्हांला वाचावयास आवडेलना ?' असें शिक्षकानें विचारतांच मुलांनीं ती वाचण्याची अतिशय उत्कट इच्छा दाखविली. आज आपण अर्धीच गोष्ट वाचूं व उद्यां राहिलेली अर्धी वाचूं असें शिक्षकानें मुलांना सांगून गोष्टीचा पहिला तक्ता फळ्यावर लाविला. शब्दावर पट्टी ठेवीत ठेवीत शिक्षकानें तो भाग सावकाश योग्य स्वरांत दोनदा वाचून दाखविला. नंतर शिक्षकानें एक एक वाक्य वाचावें व मुलांनीं त्याचे पाठोपाठ तें वाचावें अशा प्रकारें तो सर्व भाग शिक्षक आणि मुलें यांनीं मिळून वाचला. वाचतांना शिक्षक शब्दावर पट्टी ठेवीतच असे. यामुळें आपण वाचीत आहों किंवा शिक्षक वाचीत आहे तो शब्द कोणता हें मुलांना बरोबर कळत असे. नंतर मुलांनीं तो भाग मनांत वाचिला. लहान मुलांना मनांत वाचण्यास जड जातें, पण हळूहळ संवय लाविली कीं मग त्यांना तें कठीण वाटत नाहीं. मुलांचें मनांतील वाचन संपल्यावर एक एक मुलानें शब्दावर पट्टी ठेवीत एक एक वाक्य वाचलें. याप्रमाणें तो सर्व भाग मुलांनीं वाचला. मग एक एक मुलानें चार चार पांच पांच ओळी याप्रमाणें तो भाग आणखी एकदा वाचला. एकाद्या मुलाला वाक्य बरोबर वाचतां आलें नाहीं, तर शिक्षक त्यास पुन्हा तें मनांत वाचण्यास सांगे. नंतर तें मूळ तें वाक्य

मोठ्यानें वाची. अशा प्रकारें एकंध वाक्य अर्थ समजून वाचण्याची संवय लागते. एक एक अक्षर वाचीत गेल्यानें मुलांना वाचनाची गोडी लागत नाहीं, कारण वाक्याचा अर्थच त्यांच्या लक्षांत येत नाहीं. अशा प्रकारें हा पहिला धडा झाला. पुढील धडा दुसऱ्या दिवशीं घेतला. मुलांनीं आदल्या दिवसाची गोष्ट सांगितली व झालेला तक्ताही वाचून दाखविला. तक्त्यांतील एक एक वाक्याची एक एक पट्टी याप्रमाणें अर्ध्या धड्याच्या अकरा पट्ट्या शिक्षकानें तयार केल्या होत्या. शिक्षकानें एक पट्टी मुलांचे समोर धरावी व एकाद्या मुलास हेंच वाक्य तक्त्यांत दाखविण्यास सांगावें, मग मुलानें ती पट्टी तक्त्यावरील वाक्याचे खालीं धरावी व दोन्ही वाक्यें एकच आहेत हें सर्व वर्गानें पाहावें, अशा प्रकारें मागील धड्याची उजळणी केली. नंतर त्या वाक्यांच्या पट्ट्या वर्गांत पसरल्या. शिक्षकानें फळ्यावर एक एक वाक्य दाखवावें व मुलांनीं त्या वाक्याची पट्टी ओळखावी, मग शिक्षक ज्या मुलाकडे बोट दाखवील त्या मुलानें ती पट्टी फळ्यावरील तक्त्याचे त्या वाक्याखालीं धरावी, अशा प्रकारें पुन्हा त्या धड्याची उजळणी झाली. नंतर एक शब्दाचें कार्ड शिक्षकानें हातांत धरलें, वर्गाला दाखविलें व मुलांनीं तो शब्द तक्त्यांत दाखविला. एक शब्द बहुतेक चार पांच वेळां आलेला असे. एकामागून एक मुलें उठून तोच शब्द दाखवीत असत. अशाप्रकारें कांहीं कार्डं दाखविलीं. नंतर एका वर्तुळांत पट्ट्या व शब्द ठेविले व त्या वर्तुळाच्या भोंवतीं मुलांचें एक वर्तुळ केलें. तोंडें फिरवून मुलें उभीं राहिलीं. शिक्षकानें टाळी वाजवितांच मुलें वर्तुळांत फिरूं लागलीं. पुन्हा टाळी वाजवितांच मुलें थांबलीं व तोंडें फिरवून आपल्या समोर असलेली पट्टी घेऊन त्यांनीं वाचली व प्रत्येक मुलानें आपआपलें वाक्य वाचून दाखविलें. नंतर पुन्हा तोंड फिरवून मुलें उभीं राहिलीं व फिरलीं. शिक्षकानें टाळी वाजविल्यावर तीं थांबलीं व पट्टीवर असलेलें वाक्य त्यांनीं

वाचून दाखविलें.मुलें असा खेळ ५।७ मिनिटें खेळलीं.यानंतर मुलांना शब्दांचे कार्ड शिक्षकानें दिले. एक एक मुलाला एक वाक्य पूर्ण होईल असे तीन चार कार्ड दिले होते. मुलांनीं ते कार्ड भुईवर ठेवून वाक्य जुळविलें व शिक्षकाला तें वाचून दाखविलें. टाळी वाजविल्यावर मुलें आपले कार्ड गोळा करून पिशीत व खालच्या मुलास देत. पुन्हा मुलें कार्ड जुळवून त्यांचें वाक्य बनवीत व शिक्षकाला झालेलें वाक्य वाचून दाखवीत. अशा प्रकारें हा खेळ ७।८ मिनिटें चालला. एवढा भाग एका घड्यांत झाला.

तिसऱ्या दिवशीं राहिलेला अर्धा धडा पहिल्या धड्याप्रमाणें वाचून घेतला. चवथ्या दिवशीं खेळाच्या साहाय्यानें या भागाची उजळणी घेतली.पांचव्या दिवशीं हा सर्व धडा वाचून घेतला.अशा प्रकारें पहिली गोष्ट ९ दिवसांत संपली.

वाचनाचें काम चालू असतां लिहिण्याचेंही काम सुरू होतें. दुपारीं एका तासाला मुलें हें लिहिण्याचें काम करीत. पहिल्या दिवशीं दुपारीं शिक्षकानें पहिल्या तक्त्यांतील वाक्यांच्या पट्ट्यांपैकीं एक एक पट्टी मुलींना दिली व त्या पट्टीवरील वाक्य आपल्या पाटीवर मोठ्या अक्षरानें लिहिण्यास सांगितलें. एक वाक्य लिहिलें कीं मुली आपली पट्टी खालच्या मुलीला देत व पुन्हा सर्व मुली आपआपलें वाक्य लिहिण्यास सुरुवात करीत. हें वाक्य संपलें कीं पुन्हा पट्ट्या बदलीत व नव्या ओळीला सुरुवात करीत. अशाप्रकारें चार पांच ओळी मुलींनीं लिहिल्यानंतर व शिक्षकानें वर्गांत हिंडून तीं वाक्यें बरोबर आहेत असें पाहिल्यानंतर शिक्षकानें पुढील शब्दांचा तक्ता फळ्यावर लावला व मुलांनीं ते शब्द पाहून आपल्या पाटीवर लिहिले. या तक्त्यावरील शब्द पुढें दिले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| बाबा. | मान. | मका. | बसला. |
| दादा. | नाक. | तवा. | हसला. |
| मामा. | बाग. | सहा. | उठला. |
| नाना. | माळ. | गळा. | कामाला. |
| काका. | लाग. | मळा. | दादाला. |

दुसऱ्या दिवशीं लेखनाचे वेळीं अशाच प्रकारें राहिलेलीं वाक्यें व नंतर आकार असलेले शब्द मुलांना लिहिण्यास सांगितलें. तिसऱ्या दिवशीं दुसऱ्या तक्त्यांतील वाक्यें मुलांनीं लिहिलीं व पुढें दिलेले ईकार असलेले शब्द तक्त्यांत पाहून लिहिले.

| | | | |
|---|---|---|---|
| झाली. | काकी. | नदी. | तीन |
| आली. | मामी. | घरी. | खीर |
| माळी. | आजी. | बसली. | मीठ |
| साळी. | भाजी. | उठली. | पीठ |

चौथ्या दिवशीं उरलेलीं वाक्यें व ईकार असलेले आणखी कांहीं शब्द मुलांनीं लिहिले. तक्त्यांत नसलेले कांहीं शब्द शिक्षकानें मुलांना लिहिण्यास सांगितलें. पांचव्या दिवशीं अशाच प्रकारें लेखन घेतलें.

मुलांचीं मूळाक्षरें झालीं असल्यामुळें पहिली गोष्ट चांगली वाचावयास त्यांना पांच दिवस लागले. या पांच दिवसांत वाचनाला व लेखनाला दररोज ४० मिनिटांचे २ तास दिले होते. या दहा घडयांत मुलांना ही गोष्ट साभिनय सांगतां आली, लिहितां आली व तिच्यांतील कल्पना पूर्णपणें त्यांना कळल्या. बाराखडींतील आकार व ईकार हेही त्यांना कळले. मधूचे, बोलला, बोलली वगैरे ऊकार व ओकार असणारे शब्दही त्यांना ओळखतां येऊं लागले. या सर्व घडयांत मुलांना भरपूर असा आनंददायक व्यवसाय मिळाला.

यानंतर पुढें दिलेली नवी गोष्ट वाचनाकरितां घेतली.

## कोण चांगलें गातो !

गणू नदीचे कांठीं एका दगडावर बसला होता.

तो मजेनें गाणें गात होता.

नदीचे कांठीं एक बेडूक बसलेला होता.

तो बोलला, 'गणू, मला तुझें गाणें आवडत नाहीं.

मी गाऊं का एक गाणें.'

गणू बोलला, 'गा पाहूं.'

बेडूक गाऊं लागला, 'डराव, डराव, डराव.'

झाडावर चिमणी बसली होती.

ती बोलली, 'मला गणूचें व बेडूकदादाचें गाणें आवडत नाहीं.

मी गाऊं का एक गाणें.'

गणू बोलला, 'गा पाहूं.'

चिमणी गाऊं लागली, 'चिव, चिव, चिव.'

उंच झाडावर कावळा बसला होता. तो बोलला,

'मला गणूचें, बेडूकदादाचें व चिऊताईचें गाणें आवडत नाहीं.

मी गाऊं का एक गाणें ?'

गणू बोलला, 'गा पाहूं.'

कावळा गाऊं लागला, 'काव, काव, काव'

तें ऐकून गणू हसला व घरीं गेला.

ही गोष्ट समोर ३५।३६ शब्दांची झालेली आहे. त्यांपैकीं २१ शब्द मुलांना गेलेले होते व १५ शब्द नवीन होते. मूळाक्षरें झाल्यामुळें व संदर्भामुळें हे शब्द मुलांच्या लक्षांत शिक्षकाचे वाचनानंतर चांगले राहिले.

पूर्वींच्याच पद्धतीनें हा धडा ९ दिवसांत संपविला. या धड्यांत ओकार व ऊकार मुलांना शिकवावयाचे होते. दररोज दोन तासप्रमाणें ९ दिवसांत मुलांनीं हा धडा तयार केला. तक्त्यावर लेखनाकरितां ओकार असणारे पुढील शब्द घेतले होते.

| | | |
|---|---|---|
| गातो. | कोण. | बोलतो. |
| खातो. | दोन. | चोरतो. |
| चालतो. | पोर. | पोहतो. |
| पाहतो. | मोर. | घोरतो. |
| बसतो | चोर. | कोरतो. |

ऊकार असणारे पुढील शब्द दुसऱ्या तक्त्यांत घेतले होते.

| | | |
|---|---|---|
| गणू. | दूध. | चाखून. |
| मधू. | तूप. | चोरून. |
| गहू. | चूळ. | धरून. |
| हळू. | खूर. | पाहून. |
| गोपू. | तूर. | टाकून. |

या धड्यानंतर पुढीलप्रमाणें मुलांना बाराखडी लिहितां येऊं लागली.

क का की कू को

ग गा गी गू गो

त ता ती तू तो

या दोन गोष्टींचें एक पुस्तक छापलें. त्यांतील टाईप ¾ इंचाचा होता. त्यांत भरपूर चित्रें दिलीं होतीं. एका ओळींत एकच वाक्य दिलें होतें. प्यारेग्राफ मुळींच नव्हते. मुलांना पुस्तकांतील धडे वाचण्यास त्रास पडला नाहीं. दोन दिवसांत या दोन गोष्टी मुलांनीं वाचल्या. यानंतर आणखी दोन गोष्टी याच पद्धतीनें घेतल्या. मुलांना कंटाळा येऊं नये, म्हणून पूर्वी-

पेक्षां निराळ्या अशा कांहीं खेळांचा उपयोग या गोष्टींत केला. या गोष्टी-च्या योगानें बाराखडींतील आणखी तीन अक्षरें मुलें शिकलीं. या दोन गोष्टींचें निराळें पुस्तक छापलें. त्यांतून मुलांनीं या गोष्टी वाचल्या. आणखी चार गोष्टी याच पद्धतीनें शिकविल्या व त्यांचीं पुस्तकें मुलांकडून वाचून घेतलीं.

मूळाक्षरें व आठ गोष्टी होण्याला चार महिने लागले. या चार महिन्यांत मुलांना मोठें व मुलांच्या मानानें बरेंच वळणदार असें अक्षर काढतां येऊं लागलें. साधारण सोपी व मोठ्या अक्षरांत लिहिलेली लहान गोष्ट त्यांना चांगली वाचतां येऊं लागली. मुलांना वाचनाची गोडी लागली व आधीं सर्व वाक्य मनांत वाचून मग तें मोठ्यानें वाचण्याची त्यांना संवय लागली. यानंतर प्राक्टिसिंग स्कूलला दीड महिन्याची सुटी मिळाली. मुलें परत आल्यानंतर 'शिशुवर्गाकरितां मनो-रंजक पाठ,' या पुस्तकांतील गोष्टी मुलांनीं वाचण्यास सुरुवात केली. या पुस्तकांत २९ धडे आहेत. मुलांना परिचित व आनंददायक वाट-णाऱ्या विषयांवरच हे धडे लिहिलेले आहेत. यांतील पहिल्या आठ धड्यांत पहिल्या सहामाहींत झालेल्या आठ गोष्टी दिल्या आहेत. नवव्या व दहाव्या धड्यांत याच प्रकारच्या आणखी दोन गोष्टी दिल्या आहेत. पुढील धड्यांत मुलांना ज्यास्त आनंद वाटेल अशा लहान लहान कविताहि दिल्या आहेत. आरंभींचे धडे मोठ्या टाइपांत (पूर्वींच्या पुस्तकापेक्षां बारीक टाइपांत ) व पुढील धडे यापेक्षां जरा बारक्या टाइपांत दिले आहेत. पुस्तकांत प्यारेग्राफ दिलेले नाहींत. यांतील धड्यांची व कवितांची कल्पना येण्याकरितां पुढें एक धडा व कविता दिली आहे.

## तारे.

आतां अंधार पडला आहे.
भाऊ, हें आकाश पहा.

आकाशांत तारे कसे चमकत आहेत.

ते जणूं काय डोळे झांकीत व उघडीत आहेत.

ताई, हा बघ केवढा मोठा तारा आहे.

तो कसा लाल आहे व किती चमकत आहे.

ताई, कांहीं तारे लाल दिसतात.

कांहीं निळे, कांहीं हिरवे, कांहीं पिवळे दिसतात.

हे तारे किती आहेत? मी मोजूं का?

एक, दोन, तीन, छे मला नाहीं मोजवत.

ताई, तूं हे तारे मोज पाहूं.

नाहीं भाऊ, मला नाहीं ते मोजवत.

मी तुला उखाणा घालूं कां?

तूं जिंक पाहूं.

परडीभर फुलें तुला नाहीं मोजवत मला नाहीं मोजवत.

ताई, मी हरलों तूं सांग पाहूं.

अरे, तारे हींच फुलें आभाळाचे परडींत आहेत.

तीं तुला व मला कोठें मोजतां येतात?

## चिमुकला बाग.

चाल. (विठूचा। गजर हरिनामाचा.)

मौजेचा

बाग किती हा अमुचा

झाडें लावियलीं।

घालोनी
झारीनें या पाणी
सारीं वाढविलीं।
जाईचा
मांडव बघ हा केला
वेल चढवीला।
हसताती
गुलाब हे किति डुलती
सुंदर बहु दिसती।
फुलांचा
बहर किती हा आला
वाहूं देवाला ॥ १ ॥

हे धडे घेत असतांना शिक्षकाला वाचन घेण्याची आपली पद्धति थोडीशी बदलावी लागली. धड्यांतील कल्पना मुलांना परिचित होण्याकरिता प्रारंभीं शिक्षक गोष्ट सांगत असे. पण पुढें पुढें कांहीं मुलें घरींच पुस्तक वाचीत व स्वतःच गोष्ट सांगत. शिक्षक अशा मुलांना गोष्ट सांगण्यास उत्तेजन देई व प्रश्नद्वारा मदत करून ती त्यांजकडून काढून घेई. आतां पूर्वींच्या गोष्टींप्रमाणें दोन तीन वेळां तीच गोष्ट मुलांना वाचून दाखविण्याची व काढून घेण्याची जरूर नसे. शिक्षक धडा एक दोन वेळां सावकाश वाचून दाखवी. मग मुलें तो धडा स्वतांच मनांत वाचीत व मग प्रत्येक मूल शिक्षकाला चार चार पांच पांच वाक्यें वाचून दाखवी. पूर्वींच्या खेळांचा उपयोग शिक्षक करीत असे. एका धड्याला दोन दिवसांपेक्षां जास्त वेळ लागत नसे. कांहीं धडे कृति करण्याचे असत. आधीं मुलें कृति करीत व मग तो धडा वाचीत. कृतिपर कविता देखील याचप्रमाणें घेतल्या जात.

33 915 9 6

हें पुस्तक संपण्याला दोन महिने लागले.

नंतर मुलांना पुन्हा पुन्हा तेच शब्द, वाक्यांश अगर वाक्यें येणाऱ्या आणखी चार पांच गोष्टी तयार करून वाचावयास दिल्या. पूर्वीप्रमाणें या गोष्टींना फारसा वेळ लागला नाहीं. १०।१२ दिवसांत मुलांनीं या गोष्टी संपविल्या व वर्षाचा अभ्यासक्रम पुरा केला. या वर्षांत हे जे कांहीं प्रयोग करून पाहिले त्या योगानें पुढील गोष्टी निदर्शनास आल्या.

१ देवनागरी ही लिपी शास्त्रशुद्ध व संपन्न असल्यामुळें मुलांना अक्षराचा उच्चार कळण्यास मुळींच त्रास पडत नाहीं.

२ यटाचे पद्धतीनें अक्षरांचा अनुक्रम घेणें मुलांना सोपें जातें.

३ मुलांना वाक्य कळतें व त्यांतच त्यांना गोडी वाटते, म्हणून प्रारंभींच्या धड्यांतही नुसते शब्द न देतां त्यांचा वाक्यांत उपयोग करावा.

४ कांहीं थोडेसे नवीन शब्द असले, तरी तेच तेच पुन्हा पुन्हा आल्यानें मुलांना ते चांगले ओळखतां येतात.

५ धड्यांतील वाक्यांत संगति असल्यास मुलांना गोडी वाटते· विस्कळित वाक्यांत त्यांना गोडी वाटत नाहीं.

६ १०।११ अक्षरें झाल्यावर आकार असणाऱ्या शब्दांचा उपयोग मुलांना कळतो व या आकारानें संगति असलेलीं वाक्यें घालून धडे मनोरंजक करितां येतात.

७ अक्षरें झाल्यावर बाराखडी न शिकवितां मुलांना गोष्ट वाचण्यास शिकवितां येते.

८ वाक्यांची व शब्दांची पुनरुक्ति मुलांना आवडते व त्यांना त्या योगानें चांगलें वाचतांही येतें.

९ मुलांना मनांत वाचण्याची संवय लागली म्हणजे त्यांना वाक्याचा अर्थ चांगला कळतो व धड्यांत गोडी लागते.

१० शब्दचित्र मुलांच्या पुढें पुन्हा पुन्हा आलें म्हणजे तें मुलांच्या चागलें लक्षात राहातें.

११ शिशुवर्गांत एक वर्षांत मुलांना सरकारी प्रायमराशिवाय पुष्कळसा इतर भाग सहज वाचतां येईल.

१२ मुलांना मोठ्या अक्षरानें लिहिलेल्या तक्त्यावरून चागलें वाचतां येतें व लिहितांही चांगलें येतें. पुढें चांगला नमुना असला म्हणजे मुलाना लिहिण्याची हौस वाटते. वाचन व लेखन बरोबर चालण्यास कांहींच हरकत नाहीं. मुलें वाक्येंही चांगलीं लिहितात व वाक्यें लिहिण्यांत त्यांना आनंद वाटतो.

१३ मोठ्या अक्षरापासून सुरुवात करून क्रमानें बारीक टाइपाचा उपयोग केल्यास मुलांना पुस्तकांतून वाचण्यास त्रास पडत नाहीं.

१४ शिशुवर्गाच्या पुस्तकाचा टाईप स्वच्छ, मोठा व मनोहर असला म्हणजे मुलांना तें सहज वाचतां येतें. शब्दात व ओळींत अंतर जास्त असावें. एक वाक्य एका ओळींत असावें व प्यारेग्राफ नसावे.

१५ मुलांना गोष्टी फार आवडतात, म्हणून शिशुवर्गाच्या पुस्तकांत मौजेच्या गोष्टी असाव्या.

१६ मुलांना वाचनाची गोडी लागली कीं, त्यांची प्रगति फार भराभर होते. वाचनाचा तास फार आनंददायक वाटतो.

१७ वाचन हा विषय अनेक खेळाच्या योगानें आनंददायक करितां येतो.

गोष्टीच्या साहाय्यानें वाचन शिकविणें हें जरी शिक्षक व मुलें या उभयतांना आनंददायक आहे, तरी तें शिकविण्याला चातुर्य व अनुभव लागतो. अननुभाविक व अनट्रेन्ड शिक्षकाला तें साधणार नाहीं. शिक्षक व शिष्य यांचें तादात्म्य झाल्याशिवाय धड्याला गोडी येणें शक्य नाहीं. या धड्यात मुलांना पुष्कळ स्वातंत्र्य द्यावें लागते. मुलांची सारखी हालचाल सुरू असते.

मुलांना स्वातंत्र्य देऊन पुन्हां शिस्त राखणें व तीही प्रेमळपणानें राखणें ही गोष्ट कठीण आहे. शिवाय अननुभविक शिक्षकानें या पद्धतीनें शिकविल्यास गोष्टी पाठ केल्या जाण्याचा फार संभव असतो. मग शब्द न ओळखतां पोपटाप्रमाणें भराभर वाचण्याची संवय मुलांना लागण्याची भीति असते. ज्यांना गोष्टींच्या पद्धतीनें मुलांना वाचन शिकवितां येणार नाहीं अशा शिक्षकांकरितां आणखी एक नवीन प्रयोग करून पाहिला.

प्रायमरमध्यें ज्याप्रमाणें बाराखडींतील एक एक खुणेचा एक एक स्वतंत्र धडा आहे त्याप्रमाणें आकार, ईकार वगैरेंचे स्वतंत्र धडे रचले. हे रचतांना

१ धडे मनोरंजक व्हावे अशी खबरदारी घेतली.

२ शब्दांची व वाक्यांची पुनरुक्ति व्हावी अशी काळजी घेतली.

३ मागील धड्यांत गेलेले शब्द पुन्हा पुढील धड्यांत यावे अशी योजना केली.

४ मुलांना परिचित व आनंददायक असे विषय धड्याकरितां घेतले.

यावर्षीं मार्चपासून नवीन आलेल्या मुलांना पूर्वीं सांगितलेल्या पद्धतीनें मूळाक्षरें शिकविलीं व नंतर जूनच्या शेवटच्या आठवड्यापासून हे नवीन रचलेले धडे देण्याला प्रारंभ केला. प्रथम बाराखडीची खूण मुलांना समजावून धडा शिकविण्यांत येतो. तक्त्यावरूनच धडे शिकविले जातात. पट्ट्या खेळ वगैरे साधनांचा भरपूर उपयोग शिक्षक करितो. या धड्यांपैकीं दोन धडे नमुन्याकरितां दिले आहेत.

( आ )

बाबाचा बाजार

ब ा बा बाबा

ख ा खा खाऊ.

त ा ता ताई

बाबा, बाजारांत जा.
बाबा मला एक भवरा आणा.
ताईला एक खग आणा.
बाळाला एक बाजा आणा.
बाळाला खाऊ आणा.
बाबा लवकर जा.
बाळाला खाऊ आणाल ना ?
मग बाळ खाऊ खाईल.

( उ )

कुसमची फजिती.

| | | | |
|---|---|---|---|
| स | ु | सु | सुटली |
| फ | ु | फु | फुटली |
| त | ु | तु | तुटली |


शाळा सुटली.
कुसुम पळत पळत घरीं चालली.
पळतां पळतां कुसुम पडली.
तिची पिशवी तुटली.
तिची पाटी फुटली.
नुकाला माती लागली.
मग कुसुम उठली.
ती मुसमुसत घरीं गेली

आगस्टच्या दुसऱ्या आठवड्यांत हे सर्व धडे संपले. आतां मुलांना गोष्टी वाचण्यास द्यावयाच्या आहेत. मूळाक्षरें व बाराखड्या झाल्यामुळें या गोष्टी १ महिन्याचे आंत सहज होतील. नंतर पुढें 'मनोरंजक पाठ' हें पुरवणीपुस्तक वाचून घेतलें जाईल.

मुलांच्या वाचनाचा प्रश्न फार महत्वाचा आहे म्हणूनच या ट्रेनिंग कॉलेजमध्यें या बाबतींत चाललेल्या प्रयोगांची साद्यंत हकीकत दिली आहे. बालवर्गाच्या नमुनेदार प्रायमरमध्यें टाईप कसा असावा व वाक्यें कशीं सुटीं असावीं हें दाखविण्याकरितां नमुन्यांचीं दोन पानें पुढें दिलीं आहेत.

---


न  नथ

न 

नळ

न 

नख

न 

नगारा

न न न न न न

न न न

# कुसुमची फजिती.

उ = ु

स ु = सु सुटली.

फ ु = फु फुटली.

त ु = तु तुटली.

पिशवी बुकाला मुसमुसत




शाळा सुटली.
कुसुम पळत पळत घरीं चालली.
पळतां पळतां कुसुम पडली.
कुसुमची पिशवी तुटली.
कुसुमची पाटी फुटली.
बुकाला माती लागली.
मग कुसुम उठली व मुसमुसत घरीं गेली.

# लहान मुलांकरितां कविता,

## लगबगा.

### पद.

( हे मना, सोड कल्पना—या चालीवर. )

टुणटुणा
मारिते उड्या
धान्य खावया
कशी चिउताई
कशी चिउताई
लगबगा भोंवतीं पाही । लगबगा.

शाळेस
निघे जाण्यास
धेइ पाटीस
उशिर बहु होई
उशिर बहु होई
लगबगा पळतसे ताई । लगबगा.

चोरुनी

दूध पी मनी

काठि घेउनि

मालकिण आली

मालकिण आली

लगबगा मनी ती पळली । लगबगा.

नदिवरी

भरुनि घागरी

घेउनि शिरीं

बायका निघती

बायका निघती

लगबगा घरीं त्या जाती । लगबगा.

( गाण्यांतील अर्थाप्रमाणें मुलांनीं कृति करावी. गाणेंही जलदीनें व जोरानें म्हणावें. )

ता..........

# हळुहळू.

पद.

( चाल पूर्वींचीच. )

हळुहळू
रोप वाढतें
झाड होत तें
उंच मग होई
उंच मग होई
भेटाया गगना जाई । हळुहळू.

बागांत
तेवि रानांत
तसे शेतांत
तरू ते डुलती
तरू ते डुलती
वायूच्या झुळुकी येती । हळुहळू.

सुकुमार
किती तें फूल
वेलिचें मूल
वायुनें डोले
वायुनें डोले
पाळण्यांत जणुं घे झोले । हळुहळू.

शेतांत
कशीं डुलतात
रम्य दिसतात
पहा हीं कणसें
पहा हीं कणसें
नाचतीं जणू हीं हर्षें। हळुहळू

( गाण्यांतील अर्थाप्रमाणें कृति करावयाची आहे. गाणें सावकाश म्हणावें चालही मंद अशी घ्यावी. )

---

## धुणें.

( धिन्ना धिन्ना धिन्नकना या चालीवर. )

' गडे चाल गे खेळाया
खेळ मजेचे खेळूं या '
' नसे वेळ तो मला मुलीं '
मैत्रिण माझी ती वदली ॥ १ ॥

धुणें धूत ती मग बसली
खेळायाला नच आली
धुणें कशी ती धूत असे
कृती करुनि मी दावितसें ॥ २ ॥

चाल फटक्याची.

घंगाळामधिं धुणें घालुनी—आघळ आघळ आघळते
शिळेवरी तें ठेवुनि मग ती—चुबक चुबक तें चुबकीते

बुचकळोनि तें पुन्हा शिळेवर—आपट आपट आपटते
घंगाळामधिं घालुनि मग तें—चुबक चुबक तें चुबकीते
पिळा पिळोनी सोडवुनी तो—झटक झटक ती झटकीते
घडी करोनी साफ नीट ती—दोरीवर मग घाली तें

—————

# पांच पोपट.

( पुढें दिलेला खेळ वजाबाकी शिकविण्याकरिता आहे. गाण्यांत वर्णन केल्याप्रमाणें मुलांनीं कृती करावी. )

पद— चाल साधी ( फटक्या सारखी. )

नाचत खेळत पोपट बसले झाडाच्या वरतीं
पांच सोबती खेळ खेळती आनंदें गाती
चरावयाला भुर्कन् उडुनी एक दूर गेला
चार राहिले पोपट तेथें मग खेळायाला ॥ १ ॥

नाचत खेळत पोपट बसले झाडाच्या वरतीं
चार सोबती खेळ खेळती आनंदें गाती
पाणी प्याया भुर्कन् उडुनी एक दूर गेला
तीन राहिले पोपट तेथें मग खेळायाला ॥ २ ॥

नाचत खेळत पोपट बसले झाडाच्या वरतीं
तीन सोबती खेळ खेळती आनंदें गाती
आंघोळीला भुर्कन् उडुनी एक घरीं गेला
दोन राहिले पोपट तेथें मग खेळायाला. ॥ ३ ॥

नाचत खेळत पोपट बसले झाडाच्या वरतीं
दोन सोबती खेळ खेळती आनंदें गाती
पेरू खाया एक उडोनी बागेला गेला
एक राहिला पोपट तेथें मग खेळायाला. ॥ ४ ॥

नाचुनि खेळुनि गाउनि दमला झाडावर बसला
एकटाच तो नसे सोबती मग खेळायाला
निजावयाला भुर्कन् उडुनी तोहि घरीं गेला.
राहिलें न मग कोणी तेथें बघ खेळायाला. ॥ ५ ॥

---

# झोला.

( दोन मुलांनीं हात जुळवून त्यांचा झोपाळा बनवून ते खालींवर करावे. )

## पद.

(जाऊं कामाला । गडे ग उशिर किती झाला. या चालीवर )

झोला हाताचा । करूं या आपण मौजेचा
हात जुळवुं या आपण आपुले बघ झोला झाला
वरतीं खालीं वरतीं खालीं जोरानें गेला
झोला हाताचा । करूं या आपण मौजेचा ॥ १ ॥

झोला वेलीचा । फुलें तीं करितीं मौजेचा
वाऱ्यासंगें वेल डोलते बघ झोला झाला
वरतीं खालीं वरतीं खालीं जोरानें गेला
झोला वेलीचा । फुलें तीं करिती मौजेचा ॥ २ ॥

झोला खांदीचा । करिती पोपट मौजेचा
वाऱ्यासंगें खांदि डोलते बघ झोला झाला
वरतीं खालीं वरतीं खालीं जोरानें गेला.
झोला खांदीचा । करिती पोपट मौजेचा ॥ ३ ॥

---

# शिशुवर्गाकरितां धडे.

## चार गाई.

एक होती काळी गाय.
एक होती पिवळी गाय.
एक होती तांबडी गाय.
काळी गाय रानात निघाली.
पिवळी गाय रानात निघाली
तांबडी गाय रानात निघाली.

रानांत हिरवें गवत होतें.
रानांत खोल नदी होती.
नदीचें पाणी गार होतें.

काळी गाय रानांत चरली.
पिवळी गाय रानांत चरली.
तांबडी गाय रानांत चरली.
काळी गाय नदीवर गेली.
पिवळी गाय नदीवर गेली.
तांबडी गाय नदीवर गेली.

वाघ नदीवर आला.
वाघ गाईला म्हणाला,
' माझें गवत कां खातां ?
माझें पाणी कां पितां ?
आतां मी तुम्हांला खाईन '

काळी गाय म्हणाली,
' आमचा धनी आला आहे.
आमचा धनी झाडावर लपला आहे.
आमचा धनी बंदूक मारीत आहे.
आमचा धनी वाघ मारणार आहे.
पहा सुटली बंदूक. '

वाघ बिचकला.
वाघानें उडी मारली
वाघ खोल नदींत पडला.
वाघ खोल नदींत बुडाला.

काळी गाय घरीं पळाली.
पिवळी गाय घरीं पळाली.
तांबडी गाय घरीं पळाली.

---

# कुंभाराचें गाढव.

एका गांवांत एक कुंभार होता.
या कुंभाराचें एक गाढव होतें.
हें गाढव या कुंभाराचें फार लाडकें होतें.
एक दिवस हें गाढव चरावयास गेलें.
तें लवकर परत आलें नाहीं.
मग कुंभार फार फार रडूं लागला.

तेथें एक सुतार आला.
हा सुतार या कुंभाराचा फार सोबती होता.
कुंभाराला सुतारानें विचारलें, 'कुंभारा, कुंभारा, तूं कां रडतोस ?'
कुंभार कांहीं बोलला नाहीं.
तो रड रड रडला.
सुताराला वाटलें याचा मुलगा वारला.
मग सुतार तेथें बसला
व फार फार रडूं लागला.

तेथें एक सोनार आला.
हा सोनार या सुताराचा फार सोबती होता.
सुताराला सोनारानें विचारलें, 'सुतारा, सुतारा, तूं कां रडतोस ?'
सुतार कांहीं बोलला नाहीं.
तो रड रड रडला.
सोनाराला वाटलें याचा मुलगा वारला.
मग सोनार तेथें बसला
व फार फार रडूं लागला.

तेथें एक सरदार आला.
हा सरदार या सोनाराचा फार सोबती होता.
सोनाराला सरदारानें विचारलें, 'सोनारा, सोनारा, तूं कां रडतोस ?'
सोनार कांहीं बोलला नाहीं.

तो रड रड रडला.
सरदाराला वाटलें याचा मुलगा वारला.
मग सरदार तेथें बसला
व फार फार रडूं लागला.

तेथें या गांवचा राजा आला.
हा सरदार या राजाचा फार लाडका होता.
सरदाराला राजानें विचारलें, 'सरदारा, सरदारा, तूं कां रडतोस ?'
सरदार कांहीं बोलला नाहीं.
तो रड रड रडला.
राजाला वाटलें याचा मुलगा वारला.
मग राजा तेथें बसला
व फार फार रडूं लागला.

कांहीं वेळानें कुंभाराचें गाढव परत आलें.
मग कुंभारानें आपलें रडें थांबविलें.
तें पाहून सुतारानें आपलें रडें थांबविलें.
तें पाहून सोनारानें आपलें रडें थांबविलें.
तें पाहून सरदारानें आपलें रडें थांबविलें.
तें पाहून राजानें आपलें रडें थांबविलें.

सुतारानें कुंभाराला विचारलें, 'कुंभारा, तूं कां रडत होतास ?'
कुंभार बोलला, 'माझें गाढव आलें नाहीं, म्हणून मी रडलों.'
हें ऐकून सुताराला लाज वाटली.
तो बोलला, 'मी वेडा म्हणून रडलों.'
सोनार बोलला, 'मी वेडा म्हणून मी रडलों.'
सरदार बोलला, 'मी वेडा म्हणून मी रडलों.'
राजा बोलला, 'मी वेडा म्हणून मी रडलों.'

मग सुतार हसत हसत घरीं गेला.
मग सोनार हसत हसत घरीं गेला.
मग सरदार हसत हसत घरीं गेला.
मग राजा हसत हसत घरीं गेला.

---



नव विवाहित आलेक्झांड्रा राणी.

# साम्राज्य परिषद.

वसाहती व इंग्लंड यांमध्यें फार अंतर असल्यानें दोन्ही देशांतील लोकांचा भेटीचा योग फारसा येत नाहीं व भेटी झाल्याशिवाय प्रेमभाव वृद्धिंगत होत नाहीं. सबब दूरदूरच्या वसाहतींमधील प्रमुख लोकांच्या गांठी पडून विचारविनिमय व्हावा व साम्राज्य चिरस्थायी होण्याचें कार्य सुलभ व्हावें एतदर्थ साम्राज्यांतील प्रमुख लोक कांहीं वर्षांनीं इंग्लंडांत बोलावण्याची अलीकडे पद्धति पडली आहे. या सर्व लोकांच्या सभेस ' साम्राज्य परिषद्* ' हें नांव देण्यांत आलें आहे.

प्रथमतः १८८७ सालीं महाराणी व्हिक्टोरिया यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त इंग्लंडांत उत्सव साजरा होऊन तो साम्राज्यांतही साजरा केला गेला. त्यावेळीं त्या उत्सवाप्रीत्यर्थ साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांतून कांहीं प्रमुख प्रतिनिधि बोलावण्यांत आले होते. त्यावेळीं त्यांच्या व इंग्लंडांतील प्रधानमंडळांतील सभासदांच्या गांठी पडून पुष्कळ निरनिराळ्या विषयांवर वादविवाद व संभाषणें झालीं. त्यानंतर पुनः १८९७ सालीं व्हिक्टोरिया राणीच्या ६० व्या वर्षी उत्सव झाला, त्यावेळीं असाच भेटीचा योग आला. त्या भेटी झाल्यानें परस्परांस आपले विचार मोकळेपणानें परस्परांस कळविण्याची संधी मिळाली व अशीच संधी कांहीं वर्षांनीं नियमितपणें येत गेल्यास साम्राज्यास हितावह होईल असें वाटून दर पांच वर्षांनीं असा भेटीचा योग आणावा असें ठरलें.

त्यानंतर परिषदेच्या बैठकी १९०२, १९०७, व १९१२ या सालीं भरल्या. या बैठकींस हिंदुस्थानांतून हिंदुस्तानच्या वतीनें असे प्रतिनिधी पाठवीत नसत. स्वतंत्र राज्यव्यवस्था असणाऱ्या देशांपुरतीच ही घटना होती.

पुढें १९१७ सालीं ठरल्याप्रमाणें ही सभा भरावयाची, पण १९१४ च्या अखेरीस सुरू झालेलें महायुद्ध बंद न झाल्यामुळें, हिची बैठक लांबणीवर टाकावी लागली. या महायुद्धांत हिंदुस्तान देशानें इंग्लंडास १५० कोटी

---

* परिषद् = सभा.

साम्राज्य परिषद् = साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांतून बोलाविलेल्या प्रतिनिधींची सभा.

रुपयांची मदत केल्यानें इंग्लिश लोकांस हिंदुस्तानचें कसें उतराई व्हावें असें होऊन गेलें होतें. तेव्हां त्या मनःस्थितींत इंग्लंडाकडून भरपूर असा नवीन सुधारणांचा हप्ता मिळून हिंदुस्तानच्या वतीनें या साम्राज्यपरिषदेंत सभासद पाठविण्याचा हक्क देण्यांत आला. प्रथमतः एक तरी लोकनियुक्त सभासद पाठवावयाचा असा सरकारचा क्रम होता व त्याप्रमाणें १९१७ सेपांस तो क्रम चालला; पण पाठविलेल्या माणसांकडून शक्य तितका विशेष उपयोग झाला नाहीं म्हणून म्हणा तें धोरण चालूं राहिलें नाहीं. तरी पण हिंदुस्तानचे तीन प्रतिनिधि या सभेस पाठविण्याची पद्धति मात्र सरकारनें कायम ठेविली आहे. या परिषदेस पाठविलेल्या तीन सभासदांपैकीं एक युरोपिअन, एक संस्थानिक व एक बिनसरकारी इसम अशी निवड करण्यांत येते. १९१७ सालीं भरावयाची ती परिषद १९१९ सालीं युद्धसमाप्तीनंतर भरली व तेव्हांपासून ती दर दोन वर्षांनीं भरण्याचा प्रघात पाडण्यांत आला. या पद्धतीप्रमाणें आतां अलीकडे ती परिषद् बिनबोभाट १९१९, १९२१, १९२३, हीं तीन सालें भरत आली; पण १९२५ सालीं कांहीं कारणामुळें, विशेषतः वेंब्लीप्रदर्शन वगैरेसारख्या बऱ्याच इतर गोष्टींत इंग्लंड गुंतल्यामुळें, ती सभा येत्या आक्टोबरांत इंग्लंडांत भरणार आहे व त्यावेळीं ठरल्याप्रमाणें हिंदुस्थानकरितां सरकारनें निवडलेले ३ सभासद तेथें हजर राहणार आहेत.

गेलें महायुद्ध सुरू झालें त्यावेळीं इंग्लंडला युद्ध पुकारण्यापूर्वी आपल्या वसाहतींचा या बाबतींत सल्ला घेण्यास मुळींच वेळ मिळाला नाहीं व युद्ध सुरू केल्यामुळें अर्थातच मदतीसाठीं साम्राज्यांतील वसाहतींच्या सरकारांकडे धांव घ्यावी लागली. आणीबाणीचा प्रसंग ओळखून त्यावेळीं साम्राज्यांतून भरपूर मदत आली. पण युद्ध संपल्यावर इंग्लंडनें साम्राज्याचा सल्ला न घेतां अशा प्रकारें युद्ध जाहीर करणें हें योग्य नव्हे असें बहुमत दिसलें. अशाप्रकारें पुनश्च प्रसंग न यावा म्हणून साम्राज्य प्रतिनिधींनीं इं. पार्लमेंट सभेप्रमाणें साम्राज्य पार्लमेंट इंग्लंडांतच बनवावी व त्या सभेचा अशा बाबतींत ठरणारा निर्णय बंधनकारक व्हावा अशा प्रकारच्या सूचना पुढें आणल्या; पण तूर्त तरी त्या शक्य कोटींतील नाहींत असा ब्रिटिश प्रधान मंडळाकडून त्यास जबाब मिळाल्यामुळें तें तसेंच भिजत घोंगडें पडलें आहे.

पण याशिवाय व्यापाराविषयक वाटाघाटींना बरेंच यश आलें. साम्राज्यांत होणाऱ्या मालास साम्राज्यांतील निरनिराळ्या देशांतील जकातीचे दर थोडे हलके असावेत व इतर युरोपियन देशांपेक्षां 'Buy British Goods' म्हणजे ब्रिटिश माल वापरण्यासंबंधीं सर्वांनीं एकजातं जूट करावी अशा प्रकारचे ठराव होऊन बहुतेकांस ते पसंत पडले. साम्राज्यांतील वसाहतींतून आज जोंपर्यंत कच्चा मालच उत्पन्न होत आहे व उद्योगधंद्यांची विशेष वाढ झालेली नाहीं तोंपर्यंत ही गोष्ट सर्वांना श्रेयस्करच आहे यांत कांहीं संशय नाहीं. पण उद्योगधंद्याची हळू हळू वाढ होत आहे व तशी वाढ झाल्यावर ही स्थिति क़ायम राहणें फारसें शक्य होणार नाहीं.

येत्या साम्राज्यपरिषदेंत खालीं दिलेल्या मुद्यांवर चर्चा होणार आहे.

( १ ) परराष्ट्रीय धोरणाचा विचार.

( २ ) आंतरराष्ट्रीय व्यापार.

( ३ ) वसाहतींची स्थापना ( अर्थात् साम्राज्याविस्तार ).

( ४ ) संशोधन.

( ५ ) साम्राज्यविषयक चित्रपट दाखविण्याची व्यवस्था करणें.

वरील मुद्यांपैकीं २ रा मुद्दा व्यापाराच्या सवलतीसंबंधाचा पूर्वींचाच कायम आहे. साम्राज्यांत उत्पन्न होणाऱ्या पदार्थांचें संशोधन करून संपत्ति किती वाढवितां येईल हें पाहणें ही नवीन गोष्ट सामील करण्यांत आली आहे. तसेंच या साम्राज्याचें वैभव किती आहे, या साम्राज्यांत राहाणारे निरनिराळ्या देशचे लोक शांततेचा कसा अनुभव घेत आहेत व शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीमुळें सर्वांना आगगाड्या, तारायंत्रें वगैरे गोष्टींच्या सुखसोयीचा कसा लाभ झाला आहे, या गोष्टी चित्रपटांच्या साहाय्यानें लोकांच्या मनावर बिंबविण्याची व्यवस्था करण्यासंबंधीं विचार ठरून योजना अमलांत येणार आहे. येत्या आक्टोबर महिन्यांत भरणारी परिषद् यशस्वी होऊन हिंदुस्तानचें वैभव वाढण्यास मदत होवो अशी सर्वांची इच्छा आहे ! काय होईल तें खरें !

---

# न्यू फाऊंडलंड.

मागें आलेल्या कानडा, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका व न्यू झीलंड या वसाहतींप्रमाणें जबाबदार राज्यव्यवस्था मिळालेली अशी ही पांचवी वसाहत होय. या पांच वसाहतींप्रमाणें १९२२ सालीं स्वातंत्र्यहक्क मिळालेली ६ वी वसाहत दक्षिण ऱ्होडेशिया असून तिचा मागें उल्लेख केला गेलाला आहे.

साम्राज्यांतील सर्व वसाहतींत इंग्लंडची हीच फार जुनी वसाहत आहे. कोलंबसानें अमेरिकेचा शोध लाविल्यावर इंग्लंडचा राजा सातवा हेन्री (ट्यूडर घराणें) यानें सिबॅश्चियन केबट या खलाशास त्याच दिशेनें नवीन देश शोधण्यास पाठविलें व त्यानें लॅब्रेडोरचा किनारा व न्यूफाऊंडलंड हे दोन भाग शोधून काढले. तेव्हांपासून या भागांत मासे धरण्याच्या निमित्तानें इंग्लिश व फ्रेंच मच्छिमार बोटी दरसाल येऊं लागल्याबद्दल मागें उल्लेख आलाच आहे.

पुढें फ्रेंच लोकांच्या मनांत ही वसाहत आपल्या ताब्यांत घ्यावी असें आलें. तेव्हां चपळाई करून इंग्लंडनें ती वसाहत १५८३ सालीं ताब्यांत घेतली व ती वसाहत १७१३, १७६३ व १७८३ सालीं फ्रान्सबरोबर झालेल्या तहांनीं इंग्लिशांकडे राहाण्यासंबंधीं अटी घालण्यांत आल्या.

या वसाहतीचें क्षेत्रफळ मुंबई इलाख्याएवढें असून लोकसंख्या फक्त हिंदुस्थानांतील दिल्ली अगर अहमदाबाद या शहराएवढी आहे.

१५८३ सालापासून जरी ही वसाहत इंग्लिशांच्या ताब्यांत होती व निरनिराळ्या तहांच्या वेळेला ती आपल्याकडेच ठेवण्याबद्दल जरी इंग्लंडला तिची आठवण होत असे, तरी १८३२ सालापर्यंत या वसाहतीस प्रतिनिधित्वाचा हक्क मिळाला नव्हता; पण या सालीं प्रथमतः एक कायदेमंडळ स्थापण्यांत आलें. १८४१ सालीं या देशास लोकसभा मिळून तींत

१७१३ युट्रेक्टचा तह.

१७६३ पॅरिसचा तह. (फ्रान्सची राजधानी)

१७८३ व्हर्सेल्सचा तह. (पॅरिसच्या उत्तरेस एक शहर आहे.)

१० सरकारनियुक्त व १५ लोकनियुक्त सभासद निवडण्यांत आले; परंतु, एवढे हक्क मिळाल्यानें तेथील लोकांची राजकीय आकांक्षा तृप्त झाली नाहीं. म्हणून त्यांनीं सनदशीर रीतीनें आपली राजकीय चळवळ सुरू ठेविली. या चळवळीचें दृश्य फळ त्यांना १८५५ सालीं मिळालें. तें म्हटलें म्हणजे ' जबाबदार राज्यव्यवस्था ' हें होय.

मूठभर लोकांना अवघ्या २३ वर्षांच्या काळांत जबाबदार राज्यव्यवस्था मिळते याचें मुख्य कारण तेथील बहुतेक वस्ती इंग्लिश लोकांचीच आहे, व लोकसत्तात्मक राज्यव्यवस्थेचें धोरण त्यांच्या हाडींमासीं खिळलें आहे. सबब त्यांस नवीन दिलेली व्यवस्था झेपेल कीं नाहीं हा इंग्लंडपुढें प्रश्नच आला नसेल.

आपल्या साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांना त्यांनीं पात्रता दाखविल्यावर क्रमाक्रमानें असेच स्वातंत्र्याचे हक्क देण्याची दिशा इंग्लंडनें १७८३ नंतर आपल्या डोळ्यांपुढें आंखून ठेविली आहे.

या बेटाच्या ताब्यांत कानडाच्या पूर्व बाजूचा लॅब्रेडोर प्रांत आहे. न्यूफाऊंडलंड व लॅब्रेडोर या दोन प्रांतांना संघटित राज्यव्यवस्था देण्यांत आली आहे. कानडाच्या राज्यांत या दोनही भागांचा अन्तर्भाव करण्यासंबंधीं एकदां बूट निघाला होता, पण तेथील लोकांनीं कानडांत सामील न होण्याचा आपला निश्चय साम्राज्य सरकारास कळविला व त्यांस स्वतंत्र व्यवस्था देण्यांत आली.

या बेटांत इंग्लंडहून गव्हर्नर नेमून येतो. त्याच्या मदतीस ९ असामींचें एक कार्यकारी मंडळ असतें. याशिवाय ' कौन्सिल ' व ' असेंब्ली ' अशा दोन सभा असून त्यांत अनुक्रमें २४ व ३६ प्रतिनिधि असतात.

येथील कार्यकारी मंडळ इतर देशांतील प्रधानमंडळाप्रमाणें राज्यांतील सर्व खात्यांची व्यवस्था ठेवतें.

येथेंही कौन्सिलांतील सभासदांस १२० डॉलर्स व असेंब्लींतील सभासदांस २०० ते ३०० डॉलर्स मिळतात.

सारांश, देश लहान किंवा मोठा असणें यावर हक्क मिळणें अवलंबून नसून, तेथील लोकांचें सामर्थ्य किती आहे, यावरच तें मुख्यत्वेंकरून अवलंबून राहातें, असें न्यू झीलंड व न्यूफाऊंडलंड या दोन देशांच्या चळवळींवरून आपणांस दिसतें.

# न्यू झीलँड.

हें बेट आस्ट्रेलियापासून पूर्वेस १२०० मैलांवर असून उत्तर व दक्षिण असे याचे कुक् सामुद्रधुनीनें दोन भाग झाले आहेत. १६४२ सालीं प्रथमतः या बेटाचा शोध डच खलाशी हॅसमन् यानें लाविला. पण या बेटासंबंधी जास्त माहिती कॅप्टन कुक् या इंग्लिश खलाशानें सर्व जगास करून दिली. कॅ. कुक् यानें १७६९ सालीं आपल्या पहिल्या पर्यटनाचे वेळीं या बेटाचा ताबा घेतला. या बेटाचें क्षेत्रफळ हिंदुस्थानांतील आग्रा अयोध्या प्रांताएवढें आहे, पण यांत लोकसंख्या त्या मानानें फारच कमी ( म्हणजे दर चौरस मैलास १० मनुष्यें ) आहे. या बेटांतील सर्व लोकसंख्या एकट्या कलकत्ता शहराइतकी ( १२ लक्ष ) आहे. या बेटांत मूळचे लोक मेओरी जातीचे आहेत व ते हुशार व प्रगमनशील आहेत. ऑस्ट्रेलिया, आफ्रिका वगैरे देशांतील मूळच्या रहिवाशांप्रमाणें हे लोक आळशी नाहींत. या लोकांची वस्ती मुख्यतः यांपैकीं उत्तरेकडील बेटांतच विशेष आहे. अलीकडे यांची वस्ती वाढूं लागली आहे असें गेल्या खानेसुमारीच्या आंकड्यांवरून दिसतें.

या बेटाचा शोध लागल्यावर या समुद्रांत देवमासे मारणारे युरोपियन लोक या बेटाच्या आश्रयास येऊं लागले, व त्यांनीं तेथें वसाहत करण्यास सुरुवात केली. पण मेओरी लोकांशीं गांठ असल्यामुळें पुष्कळ वेळां चांगल्याच झटापटी झाल्या. तथापि या झटापटी चालू होत्या, तरी युरोपियन लोकांनीं उत्तरेकडील भागांत एक वसाहत स्थापिन केली. बंदुका वगैरे हत्यारें मेओरी लोकांना विकल्यामुळें त्यांच्या आपापसांतील जातिविषयक भांडणांना जोर येऊन बराच संहार होऊं लागला व परस्पर त्यांची संख्या कमी होऊं लागली.

यानंतर या बेटांचा ताबा फ्रेंच सरकार घेणार आहे अशी शंका उत्पन्न झाल्यामुळें इंग्लिशांनीं घाई करून १८४० सालीं या बेटांवर इंग्लिश अंमल बसविला व मूळच्या मेओरी लोकांबरोबर समेटाचा तह केला.

या समेटाच्या तहान्वयें वसाहतवाल्यांनीं घेतलेल्या जमिनींबद्दल मेओरी लोकांस योग्य मोबदला देण्याचें ठरलें. १८४५ सालीं या भागावर नेमि-

लेला अधिकारी लॉर्ड ग्रे यानें या प्रांतांत बरीच सुव्यवस्था केली. परंतु पैसे देऊन जमिनी विकत घेणें हें फार त्रासाचें काम होतें. कारण तेथील जमिनीच्या देवघेवीसंबंधीं व्यवस्था फार भानगडीची असे. त्यामुळें या बाबतींत तेथील मूळचे रहिवाशी व नवीन वसाहतवाले इंग्लिश यांमध्यें मधून मधून भांडणें उपस्थित होत. आपणांस स्वातंत्र्य मिळावें म्हणून चालू झालेला झगडा १८६९ पर्यंत चालू राहिला.

मध्यंतरीं १८४० सालीं ऑकलंड व वेलिंग्टन्, १८४८ सालीं डुनेडिन व १८५० सालीं ख्राइस्टचर्च येथें वसाहती होऊन त्या भरभराटीस येऊं लागल्या होत्या. तेव्हां कानडाप्रमाणेंच येथेंही उदारपणाचें धोरण स्वीकारून इंग्लंडनें १८५२ सालीं या प्रांताला थोडीशी स्वतंत्र व्यवस्था दिली. नंतर १८७५ या वर्षी या भागांतील अन्तर्व्यवस्थेंत पुष्कळ सुधारणा होऊन खेडोपाडीं लहान लहान स्थानिक संस्था निर्माण झाल्या व देशांतील राज्यव्यवस्थेला सुसंघटित स्वरूप येऊं लागलें. १९०७ सालीं या देशाला कानडाप्रमाणें 'डोमिनियन' अगर पूर्ण जबाबदार व्यवस्था देण्यांत आली.

या बेटांना दक्षिणेकडील इंग्लंड म्हणतात, व खरोखरीच त्या बेटांशीं लोकसंख्येशिवाय इतर बाबतींत या बेटांचें साम्य आहे. ऑस्ट्रेलिअन संघांत हीं बेटें सामील करून घेण्यासंबंधीं बरीच खटपट झाली, पण न्यू फौंडलंडप्रमाणें आपण स्वतंत्र राहाण्याचें ठरविलें आहे—असें त्यांनीं साम्राज्य सरकारास कळविलें.

साम्राज्य सरकारचा प्रतिनिधि म्हणून एक गव्हर्नर येथें इंग्लंडमधून नेमून येतो. इंग्लंडच्या पार्लमेंटप्रमाणें येथें २ सभा असून त्यांस 'कौन्सिलें' व 'हाउस ऑफ रेप्रेझेंटेटिव्ज' अशीं नांवें आहेत. कौन्सिलांतील ४२ सभासदांपैकीं ३ सभासद मेओरी लोकांमधून निवडतात. या सर्व सभासदांची ७ वर्षांची मुदत असते व यांना सालीना २०० पौंड म्हणजे दरमहा २५० रु. वेतन मिळतें.

# वर्तमानसार.

---

मे महिन्यांत इंग्लंडांत खाणींतील मजुरांनीं संप केला. त्या मजुरांनीं ७ तासांच्या ऐवजीं ८ तास काम करावें, व आहे त्या मजुरीपेक्षां कमी मजुरी स्वीकारावी असें भांडवलवाल्या खाणींच्या मालकांचें म्हणणें होतें. यावर आम्ही दोन्हीही अटी कबूल करण्यास तयार नाहीं, असें मजुरांनीं ठरवून सरतेशेवटीं संप पुकारला. त्यांच्या संपाचा विचार सर्व पक्षांचे लोक सहानुभूतिपूर्वक विचारांत घेत होते; पण बरेच दिवस झाले, तरी निकाल लागेना म्हणून इतर ठिकाणीं म्हणजे रेल्वे, बंदरें, गिरण्या, कारखाने वगैरे ठिकाणीं काम करणाऱ्या मजुरांनीं त्यांच्या या प्रश्नाचा लवकर निकाल लागावा, म्हणून सार्वत्रिक संप पुकारण्याचें ठरविलें, व त्यांच्या या विचारास मजुर वर्गांच्या मुख्य सभा ' ट्रेड युनियनस् ' यांनीं संमति दिली. त्याप्रमाणें मे महिन्यांत इंग्लंडांत संप पुकारला गेला. अशा रीतीनें संप पुकारून सर्व कामें बंद पाडणें सामान्य जनसमूहाला पसंत न पडल्यानें प्रधानमंडळाच्या आज्ञेवरून त्यांनीं सर्व प्रकारचीं कामें अंगावर घेतलीं व लोकव्यवहार बरेच सुरळीत चालविले. सरते शेवटीं प्रमुख न्यायाधीशांनींही अशा तऱ्हेचे सार्वत्रिक संप पुकारणें बेकायदेशीर आहे, असें ठरविल्यामुळें ट्रेड युनियनना संप मोडणें भाग पडलें. पण अद्याप खाणीवाल्या मजुरांच्या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लागलो नाहीं. आठ तास काम करण्याची अट त्यांजवर लादली जाणारच. मजुरीसंबंधानें "प्रांतानिहाय विचार करून कोठें शेंकडा दहापेक्षां मजुरी कमी करतां येईल, कोठें शेंकडा १० मजुरी कमी करून चालेल, व कोठें मजुरी शेंकडा १० सुद्धां कमी करतां येणार नाहीं, यासंबंधानें विचार चालू असून ' जास्त वेळ काम व कमी मजुरी ' घेण्याचाच प्रसंग बहुधा खाणींच्या मजु-

रांवरच येणार असल्याचें भविष्य दिसूं लागलें आहे. सार्वत्रिक संपाच्या योगानें इंग्लंडांतील लोकांचें २ कोटी पौंडांवर नुकसान झालें आहे.

आफ्रिकेच्या वायव्येस असणाऱ्या मोरोक्को प्रांतांत रीफ लोकांबरोबर फ्रान्सचें युद्ध चाललें होतें. त्यांत फ्रान्सचा विजय होऊन रीफ पुढारी अबदुल करीम यास त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतलें आहे. लवकरच त्याला आफ्रिकेच्या पूर्वेस फ्रेंचांच्या ताब्यांत असलेल्या माडागास्कर बेटांत नेऊन ठेवण्यांत येईल. नेपोलियनचा पराभव झाल्यावर इंग्लिशांनीं त्यास असेंच आफ्रिकेच्या पश्चिमेस असलेल्या सेंट हेलिना बेटाच्या एकांतवासांत ठेविलें होतें. भवितव्यता बलीयसी !

चीन देशांत बंडाळी सुरू होती व मुख्य दोन तट पडून आपापसांत लढाई चालू होती. एका पक्षाचा पुढारी चँग व दुसऱ्याचा फेंग हा आहे. यांपैकीं फेंग यास रशियाची मदत मिळाली. पण चँगचा विजय होऊन पेकिंग शहर त्याच्या हातांत आहे. फेंग हा बहुधा मंगोलियाकडे निघून गेला असावा. आतां चीनमध्यें शांतता प्रस्थापित होईल असें वाटतें.

कोरिया प्रांत कांहीं वर्षांपूर्वीं चीन साम्राज्याचा भाग होता. पण नुकत्याच वारलेल्या ई—सायक या राजाच्या आजाच्या कारकीर्दींत आजाचें व बापाचें पटलें नाहीं. तेव्हां आजानें रशियाच्या मदतीनें आपल्या मुलास कैदेंत टाकिलें व सुनेस ठार मारिलें; पण त्यायोगानें रशियाचा त्या प्रांतांत शिरकाव झाला व प्राबल्य वाढलें. हळूहळू चीनपासून रशियानें तो प्रांत मागून घेतला. ई—सायक हा अर्थात् रशियाच्या अंकित होता. पुढें रशिया व जपान यांमध्यें झालेल्या १९०४–५ च्या युद्धांत तो प्रांत जपाननें जिंकून घेतल्यामुळें ई—सायक यास

त्यांनीं जपानमध्यें ठेविलें. हा शेवटचा राजा नुकताच मरण पावला. या घराण्याच्या २९ राजांनीं क्रमानें या प्रांतावर राज्य केलें होतें. या राजाच्या मृत्यूनंतर हा प्रांत पुन्हा स्वतंत्र करण्याचा कांहीं लोकांनीं प्रयत्न केला; पण अशा दोनतीनशें माणसांना जपानी सरकारनें पकडलें असून त्यांस जबरदस्त शिक्षा होतीलसें दिसतें.

सन १९२० पूर्वीं जपानची लोकसंख्या ५ कोटी ९७ लक्ष होती. ती आज २७ लक्षांनीं वाढली आहे. जपानांत स्त्रियांची संख्या पुरुषाहून जास्त आहे. दर १०० पुरुषांस १०१ बायका असें तेथें प्रमाण असतें. अशा रीतीनें लोकसंख्या वाढूं लागल्यास आणखी ३० वर्षांनीं ती १० कोटी पर्यंत सहज जाईल असा अंदाज आहे. जर्मनीची लोकसंख्या ६ कोटी व इंग्लंडची ४½ कोटी आहे.

हिंदुस्तानांत बांबूपासून कागद तयार करूं लागले आहेत. येथें हा पदार्थ मुबलक असल्यानें हा धंदा येथें चांगला चालू शकेल. बाहेर देशाहून कागदासाठीं लागणारा पल्प ( रांधा ) मागविण्यापेक्षां बांबूचा रांधा तयार झाल्यास हिंदुस्तानांत एक स्वतंत्र धंदा होईल. बाहेरून येणाऱ्या रांध्यापेक्षां या रांध्यांत दर टनामागें ७५ रु. फायदा होतो.

बेल्जममधील एका चार्लस केलॉग नांवाच्या शास्त्रज्ञानें आवाजासंबंधानें प्रयोग चालविले आहेत. विशिष्ट प्रकारच्या नादलहरींच्या योगानें आग विझवितां येईल असें त्याचें म्हणणें आहे. दीपरागानें दिवे लागल्याचीं उदाहरणें आपण ऐकतों. मेघमल्हार राग गाऊन पाऊस पडतो असें म्हणतात. नाग तर पुंगीचा नाद ऐकून वैरभाव क्षणिक तरी विसरून डोलूं लागतो. एखाद्या पुलावरून सैन्य जातांनां त्यांचीं वाद्यें व चालण्याचा ठेका कायम राहिला, तर पूल पडल्याचीं उदाहरणें आपण ऐकतों. मग नादानें आग कां विझणार नाहीं?

पुढें मार्गे ही गोष्ट शक्य झाल्यास आग विझविण्यास पाण्याची आवश्यकता राहणार नाहीं! हा जगावर मोठाच उपकार होणार आहे !!

अमुंडसेन या ध्रुवशोधकानें विमान मार्गानें उत्तर ध्रुवावरून प्रवास केला. जहाजांतून पियरी यानें उत्तर ध्रुव शोधलें होतें व स्कॉट यानें दक्षिण ध्रुव शोधण्याचा प्रयत्न केला होता. अमुंडसेन यानें यापूर्वी दोन्ही ध्रुवांपर्यंत प्रवास केला. ज्यानें दोन्ही ध्रुवबिंदु पाहिले असा हा एकच नॉर्वेजियन प्रवासी आढळतो. त्याच्या धाडसाचें जग कां अभिनंदन करणार नाहीं?

लॉर्ड वुइलिंगडन या पूर्वींच्या मुंबई इलाख्याच्या गव्हर्नरांची कानडा ( अमेरिका ) प्रांताच्या गव्हर्नर जनरलचे जागीं नेमणूक झाली.

जॉर्ज लॉईड हे मुंबईचे मागील गव्हर्नर हल्लीं इजिप्त प्रांताचे हाय कमिशनर आहेत.

हिंदुस्तानांतील लोखंडाच्या कारखान्याची स्थिति पाहून त्यांना मदत देणें जरूर आहे काय, हें ठरविण्यासाठीं २-३ वर्षांपूर्वी टॅरिफ बोर्ड नेमिलें होतें. त्याचें अद्याप काम संपलें नाहीं, म्हणून हिंदुस्तानांतील कापसाच्या गिरण्यांच्या स्थितीचा विचार करण्यासाठीं सरकारनें नवें 'टेक्स्टाइलटॅरिफ' नेमिलें आहे.

येत्या अक्टोबरपासून सुरू होणाऱ्या 'शेतकी कमिशन' वर येथील पूर्वीचे कार्यकारी मंत्री व ॲक्टिंग गव्हर्नर सर हेनरी लॉरेन्स यांची नेमणूक झाली आहे.

सहा मैलांच्या वरील हवा विरळ असली, तरी तेथें वाऱ्याचा वेग फार असतो व वादळें सहसा होत नाहींत, तेव्हां अशा ठिकाणीं विमानें नेल्यास दर तासीं २९० मैलांचा प्रवास करतां येईल अशी कल्पना

जर्मन शास्त्रज्ञानीं काढली असून तिचे प्रयोग चालू आहेत. तेथें वैमानिकांना पाणबुडच्या बोटीप्रमाणें हवेचा कृत्रिम पुरवठा करावा लागेल इतकेंच काय तें !

मेवाडचा पुण्यप्रतापी राणा प्रतापसिंह याचा वार्षिक उत्सव काशीस गेल्या २४ जून १९२६ रोजीं साजरा करण्यांत आला. त्यावेळीं त्याच्या आगच्या ( १ ) कर्तव्यनिष्ठा ( २ ) स्वदेशप्रीति व ( ३ ) स्वार्थत्याग या गुणांचा उल्लेख करण्यांत आला. राष्ट्रवीराचे महोत्सव कोणत्या देशांत होत नाहींत ! होत नसतील तो देश अभागी होय ! !

लॉर्ड बर्कनहेड हे पार्लमेंटानें नेमिलेल्या व आस्ट्रेलियास जाणाऱ्या शिष्टमंडळावर सभासद नेमिले आहेत. ते ऑस्टेलियास जातांना वाटेंत हिंदुस्तानांत मुक्काम करून लॉर्ड आयर्विन यांची मुलाखत घेणार आहेत.

लॉर्ड रेडिंग ( हिंदुस्तानचे मागील गव्हर्नर जनरल ) व लॉर्ड बर्कनहेड ( हल्लींचे भारतमंत्री ) या दोघांस त्यांच्या हिंदुस्तानविषयक उत्कृष्ट कामगिरीबद्दल अनुक्रमें 'फ्रीडम ऑफ लंडन' व 'फ्रीडम ऑफ एडिंबरो' हे बहुमानाचे किताब अर्पण करण्यांत आले.

लॉर्ड आयर्विन हे ता. २८ जुलै रोजीं पुण्यास येऊन गेले. सबर्बन म्युनिसिपालिटीनें त्यांस मानपत्र अर्पण केलें.

हिंदुस्तानांतील मौर्य व गुप्त घराण्यांतील राजांची राजधानी पाटलिपुत्र ही कालवशात् पृथ्वीच्या पोटांत गडप होऊन गेली. त्या ठिकाणाजवळ हल्लींचें पाटणा शहर आहे. ती उकरून काढण्याबद्दल पुराण-

वस्तुसंशोधक खातें गव्हर्नर जनरलजवळ परवानगी मागत होतें. ती परवानगी यंदा मिळाली असून कामास पुढील वर्षीं सुरुवात होईल.

ॲलन कोबहॅम हा इंग्लंडहून केप ऑफ गुड होपला जाऊन मार्गेंच परत गेला. जूनच्या २९ तारखेस तो इंग्लंडहून निघाला असून आस्ट्रेलियाची सफर करणार आहे. त्याच्या या सफरीबद्दल आस्ट्रेलियाचे मुख्य प्रधान मि. ब्रूस यांनीं आस्ट्रेलियांत येण्याबद्दल सहानुभूति व्यक्त केली आहे.

प्रकाशकिरणांपासून शरीरप्रकृतीवर इष्ट परिणाम होतो व क्षयासारख्या रोगांतही सूर्यप्रकाशांत राहिल्यानें हुशारी वाटते. या सर्व प्रकाशाचा पांढरा रंग सप्तरंगाचें मिश्रण आहे. या दृश्य किरणांशिवाय या सप्तरंगी पट्टयाच्या दोन्ही टोकांच्या पलीकडे चर्मचक्षूंस अदृश्य पण परिणामी असे किरण असतात. त्यांपैकीं व्हायोलेट ( हा रंग जांभळा व तांबडा यांच्या मिश्रणासारखा दिसतो ) रंगापलीकडे असणाऱ्या किरणांना अल्ट्रा व्हायोलेट व तांबड्या रंगाच्या पलीकडील किरणांस इन्फ्रारेड असें म्हणतात. तांबडे व त्याच्या पलीकडे असणारे किरण उष्णता जास्त उत्पन्न करितात. व्हायोलेट व अल्ट्राव्हायोलेट हे उष्णतेपेक्षां प्रकाश जास्त देतात. अलीकडे शास्त्रज्ञांना प्रयोगानें असें आढळून आलें आहे कीं, व्हायोलेट व अल्ट्राव्हायोलेट किरणांनीं प्राण्यांना तरतरी येऊं शकते. हे प्रयोग डॉ. बीच थॉमस यांनीं सर्प व पाळीव जनावरें यांवर करून पाहिले, तेव्हां त्यांजमध्यें जास्त तरतरी आल्याचें दिसलें. अशक्त मुलें व माणसें यांना जर या किरणांच्या प्रकाशांत बसविलें, तर त्यांची शरीरप्रकृति सुधारण्यास मदत होईल असें त्यांचें मत आहे. हे अल्ट्रा व्हायोलेट किरण पाडण्यासाठीं त्यांनीं एक व्हिटाग्लास नांवाची काच तयार केली असून तिच्या साह्यानें हे किरण चांगले पाडतां येतात. शास्त्रीय शोधांना मर्यादा नाहीं.

डॅनिश वैमानिक बोलव्हेड हा विमानमार्गानें टोकियोस जाऊन परत आला.

कोल्हापूर संस्थानाधीपतींनीं आपल्या राज्यांत १० वर्षांच्या आंत मुलींचा व १४ वर्षांच्या आंत मुलांचा विवाह करूं नये, असा हुकूम काढला असून तो न पाळणाऱ्यास २००० रुपये दंड द्यावा लागणार आहे. कांहीं वर्षांपूर्वीं बडोदा सरकारनेंही असाच हुकूम काढला होता व त्यांत १२ व १६ अशी मुली व मुलांच्या लग्नाची मर्यादा घातली होती. या कायद्याची अंमलबजावणी झाल्यास फायदा होणार नाहीं असें कोण म्हणेल ?

आपल्या शरिराचा लोह हा एक घटक आहे. याचें प्रमाण अल्प असलें तरी याचा उपयोग हवेंतील ऑक्सिजन फुफ्फुसांतून शोषून घेऊन त्याचा रक्ताला पुरवठा करण्याचे कामीं फार होतो. रक्तांतील हेमोग्लोबिन नांवाच्या पेशींचा तांबडा रंग या ऑक्सिजनचाच परिणाम आहे. शरीरांत या लोहाचें परिमाण अल्प प्रमाणांत जरी कमी झालें तरी मनुष्याला थकवा येऊन गळून गेल्याप्रमाणें वाटतें. औषधांच्या द्वारें नुसतें लोह घेण्यानें शरिरांत लोहाची झीज भरून निघत नाहीं. उलट हा लोह आंतड्यांतील गंधकाबरोबर मिश्रण पावून अवरोध करतो. शरिराला लागणारा लोह हा वनस्पतींमार्फतच शरिरांत जावा लागतो. पालेभाजांतून लोहाचा शरिराला योग्य पुरवठा होतो. सालट किंवा लेटिव्हस ( विलायती भाजी ) ह्या भाजांपासून लोहाचा भरपूर पुरवठा होतो. एकंदरीनें पालेभाजा खाल्ल्यानें शरिरांत लोहाचा योग्य पुरवठा होऊन औषधापेक्षां शरिरावर चांगला तजेला लवकर येईल, म्हणून जेवणांत पालेभाजा जास्त खाण्यांत याव्या असें डॉक्टरांचें म्हणणें आहे.

-----

# जगदेव परमार.

---

मालव देशांत धारानगरींत उदयादित्य नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याला दोन राण्या होत्या. थोरली वाघेर रजपुताच्या शाखेंतील होती. धाकटी चालुक्याच्या वंशांतील होती. थोरल्या राणीवर राजाचें प्रेम फार असे. थोरलीला एक मुलगा होता, त्याचें नांव धवलराय असें होतें. त्याचा वर्ण गोरा होता. धाकटीला एक मुलगा होता, त्याचें नांव जगदेव. हा मुलगा श्याम वर्णाचा होता, पण तो मदनाप्रमाणें सुंदर असे. राजानें धाकट्या राणीला खर्चाकरितां एक गांव इनाम दिला होता. तेथें ती व तिचा मुलगा जगदेव हीं राहात असत. थोरली राणी यांना कधींही राजाजवळ येऊं देत नसे. जगदेवाला १२ वें वर्ष लागलें. एके दिवशीं राजानें आपल्या प्रधानाला म्हटलें, 'प्रधानजी, मीं आज किती तरी दिवसांत जगदेवाला पाहिला नाहीं.' प्रधानानें उत्तर दिलें, 'महाराज, पुत्रापेक्षां दृष्टीला सुख देणारी या जगांत दुसरी कोणती वस्तु आहे?' राजानें जगदेवाला बोलावणें पाठविलें. जगदेव राजवाड्यांत आला. राजपुत्राचे कपडे अगदीं साधे होते. त्याच्या डोकीचें पागोटें १ रुपाया किंमतीचेंही नव्हतें. त्याच्या बोटांत अंगठी नव्हती व गळ्यांत कंठा नव्हता किंवा कानांत हिऱ्याचे डूलही नव्हते. जगदेवाला पाहिल्याबरोबर राजाला पुत्रप्रेमाचा उमाळा आला. त्यानें त्याला पोटाशीं धरलें. तो म्हणाला, 'मुला, तूं असले भिकार कपडे कां घालतोस?' जगदेवानें उत्तर दिलें, 'महाराज पूर्वजन्मीं मीं पुण्य केलें नाहीं, म्हणूनच माळव्याच्या परमार वंशांत जन्माला येऊनही मला मठिभाकर मोठ्या कष्टानें मिळते. आपण माझ्या आईला एक भिकार गांव दिला आहे, त्याच्या उत्पन्नावर आमचा कसाबसा चरितार्थ चालतो.' राजानें प्रधानाला राजपुत्राचे खर्चाकरितां रोज चार रुपये देण्याचा हुकूम केला. पण जगदेव म्हणाला, 'माझी आई

अत्यंत प्रेमळ आहे. माझ्या प्रेमळ आईच्या सहवासांत मी अत्यंत सुखी आहें. मला आपल्या पैशाची गरज नाहीं.' परंतु राजानें आग्रह करून जगदेवाला रुपयांची एक थैली दिली व त्याला घरीं परत धाडलें. जगदेवानें सर्व हकिकत आपल्या आईला सांगितली. तिनें ती शांत चित्तानें ऐकून घेतली, पण ती कांहीं बोलली नाहीं. 'राजानें जगदेवाला बोलावून त्याला प्रेमानें जवळ बसवून घेतलें व त्याला रुपयांची पिशवी दिली' ही बातमी थोरल्या राणीला कळतांच ती संतापानें लाल झाली. तिनें राजाला बोलावून त्याची चांगलीच कानउघाडणी केली. ती म्हणाली, 'त्या काळ्या भिकार पोराबद्दल तुम्हांला प्रेमाचा इतका उमाळा कां आला? तें पोर रंगानें जितकें काळें आहे, तितकेंच त्याचें भाग्यही काळें आहे. तुम्ही त्याला दिलेली पिशवी परत आणा.' राजानें नम्रपणें उत्तर दिलें, 'दिलेली वस्तु परत घेणें योग्य नाहीं. मी तुला विचारल्याशिवाय जगदेवाला आतां पुन्हा कांहींही देणार नाहीं.'

राजा उदयादित्य हा मांडवगणच्या राजाचा मांडलिक होता. मांडवगण एथील राजानें उदयादित्याला आपल्या दरबारीं बोलाविलें व कांहीं कामगिरीवर पाठविलें. तिकडे तो तीन वर्षे राहिला. राजपुत्र जगदेव आपल्या आईच्या गांवींच राहिला. थोरली राणी आपल्या पुत्रासह धारला राहून राज्यकारभार करीत होती. जगदेव विनयशील व गरिबांचा वाली असे. त्याच्या घरीं जाण्यायेण्याला कोणालाही प्रतिबंध नसे. त्याच्या सौजन्याची, त्याच्या शौर्याची, त्याच्या धाडसाची कीर्ति चोहोंकडे पसरली. माळव्याचे पलीकडे गंभीरसिंह नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याला एक मुलगी होती. ती त्यानें जगदेवाला देण्याचा निश्चय केला व लग्न ठरविण्याकरितां उपाध्यायाला नारळ देऊन पाठविलें. उपाध्यायाबरोबर ९ हत्ती व १९ घोडे यांचा नजराणाही पाठविला. उपाध्याय व त्याच्या बरोबरची मंडळी धारला आली. उदयादि-

त्याच्या कामगार मंडळीनें त्यांचें स्वागत केलें व त्यांची राहण्याची उत्तम व्यवस्था केली. 'जगदेवाला मागणी घालण्याकरितां आम्ही आलों आहों, तेव्हां त्याला व त्याच्या आईला एथें आणा, म्हणजे आम्ही हा नजराणा त्याला देऊं व लग्नाचें ठरवूं', असें उपाध्यायानें प्रधानाला सांगितलें. हें ऐकून थोरली राणी रागानें लाल झाली. तिनें त्या उपाध्यायाला निरोप पाठविला कीं, 'राय धवल हा राज्याचा मालक आहे. तो युवराज आहे. जगदेवाला खाण्याला पुरेसें अन्नही नाहीं. तेव्हां धारच्या राजपुत्राला सोडून त्या भिकार काळ्या मुलाला तुम्ही आपली मुलगी कशाला देतां ? राय धवलला तुम्ही आपली मुलगी द्या म्हणजे तिचें कल्याण होईल.' तिनें त्या उपाध्यायाला व त्याच्या बरोबरीच्या मंडळीला बऱ्याच बहुमूल्य देणग्या दिल्या. तेव्हां त्यांनीं आपली राजकन्या राय धवलला देण्याचें ठरविलें व विवाहाचा वाङ्‌निश्चय मोठ्या थाटानें केला. परत जाण्याचे पूर्वीं जगदेवाला एकदां पाहावें अशी त्यांना इच्छा झाली. तेव्हां थोरल्या राणीनें त्याला त्याचे गांवाहून आणविलें. जगदेवाचें तें मनोहर रूप पाहून उपाध्यायाला आपली चूक कळून आली. पण आतां उपयोग काय ? ती सर्व मंडळी आपल्या नगरींत परत गेली. राजाला त्यांनीं ती सर्व हकीकत सांगितली. भवितव्यतेपुढें कांहीं इलाज नाहीं असें समजून राजानें मुलीच्या लग्नाची तयारी केली.

गंभीरसिंहानें पत्र पाठवून धारचे प्रधान मंडळीला राय धवलाच्याबरोबर जगदेवला घेऊन येण्याविषयीं आग्रहानें लिहिलें. तेव्हां थोरल्या राणीचा नाइलाज झाला. जगदेवाला उत्तम वस्त्रें, घोडा, शस्त्रें वगैरे देऊन त्याला तिनें राय धवलच्याबरोबर घेतलें व मंडळी लग्नाला निघाली. वाटेंत या मंडळीचा मुक्काम टोकतोडा या शहरीं झाला. या शहरचा राजसिंह नांवाचा राजा होता. त्यानें या मंडळींचा आदरसत्कार केला. 'दोन दिवस माझा पाहुणचार घ्या व मग जा,' अशी त्यानें त्यांना विनंती

केली. या आग्रहामुळें ही मंडळी त्या ठिकाणीं दोन दिवस राहिली. राजसिंह हा उत्तम कुळांतील रजपूत होता. त्याला वीरमती नांवाची एक मुलगी होती. ती लग्नाला योग्य झाली होती, पण तिला अनुरूप वर न मिळाल्यामुळें राजसिंह फार कष्टी झाला होता. जगदेवाची कीर्ति त्यानें ऐकिली होती. त्याचें तें मदनासारखें अप्रतिम रूप पाहून त्यानें आपली मुलगी त्याला देण्याचा निश्चय केला. नंतर या ठिकाणीं जगदेव व वीरमती यांचें थाटानें लग्न झालें. राजसिंहानें आपल्या जांवयाला पुष्कळ देणग्या दिल्या. आपल्या मुलाचे आधीं जगदेवाचें लग्न झालेलें पाहून थोरल्या राणीच्या अंगाचा तिळपापड झाला, पण तिनें तो सर्व राग कष्टानें गिळला. वीरमती आपल्या बापाचे घरीं राहिली व मंडळी पुढें राय धवलच्या लग्नाला गेली. राय धवलचें लग्न आटोपल्यावर सर्व मंडळी परत धारला आली. परत येतांना राजसिंहानें आपली मुलगी धारला पाठवली. जगदेवाचें वैभव पाहून त्याच्या सावत्र आईला संताप आला. वीरमतीला आपल्या सासूकडे खेडेगांवांत पाठवलें, एक महिन्यानें ती आपल्या गांवीं परत गेली. सासऱ्यानें दिलेली सर्व संपत्ति जगदेवानें वीरमतीबरोबर परत पाठविली. तो म्हणाला, 'या संपत्तीचा एथें मला कांहीं उपयोग नाहीं.' यानंतर तीन वर्षें गेलीं.

तीन वर्षांनीं राजा उदयादित्य आपली कामगिरी संपवून परत धारा नगरीस आला. त्यावेळीं तो फार आनंदांत होता. त्याला राय धवल व नगरची सर्व मंडळी सामोरा गेली. दरबारांत आल्यावर त्यानें जगदेवाची चौकशी केली व त्याला बोलावण्यास नोकरास पाठविलें. जगदेवाच्या शौर्याची व सौजन्याची कीर्ति त्यानें आधींच ऐकिली होती. जगदेवानें आल्यानंतर त्यानें त्याला आपल्या हृदयाशीं कवळून धरलें. जगदेवाचा पोशाक अगदीं गरिबीचा होता. तो पाहून राजास फार वाईट वाटलें. त्यानें आपल्या गळ्यांतील कंठा काढून त्याचे गळ्यांत घातला. आपल्या अंगावरील हिऱ्याचे अलंकार त्याचे अंगावर घातले. आपली तलवार व ढाल त्याला दिली. आपला घोडाही त्यानें जगदेवाला दिला.

ही बातमी ऐकून त्याचे सावत्र आईस फार वाईट वाटलें. तिनें राजाला सांगितलें कीं, आपण जर दिलेले दागिने व शस्त्रें जगदेवापासून परत आणणार नाहीं, तर मी अन्न घेणार नाहीं. ही गोष्ट जगदेवाला कळल्यावर त्यानें ते दागिने व शस्त्रें परत पाठवून दिलीं.

दोन तीन वर्षें आणखी गेलीं. आपल्या पराक्रमानें कीर्ति व संपत्ति मिळविण्याचा जगदेवानें निश्चय केला. त्यानें आपणांस घर सोडून जाण्याची परवानगी देण्याविषयीं आईची विनंति केली. आपल्या जीव कीं प्राण पुत्राला निरोप देतांना तिला अत्यंत वाईट वाटलें, पण ती रजपूत होती. आपल्या पुत्राची कीर्ति दिगंतीं पसरावी अशी तिची इच्छा होती, म्हणून डोळ्यांतील अश्रुबिंदु आवरून तिनें त्याला आशीर्वाद दिला. जगदेव आपलीं शस्त्रास्त्रें घेऊन आपल्या आवडत्या घोड्यावर बसून निघाला. निघतांना त्याला आईनें दोन सोन्याच्या नाण्यांच्या पिशव्या दिल्या. तो प्रथम तो आपल्या सासरच्या गांवाकडे गेला. दुपारच्या वेळीं टोकतोडा शहराच्या बाहेर असलेल्या बागाजवळ आला. बागेजवळील झाडाला त्यानें घोडा बांधला व आपण विश्रांति घेण्याकरितां तेथेंच जरा पडला, तोंच त्याला झोप लागली. ही बाग राजाची होती. जगदेवाची पत्नी वीरमती ही आपल्या दासींसह त्याच दिवशीं सकाळीं बागांत आली होती. तिची व जगदेवाची चार पांच वर्षांत गांठ पडली नव्हती. ती बागेंतील मंदिरांत बसली होती व तिनें आपल्या दासींना आपणाकरितां फळें आणण्यास धाडलें. त्यांपैकीं एका दासीच्या निजलेला राजपुत्र व त्याचा घोडा दृष्टीस पडला. राजपुत्राचा तो बहुमोल पोषाक व सुंदर घोडा पाहून तिला आश्चर्य वाटलें व तिनें जरा निरखून पाहिलें, तों तिला जगदेवाची ओळख पटली. ती धावत राजपुत्रीकडे गेली व म्हणाली, 'बाईसाहेब, दारीं आपले यजमान आले आहेत.' राजकन्येनें आणखी दुसऱ्या दासींना धाडलें व सर्वांची तो जगदेव आहे अशी खात्री झाली. राजकन्येनें हळूच फुलांच्या ताटव्यांच्या आडून

पाहिलें तो तिलाही ओळख पटली. ती पुढें जाऊन म्हणाली, 'आज माझें महद्भाग्य उदयास आलें. आज मला शुभशकुन होत होते त्यांची प्रतीति आली. आपण एकटें येऊन एथें कां पडला आहां? आम्ही आपला कांहीं अपराध केला असल्यास त्याची क्षमा करावी. आपण आतां नगरांत चलावें.' जगदेवानें तिला सगळी हकिकत सांगितली. तो म्हणाला, 'बाहुबलानें कीर्ति व संपत्ति संपादन करण्यापूर्वी तुला एकदां भेटावें अशी इच्छा होती, म्हणून मी एथें आलों. माझा हेतु साध्य झाल्याशिवाय तुझ्या बापाचा पाहुणचार स्वीकारण्याची माझी इच्छा नाहीं. हेतु साध्य झाल्यावर माझ्या प्रियपत्नीस नेण्याकरितां मी येईन व माझ्या श्वशुराच्या आदरातिथ्याचा आनंदानें स्वीकार करीन.' अर्थातच त्याचें हें बोलणें वीरमतीला आवडलें नाहीं. तिनें त्याला नगरांत येण्याविषयीं फार आग्रह केला. यापूर्वींच दासींनीं धावत जाऊन जामात आल्याची खबर राजास दिली होती. राजा आपल्या जांवयाला नेण्याकरितां ताबडतोब तेथें आला. मग जगदेवाचा नाइलाज झाला व त्याला नगरांत जाणें भाग पडलें.

जगदेव आपल्या सासऱ्याचे घरीं पांच दिवस राहिला. नंतर आपणांला जाण्याची परवानगी द्यावी, अशी सासऱ्याची त्यानें विनंती केली. 'हें राज्य तुमचेंच आहे, तुम्ही एथें राहा' असें त्यास सासऱ्यानें वारंवार सांगितलें, पण जगदेव तें ऐकेना. अखेरीस त्यानें मोठ्या कष्टानें जांवयाला जाण्याची परवानगी दिली. जगदेवानें वीरमतीला 'आपण आतां जाणार' असें सांगितलें. तिनें आपल्या पतीबरोबर आपण येणार असा आग्रह धरला. 'परक्या देशांत तुझ्यासारख्या तरुण स्त्रीनें येणें चांगलें नाहीं, तेथें अनेक संकटें असतात, म्हणून तूं येऊं नको' असें अनेक प्रकारानें त्यानें तिला सांगितलें. पण ती ऐकेना ती म्हणाली,

### साकी-

जिकडे भर्ता तिकडे त्याची प्रेमळ पत्नी जाई
वृक्ष सोडुनी छाया त्याची कधीं तरी का राही,

सहवासीं मी अपुल्या राहुनि सुखदुःखें भोगीन
सेवा करण्या अपुली नाथा दक्ष सदा राहीन

तिचा तो निश्चय पाहून जगदेवानें तिला आपल्याबरोबर घेतलें. निघण्याची वेळ झाली, वीरमतीनें आईचा, बापाचा व भावाचा निरोप घेतला. जगदेवानें सासुसासऱ्यांस नमस्कार केला. त्यांनीं त्याला आशीर्वाद दिले. जगदेव व वीरमती दोघेंही घोड्यांवर बसलीं. वीरमतीनेंही कमरेस तलवार बांधली व पाठीवर धनुष्य बाण बांधले. तिनें बुरख्यानें तोंड झाकलें. पतिपत्नींनीं आपल्या घोड्यांना टांच मारल्यावर ते वायुवेगानें निघालें जगदेवाचे सासऱ्यानें त्यांच्याबरोबर कांहीं घोडेस्वार दिले होते. शहराबाहेर आल्यावर कांहीं वेळानें त्या घोडेस्वारांना जगदेवानें सांगितलें, 'तुम्ही आतां परत जा. मी सौराष्ट्र देशाचा राजा सिद्धराज जयसिंग याच्याकडे नोकरीस जात आहें. तेथें आपल्या स्वतांच्या बाहुबलानें संपत्ति व कीर्ति मिळवावी अशी माझी इच्छा आहे. तुम्ही मला आतां पट्टणला जाण्याचा रस्ता दाखवा.' हें ऐकून त्या स्वारांचा मुख्य अधिकारी म्हणाला 'महाराज, आपल्या पुढें आमचा नाइलाज आहे. आम्ही आपल्या हुकुमानें परत जातों. पट्टणला रस्ता तोडरी गांवाहून जातो. तें गांव थेट पश्चिमेला १० कोस आहे, पण तुम्ही या तिरप्या रस्त्यानें जा. कारण या सरळ रस्त्यावर मोठें अरण्य आहे. त्या अरण्यांत एक मोठा वाघ व वाघीण आहेत. त्यांनीं आज दोन वर्षांत कहर केला आहे, म्हणून या रस्त्यानें कोणी जात नाहीं.' 'तुम्ही आतां नगरांत परत जा' असें स्वारांस सांगून जगदेव समोरच्या मार्गानें चालला. त्यानें वीरमतीला मोठ्या दक्षतेनें डाव्या बाजूकडे लक्ष देण्यास सांगितलें व आपण उजव्या बाजूकडे लक्ष देऊन तो चालला. त्या दोघांनीं आपलीं धनुष्यें व बाण सज्ज ठेविले. वाटेनें त्यांना वाघांनीं मारलेल्या माणसांचे व जनावराचे शेंकडों सांगाडे दृष्टीस पडले. रानांत बरेंच पुढें गेल्यावर तो वाघ झाडाखालीं पडलेला

जगदेवाचे दृष्टीस पडला. तेव्हां जगदेवानें त्याला मोठ्यानें हाक मारली व युद्धास बोलाविलें. तो प्रचंड वाघ जोरानें जगदेवावर हल्ला करण्याकरितां आला. जगदेवानें धनुष्याला बाण लावून तो बाण आकर्ण ओढला वें वाघावर सोडला. तो बाण वाघाचे मर्मस्थानी लागला, तेव्हां वाघानें मोठी गर्जना केली व मोठ्यानें उडी मारून तो खालीं पडला व मेला. जगदेव व त्याची पत्नी पुढें गेलीं तोंच आपल्या आंगावर जोरानें धावत येणारी वाघीण त्यांच्या दृष्टीस पडली. त्याबरोबर वीरमतीनें एक बाण त्या वाघिणीचे मस्तकावर सोडला. त्या वाघिणीचे मर्मस्थानीं तो बाण लागून ती गतप्राण झाली, नंतर तीं उभयतां संध्याकाळचे सुमारास एका तळ्याचे कांठीं आलीं. तेथें त्यांनीं त्या रात्रीं मुक्काम केला.

जगदेव हा वाघांच्या रानांतून जात आहे ही बातमी जेव्हां त्या स्वारांनीं जगदेवाच्या सासऱ्यास सांगितली, तेव्हां त्याला आपल्या जांवयाबद्दल व कन्येबद्दल फार काळजी वाटली. त्यानें लागलीच पन्नास स्वार त्यांच्या शोधार्थ पाठविले. स्वार रानांत आले. त्यांनीं तो भयंकर वाघ व वाघीण मारलेली पाहिली जगदेवाचें हें शौर्याचें कृत्य पाहून त्यांना अत्यंत आश्चर्य वाटलें. पुढें गेल्यावर त्यांना तो राजपुत्र व त्याची पत्नी तळ्याचे कांठीं उतरलेली दृष्टीस पडली. त्यांनीं वाघाला मारल्याबद्दल व त्या प्रदेशांतील लोकांना संकटांतून सोडविल्याबद्दल जगदेवाची फार स्तुति केली, पण जगदेवाला आपण कांहीं विशेष केलें असें वाटत नव्हतें, म्हणून त्यानें त्यांच्या बोलण्याकडे लक्ष दिलें नाहीं. त्यानें त्या स्वारांना परत जाण्यास सांगितलें. दुसऱ्या दिवशीं पुन्हा त्या उभयतांनीं आपल्या प्रवासास प्रारंभ केला व चौथ्या दिवशीं सिद्धराजाच्या पट्टण नगरीजवळ तीं उभयतां येऊन पोहोंचलीं. नगरच्या बाहेर असलेल्या विस्तीर्ण अशा सहस्रलिंग तलावाचे कांठीं त्यांनीं आपले घोडे सोडले. जगदेव आपल्या पत्नीस म्हणाला, 'तूं या ठिकाणीं विसांवा घे, मी नगरांत जाऊन आपणांकरितां एक घर भाड्यानें घेतों व लागलीच

परत येतों.' मग तो आपल्या घोड्यावर बसून शहरांत गेला. तलावाच्या या बाजूला कोणीही मनुष्य नव्हतें, म्हणून वीरमतीनें आपला बुरखा दूर करून तलावाच्या शीतलजलानें मुख प्रक्षालन केलें व त्यायोगानें तिच्या प्रवासाचे श्रम नाहींसे झाले. सकाळच्या शीतल व सुगंध वायूच सेवन करीत ती झाडाखालीं बसली. इतक्यांत तेथें दासींसह एक प्रौढ स्त्री स्नानाकरितां आली. ही स्त्री त्या शहरांतील एक वेश्या होती. ती अजाण अशा मुलींना आपल्या जाळ्यांत गुरफटून त्यांना वाईट मार्गाल लावीत असे.

पट्टणच्या कोतवालाला एक दिवटे चिरंजीव होते. ते आपला काळ ख्याली-खुशालींत घालवीत असत. ही वेश्या त्यांची फार आवडती असे. शहरांत शोध ठेवून गरीब व निराधार तरुण मुलींना फुसलावून ती दासी म्हणून या कोतवालाच्या मुलास पुरवीत असे व याजबद्दल तो तिला भरपूर द्रव्य देई. ही वेश्या या ठिकाणीं स्नानास आली होती. तिच्या दृष्टीस ती मुलगी पडली. तिनें आपली एक दासी तिच्या चौकशीकरितां धाडली. तिनें वीरमतीजवळ तिची चौकशी केली. वीरमतीनें मी परमार घराण्यांतील राज-स्नुषा आहे व माझा पति सिद्धराजाचे पदरीं राहाण्याकरितां आला आहे हें तिला सांगितलें. तिनें वीरमतीला तिच्या नवऱ्याचें नांव विचारलें. वीरमती लाजून म्हणाली, 'बाइगे पतीचें नांव शुभ प्रसंगाशिवाय आर्यस्त्री कधीं घेत नाहीं. परंतु ज्या अर्थी मी या नवीन देशात आलें आहें व तूं इतक्या प्रेमानें चौकशी करीत आहेस त्याअर्थी मी तें तुला सांगतें.' या-नंतर त्या सरळ मनाच्या बालिकेनें आपली सर्व हकीकत त्या दासीला सांगितली. तिनें परत येऊन ती आपल्या यजमानिणीला सांगितली. ही भोळी मुलगी जर आपल्या जाळ्यांत सांपडली, तर आपणांला कोतवालाचा मुलगा पुष्कळ द्रव्य देईल असें जमोतीस (हें त्या वेश्येचें नांव होतें.) वाटलें. तिनें काय करावयाचें तें मनांत योजलें. ती वीरमतीकडे गेली व डोळ्यांत आंसवें आणून म्हणाली, 'मुली, किती विलक्षण योगायोग हा. जगदेव

माझा भाचा, उदयादित्याची मी बहीण आहें.तुझें लग्न घाईनें झाल्यामुळें मला लग्नाला येतां आलें नाहीं. आज तुम्ही येथें आलेलीं पाहून मला किती आनंद झाला आहे. मला तरी मूलबाळ कोठें आहे. आतां तुम्हां दोघांच्या संगतींत मी आपला काळ सुखांत घालीन. मी जगदेवाला आणण्याकरितां माणसें शहरांत धाडलीं आहेत, त्यांनीं त्याला माझ्या वाड्यांतही नेलें असेल. चल, तूंही आतां घरीं चल. परमाराची सून अशी भिकाऱ्यासारखी झाडाखालीं बसलेली मला कशी पाहावेल ? ' तिच्या या मायावी भाषणानें व तिच्या अश्रूंनीं वीरमती फसली. तिला तिचें बोलणें खरें वाटलें. जमोतीनें तिला पालखींत बसविलें व नगरांत नेलें. घरीं आल्यावर तिच्या नोकरानें सांगितलें, ' राजपुत्राला सिद्धराजानें आपल्या राजवाड्यांत नेलें आहे, तो आज तेथेंच राहील व संध्याकाळीं एथें परत येईल. ' जमोतीनें मोठ्या प्रेमानें वीरमतीला स्नान घातलें व भोजनास बसविलें. जगदेव न आल्यानें वीरमतीच्या मनास खिन्नता आली. संध्याकाळ झाली, तरी जगदेव आला नाहीं. एक चाकर येऊन त्यानें निरोप सांगितला कीं, ' जगदेवाला राजानें एक महत्त्वाचें काम सांगितलें आहे. आज रात्रीं राजा जगदेवाला त्या कामाची माहिती देणार आहे, म्हणून जगदेव राजवाड्यांत राहणार आहे, तो उद्यां सकाळींच एथें येईल. '

जमोतीनें वीरमतीला एक सुशोभित खोली निजावयास दिली. ही भोळी मुलगी आतां सर्वस्वी आपल्या ताब्यांत आली असें वाटून तिला फार हर्ष झाला. तिनें कोतवालाच्या मुलाला मीं एक सुंदर दासी तुम्हाकरितां आणलेली आहे, म्हणून तुम्ही ताबडतोब या असा निरोप धाडला. कोतवालाच्या मुलानें सुंदर पोषाख केला व मद्याचे चार पेले झोकून तो जमोतीचे घरीं गेला. तिनें त्याला वीरमतीचे खोलींत धाडलें. त्याला पाहतांच त्या रजपूत कन्येचे लक्षांत जमोतीचें सर्व कपट आलें. पण तिचें धैर्य अलोट होतें. ती घाबरली नाहीं. संकटांतून पार

पडण्याची युक्ति तिनें योजिली. कोतवालाच्या मुलानें तिला सांगि-तलें, 'मी अत्यंत श्रीमंत व शूर आहें. तूं दासी म्हणून जर माझ्या पदरीं राहाशील, तर मी तुला अत्यंत सुखांत ठेवीन.' वीरमती म्हणाली, 'महाराज, आपली मजवर फार कृपा आहे. ती मी कधीं विसरणार नाहीं. या कृपेचा मोबदला मी आपणांस खात्रीनें देईन. आपण आज पाहुणे आहां, तेव्हा मी प्रथमच दिलेला मद्याचा पेला आपण नाकारणार नाहीं.' असें म्हणून तिनें एक पेला मद्यानें भरून कोतवालाचे मुलास दिला. यानंतर थोड्या वेळानें तिनें दुसरा पेला त्याला दिला. थोड्याच वेळांत त्या मद्यानें तो बेशुद्ध झाला. तो घोरूं लागतांच वीरमतीनें आपली कट्यार काढून ती त्याचे छातींत आरपार खुपसली. त्याचा प्राण तावडतोब गेला. त्या प्रेताकडे पाहून ती म्हणाली, 'दुष्टा, रजपुत कन्यकेवर पापदृष्टि ठेवल्याचें हें फळ भोग.' नंतर तिनें तें प्रेत वस्त्रांत गुंडाळलें व एका बोचक्यांत व्यवस्थित बांधलें व खिडकींतून तें खालीं ढकलून दिलें. शिपाई लोक रस्त्यांत पाहारा करीत होते. त्यांना वाटलें कीं, आपणांला पाहून चोर द्रव्याचें बोचकें टाकून पळून गेले. तें बोचकें त्यांनीं उचललें व कोतवालाचे घरीं नेलें. कोतवाल निजला होता, म्हणून त्यांनीं तें बोचकें देवडीवर ठविलें.

पहांटेस कोतवाल उठला. त्यानें तें बोचकें सोडलें व पाहतो तों आपल्या एकुलत्या एक पुत्राचें प्रेत. तें पाहिल्याबरोबर दुःखानें तो चूर झाला. त्यानें चौकशी केली व त्याला सर्व हकिकत कळली. जमोतीच्या घरच्या नव्या मुलीनें आपल्या मुलास मारलें ही त्याची खात्री झाली. मग त्यानें त्या मुलीला धरून आणण्याकरितां शिपाई धाडले. वीरमतीनें आपल्या खोलीचें दार लावून घेतलें होतें व तें दारही बळकट होतें. तिनें रस्त्यावरील लहान खिडकी मात्र उघडी ठेविली होती. दार उघडत

नाहीं असें पाहून एक शिपाई खिडकींतून आंत शिरूं लागला. त्याबरोबर आंतून वीरमतीनें तरवारीनें एक झटक्यास त्याचें डोकें उडविलें व त्याचें धड रस्त्यांत पडलें, दुसऱ्या पांच शिपायांचीही तीच स्थिति झाली. मग ते शिपाई कोतवालाकडे गेले. कोतवाल राजाकडे गेला व जमोतीचे घराला वेढा घालण्याची त्यानें राजाजवळ परवानगी मागितली. यावेळीं प्रभात काळ होऊन दोन घटका झाल्या होत्या व सिद्धराज दरबारांत बसला होता.

इकडे जगदेवाची हकिकत काय झाली हें आपण पाहूं. जगदेवानें आपणाकरितां शहरांत एक वाडा भाड्यानें ठरविला व तो पुन्हा सहस्रलिंग तलावाचे कांठीं वीरमतीला नेण्याकरितां आला. पण तेथें ती नाहीं हें पाहून त्याला एकदम धक्का बसला. मग खिन्न चित्तानें शहरांत तो परत आला. राजाची गांठ घेऊन आपल्या येण्याचा हेतु सांगावा व वीरमतीचा शोध करण्यास त्याला सांगावें, म्हणून सिद्धराजाची गांठ घेण्याकरितां तो राजवाड्याकडे गेला. तेथें घोडेस्वारांवरील मुख्य अधिकाऱ्यानें त्याची चौकशी केली व त्याला आपल्या घरीं नेलें. दुसऱ्या दिवशीं सकाळींच सिद्धराजाची व त्याची गांठ पडली. राजानें त्याचा सत्कार केला व तो त्याशीं बोलत आहे तोंच कोतवाल आला व त्यानें जमोतीच्या घरांतील एका रजपूत मुलीनें आपल्या पुत्राला व पांच सहा शिपायांना ठार मारल्याचें कळविलें व जमोतीच्या घराभोंवतीं लष्कराचा वेढा घालून त्याचे दरवाजे फोडण्याची त्यानें परवानगी मागितली. सिद्धराजाला यांत कांहीं तरी कोतवालाची भानगड आहे अशी शंका आली व तो म्हणाला, 'मी स्वतःच येऊन या गोष्टीची व्यवस्था करितों.' सिद्धराजानें जगदेवाला बरोबर घेतलें. सिद्धराज स्वतां रस्त्यावर लावलेल्या शिडीवरून वर चढला. त्यानें वीरमतीला हाक मारली. तो म्हणाला, 'मुली, मी या नगराचा राजा सिद्धराज एथें आलों आहें. तूं यां कोतवालाच्या पुत्राला व शिपायांला कां मारलें तें सांग.' वीरमतीनें

राजाला पाहिलें व तिनें आपली सर्व हकिकत त्याला सांगितली. राजानें जगदेवाला शिडीवर बोलाविलें. त्यानें तिला खोलीचें दार उघडण्यास सांगितलें. मग तिनें दरवाजा उघडला. राजानें वीरमतीच्या शौर्याची वाखाणणी केली. तो तिला म्हणाला, 'वीरमती तूं माझी स्वतांचीच मुलगी आहेस असें समजतों. तूं आतां सुखानें आपल्या पतीसह पट्टणांत राहा.' कोतवालानें आपल्या नगराच्या लोकांचें रक्षण न करितां त्यांना त्रास दिला, म्हणून राजानें त्याला हद्दपार केलें.

जगदेवाला रोज एक हजार होन देऊन राजानें आपल्या पदरीं ठेविलें व त्याला राजवाड्याचे पाहारेकऱ्यांवरील मुख्य अधिकारी नेमलें. सिद्धराजानें त्याला अनेक साहसाचीं कामें सांगितलीं, पण तीं त्यानें मोठ्या आनंदानें पार पाडलीं. सिद्धराजाचें वीरमतीवर व जगदेवावर अत्यंत प्रेम असे.

काळ कसा भराभर जात असतो. त्यांतून सुखाचा काळ तर अत्यंत लवकर जातो. जगदेवाला सिद्धराजाचे नगरांत आल्याला आठ वर्षें झालीं. जगदेवाला सर्व सुखें अनुकूल होतीं. त्याला दोन पुत्र झाले. त्यानें थोरल्या मुलाचें नांव जगधवल व धाकट्याचें नांव व्रजधवल असें ठेविलें. थोरला मुलगा आतां पांच वर्षांचा झाला व धाकटा मुलगा तीन वर्षांचा झाला. हीं दोन मुलें सिद्धराजाचीं फार लाडकीं होतीं.

भाद्रपदाची अमावास्या होती. आकाश काळेकुट्ट झालें होतें. नगरांत जिकडे तिकडे शांतता होती. हस्तनक्षत्राची मुसळधार सुरू होती. मधून मधून मेघांचा गडगडाट व विजांचा चमचमाट होत होता. नगराचे बाहेर खंदकाचे पलीकडे घुबडें घूं घूं अशीं सारखीं ओरडत होतीं. नित्याप्रमाणें जगदेव सिद्धराजाचे वाड्यांत पहारा करीत होता. यावेळीं कांहीं तरुण स्त्रिया रडत आहेत असें जगदेवाला ऐकूं आलें. सिद्धराज आपल्या महालांत जागा होता. त्यानें खिडकी उघडून जगदेवाला विचारलें, 'जग-

देव, हा रडण्याचा आवाज कोठून येत आहे ?' जगदेवानें उत्तर दिलें, 'महाराज आज आठ दिवस मध्यरात्रीच्या सुमारास हा आवाज ऐकूं येतो. मला पहारा सोडून जातां येत नाहीं, म्हणून मी त्याची चौकशी केली नाहीं.' सिद्धराज म्हणाला, 'जगदेव, हा आवाज नगराच्या पलीकडील रानांतून येत आहे. तूं जा व कोण स्त्रिया रडत आहेत व त्यांचे रडण्याचें कारण काय याचा शोध कर.' 'बरें आहे. महाराज' असें म्हणून जगदेव राजवाड्याचे बाहेर पडला.

सिद्धराजाही आपलीं शस्त्रें घेऊन व काळा पोशाक करून जगदेवाचे मागोमाग निघाला. जगदेव त्या आवाजाचे धोरणानें नगराचे बाहेर पडला. तो त्या घोर अरण्यांत शिरला. त्याच्या मनांत यत्किंचितही भीति नव्हती. रानाचे मध्यभागीं त्याच्या दृष्टीस एक विलक्षण देखावा पडला, एका वडाचे झाडाखालीं एक अत्यंत तेजस्वी स्त्री बसली होती. तिचीं वस्त्रें बहुमोल होतीं. तिनें आपले केश मोकळे सोडले होते व ती एकसारखी मोठमोठ्यानें रडत होती व तिच्याभोंवतीं तशाच तरुण आठ स्त्रिया तिच्याबरोबर मोठमोठ्यानें रडत होत्या. जगदेवानें तें पाहिलें व त्यानें त्या मुख्य स्त्रीला नमस्कार केला. तो म्हणाला, 'मायजी, आपण कोणी देवता आहांत असें मला वाटतें. आपण कां रडत आहां हें मला सांगा.' त्यावर ती स्त्री म्हणाली, 'तुला सांगून उपयोग काय? तुझ्यानें आमच्या दुःखाचें निवारण होणार नाहीं !' जगदेव म्हणाला, 'मायजी, तुमचें दुःख निवारण करण्यास मी आपला प्राण देखील देईन. आपण आपल्या दुःखाचें कारण अवश्य सांगावें.' त्यावर ती स्त्री म्हणाली, 'मी या पट्टण नगराची राजलक्ष्मी आहें. सिद्धराजाला उदयीक रात्रीं यावेळीं मृत्यु येईल व नंतर पट्टणचें राज्य दिल्लीच्या मुसलमानांच्या ताब्यात जाईल. यामुळें मला व या माझ्या साहाय्य करणाऱ्या देवतांना वाईट वाटत आहे व आम्ही रडत आहों.' जगदेव म्हणाला, 'देवी, हें संकट नाहींसें होण्यास कांहीं उपाय आहे काय?' देवी म्हणाली, 'आहे,

पण तो फार भयंकर आहे. सिद्धराजाप्रमाणें पराक्रमी राजपुत्र व साध्वी राजस्नुषा जर आपलें आयुष्य सिद्धराजाला देण्यास व आपण मरण्यास तयार असेल, तर सिद्धराज वांचेल व राज्यावरील संकट नाहींसें होईल.' जगदेव म्हणाला, 'मी आपलें आयुष्य सिद्धराजाला दिलें, तर चालेल काय?' देवी म्हणाली, 'होय. पण तूं आपल्या हातानें आपला शिरच्छेद केला पाहिजेस!' जगदेव म्हणाला, 'बरें तर अर्ध घटका तुम्ही एथें थांबा. मी आपल्या पत्नीला सांगून एथें येतों.' असें म्हणून तो निघाला. राजा सिद्धराजही त्याचे मागोमाग गेला. वीरमतीनें आपल्या पतीनें सांगितलेली हकिकत ऐकिली. ती म्हणाली, 'मीही आपलें आयुष्य राजाला देण्यास तयार आहें.' मग आपल्या प्रिय पुत्रांचें शेवटचें दर्शन त्यांनीं घेतलें व तीं दोघे त्या वनांत गेलीं. सिद्धराजही त्यांचे मागोमाग गेला. जगदेवानें आपली तरवार काढली. वीरमतीनेंही आपली तरवार काढिली व आपल्या तरवारीच्या एकाच झटक्यानें आपलीं शिरें तीं दोघें कापणार, तोंच त्यांचा हात देवीनें धरला. ती म्हणाली, 'मुलांनो, तुम्ही जा. तुम्हांला दीर्घ आयुष्य असो. तुमच्या शौर्यानें व स्वामिभक्तीनें मी प्रसन्न झालें आहें. आतां सिद्धराजा ४८ वर्षें राज्य करील, असा मी त्याला वर देतें.' देवी अदृश्य झाली. मग तीं नवरा बायको घरीं परतलीं. राजवाड्यांत सिद्धराज परत गेला. जगदेवाच्या स्वामिभक्तीनें व स्वार्थत्यागानें त्याचें अंतःकरण गहिंवरलें.

सिद्धराजानें आपली मुलगी जगदेवाला दिली. वीरमती व सिद्धराजाची मुलगी सुमनवती या प्रेमानें सख्या बहिणीप्रमाणें वागूं लागल्या. पुढें सिद्धराजाला असा संशय येऊं लागला कीं, जगदेव आपणच पट्टणच्या गादीवर बसेल. जगदेवानें पाहिलें कीं, सिद्धराजाचें मन आपणाविषयीं कलुषित झालें आहे. मग त्यानें धारला जाण्याची तयारी केली. जगदेव जाणार हें पाहून सिद्धराजाला व पट्टणच्या लोकांना अतिशय वाईट वाटलें. त्यांनीं जगदेवाला राहण्याविषयीं फार आग्रह केला, पण तो राहिला

नाहीं. पत्नी व मुलें यांसह तो धारा नगरीला परत गेला. तेथें त्याचें त्याच्या बापानें व दोन्ही आयांनीं स्वागत केलें. त्याची सावत्र आई त्याजवर मनापासून प्रेम करूं लागली. नंतर त्यानें आणखी पुष्कळ शौर्याचीं कृत्यें करून अतुळ यश संपादन केलें. जगदेवाची कथा सांगणाऱ्या भाटानें म्हटलें आहे,

### साकी.

मंगलकारक अद्भुत पावन रम्य कथा वीराची
ऐकतील जे होईल त्यांना जोडी बहु पुण्याची
शौर्य धैर्य औदार्य तयांचे आंगीं दृढ बाणेल
इष्टकामनापूर्ती होउनि कीर्ती बहु वाढेल
कंजुष होतिल उदार भारी भ्याड शूर होतील
स्वार्थी होतील परोपकारी जनहित ते करतील

आम्हींही 'तथास्तु' म्हणून ही कथा पुरी करितों. या गोष्टीवरून ११ व्या शतकांतील समाजाचे विचार, कल्पना, आयुष्यक्रम यांविषयीं वाचकांना थोडीबहुत कल्पना येईल आणि म्हणून ही कथा आम्हीं दिली आहे.

# पोंच व अभिप्राय.

मुलांचें अंकगणित पुस्तक १ लें.—या पुस्तकांत दुसऱ्या इयत्तेंत लागणारा अंकगणिताचा सव भाग आला आहे. एक एक नमुन्याचें एक उदाहरण सोडवून दाखवावयाचें व त्याच जातींची १०।१२ उदाहरणें द्यावयाचीं असा क्रम ठेवल्यामुळें मुलांना उदाहरणें करण्यास सोपें जाईल. उदाहरणें अशक्य कोटींतील नाहींत. तीं व्यवहाराला धरून आहेत व मुलांच्या माहितींतील व्यवहाराचींच असल्यामुळें त्यांना तीं आवडतील. पुस्तकाची बांधणी व टाईपही चांगला आहे. त्या मानानें किंमतही थोडी म्हणजे तीन आणे आहे. शिक्षक व विद्यार्थी या दोघांनाही हें पुस्तक उपयुक्त वाटेल.

मुलांचें अंकगणित पुस्तक २ रें.—हें पुस्तकही वरील पद्धतीनें लिहिलें आहे. यांत उदाहरणांचा भरपूर संग्रह आहे. किं. ३॥ आणे.

लेखक रा. म. गो. मोडक, एम. ए. व द. ज. गोखले, बी. ए. शिक्षक ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन पुणें.

बेळगांवच्या म्युनिसिपल मराठी शाळेचे हेडमास्तर रा. केशव रामचंद्र कुलकर्णी यांजकडून खालील तीन पुस्तकें आमचेकडे अभिप्रायार्थ आलीं आहेत.

१ सुलभ भूवर्णन भाग १ ला.—या पुस्तकांत एकही नकाशा नाहीं. एकही चित्र नाहीं. एकही मनोरंजक वर्णन नाहीं. हिंदुस्तानांतील शहरें, नद्या, पर्वत, बंदरें यांच्या १८८ यादी व १९४ व्याख्या या पुस्तकांत दिल्या आहेत. हें पुस्तक अगदीं नीरस व शिक्षणदृष्ट्या अयोग्य आहे. किं. ५ आणे,

२ जोडाक्षरयुक्त शब्दसंग्रह.—यांत जोडाक्षराचे अवयव व त्या जोडाक्षरापासून होणारे शब्द दिले आहेत. शब्दांची निवड वाटेल तशी केली आहे. व्यासंग, व्युत्क्रम, बोलशेविज़म यांसारखे शब्द पहिल्या व दुसऱ्या इयत्तें· तील मुलांना लिहावयास सांगणें म्हणजेच शिक्षणशास्त्राचीं सर्व तत्त्वें झुगारून देण्यासारखें आहे. किं. एक आणा.

३ सुलभ तोंडी हिशेब.—यांत रीति वगैरे कांहीं दिल्या नाहींत. कांहीं सोपे कांहीं कठीण असे हजार दीड हजार हिशेब दिलेले आहेत. किं. १॥ आणा.

रा. कुलकर्णी यांचा आत्मविश्वास मात्र दांडगा आहे! ते आपल्या एका पुस्तकाबद्दल म्हणतात माझें हें पुस्तक कोहिनूर अष्टपैलू असून शिक्षक विद्यार्थ्यांचा कंठमणि आहे!

भाग्यपुरुष.—गेल्या उन्हाळ्याचे सुटीचे अगोदर नूतन मराठी विद्यालया-यांतील विद्यार्थ्यांस केलेला हा उपदेश आहे. हा उपदेश प्रत्येक विद्यार्थ्यानें अवश्य वाचावा. ले. रा. दत्तो वामन पोतदार सुपरिंटेन्डट नूतन मराठी विद्यालय, पुणें.

आरोग्य-प्रवेश.—लेखक. रा. ग. म. देशमुख बी. ए. बी. एस सी. सायन्स टीचर हायस्कूल फॉर गर्ल्स पुणें.

खालच्या इयत्तांत आरोग्य व शरीररचना यांची माहिती देण्याला हें पुस्तक फार उपयोगी पडेल. विषयाचें विवेचन सोपें व मनोरंजक आहे. ठिकठिकाणीं आकृति घातल्यामुळें पुस्तकांतील विषय समजण्याला मदत झालेली आहे. भाषा अगदीं सोपी आहे. मुलींच्या शाळांतून आरोग्य या विषयाला जास्त महत्त्व दिलेलें आहे. रा. देशमुख यांचें पुस्तक या शाळांतील ४ थ्या व ५ व्या इयत्तेला फार उपयोगी पडेल. सामान्य वाचकांनाही हें पुस्तक मनोरंजक व उपयुक्त वाटेल. किं. ४ आणे.

मनोरंजन—जुलै अंक. महाराष्ट्राच्या या आवडत्या मासिकाला ३२ वें वर्ष लागलें. प्रोफेसर नाईक यांच्या संपादकत्वाखालीं मनोरंजनचें काम समाधानकारक चाललें आहे. या वर्षी एक लहानसें पुस्तक वाचकांना मनोरंजननें बक्षिस दिलें आहे. त्यांत तीन गोष्टी आहेत. त्या मनोरंजक आहेत.

विद्यासेवक.—या मासिकांत वाङ्मय, समाजशास्त्र, इतिहास, राज्यकारण वगैरे विषयांवर वाचनीय लेख येतात. यांतील बहुतेक लेख माहितीनें भर-लेले असतात. या मासिकाला आतां तिसरें वर्ष लागलें आहे.

सुलभ शास्त्रीय पाठ.—अभिप्राय पुढील अंकीं. वरील पुस्तकें धाडणाराचे आम्ही फार आभारी आहों.

---

# मुलींची व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षा.

———:०:———

## ( मराठी व उर्दू )

## मुंबई भाग.

नंबर इ एक्स ४०१३-तारीख १ आक्टोबर सन १९२५ चें मुंबई सरकारचें गॅझेट भाग १ ला पानें २५४४ ते २५४८ यांत प्रसिद्ध झालेली शाळाखात्याची सरकारी जाहिरात नंबर २६३६ तारीख १८ आगष्ट सन १९२५ ची बरहुकूम मुलींची व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षा मुंबई भागाच्या सर्व जिल्ह्यांत शनिवार तारीख ९ आक्टोबर सन १९२६ रोजीं व पुढील दिवशीं ( रविवार तारीख १० आक्टोबर सन १९२६ खेरीज करून ) खालीं दिलेल्या ठिकाणीं ( सेंटरला ) होईल.

| जिल्हा | सेंटरचें नांव |
|---|---|
| १ मुंबई शहर | १ गिरगांव ( मराठी ) |
| | २ टँक स्ट्रीट ( उर्दू ) |
| २ ठाणें जिल्हा | ठाणें |
| ३ कुलाबा जिल्हा | १ अलिबाग |
| ४ रत्नागिरी जिल्हा | १ रत्नागिरी |
| | २ मालवण |
| ५ नाशिक | १ नाशिक |
| | २ मालेगांव |

२ प्रत्येक सेंटरला परीक्षा स्थानिक परीक्षाकमिटीकडून घेतली जाईल. आणि मुंबई येथील एल्फिन्स्टन् हायस्कूलचे प्रिन्सिपाल, मुंबई येथील उर्दू शाळांचे डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर, ठाणें, रत्नागिरी व नाशिक येथील सरकारी हायस्कूलचे हेडमास्तर, कुलाब्याचे डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर आणि रत्नागिरी व नाशिक येथील सीनियर असिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर्स हे अनुक्रमें गिरगांव, टँकस्ट्रीट, ठाणें, रत्नागिरी, नाशिक, अलिबाग, मालवण व मालेगांव या ठिकाणीं स्थानिक परीक्षाकमिट्यांचे अध्यक्ष आहेत.

३ परीक्षेला परवानगी मिळण्याकरितां करावयाचे अर्ज ठराविक नमुन्यांत केले पाहिजेत. हे नमुने जिल्ह्यांचे डे. ए. इन्स्पेक्टर्स अगर सीनियर असि. डे. ए. इन्स्पेक्टर्स यांच्याकडे फुकट मिळतील.

या अर्जांत आपणास कोणत्या विशिष्ट सेंटरला बसावयाचें व कोणत्या मार्फतून परीक्षा द्यावयाची यांचा उल्लेख करावा व ते अर्ज तारीख १ सप्टेंबर सन

१९२६ ला अगर त्या पूर्वी पोहोंचतील अशा बेतानें त्या सेंटरच्या अध्यक्षाकडे पाठवावे.

४ परिक्षेकरितां फी घेतली जाणार नाहीं

५ वयाची अट नाहीं.

६ परिक्षेला लागणाऱ्या पुस्तकांचीं नांवें तारीख ८ माहे आक्टोबर सन १९२५ चे मुंबई सरकारचें गॅझेट भाग २ रा पान १८२० मध्यें प्रसिद्ध झालीं आहेत.

७ मुसलमान मुलींकरितां उर्दू व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षा ठाणें, कुलाबा, रत्नागिरी व नाशिक या जिल्ह्यांत वर सांगितलेल्या सेंटर्सना व मुंबईस टँक स्ट्रीट सेंटरला घेतली जाईल.

एज्युकेशनल इन्स्पेक्टर,
मुंबई भाग यांचें ऑफिस.
ता. ३० जुलई सन १९२६.

जे. एस. काद्री,
एज्युकेशन इन्स्पेक्टर
मुंबई भाग.

---

# सरकारी जाहिरात.

पुणें येथें भरविण्यांत येणाऱ्या शिक्षणविषयक प्रदर्शनाच्या माहिती पत्रकाच्या १३ व्या भागांत–हस्ताक्षराच्या सदरांत–उर्दू, गुजराथी व कानडी हस्ताक्षरांचाही समावेश करण्याचें ठरलें आहे.

व्ही. व्ही. साठये,
ए. इ. मध्यभाग याकरितां.

---

# मुलींच्या कामाचें शिक्षणविषयक

## प्रदर्शन

पाठविण्याच्या वस्तूंची यादी तारीख १० ते २५ सप्टेंबर पर्यंत पाठवावी.

वस्तु तारीख २५ सप्टेंबर ते १ आक्टोबर पर्यंत पाठवाव्या.

पुण्यांतील शाळांनीं आपल्या वस्तु तारीख १ आक्टोबर रोजीं ११ ते ५ चे दरम्यान कौन्सिल हॉलमध्यें पाठवाव्या.

पत्ता:—सेक्रेटरी,
मुलींच्या कामाचें शिक्षणविषयक प्रदर्शन. पुणें.

# मुलींची व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षा.

ता. १ आक्टोबर १९२५ चें मुंबई सरकारचें गॅझेट भाग १ ला पानें २५४४ ते २५४८ यांत प्रसिद्ध झालेली शाळा खात्याची सरकारी जाहिरात नं. २६३६ ता. १८ ऑगष्ट १९२५ बरहुकूम मुलींची व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षा मध्य भागांतील सर्व जिल्ह्यांत शनवार ता. ९ आक्टोबर १९२६ रोजीं व पुढील दिवशीं होईल. ( रविवार ता. १० आक्टोबर १९२६ सेरीज करून ) या भागांत अहमदनगर, धुळें, जळगांव, पुणें, सातारा व सोलापूर हे परीक्षेचे सेंटर आहेत.

( २ ) प्रत्येक सेंटरला परीक्षा स्थानिकपरीक्षा कमिटीकडून घेतली जाईल. पुणें ( अँग्लो उर्दू हायस्कूल, पुणें येथील हेडमास्तर ) सातारा, सोलापूर, जळगांव व धुळें या ठिकाणच्या स्थानिक कमिट्यांचे हायस्कूलचे हेडमास्तर हे अध्यक्ष नेमिले आहेत. अहमदनगर येथें अँग्लो व्हर्न्याक्युलर मुलींच्या मिडलस्कूलच्या हेडमिस्ट्रेस या स्थानिक कमिटीच्या अध्यक्ष आहेत.

( ३ ) उमेदवारांनीं या परीक्षेस बसण्यासंबंधीं अर्ज ठराविक छापील नमुन्यावर आपापल्या जिल्ह्याच्या स्थानिक कमिटीच्या अध्यक्षाकडे १ सप्टेंबर १९२६ रोजीं अगर त्यापूर्वीं पोहोंचतील अशा बेतानें पाठवावे. अर्जांचे नमुने त्या त्या जिल्हा कमिटीच्या अध्यक्षाकडे फुकट मिळतील.

( ४ ) परीक्षेस बसण्याबद्दल फी आकारली जाणार नाहीं.

( ५ ) परीक्षेस लागणाऱ्या पुस्तकांची यादी १ आक्टोबर १९२५ रोजीं प्रसिद्ध झालेल्या मुंबई सरकारचें गॅझेट भाग २ रा पान १७९९ मध्यें दिलेली आहे.

( ६ ) मुसलमानी मुलींची उर्दू व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षा वर दिलेल्या ठिकाणींच होईल.

पुणें,
ता. २६ जुलै १९२६.

के. जी. जोशी,
ए. इ. मध्यभाग, पुणें.

**मुंबई व मध्यप्रांत येथील शाळाखात्यानें बक्षिसाकरितां व लायब्ररीकरितां मंजूर केलेलें**

संग्राह्य ) **हिंदू–सण व व्रतें** ( किं. ६ आणे.

या नांवाचें पुस्तक केवळ लहान मुलां–मुलींकरितां लिहिलें आहे. यांत सर्व सणांची व व्रतांची सोपपत्तिक माहिती गोष्टीरूपानें दिली आहे. करितां आजच ८७ चीं तिकिटें पाठवून मागणी करा.

लेखकः—व. बा. खांबेटे हेडमास्तर म्यु. मु. सात-रस्ता स्कूल मुं. नं. ११

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणेंः—१ लेखकाकडे,
२ मुंबईंतील प्रसिद्ध बुकसेलर्स.

[illegible]
[illegible]

Registered No. B 1195.


लक्ष्मीबाई प्रधानकृत

## विणकला भाग १ ला.

अलीकडे स्त्रीशिक्षणाचा प्रसार झाल्यापासून त्याचेबरोबरच प्रत्येक सुशिक्षित कुटुंबांत विणकलेचा जारीनें प्रचार सुरू झाला आहे. त्या कलेवर आजपावेतों दोन तीन पुस्तकेंही प्रसिद्ध झालीं, परंतु या कलेचें पूर्ण ज्ञान होण्यास या पुस्तकासारखें पुस्तक झालें नव्हतें. यांत कर्त्रीनें इंग्रजी पुस्तकावरून उत्तम प्रकारचें ज्ञान संपादन करून एकंदर नमुने स्वतः विणून त्याचे फोटो घेऊन त्या फोटोचे ब्लॉक नेरॉय कंपनीकडून तयार करवून आर्टपेपरवर छापून पुस्तकांत घातले आहेत व त्या त्या आकृतीचें वर्णन छापिलें आहे. यांत पुढीलप्रमाणें तीस प्रकारच्या विणी, गळपट्टे (दुरंगी साधे, टॉय ३ प्रकारचे) पायमोजे चार प्रकारचे, टोप्या (गंधर्व, साधी, गळोतें, रुमी, गांधी, साहेबी, कमळाची, प्रवासी, बॉनेट, थंडीची, प्रवासी चार सुयांची), स्वेटर्स ८ प्रकारचीं, गंजीफ्रॉक्स, साधे कोट. ओव्हरकोट, झुली, झाली वगैरे विणण्याची माहिती यांत असल्यामुळें ही कला अवगत करून घेण्याला फारच उपयुक्त असें हें पुस्तक झालें आहे. पुस्तकाचे खर्चाचे मानानें किंमतही अल्प म्हणजे फक्त रु. १। ठेविली आहे. ट. ख. व्ही. पी. सह रु. १८१०

मिळण्याचें ठिकाणः—लक्ष्मण नारायण गोडबोले, बुकसेलर लक्ष्मी-रोड, पुणें सिटी.

---

## पुस्तकांचें नवीन दुकान.

आमचेकडे सर्व तऱ्हेची इंग्रजी, मराठी व संस्कृत पुस्तकें मिळतात. स्त्रियांना उपयुक्त अशीं गाण्यांचीं, कहाण्यांची व गोष्टींचीं पुस्तकें आम्ही ठेवितों. आमच्या व्यवहाराबद्दल विद्वानांनीं उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत. व्यापारी व शाळामास्तर यांस भरपूर कमिशन दिलें जातें.

ए. पी. बापट अँन्ड ब्रदर्स,<br>
बुकसेलर्स आणि पब्लीशर्स,<br>
बुधवार पेठ, पुणें शहर.

---

# कन्याशिक्षक.

वर्ष १२ वें. ] जुलै ते नोव्हेंबर १९२६ [ अंक ५ ते ९

पुणें एथें 'आर्यभूषण' छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन
यांनीं छापिलें व मिस् आर. नवलकर, बी. ए., लेडी
सुपरिंटेन्डन्ट ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें,
यांनीं पुणें एथें प्रसिद्ध केलें.

वार्षिक वर्गणी
ट. हा. सह १॥ रुपया.

या अंकाची
किंमत १५ आणे.

२९ डिसेंबर १९२६.

# अनुक्रमणिका.

---:०:---


| विषय | पान |
|---|---|
| १ खेड्यांतील मुलींचें शिक्षण. ... ... | ९७–१०२ |
| २ आस्ट्रेलियांतील प्राथमिक शाळा. ... ... | १०२–१०९ |
| ३ शिवजयंतीचा वाद. ... ... ... | १०९–११४ |
| ४ प्राथमिक शिक्षण. ... ... ... | ११५– १८ |
| ५ गोपिकाबाई पेशवे. ... ... ... | ११ –१२२ |
| ६ शिशुवर्गाकरितां धडे. ... ... ... | १२३–१२६ |
| आमच्या गांवची नदी.... ... ... | |
| गांवचा बाजार. ... ... .. | |
| आमचा मळा. ... ... ... | |
| ८ वाक्यरचना. ... ... ... ... | १२६–१३० |
| ७ बुलबुल पक्षी (गोष्ट) ... ... ... | १३०–१३६ |
| ९ राजपुत्र माधव (गोष्ट) ... ... ... | १३७– ४४ |
| १० कृत्रिम रेशीम व लोकर. ... ... ... | १४५–१४५ |
| ११ माशी. ... ... ... .. | १४६–१४८ |
| १२ विचित्र रावांची विचित्र लीला (गोष्ट) ... | १४९–१५१ |
| १३ व्हिटॅमिन्स उर्फ जीवनसत्त्वें. ... ... | १५२–१५४ |
| १४ टॅपि ओका. ... ... ... .. | १५४–१५६ |
| १५ वर्तमानसार. ... ... ... .. | १५६–१५९ |
| १६ विमानें. ... ... ... .. | १६०–१ ४ |
| १७ सुशीला (एकांकी नाटक)... ... .. | १६५–१८२ |
| १८ अनपेक्षित आरोग्य व संपत्ति यांचा पुरवठा. .. | १८३–१८४– |
| १९ इराणांतील राज्यारोहण. ... ... .. | १८४–१८१ |
| २० कृत्रिम रेशीम. ... ... .. | १८५–१८१ |
| २१ गल्फस्ट्रीमची अपूर्व कामगिरी. ... .. | १८६–१८६ |
| २२ दृढनिश्चय. ... ... ... .. | १८७–१८८ |
| २३ गौरीशंकर आरोहण. ... ... .. | १८ –१८९ |
| २४ इंग्लिश खाडी पोहून जाण्याचे प्रयत्न. .. | १९०–१९१ |
| २५ गुलाब (गोष्ट). ... ... .. | १९२–१९४ |
| २६ अत्तरगुजवाला (कविता.) ... ... .. | १९५–१९७ |
| २७ संपत्तीचा लोभ (कविता)... ... .. | १९६–२०१ |
| २८ शिवनेरी किल्याची सफर. ... .. | २०१–२०६ |
| २९ कोहिनूर हिरा. ... ... .. | २०६–२०९ |
| ३० मुलींच्या हस्तकौशल्याचें प्रदर्शन. ... .. | २०९–२१५ |
| ३१ चोप व अभिप्राय. ... ... .. | २१६–२२० |

३३ ... २९/१ ता. ... ५/१/२६

# कन्याशिक्षक.

जरि असेल रसज्ञपणा पुरा । जरि परोपकृतीच मनोहरा ।
जरि असे चतुरत्व, तरी मुला । शिकविण्यासम छंद नसे भला ॥

वर्ष १२ वें. ] जुलै ते नोव्हेंबर १९२६. [ अंक ५ ते ९

## खेड्यांतील मुलींचें शिक्षण.

कांहीं वर्षांपूर्वी सरकारनें एक कमेटी नेमली होती. ' खेड्यांतील शिक्षणाची स्थिति कशी आहे, तिच्यांत सुधारणा कशी करितां येईल, खेड्यांतील मुलांच्या शिक्षणाचें ध्येय कोणतें असावें, त्याची मर्यादा कोठपर्यंत असावी ' हे व असेच दुसरे महत्त्वाचे प्रश्न या कमिटीकडे सोपविले होते. या कमेटीनें चवकशी करून आपला रिपोर्ट सरकारला सादर केला. त्या रिपोर्टांतून पुढील उतारा घेतला आहे. यांत मुलींच्या शिक्षणाची दिशा कोणती असावी याबद्दल कमिटीनें आपले विचार प्रदर्शित केले आहेत. सध्यां खेडेगांवांतील मुलांच्या व मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न प्रामुख्यानें समाजापुढें आहे. यावेळीं कमेटीनें प्रदर्शित केलेले विचार शिक्षकाला व पालकाला उपयुक्त व मार्गदर्शक वाटतील म्हणून ते आम्हीं पुढें दिले आहेत.

हिंदी मुलींच्या शिक्षणाची योजना ठरवितांना ती मुलगी ज्या समाजांत जन्मली आहे त्या समाजाची पूर्वपरंपरा, त्या मुलीच्या आईबा-

पाचा समाजांतील दर्जा, स्त्रियांच्या अंगच्या ज्या सद्गुणांना तो समाज अत्यंत मान देतो ते सद्गुण, त्या मुलीचें पुढील आयुष्यांतील कर्तव्य वगैरे गोष्टींचा काळजीपूर्वक विचार केला पाहिजे.

खेडेगांवांत मुलगी आपल्या आईला अनेक प्रकारें मदत करीत असते. ती विहिरीचें अथवा नदीचें पाणी आणिते, दळण्याला आणि कांडण्याला मदत करते, सरपणकाडी गोळा करिते, घर झाडते व सारवते. तिला रिकामा वेळ सांपडला कीं ती आपल्या लहान भावाला किंवा बहिणीला कडेवर घेऊन खेळविते. अशा प्रकारें घरच्या सर्व कामांत ती आईला मदत करते. मुलगी वाढूं लागली कीं, तिच्या लग्नाचा विचार तिच्या आईबापांचे मनांत घोळूं लागतो. आपल्या मुलीला उत्तम स्थळ कसें मिळेल, तिच्या सासरचीं माणसें तिला कशीं वागवतील ही काळजी त्यांच्या मनाला सतत लागते. लहान मुलींची घरांत होणारी मदत व त्यांचा बालपणीं होणारा विवाह या दोन कारणांमुळें खेडेगांवांतील मुलींना नियमितपणें शाळेंत येतां येत नाहीं.

खेडेगांवांतील या मुलींपैकीं पुष्कळ मुलींची बुद्धिही चांगली असते; आणि या मुलींना शिकविण्यास चांगला शिक्षक मिळाला, तर त्यांच्या बुद्धीचा विकास समाधानकारक होईल यांत मुळींच शंका नाहीं.

खेडेगांवांतील मुलींच्या अभ्यासक्रमांत वाचन, लेखन, गणित, सृष्टिनिरीक्षण, हातकाम व गायन यांचा समावेश झाला पाहिजे. लहान मुलांना योग्य असे व्यायामाचे प्रकार व खेळ यांनाही या अभ्यासक्रमांत स्थान मिळालें पाहिजे. मुलींना सर्व शिक्षण त्यांच्या मातृभाषेंतून मिळालें पाहिजे. हा अभ्यास आटोपून मुलींनीं शाळा सोडली कीं त्यांना साधें पत्र लिहितां व वाचतां आलें पाहिजे, दररोजच्या व्यवहारांतील हिशेब त्यांना करितां आले पाहिजेत, व त्यांच्या भोंवतीं असणारे पशु, पक्षी व वनस्पति यांची साधारण माहिती त्यांना सांगतां आली पाहिजे. प्राथमिक शाळांतील

चार इयत्तांच्या अभ्यासाइतका तरी खेडेगांवांतील मुलींच्या शाळांचा अभ्यासक्रम असला पाहिजे.

खेड्यांतील मुलींच्या शाळेवरील शिक्षकानें वर सांगितलेले विषय शिकविले पाहिजेत व ते नेहमींच्या कंटाळवाण्या पद्धतीनें न शिकवितां मुलींना त्यांत गोडी वाटेल अशा रीतीनें शिकविले पाहिजेत. मुलींना शक्य तितक्या लवकर लिहितां व वाचतां आलें पाहिजे. अंकगणिताचा संबंध व्यवहारांशीं जोडला पाहिजे. मुलींच्या भोंवतीं असणारे पक्षी, कीटक, पशु व वनस्पति यांचें निरीक्षण करण्यांत त्यांना गोडी वाटली पाहिजे. हस्तव्यवसाय शिकवितांना त्यानें कांहीं ठराविक मातीच्या वस्तु करून घेतल्या कीं आपलें काम संपलें अशी कल्पना करून भागणार नाहीं. अशा प्रकारच्या ठराविक वस्तु करण्यांत मुलांना बिलकूल गोडी वाटत नाहीं. प्रत्येक खेडेगांवांत वाक, गवत, लव्हाळे केळींचें सोपट अशा प्रकारचे कितीतरी पदार्थ सहज व वाटेल तितके मिळतात. यांच्या साह्यानें टोपल्या, करंड्या वगैरे उपयुक्त पदार्थ तयार करितां येतील व मुलींना हे पदार्थ तयार करण्यांत आनंदही वाटेल. उत्तम माती, बिया, पानें, डहाळ्या इत्यादि हस्तव्यवसायाला लागणारें साहित्य प्रत्येक गांवांत भरपूर मिळण्याजोगें आहे. याचा हस्तव्यवसायांत चांगला उपयोग करून घेतां येईल.

प्रत्येक राष्ट्राचे शिक्षणांत गोष्टी व गाणीं या साधनांचा अवश्य उपयोग केला जातो. मुलींच्या शिक्षणाचे कामीं या बहुमूल्य साधनांचा भरपूर उपयोग केला पाहिजे.

सृष्टिनिरीक्षण या विषयासंबंधानें आम्हीं वर उल्लेख केला आहे. शाळेच्या पुढें किंवा मागें मोकळी जागा असेल व पाण्याची सोय असेल तर मुलींकरितां एक लहानशी बाग तयार करितां येईल. या बागेंत काम करितांना मिळालेल्या अनुभवानें मुलींच्या ज्ञानांत कितीतरी भर

पडेल. शाळेंत बाग करण्याचा हेतु मुलींना शेतकरी बनविणें हा नव्हे, तर परसांत भाजीपाला लावणें, फुलझाडें लावणें वगैरे कामें त्यांना पुढील आयुष्यांत करावीं लागतील त्यांची तयारी करणें हा होय. " ज्याला लिहितां वाचतां येतें त्याला शारीरिक श्रमाची गरज नाहीं व शेतकरी वगैरे शारीरिक श्रम करणाऱ्यांना लिहितां वाचतां येण्याची आवश्यकता नाहीं, " अशा प्रकारची भ्रामक कल्पना खेडेगांवांत प्रचलित असते. खांद्यावर नांगर टाकून शेताकडे निघालेल्या एका शेतकऱ्याला एका गृहस्थानें प्रश्न केला, ' काय हो, तुम्हांला लिहितां वाचतां येतें का ? ' त्यावर त्यानें उत्तर दिलें, ' महाराज, मला जर लिहितां वाचतां येतें, तर मी हा नांगर खांद्यावर कशाला वागविला असता ? ' हाच समज खेड्यांतील बहुतेक लोकांचा असतो. शारीरिक श्रम करण्यात कमीपणा नाहीं व लिहितांवाचतां येणें व शारीरिक श्रम करणें या दोन गोष्टी एकमेकांच्या विरुद्ध नाहींत ही गोष्ट शाळेच्या बागेंत काम केल्यानें मुलांच्या मनांत बिंबते. खेड्यांतील पुष्कळ मुली शेतकऱ्यांच्या असतात, म्हणून शेतकीच्या संबंधानें मधून मधून संभाषणें अभ्यासक्रमांत असावीं म्हणजे मुलींना घर व शाळा यांत फारसा भेद वाटणार नाहीं. अशा प्रकारें घर आणि शाळा यांतील भेद कमी करण्याचें काम कठीण आहे ही गोष्ट खरी आहे व ही गोष्ट साधण्याला शिक्षकाला बरीच तयारी करावी लागेल.

प्राथमिक शाळेंतील गाण्याच्या अभ्यासक्रमाविषयीं लिहिणें ही गोष्ट अवघड आहे, पण आमची अशी पक्की समजूत आहे कीं, कोणत्याही समाजांत प्रचलित असलेलीं गाणीं ही त्या समाजाला मिळालेली देणगी आहे आणि प्राथमिक शाळांनाही या देणगीचा लाभ अवश्य झाला पाहिजे. रवींद्रनाथ टागोर व इतर कवि यांनीं लिहिलेलीं, सृष्टीचें आनंदी स्वरूप वर्णन करणारीं, फुलें, पांखरें, निरनिराळे ऋतु यांचीं

वर्णनें असणारीं गाणीं हीं प्राथमिक शाळांतून शिकविलीं पाहिजेत. मुलांचे शिक्षणाचे दृष्टीनें हिंदी गायनाचें निरीक्षण करून प्राथमिक शाळेंतील गायनाचा अभ्यासक्रम ठरविणें आवश्यक आहे. प्राथमिक शाळांतून खेळांत हावभाव करून म्हणावयाचीं गाणीं अवश्य शिकविलीं पाहिजेत. खेळ व गाणीं या योगानें मुलांना योग्य व हितकर व्यायाम अवश्य मिळाला पाहिजे. बडोदें संस्थानानें 'मुलांचे खेळ' म्हणून एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्याजवरून मुलांना हितकर व योग्य असे कितीतरी खेळ पर्वापार चालत असलेले दिसून येतील. या पुस्तकांतून शिक्षकाला हवे तसे खेळ सहज निवडून घेतां येतील. गृहकृत्यांसंबंधीचें एकादें विशिष्ट शिक्षण इतक्या लहान वयांत मुलींना द्यावें असें आम्हांला वाटत नाहीं. लेखन, वाचन व गणित हे अत्यावश्यक विषय शिकण्याची पात्रता मुलांप्रमाणें मुलींच्याही अंगीं असते.

या देशांत आईबाप आपल्या लहान मुलांची मदत आपल्या कामांत नेहमीं घेतात. लहान मुलांना पेरणी, खुरपणी, मळणी इत्यादि कामांत आपल्या आईबापांना मदत करावी लागते. त्यांना गुरें राखावीं लागतात, किंवा दुसरें एकादें काम करून आईबापांच्या मिळकतींत भर घालावी लागते. या कामाचे योगानें मुलांचें आरोग्य सुधारतें ही गोष्ट खरी आहे. खेड्यांतील मुलांच्या शाळेचे तास व वर्षाच्या सुट्या ठरवितांना वर सांगितलेल्या गोष्टी अवश्य लक्षांत घेतल्या पाहिजेत. या बाबतींत सामान्य नियम ठरविणें कठीण आहे. प्रत्येक गांवच्या किंवा तालुक्याच्या परिस्थितीप्रमाणें या गोष्टी ठरविल्या पाहिजेत. शेतीचा हंगाम, बाजारचा दिवस, शेतावरील कामाची वेळ वगैरे गोष्टी शाळेचा वेळ व वर्षाच्या सुट्या ठरवितांना लक्षांत घेतल्या पाहिजेत. आईबापांच्या अडचणींकडे शाळांच्या चालकांनीं या बाबतींत पूर्वीपेक्षां जास्त लक्ष देणें जरूर आहे. मुलींच्या शाळेची वेळ मुलांच्या शाळेच्या वेळापेक्षां कमी असावी.


सध्यां शाळा ५ तास भरतात त्याऐवजीं हा वेळ ४ तास किंवा कमी केला तरीही चालेल. कारण मुलींना घरीं आईला मदत करावयाची असते व आपल्या आईला गृहकृत्यांत मदत केल्यानें तिला तिच्या भावी आयुष्याला अवश्य लागणारें अत्यंत उपयुक्त शिक्षण मिळतें. घरीं हें काम करितांना तिला श्रमही पुष्कळ होतात. खेड्यांतून मुलींच्या शिक्षणाचा प्रसार होणें ही गोष्ट मुख्यतः त्यांना या कामाला योग्य व कार्यक्षम असा शिक्षक मिळण्यावर अवलंबून आहे.

## ऑस्ट्रेलियांतील प्राथमिक शाळा.

आपल्या इकडील खेडेगावांतील कांहीं कांहीं शाळांत एकाच शिक्षकाला तीन तीन किंवा चार चार देखील वर्ग शिकवावे लागतात. अशीच स्थिति ऑस्ट्रेलियांतही आहे. मुंबई एथील सेकंडरी ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपाल प्रोफेसर ह्याम्ले हे ऑस्ट्रेलियाचे रहिवासी आहेत. गेल्या ऑगस्ट महिन्यांत त्यांनीं 'ऑस्ट्रेलियांतील एक शिक्षकाच्या शाळा' या विषयावर या ट्रेनिंग कॉलेजमध्यें एक मनोरंजक व्याख्यान दिलें. या व्याख्यानांत आपल्या इकडील प्राथमिक शाळेंतील शिक्षकाला विचार करण्याजोगा पुष्कळ भाग सांपडेल असें वाटल्यावरून त्या व्याख्यानाचा सारांश पुढें दिला आहे.

'माझ्या आजच्या व्याख्यानाचा विषय 'एकशिक्षक असणाऱ्या ऑस्ट्रेलियांतील शाळा' हा आहे. ऑस्ट्रेलिया व हिंदुस्तान या दोन देशांचें बऱ्याच बाबतींत साम्य आहे. शेतकी व गुरें पाळणें हेच दोन्ही देशांतील मुख्य धंदे आहेत. दोन्हीही देशांत पुष्कळशी लोकसंख्या रेल्वेपासून दूर अंतरावर असणाऱ्या लहान लहान खेडेगांवांतून राहात आहे. या खेडेगांवांतील लोकांना आपलीं लहान लहान मुलें शिक्षणाकरितां दूर अंतरावर असलेल्या शहरांत धाडणें शक्य नसतें व लहान सहान

खेड्यांतून मोठमोठ्या शाळा चालविणें अशक्य असतें. यामुळें या खेडे-गांवांतून एक शिक्षक असलेल्या प्राथमिक शाळा चालविणें अविश्यक असतें; म्हणूनच ऑस्ट्रेलियामध्यें अशा शाळांचा भरणा फार आहे. या शाळांना बहुतेक एकच मोठी खोली असते. खोली साधारण-पणें २० फूट लांब व १२ ते १९ फूट रुंद अशी असते. भरपूर प्रकाश व हवा येण्याकरितां या खोलीला बऱ्याच खिडक्या ठेवि-लेल्या असतात. शाळेंत शिशुवर्ग व ७ इयत्ता मिळून ८ वर्ग असतात. साधारणपणें प्रत्येक वर्गांत ४ मुलें असतात. सर्व शाळेंत साधारणपणें ३०।३२ मुलें असतात. दोन दोन इय-त्तांचा एक विभाग करितात. याप्रमाणें या शाळेचे ४ विभाग असतात. शिशुवर्ग व पहिली इयत्ता यांचा पहिला विभाग, दुसरी इयत्ता व तिसरी इयत्ता यांचा दुसरा विभाग, चौथी व पांचवी इयत्ता यांचा तिसरा विभाग व सहावी व सातवी यांचा चौथा विभाग केलेला असतो. या शाळेंतील सातव्या इयत्तेचा अभ्यास आपल्या इकडील म्याट्रिक्युलेशन-इतका जवळ जवळ असतो. एक विभाग एका ठिकाणीं बसतो व त्याचें वेळापत्रक एकच असतें. हे वर्ग कसे बसतात व त्यांची रचना कशी असते हें पुढील आकृतीवरून लक्षांत येईल.



शिक्षकाचे मागील सर्व भिंत फळ्यांनीं भरलेली असते. या फळ्याचे भाग पाडलेले असतात व एक एक भाग एक एक इयत्तेला दिलेला असतो. प्रत्येक इयत्तेंतील मुलांपुढें त्या इयत्तेला लागणारें साहित्य व्यवस्थितपणें ठेविलेलें असतें. ज्या शाळेंत डाल्टन पद्धतीनें शिकवितात तेथें त्या इयत्तेंतील मुलांना वाचावयास लागणारीं पुस्तकें लहान लहान कपाटांतून मुलांचे पुढें ठेविलेलीं असतात. शाळेच्या भिंती सुशोभित करण्याकरितां त्यांजवर चित्रें लावतात. यांपैकीं पुष्कळशीं चित्रें मुलांनीं व शिक्षकानें काढलेलीं असतात. शाळेच्या कोंपऱ्यांतील कपाटांत शाळेचें चिमकुलें पदार्थसंग्रहालय असतें. वनस्पति, फुलें, पानें, शिंपा, बीं वगैरे नवीन नवीन पदार्थ आणून शिक्षक व विद्यार्थी या संग्रहालयांत भर घालीत असतात. मुलांच्या खेळाला लागणारें साहित्यही याच कपाटांत ठेवितात. फळ्यांचे वर कडिपाटाजवळ एक फळी लावलेली असते. या फळीवरही साहित्य ठेवलेलें असतें. शाळेला सुशोभित करण्यासाठीं शिक्षक व मुलें हीं उभयतांहि झटत असतात. मुलें आपल्या परसांत अगर बागांत फुललेल्या फुलांचा गुच्छ तयार करून रोज आळीपाळीनें शिक्षकाचे टेबलावर ठेवतात. अध्यापनाला लागणारें बरेंचसें साहित्य शिक्षकानें स्वतांच तयार केलेलें असतें. शिशुवर्गाला अंक व वाचन शिकविण्याकरितां पुष्कळ साहित्य लागतें; पण हें साहित्य विद्यार्थी ट्रेनिंग कॉलेजमध्यें शिकत असतांना त्याच्याकडून तयार करून घेतलें जातें व विद्यार्थी अध्यापक होऊन बाहेर पडला म्हणजे आपण तयार केलेलें सर्व साहित्य घेऊन आपल्या शाळेंत जातो. शिक्षकाची बदली झाली कीं तो आपलें साहित्य बरोबर घेऊन नवीन शाळेंत जातो.

एथपर्यंत शाळागृहाचें वर्णन झालें. आतां त्या शाळेंतील अभ्यासक्रमाकडे व अंतर्व्यवस्थेकडे वळूं. एका शिक्षकानें आठ वर्ग शिकवा-

वयाचे ही कल्पनाच सकृद्दर्शनीं असंभाव्य वाटते. कोणाच्या तरी साहाय्यावांचून एकाच शिक्षकाला इतके वर्ग चालवितां येणार नाहींत, हें उघड आहे. या शिक्षकालाही मदतनीस असतो, पण तो त्या शाळेंतील विद्यार्थीच असतो. वरच्या वर्गांतील एक विद्यार्थी शिक्षकास शिकविण्याचे कामीं मदत करितो. जो विद्यार्थी स्वतां शिकतो व दुसऱ्यांना शिकवितो व अशा प्रकारें विद्यार्थी व शिक्षक या दोन्हीही नात्यांनीं शाळेंत काम करितो त्याला मॉनिटर असें म्हणतात. मॉनिटरकडे खालच्या इयत्तांचे कांहीं विषय दिलेले असतात. तो आठवड्यांतून फक्त ७।८ तास शिक्षकाला मदत करितो. जो मुलगा मनमिळाऊ असतो, ज्याला कामाची आवड असते, ज्याचें वजन मुलांवर असतें अशाच मुलाची मॉनिटरचे जागीं निवड होते. मॉनिटर हा साधारणपणें १३।१४ वर्षांचा असतो व ७।८ वर्षांच्या मुलांच्या वर्गाला शिकविण्याचें काम तो चांगलें करितो. मॉनिटरशिवाय वरच्या वर्गाच्या विद्यार्थ्यांमधून प्रिफेक्ट नामक अधिकारी निवडतात. मुलें वर्गाबाहेर असतांना त्यांत शिस्त राखणें, मुलांचे खेळांवर नजर ठेवणें, मुलांना कवाईत व खेळ शिकविणें वगैरे गोष्टी प्रिफेक्टला कराव्या लागतात. या प्रिफेक्टचीही शिक्षकाला चांगली मदत होते.

मॉनिटर अगर प्रिफेक्ट नेमल्यामुळें आपल्या मुलांच्या अभ्यासाचें नुकसान होतें अशी कल्पना तिकडील आईबापांचे मनांत कधींही येत नाहीं. उलटपक्षीं शिक्षणदृष्ट्या मुलांचा हा फायदाच आहे असें त्यांस वाटतें. मुलेंही शिक्षकाला मदत करण्यास तयार असतात व तीं आपलें काम मोठ्या दक्षतेनें आणि आनंदानें करितात. या बालशिक्षकाकडे कांहीं थोडे सोपे विषय शिकविण्याचें काम सोंपविलेलें असतें. भाषा, चित्रकला, सृष्टिनिरीक्षण यांसारखे विषय शिक्षक स्वतांच शिकवितो. अंकगणिताचा जो नियम झाला असेल त्याजवरील उदाहरणें करून

घेणें, शुद्धलेखन वगैरे भाग मॉनिटरकडे सोंपविलेले असतात. ह्या शिक्षकाची स्वतांची बाल्यावस्था गेली नसल्यामुळें त्याला लहान मुलांशीं तद्रूप होण्यास वेळ लागत नाहीं. मुलांच्या आवडी नावडी, त्यांचा स्वभाव, त्यांना संतोष देणाऱ्या गोष्टी यांची त्यास चांगली माहिती होते. लहान मुलांना आपल्यापेक्षां जरा वडील असलेल्या या संवगड्याची संगत फार प्रिय होते. शिकविणें ही गोष्ट सोपी नाहीं, तिची चांगली तयारी केली पाहिजे ही गोष्ट त्याला अनुभवानें कळूं लागते. मग तो शिक्षकाचे साहाय्यानें आपल्या विषयाचा अभ्यास करूं लागतो. या योगानें तो विषय साहजिकपणें चांगला कळूं लागतो. हीच गोष्ट प्रिफेक्टच्या संबंधानेंही खरी आहे. प्रिफेक्टला आपल्या बालमित्रांशीं प्रेमानें व सहानुभूतीनें वागून त्यांचें प्रेम संपादावें लागतें व स्वतां शिस्तीनें वागून दुसऱ्यांस शिस्त लावावी लागते. पुष्कळ वेळां मॉनिटरच्या हातून शिक्षणाचें काम फार चांगलें होतें. मी ऑस्ट्रेलियांत असतांना अशा प्रकारच्या एका शाळेंत गेलों होतों. त्यावेळीं त्या शाळेंतील १३।१४ वर्षांचा एक मॉनिटर बालवर्गाला गोष्ट सांगत होता. गोष्ट सांगत असतांना तो त्या गोष्टीशीं अगदीं तन्मय झाला होता व त्याचे विद्यार्थीही त्या गोष्टींत रंगून गेले होते. प्रिफेक्ट व मॉनिटर यांच्या साहाय्यामुळें शिक्षकाचें काम थोडेंतरी सुलभ होतें यांत शंका नाहीं. मॉनिटर किंवा प्रिफेक्ट यांच्या ताब्यांत एक विभाग गेल्यामुळें शिक्षकाला बाकीच्या विभागांकडे चांगलें लक्ष देतां येतें.

आपल्या इकडील शाळांत शिकविणें म्हणजे शिक्षकानें एकसारखें बोलणें अशीच कल्पना होऊन बसली आहे. या पद्धतीनें आठ इयत्ता शिकविणें ही गोष्ट एका शिक्षकाला अगदीं अशक्य आहे. मुलांनीं वर्गांत स्वस्थ बसावें व शिक्षकाचें व्याख्यान मुकाट्यानें ऐकावें किंवा शिक्षकाचे भीतीनें यंत्राप्रमाणें लिहीत किंवा आंकडे मोडीत बसावें असा प्रकार या शाळांतून

कधींहि दिसणार नाहीं. शिक्षक मार्गदर्शकाचें काम करीत असतो. जेथें मुलांचें अडतें तेथें तो त्यांना मदत करितो. तो नवीन नियम समजावून देतो मग मुलें त्या नियमाचा उपयोग केलेलीं उदाहरणें सोडवितात. जें उदाहरण सुटणार नाहीं, तें तीं शिक्षकाला विचारतात. याप्रमाणें इतर विषयांचेंही असतें. ठरलेल्या वेळीं ठरलेल्या विषयाचा कोणता भाग करावयाचा हें आधीं ठरलेलें असतें. मुलें त्याप्रमाणें काम करितात. स्वतःच्या प्रयत्नानें अभ्यास करण्याची त्यांना संवय असते. एक विभाग गणित करीत असतो, दुसरा विभाग इतिहास वाचीत असतो, अशा प्रकारें दोन विभाग कामांत गुंतले असतां शिक्षकाला तिसऱ्या विभागाचें पद्य किंवा गद्य घेतां येतें. मधून थोडा वेळ बाकीच्या दोन विभागांकडे थोडें लक्ष दिलें असतां पुरें होतें. विनाकारण ढवळाढवळ न करितां सर्व मुलांकडून काम करून घ्यावयाचें, सर्वांवर सारखें लक्ष ठेवावयाचें, सर्वांना जरूर तेथें मदत करण्यास तयार राहावयाचें व सर्व वर्गांत सारखी शिस्त ठेवावयाची हें काम अत्यंत कठीण आहे व तें करण्यास उत्तम शिक्षक लागतो. शिक्षकाला नेहमीं अत्यंत दक्ष राहावें लागतें. आपलें काम नीट व्हावें म्हणून त्याला आधीं सर्व तयारी करून ठेवावी लागते. प्रत्येक वर्गाचा दर तासाचा अभ्यास निश्चितपणें ठरवावा लागतो व त्याप्रमाणें तो करून घ्यावा लागतो. दररोज घरीं शिक्षकाला या कामांत दोन तीन तास घालवावे लागतात. त्याखेरीज त्याच्या हातून आपलें काम नीट होणार नाहीं. त्याच्या हातून काम चांगलें होण्यास त्याला पूर्वतयारी अवश्य करावी लागते.

मुलांची शाळा १० वाजतां उघडते, पण शाळा उघडण्याचे पूर्वीं सुमारें अर्धा पाऊण तास शिक्षक येतो. तो फळ्यावर प्रत्येक वर्गाचा त्या दिवशीं करावयाचा अभ्यास व्यवस्थितपणें लिहून ठेवतो. कधीं कधीं एखादें मूल लवकर येऊन शिक्षकाला त्याच्या कामांत आनंदानें मदत करतें. आन

आपणे आपल्या शिक्षकाला मदत केली या गोष्टीचा त्याला अत्यंत अभिमान वाटतो. १०। वाजतां शाळा सुरू होण्यापूर्वी सर्व मुलें जमतात. शिक्षकाला सर्वांनी नमस्कार केल्यानंतर प्रार्थनेला सुरुवात होते. प्रार्थना झाल्यावर शाळेचें पद्य म्हणण्यांत येतें. यानंतरचीं १५ मिनिटें शिक्षक मुलांशीं बोलण्यांत घालवितो. यावेळीं शिक्षक वर्तमानपत्रांत वाचलेली एकादी मनोरंजक व महत्त्वाची हकिकत मुलांना सांगतो. कधीं कधीं मुलांनीं कसें वागावें, कोणतें ध्येय आपल्या दृष्टीसमोर ठेवावें याविषयीं तो मुलांना चार शब्द सांगतो. कधीं कधीं तो देशांतील सुप्रसिद्ध व्यक्तींचें चरित्र सांगतो. कधीं कधीं तो एकादी सुंदर व मनोरंजक गोष्टही मुलांना सांगतो.याच वेळीं तो मुलांचे कपडे व इतर स्वच्छता यांजकडे लक्ष देतो. हें संभाषण झाल्यानंतर मुलें आपआपल्या जागेवर बसतात व मग अभ्यासाला सुरुवात होते. या शाळांचें वेळापत्रक कसें असतें व त्यांतील अभ्यास कसा चालतो, तें दाखविण्याकरितां मीं एका शाळेच्या वेळापत्रकाच्या कांहीं प्रति आणल्या आहेत त्या मी तुम्हांस देतों. शाळेंतील पहिला तास १०॥ ते ११ आहे. या तासाला तिसऱ्या व चवथ्या विभागांचें गणित आहे. दुसऱ्या विभागाचें वाचन आहे व पहिल्या विभागाचें अंकलेखन व अंकवाचन आहे. तिसऱ्या व चौथ्या विभागांला शिक्षक शिकवीत आहे. दुसरा विभाग स्वतःच अभ्यास करीत आहे व पहिला विभाग मॉनिटरचे ताब्यांत आहे. तिसऱ्या विभागानें गणिताचा कोणता भाग सोडवावयाचा तें शिक्षक फळ्यावर आधींच लिहून ठेवितो व त्याप्रमाणें तो विभाग तीं उदाहरणें सोडविण्यास सुरुवात करितो. हा विभाग उदाहरणें सोडवीत आहे तोंपर्यंत शिक्षक चौथ्या भागाला गणिताचा नवीन भाग समजावून देतो. मग या विभागाला या नवीन नियमाला अनुसरून असणारीं उदाहरणें सोडविण्यास तो सांगतो. यानंतर चौथा विभाग उदाहरणें सोडविण्यास लागतो. मग शिक्षक तिसऱ्या विभागाकडे वळतो. त्यांनीं

केलेलीं उदाहरणें पाहून तो नवीन नियम त्यांना समजावून देतो. दुसरा विभाग यावेळीं वाचनांत गुंतलेला असतो. हा विभाग मागील धड्याची उजळणी करितो किंवा शिक्षकानें सांगितलेला नवीन धडा वाचतो व आपणांला कळत नसलेला भाग शिक्षकाला विचारतो. पहिला विभाग यावेळीं मॉनिटरच्या ताब्यांत असतो. तो त्याला संख्या व सोपीं उदाहरणें शिकवितो. अशा प्रकारें इतर तासांचाही अभ्यास चाललेला असतो. ११ ते २ पर्यंत पाऊण तास शाळेला सुट्टी असते. दुपारीं ४ वाजतां शाळा बंद होते. शेवटचा अर्धा तास खेळ व ड्रिल यांकरिता असतो.

ऑस्ट्रेलियांतील प्राथमिक शाळांत बहुतेक स्त्रीशिक्षकच असतात. मुलें व मुली या एकाच शाळेंत शिकत असतात. पालकांची सहानुभूति असल्यामुळें, मॉनिटर व प्रिफेक्ट या दोन बालशिक्षकांच्या मदतीनें प्राथमिक शाळेंतील बिकट काम एका शिक्षकाला समाधानकारक रीतीनें करितां येतें.

व्याख्यात्यांचें भाषण झाल्यावर कांहीं शिक्षकांनीं वक्त्यास प्रश्न विचारले व त्यांचीं उत्तरें प्रिन्सिपॉल हॅम्ले यांनीं दिलीं. मग ट्रेनिंग कॉलेजच्या लेडी सुपरिंटेन्डंट मिस् नवलकर यांनीं व्याख्यात्यांचे आभार मानले.

---

# शिवजयंतीचा वाद.

( लेखक रा. विनायक सदाशिव वाकसकर, बडोदें. )

छत्रपति शिवाजी महाराज ह्या अलौकिक व्यक्तीबद्दल अलीकडे पुष्कळ माहिती संशोधकांच्या श्रमानें प्रसिद्धीस येत आहे, हें महारा-

ष्ट्राचें सुदैव आहे. भारतइतिहाससंशोधक मंडळाच्या शके १८३४ च्या संमेलनवृत्तांत जेधे यांची शकावली लोकमान्य टिळकांनीं संशोधन करून छापिली आहे. या शकावलींत,—हल्लींच्या इतिहासांत नसलेल्या व चुकीच्या अशा—दोनही प्रकारच्या बाबती ग्रथित झालेल्या असल्यानें शकावली प्रसिद्धीस येतांच संशोधकांचें लक्ष तिच्याकडेस आपोआपच वेधलें गेलें. या शकावलींत शिवाजी महाराजांच्या जन्माची शके १५५१ फाल्गुन वद्य ३ शुक्रवार म्हणजे तारीख १९ मार्च सन १६३० ही मिति दिलेली आहे. शिवाजी महाराजांच्या वेळीं ज्या क्षत्रिय मराठ्यांनीं आपल्या सर्वस्वावर पाणी सोडून जुलमी अशी मोंगली सत्ता उलथून पाडण्यांत महाराजांना साहाय्य केलें, त्या क्षत्रिय मराठ्यांच्या घराण्यांपैकींच जेध्यांचें घराणें हें एक होय. यांचा एक पुरुष शहाजीराजांच्या बरोबर कर्नाटकांतही बहुत दिवस होता व त्याचाच मुलगा बाजी शिवाजी महाराजांबरोबर हातावर शीर घेऊन महाराष्ट्रभूच्या दास्यविमोचनार्थ पुढें सरसावला होता. असल्या ऐतिहासिक घराण्यांत जी शकावली सांपडली ती अर्थातच विश्वसनीय मानण्याकडे संशोधकांची प्रवृत्ति होणें साहजिकच आहे. आणि म्हणूनच या शकावलींतील शिवछत्रपतींची दिलेली जन्ममिति प्रमाण मानून प्रचलित असलेली मिति वैशाख शुद्ध २ शके १५४९ ही खोटी असें ठरविण्याकडे कित्येक संशोधकांच्या मनाचा कल वळला.

या दोन जन्मतिथींमध्यें बरोबर साडे चौतीस महिन्यांचें अंतर आहे. जेध्यांच्या शकावलींतलि तिथि गणितानें अगदीं बरोबर येते, म्हणून तिथि, वार, नक्षत्र इत्यादि तपशील जेध्यांच्या शकावलींत जो दिला आहे तो अगदीं बरोबर आहे. आतां दुसरी जी वैशाख शु॥ २ ही तिथि प्रसिद्ध आहे तिला बखरीशिवाय दुसरा कोणताही आधार नाहीं, पण सतरा अठरा बखरी शिव छत्रपतींची जन्ममिति वैशाख शु॥ २ च

देतात, म्हणजे संख्याधिक्य वैशाख शु॥ २ स आहे, पण यांपैकीं कित्येक बखरी या मितीस वार देतात तो बरोबर जुळत नाहीं. तसेंच या सर्व बखरी शिवाजी महाराजांनंतर अनेक वर्षांनीं लिहिल्या आहेत. यामुळें ही वैशाख शु॥ २ ही तिथि चुकीची असावी असा कित्येक संशोधकांचा तर्क आहे. म्हणजे जेधे शकावलींतील फाल्गुन वद्य ३ शके १५५१ ही तिथि खरी मानणाऱ्या संशोधकांचीं कारणें पुढें दिल्याप्रमाणें आहेत

१ जेधे शकावली ही ज्या त्या वेळींच लिहिली असल्यानें तिच्यांतील माहिती अधिक विश्वासार्ह होय.

२ शिवभारत नांवाचा ग्रंथ नुकताच उपलब्ध झालेला आहे व तो-ही शिवाजी महाराजांच्या हयातींतच रचला गेला असून त्यांतही जेधे शकावलींतीलच शिवजन्माची मिति दिलेली आहे.

३ बखरींतील शिवजन्म मिति पंचांगशुद्ध नाहीं व बखरी फारच मागाहून लिहिलेल्या आहेत. आणि त्यांचाही एकमेकांशीं मेळ नाहीं, म्हणजे संवत्सर, शक, मास, पक्ष, तिथि आणि वार असा तपशील सर्व बखरी सारखाच देत नाहींत.

४ राजपुतान्यांत एक नुकताच कुंडलींचा संग्रह सांपडला असून तो शिवकालीन शिवराम ज्योतिष्याचा आहे असें सिद्ध झालें आहे. त्या बाडांतहि शिवाजी महाराजांची म्हणून जी कुंडली दिली आहे ती फाल्गुन वद्य ३ चीच म्हणजे जेधे शकावलींतील तिथीचीच दिली आहे.

याप्रमाणें चार मुख्य मुद्दे जेधे पक्षाचे आहेत. बारीक सारीक इतरही कांहीं आहेत पण महत्त्वाचे असे एवढेच दिसतात.

वैशाख शु॥ २ ही जुनी शिवजन्म तिथिच खरी आहे व नवीन जेधे शकावलींतील तिथि खोटी आहे असें मानणारा संशोधकांचा एक पक्ष आहे. त्याचें या प्रत्येक मुद्द्याबद्दल काय म्हणणें आहे तें संक्षेपतः येथें देऊं.

प्रथम जेधे शकावली घ्या. बखरीप्रमाणेंच ही शकावली सुद्धां उत्तर पेशवाईतील आहे. अस्सल नव्हे. या शकावलींतही कित्येक चुका आहेत. मुख्यतः ज्या सालांत शिवाजी महाराजांचा जन्म झाला असें लिहिलें आहे त्याच सालांत विजापूरच्या इब्राहिम आदिलशहाचा मृत्यु व जाधवरावांचा खून झाल्याची नोंद आहे. पण या दोनही नोंदी चुकीच्या असल्याचें इतर पुराव्यावरून सिद्ध आहे व जेधे पक्षास तें मान्यही आहे. म्हणजे जेधे शकावलींतील तीन नोंदींपैकीं दोन जशा चुकल्या तशीच शिवजन्माचीही तिसरी चुकली असावी. कारण प्रधानवल्ली व रामदासी याही दोनही शकावल्या जेधे शकावलीच्या तोलाच्या असून त्यांत शिवजन्म वैशाख शु॥ २ स झाल्याचें स्पष्ट लिहिलें आहे.

शिवभारत ग्रंथ अद्यापि प्रसिद्ध झाला नाहीं. त्यांतील म्हणून एकेवेळीं प्रसिद्ध केलेलें साल शंभर वर्षांनें चुकलें होतें. ती चुकी संशोधकांनीं दाखवितांच पुढें पोथीचे पाठभेद व फोटो प्रसिद्ध करण्यांत आले. परंतु या ग्रंथांतील तिथि व जेधे तिथि एकच आहे हें मात्र सर्व संशोधकांना मान्य आहे. पण त्यांत गोम एवढीच आहे कीं, या ग्रंथांतील ग्रहस्थिति मात्र या शिवजन्मतिथीशीं जुळत नाहीं. अर्थात् तिथि बरोबर पण ग्रहस्थिति विपरीत असा प्रकार या ग्रंथाचा आहे.

बखरींचा एकमेकांशीं सूक्ष्म बाबतींत मेळ नसण्यास अनेक कारणें आहेत व असा मेळ नसल्यानेंच त्या बखरी स्वतंत्रपणें लिहिल्या आहेत असें सिद्ध होतें. आजच्यासारखाच पंचांगवाद शिवकालींही

होता व त्यामुळें तिथि व वार यांचा मेळ नाहीं. तसेंच शिवकालीं छापील पचांगें नसल्यानें गांवोगांवचीं पंचांगेंही पृथक् असत; अर्थात्, त्यांत सूक्ष्म भेद असणें अपरिहार्य आहे.

राजपुतान्याकडे पौर्णिमान्त मास असल्यानें तिकडील बाडांतील कुंडली जर अस्सल असती, तर ती चैत्र तृतीयेची असती. पण ती ज्याअर्थी फाल्गुन वद्य तृतीयेचीच आहे त्या अर्थी ती अस्सल नसून इकडलीच कुंडलीची नकल आहे हें उघड आहे. त्या बाडांत पुष्कळ कोऱ्या कुंडल्या आंखून ठेविलेल्या आहेत व कुंडलींतील हस्ताक्षर अगदींच थोडें असल्यानें तें अमक्याचेंच आहे असें सांगणेंही कठीण आहे. किंबहुना हस्ताक्षर ओळखणाऱ्या तज्ज्ञांची कोर्टांतून काय अवस्था होते हें आपण पाहतोंच, म्हणून ही कुंडलीही विश्वसनीय मानण्याचें एवढें मजबूत कारण दिसत नाहीं.

शिवाजी महाराजांच्या वेळीं त्यांचें व व्यंकोजीचें भांडण होतें हें प्रसिद्धच आहे. अशा वेळीं आपणच वडील आहोंत असें सिद्ध करण्याचा व्यंकोजीचा प्रयत्न होता आणि त्यानेंच ही फाल्गुन वद्य ३ ही पंचांगशुद्ध तिथि अस्तित्वांत आणिली असावी असा तर्क आहे. व्यंकोजीची जन्मतिथि अद्यापि अज्ञात आहे. ती जर सांपडेल, तर यावर बराच प्रकाश पडेल. कदाचित् ही फाल्गुन वद्य ३ व्यंकोजीची जन्मतिथि असावी असें त्या तिथीच्या प्रसिद्ध असलेल्या जन्मपत्रिकेवरून वाटतें, कारण ती पत्रिकाच अपेशी दिसते.

मालवण येथें श्रीशिवाजी महाराजांची प्रतिमा त्यांचे पुत्र राजाराम महाराज यांनीं स्थापिली असून त्यांनींच शिवजन्माचा उत्सव वैशाख शु॥ २ सच सुरू ठेविला आहे, असें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. हें जर खरें असेल तर जेधे शकावलीची तिथि चुकली याबद्दल सुतराम शंका राहणार नाहीं.

श्री शंकराचार्य, गजनीचा महमूद, राजा राममोहनराय इत्यादि जगत्प्रसिद्ध व्यक्तींच्या दोन दोन जन्मतिथिच प्रसिद्ध आहेत, तसाच प्रकार शिवाजी महाराजांच्या जन्मतिथीबद्दलही झालेला आहे. कसेंही असो, तूर्त पूर्ण वहिवाटीप्रमाणें वैशाख शुद्ध २ च शिवजन्मतिथि समजून आपण सर्वांनीं त्याच तिथीस उत्सव करावा हें श्रेयस्कर आहे. विशेषत: सन १९२७ च्या वैशाख शु॥ २ स श्रीशिवाजी महाराजांस जन्मून तीनशें वर्षें पूर्ण होत असल्यानें या वेळीं सर्व महाराष्ट्रीयांनीं एक होऊन टोलेजंग उत्सव करावा यांतच राष्ट्राचें कल्याण आहे.

---

## प्राथमिक शिक्षण.

हिंदुस्तानांतील प्राथमिक शिक्षणासंबंधानें पुढें दिलेली माहिती 'हिंदुस्तानच्या खेड्यांतील शिक्षण' नांवाच्या एका नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांतून घेतली आहे. या माहितीवरून सध्यां आपल्या देशांत प्राथमिक शिक्षणाची स्थिति कशी आहे याची कल्पना होईल. पुढें दिलेले आंकडे सन १९२३ सालचे आहेत व ते ब्रिटिश हिंदुस्तानचे आहेत. यांत संस्थानांचा समावेश केलेला नाहीं.

| शाळांचा प्रकार | शाळांची संख्या | विद्यार्थ्यांची संख्या. |
|---|---|---|
| १ प्राथमिक | १३९०९९ | ५८१२३०३ |
| २ इंग्लिश मिडल् स्कूल्स व हायस्कूल्स | ८१९० | १२२४१७३ |
| ३ धंदेशिक्षण व इतर शिक्षण देणाऱ्या शाळा | ५४४७ | १७१३१९ |
| ४ कॉलेजें | २१२ | ६४८८८ |
| एकूण | १५२९४४ | ७२७२६८६ |

## मुलींना शिक्षण देणाऱ्या संस्था

| शाळांचा प्रकार | शाळांची संख्या | विद्यार्थिनींची संख्या. |
|---|---|---|
| प्राथमिक | २२९२० | ७८७८१० |
| मिडल् स्कूल्स व हायस्कूल्स | ८९४ | १०७२३२ |
| कॉलेजें | २१ | १२४८ |
| धंदेशिक्षण व इतर शिक्षण देणाऱ्या शाळा | २७३ | ९९९९ |
| एकुण | २४०६८ | ९०६२८९ |

सुमारें ९ लक्ष मुली मुलांच्या शाळेंत शिकत होत्या व कांहीं मुलें-ही मुलींच्या शाळेंत शिकत होतीं.

या वर्षीं ५ ते १० वर्षांच्या वयाचीं ४७ लक्ष ४९ हजार मुलें शाळेंत शिकत होतीं व ३ कोटी ७७ लक्ष ७६ हजार मुलें शाळेंत जात नव्हतीं. १० ते १५ वर्षांच्या वयाचीं २१ लक्ष ८६ हजार मुलें शाळेंत शिकत होतीं व ३ कोटी २८ लक्ष ८२ हजार मुलें शाळेंत जात नव्हतीं.

शाळेंत जाणाऱ्या व न जाणाऱ्या मुलांचें शेंकडा प्रमाण पुढें दिल्या-प्रमाणें होतें.

| वय वर्षें | शाळेंत जाणारीं मुलें शेंकडा | शाळेंत न जाणारीं मुलें शेंकडा. |
|---|---|---|
| ५ ते १०. | १०.०५. | ८९.९५. |
| १० ते १५. | ५.८८. | ९४.१२. |

या वर्षीं निरनिराळ्यां प्रकारच्या शिक्षणसंस्थावर सरकारनें पुढें दिल्याप्रमाणें खर्च केला.

| | |
|---|---|
| प्राथमिक शाळा. | ९ कोटी ३७ लक्ष रुपये. |
| मिडल स्कूल्स व हायस्कूल्स | ५ कोटी १९ लक्ष रुपये. |
| कॉलेजें | २ कोटी २३ लक्ष रुपये. |
| धंदेशिक्षणाच्या व इतर शाळा. | १ कोटी ४७ लक्ष रुपये. |
| इमारती व इतर शिक्षणाला आवश्यक गोष्टी. | ३ कोटी ८४ लक्ष रुपये. |

एका प्राथमिक शाळेला सरासरीनें २३१ रुपये खर्च आला. एका प्राथमिक शाळेंत शिकणाऱ्या मुलांची सरासरी ४१ आली. यावरून प्राथमिक शाळेंत शिकणाऱ्या प्रत्येक मुलाच्या मागें सरकारला ८ रुपये खर्च आला हें दिसून येतें. इंग्रजी शिकविणाऱ्या प्रत्येक शाळेच्या खर्चाची या वर्षाची सरासरी ५७५४ रुपये आली व एका शाळेंतील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची सरासरीनें संख्या १४७ होती. यावरून हायस्कूलमध्यें शिकणाऱ्या प्रत्येक मुलाकरितां या वर्षी सरकारला ३९ रुपये खर्च आला हें उघड आहे.

आपल्या प्राथमिक शाळांतून मुलें आपला अभ्यासक्रम पुरा न करितां मध्यंतरींच शाळा सोडतात, यामुळें जें कांहीं थोडें बहुत शाळेंत शिकतात तें लवकरच विसरून जातात. या कारणानें मुलांचा शाळेंतील काळ, शिक्षकाचे परिश्रम व सरकारचा खर्च हे फुकट जातात. सन १९१२ ते १९१७ च्या पंचवार्षिक अहवालांत यासंबंधानें पुढील उल्लेख आहे.

'प्राथमिक शाळेंतील मूल त्या शाळेंत सरासरी ३·८ वर्षे राहातें. साधारणपणें लिहितां वाचतां येण्यास मुलाच्या ४ इयत्ता पुऱ्या झाल्या पाहिजेत. पण शिशुवर्गांत अभ्यास करणाऱ्या मुलांपैकीं शेंकडा १० मुलेंच आपल्या ४ इयत्तांचा अभ्यासक्रम पुरा करितात. बाकीचीं मुलें

मध्यंतरींच शाळा सोडून जातात. मुंबई इलाखा व बंगाल या प्रांतांत शिक्षणाची प्रगति इतर प्रांतांपेक्षां जास्त झाली आहे. तथापि या प्रांतांतहीं शेंकडों ४५ मुलें दुसरी इयत्ता पुरी होण्यापूर्वींच शाळा सोडतात व कांहीं मुलें यांच्या आधींही शाळेला रामराम ठोकतात. शाळांत शिकणाऱ्या मुलांपैकीं शेवटपर्यंत अभ्यास न करितां मध्यंतरींच शाळा सोडून जाणाऱ्या मुलांचें प्रमाण फार मोठें आहे. हीं मुलें लवकरच अक्षरओळख विसरून जातात व अशा प्रकारें निरक्षर बनतात.

शिशुवर्गांत मुलांची जी संख्या असते तिजपेक्षां पहिल्या इयत्तेंत कमी असते व वरच्या इयत्तांत ती जास्त कमी कमी होत जाते, ही गोष्ट पुढील आंकड्यावरून लक्षांत येईल.

| इयत्ता. | शिकणाऱ्या मुलांची संख्या. | मागील इयत्तेपेक्षां कमी झालेली मुलांची संख्या |
|---|---|---|
| शिशुवर्ग. | ३९८६९२४ | |
| पहिली. | १३४३७९८ | २६४३१२६ |
| दुसरी. | ९२४६६५ | ४१९१३३ |
| तिसरी. | ६४६९६२ | २७७७०३ |
| चौथी. | ३२३६७२ | ३२३६९० |
| पांचवी. | २१९०५८ | १०४६१४ |
| सहावी. | १६०६७० | ५९३८८ |

शिक्षणाप्रीत्यर्थ होत असलेला सरकारी खर्च कसा वाढत जात आहे हें पुढील आंकड्यांवरून लक्षांत येईल.

| | |
|---|---|
| सन १८९१–९२ | ३ कोटी १० लक्ष रुपये. |
| सन १९०१–३ | ४ कोटी रुपये. |
| सन १९११–२ | ७ कोटी ७९ लक्ष रुपये. |

| | |
|---|---|
| सन १९२१–२२ | १८ कोटी ४ लक्ष रुपये. |
| सन १९२२–२३ | १९ कोटी रुपये. |

ब्रिटिश हिंदुस्तानातील निरनिराळ्या प्रांतात प्राथमिक शिक्षणाचा प्रसार कसा आहे हें पुढील कोष्टकावरून लक्षांत येईल.

| | | |
|---|---|---|
| बंगाल प्रांतांत | ९७७ | लोक संख्येला एक प्राथमिक शाळा. |
| मद्रास ,, | ११६१ | ,, |
| बहार ,, | १३६२ | ,, |
| मुंबई ,, | १५३२ | ,, |
| आसाम ,, | १७४५ | ,, |
| संयुक्त प्रांतांत | २६९३ | ,, |
| पंजाबांत | ३१०२ | ,, |
| मध्यप्रांतांत | ३२२९ | ,, |

हिंदुस्तानांतील निरनिराळ्या धर्मांच्या अनुयायी लोकांत लिहितां वाचतां येणाऱ्यांचें प्रमाण पुढें दिलें आहे.

| नांव | पुरुष शेंकडा | स्त्रिया शेंकडा |
|---|---|---|
| हिंदू | १·३ | १·६ |
| मुसलमान | ९·३ | ०·९ |
| भिल्ल वगैरे डोंगरांत रहाणारे | १·६ | ०·१ |
| ख्रिस्ती | ३५·५ | २·१ |
| शीख | १०·७ | १·६ |

# गोपिकाबाई पेशवे.

गोपिकाबाई ही नानासाहेब पेशवे यांची पहिली पत्नी होय. ही भिमाजी नाईक रास्ते यांची कन्या. हिचा जन्म १७२९ त झाला. भिकाजी नाईक हा सचोटीनें व्यवहार करणारा सावकार साताऱ्यास प्रसिद्ध होता. नाईकांच्या चोख व्यवहाराबद्दची कीर्ति सर्वत्र पसरली होती. यावेळीं साताऱ्यास शाहू महाराज राज्य करीत होते. त्यांच्या कानीं ही हकिगत गेली असतां, त्यांनीं नाईकांचा मोठा सन्मान करून त्यांस रास्ते असें म्हणूं लागले. शाहू महाराजांचा व रास्ते यांचा मोठा स्नेह जमला. दिवाळीच्या सणांत रास्ते यांनीं महाराजांस मेजवानीस बोलाविलें होतें. तेव्हां गोपिकाबाईस पाहून रास्ते व पेशवे यांचा शरीर-संबंध जुळवावा असें महाराजांच्या मनांत आलें. पुढें बाजीराव साताऱ्यास आला तेव्हां नानासाहेबांस गोपिकाबाई योग्य आहे असें सांगून हें लग्न शाहूमहाराजांनीं स्वतः ठरविलें व लग्नसमारंभ मोठ्या थाटानें महाराजांच्या नजरेखालीं झाला.

पुढें गोपिकाबाई आपल्या पतीबरोबर स्वारीशिकारीस जात असे. हिला बालबोध चांगलें लिहितां वाचतां येत होतें. ही हुशार व राजकारणी स्त्री होती. सदाशिवभाऊंचा ती नेहमीं मनांतून द्वेष करी. सदाशिव-भाऊंचा मोठेपणा तिला खपत नसे. तिनें भाऊंच्याबद्दल नानासाहेबांचें मन गढूळ केलें होतें. पानिपतच्या लढाईत विश्वासरावानें न जातां भाऊंनींच जावें असें तिला वाटत होतें. युद्धांत भाऊ हे अगदीं पुढारी म्हणून नांवाजलेले होते. त्यांना पानिपतच्या रणसंग्रामांत जाणें इष्ट होतें. ते गेले व परिस्थित्यनुरूप विश्वासरावालाही जाणें भाग पडलें. अशा प्रकारें दोघेही युद्धास गेले. दुर्दैवानें पानिपतच्या युद्धांत विश्वासरावास गोळी लागून तो ठार झाला व भाऊही एकाएकीं नाहींसे झाले. हें

दुःखाचें वर्तमान महाराष्ट्रांत हां हां म्हणतां येऊन थडकलें. यामुळें सद्गुणी प्रियपुत्राच्या मृत्यूमुळें गोपिकाबाईस अनावर शोक झाला. गोपिकाबाईच्यावर वरचेवर दुःखाचे डोंगर कोसळत गेल्यानें, तिच्या अंगीं दुःखें सहन करण्याची शक्ति आली होती. मृत्यूपूर्वी सहा महिने पेशव्यांनीं दुसरें लग्न केल्यामुळें तें तिला अपमानास्पद वाटत होत. भाऊंच्या वियोगानें नानासाहेबांच्या प्रकृतीवर परिणाम होऊन १७६१ च्या मार्च महिन्यांत पर्वतीवर त्यांचा अंत झाला.

नानासाहेबांच्या मृत्यूनंतर माधवराव हे राज्यकारभार पाहूं लागले. नानासाहेबांच्या मागें रघुनाथरावाचें व गोपिकाबाईचें सख्य होतें, परंतु गोपिकाबाईचें व आनंदीबाईचें पटेनासें झालें. आपल्या पतींनीं स्वारीशिकारीची दगदग सोसावी व राज्यऐश्वर्य दुसऱ्यांनीं भोगावें व आपल्यास मात्र राज्यप्राप्तीचा वांटा मिळूं नये अशा प्रकारचे दुःखाचे विचार आनंदीबाईच्या मनांत येऊं लागल्यामुळें गृहकलह उत्पन्न झाला. अशा स्थितींत राहाणें गोपिकाबाईसारख्या मानी स्त्रीस न आवडून ती नाशकाजवळ गंगापूर येथें राहूं लागली. तेथील गोपिकाबाईचा सालीना खर्च सुमारें ३४ हजार रुपये होता. गोपिकाबाई सातान्यास ताराबाईच्या भेटीस जात असे व तिला सल्लामसलत देत असे.

थोरले माधवराव हे मातृभक्त असल्यानें ते आपल्या आईच्या आज्ञेबाहेर वागत नसत. राजकारणांत सुद्धां ते आपल्या आईचा सल्ला घेऊन वागत असत. पानिपतच्या रणसंग्रामांत झालेलें भयंकर नुकसान व राज्याची विसकटलेली घडी माधवरावानें चांगली बसविली व राज्यात शांतता केली. गोपिकाबाईचेंही त्याजवर अत्यत प्रेम होतें. माधवरावाची आपल्या आईवर असलेली श्रद्धा पाहून इतर मंडळीही तिला भिऊन वागत व मान देत. तिची योग्यता नाना फडणवीस हे जाणून होते. माधवराव हा राज्यकर्ता शूर पुरुष होता. परंतु अशा या श्रेष्ठ पुरुषाला ईश्वरानें

भरपूर आयुष्य दिलें नव्हतें हें गोपिकाबाईचें दुर्दैव होय. माधवरावाची प्रकृति नेहमीं बिघडत असे. त्यांना थेऊरच्या गणपतीची भक्ति फार होती. शेवटीं थेऊर येथेंच गजाननामाचा घोष करीत त्यांचा प्राण गेला, व त्यांची स्त्री रमाबाई ही सती गेली. तेथें वृंदावन बांधलें आहे. थेऊर येथील रमाबाईचें वृंदावन पाहिल्यास त्या सतीचें व त्या भयंकर प्रसंगाचें स्मरण झाल्यावांचून राहणार नाहीं. माधवरावांच्या पश्चात् गोपिकाबाईची राज्यकारभारांतील सत्ता नष्ट झाली.

माधवरावांच्या मृत्यूनंतर पेशवाईचीं वस्त्रें नारायणरावास मिळालीं. या वेळीं गोपिकाबाईही पुण्यास आली होती. तिची महत्त्वाकांक्षा जबर होती यावेळीं पुण्याचा राज्यकारभार आपल्या सत्तेखालीं चालावा अशी तिला प्रबळ इच्छा होती. पण तिच्या मनाप्रमाणें घडलें नाहीं. नानासाहेबाच्या पश्चात् रघुनाथराव महत्त्वाच्या राजकारणांत गोपिकाबाईचा सल्ला घेत असत. पण गृहकलहाच्या अतिरेकामुळें नारायणरावाचा खून झाला. यामुळें गोपिकाबाई व रघुनाथराव यांच्यांत वितुष्ट माजलें व गोपिकाबाई व आनंदीबाई यांच्यांतही पराकाष्ठेचें वांकडें आलें. गोपिकाबाईचे मोठे राज्यकर्ते पुत्र एकामागून एक मृत्यूच्या दाढेंत गेले. इ. स. १७६१ त तिचा मोठा मुलगा विश्वासराव व पति यांचा अंत झाला. माधवरावांच्या मातृभक्तीमुळें त्या भयंकर दुःखाचें विस्मरण होतें न होतें तोंच इ. स. १७७२ त माधवरावासारख्या शूर राज्यकर्त्या पुत्रावर काळानें अचानक घाला घातला व त्याची पत्नी रमाबाई ही सती गेली. पुढें लवकरच नारायणरावाचा खून झाला. अशा प्रकारें तिच्या पुत्रशोकाला सीमाच राहिली नाहीं. पण हें सर्व दुःखाचे आघात ती खंबीरपणानें सहन करीत होती. नारायणरावाच्या मृत्युसमयीं त्याची पत्नी गंगाबाई ही दोन महिन्यांची गरोदर होती. नऊ महिने पूर्ण होतांच गंगाबाई प्रसूत झाली व तिला मुलगा झाला, तोच सवाईमाधवराव

या नांवानें प्रसिद्ध आहे. ह्यास गोपिकाबाईनें उपदेशपर पत्र पाठविलें होतें, त्यात राज्यकर्त्या पुरुषाची दिनचर्या कशी असावी याबद्दलचा मजकूर अत्यंत महत्त्वाचा आहे. शिवाय दरबारी मंडळीशीं कसें वागावें, अपराध्याला शासन कोणत्या प्रकारचें करावें, याचा व ईश्वरभक्ति धर्मनिष्ठा, आरोग्य याबद्दलचाही मोठ्या चौकसबुद्धीनें व चातुर्यानें राज्यकर्त्या पुरुषास योग्य असाच उपदेश तिनें सवाई माधवरावांना केला आहे तो वाचून पाहिल्यास बाईची योग्यता कळून येते.

गृहकलह व तंटेबखेडे जसे माजूं लागले तसें गोपिकाबाईनें पुण्यास राहाण्याचें वर्ज्य केलें व पतीच्या मार्गे राहिलेलें अयुष्य तिनें गंगापूर येथेंच कंठलें. ही थोर राजकारणी स्त्री १७८८ त गंगापूर येथें कैलासवासी झाली. हिची उत्तरक्रिया हिचा बंधु गंगाधर नाईक रास्ते यांनीं कोणत्याही प्रकारची उणीव भासूं न देतां नाशीक येथें ३३५१९ रुपये खर्च करून केली व पुष्कळ दानधर्म केला. त्याचप्रमाणें सवाईमाधवरावानींही पुण्यास पुष्कळ खर्च करून बाईची उत्तरक्रिया केली.

गोपिकाबाई ही राजकारणी, महत्त्वाकांक्षी, मानी व इभ्रतदार स्त्री होती. हिला विश्वासराव, माधवराव व नारायणराव असे तीन पुत्र होते. पण हिच्या मरणसमयीं पुत्रांपैकीं कोणीं राहिलें नव्हतें. गोपिकाबाई माधवरावाच्या कारकीर्दीपर्यंत राजकारणांत सल्लामसलत देत असे. तिनें शेवटपर्यंत दुसऱ्याची छाप आपल्यावर पडूं दिली नाहीं. महाराष्ट्रांच्या राजकारणी ज्या कांहीं थोड्या फार स्त्रिया होऊन गेल्या त्यांत गोपिकाबाईची गणना होते.

हौशाबाई शिंदे.

# शिशुवर्गाकरितां धडे.

## आमच्या गांवची नदी.

च् + य = च्य आमच्या.

त् + य = त्य त्यांची.

आमच्या गांवाला एक नदी आहे.
तिला पाणी फार नाहीं.
नदीचें पाणी फार गार आहे.
तें झुळझुळ झुळझुळ वाहात असतें.

सकाळींच घागरी घेऊन बायका नदीला येतात
बायका नदीला पाणी भरतात
व डोकीवर घागरी घेऊन परत घरीं जातात.
दुपारीं मुलें नदीवर आंघोळीला जातात.

नदीचे काठीं महादेवाचें देऊळ आहे.
आंघोळ करून मुलें महादेवाला पाणी घालतात
व परत घरीं येतात.
पावसाळा सुरू झाला कीं नदीला पूर येतो.

पावसाळा संपला कीं नदीचें पाणी कमी होतें.
कांहीं दिवसांनीं नदीचें पाणी फारच कमी होतें.
मग नदीचे काठीं झरे पाडतात.
व तें पाणी लोक पितात.

साकी.

नदी आमची आवडती ही सुंदर भारी दिसतें ।
काठावरची हिरवी झाडें तोष मनाला देते ॥
झुळझुळ झुळझुळ वाहे नदिचें गार गोड तें पाणी ।
सकलांना बहु सुख देई तें तहान त्यांची हरुनी ॥ १ ॥

---

## गांवचा बाजार.

---:०:---

गणू, आज आपल्या गांवचा बाजार आहे.
चल, आपण बाजारांत जाऊं.
मीं मळ्यातून वांगीं आणलीं आहेत.
मीं मळ्यातून मेथीची भाजी आणली आहे.
मीं मेथीच्या जुडया बांधल्या आहेत.

आपण एक पैशाला एक जुडी विकूं.
वांगीं वजन करायाला तराजू व वजनें घे.
आज वांगीं सहा पैशाला शेर आहेत.
आज आपला सगळा माल खपेल.
आज आपणास तीन चार रुपये मिळतील.

परत येतांना मी तुला धोतर विकत घेईन.
विठू शिंपी बाजारांत सदरे विकीत आहे.
आठ आण्याला सदरा मिळतो.
तुला मी एक सदरा विकत घेईन.

बाजारांतून आपण बाळाला पेढे आणूं.
चल, ऊठ बाजाराची वेळ झाली.
मी मोठी पाटी डोकीवर घेतों.
तूं ही लहान पाटी डोकीवर घे.
चल आतां पाय उचल.

---

## आमचा मळा.

न् + य = न्य न्याहारी

आमचा मळा गावाजवळ आहे.
आमचें घर मळ्यांतच आहे.
आमच्या दोन गाई आहेत.
आमचे चार बैल आहेत.

माझे बाबा व आई पहांटेस उठतात.
बाबा गाईंना व बैलांना चारा घालतात.
मग गोठा झाडून साफ करतात.

आइ धान्य दळते.
दळतांना ती गोड गाणीं गाते.
तिचीं गाणीं मला फार आवडतात.

सकाळ झाली कीं आई मला उठवते.
बाबा गाईंची धार काढतात.
मी तोंड धुतों व बाबांनीं दिलेलें दूध पितों.
आई रतिबाचें दूध घालायाला गावात जाते.

मी बाबाबरोबर विहिरीवर जातों.
बाबा मोट धरतात.
मी पाटांतून पाणी जातांना पाहातों.
तें पाणी धावताना पाहून मला मजा वाटते.
मी मळ्यातील फुलें तोडतों.

आई गावातून परत येते.
मग भाकरी व झुणका घेऊन ती विहिरीवर येते.
मग बाबा व मी न्याहारी करितों.
मी लहान आहें.
मी मोठा होईन.
मग मी बाबाना मदत करीन.

---

## वाक्यरचना.

---

मुलांच्या शब्दसंग्रहांत भर टाकणें म्हणजे त्यांची विचारशक्ति वाढविणें होय. मुलांना नवीन-नवीन शब्द माहीत झाले पाहिजेत. त्यांचा अर्थ त्यांना चांगला कळला पाहिजे व त्यांना त्या शब्दांचा चांगला उपयोग करितां आला पाहिजे. वाक्यरचना या विषयाचा य कामीं फार चांगला उपयोग होतो. खालच्या इयत्तांत तोंडी व लेखी वाक्यरचना घेतांना मुलांच्या शब्दसंग्रहांत भर घालण्याची उत्तम संधि असते व वाक्यरचनेचे हे पाठही मुलांना भारी मनोरंजक वाटतात.

अशा प्रकारचे कांहीं पाठ पुढें दिले आहेत. पुढील पाठ पहिल्या इयत्तेला देतां येईल.

## पाठ १ ला.

गाईच्या ओरडण्याला काय म्हणतात हें प्रश्नद्वारा मुलांकडून काढून घ्यावें. मुलांनीं हंबरणें हा शब्द सांगितल्यावर पुढील वाक्य फळ्यावर लिहावें व त्याच्या पुढील अपुरीं वाक्यें मुलांना पुरीं करण्यास सांगावें.

गाय हंबरते.
बैल × ×
म्हैस × ×
घोडा × ×
कुत्रा × ×
मांजर × ×
कावळा × ×
चिमणी × ×
बेडूक × ×

## पाठ २ रा.

अशाच प्रकारें निरनिराळ्या प्रकारच्या लोकांच्या धंद्याविषयीं वाक्यरचना मुलांकडून करून घेतां येईल. सोनार काय करितो हें प्रश्न विचारून मुलांकडून काढून घ्यावें व तें वाक्य फळ्यावर लिहावें. मग पुढें दिल्याप्रमाणें अपूर्ण वाक्यें देऊन तीं मुलांकडून पुरीं करून घ्यावीं.

सोनार दागिने करितो.
सुतार × × × ×
साळी × × × ×
चांभार × × × ×

शेतकरी × × × ×
हलवाई × × × ×
तांबट × × × ×
शिक्षक × × × ×
मुलें × × × ×
शिपाई × × × ×
कारकून × × × ×
धनगर × × × ×
माळी × × × ×
कुंभार × × × ×

## पाठ ३ रा.

निरनिराळ्या जनावरांच्या संबंधानेंही अशाच प्रकारें मुलांकडून वाक्यरचना करून घेतां येईल. प्रथम मुलांना प्रश्न विचारून आपणांस काय लिहावयाचें याची मात्र स्पष्ट कल्पना दिली पाहिजे. उदाहरणार्थ, आपणाला गाईचा काय उपयोग होतो, बैलाचा उपयोग काय होतो हें मुलांकडून काढून घ्यावें व तीं वाक्यें फळ्यावर लिहावीं, मग त्यांचे खालीं जनावरांचीं नांवें लिहावीं व वाक्यें पुरीं करावयास मुलांना सांगावें.

गाय दूध देते.
बैल शेत नांगरतो.
म्हैस × × × ×
गाढव × × × ×
शेळी × × × ×
उंट × × × ×
मांजर × × × ×
कुत्रा × × × ×
घोडा × × × ×

## पाठ ४ था.

आपण आपल्या लहान मुलाला बाळ म्हणतों, व गाईच्या लहान मुलाला वासरूं म्हणतात हें मुलांकडून काढून घ्यावें व तीं वाक्यें फळ्यावर लिहावीं. मग पुढें दिल्याप्रमाणें अपर्ण वाक्यें देऊन तीं मुलांकडून पुरीं करून घ्यावीं.

माणसांच्या लहान मुलाला बाळ म्हणतात.
गाईच्या लहान मुलाला वासरूं म्हणतात.
म्हशीच्या लहान मुलाला × ×
घोडीच्या लहान मुलाला × ×
शेळीच्या लहान मुलाला × ×
मेंढीच्या लहान मुलाला × ×

## पाठ ५ वा.

राहाण्याच्या ठिकाणाविषयींही वाक्यरचनेचा पाठ घेतां येईल. पूर्वीप्रमाणेंच प्रश्न विचारून पहिलीं एक दोन वाक्यें फळ्यावर लिहावीं, म्हणजे आपणांस काय लिहावयाचें याची मुलांना चांगली कल्पना येते.

| | | | |
|---|---|---|---|
| राजा | राजवाड्यांत | | राहातो. |
| सावकार | × | × | राहातात. |
| शेतकरी | × | × | राहातात. |
| साधु लोक | × | × | राहातात. |
| आपण आपल्या | × | × | राहातों. |
| पक्षी आपल्या | × | × | राहातात. |
| गाई | × | × | राहातात. |
| घोडे | × | × | राहातात. |
| मेंढरें | × | × | राहातात. |

## पाठ ६ वा.

कारकून लेखणीनें लिहितो.
सुतार × × लाकूड तासतो.
सोनार × × दागिने घडतो.
लोहार × × लोखंड ठोकतो.
कुंभार × × मडकीं तयार करतो.
शिंपी × × सदरा शिवतो.
साळी × × वर लुगडें विणतो.
वेणू × × भाजी चिरते
आई × × खोबरें किसते.
भाऊ × × लेखणी करितो.
ताई × × कापड फाडते.

कुरण, मळा, रान, बाग, शेत, जंगल यांतील भेद स्पष्टपणें मुलांना कळण्याकरितां असाच एकादा वाक्यरचनेचा पाठ घेतां येईल. हे वाक्यरचनेचे पाठ मुलांना भारी मनोरंजक वाटतात.

---

### लहान मुलांकरिता गोष्टी.

## बुलबुल पक्षी.

फार फार प्राचीन काळीं चीन देशांत एक राजा होऊन गेला. त्याचा राजवाडा खूप मोठा असून स्फटिकाचा होता. राजवाड्यासमोर एक सुंदर बाग होता व तेथून दूर गर्द झाडी होती. तेथील झाडें खूप खूप उंच होतीं व त्या झाडीपलीकडे एक दाट अरण्य

होतें. या अरण्यांत एक बुलबुल पक्षी राहात असे. तो पक्षी इतकें मधुर गात असे कीं, ऐकणारांचें मन मोहून जाई, व जन्मांत तें गाणें कधीं विसरत नसे. जगांतून चोहोंकडून माणसें तेथें येत असत. तो स्फटिकाचा राजवाडा, तो सुंदर बाग व ती दाट झाडी हीं पाहून त्यांना अत्यंत आनंद होत असे. परंतु बुलबुलचें गाणें ऐकून ते थक्क होत, व घरीं गेल्यावर जेव्हां ते पुस्तक लिहीत तेव्हां त्यांत सर्वांपेक्षां बुलबुल श्रेष्ठ असें लिहीत. एके दिवशीं अशा प्रकारचें एक पुस्तक राजाच्या वाचण्यांत आलें, व त्यानें बुलबुल सर्वांत श्रेष्ठ हें वाचलें. तेव्हां ताबडतोब त्यानें प्रधानाला बोलावलें. राजा म्हणाला, हा बुलबुल कोण? मी याचें गाणें आजपर्यंत कसें ऐकलें नाहीं? प्रधान म्हणाला, मींही पण असें कोणाचें नांव ऐकलें नाहीं. राजा म्हणाला, या पुस्तकांत बुलबुलचें नांव आहे. तेव्हां आज संध्याकाळीं गाण्याकरितां त्याला येथें आणलेंच पाहिजे, असा माझा हुकूम आहे. प्रधानानें दरबारमधील सर्व स्त्रीपुरुषांना बुलबुलबद्दल विचारलें; पण कोणालाच त्याची माहिती नव्हती तेव्हां प्रधान परत राजाकडे आला व म्हणाला, महाराज, बुलबुल या नांवाचा कोणी माणूस नाहीं. राजा म्हणाला, मग पुस्तकांत नांव कसें आलें? तें कांहीं नाहीं. आज संध्याकाळीं त्याला जर आणलें नाहीं, तर दरबारांतील सर्व लोकांना कडक शिक्षा होईल. पुढें प्रधानानें पुष्कळ तपास केला. याला विचार, त्याला विचार असा त्याचा क्रम चालला. शेवटीं पाकखान्यांतील एक मुलगी म्हणाली, मला बुलबुल माहीत आहे. मी दररोज माझ्या आईला त्या लांबच्या अरण्यांत भाकर घेऊन जातें, तेव्हां मी दररोज बुलबुलचें गाणें ऐकतें. तेव्हां प्रधान म्हणाला, मला तें ठिकाण दाखव. शेवटीं प्रधान, दरबारचे सरदार व त्यांच्या स्त्रिया अशी पुष्कळ मंडळी त्या मुलीबरोबर अरण्यांत जावयास निघाली. थोडें गेल्यावर गाय हंबरतांना त्यांनीं ऐकली. तेव्हां मंडळी म्हणाली, हाच तो बुलबुल. प्राणी

किती लहान व आवाज किती मोठा! तेव्हां मुलगी म्हणाली, अहो, तो बुलबुल नव्हे, ती गाय आहे. आणखी पुढें गेल्यावर तळ्यांत बेडूक डराव. डराव करतांना त्यानीं ऐकलें. तेव्हां मंडळी म्हणाली, हाच तो बुलबुल! देवळांतल्या घंटेसारखा कीं हो त्याचा आवाज आहे! तेव्हां मुलगी म्हणाली, अहो, ते बेडूक ओरडत आहेत. शेवटीं ती मंडळी त्या अरण्यांत आली. तेव्हां मुलगी म्हणाली, आतां बोलूं नका. बुलबुल गाण्याला सुरुवात करील, आणि खरोखरच बुलबुलनें सुरुवात केली, व जन्मांत कधीं कोणाला ऐकायला सांपडणार नाहीं, इतकें मधुर गाणें त्यानें गायलें. गाणें ऐकल्यावर मंडळी म्हणाली, काय उत्कृष्ट गाणें! एवढा मोठा आवाज या पक्ष्याचाच का? पुढें राजवाड्यांत येऊन राजाकरितां गाणें म्हणण्याविषयीं प्रधानानें बुलबुलला विचारलें. परंतु बुलबुल म्हणाला, मला या अरण्यांतच चांगलें गातां येतें! तथापि तुमचें म्हणणेंच आहे तर मी येतों. त्या दिवशीं संध्याकाळीं राजवाड्यांत जिकडे तिकडे थाटमाट केला होता. रंगीबेरंगी फुलांच्या माळा जागोजाग दिसत होत्या. वाऱ्याच्या झुळकेचा धक्का लागतांच ज्यांचा आवाज होईल, अशा शेंकडों रुप्याच्या घंटा टांगल्या होत्या. हजारों मेणबत्त्या जागोजाग लावून दिव्यांची रोशनाई केली होती. त्यांच्याकडे पाहातांच हजारों चांदण्या चमकताहेत असें दिसे. एका मोठ्या दिवाणखान्यांत राजाच्या सिंहासनाशेजारीं बुलबुलला बसण्याकरितां एक सोन्याची दांडी होती. सर्व मंडळी जमल्यावर बुलबुलला गाणें सुरू करण्याविषयीं राजानें आज्ञा केली. तेव्हां बुलबुलनें आपला कंठ फुगवला, व गाण्यास सुरवात केली. त्याचें गाणें इतकें मधुर होतें कीं, तें ऐकून राजाचे डोळे पाण्यानें भरून आले. त्यानें पुन्हां बुलबुलला गाण्यास सांगितलें. या वेळेस तर बुलबुलनें एवढी कांहीं बहार केली कीं, राजाच्या डोळ्यांतील पाण्याच्या धारा गालावरून वाहूं लागल्या. मंडळीनें वरचेवर बुलबुलला गायला सांगितलें. सर्वांचें पूर्ण समाधान झालें, तेव्हां राजा म्हणाला, मी या

बुलबुलला आजपासून दरबारचा मुख्य गवई नेमलें आहे. माझ्या सिंहासनाशेजारीं त्याची बसावयाची सोनेरी दांडी असावी, व शेजारीं जवळच एक सोन्याचा पिंजरा ठेवावा. बुलबुलनें दिवसांतून दोन वेळां बाहेर जावें. बुलबुलची काळजी घेण्याकरितां बारा चाकर ठेवले होते. तो बाहेर गेला असतांना ते त्याच्या बरोबर जात असत. त्याच्या पायाला एक लांबच लांब रेशमी दोरा बांधलेला असे, व त्याचें दुसरें टोंक ते बाराजण आपले हातांत धरीत, व अशा रीतीनें बुलबुलची स्वारी बाहेर पडत असे. त्याला कैद्याप्रमाणें बाहेर जाणें आवडत नसे. तो दररोज सायंकाळीं राजा वं दरबारचे लोक यांना गाणें म्हणून दाखवी, व तें ऐकून सर्वांचें समाधान होत असे.

एके दिवशीं राजाकडे एक पार्सल आलें. त्यावर बुलबुल असें लिहिलें होतें. राजानें तें पार्सल फोडलें, तों आंत एक बुलबुलसारखा पक्षी होता. परंतु तो खरा नसून सोनें, रुपें, हिरे, पांच, माणिक वगैरेंचा कृत्रिम केलेला होता. त्याला किल्ली दिली कीं तो गाऊं लागे व गातांना त्याचें चिमुकलें शेपुट वर खालीं होई. नवीन बुलबुलचें गाणें ऐकून दरबारी मंडळीला मोठा आनंद झाला. त्यांनीं त्या पक्ष्याचें ३०। ४० वेळां गाणें ऐकलें, तरी त्यांची तृप्ति झाली नाहीं. इतक्यांत राजाला खऱ्या बुलबुलची आठवण झाली, व आतां त्याचें गाणें ऐकूं असें तो म्हणाला. परंतु बुलबुल कोठेंच दिसेना! इकडे पाहा, तिकडे पाहा तरी त्याचा पत्ता नाहीं. मंडळी त्या नवीन बुलबुलचे गाण्याच्या नादांत असतांना तो खरा बुलबुल खिडकीवाटे निघून गेला. तें पाहून दरबारची मंडळी म्हणाली, 'बुलबुल काय कृतघ्न आहे! बरें, गेला तर गेला. नवीन बुलबुल काय वाईट आहे!' झालें. खऱ्या बुलबुलच्या सोन्याच्या दांडीवर बसून हा नवीन बुलबुल दररोज सायंकाळीं राजा व दरबारची मंडळी यांची करमणूक करूं लागला. मंडळींना खऱ्या

बुलबुलपेक्षां हांच जास्त आवडला. कारण या बुलबुलसारखा आवाज त्यांना काढितां येत असे. त्या बुलबुलची नक्कल करणें त्यांना शक्य नव्हतें. याप्रमाणें एक: वर्षभर क्रम चालला. पुढें एके दिवशीं गाणें चाललें असतांना त्या पक्ष्याचे पोटांत व्हररररर असा आवाज झाला, व गाणें एकदम थांबलें. तेव्हां राजानें ताबडतोब डॉक्टरला बोलावलें. पण त्याच्यानें कांहीं झालें नाहीं. मग घड्याळें दुरुस्त करणारास बोलावलें. पण तोही कांहीं करूं शकला नाहीं. त्या दोघांनीं पुष्कळ खटपट केली, व वर्षांतून कसें तरी एकदांच गाणें ऐकतां येईल एवढ्यापुरती दुरुस्ती केली. शिवाय आवाजही पूर्वींचा राहिला नाहीं. तरीपण राजानें त्या बुलबुलला आपले जवळ त्या सोन्याचे दांडीवर ठेवून दिलें.

याप्रमाणें बरेच दिवस गेले. पुढें राजा अतिशय आजारी पडला, व मरायची वेळ आली. आतां हा जगत नाहीं असें पाहून लोकांनीं दुसरा राजाही पसंत केला, व हा केव्हां मरतो, याची वाट पाहात बसले. इकडे त्या राजाची प्राणांतिक अवस्था होत चालली. आतां मरेल, घटकेनें मरेल अशी त्याची स्थिति झाली. त्याचे हातपाय सुद्धां गार पडले! परंतु अशा स्थितींतही त्याचे जवळ कोणी नव्हतें. भोंवतालीं दिव्याचा प्रकाश पडला होता, व एका मोठ्या बिच्छान्यावर मच्छरदाणीच्या आंत ती राजाची स्वारी पडली होती. त्याचा जीव अगदीं एकवटून आला. दरबारची मंडळी किंवा चाकर माणसें यांपैकीं त्याजवळ कोणी नव्हतें. ते सर्वजण नवीन राजाला सलाम करण्याकरितां गेले होते. अशा त्या भयंकर स्थितींत असतांना राजा किंचित् शुद्धीवर आला तों छाती दडपल्यासारखें वाटलें, व कोणीतरी आपल्या छातीवर बसलें आहे असें त्याला भासलें. तेव्हां त्यानें डोळे उघडून पाहिलें तों यमाची स्वारी छातीवर बसली आहे, असें त्यास दिसलें. यमाच्या डोकीवर राजाचा मुगुट व एका हातांत राजदंड व दुसऱ्या हातांत निशाण होतें; व तो राजाकडे

डोळे वटारून पाहात होता. भोंवतालीं भिंतीवर जिकडे तिकडे माणसांच्या आकृति दिसूं लागल्या. त्यांपैकीं कांहींचे चेहेरे सुंदर होते, तर कांहींचे भीति वाटण्यासारखे उग्र होते. राजानें सर्व आयुष्यांत केलेलीं बरीं वाईट कर्में माणसांच्या रूपानें त्याला दिसूं लागलीं. तो जेव्हां आकृतींकडे पाहूं लागला, तेव्हां कांहीं आकृति म्हणूं लागल्या, 'राजा, तुला ही गोष्ट आठवते का ?' 'तें कर्म तुला स्मरतें का ?' राजाला त्या सर्व गोष्टींची आठवण झाली, व तो फार घाबरला, व ओरडून म्हणाला, 'अरे, कोणी तरी वाद्यें वाजवा, कोणी तरी गाणें म्हणा, म्हणजे त्यांच्या या क्रूर आरोळ्या ऐकावयास नकोत. माझा जीव अगदीं कासावीस झाला आहे'; परंतु नगारा वगैरे वाद्यें आणावयाला तेथें कोणीच नव्हतें तेव्हां राजा त्या सोन्याच्या बुलबुल पक्ष्याला म्हणाला, 'बुलबुल, तूं तरी या वेळीं गा. आजपर्यंत मी तुला सांभाळलें, व तुला सोन्यामोत्याच्या किती तरी देणग्या दिल्या. करितां यावेळीं तूं तरी मला मदत कर. परंतु त्याला किल्ली दिल्याखेरीज तो बुलबुल गाणार कसा, व किल्ली देण्याला तर तेथें कोणीही नव्हतें. झालें, शेवटची वेळ आली. भोंवतालच्या आरोळ्या वाढूं लागल्या. राजाची छाती गार पडावयास लागली व प्राण डोळ्यांत येऊन ठेपले. इतक्यांत काय चमत्कार झाला ! आतां यम त्याचे प्राण काढून घेणार तोंच अतिशय सुंदर, मधुर व खड्या सुरांत असे गाण्याचे आलाप ऐकूं आले. गाणें इतकें उंच सुरांत होतें कीं, बाकीच्या आरोळ्या त्यांत सर्व बुडून गेल्या. त्या गाण्याचा मधुर स्वर ऐकतांच राजाला किंचित् हुशारी आली, व त्याच्या अंगांत ऊब आली, तो गाण्यांत इतका तल्लीन झाला कीं, त्याचे डोळे पाण्यानें भरून येऊन गालावरून आंसवें गळूं लागलीं. तो पूर्वींचाच खरा बुलबुल आला आहे, व त्याचेंच गाणें आपण ऐकत आहों हें राजानें ओळखलें. तें गाणें ऐकून यमाची स्वारी अगदीं मोहून गेली. गाणें संपल्यावर पुन्हा दुसरें गाणें म्हणण्याविषयीं राजानें बुलबुलला विनंती केली, तेव्हां

यमही म्हणाला, ' मेहेरबानी करून थोडें गाच. ' तसें बुलबुल यमास म्हणाला, मी गातों, पण मला त्याबद्दल राजाचा मुगुट देतोस का ? यमानें होय म्हटल्यावर बुलबुलनें गाणें म्हणून मुगुट मिळविला. तेव्हां यम म्हणाला, ' बुलबुल आणखी गा. ' तसें बुलबुल म्हणाला, मी गातों पण त्याबद्दल राजदंड देतोस का ? यमानें होय म्हटल्यावर बुलबुलनें गाणें म्हणून राजदंड मिळविला. तेव्हां यम म्हणाला, ' बुलबुल आणखी गा ' तसें बुलबुल म्हणाला, मी गातों; पण मला त्याबद्दल निशाण देतोस का ? यमानें होय म्हटल्यावर बुलबुलनें गाणे म्हणून निशाण मिळविलें. शेवटीं बुलबुलनें इतकें मधुर व सुंदर गाणें म्हटलें कीं, आतां आपण आपल्या यमलोकांतच जावें असें यमाला वाटलें, व तो नाहींसा झाला. यम निघून गेल्यावर राजा बुलबुलला म्हणाला, ' मित्रा बुलबुल, आज तूं माझें मरण चुकविलेंस. आतां नेहमीं येथेंच मजजवळ राहा, व मजकरितां गाणें गात जा. ' त्यावर बुलबुल म्हणाला, राजा, हें शक्य नाहीं. मी मोकळा असलों म्हणजेच उत्तम गातों. मी येथें राजवाड्यांत राहूं शकणार नाहीं. परंतु दररोज रात्रीं मी येत जाईन, व या खिडकींत बसून तुझ्या करतां गाणें म्हणत जाईन. बुलबुल निघून गेल्यावर राजाला चांगली हुशारी वाटली, व तो तरतरीत झाला. त्यानें उठून चांगला पोषाख केला, डोकीला मुगुट घातला व हातांत राजदंड घेतला. इतक्यांत दरबारची मंडळी राजा मेला आहे कीं नाहीं, हें पाहाण्याकरितां तेथें आली, तों काय चमत्कार ! राजा पोशाख करून उभा आहे. त्याचे डोक्यावर मुगुट, एका हातांत तलवार व दुसऱ्या हातांत राजदंड ! तें पाहतांच सर्व लोकांनीं राजाला पटापट मुजरे केले.

# राजपुत्र माधव.

एक होता राजा. तो फार शाहाणा व मायाळू होता. खोटें त्याला अगदीं आवडत नसे. हे त्याचे गुण पाहून एकदां त्याचे राज्यांतील एक देवता त्याचेकडे आली, व म्हणाली, 'राजा, मी तुझें काय कल्याण करू तें सांग?' त्यावर राजानें उत्तर केलें,' देवी, मला एकुलता एक माधव या नांवाचा मुलगा आहे, व तो मला प्राणापेक्षां प्रिय आहे, हें तुला माहीत आहे; तरी त्याचेंच काय कल्याण करावयाचें तें कर.' देवी म्हणाली, 'राजा, तुझ्या माधवाचें काय कल्याण करूं तें सांग. त्याला खूप श्रीमंत करूं, का अत्यंत देखणा करूं, का मोठा बादशाहा करूं? काय करूं तें सांगा' राजा म्हणाला, यांपैकीं कांहींही नको. त्याला सद्गुणी कर. तो जर वाईट निघाला, तर त्याची श्रीमंती, त्याचें सुंदर रूप व त्याचें मोठें राज्य यांचा काय उपयोग बरें? या करितां त्याला सद्गुणी कर, ही प्रार्थना आहे.' देवी म्हणाली, 'राजा, ती गोष्ट अशक्य आहे. त्याची इच्छा असल्यास तो चांगला होईल, मी तें करूं शकणार नाहीं. मी त्याला उपदेश करीन. तो चुकल्यास त्याची कान-उघाडणी करीन, व नच ऐकूं लागला तर शिक्षा करीन. मी नेहमीं त्याचे हिताकरितां झटेन. परंतु त्याच्या मनांत असल्याशिवाय मी त्याला सद्गुणी करूं शकणार नाहीं.' हें ऐकून राजाला वाईट वाटलें.

परंतु कांहीं झालें तरी आपल्या मुलाची काळजी घेण्याला एक देवता आहे; व आपण आपल्या माधवाला एका देवतेच्या हवालीं केलें आहे, व ती त्याला कांहीं कमी पडूं देणार नाहीं, असा विचार मनांत येऊन त्याला समाधान वाटलें. पुढें कांहीं दिवसांनीं राजा वारला. माधवाला बापाबद्दल मोठें दुःख झालें. कित्येक वेळां तो रात्रीं बापाची आठवण होऊन तासचे तास जागा असायचा. एके दिवशीं रात्रीं आपल्या

खोलींत एकटाच असा असतांना एकदम जिकडे तिकडे लख्ख प्रकाश पडला, व समोर एक सुंदर स्त्री उभी राहिली. ती गोरी गोरीपान व रूपानें फारच सुंदर होती. ती जरीचें उंची पातळ नेसलेली होती. डोकींत तऱ्हेतऱ्हेचीं फुलें होतीं, व तिनें गळयांत गुलाबाच्या फुलांचा हार घातला होता.

ती मागें सांगितलेली देवता होती. ती म्हणाली, 'माधवा, घाबरूं नकोस, शांत हो. मी या प्रदेशांतील देवता आहें. तूं जिवंत आहेस तोंपर्यंत मीं तुझ्या सुखाकरितां झटेन, असें मीं तुझ्या वडिलांना वचन दिलें आहे. तरी मी तुझें कल्याण करण्याकरितां झटेन. मी तुला एक देणगी आणली आहे. ती देणगी कांहीं मोठीशी नाहीं, पण तुला ती विलक्षण मदत करील' असें म्हणून तिनें एक आंगठी माधवाचे बोटांत घातली, व म्हणाली, 'या आंगठीपासून तुझें कल्याण होईल. तूं कांहीं वाईट करूं लागलास तर ती आंगठी तुझे बोटाला टोचूं लागेल, म्हणजे खास समजावें कीं, आपण चुकतों आहों. पण आंगठी टोचते, इकडे लक्ष न देतां हट्टानें वागूं लागलास तर भयंकर परिणाम सोसावे लागतील. कारण मी तुझी शत्रु बनेन.' इतकें बोलून ती देवता नाहींशी झाली. आंगठीसंबंधानें माधव कोणाजवळ कांहीं बोलला नाहीं. तो पुढें कांहीं दिवस बरा वागल्यामुळें त्याचे बोटाला आंगठी टोचली नाहीं. परंतु लहानपणापासून दाईनें फाजील लाड केल्यामुळें तो बिघडला होता. राजा झाल्यावर प्रत्येक गोष्ट आपल्या मताप्रमाणें करतां येते, आपल्या मनाविरुद्ध कांहीं सुद्धां होत नाहीं, असें दाईनें त्याच्या मनांत भरवलें होतें. परंतु प्रत्यक्ष राजा झाल्यावर ती गोष्ट खरी नाहीं असें दिसून आलें, व त्यामुळें त्याला राग येई.

एके दिवशीं तो रानांत शिकारीस गेला. परंतु कांहीं शिकारच सांपडली नाहीं. मी राजा असून मला शिकार नाहीं, हें पाहून त्याला

राग आला, व ज्याचे त्याचे अंगावर तो तोंड टाकूं लागला, व चरफडत चरफडतच घरीं आला. त्यावेळीं बोटांतील आंगठी घट्ट होऊन रुतूं लागली. परंतु त्यानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. राजवाड्यांत शिरतांच त्याचा लाडका कुत्रा जवळ आला, व त्यानें लाडुकपणाचे चाळे करावयास सुरुवात केली. परंतु माधवानें त्याला निघून चालता हो असें म्हणून झिडकारलें परंतु तो कुत्रा तसाच लाडुकपणा करावयास लागला. त्यानें शेपटी हालविली, तो मागील पायांवर उभा राहिला व त्यानें मालकाचे छातीवर उडी मारिली. परंतु माधवाला उलट त्याचा रागच आला, व त्यानें त्या गरीब कुत्र्याला लाथेनें उडविलें. त्याबरोबर एखादी टाचणी टोचावी त्याप्रमाणें ती आंगठी त्याच्या बोटाला टोचली. तेव्हां राजपुत्र म्हणाला, मी या देशाचा राजा नाहीं काय ? मला वाटल्यास मी आपल्या कुत्र्याला लाथ मारूं नये काय ? त्यांत वाईट तें काय आहे ? हा मोठा जुलूम आहे ! त्याबरोबर मधुर अशा सुरानें उच्चारलेले पुढील शब्द त्याच्या कानांवर आले. " लोकांना सुख देणें हा राजाचा अधिकार आहे. दुःख देणें हा अधिकार नाहीं. आज तूं रागाच्या भरांत चुका केल्यास, करितां उद्यां चांगला वाग. " शब्द तर कानांवर आले; पण कोणी मनुष्य दिसलें नाहीं; पण ते शब्द त्या देवतेचे आहेत हें माधवानें ओळखलें. पुढें कांहीं दिवस तो तिच्या उपदेशाप्रमाणें वागूं लागला. पण पुन्हां पहिल्या वळणावर आला.

एके दिवशीं आंगठी इतकी टोचली कीं, बोटांतून रक्ताचा थेंबच आला. दिवसेंदिवस तो जास्तच चिडखोर बनूं लागला, व वरचेवर बोटाचें रक्त निघूं लागलें. परंतु तिकडे त्याचें लक्ष जाईना. त्याचे कांहीं दुष्ट मित्र होते, तेही त्याला वाईट कामांत भर देत. त्याला वाईट कामांत भर देऊन त्याचा नाश करावयाचा व आपण त्याचें राज्य बळकावयाचें असें त्या दुष्ट मित्रांच्या मनांत होतें. परंतु तें माधवाच्या

लक्षांत येईना. तो दिवसेंदिवस लोकांना जास्तच त्रास देऊं लागला, व वाड्यांतील चाकर नोकर ह्याना शिवीगाळ करूं लागला. तसतशी आंगठी बोटाला टोचून रक्ताचे ठिपके टप् टप् गळूं लागले. शेवटीं त्यानें ती आंगठी काढून ठेवून दिली, तेव्हां त्याला समाधान वाटलें. आतां आपण वाटेल तें करूं असें त्याच्या मनानें घेतलें. शेवटीं जी गोष्ट त्यानें करूं नये ती केली. मालती या नांवाची एक सुंदर मुलगी होती. आपण हिच्याशीं लग्न करावें, असें त्यानें ठरविलें. परंतु ती गोष्ट तिनें झिडकारिली तेव्हां त्याला फार आश्चर्य वाटलें. तो तिला म्हणाला, मालती, तूं माझ्याशीं लग्न कां करीत नाहींस? तेव्हां मालती म्हणाली, माधवा, तूं रूपानें सुंदर आहेस, पण तुझ्या वडलांप्रमाणें तुझा स्वभाव चांगला नाहीं. मी तुझी राणी झालें, तर तुझ्यापासून मला अतिशय दुःख होईल. मालतीचे हे शब्द ऐकतांच माधवानें तिला तुरुंगांत नेण्याचा हुकूम दिला. तुरुंगाची किल्ली त्यानें आपल्या जवळ ठेविली, व आतां, पुढें काय करावें, ह्मणून त्यानें एका दुष्ट मित्राला सल्ला विचारला. तेव्हां तो मित्र ह्मणाला, माधवा, तूं राजा आहेस. तूं काय करशील तें होईल. लग्नाला कबूल होइपर्यंत मालतीला तुरुंगांत ठेव. तेव्हां राजपुत्र ह्मणाला, निरुपद्रवी प्राण्याला असा त्रास देणें हें बरें काय? लोक मला नांवें ठेवतील. त्यावर तो मित्र ह्मणाला, तुझ्या राज्यांतल्या एका मुलीनें तुझा अपमान करणें ही केवढी तुझी अपकीर्ति हें आधीं लक्षांत ठेव. तेव्हां मित्राचें बोलणें खरें वाटून रागारागांतच माधव तुरुंगाकडे गेला. परंतु आश्चर्याची गोष्ट कीं, मालती तुरुंगांत आढळली नाहीं. ती तेथून निघून गेली होती. तुरुंगाची किल्ली तर आपणाजवळ, तर हें झालें कसें? एका माणसाचा त्याला संशय आला. तो ह्मणजे त्याचा जुना शिक्षक हरिपंत हा होय. कारण हरिपंत माधवाची नेहमीं कानउघाडणी करीत असे. हरिपंताचा संशय येतांच त्याला पकडून आपल्या समोर आणण्याकरितां हुकूम सोडला. चाकर निघून गेले व

माधव एकटाच तेथें राहिला. तेव्हां मेघांचा गडगडाट व्हावा असा मोठा आवाज त्या खोलींत झाला, व डोळे दिपतील एवढा मोठा प्रकाश पडला. देवता माधवापुढें उभी राहिली. त्या वेळेस तिचा सुंदर चेहरा उग्र दिसत होता. व तिचा मधुर आवाज नगाऱ्याच्या आवाजाप्रमाणें भासूं लागला. ती म्हणाली, हे दुष्ट राजपुत्रा, तूं ज्या क्रूर प्राण्यांची शिकार करतोस, त्यांच्यापेक्षांही नचि बनला आहेस. सिंहाप्रमाणें क्रूर, सापाप्रमाणें सूड घेणारा, लांडग्याप्रमाणें अधाशी आणि बैलाप्रमाणें उन्मत्त झाला आहेस. तेव्हां त्यांच्याच प्रमाणें आतां तूं हो" हे शब्द निवतांक्षणींच त्या राजपुत्राचा एक भयंकर राक्षस बनला, व तो राक्षस रागानें त्या देवतेच्या आंगावर धावणार तों ती नाहींशी झाली. एका क्षणांत आपण लांब लांब एका अरण्यांत एका ओढ्याच्या कांठीं आहोंत, असें त्याला दिसलें. पाण्यांत त्यानें आपलें प्रतिबिंब पाहिलें, तेव्हां डोकें सिंहासारखें, शिंगें बैलाचीं, पाय लांडग्यासारखे व शेपूट सापासारखें आहे, असें त्याला दिसलें, तेव्हां त्याला अत्यंत वाईट वाटलें. इतक्यांत त्याच्या कानावर शब्द पडले. 'माधवा, तुझ्या शरीरापेक्षांही तुझें मन वाईट झालें आहे, व तूंच त्याचें कारण आहेस. हे शब्द ऐकल्याबरोबर तो पळाला, व पळत असतांना एका पारध्याच्या जाळ्यांत सांपडला. तेव्हां ही भली गंमत सांपडली, व लोकांना दाखवून चांगले पैसे मिळवितां येतील, असें पारध्याला वाटलें, व त्यानें त्याला तसाच पिंजऱ्यांत घालून शहरांत राजवाड्यापुढें आणिलें. तेव्हां माधवाला कळलें कीं, वीज पडून राजा मेला, अशी बातमी गांवांत पसरली आहे व चार पांच सरदार लोक राज्य बळकावण्याकरितां धडपडत आहेत. परंतु लोकांची इच्छा हरिपंतानेंच राजा व्हावें अशी आहे. तेव्हां हरिपंत तेथें येऊन लोकांना म्हणाला, आपला राजा मेला नाहीं, असें मला वाटतें. तेव्हां तो परत येईपर्यंत मी राज्य करीन. तसें लोक म्हणाले, तो राजा वाईट होता, तो आम्हांला नको. तेव्हां हरिपंत म्हणाला, मला

त्याचें अंतःकरण माहीत आहे. तो खरोखर वाईट नाहीं. तो बिघडला आहे; पण मूळचा वाईट नाहीं. त्याला पश्चात्ताप होईल, व तो चांगल्या रीतीनें राज्य करील. हे शब्द ऐकतांच त्या राक्षसाचें ( माधवाचें ) अंतःकरण द्रवलें. पुढें त्या राक्षसाच्या मालकानें त्याला राजवाड्यांत नेऊन ठेवलें तो त्याला अतिशय कडक रीतीनें वागवीत असे; परंतु हें आपल्या कर्माचें फळ ह्मणून माधवाला पश्चात्ताप वाटूं लागला. एके दिवशीं जवळच्या पिंजऱ्यांतील वाघ सुटून मालकाला मारावयास धावला, तेव्हां या राक्षसानें वाघावर उडी घालून त्याला ठार मारलें, व मालकाचा प्राण वांचविला. त्याबरोबर "चांगल्या कर्माचें फळ मिळाल्याशिवाय केव्हांही राहात नाहीं," असे शब्द त्याच्या कानावर आले, व तावडतोब राक्षसाचें रूप जाऊन तो राजपुत्र एक सुंदर लहान पांढऱ्या रंगाचा कुत्रा बनला. ही गोष्ट त्या कुत्र्याच्या मालकानें राजवाड्यांत सर्वांना सांगितली व सर्व लोक त्या कुत्र्याचे लाड करूं लागले, व राणीही त्याच्यावर प्रेम करूं लागली. परंतु तो फार लठ्ठ होऊं नये, म्हणून त्याला थोडें खायाला देत असत. त्यामुळें त्याला अर्धपोटीं राहावें लागे.

एके दिवशीं त्याला एक भाकरीचा तुकडा मिळाला व तो घेऊन तो लांब एका बाजूला खात बसला, तेव्हां त्याला एक भुकेलेली म्हातारीबाई दृष्टीस पडली. तिला पाहून त्याला दया आली, व त्यानें तो तुकडा तोंडांत धरून तिच्यापुढें नेऊन टाकिला. तो त्या बाईनें खाल्ला, व तिला समाधान झालें तिला आनंदांत पाहून त्या कुत्र्याला म्हणजे राजपुत्रालाही समाधान झालें, व तो राजवाड्याकडे वळला. इतक्यांत कांहीं दांडगे लोक एका सुंदर मुलीला फरफरा ओढीत चालले आहेत, व ती दुःखानें ओरडत आहे, असा देखावा माधवाला दिसला. ही मुलगी दुसरी कोणी नसून माधवाची आवडती मालतीच होती, यावेळीं आपण जर पूर्वींचे राक्षस असतों, तर इतक्या लोकांना ठार मारलें असतें, व कांय बहार झाली

असती; परंतु आतां काय त्याचें असें माधवास वाटलें. तरी पण त्या लोकांवर तो भुंकत धांवला, व त्यांचे लचके तोडूं लागला. परंतु त्यांनीं त्या कुत्र्याला दोन काठ्या मारून दूर केलें, व मालतीला अरण्यांतील एका राजवाड्यांत नेऊन ठेवलें. कुत्र्यानें हा उपकार केल्याबरोबर चांगल्या कर्माचें फळ मिळाल्याशिवाय केव्हांही राहात नाहीं, असे शब्द त्याच्या कानावर आले, व तत्क्षणीं त्याचें कुत्र्याचें रूप जाऊन तो सुंदर कबुतर बनला. तेव्हां त्याला मोठा आनंद झाला, व आपल्या आवडत्या मालतीला शोधून काढण्याकरितां या खिडकींतून त्या खिडकींत, या खोलींतून त्या खोलींत, या दालनांतून त्या दालनांत, वरच्या मजल्यावरून खालच्या मजल्यांत असा त्यानें तिचा पुष्कळ तपास केला, परंतु ती आढळली नाहीं. शेवटीं तिला शोधून काढण्याकरितां तो जगांत भटकूं लागला. त्यानें निरनिराळ्या प्रांतांत तिचा शोध केला. शेवटीं लांब एका देशांत एका तंबूंत बसलेली ती त्याला आढळली. तिच्याजवळ एक जख्ख म्हातारा संन्यासी बसला होता. तिला पाहतांच माधवाला अतिशय आनंद झाला. तो तिच्या खांद्यावर जाऊन बसला, आपली चोंच तिच्या केसावरून फिरवूं लागला व तोंडानें तिच्या कानांत कुडकुड असे शब्द त्यानें उच्चारले. तेव्हां मालती म्हणाली, छबुकल्या, तूं मजजवळ राहाशील काय? तूं जर राहिलास तर मी तुजवर नेहमीं प्रेम करीन. तेव्हां तो म्हातारा संन्यासी हसून म्हणाला, मालती, हें तूं काय केलेंस? हे शब्द उच्चारतांच तें कबूतर एकदम नाहींसें झालें, व राजपुत्र माधव तेथें उभा राहिला. तो रूपानें अत्यंत सुंदर दिसूं लागला, व पूर्वीं केव्हांही नव्हता इतका विनय व मायाळूपणा त्याच्या चेहऱ्यामध्यें झळकूं लागला. तसेंच तो म्हातारा संन्यासी एकदम बदलून त्याची एक सुंदर स्त्री झाली. ती म्हणजे पूर्वींची देवता होय. देवता म्हणाली, माधवा, तुझा शाप संपला, व तूं आतां हिच्या प्रेमाला पात्र झालास.

तेव्हां माधव व मालती या दोघांनीं देवतेला नमस्कार केला. आतां तुम्ही आपल्या राज्यांत जा, असा तिनें त्यांना आशीर्वाद दिला. चुटकीसरशी ते राजवाड्यांत आले. तेथें हरिपंतानें त्यांचें स्वागत केलें, व माधवाचें राज्य त्याला परत दिलें. पुढें माधव व मालती यांनीं आनंदानें पुष्कळ दिवस राज्य केलें. माधवानें सर्व आयुष्यभर ती आंगठी हातांत घातली; परंतु पुढें केव्हांही तीं टोचून त्याचे बोटाचें रक्त निघालें नाहीं.

---

## कृत्रिम रेशीम व लोकर.

शास्त्रीय शोध काय करूं शकतील याबद्दल आज या विसाव्या शतकांत तरी शंका उरलेली नाहीं. तुकाराम महाराजांची ' गाढवाचें घोडें । आम्ही करूं दृष्टीपुढें । ही लाक्षणिक उक्तीसुद्धां कदाचित् शक्य कोटींत येऊन बसेल, असें वाटूं लागतें. इतक्या विचित्र कल्पना शास्त्रज्ञांनीं आज प्रत्यक्ष सिद्ध करून दाखविल्या आहेत. अशा गोष्टींपैकीं कृत्रिम रेशीम, कृत्रिम लोकर, कृत्रिम रबर, कृत्रिम अत्तरें वगैरे गोष्टी होत.

लाकडाच्या रांध्यापासून कागद बनवितात, हीं गोष्ट आपल्या सर्वांना माहीत आहे. पण आज त्याच्यापासून कृत्रिम रेशीम व कृत्रिम लोकर हे जिन्नसही बनवूं लागले आहेत. कृत्रिम रेशामध्यें किड्यांपासून मिळणाऱ्या रेशमाचे बरेच गुणधर्म उतरतात, व त्यापेक्षां तें पुष्कळ स्वस्त विकत मिळतें. त्यामुळें त्याचा प्रसार होऊन पुष्कळ लोकांना रेशीम वापरण्याची संधि मिळेल. कृत्रिम लोकरही कृत्रिम रेशमाप्रमाणें झाडाच्या रांध्यापासून बनवितात, व त्या लोकरींत मेंढ्यांच्या लोकरीचे गुणधर्मही बऱ्याच प्रमाणांत आढळतात.

कृत्रिम रेशीम करतांना लाकडाच्या रांध्यांत कांहीं रासायनिक द्रव्यें मिसळतात, व रेशमी किडयाच्या बारीक तोंडाएवढ्या लहान भोकें असणाऱ्या एका यंत्रांतून तो रांधा बांधकामाच्या मोठ्या टाकींत पिचकारीप्रमाणें जोरानें उडविला जातो. गंधकाम्लांत पडल्याबरोबर तेथल्या तेथें तो रांधा गोठून त्याच्या लांब तारा बनतात, नंतर तें रेशीम बाहेर काढून धुवून रिळावर गुंडाळतात. हे धागे धातूंच्या तारांप्रमाणें आंतून भरीव असतात.

कृत्रिम लोकर करतांना लांकडाच्या रांध्यांत दाबाखालीं हवा मिसळतात. सोडावॉटर, लेमोनेड वगैरे बाटल्या भरतांना जसा त्यांत कॉर्बॉनिक आसिड गॅस दाबाखालीं विरघळविलेला असतो. तशा प्रकारें हवा मिसळलेला हा रांधा रेशमाच्या किडयाच्या तोंडाएवढ्या बारीक छिद्रांमधून यंत्रद्वारें गंधकाम्लाच्या मोठ्या टाकींतील एका नळींत पिचकारीप्रमाणें उडवितात, व तेथें त्यापासून लोकर बनते. कृत्रिम लोकरीचा धागा नळीप्रमाणें आंतून पोकळ असतो. ही लोकर मेंढीच्या लोकरीपेक्षां हलकी असून तिच्याइतकी ऊबदार असते. ही लोकर हल्लीं मोठ्या प्रमाणावर तयार करूं लागले आहेत, व त्यामुळें मेंढ्यांच्या धंद्याला मोठा धक्का बसणार आहे. नवीन लोकरींत पूर्वीच्या लोकरीचा ऊबदारपणा असून ती जास्त स्वस्त असल्यामुळें स्वाभाविकच तिचा खप फार जास्त होईल; व सामान्य लोकांनासुद्धां कृत्रिम रेशमी कपड्याप्रमाणें या कृत्रिम लोकरीचे कपडे मुबलक वापरण्याची संधि मिळेल.

हे दोनही पदार्थ झाडाच्या रांध्यापासून तयार केले असल्यामुळें झाडाचा रांधा अंगावर चढवलेलीं हीं दुसरीं चालतीं बोलतीं झाडेंच म्हणावयास काय हरकत आहे?

---

# माशी.

मुंग्या व माशा या सर्वांच्या इतक्या परिचयाच्या झालेल्या असतात कीं, त्या पाहिल्यानें कधींही कोणाला आश्चर्य वाटत नाहीं. कोणतीही गोष्ट नेहमींच्या पाहण्यांत आल्यानें तींतील नाविन्य नेहमींच नाहींसें होणार व तीबद्दल जिज्ञासा उत्पन्न होणार नाहीं. तशीच स्थिति या आपल्या माशीसंबंधीं आहे.

माशा पावसाळ्यांत व हिंवाळ्यांत फार कमी असतात; पण उन्हाळ्यांत आंब्याच्या दिवसांत फारच उत्पन्न होतात, व जेवणारांना त्या हांकितां हाकतां पुरेवाट होऊन जाते. रात्रीच्या वेळीं या माशांना दिसत नाहीं म्हणून बरें, नाहींतर त्यांनीं सारखें घोंगावून माणसाला उच्छाद दिला असता. माशा दिवसा त्रास देतात, तर डांस रात्रीच्या वेळीं आपलें गायन सुरू करतात, व तें न ऐकणाऱ्या—म्हणजे निद्रावस्थेंत असणाऱ्या—माणसांस आपल्या दंशांनीं ऐकावयास भाग पाडतात. डांसांपासून त्रास होऊं नये म्हणून मनुष्यानें मच्छरदाणी बनविली, व इतरही अनेक प्रकारें त्यांचीं उत्पत्तिस्थानें नाहींशीं करून त्यांचा त्रास बराच कमी केला. तशी गोष्ट या माशांसंबंधानें करणें आवश्यक आहे, असें त्यास बरेच दिवस वाटलें नाहीं, उलट ती माशी ही एक मैत्रीण करून कवींनीं तिला आपल्या पेल्यांतील अमृततुल्य पेयांचा आस्वाद घेण्याची विनंति केली!

पण दिवसेंदिवस निरनिराळ्या राष्ट्रांतून शास्त्रीय ज्ञानाचा अभ्यास जसजसा वाढूं लागला, तसतसा माशीपासून उत्पन्न होणाऱ्या भयंकर रोगांसंबंधीं स्वच्छ प्रकाश पडत जाऊन हा हितकारक प्राणी नसून लघुरूपधारी एक भयंकर राक्षस आहे, अगर निरनिराळ्या रोगांनीं नेमलेला दलाल आहे, ही कल्पना स्पष्ट होऊं लागली.

सामान्य निरीक्षण करणारांना असें दिसेल कीं, स्वच्छ पदार्थापेक्षां माशीला घाण पदार्थांवर बसण्याची मोठी आवड ! उकिरड्यावर कुजणारे पदार्थ, गटारांत पडलेली घाण व इतर पदार्थ यांवर माशांचा थवाच्या थवा नेहमीं बसलेला दिसतो, व मनुष्यानें ही घाण काढून टाकण्यापूर्वीं ही काढण्यास देवानें यांचीच नेमणूक केली आहे असें वाटतें ! पण तिला नेहमींच घाण पदार्थांवर बसणें आवडत असतें, तर एक प्रकारें बरें झालें असतें; पण तसें नाहीं. मनुष्याच्या सर्व प्रकारच्या खाण्याच्या गोड पदार्थांवर माशी चिकटलेली आहेच. बाजारांतील मेवामिठाईच्या उघड्या ठेवलेल्या ताटांवर, गटारांतील घाणीचा आस्वाद घेणाऱ्या माशा सहज उडी मारून बसतात, व तेथें त्यांतील गोड रसाचा आस्वाद घेण्यांत त्यांची एकतानता झालेली दिसते.

कोणीही माणूस रस्त्यांतील घाणीनें भरलेले जोडे दाराबाहेर काढून ठेवून नंतर घरांत शिरतो; पण या उडणाऱ्या माशांना घाण पदार्थावरून उडून खाण्याच्या सोज्वळ पदार्थांवर येऊन बसण्यास बिलकूल दिक्कत वाटत नाहीं.

यांचें सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं निरीक्षण केलें असतां आपणांस त्यांच्या पायाला ब्रशासारखे विपुल केशांचे पुंजके असलेले दिसतील. या माशा या घाण पदार्थांवरून उडून चांगल्या पदार्थांवर येऊन बसल्या म्हणजे या केसांना लागून आलेले अनेक प्रकारचे व रोगांचे घाण जंतु अन्नावर अगर पाणी प्यावयाच्या भांड्यास चिकटतात, व आपल्या पोटांत जातात, पुढें त्यांपासून अनेक रोगांचा फैलाव जोरानें होण्यास मदत होते.

या माशांच्या द्वारें ज्या रोगांचा फैलाव होतो असा समज आहे, अशांपैकीं आमांश, पटकी, विषमज्वर व डोळ्याचे अनेक रोग, लहान मुलांचे आंतड्याचे रोग हे मुख्य आहेत.

एखाद्या महारोग्याच्या अंगांतील रक्त शोषून घेऊन त्या चांगल्या माणसास झालेल्या एखाद्या जखमेवर बसल्या असतां त्यास महारोग होऊं शकेल असेंही डॉक्टर लोकांचें या बाबतींत मत आहे. एवढ्या-नेंच त्यांच्यापासून होणाऱ्या रोगांची परंपरा संपली असें नाहीं. यापेक्षां अनेक प्रकारें रोग उत्पन्न करण्याचें कार्य त्या करीत असतील, वरील गोष्टी उदाहरणादाखल घेतल्या आहेत.

तेव्हां अशा प्रकारच्या या लहान प्राण्यांपासून मनुष्यास त्रास होऊं नये म्हणून स्टेशनावरील मेवामिठाईचे दुकानदार आपला माल तारांच्या जाळीदार पिंजऱ्यांत ठेवितात हें आपण नेहमीं पाहतों. घरांतील सर्व खाण्याचे पदार्थ स्वच्छ राहावे म्हणून जाळ्यांचीं कपाटें हल्लीं घरोघर प्रचारात येऊं लागलीं आहेत. याशिवाय परवांच्या शेतकीप्रदर्शनांत चिकट पदार्थ लावलेले कागद पाहाण्यासाठीं ठेवले होते. त्यांवर खाण्यासाठीं येऊन बसणाऱ्या माशा चिकटत व त्या मरून जात. याशिवाय माशी जाळ्यांत पकडून ठेवण्यासाठीं कांहीं यांत्रिक योजना असल्याचेंही ऐकिवांत आहे. अशा रीतीनें या प्राण्यास ठार मारणें हा एकच उपाय अनर्थपरंपरा नाहींशी करण्यास समर्थ आहे अशी अलीकडील शास्त्रज्ञांची समजूत आहे.

या प्राण्यांची वाढ किती भयंकर होते, यासंबंधानें एका शास्त्रज्ञानें दिलेली माहिती अचंबा वाटण्यासारखी आहे. तो म्हणतो, एक माशी १२० अंडीं घालते. या सर्व माशा तयार झाल्या व जगल्या तर या-पासून अडीच महिन्यांच्या अल्पावधींत चार लक्ष बत्तीस हजार माशा तयार होतील, इतकी यांची जोराची वाढ होते.

मनुष्य प्राण्याचें जीवित ही अमूल्य देणगी आहे. तेव्हां त्यास वांचविण्यासाठीं या प्राण्यांचा संहारही हल्लींच्या जगांत विशेषतः मोठ्या शहरांत अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. म्हणून या बाबतींत आपण घेऊं तितकी काळजी थोडीच होईल असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

# विचित्र रावांची विचित्र लीला.

विचित्र नांवाचा एक मुलगा होता. त्याच्या घरांत त्याच्या वृद्ध आजीशिवाय कोणीही वडील माणूस नव्हतें. तो घरांत एकुलता एक असल्यानें त्याची आजी त्याचे फार लाड करीत असे; पण 'विचित्र' आपल्या नांवाप्रमाणें त्या लाडांचा फायदा घेऊन आपल्या वृद्ध आजीस कधीं कधीं अगदीं त्रासून सोडीत असे. घरांत कोणीही मिळवतें नसल्यामुळें घरांत सांठवून ठेवलेल्या थोड्या फार पुंजीवर त्याच्या आजीस कसे तरी दिवस काढावे लागत होते; पण त्यांतूनही शक्य तितकी सवड काढून ती या आपल्या 'विचित्र' लहानग्या बाळाचे कोड कौतुक करीत असे.

दिवाळीचे दिवस जवळ येत चालले होते, तेव्हां एके दिवशीं विचित्ररावा नव्या कपड्यांचा हट्ट घेऊन बसला. मला मखमालीचा कोट व जरीची टोपी पाहिजे! झालें! आजी अगदीं त्रासून जाऊन शेवटीं त्याचे म्हणण्याप्रमाणें त्याला कपडे आणण्यास कबूल झाली. ती त्याला म्हणाली, 'विचित्र', तूं पुढें हो, व पेठेंतील एकाद्या तयार कपडे विकणाऱ्या दुकानदाराकडे जाऊन तुला पसंत पडतील, ते दोन जिन्नस पसंत कर. मी तुझ्या पाठोपाठ येतें व त्या दुकानदाराचे पैसे चुकते करतें.

विचित्ररावांची स्वारी निघाली, व नाचत उडत त्यांनीं पेठेचा रस्ता सुधारला. जातां जातां ते एका भव्य दुकानाजवळ आले, व आंत टांगून ठेवलेला भारी किमतीचा माल पाहून त्याच्या तोंडास पाणी सुटलें. स्वारी दुकानांत शिरली, व तेथील दुकानदारास आपणांस कोट व टोपी विकत घ्यावयाची असल्याचें त्यांनीं सांगितलें.

दुकानदारानें लहान मुलगा आहे, ही गोष्ट लक्षांत न घेतां त्याला एकेक कोट दाखविण्यास सुरुवात केली; पण त्याच्याजवळ पैसे नसल्यानें कोट पसंत केल्यास दुकानदार पैसे मागेल, व आपणाजवळ एक कवडीही नाहीं. पैसे राहिले आजीजवळ! अशी मोठी पंचाईत झाली! तेव्हां त्याच्या सुपीक डोक्यांत अशी युक्ति आली कीं, आपण यांपैकीं प्रत्येक कोटच नापसंत आहे, असें दुकानदारास सांगावें म्हणजे झालें. लागलीच त्याप्रमाणें अमलबजावणी सुरू झाली. तो दुकानदार जो कोट दाखवी, त्याला यांचा नन्नाचा पाढा!! सरते शेवटीं तो दुकानदार कंटाळला, व म्हणाला, 'भिकारंड्या, खिशांत नाहींत पैसे आणि आला मोठा कोट घ्यायला; थांब, तुला पोलिसच्या ताब्यांत देतों,' असें म्हणून तो विचित्राला धरण्यांस धांवला; पण आमचे विचित्रराव काय कमी होते. त्यांनींही त्या मोठ्या दुकानांतील वस्तूंमागें दडून राहून त्याची नजर चुकविण्याची शक्य तितकी हिकमत लढविली; पण त्याला दुकानदाराची नजर चुकवून दरवाजाबाहेर मात्र पळून जातां आलें नाहीं. सरतेशेवटीं त्या दुकानदाराचा असा समज झाला कीं, हा पोर पळाला. म्हणून तो दमून जाऊन पुन्हा आपल्या जागेवर उभा राहिला, तेव्हां मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन विचित्ररावांनीं हळूच एका मोठ्या कपाटामागून मान लांब करून पाहिलें. आपल्याकडे दुकानदारचें लक्ष नाहींसें पाहून खिडकीवाटे जाण्याची दिशा सुधारली. त्या खिडकींत पुष्कळसे पुतळे उभे केले असून लोकांना दिसावे म्हणून त्यांच्या अंगांत निरनिराळ्या तऱ्हेचे कपडे घातले होते, व ती त्या दुकानदाराच्या मालाची एक मोठी जाहिरातच होती. त्या पुतळ्यांत हा जाऊन हळूच उभा राहिला, व तेथीलच एक पडलेला सुंदर कोट उचलून त्यानें आपल्या अंगांत चढविला, व डोक्यावर एक भारी किंमतीची टोपी ठेवून दिली. एवढें झाल्यावर संधि मिळण्याची वाट पाहात स्वारी त्या पुतळ्यांतच हालचाल न

करितां उभी राहिली. पाहाणारास वाटे कीं, या देखाव्याच्या पुतळ्यांपैकींच हा एक पुतळा असावा.

इतक्यांत त्याची आजी दुकानें पाहात पाहात त्याच दुकानाजवळ आली, व खिडकींतून दिसणारे पुतळ्यांच्या अंगावरील सुरेख कपडे तिनें पाहिले व विचित्राच्या अंगावरील कोट तिनें पाहून तो आपल्या विचित्राच्या अंगाला येईल, असें तिला वाटलें. तिनें विचित्राला दुकानाबाहेरून ओळखलें नाहीं. दुकानात शिरल्यावर खिडकींत ठेवलेल्या पुतळ्याच्या अंगावरील कोट दाखविण्यास तिनें त्या दुकानदारास विनंती केली. तेव्हां तिला बरोबर घेऊन दुकानदार पुतळे उभे होते तिकडे जाऊं लागला. तो जसजसा जवळ येऊं लागला, तसतशी विचित्ररावांची छाती धडधडूं लागली; पण मन घट्ट करून हालचाल न करितां ही स्वारी तेथेंच मुकाट्यानें उभी राहिली.

त्या दुकानदारानें एका पुतळ्याला हात लावून पोषाख दाखविला, व दुसऱ्या पुतळ्याजवळ आला. तो दुकानदार आपल्याजवळ येणार व हात लावणार असें पाहिल्याबरोबर या स्वारीनें एकदम उडी ठोकली, व दरवाजा गांठला. इतक्यांत विचित्रास त्याच्या आजीनें ओळखिलें. अशा रीतीनें विचित्ररावांनीं आपल्या विचित्र लीलेनें आपल्या आजीला एकटीलाच त्या दुकानांत बाजार करण्यास सोडून दिलें! मग आजीनें त्या कपड्यांची नाइलाजास्तव त्या दुकानदाराला त्यानें सांगितलेली भारी किंमत देऊन टाकिली.

# व्हिटॅमिन्स ऊर्फ जीवनसत्त्वें.

——:०:——

आपल्या खाण्यांत जे निरनिराळे पदार्थ येतात, त्यांपैकीं कांहीं-मध्यें आपल्या शरिराची वाढ करणारे पौष्टिक पदार्थ भरपूर असतात. अशा पदार्थांत असणाऱ्या या पुष्टिदायक सत्त्वांना इंग्रजींत 'व्हिटॅमिन्स' असें म्हणतात. यासच मराठींत आपणांला 'जीवनसत्त्वें' असें म्हणतां येईल. हें जीवनसत्त्व शरिरांत गेल्यानें शरीरसंवर्धन होतें, एवढेंच नाहीं, तर रोगांचा प्रतिकार करण्याची त्याची शक्ति ही वाढते, असें शास्त्रज्ञांचें मत आहे.

'व्हिटॅमिन्' म्हणजे काय पदार्थ आहे, हें अद्याप शास्त्रज्ञांना चांगलेंसें उलगडून सांगतां येत नसलें तरी तो कांहीं पदार्थांत भरपूर असतो, व ते पदार्थ खाल्ल्यानें जीवनाला उपयोग होतो, असें त्यांचें मत आहे. या पदार्थांना 'ए–व्हिटॅमिन्,' 'बी–व्हिटॅमिन्,' 'सी–व्हिटॅमिन्' वगैरे वर्गीकरणार्थ त्यांनीं नांवें दिलीं आहेत.

हा पदार्थ मूळ सूर्यकिरणांपासून प्राप्त होत असून तो शोषण करून घेण्याची कांहीं पदार्थांत शक्ति असते, व त्यामुळें निरनिराळ्या पदार्थांच्या निरनिराळ्या भागांत याची कमी जास्त प्रमाणांत वांटणी झालेली असते. व्हिटॅमिनचा भाग पदार्थांच्या कोणत्या ठिकाणीं जास्त असतो, हें न समजल्यानें आपल्या हातून खाण्यापिण्याच्या बाबतींत मोठ्या चुका होत असतात. उदाहरणार्थ—आपण खातों त्या तांदुळाच्या कोंडयांत व गव्हाच्या बाहेरील पापुद्र्यांत त्यांचें प्रमाण जास्त असतें, व आपण तो भाग टाकून देत असल्यानें महत्त्वाचा सात्त्विक भाग गमावतों.

अशाच प्रकारें हा महत्त्वाचा पदार्थ, कागदी लिंबू, साखरलिंबू, संत्रें, लोणी, कॉडलिव्हर ऑइल या पदार्थांत भरपूर आढळतो. आपण

पितों त्या गाई म्हशींच्या ताज्या न तापविलेल्या दुधांत याचें फार मोठें प्रमाण असतें, असें म्हणतात. दूध तापविल्यानें त्यांतील हा महत्त्वाचा भाग नाहींसा होतो. आपल्यापैकीं कितीजणांना अशा रीतीनें धारोष्ण दूध मिळूं शकतें ! ! व तें मिळेल तर आपली शक्ति व आयुर्मर्यादा या पदार्थानें कां बरें वाढूं शकणार नाहींत ? दुसरा व्हिटॅमिन् असणारा असाच आपल्या खाण्यांत येणरा पदार्थ लोणी हा होय. तो लोणी या स्वरूपांत फारच लवकर पचतो. व त्यांतच व्हिटॅमिन्स जास्त असतात. त्याचें तूप बनविलें कीं, त्यामधील व्हिटॅमिन्स नाहींशीं होऊन तुपाचा शरिराला लोण्याइतका उत्कृष्ट उपयोग होणार नाहीं असें शास्त्रज्ञांचें मत आहे. एका आरोग्यशास्त्राच्या पुस्तकांत लोणी फक्त पांच मिनिटांत पचतें, असें म्हटलें आहे. याशिवाय कॉडलिव्हर-ऑइलमध्येंही हा पदार्थ भरपूर आढळतो. त्यामुळें अशक्त माणसांवर कॉडलिव्हरचा अत्यंत इष्ट परिणाम लवकरच दिसूं लागतो. सर्व फळांत आपणांस नारिंग विशेष लक्षांत ठेवलें पाहिजे.

या फळाच्या सालींत एक प्रकारची जाळ्यासारखी रचना असून त्यामार्फत सूर्य किरणांतील व्हिटॅमिन्स आंतील रसांत सांठविलीं जातात, व सालींत हीं फारच मोठ्या प्रमाणांत आढळतात. आपण रस चोखतों, तेव्हां अंशतः आपण या व्हिटॅमिन्सचा उपयोग करतोंच; पण फळाच्या सालींतील व्हिटॅमिन्स द्रव्यें मात्र वायां जातात. यांचा अद्याप कसा उपयोग करून घेतां येईल, हें ठरावयाचें आहे. कागदी लिंबाच्या रसांत व्हिटॅमिन्स आहेत. आपण जेवतांना भातावर लिंबू पिळतों ही गोष्ट या दृष्टीनें किती महत्त्वाची आहे, हें लक्षांत येईल. लढाईंत एकसारखें समुद्रावर राहाणें भाग पडल्यानें पुष्कळ खलाशांना दातांचा स्कर्व्ही नांवाचा रोग होतो. त्यावर भाजीपाला खाण्यास मिळाला तर रोग लवकर बरा होतो; पण भाजीपाल्याऐवजीं साध्या लिंबाच्या रसानें

तोच कार्यभाग अल्पांशानें साध्य होतो, असें अलीकडील महायुद्धांत आढळून आलें आहे.

यावरून आपण खातों त्या पदार्थांपैकीं ज्यांत जास्त व्हिटॅमिन्स असतील, असे भाग आपण सेवन करणें आपल्या शरीरसंपत्तीच्या दृष्टीनें फार हितावह आहे. सबब अशा प्रकारचे पदार्थ कोणते, व त्यांचें सेवन कोणत्या रीतीनें करावें म्हणजे ते जास्त फायदेशीर होतील, हें आपण अवश्य पाहिलें पाहिजे, तरच जगांतील वाढत्या शास्त्रज्ञानाचा आपण चांगला फायदा करून घेतला, असें म्हणतां येईल.

## टॅपि ओका.

हिंदुस्थानांतील पुष्कळ लोकांच्या कानावरही हें नांव आलें नसेल; पण हा पदार्थ आपल्या देशांत नसला तरी आपल्या खंडांत पिकतो. रताळें, गाजरें वगैरे ज्याप्रमाणें झाडाच्या मुळाशीं येणारे कंद आपण खातों, तशाच प्रकारें एका झाडाच्या मुळापासून हा पदार्थ बनवितात. हा ज्या झाडाच्या मुळाशीं येतो, त्या झाडाला 'कॅसाव्हा' किंवा मॅनिऑक असें नांव आहे. हीं झाडें विशेषतः उष्णकटिबंधांत उगवतात, व त्यांची उंची सात आठ फुटांहून जास्त नसते. दक्षिण अमेरिकेंतील अमेझॉन नदीचा प्रदेश, ब्राझीलप्रांत, वेस्टइंडीज बेटें, आशियांतील स्ट्रेट् सेटलमेंट्स् व इतर बेटें या भागांत हीं झाडें उगवतात.

हीं झाडें पाहिलीं तर यांचीं पानें आपल्या हाताच्या बोटांसारखीं एका ठिकाणाहून पसरलेलीं व झुपक्यासारखीं दिसतात. पुष्कळदां हीं झाडें कोकोच्या मळ्यांत तीं झाडें लहान असतांना त्यांचें उन्हापासून

रक्षण व्हावें म्हणून लावतात. हीं झाडें लवकर मोठीं होऊन यांचें पीक कोकोपेक्षां फार लवकर निघूं शकतें, हा त्यांत मुख्य फायदा आहे. हीं झाडें आपण पाहिलीं तर त्यावर एकही फळ दिसत नाहीं; पण हा पदार्थ त्या झाडाच्या मुळापासून तयार करितात. हे लोक तें झाड संबंध उपटतात, व त्याचा वरचा रोप्याचा भाग टाकून देऊन मुळाचा भाग ठेवतात. तेवढाच भाग महत्त्वाचा असतो. या मुळांचाच टॅपि ओका नांवाचा सत्त्वासारखा पांढरा पदार्थ तयार करण्याकडे उपयोग होतो.

जात्या या पदार्थाचा रस फार विषारी आहे; पण या पदार्थांतील विशेष गुण म्हटला म्हणजे याचा रस अगर मगज चांगला उकळला म्हणजे त्यांतील विषारीपणा नाहींसा होऊन जातो. उलट—चहा व कॉफी हे पदार्थ उकळले तर त्यांतील विषारी पदार्थ टॅनिन् व कॅफीन हे त्या पाण्यांत उतरतात, व तें पाणी जास्त विषारी होतें. हा जिन्नस त्या भागांतील पुष्कळ लोकांच्या खाण्यातील एक महत्त्वाचा पदार्थ आहे.

मुळें गोळा केलीं म्हणजे तीं धुवून काढतात व तीं एका मोठ्या भांड्यांत अगर काथवटींत ठेवतात. त्या काथवटींत एक खरबरीत फळी उतरती ठेवून त्या फळीवर तीं मुळें घासतात. अशा रीतीनें आपल्या किसणीप्रमाणें त्या फळीचा उपयोग कीस होऊन काथवटींत पडतो व त्याला पाणी सुटतें. हें पाणी व तो कीस दोन्हीही विषारी असतात. असा बराच कीस जमला म्हणजे तो नारळीसारख्या पानांच्या विणले-ल्या पिशवींत घालून तो दाबून आंतील पाणी निराळें जमवितात. हें पाणी उकळून टाकलें म्हणजे निर्विष होऊन याचा निरनिराळ्या पदार्थांत चांगली चव येण्यासाठीं उपयोग करतात.

बाकी राहिलेला कीस पसरून ठेवून वाळवितात, व मग हा कीस भरभरीत किसाप्रमाणें हाताला लागतो. या पिठाच्या तद्देशीय लोक

भाकऱ्या करून खातात. अलीकडे हींच मुळें यंत्राच्या साह्यानें किसतात, व तो चांगला दाबून पिळून काढतात, नंतर कोरडा झाल्यावर त्याचें अगदीं बारीक पीठ केलें जातें. हें वाळविल्यावर चांगल्या मोठ्या तव्यावर तें परतून काढतात, व नंतर बाजारांत विकतात. तयार केलेल्या या पिठाचा आरारूटप्रमाणेंच उपयोग होईल.

टॅपि ओका हा पदार्थ बनविण्याचे सिंगापूर येथें मोठाले कारखाने आहेत, व हे कारखाने बहुधा समुद्रकिनाऱ्यालगतच्याच शहरीं आहेत. याचें मुख्य कारण तेथें यंत्रसामुग्री वगैरे माल बाहेरून येणें सुलभ होतें. व बाहेर देशीं माल रवाना करणेंही फार सोयीचें असतें.

आपले देशांत चहा, कॉफी, कोको, आरारूट व बार्ली वगैरे पदार्थ पुष्कळांच्या पूर्ण परिचयाचे आहेत, पण हा एक त्याच प्रकारचा व कोको आणि आरारुटाप्रमाणें पोषक पदार्थ फारसा कोणाच्याही ऐकिवांत नाहीं.

---

## वर्तमानसार.

गेल्या १०० वर्षांत आस्ट्रेलियांतील दरेक पांढऱ्या मेरीनो मेंढीची लोकर सरासरीनें ४ पौंडांऐवजीं ८ पौंडांपर्यंत निघूं लागली आहे.

आक्टोबर महिन्यांत आस्ट्रेलियाच्या मध्यवर्ति सरकारची बैठक ‘ कॅनबेरा ’ या शहरीं प्रथम भरविण्यांत आली. हिंदुस्थानच्या दिल्ली शहराप्रमाणें तेथील मुख्य सरकारची सभा पुढील सालच्या मे महिन्यापासून तेथेंच भरूं लागणार आहे. हें ठिकाण न्यू साउथ वेल्स व व्हिक्टोरिया यां परगण्यांच्या सरहद्दीवर आहे.

न्यू झीलंडच्या उत्तरेस पॅसिफिक महासागरांतील सॅमोआ बेटांत कोकोच्या मळ्यांत कोकोच्या रोपांना छाया मिळावी म्हणून मधून मधून कापसाची लागवड करितात. हें पीक हल्लीं वाढूं लागलें असून लवकरच त्या बेटांतील हें एक फार महत्त्वाचें पीक होईल असें म्हणतात.

फरसबंदी रस्त्यावरून घोड्याचे पाय घसरूं नयेत म्हणून लंडनमधील पोलिसांच्या घोड्यांच्या पायाला लोखंडी नालाऐवजीं रबरी नाल मारितात.

इंग्लंडांत विमानगृहाच्या जागेंत शाळेंतील मुलांना नेऊन त्यासंबंधीं तेथील अधिकारी माहिती देतात.

इंग्लंडांत दूधवाल्यांचा कायदा झाला असून त्याअन्वयें ज्याठिकाणीं पाणी, दिवाबत्तीची योजना, सांडपाण्याचा निकाल व खेळती हवा मुबलक आहे, अशा सरकारी रजिस्टर केलेल्या ठिकाणींच त्यांनीं दूध विकण्यास बसलें पाहिजे, असें ठरविलें आहे. त्यांनीं आपले कपडे स्वच्छ ठेवले पाहिजेत. आपल्या चरव्या स्वच्छ धुवून ठेवल्या पाहिजेत, व बाटल्यांतून विकावयाचें दूध डेअरींतच भरून त्या बंद केल्या पाहिजेत.

ब्रिटिश साम्राज्याचे रक्षणार्थ इंग्लंडचा हल्लींचा चौदा कोटी पौंडांचा दरसालचा खर्च आहे. गेल्या महायुद्धापूर्वीं हा खर्च फक्त नऊ कोटी पौंड होता. म्हणजे ५ कोटी पौंडांनीं हा खर्च वाढला आहे.

गेल्या २९ वर्षांत कानडाची लोकसंख्या ४० लाखांनीं वाढली. हल्लींची लोकसंख्या चौऱ्याण्णव लक्ष आहे.

ब्रिटिश गायेना ( द. अमेरिका ) या प्रांतांत फार अरण्यें आहेत. या प्रांतांतील अरण्यांत मिळणाऱ्या लाकडांपैकीं ‘ ग्रीनहार्ट ’ नांवाच्या झाडाचें लांकूड अत्यंत मूल्यवान् आहे.

रबराचा उपयोग दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर होऊं लागल्यामुळें मेक्सिको प्रांतांतील क्वाद्ल नांवाच्या रोपाच्या लागवडीकडे तेथील लोकांचें लक्ष गेलें आहे. हें झाड रानोमाळ वाटेल तितकें उगवतें, व यानें त्या प्रांतांत एक लक्ष तीस हजार चौरस मैल जमीन व्यापिली आहे. त्याची जोपासना केल्यास रबराची पैदास पुष्कळ प्रमाणावर होऊं शकेल असा अंदाज आहे.

वैमानिकांना आपण कोणत्या भागांत आहोंत, हें वरून ओळखतां यावें, म्हणून अमेरिकेंतील वखारी व मोठ्या इमारतींच्या छपरांवर शहराचें मोठें नांव रंगांनीं लिहून ठेवावें, अशी सूचना करण्यांत आली आहे.

अलीकडे शास्त्रज्ञांनीं 'न फुटणारी काच' व डाग न पडणारी धातु बनविली आहे. हे शोध जगाच्या व्यवहाराच्या दृष्टीनें फार महत्त्वाचे आहेत. परंतु अलीकडे एका लेखकानें असें प्रसिद्ध केलें आहे कीं, इ. स. ८२९ मध्यें एल् मामून या हरून अल्रशीदच्या मुलानें ईजिप्तमधील चिऑप्स नांवाच्या राजाचें थडगें उघडलें होतें, तेव्हां त्याला आंतमध्यें पेल्याच्या मुठींना डाग न पडणारी धातु वापरल्याचें आढळलें होतें, व तेथें सांपडलेली काच वांकवितां येत असून न फुटणारी होती. हे मनोरे ख्रि. श. पूर्वी ३९०० वर्षें या काळांत बांधण्यांत आले आहेत. या वरून ही गोष्ट इजिप्शियन लोकांना ५००० वर्षांपूर्वी माहीत होती असें दिसतें.

कार्बन डाय ऑक्साइड ( कारबानिक ॲसिड गॅस ) हा द्रवरूप करून नंतर घट्ट झाल्यावर याचे लहान लहान ठोकळे बनवितात, व वाटेल तेथें एका विशेष प्रकारच्या लाकडी पेट्यांतून पाठवितात. या पदार्थापासून विलक्षण थंडी उत्पन्न करतां येते. यामुळें लांबच्या पल्ल्यावर

पाठविण्यासाठीं कृत्रिम थंडी उत्पन्न करण्यास याचा चांगला उपयोग होतो.

मलाया द्वीपकल्पांत प. आफ्रिकेंतील तेलाच्या पाम झाडांची लागवड १०००० एकरांत केली आहे. त्यामुळें त्या भागांत तेल काढण्याचा एक नवीन धंदा निर्माण झाला असून गतवर्षीं तेथें ५०० टन तेलाची पैदास झाली.

जगापासून अलिप्त राहाणाऱ्या ल्हासा ( तिबेट ) शहरांत नुकतीच विजेचा चकचकाट करण्याची योजना मंजूर होऊन तत्प्रीत्यर्थ इंग्लंड-हून बरेंच यांत्रिक सामान रवाना झालें आहे.

हिंदुस्तान सरकारच्या उत्पन्नांपैकीं जंगलाचें उत्पन्न बरेंच मोठें आहे. या जंगल खात्यांत सुधारणा करण्यासाठीं हिंदुस्तान सरकारनें एक 'संशोधन खातें' निर्माण केलें असून त्यासाठीं तें दरसाल १५००० पौंड ( २२५००० रुपये ) खर्च करितें.

इजिप्तमधील कापसाचें पीक यंदा फार चांगलें आलें आहे, असें म्हणतात. त्यावर बोल नांवाचा कीटक तेथें अद्याप पोहोंचला नाहीं असें दिसतें.

अल्जेरियांत बुचाच्या झाडांचीं मोठालीं अरण्यें आहेत, व त्यांनीं २० लक्ष चौरस एकर जमीन व्यापिली आहे. याची दिवसेंदिवस तेथील सरकारकडून जास्त काळजी घेतली जात असून त्यामुळें तेथील उत्पन्न वाढत चाललें आहे.

# विमानें.

आज जगांत मनुष्यानें आपल्या सोयीसाठीं अनेक प्रकारच्या सुधारणा केल्या आहेत. दऱ्यांचे पर्वत बनविले असून पर्वतांच्या दऱ्या केल्या आहेत. जमिनीच्या जागीं पाणी व पाण्याच्या ठिकाणीं जमीन निर्माण केली. व सृष्टिदेवतेचे उपासक बनून आज सामान्य जनसमूहाच्या सुखसोयींत कल्पनातीत भर टाकली. अनेक प्रकारचीं द्रुतगामी वाहनें, अल्पावधींत हजारों मैल संदेश पोहोंचविणारीं साधनें, बसल्या ठिकाणाहून अनेक मैलांवरील यांत्रिक रचनेस चालना देण्याच्या युक्त्या वगैरे एक ना दोन, अनेक प्रकारचे शोध ३½ हात उंचीच्या मनुष्यानें लाविले आहेत. या अनंत शोधांपैकीं आज आपण विमानांचा थोडासा सामान्य विचार करूं.

पुष्कळ दिवसपर्यंत मनुष्यप्राण्यास पक्ष्यांच्या राहाणीचा हेवा वाटत असे. त्याला हवेंत उडतां येतें मला कां येऊं नये ? जमिनीवर चालणाऱ्या प्राण्यांस पाण्यांत पोहोण्याची युक्ति साधली, मग त्याला पक्ष्यांप्रमाणें हवेंतच कां जातां येऊं नये? कांहीं शोधकांनीं प्रथम पक्ष्यांप्रमाणें पंख लावून उडण्याचा प्रयत्न केला. त्या योगानें त्यांना जमीन सोडून थोडया उंचीवर जातां आलें, पण स्वतांचा तोल संभाळण्याचें सामर्थ्य नसल्यानें त्यांना परत असहाय स्थितींत जमिनीवर पडावें लागलें, व त्यापासून त्यांना इजाही झाली. विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः। प्रारब्धमुत्तमजना न परित्यजंति। या न्यायानें विघ्नें पुनः पुन्हा आलीं तरी अंगीकृत कार्य सोडावयाचें नाहीं, अशी मनुष्याची चिकाटी असल्यानें त्यानें याच दिशेनें उद्योग करण्यास सुरुवात केली. हैड्रोजन नांवाचा वायु हा हवेपेक्षां फार हलका आहे. तो मोठ्या एका पिशवींत भरून ठेवला तर ती पिशवी हवेंत आपोआप तरंगू लागेल, व ह्या गोष्टीचा विमानासारखा फायदा होईल, असें त्यानें ठरविलें. हळू हळू पूर्वीपेक्षां त्याला सहज

रीतीनें हवेंत तरंगतां येऊं लागलें. तरी अजून स्वेच्छेप्रमाणें वाटेल तिकडे जाणें त्याला शक्य झालें नाहीं. मोटार–इंजिनांच्या शोधानें त्यालां विमानांतून स्वतःच्या इच्छेप्रमाणें जाण्याचें साधन मिळालें.

विमानांचे एरोप्लेन व झेपलिन असे दोन मुख्य भाग करतां येतील. एरोप्लेनस् लहान असून त्यांच्या रचनेंत कोणत्याहि वायूचा उपयोग करीत नाहींत. झेपलिनमध्यें चिरुटाच्या आकाराच्या एका प्रचंड पिशवींत हवेहून हलका वायू भरलेला असतो, व त्यास मनुष्यांना बसण्यासाठीं मोठाल्या टोपल्या टांगलेल्या असतात. या विमानांतून प्रवासी व सामान यांची बऱ्याच मोठ्या प्रमाणावर ने आण करतां येते. या दोनही प्रकारच्या विमानांत मोटार-इंजनें ठेविलेलीं असूनें त्यांच्या योगानें विमानाला गति देणें अगर आपल्या इच्छेप्रमाणें त्यांना वाटेल त्या दिशेनें नेणें अगर वाटेल त्या उंचीवर त्यांना चालविणें शक्य होतें.

लहान विमानें आटोपशीर व हलकीं असल्यानें त्यांचा चालण्याचा वेग अतिशय मोठा असतो, व हलकें पोस्टासारखें सामान घेऊन जाण्यास त्यांचा उपयोग फार करितात, पण देशांतल्या देशांत जवळच्या अंतरावर प्रवासी व माल नेण्यास झेपलिनांचा जास्त उपयोग होतो. युरोपखंडांतील देश नेहमींच्या दळणवळणासाठीं विमानांचा उपयोग करून घेऊं लागले आहेत. युरोपांतील बहुतेक देश महत्त्वाच्या सरकारी पोस्टाची ने–आण विमान–मार्गें करूं लागले आहेत. विमानें चालविण्यास उत्तेजन यावें म्हणून अलीकडे इंग्लंडनें ‘ स्नेडर कप रेस ’ नांवाच्या विमानांच्या शर्यती दरसाल लावण्याचें ठरविलें आहे.

ॲलन कोबहॅम या सारखे धाडसी वैमानिक आज हजारों मैल प्रवास करून स्वदेशबांधवांच्या अंगांत वीरश्री उत्पन्न करीत आहेत. अशा रीतीनें जगाच्या यत्किंचित् मागें न पडण्याचा इंग्लंडचा जारीनें प्रयत्न

सुरू आहे. पुढील जानेवारीपासून इंग्लंड ते हिंदुस्तान यांच्या दरम्यान विमान मार्गें पोस्टाचें दळणवळण सुरू होईल.

हलक्या विमानांचा वेग दरताशीं १०० ते १५० मैलपर्यंत असतो, पण जड विमानें ६० ते ८० मैल फार तर १०० मैलपर्यंत जाऊं शकतात. जर्मनीनें अमेरिकेकरितां महायुद्धानंतर एक नवें मोठें विमान तयार केलें, व दरताशीं ६० मैल वेगानें कोठेंही मध्यंतरीं न थांबतां अटलांटिक महासागर ओलांडून न्यूयॉर्क येथें जाऊन पोहोंचलें.

अलीकडे एरोप्लेनमध्यें बसून वाटेंत कोठेंही न थांबतां सरळ किती अंतर जातां येईल या संबंधीं वैमानिकांचे प्रयत्न चालू आहेत. स्वीडन, डेन्मार्क, फ्रान्समधील वैमानिक या बाबतींत जास्त पुढाकार घेत आहेत. एका फ्रेंच वैमानिकानें फ्रान्स ते बगदादपर्यंत ३ हजार मैलांचें उड्डाण एका दमांत पुरें केलें. दुसऱ्या एका वैमानिकानें डेन्मार्क ते सैबेरियांतील ओम्स्कपर्यंत सुमारें ३ हजार मैलांचें अंतर अशाच रीतीनें न थांबतां ओलांडलें. यावरून ३ हजार मैल आजच्या वैमानिकांना कोठेंहि न थांबतां ओलांडतां येतील ही गोष्ट सिद्ध झाली आहे. ॲलन कोबहॅम या इंग्लिश वैमानिकानें लंडन ते केपटाऊन व लंडन ते ॲडिलेटपर्यंतचा जाण्यायेण्याचा प्रवास विमानमार्गें करून ब्रिटिश साम्राज्याचीं बंधनें जास्त दृढ केलीं, व पुढील दळणवळणाचा मार्ग आंखून टाकला.

आज आपणांस विमानें वरील वेगानें जातांना दिसतात, पण एक जर्मन विमानशास्त्रज्ञाचें असें म्हणणें आहे कीं, ज्या ठिकाणीं विरळ हवा आहे व जेथें वादळें होत नाहींत, व हवेचे प्रवाह फार वेगानें वाहतात, अशा जमिनीपासून ७ मैल उंचीच्या भागांवरून विमान चाल-वितां आल्यास आपल्यास तें दरताशीं २८० मैल वेगानें नेतां येऊन जर्मनी ते अमेरिका हा प्रवास फक्त १२ तासांत करतां येईल. पण हा दिवस येईल तेव्हां खरें.

महायुद्धापूर्वी विमानाच्या रचनेंत, वेगांत व यांत्रिक बाबतींत फारशी म्हणण्यासारखी सुधारणा झाली नव्हती, पण महायुद्धानें त्या बाबतींत भयंकर चालना दिली आहे. अलीकडे विमानें वरून चालतांना त्यांचा आवाज होऊं नये म्हणून त्याचा पंखा फिरतांना न वाजण्याची युक्ति एका शास्त्रज्ञानें काढली आहे. विमानें हवेंतून उडतांना पाण्यांत पडलीं तर तीं बुडूं नयेत म्हणून कांहींना खालीं लहान बोटी जोडण्यांत येतात. विमानें खालीं उतरतांना हिसका बसूं नये, म्हणून त्यांच्या चाकांना रबरी धांवा लावतात. विमानें उतरतांना पक्ष्यांसारखीं गिरक्या घेत घेत उतरतात. पण अलीकडे पवनचक्कीसारखें विमानांच्या डोक्यावर एक नवीन यंत्र जोडतात, त्यामुळें विमानें हवेंतून सरळ खालीं येऊं शकतात. याशिवाय विमान हवेंत खालीं वर जातांना जर कलंडलें, तर एकदम कोसळून जमिनीवर पडण्याचा फार संभव असतो. पण त्या बाबतींत शेपूट नसणाऱ्या एका प्राचीन पक्ष्याचा त्याला आकार देऊन ही आपत्ति टाळण्याचें नवीन साधन शास्त्रज्ञांनीं शोधून काढलें आहे. अशा रीतीनें जसजसा मनुष्याचा व्याप वाढत त्याच्या अडचणी दृष्टोत्पत्तीस येऊं लागल्या तसतसें शास्त्रज्ञांनीं एक एक अडचण दूर करण्याचे तोडगे सुचविण्यास सुरुवात केली आहे. आज विमानमार्ग हा कांहीं थोड्या लोकांच्या उपयोगाचा व कदाचित् फार धोक्याचा आहे. याशिवाय त्या मार्गानें जाणाराला बरेच पैसेहि खर्च करण्याचें सामर्थ्य लागतें, पण हळू हळू बिनतारी तारायंत्राच्या साहाय्यानें एका जागेवर बसून विमानांना ठरविक मार्गानें चालवितां येणें सुलभ झाल्यास विमान नेहमींच्या व्यवहारांतीलच एक अतिशय उपयोगाचें साधन होऊन बसेल यांत शंका नाहीं.

आपण विमानाचा जो उपयोग वर पाहिला त्यापेक्षाही बरेच जास्त उपयोग त्यापासून करून घेऊं लागले आहेत. या विमानाच्या साहा-

ज्यानें वैमानिकांना खालील प्रदेशाचे प्रत्यक्ष जसेच्या तसे फोटो घेतां येतात, व त्यामुळें भूगोल विषयाला दिवसेंदिवस उत्कृष्ट मदत होत जाणार आहे, व या शिवाय त्या त्या मार्गानें जाणाऱ्या वैमानिकांना आपला मार्ग शोधून काढण्यासही या फोटोंची मदत होणार आहे. शिवाय अमेझॉन नदीसारखे अज्ञात भाग, हिमालयोच्या दऱ्याखोऱ्यांतील कष्टसाध्य ठिकाणें या ठिकाणीं सहज जातां येऊन मनुष्याला अनेक अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शोधून काढतां येतील. याशिवाय विमानाच्या साह्यानें अलीकडे उत्तर ध्रुवबिंदूचाही बियर्ड व अमुंडसेन या द्वयानें निश्चित शोध लावला आहे. सारांश, विमानाच्या दळणवळणानें मनुष्याच्या सुखसोयींत भर पडली ही तर गोष्ट खरीच, पण त्याबरोबर कोणत्याही देशाला दुसऱ्या देशापासून पूर्वींच्या काळाप्रमाणें अलग राहतां येणार नाहीं. त्यानें सर्व जगाबरोबर सहकार्य करण्याची आपली तयारी केली पाहिजे, हें उघड आहे.

---

# सुशीला.

## एक अंकी नाटक.

### पात्रें.

सुशीला—एक अनाथ व मावशीच्या घरीं राहाणारी मुलगी.

तरलाबाई—सुशीलेची श्रीमंत मावशी.

चंचला ( माई )—मावशीची थोरली मुलगी.

चपला ( ताई )—मावशीची धाकटी मुलगी.

देवी.

विजय—देवीचा दूत.

अधिकारी—राणीचा नोकर.

सारजाबाई—मावशीची शेजारीण.

साकी

सुशील बाला सकलाला बहु आवडती या जगतीं ।
सौजन्यानें देवालाही प्रिय भारी त्या गमती ॥ १ ॥
संकट दुःखें जरी त्यावरी आलीं जगतीं भारी ।
देव तयाना साह्य करुनिया प्रेमें सर्व निवारी ॥ २ ॥

# सुशीला.

—:०:—

## प्रवेश १ ला.

( सुशीला घर झाडण्यास येते. )

सुशीलाः—दुपारचीं जेवणं झालीं. भांडीं कुंडीं झालीं. धुणं पाणी केलं. आतां एकदां घर झाडावं व मग संध्याळच्या सैंपाकाची तयारी करावी. आज संध्याकाळीं मावशी, ताई व माई कोठें बाहेर जावयाच्या आहेत. राजवाड्यांत आज मोठा समारंभ आहे असं कोणसं मघाशीं म्हणत होतं, तिकडेच बहुधा या जाणार असाव्या. पण आपणाला त्यांच्याशीं काय करावयाचं आहे ? सकाळापासून मध्यरात्रीपर्यंत मरमर काम करावं, पानावर पडेल तो तुकडा खावा, थोडीशी विश्रांति घ्यावी, सकाळ उजाडतांच पुन्हा कामाला लागावं, हाच आपला दररोजचा क्रम चाललाच आहे. अंसच माझं सारं आयुष्य जायचं ? काबाडकष्ट करण्याकरितांच माझा जन्म आहे. बरं एवढं काम करून सुखाचा एकादा शब्द तरी कुणी बोलतं का ? छे ! मुळींच नाहीं. मावशीला तर माझं काम मुळींच पसंत नाहीं. ढालगज, अजागळ, आळशी, दांडगी वगैरे शब्दांनीं ती माझी संभावना नेहमींच करीत असते. आमच्या माईला व ताईला वाटतं कीं, ही बरी मोलकरीण आपणांला सांपडली आहे. घ्या हिच्याकडून हवं तितकं काम करून. आधींच त्यांना श्रीमंतीचा ताठा आणि त्यांत आईची फूस ! मग काय विचारतां ! त्यांच्या तोंडाचा पट्टा सारखा सुरू असतो. मुकाट्यानं ऐकावं व गप्प बसावं या पलीकडे काय करावयाचं ? आपलं नशीबच वाईट. दुसऱ्याला बोलून काय फळ ? अग बाई ! या माई व ताई इकडेसच येत आहेत. आपण आपल्या कामाला लागावं हें बरं ( जाते. )

चंचला व चपला बोलत बोलत येतात.

**चपला:**—माई, तूं आज केव्हांची वेणीफणी करीत होतीस! आज तूं पोशाकही मोठा थाटामाटाचा केला आहेस!

**चंचला:**—ताई, तुलाही कांहीं कमी लागला नाहीं वेळ वेणीफणी करावयाला. तुझाही पोशाक मोठा छान आहे. चल, आई आपली वाट पाहात असेल. सुशीला आपल्याबरोबर येणार आहे काय?

**चपला:**—अग सुशीला बरोबर आली तर घरीं सैंपाक कोण करील? आणि तिला नेसायला चांगली साडी तरी कोठें आहे? राजवाड्यांत सगळ्या श्रीमंतांच्या मुली जमणार आहेत. तेथें तिला कशाला न्यायची? पण माई, आज राणीसाहेबांनीं हळदीकुंकवाला नगरांतल्या मुलींना कशाला बोलावलें तुला माहीत आहे का?

**चंचला:**—नाहीं, सांग पाहूं कशाला बोलाविलें आहे?

**चपला:**—अग, राणीसाहेबांच्या मनांत राजपुत्राचें लग्न करावयाचें आहे तेव्हां त्यांनीं नगरांतल्या श्रीमंतांच्या सर्व मुलींना बोलाविलें आहे. राणीसाहेबांना जी मुलगी पसंत पडेल तिच्याबरोबर राजपुत्राचें लग्न करावयाचें आहे.

**चंचला:**—असं का? तर मग ताईसाहेब, राणीसाहेब आपल्यालाच पसंत करणार. आहेच आमची ताई सुंदर! ताई, जरा तुझं नाक उंच असतें कीं नाहीं तर तूं भारीच सुंदर दिसली असतीस. पण नाशीक गेलं त्रिंबकाला भेटायला. त्यानें जरा घाण झाली आहे.

**चपला:**—बरं बरं, असूं दे माझं नाक नकटं. माझं नाक नकटं असलं, माझा चेहरा थबकट असला, तर तुझं कांहीं जात नाहींना? (स्वर पालटून) आमची माई खरंच भारी सुंदर आहे हो! जरा ती गोरी असती तर मग राजपुत्रानें तिलाच वरलं असतं. आणि आमच्या माईसाहेब आमच्या नगरीच्या राणीसाहेब झाल्या असत्या.

चंचलाः—असूं दे मी काळी. मी कोळशांतलं माणीक असलें तर तुझं तर त्यांत कांहीं जात नाहींना ? तूं आहेस मोठी रंभा. तुला राजपुत्र खात्रीनें माळ घालील.

चपलाः—माई तूं माझ्याशीं बोलूं नकोस. तूं असलं नेहमींच भांडण उकरून काढतेस.

चंचलाः—नाहीं तर नाहीं. माझं तरी काय अडलं आहे तुझ्याशीं बोलायला ? ( दोघी दोहींकडे तोंडें करून उभ्या राहातात. )

पडद्यांत शब्द होतो. (ए चपले, अग ए चंचले, तुमची तयारी झाली ना ? चला. मी केव्हांची वाट पहात आहें. तुम्ही येतां कीं नाहीं ? )

चपलाः—आई, ही पहा मी आलें, माझी अगदीं तयारी आहे.

चंचलाः—आई, मी केव्हांपासून तुझी वाट पाहात उभी आहें.

( जातात. )

## प्रवेश २ रा.

( सुशीला तांदूळ निवडीत आहे. )

सुशीलाः—तांदूळ निवडले. स्वयंपाकाची तयारी झाली. आतां चुलीला पेटवण लावावं व स्वयंपाकाला सुरुवात करावी. सर्व काम आटोपतां आटोपतां मला मध्यरात्र होईल. सर्व मंडळी निजल्यावर एवढ्या मोठ्या घरांत मला एकटीला काम करीत बसावं लागतं ( गडबड ऐकते व बाहेर पाहाते ) आज मुलींच्या व बायकांच्या झुंडीच्या झुंडी राजवाड्याकडे चालल्या आहेत. राजवाड्यांत हळदी कुंकवाचा मोठा समारंभ आहे वाटतें. समारंभ मोठा मौजेचा होईल. मीं राजवाडा पाहिला नाहीं. मावशी मला मौज पाहावयास नेईल काय ? काम तर बहुतेक झालें आहे. स्वयंपाक मी आल्यावर तेव्हांच करीन, विचारूं तर खरं मावशीला.

मावशी, चंचला व चपला पोषाक करून येतात.

**मावशी:**—सुशीले, स्वस्थ बसली आहेस ना? काय करावं या पोरीला. बोलणाराचें तोंड दिसतें, पण करणाराची कृति कांहीं दिसत नाहीं. बरं आम्ही हळदी कुंकवाला जातों. तूं स्वयंपाक आटोपून सर्व तयारी करून ठेव.

**चंचला:**—सुशीले, स्वयंपाक जरा चांगला कर. तुझ्या स्वयंपाकाला चवच लागत नाहीं. आज भजीं कर ह्मणजे मला दोन घास जातील. मला अलीकडे भूकच लागत नाहीं.

**चपला:**—( एकीकडे ) कशाला भूक लागेल? साऱ्या दिवसभर शेळीसारखी चरत असते. लाडू खा, पोहे खा, पेरू खा, दूध पी असं सारखं हिचें चाललेलं असतं. मग भूक लागणार कशी? पोट आहे का परगणा. ( मोठ्यानें ) सुशीले, चांगलीं खमंग भजीं कर हं म्हणजे आमच्या माईला दोन घास जातील. ( हळूच ) सुशीले, माझं अंथरूण मात्र घालून ठेव हो म्हणजे मी आपली जेवलें कीं निजेन. खोली स्वच्छ झाडून अंथरूण घाल. तूं काल कसंतरी अंथरूण घातलंस, मग मला साऱ्या रात्र झोपं आली नाहीं; अगदीं डोळ्याला डोळा लागला नाहीं.

**चंचला:**—( एकीकडे ) खरंच बाई, ताईचा डोळ्याला डोळा लागला नाहीं. मात्र साऱ्या रात्र कुंभकर्णासारखी घुर घुर घुर घुर घोरत होती.

**सुशीला:**—मावशी, मी येऊं का हळदी कुंकवाला तुमच्या बरोबर? मीं बहुतेक काम आटोपलें आहे, घरीं परत आल्याबरोबर स्वयंपाक करीन.

**मावशी:**—मोठी लाडकीच आली आहेस कीं नाहीं? करायचं

काय तुला तेथें येऊन ? नसता उद्योग भारी तुला. जा आपलं काम कर मुकाट्यानं.

( सुशीला रडकुंडीस येते. )

रडायला काय झालं तुला? तुला का कोणी मारलं? कां तुला कोणी बोललं? माझ्या भरल्या घरांत तिनीसांजचे वेळीं तुला रडायला काय झालं?

( शेजारच्या सारजाबाई येतात. )

**सारजाबाईः**—चलतांना हो हळदीकुंकवाला? चला, आपणांला उशीर झाला, सुशीला कां रडते आहे? तिला नाहीं का हळदीकुंकवाला यायचं?

**मावशीः**—तुम्हांला काय सांगूं बाई? या सुशीलेनें माझा जीव अगदीं रडकुंडीस आणला आहे. मी मघांपासून सांगतें आहें. ' सुशीले, लवकर आटप. आपणांला हळदीकुंकवाला जायचं आहे. पण अशी ही हट्टी व आळशीं मुलगी आहे. खुशाल आपली निजून राहिली व आतां म्हणते मी नाहीं येत समारंभाला. बरं, जर हिला न न्यावी तर लोक म्हणतील, पहा, आपल्या मुलींना तेवढी घेऊन आली, पण भाचीला घरीं ठेविली. इकडे आड व तिकडे विहीर असं मला झालं आहे.

**सारजाबाईः**—जाऊं द्या हो तिला. तिच्या काय लागतां नादीं. आतां वेळ मुळींच राहिला नाहीं. चला लवकर जाऊं.

**मावशीः**—चला तर, सुशीले, पुरे झालं तुझं रडं. दार लावून घे. ( जातात—सुशीला दार लावून घेते. )

**सुशीलाः**—( अश्रु पुसून ) या घरांत आल्यापासून मला सुखाचा एकही दिवस माहीत नाहीं. वाटेल त्यानें मला बोलावं व माझ्याकडून काम करून घ्यावं. जनावराशीं देखील त्याचा मालक गोड बोलतो, त्याची काळजी घेतो, प्रेमानें त्याला गाणीं गातो. पण मी जनावरापे-

क्षांहि कमी किंमतीची झालेली आहे! देवा, तूं माझे किती दिवस असे हाल करणार? तुला माझी कांहींच का दया येत नाहीं? तूं भक्तासाठीं नेहमीं धांवतोस. त्यांच्यावरील संकट नाहींसें करतोस. द्रौपदीसाठीं तूं कसा धावून जात होतात? मला कनई तो द्रौपदीचा धावा भारी आवडतो.—(गाते).

धावा.

रात्र झाली दोन प्रहर ऋषि आले भोजना

रुक्मिणीचा धावा देखील फार गोड आहे. तिच्या भावानें तिच्या इच्छेविरुद्ध तिचें लग्न शिशुपालाशीं ठरविलें. तेव्हां निराश होऊन ती म्हणते, देवा,

( ' यादवराया याहो याहो ' या चालीवर )

किती आळवूं परोपरीनें कंठ कि हो सुकला
तरी यावया देवा तुम्ही अझुनी का चुकला
सर्वसाक्षि भगवंता आतां अंत नका पाहूं
कीं विषपानें प्राण तरी हा पदकमलीं वाहूं
मीच अभागी म्हणुनी आपण अझुनी नच आलां
पहा सगुण जें दुर्लभ सकलां मिळे कसें मजला
रडतां यापरि अश्रुजलानें पदर भिजुनि जाई
ऊर भरुनि ये शब्द न चाले कवन विरुनि जाई

देवा, तूं रुक्मिणीला पावलास, द्रौपदीकरितां धावलास, गजेंद्राला पावलास. मग तूं मला पावणार नाहींस का? देवा, तूं मजकरितां धावणार नाहींस का? तुला माझी हांक ऐकूं येत नाहीं का? देवा, तूं मला पावशील का?

( देवी प्रकट होते. )

देवी ( सुशीलेच्या डोक्यावर हात ठेवून ):—अवश्य पावेल. परमेश्वर

सज्जनांना नेहमींच साह्य करतो. सुशीले, ऊठ, डोळे पूस व मी काय म्हणतें तें ऐक.

( सुशीला आश्चर्यचकित उभी राहाते. )

सुशीलाः--आपण कोण आहांत? आपणांला मी नमस्कार करितें.

देवीः--मुली, तुझें कल्याण होईल. मी या नगरची देवी आहें. तुझें सदाचरण वे तुझा सुस्वभाव पाहून मी तुझ्यावर प्रसन्न झालें आहें. माझ्या आशीर्वादानें तुला कांहीं कमी पडणार नाहीं. आतां ऐक. पलीकडे दिवाणखान्यांत तुझ्याकरितां मीं सुंदर पोषाक ठेविला आहे. तो तूं घाल. मी तुला पायांत घालण्याकरितां सुंदर जोडा ठेविला आहे. तो तूं घाल. तो कोठें विसरूं नकोस. तो तुझ्याशिवाय कोणाचेही पायास येणार नाहीं. दरवाजाचे बाहेर तुजकरितां गाडी उभी आहे. गाडीवरील नोकर तुझेच आहेत. ते तुला राजवाड्यांत नेतील. तुला कोणीही ओळखणार नाहीं. तुझा आवाज गोड आहे. माझ्या आशीर्वादानें तुझा आवाज सगळ्यांना मोहून टाकील. सुशीले, एक गोष्ट लक्षांत ठेव. पांच घटिका रात्र झाली कीं राजवाड्यांत नगारा वाजतो. नगाऱ्याचा आवाज ऐकला कीं तूं ताबडतोब घरीं ये. तेथें बिलकूल थांबूं नकोस. नाहींतर तुझे गडी, तुझी गाडी वगैरे सर्व कांहीं नाहींसें होईल व तुला तेव्हांच सर्व लोक ओळखतील. घरची बिलकुल काळजी करूं नको. तुझीं सर्व कामें एथें आपोआप होतील. मावशी येण्याच्या आंत एथें परत ये. भिऊं नकोस; जा, तुझ्या भाग्याचे दिवस जवळ आले आहेत.

सुशीलाः--भगवति, मी आपणांला पुनः पुन्हा नमस्कार करितें. आपली कृपा असल्यावर मला काय कमी आहे? ( जाते. )

देवी--( सुशीलेकडे पाहात आपणांशींच बोलते. )

किती गुणी मुलगी आहे, किती दयाळू व सुशील आहे. या घरां-

तील माणसें तिजवर प्रेम करीत नाहींत, तरी ती सर्वांवर प्रेम करते. जनावरांची काळजी घेते. त्यांना ती कधीं विसरत नाहीं. सर्व दिवसभर मुकाट्यानें काम करीत असते. तिला आळस अगदीं नाहीं. आपण प्रथम श्रीमंत होतों, आतां आपणाला गरिबी आली या विचारानें ती दुःखी होऊन स्वस्थ बसत नाहीं. मुली, तुझ्या दुःखाचे दिवस संपले. आतांपासून तुझ्या भाग्याचा उदय होईल. आतां इच्या जाण्याची तयारी केली पाहिजे. ( टाळी वाजविते. विजय नांवाचा एक देवीचा गण एकदम तेथें येतो. ) विजया, एक सुंदर रथ तयार कर. त्याला पांढरे स्वच्छ घोडे जोड. रथ हाकण्याकरतां एकादा चांगला सारथी आण. रथावर व रथाच्या मागें उभे राहून जाण्याकरितां सुंदर पोशाक केलेले चार नोकर आण.

**विजयः**—आपल्या आज्ञेप्रमाणें तयारी ठेवतों. ( विजय जातो. )

**देवीः**—झाली, सुशीलेची ही तयारी झाली. या नव्या पोषाकांत तिला कोणीही ओळखणार नाहीं, प्रत्यक्ष तिची मावशीही तिला ओळखणार नाहीं. वा ! हा पोषाक तिला किती छान दिसत आहे. सुशीले, गर्दी करूं नकोस. अजून अवकाश आहे. तुझी गाडी तुला सहज घेऊन जाईल. (सुशीला येते व देवीला नमस्कार करिते. ) जा, मुली, जा. तुझें कल्याण असो. घरची काळजी करूं नकोस. नगारा वाजल्याबरोबर घरीं ये; विसरूं नकोस. ( जातात. )

## प्रवेश ३ रा.

### स्थळ—राजवाड्यांतील बाग.

चंचला व चपला बोलत येतात.

**चंचलाः**—ताई, आज राजवाड्यांतील दिवाणखान्यांत काय गर्दी झाली आहे पाहिलीस ना ? नगरांतील श्रीमंतांच्या मुली कसा झोकदार पोशाक करून आल्या आहेत. मला आपल्या साडीचा मोठा डौल

होता. पण चपले, आज सगळ्या मुलींच्या साड्या बघ कशा एकापेक्षां एक सरस आहेत. पण सगळ्यांच्या मागून घाईघाईनें एकटीच आलेली मुलगी पाहिलीस ना? सर्व मुलींपेक्षां तिचा पोशाक फारच सुंदर आहे. ही मुलगी तुझ्या ओळखीची आहे काय?

चपलाः—छेग माई, माझ्या नाहीं ती ओळखीची. राणी साहेबांनीं तिचा कितीतरी सत्कार केला. आपण एथल्या श्रीमंतांच्या मुली आणि दिसण्यांत देखील सुंदर नाहीं काग माई? पण आपणांला 'या जा' असं देखील इथें कोणी म्हटलें नाहीं. अन् या नव्या मुलीचं काय स्वागत चाललें होतें. अस्सा मला राग आला कीं बोलतां सोय नाहीं!

चंचलाः—आणि राणीसाहेबांनीं, आज मुलींवर प्रश्नांचा भडिमार चालविला आहे. ज्या त्या मुलीला विचारतात कीं तूं श्रीमंताची सून झालीस तर काय करशील? मला त्यांनीं प्रश्न विचारल्याबरोबर मीं सांगितलें कीं, मी पुष्कळ नोकर माणसें ठेवीन. मी पालखींत बसून मिरवीन. मी हत्तीवर बसून मिरवीन. मी भरजरी साड्या नेसेन. सगळ्यांचे डोळे मी आपल्या पोषाकानें दिपवून टाकीन. ताई, मी चांगलं नाहीं का उत्तर दिलें? पण तें राणीसाहेबांना आवडलें नाहीं.

चपलाः—माई, मीं देखील हेंच उत्तर दिलें. तें ऐकून राणीसाहेब माझ्याशीं न बोलतां दुसऱ्याच मुलींशीं बोलूं लागल्या. आपल्या या नवीन आलेल्या पाहुण्या मुलीनें काय उत्तर दिलें तें तूं ऐकलेंस का?

चंचलाः—नाहीं बाई. काय म्हणाली ती?

चपलाः—ती म्हणाली, 'मी सासू सासऱ्यांची आनंदानें सेवा करीन. घरच्या कामकाजांत आनंदानें मदत करीन. मी आपल्या पैशाचा उपयोग गरीबगुरिबाला सुखी करण्यांत करीन.'

चंचलाः—अहाहा! काय उत्तर दिलं पण! काम करायचं तर श्रीमंत व्हावं कशाला? भिकारी व्हावं आणि मग मर मर काम करावं.

पण चपले, त्या नवीन मुलीनं सतार वाजविली ती ऐकून तर मी अगदीं वेडी झालें. तिचीं बोटें सतारीवर कशीं एकसारखीं धावत होतीं. सतार वाजत असतांना सगळ्या मुली चित्रासारख्या उभ्या होत्या !

**चपलाः**—राणीसाहेब, प्रत्येक मुलीला तुला गातां येतें का असें विचारूं लागल्या. तेव्हां बऱ्याच मुली तेथून हळूच निसटल्या व बागेंत आल्या. मीही त्यांचे मागोमाग इकडे आलें.

**चंचलाः**—आणि मीही तशीच निसटलें. अग तुला माहीत आहेच माझा आवाज किती गोड आहे तो. मी गाऊं लागलें कीं माझा घोगरा आवाज ऐकून मुली हसूं लागतात.

**चपलाः**—आणि माझा आवाज ऐकून मंडळीला वाटतें कीं, ही भांडतच आहे. माई आपल्याला गाणं मुळींच येत नाहीं. बाबांनीं आपणांला गाणं शिकवायला गवई ठेवला होता तो तोंडें कशीं वेडींवांकडीं करीत असे तें तुला आठवतेंना ? सारावेळ सारेग सारेग करायचा, त्याच्या त्या सारेगचा मला किनई कंटाळा आला. ( पडद्यांतून गाण्याचा आवाज ऐकूं येतो. ) माई ऐकलंस का ? कोणीतरी मुलगी दिवाणखान्यांत गात आहे. ( दोघी ऐकतात. )

( रागिणी झिंझोटी, ताल दादरा )

पद.

ठुमक चाले रामचंद्र पायिं वाजती पैंजणियां ।
किंकाळुनि पळत सुटत लटपटुनी भूमि पडत ।
धांवे माय अंकिं घेत दशरथ भामिनिया ॥ १ ॥
झाडुनि निजपदरें बालअंग गोजियरें
तुजवरि ओंवाळुं प्राण बाळा मम गुणियारे ॥ २ ॥
विद्रुमपरि अधर लाल बोलत बोबडिये बोल
सरल नासिका सुभाल लटकत रविमणिया ॥ ३ ॥

कृष्णदास वर्णिल किती रूपरंग पटचित्रीं
रघुवरसम सुंदर छबि रघुवरचि जाणें या ॥ ४ ॥

( गाणं थांबतें. )

चंचलाः—चपले, ऐकलंसना किती गोड गळा आहे? ही ती नवीन आलेली मुलगीच गात आहे. चपले, आपण गाणं शिकलों नाहीं ही वाईट गोष्ट झाली. रात्र बरीच झाली नाहीं का! नगारा ऐकूं येतो. हा पहा पांच घटका रात्र झाल्याचा नगारा ऐकूं येत आहे. मुली आंत चालल्या आहेत. आतां घरीं जाण्याची वेळ झाली. आई आपणांला शोधीत असेल. चल लवकर.

( दोघी जातात. )

## प्रवेश ४ था.

( सुशीला स्वयंपाकघरांत आहे. )

सुशीलाः—वाहवा! वाहवा। आज काय मजा झाली! मी मोठ्या थाटामाटानें राजवाड्यांत गेलें. मला कोणी ओळखील कीं काय ही थोडीशी भीति वाटत होती, पण मला कुणीही ओळखिलें नाहीं. माझा पोशाख पाहून मंडळी दिपून गेली, राणीसाहेबांनीं माझा मोठा सत्कार केला. मला कितीतरी त्यांनीं प्रश्न विचारले. त्यांचीं उत्तरेंही मीं दिलीं. तीं ऐकून त्यांना समाधान वाटलें. माझें गाणें व सतार हींही त्यांना फार आवडलीं. मी त्या समारंभांत अगदीं गढून गेलें इतक्यांत ९ घटकांचा नगारा वाजावयाला सुरुवात झाली. तो आवाज ऐकतांच माझी इतकी धांदल झाली कीं बोलता सोय नाहीं. मी दिवाणखाण्यांतून पळतच बाहेर आलें. त्या धांदलींत माझा जोडाही पडला. गाडींत बसून एथें आलें. तों काय गाडी नाहींशी झाली! नोकर लोक नाहींसे झाले! आमचा सुंदर पोषाखही गेला, सुशीला आपली स्वयंपाक घरांत!

एक जोडा मात्र मजजवळ राहिला. हा मी आतां लपवून ठेवितें. चला आतां कामाला लागावं. पण हें काय ! स्वयंपाक शिजून अगदीं तयार आहे. हें काय ! हीं तर खमंग भजीं. माईसाहेब, खा आतां यथेच्छ भजीं. अरे वा ! हीं अंथरुणेंही तयार आहेत. ताईसाहेब, आतां स्वस्थ १२ तास निजा. ही सर्व त्या देवीची कृपा. भगवति, मी आपणांला पुनः पुन्हा नमस्कार करितें. आपली मजवर फार कृपा आहे. (ऐकून) ही पहा मावशी परत आली.

( मावशी, चंचला व चपला येतात. )

**मावशी**:—सुशीले, स्वयंपाक तयार आहेना ? मुलींना फार भूक लागली आहे.

**सुशीला**:—होय. मावशी, पानें मांडू का ?

**मावशी**:—होय, मांड पाहूं. ( सुशीला पानें मांडते. )

**चंचला**:—सुशीले, आज हळदी कुंकुवाचा काय थाट होता म्हणून सांगूं ? राणीसाहेबांनीं आमचं फार स्वागत केलं.

**चपला**:—माईशीं व माझ्याशीं त्या किती तरी वेळ बोलत होत्या. माईनें आज किती तरी सुंदर गाणं म्हटलं. तें सगळ्यांना फार आवडलें.

**चंचला**:—आणि ताईनं सतार काय चांगली वाजवली. ती ऐकून सर्व मंडळी खूष झाली.

**चपला**:—माझी व माईची साडी पाहून मुलींना फार आश्चर्य वाटलें. सगळ्यांना या आमच्या साड्या फार आवडल्या.

**मावशी**:—खरंच, मला जें तें म्हणत होतें कीं, तरलाबाई, तुमची ही चंचला व चपला भारीच सुरेख आहेत. आज निजतांना मी त्यांची दृष्ट काढणार आहें. सुशीले, मीठ मोहऱ्या काढून ठेव वर; नाहींतर विसरशील. चल, पानें वाढ आतां. जेवावयाला बसूं. ( जातात. )

## प्रवेश ५ वा.

राजाचा एक अधिकारी येतो.

अधिकारी:—आज एक आठवडा झाला. एकसारखा गांवांत हिंडत आहें! आज आठ दिवस झाले. आमच्या राणीसाहेबांनीं नगरांतील मुलींना हळदी कुंकवाला बोलाविलें. हेतु हा कीं, चांगली मुलगी पाहून तिला आपली सून करावी. जमलेल्या मुलींत एक नवखी मुलगी आली होती. तिचें स्वरूप, तिची वागणूक, तिची बुद्धि, तिचें गायन व वादन ऐकून राणीसाहेब खूष झाल्या व ती मुलगी राजपुत्राला करण्याचें त्यांनीं व राजेसाहेबांनीं ठरविलें. सगळें ठरलें, पण मुलगी कोण, कोणाची, कोठून आली व कोठें गेली याचा मुळींच पत्ता नाहीं; नाहीं म्हणायाला ती आपला एक जोडा मात्र विसरून गेली होती, राणी साहेबांनीं मला आमंत्रण धाडलें आणि काय म्हणतात, 'हंबीरराव, हा जोडा घ्या. आणि हा जोडा ज्या मुलीच्या पायाला बरोबर बसेल तिला राजवाड्यांत घेऊन या. तिच्याशीं राजपुत्राचें लग्न करावयाचें आहे.' मी मनांत म्हटलें, 'वा! छान! हा जोडा एकाद्या काळ्या, नकट्या, मूर्ख, व हट्टी मुलीच्या पायाला आला म्हणजे मोठी गंमतच होईल. आपल्याला काय, आपण हुकुमाचे चाकर, घातला जोडा काखोटीला, चाललों घरें धुंडाळीत. गांवांत बातमी तेव्हांच पसरली. प्रत्येक घरच्या मुली माझी वाट पाहूं लागल्या. जी ती म्हणे हा माझाच जोडा. पण हा जोडा कसला लबाड! तो कोणाच्याच पायाला होईना. कोणाला होतो सैल तर कोणाला होतो घट्ट. घरें फिरतां फिरतां अगदीं थकून गेलों. आतां हें एवढेंच घर राहिलें आहे. हें पाहावें आणि राजवाड्यांत परत जावें. अहो, घरांत कोण आहे?

चंचला:—कोण आहे दारीं?

हंबीरराव:—मी हंबीरराव आहें. या घरांत कोणी मुली आहेत

काय ? राणीसाहेबांनीं हा जोडा त्यांच्या पायाला येतो कीं काय हें पाहाण्यास मला धाडलें आहे.

मावशी, चंचला व चपला येतात.

**मावशी:**—अहो, हा माझ्याच मुलीचा जोडा आहे. चंचले, घाल पाहूं जोडा पायांत.

( जोडा पायांत घालते तो पायाला होत नाहीं. )

**हंबीरराव:**—छे ! हा नाहीं या मुलीचा जोडा.

**मावशी:**—अहो होईल हो तिच्या पायाला. अग चंचले, नीट घाल पाहूं. तुझी घांदलच मारी. अग तुझा जोडा तुझ्या पायाला कसा नाहीं होणार ?

( चंचला जोडा घालते पण तो तिच्या पायाला होत नाहीं. )

**मावशी:**—अहो, हा जोडा माझ्या दुसऱ्या मुलीचा आहे बरं का ? चपले, तूं घाल पाहूं हा जोडा; हळूच घाल. घांदल अगदीं करूं नको हं.

( चपला जोडा घालते पण तो तिच्याही पायाला होत नाहीं. )

**हंबीरराव:**—जाऊंद्या हो. तो तुमच्या मुलींच्या पायाला होत नाहीं. आणखी कोणी मुलगी तुमच्या घरांत नाहीं ना ?

**मावशी:**—आणखी एकदां माझ्या मुलीला पायांत घालून पाहूं द्या हो.

**हंबीरराव:**—छेहो. तो का बळेंदळें पायांत बसणार आहे ? आणखी कोणी मुलगी तुमच्या घरीं नाहीं ना ?

**मावशी:**—कोणी नाहीं.

हंबीररावाच्या नजरेस सुशीला पडते.

**हंबीरराव:**—अहो, ही कोण मुलगी दिसते ? ये मुली, हा जोडा तुझ्या पायाला होतो का पाहूं ?

मावशीः—अहो, तिला कशाला सांगतां ? तिचा कसला आला आहे तो जोडा ? ही मुलगी त्या दिवशीं घरीं स्वयंपाक करीत बसली होती, ती कशाला येते तुमच्या राजवाड्यांत ? तुम्ही आपले चालते व्हा. नसत्या भानगडी तुम्हांला हव्यात कशाला ?

हंबीररावः—तसें नाहीं बाई. मला हुकूम आहे कीं नगरांतील प्रत्येक मुलगी पहा व जिच्या पायाला जोडा येईल तिला राजवाड्यांत आणा. ( सुशीलेस ) ये मुली, हा जोडा पायांत घालून पाहा

( सुशीला पुढें येते. पायांत जोडा घालते तों तिच्या पायाला अगदीं बरोबर बसतो. ती आपल्या जवळील दुसरा जोडा आणते. तें पाहून सर्वजण आश्चर्यचकित होतात. )

हंबीररावः—हीच ती मुलगी. राणीसाहेबांनीं वर्णन केलेली हीच ती मुलगी. मुली, तुझें नशीब उघडलें, तूं आमच्या युवराजांची पत्नी होणार. आमच्या छोट्या राणीसाहेब, तुम्हांला मी नमस्कार करितों, आतां मी जातों. लवकरच राजवाड्यांतून तुम्हांला नेण्याकरितां पालखी व नोकर चाकर येतील. मी राणीसाहेबांना व राजेसाहेबांना ही आनंदाची बातमी देण्याकरितां राजवाड्यांत जातों. बाईसाहेब, आमच्या छोट्या राणीसाहेब, मी तुम्हांला पुन्हा नमस्कार करितों ( जातो )

मावशीः—सुशीले, ही काय भानगड आहे ? तूं त्या दिवशीं राजवाड्यांत गेली होतीस काय ?

सुशीलाः—होय मावशी.

मावशीः—मग मोठ्या थाटामाटानें आलेली व जिच्याशीं राणीसाहेब फार वेळ बोलत होत्या ती तूंच काय ?

सुशीलाः—होय मावशी.

मावशी—मग तूंच सुंदर गाणें म्हटलेंस व सतार वाजविलीस ?

सुशीला:—होय मावशी.

मावशी:—आणि ९ घटिकांचा नगारा होतांच पळत पळत गेलीस ती तूंच का?

सुशीला:—होय मावशी.

चंचला व चपला:—अग आई, ती नवी आलेली मुलगी आपली सुशीलाच होय! आम्हीं आतां अगदीं बरोबर ओळखलें.

मावशी:—सुशीले, ही काय भानगड आहे, ही मला मुळींच कळत नाहीं. तूं इतकी श्रीमंत एकदम कशी झालीस? तुला बहुमोल पोशाक कोणीं दिला? तूं नोकरचाकर, गाडीघोडा कोठून आणला? तूं तर आतां आमची छोटी राणी होणार?

( देवी प्रकट होते. )

देवी:—होय. सुशीला या नगरीची मालकीण होणार यांत शंका नाहीं. मींच तिला सर्व कांहीं दिलं. ती तशीच सुशील आहे. परमेश्वर-कृपेनें तिचे सुखाचे दिवस जवळ आले आहेत.

( मावशी, चपला, चंचला व सुशीला देवीला नमस्कार करितात. )

मावशी:—सुशीले, तुझं कल्याण होत आहे हें पाहून मला भारी आनंद वाटत आहे. मीं तुला त्रास दिला त्याची क्षमा कर व आम्हांवर प्रेम ठेव.

चंचला:—सुशीलाताई, मी व चपला तुला कधीं कधीं टाकून बोललों त्याची क्षमा कर. आमच्यावर पूर्वीप्रमाणें प्रेम ठेव.

सुशीला:—मावशी, ताई व माई, देवीच्या कृपेनें मला चांगले दिवस येत आहेत. मला मोठं वैभव जरी आलं तरी मला तुमचा विसर अगदीं होणार नाहीं. माझं प्रेम तुमच्यावर कायम राहील.

देवीः—सुशीले, तुझ्यावर माझी कृपा सदैव राहील. आणखी तुझें मी कोणतें प्रिय करूं सांग बरें.

सुशीलाः—भगवति, आपण वर देतच आहांत तर एवढेंच मागतें.

( झंपा—मुला सांग नृपतीस संदेश माझा—या चालीवर )

नियतकालीं जला वर्षुनी मेघमाला ।
सजल सफला करूं आर्यभूला ॥
आधि व्याधी जना तापवो ना कदा ।
ज्ञानप्राप्ती सदा आवडो ती मना ॥
ईशपादीं करूं विनति बाला आम्ही ।
दीर्घ आयुस दे भूपतीला ॥ नियत ॥

देवीः—तथास्तु—( जाते. )

सुशीलाः—मावशी, आपणांला ईश्वरानें जो हा सुदिन दाखविला त्याजबद्दल भक्तिभावानें त्याची स्तुति करूं या. सर्व जणी हात जोडून गातात.

## पद.

( धनराशी मूढा हातीं, या चालीवर. )

जगदीशा ध्याऊं, कीर्तिस गाऊं
चरणा स्मरूं, हृदयीं धरूं ॥धृ॥
निर्गुण निरुपम तरिही वसतो,
अखिल जनाच्या हृदयीं प्रभु तो
निजभाव बळें गवसे तो
सुगम गमतो
सदय प्रभु तो
प्रणती करू। चरणा स्मरूं ॥ जगदीशा

# अनपेक्षित आरोग्य व संपत्ति यांचा पुरवठा.

गेल्या महायुद्धांत शत्रुसंघांतील राष्ट्रांचा सपशेल पराभव झाल्यावर निरनिराळ्या शत्रुराष्ट्रांशीं जे तह झाले, त्या तहान्वयें आस्ट्रियन साम्राज्याचे घटक सुटे झाले. आस्ट्रिया हें सुटें व छोटें राष्ट्र बनलें, हंगेरी हेंही एक लहान, कमकुवत व निर्धन राष्ट्र बनलें, व दोघांतील कांहीं संपन्न व उद्योगी प्रांतांचें एकीकरण करून 'झेकोस्लोव्हाकिआ' हें एक नवीन स्वतंत्र राष्ट्र उत्पन्न झालें. हंगेरी हा देश शेतकीविषयीं प्रसिद्ध आहे. या देशांत खनिज द्रव्यें फार सांपडत नाहींत. या देशाचे मध्यभागीं राकेल तेलाचा शोध लागेल अशा समजुतीनें सरकारी कमिशनाच्या ठरावानें एक नलिकाकूप (विहीर) खणण्याचा प्रयत्न झाला. एक हजार फूट खोलीपर्यंत खणून झाल्यावर, त्याठिकाणीं कांहीं तरी निराळा व मौल्यवान पदार्थ सांपडेल अशीं चिन्हें दिसूं लागल्यामुळें ती विहीर आधिक खोदावी असा मोह उत्पन्न झाला. सुमारें ३६०० फूट खोदल्यावर, भूगर्भांतून जोरानें पाण्याचा फवारा उडाला, व तो इतका जोराचा होता कीं, भूपृष्ठावर २५ फूटपर्यंत हवेंत त्यानें उडी मारली! हें पाणी फुकट जाऊं नये म्हणून नलिकाकूपासभोंवतीं ३५० फूट लांब व १२५ फूट रुंद असा एक मध्य हौद बांधण्यांत आला.

कूपनलिकेनें उडणाऱ्या पाण्यामध्यें कांहीं मूल्यवान् रासायनिक द्रव्यें—विशेषतः नायट्रोजन व आयोडिन वगैरे—आहेत असें त्याची तपासणी केल्यावर समजलें. पैकीं आयोडिनचा उपयोग बहुधा शरिराचा दुखावलेला भाग बरा करण्याकडे होतो, हें पुष्कळांना माहीत आहेच. अशा तऱ्हेनें भूगर्भांतून पुष्कळ उंचीपर्यंत हा औषधी पदार्थ उडत्या वेत धावत यावा हें दृश्य स्वप्नसृष्टींतील अगर एखाद्या अप्सरेच्या चटकदार गोष्टींतील कल्पित वस्तुप्रमाणें खोटें असावें, असा भास होतो.

रासायनिक पदार्थांनीं मिश्रित असें हें पाणी थंडीमुळें थिजत नाहीं, व याच्या उपयोगानें संधिवाताचे हजारों रोगी आश्चर्यकारक रीतीनें निरोगी झाले आहेत. ही कूपनलिका खणण्याचें काम एकंदर २१७ दिवस चाललें, व तें खणीत असतां २५० प्रकारचे मातीचे थर व ७ प्रकारचे दगडाचे थर

आढळले सुमारें २००० फुटांवर एका मेलेल्या प्राण्याच्या शरिराचे कांहीं शेष भाग म्हणजे हाडें सांपडलीं. हंगेरीचें सरकार ती विहीर जास्त खणून सृष्टिदेवतेकडून आणखी किती चमत्कारिक देणग्या मिळतात, तें पहाण्याच्या विचारांत आहे.

सदरहु नलिकाकूपांतील पाण्यापासून आयोडिन हा पदार्थ काढण्यांत येतो. सुमारें १२५ डबे पाणी या झऱ्यांतून रोज बाहेर पडतें, व त्यापासून ४० पौंड आयोडिन तयार होतें. आयोडिन हा पदार्थ विषारी असून औषध म्हणून तो वापरतात. अशा तऱ्हेनें विपन्न स्थितींत असलेल्या व दारिद्र्यानें ग्रस्त झालेल्या देशावर सृष्टिदेवतेनें खरोखर योग्य वेळीं संपत्तीचा वर्षाव केला, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

# इराणांतील राज्यारोहण.

आशिया खंडामध्यें जीं ४-५ स्वतंत्र राष्ट्रें आहेत, त्यांमध्यें इराणची गणना होते. हा देश आशिया खंडाच्या दक्षिण पट्यांत असून क्षेत्रफळाच्या मानानें मुंबई इलाख्याहून मोठा आहे. येथील वस्ती शिया पंथाच्या मुसलमान लोकांची आहे. पूर्वीचा बादशहा डगायस याच्या मागून हल्लींचे 'शहारिझाशहा पेहलवी' हे गादीवर बसले आहेत. प्रथम हे सैन्यांत शिपाई होते. यांच्या राज्यारोहणसमारंभाचे वेळीं देशांतील मोठमोठे सरदार व ऑफिसर शिया पंथाचे मौलाना व निरनिराळ्या स्वतंत्र राष्ट्राचे वकील हजर होते.

समारंभाचे वेळीं त्यांनीं नवीन पेहलवी मुगुट धारण केला. तो सोन्याचा केलेला असून त्यावर मोठमोठे मौल्यवान हिरे, पाचूचे खडे व लाल रत्नें जडविलेलीं आहेत. त्यांचें सिंहासन मात्र जुनें होतें. नादिरशहानें हिंदुस्थानांतून लुटीबरोबर नेलेल्या इतिहासप्रसिद्ध मयूर सिंहासनावर यांचा राज्यारोहण विधि झाला असें म्हणतात. यांचा गादीवरील हक्क, इराणच्या पार्लमेंटनें व जनतेनें मान्य केलेला आहे. या राज्यारोहणसमारंभाचे प्रसंगीं लोकांनीं

उत्कट उत्सुकता व आनंद व्यक्त केला, इतकेंच नव्हे तर पूर्वीच्या शहाच्या कारकीर्दींत ज्या सरदारांनीं वैरभाव दाखविला, ते सर्व सरदार व निरनिराळ्या पंथाचे लोक या समारंभांत सर्व प्रकारें सामील झाले होते. या सर्व हकीकतीवरून ते फारच लोकप्रिय असावे हें उघड आहे.

---

# कृत्रिम रेशीम.

अलीकडे निरनिराळ्या कापडाच्या गिरण्यांतून खऱ्या रेशमाऐवजीं कृत्रिम रेशीम वापरण्याची सुरुवात झाली आहे. त्यामुळें कृत्रिम रेशीम कोणकोणत्या पदार्थांपासून तयार करतां येईल याबद्दलचे शोधही निरनिराळे लोक लावीत आहेत. आतांपर्यंत जे शोध लागले आहेत, त्यांवरून कृत्रिम रेशीम हा पदार्थ तीन चार पदार्थांपासून तयार करतां येईल, असें शोधकांचें ह्मणणें आहे. अलीकडे केळीच्या सोपटांपासून रेशीम तयार होतें; अंबाडी व ताग या दोन पदार्थांपासूनही तयार होतें. तसेंच घायपात, केतकी व अननस या वनस्पतींच्या पात्यांपासून जो वाख तयार होतो, त्याचेंही रेशीम बनविलें जातें.

अगदीं अलीकडील नवा शोध झाला ह्मणजे पावसाळ्यांत उकिरड्यांवर उगवणाऱ्या आळंब्यां— छत्र्यां— पासून रेशीम तयार करतां येतें हा होय. शोधकांचें म्हणणें असें आहे कीं, या आळंब्यांमध्यें सेलुलोस नांवाचें द्रव्य असतें; व तें द्रव्य कागदाकरितां जो लाकडापासून रोंधा— पल्प— तयार करतात तो ज्या रासायनिक द्रव्यामध्यें विरतो, त्यांत हें सेलुलोस विरतें, व त्यापासून कृत्रिम रेशीम बनवितां येतें. अशा तऱ्हेच्या आळंब्यांची लागवड केली असतां तीं फार जोरानें व थोडक्या वेळांत वाढतात. यामुळें कृत्रिम रेशीम तयार करण्याचें आणखी एक साधन भौतिक शास्त्रांच्या अभ्यासामुळें उपलब्ध झालें आहे.

---

# गल्फस्ट्रीमची अपूर्व कामगिरी.

ब्रिटिश बेटांच्या उत्तरेस असलेल्या शेटलंड बेटांत अटलांटिक महासागराच्या सान्निध्यामुळें वादळें वारंवार होतात व झाडें उपळून पडतात, व त्यामुळें या बेटांत कोणतेंही झाड अगर वृक्ष वर डोकें काढूं शकत नाहीं. अर्थात् त्या बेटांत इमारतीला उपयोगी अशीं लांकडें होणें शक्य नाहीं. वृक्षांची वादळानें झालेली ही नुकसानी भरून काढण्यास वादळच साहाय्य करतें. गल्फस्ट्रीम हा उष्ण पाण्याचा प्रवाह मेक्सिकोच्या आखातापासून फ्लोरिडाच्या बाजूनें जाऊन उत्तरेकडे न जातां ईशान्य दिशेला वळतो, व ब्रिटिश बेटांच्या सभोंवार फिरतो, यामुळें अमेरिकेच्या जंगलांतील वृक्ष व इतर पदार्थ या प्रवाहांत सांपडल्यास वाऱ्याच्या जोरानें या बेटांकडे वाहत येतात, व शेटलंड बेटाच्या किनाऱ्यास लागतात.

या गल्फस्ट्रीमनें नुकताच एक चमत्कार दाखविला, तो असा:—फ्लोरिडांतील एका प्रवाशाला बोटींतून जात असतांना शिकागोमधील मित्राला पत्र पाठविण्याची आठवण झाली. त्यानें लागलीच एक मोठी बाटली घेतली, व पत्रावर सुवाच्य पत्ता लिहून तें बाटलींत घालून घट्ट बूच लाविलें, व लाखेनें बंद करून बाटली समुद्रांत फेकून दिली. प्रवाशाची समजूत अशी होती कीं, अमेरिकेचा किनारा जवळ असल्यामुळें ही बाटली वाहात वाहात अमेरिकेच्या किनाऱ्याला लागेल, व तेथून कस्टमचे अधिकारी तें पत्र शिकागोला पाठविण्याची व्यवस्था करतील; पण तसें मुळींच घडलें नाहीं. आश्चर्याची गोष्ट ही कीं, ती बाटली पत्र घेऊन गल्फस्ट्रीमच्या प्रवाहाबरोबर वाहात वाहात शेटलंड बेटाच्या किनाऱ्यावर येऊन थडकली! अशा रीतीनें हा उष्ण पाण्याचा प्रवाह-गल्फस्ट्रीम-चमत्कारिक कृत्यें करून दाखवितो.

# दृढनिश्चय.

——:०:——

महायुद्धानंतर युरोपखंडांत जीं नवीन राष्ट्रें निर्माण झालीं आहेत, त्यांपैकीं पोलंड हें एक होय. येथील लोकांस पोल्स असें म्हणतात. यांची भाषाही युरोपांतील इतर भाषांहून भिन्न आहे. या देशांत एक गरीब शेतकरी राहत होता. त्याचें कुटुंब मोठें असून त्याला आठ मुलें होतीं. कुटुंब मोठें असल्यामुळें मुलांच्या शिक्षणाकडे त्याला फार खर्च करण्याचें सामर्थ्य नव्हतें. त्याचा मोठा मुलगा अठरा वर्षें वयाचा स्टीफन ह्यानें ही गरिबीची स्थिति ओळखिली, व ज्यास्त शिक्षणाच्या महत्त्वाकांक्षेमुळें अमेरिकेस जाण्याचें ठरविलें. कांहीं पोल्स लोक युनायटेड स्टेट्समधील मॅसाच्युसेटस संस्थानांत उद्योगधंद्यानिमित्त राहत आहेत, हें त्यास माहीत होतें. तेथें जाण्याची परवानगी आपल्या आईबापांपासून त्यानें मिळविली. त्याला इंग्रजी भाषा मुळींच येत नव्हती, व त्याजवळ द्रव्यही नव्हतें. मॅसाच्युसेटसमध्यें जातांच त्यानें एका बुरुडाच्या घरीं टोपल्या विणण्याचें काम पतकरिलें. त्याबद्दल त्याला दर आठवड्याला पांच डॉलर्स मिळत, पैकीं ३ डॉलर आपल्या चरितार्थाकरितां खर्च करी, व बाकी शिलुक ठेवी.

रिकामपणाच्या वेळांत स्टीफन इंग्रजी शिकूं लागला. त्यानें रात्रीच्या शाळेंत आपलें नांव दाखल केलें व मन लावून सर्व मोकळा वेळ अभ्यासांत घालवूं लागला; परंतु दुर्दैवाचा फेरा अद्याप पुरा झाला नव्हता. ज्या बुरुडानें त्याला आश्रय दिला होता, त्याचें घर पेटलें व टोपल्यांचा कारखानाही जळाला. त्यामुळें स्टीफनला उदरनिर्वाहाकरितां मिळालीं तशीं भिन्नभिन्न कामें पतकरावीं लागलीं. तो कांहीं दिवस गंवड्याच्या हाताशीं भिंती बांधण्यास राहिला. नंतर कापसाच्या गिरणींतही काम करूं लागला. पुढें तंबाखूच्या मळ्यांत त्यानें नोकरी धरली; परंतु इतक्या अडचणींतसुद्धां त्यानें अभ्यास सोडला नाहीं.

स्टीफनला अभ्यास करण्याची इतकी आवड उत्पन्न झाली कीं, तो रिकामपणचा सर्व वेळ अभ्यासांत घालवी. तीन वर्षांत त्यानें शाळेंतील अभ्यास पुरा केला, व प्रवेश परीक्षा पास होऊन अम्हर्स्ट कॉलेजांत पुढील अभ्यासा-

साठीं जाऊं लागला. त्याचा खर्च वाढला, त्यामुळें कॉलेजांत अभ्यास करीत असतांना खर्च भागविण्यासाठीं त्यानें एका कुवांत भांडीं घासण्याचें, बिछाने घालण्याचें व क्रिकेटमैदानावरील गवत कापण्याचें काम पतकरिलें होतें. तसेंच कॉलेजच्या सुटीच्या दिवसांत तो एका हॉस्पिटलमध्यें पाहारेकऱ्याचें काम करी. अशा रीतीनें भिन्नभिन्न प्रकारचीं कामें करून त्यानें कॉलेजच्या दिवसांतील खर्च भागविला, व मनापासून अभ्यास केला.

इ. स. १९१९ मध्यें स्टीफन कॉलेजांतील शेवटच्या परीक्षेस बसला, व उत्तम मार्क मिळवून तो पास झाला. त्याला हार्वर्ड युनिव्हर्सिटीची छात्रवृत्ति–स्कॉलरशिप–मिळाली. नंतर तो हार्वर्ड युनिव्हर्सिटीचा एम. ए. झाला, व त्या वेळीं त्याचा नंबरही वर आला. पुढें त्यानें ड्रेक युनिव्हर्सिटीमध्यें प्रोफेसरचें काम पतकरिलें. चालू सालीं तो हार्वर्ड युनिव्हर्सिटीच्या दुसऱ्या एका परीक्षेसाठीं अभ्यास करीत आहे. अशा रीतीनें एक गरीब, निर्धन शेतकऱ्याचा मुलगा दृढनिश्चयाच्या जोरावर एका मोठ्या युनिव्हर्सिटींत मानाच्या जागेवर चढला !

---

# गौरीशंकर आरोहण.

हिमालय पर्वताचें गौरीशंकर शिखर गांठण्यासंबंधानें जे प्रयत्न करण्यांत आले, त्यांसंबंधानें या मासिकांत पूर्वीं माहिती दिली आहे. युरोपांत महायुद्ध चालू असतां या पर्वताचें शिखर गांठण्याचे तीन वेळां प्रयत्न करण्यांत आले. त्यांपैकीं पहिल्या सफरींत डॉ. केलास मरण पावले. दुसऱ्या सफरींत सात हमाल गडप झाले, व तिसऱ्या खेपेस २८००० फूट उंचीवर चढून गेल्यावर व शिखर गांठण्यास फक्त १००० फूटच काय ते उरले असतां मॅलोरी, आपर्व्हिन् व दोन हमाल हे यमलोकास रवाना झाले, त्यामुळें या उंच प्रदेशावर त्यांना कोणत्या प्रकारचे अनुभव आले, हें पूर्णपणें समजलें नाहीं, पण या ठिकाणापर्यंत जातांना

त्यांना बर्फाळ प्रदेशावरून सरपटत जावें लागलें. तेथील हवा विरळ असल्यानें श्वासोच्छ्वास सुलभ रीतीनें करितां यावा म्हणून ऑक्सिजन भरलेल्या बाटल्या बरोबर न्याव्या लागल्या. त्यांचा प्रवास म्हणजे फुटांनींच मोजण्यासारखा होत असे. वरून बर्फाचा कडा केव्हां सुटेल, व खालीं केव्हां लोटून देईल याचा तर नेमच नसे, व त्यामुळें हा प्रयत्न म्हणजे आपण होऊन मृत्युमुखांत शिरण्याचाच एक प्रकार होता. इत्यादि गोष्टी प्रसिद्ध झाल्या होत्या. अशा प्रयत्नांत जीव बळी देण्यांत काय अर्थ आहे, असें पुष्कळांस स्वाभाविकच वाटेल, पण या प्रयत्नानें मनुष्यानें सृष्टीवर मिळविलेल्या विजयांत एक प्रकारें भरच पडणार होती. मनुष्याची धाडसी जिज्ञासा तृप्त करून घेण्याची ही एक दिशा आहे. बर्फाळ ध्रुव–प्रदेश शोधीत हिंडणाऱ्या प्रवाशांचें कोण कौतुक करणार नाहीं ? अशीं माणसें स्वतः प्रयत्न करून आपल्या देशाचें कीर्तिवैभव तर वाढवितातच, पण आपल्या या उदाहरणानें आपली धाडसी वृत्ति अनेक हृदयांत उत्पन्न करतात, व हीच गोष्ट फार महत्त्वाची आहे.

या प्रयत्नांत भाग घेणाऱ्या निरनिराळ्या धाडसी वीरांपैकीं डॉ. ब्रूस हे पुन्हा एकदां हें शिखर गांठण्याचा प्रयत्न करणार आहेत असें म्हणतात.

अशा प्रयत्नांपासून सर्वांनीं धडा घेण्यासारखा आहे, यांत संशय नाहीं.

---

# इंग्लिश खाडी पोहून जाण्याचे प्रयत्न.

इंग्लंड व फ्रान्स या दोन देशांमध्ये जी खाडी आहे; तिला इंग्लिश खाडी म्हणतात. या खाडीचा पश्चिम भाग बराच रुंद आहे. पण पूर्व भागांत इंग्लंड व फ्रान्स यांच्या किनाऱ्यांत सर्वांत कमी अंतर आहे. इंग्लंडचें डोव्हरबंदर व फ्रान्सचें कॅलेबंदर यांमध्यें सुमारें २१ मैलांचेंच काय तें अंतर आहे. या खाडींतच स्पेनच्या अजिंक्य आरमाराचा इंग्लंडनें धुव्वा उडविला, व या खाडीमुळेंच नेपोलियनला इंग्लंडवर स्वारी करितां आली नाहीं. इंग्लंडचें आरमार जोंपर्यंत बलिष्ट आहे तोंपर्यंत कोणत्याही राष्ट्राला इंग्लंडच्या किनाऱ्यावर या खाडीमुळें पाय ठेवतां येणार नाहीं.

ही खाडी पोहून जाण्यासंबंधानें आजपर्यंत प्रयत्न झाले आहेत, व त्यांत दोघां तिघांना यशही मिळालें आहे, पण चालू सालीं झालेल्या प्रयत्नांत ही खाडी किती लवकर पोहून जातां येईल, या संबंधीं जणू कांहीं अहमहमिकाच लागून गेलेली दिसते. मागें झालेल्या प्रयत्नांत कॅप्टन वेल यास खाडी पोहून जाण्यास २४ तास लागले. या खाडीं-तून पोहून जाण्यास माणसांना पोहोण्याचा मार्ग सरळ असून चालत नाहीं. त्यांच्या प्रवासाचा नकाशा वाकडा तिकडा दिसतो. या खाडींत येणारी भरती ओहोटी, वारे, लाटा व प्रवाह हीं यांचीं कारणें होत.

वेलनंतर बरींच वर्षे या दिशेनें प्रयत्न झालेले ऐकिवांत नाहींत, पण चालू वर्षी झालेले प्रयत्न अत्यंत चुरशीचे असून त्यांनीं मागील सर्व प्रयत्नांवर ताण केली आहे. अलीकडे जगांतील सर्व देशांत अमेरिकेंतील लोकांना पोहोण्याचा नाद विशेष असून त्या देशाचा नंबर त्या बाबतींत वर लागतो असें म्हणतात. नुकत्याच झालेल्या प्रयत्नांत एका १८ वर्षे

वयाच्या तरुण अमेरिकन मुलीनें ही खाडी पोहून अवघ्या १४ तासांत ओलांडली. या मुलीचें नांव मिस् ओडर्ले असें आहे.

ही मुलगी फ्रान्सच्या किनाऱ्याकडून इंग्लंडच्या किनाऱ्याकडे पोहोत गेली, व सर्व पोहोणारे हाच मार्ग स्वीकारतात. अशा पोहोणाऱ्यांच्या बरोबर बाजूनें नेहमीं चालणारें एक गलबत ठेवण्यांत येतें. एखाद्याला पुढें जाववत नाहीं, असें वाटल्यास त्याला मध्यंतरीं गलबतावर घेतां येतें याशिवाय वर घेण्याची जरुरी न वाटल्यास पोहोत जातांना त्यांची करमणूक व्हावी म्हणून गलबतावर फोनोग्राफ वगैरे लावलेला असतो. केव्हां केव्हां गलबतावरील लोक पोहोणाऱ्याला वरून प्रोत्साहन देत असतात; किंवा त्याला भूक लागल्यास खाण्याचे पदार्थ देतात. अशा रीतीनें पोहोणाऱ्यास कंटाळा न येईल व उमेद कायम राहील अशा गोष्टी गलबतावरील लोक करीत असतात.

मिस् ओडर्ले या मुलीनें अवघ्या १४ तासांत ही खाडी ओलांडल्यानें तिचा जगभर बोलबाला झाला. कारण इतक्या थोडक्या वेळांत हें काम कोणींच सिद्धीस नेलें नव्हतें. व तें एका स्त्रीनें केल्यानें तर प्रत्येक माणूस आश्चर्यचकित झाला, व तसें होणें स्वाभाविक आहे.

परंतु कसलेल्या व नामांकित पोहोणारांना तें एक प्रकारचें आव्हानच होतें. त्यांना गेलेलें यश मिळविल्यावांचून चैन पडेना. तेव्हां ईर्षेनें प्रेरित होऊन मिस्टर विकरकोटर या जर्मन पोहोणारानें ही खाडी १२ तास ३९ मिनिटांत ओलांडून दाखविली, व त्याच्या मागून थोड्याच दिवसांत फ्रेंच पोहोणारा जार्जेस् लायकेस यानें तर ती खाडी ११ तास ६ मिनिटांत ओलांडून सर्व प्रयत्नांवर कळस चढविला. अशा रीतीनें या शेवटच्या दोन पुरुषांनीं गेलेलें यश पुन्हा परत मिळविलें. ही गोष्ट जरी खरी असली तरी स्त्री या दृष्टीनें विचार केल्यास मिस् ओडर्ले या अमेरिकन स्त्रीनें अद्वितीय कामगिरी करून पराक्रमी स्त्रियांच्या मालिकेंत भर टाकली, यांत तिळमात्र संशय नाहीं.

———

# मुलांकरितां गोष्टी.

## गुलाब.

गुलाब नांवाची एक लहान मुलगी होती. तिची आई तिला नेहमीं गुलाबी परकर नेसवी व गुलाबी पोलकें घाली. एके दिवशीं गुलाबची आई तिला म्हणाली, 'बाळ, तुझी मावशी आजारी आहे. तिच्याकरितां मी हे लाडू केले आहेत. हा लाडवांचा डबा घेऊन मावशीकडे जा व तिला तो देऊन लवकर परत ये.' गुलाबची मावशी एका शेतांत राहात होती. त्या शेताला जावयाचा रस्ता रानांतून होता. गुलाबच्या आईनें तिला लाडवांचा डबा दिला व म्हणाली, 'बाळ, वाटेनें सरळ जा. वाटेनें कोणी भेटलें, तर त्याच्याशीं बोलण्यांत वेळ घालवूं नकोस व रानांत इकडे तिकडे जाऊं नकोस. मावशीच्या घरीं जा, तिला नमस्कार कर, तिला लाडू दे व लागलीच परत ये.' 'बरें आहे. आई, मी लागलीच परत येतें,' असें म्हणून गुलाब निघाली.

ती रानांतून चालली असतां एका लबाड लांडग्यानें तिला पाहिलें व तिजजवळ येऊन म्हणाला, 'बाळ, तूं एकटी कोठें जात आहेस?' गुलाब म्हणाली, 'माझी मावशी आजारी आहे. तिला हे लाडू घेऊन मी जात आहें.' लांडगा म्हणाला, 'तुझी मावशी कोठें राहाते?' गुलाब म्हणाली, 'या रानाचे पलीकडे शेत आहे तेथें ती राहाते.' लांडगा म्हणाला, 'तिच्या घरांत आणखी कोणी आहे काय?' गुलाब म्हणाली, 'सध्यां ती एकटीच आहे.' लांडगा म्हणाला, 'बाळ, तुझा परकर किती सुरेख आहे आणि तुझा पोलकाही फार चांगला आहे. तुझ्या अंगाला

तो भारीच शोभतो. पण बाळ, तूं आपल्या डोकींत गजरा का घातला नाहींस ? हीं पहा एथें किती सुंदर फलें आहेत. याचा गजरा कर, डोकींत घाल आणि मग मावशीकडे जा.' लांडग्यानें गुलाबला रानांतलीं सुंदर फुलांचीं झाडें दाखविलीं. गुलाबनें आपला डबा खालीं ठेवला. तिनें फुलें गोळा केलीं व त्याचा गजरा ती करीत बसली. इतक्यांत लांडगा तेथून निसटला व गुलाबनें सांगितलेल्या मावशीचे शेतात गेला. त्यानें शेतांतील घर पाहिलें म्हणून तो तेथें गेला. घराचे दाराला आतून कडी होती. लांडग्यानें दारावर टिचकी मारली. गुलाबची मावशी आजारी होती म्हणून ती अंथरुणावर पडली होती. तिला वाटलें कीं, गुलाबच आली आहे. ती म्हणाली, 'गुलाब, खिडकी उघडी आहे, तिच्यातून आंत ये.' तें ऐकून लांडगा खिडकींतून आत गेला व त्यानें मावशीला चटकन खाऊन टाकिलें व तो त्या अंथरुणावर पांघरुण घेऊन मावशीचे जागीं निजला.

इकडे गुलाबनें एक सुरेख गजरा केला. मग तिनें तो डोकींत घातला व ती मावशीकडे निघाली. ती मावशीचे घरीं पोहोंचली व तिनें दारावर टिचकी वाजविली. तेव्हां मावशीसारखा आवाज काढून लांडगा म्हणाला, 'बाळ गुलाब, मला दरवाज्याची कडी काढण्याला उठवत नाहीं. तूं खिडकींतून आत ये.' मग गुलाब खिडकींतून आत गेली. तिला वाटलें कीं, आपली मावशीच पांघरूण घेऊन निजली आहे, तिनें मावशीला नमस्कार पण केला. तिला तें सगळें विचित्र दिसलें, तेव्हां ती म्हणाली,

'मावशी, तुझे डोळे असे मोठाले कां दिसतात ?' लांडगा म्हणाला, 'बाळ, तूं फार दिवस दिसली नाहींस म्हणून तुला पाहावयास ते मोठे झाले आहेत.'

गुलाब म्हणाली, ' मावशी, मावशी, तुझे कान एवढे लांब का झाले ? ' लांडगा म्हणाला, ' फार दिवस तूं माझ्याशीं बोलली नाहींसः म्हणून तुझें बोलणें ऐकण्याकरिता माझे कान लांब झाले आहेत. '

गुलाब म्हणाली, ' मावशी, तुझे दात एवढे मोठे का झाले ? '

लांडगा म्हणाला. ' तुला खाण्याकरितां. ' असें म्हणून तो उठला; त्याला पाहून गुलाब घाबरली व ती मोठमोठ्यानें किंकाळूं लागली. त्याच वेळेस सुदैवानें तिचा बाप शिकारीकरिता त्या घराजवळून जात होता त्यानें तो आवाज ऐकला. त्यानें खिडकींतून पाहिलें तो एक दुष्ट लांडगा एका मुलीचे अंगावर उडी मारून तिला खाण्याचे बेतांत आहे, असें त्यास दिसलें. तावडतोब त्यानें गोळी घालून लांडग्याला ठार मारिलें व तो घरांत गेला. गुलाबनें आपल्या बापाला पाहिलें व त्याच्या गळ्याला मिठी मारली. बापानें तिला आपल्या पोटाशीं धरली. तिनें स्फुंदत स्फुंदत झालेली सर्व हकिकत आपल्या बापास सांगितली. गुलाबचा बाप तिला म्हणाला, ' पहा, बाळ, तूं आपल्या आईचें ऐकिलें नाहींस म्हणून लांडग्याचे तावडींत सांपडलीस. ' गुलाब म्हणाली, ' मी पुन्हा असें कधीं करणार नाहीं. ' मग गुलाबला घेऊन तिचा बाप घरीं गेला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ... ३३ ... १९५ ता........... मासिक शाखा

# मुलांकरितां कविता

## अलगुजवाला

चाल—( साधी, कटावासारखी. )

गांव मोठकें पूर्वी होतें एक नदीच तीरीं
पडूं लागलीं घरें तेथलीं जुनीं जाहलीं भारी
भिंतीमध्यें बिळें करोनी आनंदें वसती
उंदिर सारे घरांतुनी ते दिवसाही पळती

धान्य खाउनी मस्त जाहले उंदिर ते फार
मांजरास ते मुळीं न भीती देति तयाला मार
वाणे खाती कपडे खाती अन्नहि ते खाती
ताटांतुनिही भात खावया मुळींच ना भीती

लोक आसले तेथिल भारी म्हणती काय करावें
या गांवांतुनि या दुष्टांना कसें घालवुनि द्यावें

× × × ×

एके दिवशीं अलगुजवाला विचित्र तेथें आला
मोरपिसांचा टोप मजेचा घालुनियां अपुला
गोड गोड तो अलगुज वाजवि मोहुनियां जाती
लोक सर्व ते जमति भोंवतीं टकमक ते बघतीं

× × × ×

गांवकरी ते जमुनी त्याला तेव्हां विनवीती
अलगुजवाल्या ऐक ऐक तूं अमुची ही विनती
गोड वाजवित अलगुज अपुला जाई तूं इथुनी
गाणें ऐकुनि उंदिर येतिल तुझिया मागोनी

नदींत सारे बुडवुनि टाकी अमुचा त्रास निवारीं
आनंदानें आम्ही देऊं तुजला द्रव्यहि भारी

× × × ×

वाजवूनियां अलगुज अपुलें उंदिर भुलवुनि नेले



'आतां तुम्ही द्रव्य मला द्या' ऐसें तो बोले
गांवकरी ते हसुनि बोलती ऐकती न त्याचें
वेडा कुठला द्रव्य कशाचें तुला द्यावयाचें

× × × ×

पद

( आज भेटली ताई ही–या चालीवर )

नदी तटावर मग बसला
अलगुज वाजवि तो अपुला
धावत धावत मग येती
मुलें वासरें तेथें ती
लोक जरी त्यां घरिं नेती
मुळीं न तेथुनि तीं हलती

( चाल बदलून )

अलगुज येकाति
थै थै नाचति
वेडे बनती



( चाल पूर्वीची ) गांव करी ते बहु भीती
द्रव्य तयाला मग देती ॥ १ ॥

———

# संपत्तीचा लोभ.

(साकी)

गोदातीरीं पूर्वी होती नगरी सुंदर भारी
विष्णुदत्त या नामें होता धनिक तिथें व्यापारी १

परोपकारी सुशील भारी दीनांचा कैवारी
साह्य करोनी अनाथांस तो संकट त्यांचें वारी २

भार्या त्याची रूपवती ती शीलवती ही तैशी
प्रेमळ पतिला पत्नी शोभे सीता रामा जैशी ३

पुत्र जाहले दोन तयांना आनंदा ये भरती
सुखद तयांच्या सहवासानें धन्य आपणां गणती ४

नसे भरंवसा ऐश्वर्याचा तैसा जनिं सौख्याचा
सुखा मागुनी दुःख येतसे नेम असे जगताचा ५

एकाएकीं रोग होउनी पत्नी स्वर्गा जाई
पुत्रांला ती पतीस तैसें शोकामाजीं बुडवी ६

विष्णुदत्तही कृश बहु झाला शयनाला तो खिळला
मृत्यू आला समीप जाणुनि भावाला तो वदला ७

'भाऊ, आतां नसे भरंवसा माझा या लोकीं तो
सोडुनि बाळें कोमल माझीं स्वर्गाला मी जातों ८

तुझ्या करीं मी सोपवितों हीं बाळें माझीं आतां
भाऊराया तूंच पिता त्या तूंच तयांची माता ९

पुत्र आपुले मानुनि यांना सांभाळीं प्रेमानें
सन्मार्गाचा पंथ तयांना दाखिव तूं ममतेनें १०

संपत्ती ही तुझ्या करीं मी माझी सारी देतों
पुत्रांच्या या साठीं व्यय कर योग्य तुला वाटे तो' ११

डोळ्यांमध्यें अश्रु आणुनी निरोप दे भावाला
डोळेभरुनी पुत्रां पाहुनि स्वर्गाला तो गेला १२

* * * *

मृत बंधूचे शेवटचे ते शब्द धरुनियां चित्तीं
बाळांना तो जपूं लागला ठेवी त्यांवर प्रीती १३

महिने गेले थापरि कांहीं दुर्बुद्धी आठवली
काकाची ती सन्मति सारी पालटुनी गेली १४

संपत्तीचा लोभ जाहला दुर्बुद्धी आठवली
पुतण्यांची ती प्रीति लोपली सद्बुद्धी गेली १५

दोन्ही बाळें मृत्यु पावतां त्यांची ही संपत्ती
अवाढव्यही सारी येइल मग ती माझ्या हातीं १६

घात करावा या बाळांचा कांहितरी युक्तीनें
दुष्ट असा हा निश्चय केला निष्ठुर त्या काकानें १७

*　　*　　*　　*

सकाळींच तो एके दिवशीं बाळांना त्या वदला
चला मुलांनों जाऊं आतां रम्य अशा गांवाला १८

आनंदानें बाळें घेउनि घोर काननीं जाई
वृक्षाखालीं संध्याकाळीं त्यांना तेथें बसवी १९

श्रांत जाहलीं बाळें भारी तान्हेनें तीं पिडलीं
' काका पाणी आणा ' ऐसें काकुळतीनें वदलीं १०

बसा मुलांनो झाडाखालीं पाणी घेउनि येतों
वदुनी ऐसें बाळां सोडुनि निष्ठुर घरिं गेला तो ११

*　　*　　*　　*

रात्र आहली घोर वनीं त्या अंधकार बहु झाला
काका काका हाका मारुनि कंठ तयांचा सुकला १२

भीतीनें तीं मिठी मारुनी एकामेकां बसती
घू घू घू घू घुबडाचे ते शब्द ऐकुनी भीती १३

भूक लागली भारी त्यांना तहान लागे भारी
दमुनी पडलीं वृक्षाखालीं झोंप तयांना आली १४

थंडीनें तीं कुडकुडतांना बाळें पक्षी बघती
शुष्क अशीं तरुपर्णें आणुनि त्यांना आच्छादीती १५

सकाळ झाली उठवेना त्या बाळांना पाहोनी
पक्षी देती मधुर फळें त्या ममतेनें आणोनी २६

दुष्ट पशूही बाळांना त्या त्रास मुळींना देती
दिवस चार तीं यापरि बाळें वनीं घोर त्या फिरती २७

*　　*　　*　　*

प्रभात काळीं दुसऱ्या दिवशीं शिकारीस नृप आला
बाळें पाहुनि वनीं ' एकलीं चित्तीं भारी द्रवला २८

मधुर बोबडे शब्द ऐकुनी पोटाशीं त्यां धरिलें
नगरालागीं सत्वर तेव्हां नृपतीनें त्यां नेलें २९

*　　*　　*　　*

चैन पडेना काकाला त्या पश्चात्तापें झालें
हृदय तयाचें दग्ध बहू तें कांहिं न त्याला सुचलें ३०

वेड्यासम तो फिरूं लागला हाय हाय ! तो बोले
संपत्तीनें ऐश्वर्यानें सुख नच त्याला झालें ३१

वनामाजि तो येउनि बाळांसाठीं मग बहु फिरला
सांपडलीं त्या नच तेव्हां तीं वेडा मग तो झाला ३२

गांवोगांवीं वेडा मग तो हिंडत हिंडत जाई
हाय हाय तो बोले भटकत इकडे तिकडे पाही ३३

*　　*　　*　　*

वर्षें गेलीं या परि कांहीं राजगृहीं बाळें तीं
मोठीं झालीं त्यांच्यावरती नृपती करि बहु प्रीती ३४

एके दिवशीं वेडा हिंडत आला वाड्यापाशीं
मुलें पाहुनी तिथें थांबला विचार करि अपणाशीं ३५

एकाएकीं वेड तयाचें सोडुनि त्याला गेलें
नृपतीजवळी न्या मज ऐसें सेवकांस तो बोले ३६

जाउनि त्यानें नृपतीला तो सर्व कथा मग कथिली
पश्चात्तापें दशा जाहली ती ही त्या सांगितली ३७

भेटविलीं तीं बाळें भूपें अपुल्या त्या काकाला
हृदयीं धरुनी प्रेमानें तो भारी तेव्हां रडला ३८
संपत्ती ती सर्व वेउनी बाळांची बाळांला
सेवेमध्यें ईशाच्या तो काळ घालवी अपुला ३९

---

# शिवनेरी किल्ल्याची सफर.

माझें सासर पुणें जिल्ह्यांत जुन्नर तालुक्यांतील एका खेडेगांवीं असल्या-कारणानें कांहीं कामानिमित्त मी २।३ वेळां जुन्नर शहरांत आलें, परंतु मराठी राज्य स्थापन करणारे "श्री छत्रपती शिवाजी महाराज" यांचें जन्मस्थान —शिवनेरी किल्ला—हें प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहावें, असें फार दिवसांपासून मनांत होतें. ती इच्छा तारीख ५।६।२६ रोजीं पूर्ण झाली. मुसलमानी साम्राज्याच्या तडाक्यांतून डोकें वर काढून परिस्थिति केवळ प्रतिकूल असून सुद्धां ज्यानें मराठी राज्याचा पाया घातला व आपल्या पराक्रमानें, धाडसानें त्याचा विस्तार केला त्या थोर विभूतीचें जन्मस्थल आतां लवकरच पाहावयास मिळणार आहे हें पाहून कोणास बरें आनंद होणार नाहीं! आमचे बरोबर जुन्नर शहरांत राहणाऱ्या परंतु खानदेशांत नोकरी करणाऱ्या जुन्नरकरीण मास्तरीणबाई ह्या होत्या. आमचीं दुपारचीं जेवणें वगैरे आटोपल्यावर लाग-लीच शिवनेरी किल्ला पाहण्यास जाण्याविषयीं वरील बाईंचा तगादा सुरू झाला. हे दिवस उन्हाळ्याचे असल्यानें आम्ही ४।५ वाजतां निघणार होतों. परंतु तुम्ही खानदेशांतील उन्हाळा सहन करणारीं माणसें आहांत, इकडच्या उन्हाळ्याच्या उन्हाचा तुम्हांला बिलकूल त्रास होणार नाहीं म्हणून आम्हीं आमचा बेत दुपारच्या २ वाजतां जाण्याचा ठरविला. आम्ही एकूण पांच माणसें होतों. आपण लवकर परत येऊं या आशेनें आम्ही गांवांतून भराभर चालूं लागलों. त्या वेळीं ऊन बरेंच पडलें होतें, परंतु मेघराजानें आपल्या प्रतापी सूर्याला ढगाच्या आड लपवावें व पुन्हा सूर्यानें बाहेर यावें; सूर्यानें लपावें व ढगांनीं त्याला शोधून काढावें असा त्यांचा एकसारखा लपंडाव चालला होता. जरी मधून मधून ऊन

पडत होतें तरी आम्ही सानदेशांतील उन्हाळा सहन करणारे असल्यामुळें तें ऊन आम्हांला चांदण्यासारखें वाटत होतें ! शहराबाहेर आल्यावर वृक्षांची शोभा फार अवर्णनीय दिसत होती. जणू सृष्टिदेवतेनें आमच्या स्वागताकरितां वृक्षांच्या वेली उभारल्या आहेत कीं काय असें वाटत होतें ! असो बाहेर पडल्यावर आम्हांला शिवनेरी किल्ला दिसूं लागला. वासराला गोठ्यांतून सोडल्याबरोबर तें बाहेर आलें म्हणजे नाचूं लागतें, तद्वत् आमचीं मनें शिवनेरी किल्ला आतां लवकरच दिसणार म्हणून आनंदानें अंतल्याआंत उड्या मारूं लागलीं. किल्ल्याकडे जातांच गढी नांवाचें एक ठिकाण लागतें. ह्या ठिकाणीं राघोबादादाचे पुत्र दुसरे बाजीराव यांस नाना फडणवीस यांनीं कैदेंत ठेविलें होतें व पुढें सवाई माधवराव वारल्यावर येथूनच त्यांना नेऊन पेशवाई पदावर स्थापन करण्यांत आलें. पुढें याच वाटेनें बारावावडी नांवाची एक फार मोठी विहीर लागते. हिची बांधणी फार सुरेख असून मजबूत आहे. पुढें जात असतां आम्हांस शिवनेरीचा डोंगर दिसला, तेव्हां आमचें लक्ष त्याच्याकडे जास्त वेधलें व उत्सुकतेनें त्या डोंगराकडे आम्ही टक लावून पाहूं लागलों. हे दिवस उन्हाळ्याचे होते तरी चैत्र पालवी फुटली असल्यामुळें तो प्रदेश फारसा रुक्ष दिसत नव्हता. सृष्टिसौंदर्यही बरेंच दिसत होतें. ती वनशोभा व तो डोंगर पाहून आमची चालण्याची गति मंदावत चालली.

प्रथम आम्हांस डोंगराचा पूर्वेकडचा भाग दिसला. किल्ला चढण्यास वाट दक्षिण बाजूनें आहे. डोंगर पाहून हा किल्लाच कां पसंत करावा ह्याविषयीं माझ्या मनांत विचार येऊं लागले, व त्या दृष्टीनें मी डोंगराकडे पाहूं लागलें. पूर्वेकडील डोंगराचा भाग निरखून पाहिला त्यावेळीं तो एका सरळ भिंतीसारखा असून चढावास जवळ जवळ अशक्यच आहे. ह्यावरून किल्ल्याचे लायक हा डोंगर आहे हें माझ्या चटकन लक्षांत आलें. डोंगराचे माथ्यावर नजर फेंकली असतां एक कमानीसारखा भाग, इदगा व एक घुमट दिसला. ह्यावरून किल्ल्यावर कांहीं आठवणीचा भाग राहिलेला असेल असें वाटलें. डोंगराचे मध्यभागीं ठिकठिकाणीं कांहीं बांधकामही दिसलें, दारें व खिडक्याही आमच्या दृष्टोत्पत्तीस आल्या. प्रथम हीं बांधलेलीं घरेंच आहेत असें आमच्यापैकीं प्रत्येकाला वाटलें. परंतु आमच्या बरोबर एक चाणाक्ष स्त्री होती तिनें तुमची ही चुकीची समजूत आहे, तो

डोंगर पोखरला आहे असें तिनें आम्हांस सांगितलें. प्रथम त्याची सत्यता पटली नाहीं. परंतु बराच वेळपावेतों आम्ही तिकडे पाहूं लागलों. तों हीं घरें पोखरूनच तयार केलेलीं असून, डोंगराचा दगड तांबडा आहे, अशी आमची खात्री झाली. डोंगर कसा पोखरला असावा ? ह्याचेंही आश्चर्य वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. ह्याठिकाणीं शिवाजी महाराज दारूगोळा ठेवीत होते असें आमच्या वाटाड्यानें सांगितलें.

डोंगराच्या पायथ्याशीं झाडी तुरळक होती, इतस्ततः मोठमोठे दगड हातपाय पसरून खालीं पडले होते. आम्ही ज्या रस्त्यानें चाललों होतों तो रस्ता बराच रमणीय असून भोंवतालचीं शेतें बागाइती असल्यामुळें हिरवींच हिरवीं दिसत होतीं त्यावेळीं तेथील तेवढीच जागा हिरवा शालू नेसली आहे कीं काय ही कल्पना माझ्या मनांत आल्यावांचून राहिली नाहीं. शिवाय आजूबाजूस फलपुष्पांनीं डवरलेले वृक्ष आपल्या गर्द छायेनें आल्हाद देत होते. कांहीं पक्षी आपल्या मधुर स्वरानें गायन करीत होते, कित्येक वृक्ष जणू कांहीं काळजीनें करपून मरणाची वाट पाहात आकाशाकडे आ पसरून उभे होते. अशा एक ना दोन हजारों कल्पना मनामध्यें येऊन व सृष्टिसौंदर्याचे नमुने पाहून ते निर्माण करणाऱ्या परमेश्वराचें कौतुक वाटलें.

एखादा कवि आमचे बरोबर असता तर त्यानें किती तरी बहारीचें वर्णन केलें असतें ! त्याच्या कल्पनेला किती तरी विषय मिळाले असते. असो लगेच चढावास आरंभ झाला, हा चढाव केव्हां संपतो असें मला झालें. प्रथम आम्ही किल्ल्याचा पहिला दरवाजा गांठला व तेथें थोडीशी विश्रांति घेतली. तेथून पुढें थोड्याथोड्या अंतरानें कांहीं दरवाजे लागले. त्यांत एक शिवाबाईचा दरवाजा लागला. शिवाबाईच्या दरवाजाला लांब लंगरी खिळे ठोकले असून ते फार मजबुत व घट्ट बसविले आहेत. ह्या दरवाजावर प्रसिद्ध शिवाबाईचें देऊळ लागतें. पुढें टाकीं पाहिलीं हीं टाकीं म्हणजे मोठा दगड फोडून तयार केलेली मोठी कुंडी होय.

दुसरी चटकन लक्षांत येण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे ह्या ठिकाणच्या भव्य चंपक वृक्षांच्या ओळी. भोंवतालीं पडलेल्या चाफ्याच्या फुलांचा वास घेऊन मन आनंदित झालें, आम्हीं पुष्कळ फुलें वेचलीं, नंतर या मोहांतून सुटून फुलें उचलण्याचें सोडून देऊन निराळाच विचार माझे मनांत आला.

तो हा; अहाहा ! ! ह्या वृक्षांची ही अशी अवस्था पाहून एक प्रकारचें वैषम्य वाटलें. सुंदर व सुगंधित चाफ्याचीं फुलें परंतु त्याचा कोणास उपयोग नाहीं. जर हींच फुलें गांवांत असतीं तर त्यांनीं कित्येकांना तोषविलें असतें ! तेव्हां वनांत सुकून जाण्याकरितांच त्यांनीं जन्म घेतला असेल असें वाटलें ! मग आम्ही पुढें गेलों. तेथें एक साधारण बांधलेलें देऊळ दिसलें. हें देऊळ कोणाचें म्हणून विचारलें तेव्हां तें आमच्या वाटाड्यानें रामदास स्वामींची समाधि आहे असें सांगितलें. त्या शब्दावर आमचा विश्वास बसेना; परंतु न बसून सांगाव कोणाला ? नंतर आम्ही त्यास प्रणाम केला व एवढ्या मोठ्या साधूची समाधि इतकी साधी असावी ह्याचें आम्हांस आश्चर्य वाटलें.

पुढें शिवाबाईचें दर्शन घेण्यास गेलों. श्री छत्रपती शिवाजी महाराज जिच्या दर्शनावांचून बाहेर जाईनात, जिचे कृपेनें महाराजांनीं राज्याचा विस्तार वाढविला अशी ती श्रीजगदंबा आतां पाहावयास मिळणार असें पाहून मनांत चलबिचल सुरू झाली. देवीचा मुख्य गाभारा डोंगरांत खोदिलेल्या गाभाऱ्यांत आहे. देवळाच्या भोंवतालीं कांहीं पाहाण्यासारखें नव्हतें, म्हणून तिकडे आमचें लक्ष गेलें नाहीं. पुढें आम्ही श्री जगदंबेचें दर्शन घेण्यास गेलों. मूर्ति पाहिली त्याबरोबर आनंद, भीति आणि आश्चर्य अशा छटा माझे मनावर उमटल्या. आह्मांस असें कळलें कीं, देवीची अर्ध मूर्तिही आतांच बसविलेली असून खालीं असलेली साधी मूर्ति शिवाजीस तोरणा किल्ला बांधतांना पाया खणीत असतां सांपडली. तीच शिवाजीची कुलदेवता ! दोन्ही मूर्ति निरखून पाहिल्या व पुन्हा नमस्कार करून बाहेर आलें. ह्या देवीच्या प्रसादानें जिजाबाईस मुलगा झाला व त्याचें नांव शिवाजी ठेवलें. असो, ह्याप्रमाणें देवळांतून बाहेर आल्यावर किल्ला निरखूं लागलों. तेथें शिवाजीच्या वेळच्या इमारती हल्लीं पडित झालेल्या असून त्या घोड्यांच्या पागशाळा आणि धान्याचीं कोठारें होतीं असें म्हणतात. भोंवतालीं लहान मोठीं अशीं ५२ टांकीं आहेत. तीं डोंगरांत कोरलेलीं आहेत; त्यांपैकीं गंगाजमना, मोती टांकें आणि कमान टांकें हीं फार मोठीं असून प्रख्यात आहे. ह्या टांक्यांजवळ येतांच आम्हांला पाणी प्यावयास मिळणार म्हणून आनंद झाला. आम्हांस थोडासा न कळत थकवा आलाच होता. त्या ठिकाणीं आम्हीं थोडा वेळ विश्रांति

घेतली व बरोबर आलेल्या वाटाड्यानें थोडें नव्हे, बरेचसें फराळाचें आणि त्यामुळें त्यानें तें उदार मनानें आम्हांस दिलें त्यामुळें आमच्या आनंदांत बरीच भर पडली. आम्ही मजेनें तें तेथें खात बसलों, गंगाजमना टांक्यांतील गोड, स्वच्छ व काळेंभोर असें पाणी प्यालों. हें स्थळ आम्हांस लवकर सोडावेसें वाटेना. हे उन्हाळ्याचे दिवस असून, गांवांत पाण्याची टंचाई असल्यामुळें ह्या ठिकाणीं एवढा मोठा पाण्याचा सांठा आहे हें पाहून शिवाजीच्या चातुर्याचें व किल्ल्यावर टांकीं करण्याचें त्याच्या कल्पनेचें आश्चर्य वाटलें. ह्या भागापासून पुढें डोंगराचे शिखरावर गेलों त्या ठिकाणीं श्रीछत्रपति ह्यांची जन्मस्थानची जागा आहे. हें जन्मस्थळ दुमजली दगडांनीं बांधलेली खोली असून हिचा बराच भाग पडलेला आहे. ह्या खोलीची दुरुस्ती न झाल्यास ती नामशेष होईल. ह्या खोलींत आल्यावर ज्या तलवार बहाद्दरानें सर्व हिंदुस्थान पादाक्रांत करून मोंगल बादशाह, आदिलशाह, सिद्दी यांस 'दे माय धरणी ठाय' केलें, ज्यानें यवनांपासून हिंदू धर्माचें रक्षण करून मराठी राज्याची स्थापना केली, ज्याची कीर्ति आजपर्यंत पृथ्वीवर गाजत असून पुढेंही अशीच गाजत राहणार, अशा आमच्या समरधुरंधर महाराष्ट्रीय महापुरुषाच्या व राजमुगुटमणीच्या जन्मस्थानाची ही अशी अवस्था पाहून मनाला किती वाईट वाटतें तें लेखणीनें लिहितां येत नाहीं. या खोलीवर संगमरवरी दगडाची एक पाटी लावून तिजवर शिवप्रभूचा जन्मकाल लिहून त्याचें चिरकाल स्मरण राहील असें केलें आहे. शिवाजी महाराजांचा ३ वर्षेपर्यंतचा बाललीलेचा काल येथें गेला असल्यामुळें त्या स्थळाचें भाग्य थोर समजावें हें उघडच आहे.

हा किल्ला फार मजबूत असावा असें वाटतें. कारण हा किल्ला निजामाचे ताब्यात असतांना संकटसमयीं त्या घराण्यांतील राजपुरुष ह्या किल्ल्याचा आश्रय धरीत होते असें आपणास इतिहासावरून कळतें. किल्ल्यावर हल्लीं नवीन खोदींव काम चाललें असल्यामुळें कांहीं कारंजीं, विहिरी वगैरे जुने भाग दृष्टोत्पत्तीस आले. शिवाय किल्ल्याच्या वरच्या भागांत इदगा आहे. हा किल्ला कांहीं दिवस मुसलमानाचे ताब्यांत असावा असें कबर आणि इदगा पाहून मनांत येतें. तें मुसलमानांचे नमाज पढण्याचें ठिकाण आहे म्हणून आम्ही तें पाहाण्यास गेलों नाहीं. येथें दुसरें पाहण्यासारखें

काहीं नाहीं. हा किल्ला एके काळीं मुसलमानांच्या, एके काळीं मराठ्यांच्या व आतां हल्लीं निसर्गाच्या ताब्यांत आहे. हल्लीं कोणीही म्हटलें कीं, हा किल्ला माझा आहे तरी त्यास कोणीही हरकत करणार नाहीं ! !

अशा प्रकारें किल्ला पाहून आम्हांस घरची ओढ लागली व घर मराभर गांठण्याचा प्रयत्न करूं लागलों. तोंच रात्र होऊन दाट अंधार पडला. ज्याप्रमाणें मूल बाहेरून खेळून लवकर घरीं परत न आल्यामुळें आई जशी त्याजवर रागावते त्याप्रमाणें ही सृष्टिदेवता आमच्यावर रागावून तिनें दाट अंधार पाडला असल्यामुळें आम्हांस रस्ता दिसेना; आम्ही रस्ता चुकूं लागलों, बगळांच्या ठेंचा लागूं लागल्या. अशा प्रकारें कसें तरी एकदाचें घर गांठलें. तरी घरीं आल्यावर सुद्धां डोळ्यापुढें एकसारखें त्या किल्ल्याचेंच चित्र दिसत होतें !

लक्ष्मीबाई बोरकर.
एरंडोल.

---

# कोहिनूर हिरा.

( लेखक—काशीनाथ परशुराम साने, शिक्षक, पोर्डें नं. १. )

' कोहिनूर हिरा, शीख राजा धुलुपसिंग यानें व्हिक्टोरिया महाराणीस नजर केला, असा उल्लेख आपल्या शाळोपयोगी इतिहासांत झाला आहे. हें अत्यंत जगप्रसिद्ध व इतिहासप्रसिद्ध असें तेजस्वी रत्न आहे; त्यासंबंधीं उपलब्ध झालेली माहिती जिज्ञासु वाचकांस व शिक्षकांस इतिहासदृष्ट्या बरीच मनोरंजक होईल असें वाटल्यावरून खालीं देत आहें.

जगामध्यें प्रसिद्ध असे १५–१६ हिरे असून त्यापैकीं तीन हिरे अति प्रसिद्ध आहेत. त्यापैकीं ब्रागांझा नांवाचा एक हिरा पोर्तुगालच्या राजाजवळ असून बिनकांतीव आहे. त्याचें वजन १६६६ रति ह्मणजे सुमारें २५ तोळे आहे. तो कोंबडीच्या अंड्याएवढा मोठा असून त्याची किंमत ५८ कोटि रुपयांवर आहे.

दुसरा प्रसिद्ध हिरा बोर्निओच्या राजाजवळ असून त्याचें वजन ७३४ रति म्हणजे सुमारें ७॥ तोळ्यांवर आहे.

तिसरा प्रसिद्ध हिरा म्हणजे प्रस्तुतचा हिंदुस्तानच्या इतिहासांत गाजलेला कोहिनूर हिरा होय.

'कोहिनूर, याचा अर्थ तेजाचा पर्वत, (अतिशय तेजस्वी) असा असून तें नांव त्यास अन्वर्थक मिळालेलें असावें. या हिऱ्याची किंमत तज्ज्ञ लोकांनीं २ कोटि रुपयांपर्यंत केली आहे असें म्हणतात. असें सांगतात कीं, मूळ विनकांतीव स्थितींत या हिऱ्याचें वजन १५८७½ रति होतें व प्रसंगवशात् तो फुटून त्याचे तीन तुकडे झाले त्यांपैकींच कोहिनूर हिरा हा एक असावा.

कित्येक ठिकाणीं हा हिरा मोठ्या बदामापेक्षां मोठा आहे असें लिहिलें आहे, तर कित्येक ठिकाणीं तो लिंबाएवढा मोठा आहे असें वर्णन आहे. कसेंही असो, एकंदरींत हा दुर्मिळ असा पुष्कळच मोठा हिरा आहे ही गोष्ट निर्विवाद होय. याच्या उपलब्धतेसंबंधानें पुढील चार निरनिराळ्या दंतकथा आहेत—

कित्येक हा पांडवांजवळ होता व इतक्या पुरातन काळापासून याचें अस्तित्व आहे असें म्हणतात.

(२) हा भोजराजाच्या सिंहासनास होता व तेथून तो गुलाम वंशांतील बादशहा शामसुद्दीन अल्तमश याकडे आला अशीही एक आख्यायिका आहे. ती खरी असल्यास ज्यावेळीं अल्तमश यानें माळवा प्रांत जिंकून इ० स० १२३१ त उज्जनी शहर काबीज केलें व तेथील मंदिरांचा आणि प्राचीन राजवाड्यांचा विध्वंस केला त्यावेळीं हा जगप्रसिद्ध कोहिनूर हिराही त्यानें नेला असावा असें अनुमान निघतें. व त्यानंतर तो यथाक्रम दिल्लीच्या राजघराण्याकडे येत गेला असावा.

(३) कांहीं ठिकाणीं हा हिरा इ० स० १५५० त गोवळकोंडा येथील खाणींत सांपडला असें लिहिलें आहे. व कालानुक्रमदृष्ट्या ही गोष्ट विचारांत घेतल्यास पूर्वोल्लिखित दोन्हींही गोष्टी निःसंशय दंतकथाच ठरतात.

(४) हा हिरा औरंगजेबाचा प्रसिद्ध मदतगार सरदार मीरजुम्ला यानें शहाजहान बादशहास इ० स० १६५६ चे सुमारास नजर केला अशाही कोठें कोठें उल्लेख आहे.

मीरजुम्ला हा प्रथम कांहीं दिवस गोवळकोंड्याच्या बादशहाचा वजीर व सेनापति होता. त्यावेळीं तो खाजगी व्यापारही करीत असे. बादशाहाच्या कृपेमुळें त्यानें गोवळकोंडें येथें हिऱ्यांच्या खाणी काढून तो रत्नांचा व्यापारी बनला व त्यावर त्यानें अपार पैसा मिळविला. त्यानंतर तो इ० स. १६५३ त शहाजहान व औरंगजेब यांच्या आश्रयास गेला. यावरून कदाचित् मीरजुम्ला यास गोवळकोंडें येथील खाणींत हा हिरा सांपडला असून तो त्यानें शहाजहान बादशहास नजर केला ही गोष्टही संभवनीय असूं शकेल. इ० स० १६६५ सालीं टयाव्हार्निअर या इंग्रज प्रवाशानें हा हिरा औरंगजेब बादशहापाशीं पाहिला होता; त्यावेळीं याचें वजन २७२ रति होतें.

शहाजहान बादशाहापर्यंत या रत्नाची मजल झाल्यानंतर मोंगल बादशहा महमदशहा याचे कारकीर्दीपर्यंत तो मोंगल घराण्याकडे होता. पुढें महमदशाचे कारकीर्दीत इ० स. १७३९ त इराणाचा प्रसिद्ध बादशहा नादिरशहा यानें हिंदुस्तानावर स्वारी करून जी अपार लूट नेली त्याबरोबरच जगप्रसिद्ध मयूरासन व हें बहुमोल रत्नही त्यानें बादशाहापासून हिरावून नेलें. त्यावेळीं हा हिरा मयूरसिंहासनास जडलेला होता असें म्हणतात. नादिरशहानेंच या हिऱ्यास “ कोहिनूर ” असें नांव दिलें.

नादीरशहाच्या पश्चात् त्याच्या मृत्यूनंतर ( इ. स. १७४७ ) अहमदशहा अबदाली या अफगाण सरदारानें पुढारीपण स्वीकारून इराणचे ताब्यांतून अफगाणिस्तान सोडवून आपण अफगाणिस्तानचा बादशहा झाला त्यावेळीं त्यानें जी लूट नेली त्याबरोबर हा हिराही त्यानें अफगाणिस्तानांत नेला. नंतर तो बरींच वर्षें अफगाण राजघराण्याकडेच होता.

पुढें अफगाणिस्तानची गादी तेथील वजीर फत्तेखान बरक्झै यानें हिसकावून घेतली तेव्हां गादीचा खरा वारस शहासुजा हा भयंकर आपत्तींत सांपडून मदतीच्या याचनेकरितां हिंडूं लागला, या त्याच्या आपत्काल संधीचा फायदा शीख राजा रणजितसिंग यानें घेऊन विश्वासघातानें त्यानें हा हिरा इ. स. १८१० चे सुमारास शहासुजापासून उपटला.

रणजितसिंगानें शहासुजास मदतीचें आमिष दाखवून या हिऱ्याची मागणी त्याच्याजवळ केली व त्याच्या कुटुंबाच्या अनेक हालअपेष्टा करून

हा हिरा त्याच्याजवळून हिरावून घेतला व शेवटीं ठरलेली शपथही मोडून शहासुजाशीं विश्वासघात केला, तेव्हां शहासुजा दीन होऊन मग इंग्रजांच्या आश्रयास गेला ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहेच.

असें म्हणतात कीं, हा हिरा कोंदणांत बसवून रणजितसिंग तो आपल्या उजव्या दंडांत बांधीत असे.

पुढें बरेच दिवस हा हिरा रणजितसिंगाच्या वंशजांकडेच होता. पुढें इंग्रजांनीं शीखांचें राज्य काबीज केल्यावर रणजितसिंगाचा वंशज दुलीपसिंग इ. स. १८४९ मध्यें विलायतेस गेला व त्यानें हा हिरा कांतून व्हिक्टोरिया महाराणीस नजर केला. हल्लीं त्याचें वजन २०७॥ रति म्हणजे सुमारें २। तोळे असून तो आपले परमपूज्य बादशहा पंचमजॉर्ज यांच्या मुकुटांत झळकत आहे.

ज्या दिव्य रत्नानें आपल्या तेजानें सर्व जगास थक्क करून सोडलें, जें अनेक देशांतून अनेक राजघराण्यांतून व अनेक राजपुरुषांच्या हातून प्रवास करीत शेंकडा वर्षे हिंडत आलें, ज्याच्या लालसेनें रणजित-सिंगासारखे शूर व लोभी राजपुरुष क्वचित् विश्वासघातही करण्यास कचरले नाहींत असें हें इतिहासप्रसिद्ध दिव्य रत्न हल्लीं आपले सम्राट् पंचम जॉर्ज यांच्या संग्रहीं आहे ही खरोखर आनंदाची व अभिमानाची गोष्ट असून ब्रिटिश राज्यवैभवाचें हें दृश्य चिन्ह होय !

---

# मुलींच्या हस्तकौशल्याचें प्रदर्शन.

## कौन्सिल हॉलमधील समारंभ.

### सांगली संस्थानच्या श्री. सौ. राणीसाहेब यांचें भाषण.

मुंबई इलाख्याचे गव्हर्नर ने. ना. सर लेस्ली विल्सन यांच्या आश्रयाखालीं भाविण्यांत आलेलें हें मुंबई इलाख्यांतील शाळांमधील मुलींच्या हस्तकौशल्याचें प्रदर्शन काल ता. ८ रोजीं सकाळीं सांगली संस्थानच्या श्री. सौ. राणीसाहेब यांच्या हस्तें उघडण्यांत आलें. प्रदर्शन उघडण्याचा हा

समारंभ येथील कौन्सिल हॉलचे आवारांत मुद्दाम उभारलेल्या विस्तृत आणि शोभिवंत अशा मंडपामध्यें मोठ्या थाटानें पार पडला.

भोर संस्थानचे अधिपति श्रीमंत बाबासाहेब पंतसचीव, श्री. जगन्नाथ महाराज, भोर संस्थानचे युवराज, श्री. आबासाहेब मुजुमदार, कर्नल वाईल्डस्, मि. अंडरसन, ले. क. खंबाटा, रा. गोपाळराव देवधर, शिक्षणखात्याचे डायरेक्टर मि. लोरी, सर एम्. बी. चौबळ, डॉ. नायडू, खान बहादुर दस्तूर, रा. सा. वैद्य, रा. सा. पदे, रा. ब. कुमठेकर, सबजज्ज मि. बाळ, अ. जज्ज मि.असुंडी, रा. ब. अंजनगांवकर, सरदार श्रीनिवास मुदलियार, ऑ. मॅ. मि. ढेरे, सरदार बाळासाहेब पुरंदरे, सरदार बापुसाहेब विंचूरकर, सरदार हेबळीकर, प्रो. कानिटकर, मि. मालशे, रा. गो. मा. चिपळूणकर, मि. गरूड, मि. नाटेकर, मि. वाबळे, डॉ. खंबाटा, डॉ. बेलवलकर, सरदार नौरोजी पद्मजी, स्मॉ. कॉ. ज. मि. वागळे, मि. सरदेसाई वगैरे प्रमुख मंडळी या समारंभास हजर होती. त्याप्रमाणेंच फलटण संस्थानच्या श्री० सौ. राणीसाहेब, भोर संस्थानच्या युवराजांच्या पत्नी, सरदार रास्ते यांच्या पत्नी, श्रीमती यमुनाबाई भट, मिसेस वाइल्ड, लेडी मेहता, मिसेस पद्मजी वगैरे स्त्रियाही या समारंभास हजर होत्या.

मध्यभागांतील एज्युकेशनल इन्स्पेक्टर मि. के. जी. जोशी, मि. साठ्ये, मि. दीक्षित, मि. काझी वगैरे शिक्षणखात्यांतील सर्व अधिकारी मंडळी हजर होती.

८ वाजून ४० मिनिटांनीं श्री. सौ. राणीसाहेब या समास्थानीं येऊन दाखल झाल्या. मिसेस लोरी, मिस् नवलकर व मि. लोरी व मि. जोशी यांनीं राणीसाहेबांचें स्वागत केलें. श्री. सौ. राणीसाहब या स्थानापन्न झाल्यावर येथील सेवासदन बोर्डिंग हौसमधील लहान मुलींनीं " ही सरस्वतीही गुणखनी " हें स्वागतपर पद्य मधुर आवाजांत म्हटलें.

ह्या प्रदर्शनाच्या ऑ. सेक्रेटरी मिस् नवलकर यांनीं थोडें भाषण करून प्रदर्शनांत ठेवण्यांत आलेल्या वस्तूंविषयीं माहिती सांगितली. एकंदर ४०० शाळांतील विद्यार्थिनींनीं या प्रदर्शनाकरितां अनेक वस्तु पाठविल्या असल्याचें त्यांनीं सांगितलें. हें प्रदर्शन यशस्वी करण्याकरितां ज्या गृहस्थांनीं व भगिनींनीं उदार देणग्या दिल्या त्यांचे त्यांनीं आभार मानले.

नंतर प्रदर्शनाचे चेअरमन मि. के. जी. जोशी यांनीं भाषण केलें. ते म्हणाले कीं, या प्रदर्शनाची मूळ कल्पना स्त्रियांनींच काढली व तें त्यांच्या खटपटीमुळेंच आज उघडलें जात आहे. मुंबई इलाख्यांतील सर्व शाळांमधील विद्यार्थिनींनीं प्रदर्शनाकरितां अनेक वस्तु धाडल्या आहेत. येवढा मोठा कौन्सिलहॉल पण तो सुद्धां प्रदर्शनांतील वस्तूंनीं गच्च भरून गेला आहे! या गोष्टीवरून प्रदर्शनाच्या व्यापकतेची आपणांस कल्पना येईल. येवढें मोठें प्रदर्शन प्रथमच भरविण्यांत येत आहे. या प्रदर्शनाचा उपयोग शिक्षण देण्याचे कामीं फार होण्यासारखा आहे. हल्लींच्या शाळांमधून घोकंपट्टीवर विशेष भर असून पुस्तकी ज्ञानच देण्यांत येतें असा जो आक्षेप घेण्यांत येतो त्या आक्षेपाचा फोलपणा या प्रदर्शनांतील कुशल कामगिरीमुळें उत्तम रीतीनें सर्वांस दिसून येण्यासारखा आहे. असलें हें प्रदर्शन भरविण्यास द्रव्यसहाय्य मिळविणें जरूर होतें. मोठ्या आनंदाची गोष्ट ही कीं, द्रव्यसहाय्य मिळविण्याच्या कामीं अनेक स्त्रियांनीं पुढाकार घेतला. एकट्या लेडी टाटा यांनींच एक हजार रुपये जमविले. अशा रीतीनें हें प्रदर्शन यशस्वी करण्याचें बरेंचसें श्रेय पुण्यांतील सुशिक्षित स्त्रियांकडेच आहे.

लोकशिक्षणाच्या कामांत मोठ्या आनंदानें भाग घेणाऱ्या अशा बुद्धिमान राणीसाहेबांच्या हातून आजच्या प्रसंगीं हें प्रदर्शन उघडण्यांत येत आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे, तरी राणीसाहेबांनीं प्रदर्शन खुलें करावें अशी सर्वांतर्फे मी त्यांना विनंति करतों."

नंतर मिसेस लोरी आणि मिस नवलकर यांच्यासमवेत राणीसाहेब या कौन्सिल हॉलमध्यें गेल्यावर त्यांचे हस्तें प्रदर्शन उघडण्यांत आलें.

## श्री. सौ. राणीसाहेब यांचें भाषण.

सभ्य गृहस्थहो व प्रिय भगिनींनो, मुंबई इलाख्यांतील मुलींच्या शाळा व कॉलेजें यांतील विद्यार्थिनींनीं तयार केलेल्या वस्तूंचें हें प्रदर्शन उघडण्याचा मान आपण मला देऊन उपकृत केलें आहे. प्रदर्शन कमिटीला हें काम करण्यास माझ्याहून अनेक लायक माणसें मिळण्यासारखीं असतांनाही कमिटीनें हें काम मजकडे सोंपविलें याबद्दल मला धन्यता वाटत आहे.

हें प्रदर्शन अनेक दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. यांत विद्यार्थिनींनीं तयार केलेल्या अनेक कलाकौशल्याच्या वस्तु आहेत. येवढेंच नव्हे तर शिक्षणाच्या दृष्टीनेंही या प्रदर्शनाला फार महत्त्व आहे. आपण आतां लौकरच हें प्रदर्शन प्रत्यक्ष पाहाल तेव्हां शिक्षणाच्या दृष्टीनें त्याचें महत्त्व किती आहे हें आपल्या लक्षांत सहज येण्यासारखें आहे. उत्तम प्रकारचे भूगोलविषयक नमुने, ऐतिहासिक चित्रें व त्यासारख्याच लोकशिक्षणाच्या अनेक वस्तु आपणांस दिसतील. या वस्तूंचा नवीन दृष्टी येण्याच्या कामीं व बौद्धिक विकास करण्यास अध्यापक व अध्यापित या दोन्ही वर्गांस अतिशय उपयोग आहे.

हें प्रदर्शन भरविण्याची मूळ कल्पना मिस् न्यूलंड यांनीं काढली व स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजच्या उत्साही सेक्रेटरी मिस् नवलकर यांनीं अत्यंत परिश्रम करून ही कल्पना नांवारूपास आणली. या कामीं त्यांना पुणें शहरांतील स्त्रीशिक्षणाच्या अनेक संस्था व मुलींच्या शाळा यांवरील प्रमुख अशा युरोपियन व हिंदी अधिकाऱ्यांनीं व स्त्रियांनीं अतिशय साहाय्य केलें व त्यामुळेंच प्रदर्शन भरविण्याची ही कल्पना यशस्वी झाली.

सौंदर्य ग्रहण करण्याची मनुष्यमात्रांत जी नैसर्गिक शक्ति असते तिची वाढ व विकास ज्यानें होईल अशा प्रकारचें शिक्षण मुलांमुलींना देणें जरूर आहे. अत्यंत धीरगंभीर व उदात्त अशा गोष्टींविषयीं जशी आवड असावी तशीच ती सौंदर्याबद्दलही असली पाहिजे. सौंदर्यग्रहण करण्याची शक्ति हा मानवी संपत्तीचा एक महत्त्वाचा भाग आहे. या बाबींकडे अद्याप जावें तितकें लक्ष गेलेलें दिसत नाहीं; म्हणूनच तिचा उल्लेख प्रस्तुत प्रसंगीं करण्याचें अगत्य आहे. रचनासौंदर्य हें स्त्रियांच्या बाबतींत तर अत्यंत महत्त्वाचें आहे. स्त्रीला आपलें घर नीटनेटकें सजवावयाचें असतें व कुटुंबांतील सर्व माणसांना ज्या योगानें आनंद वाटेल अशी घरांतील वस्तूंची व्यवस्थित मांडणी करणें हें काम तिचें आहे. सबब सौंदर्यग्राही व सौंदर्यपोषक अशी दृष्टी स्त्रीवर्गांत उत्पन्न होण्याकरतां अशा प्रकारचें शिक्षण स्त्रियांना दिलें पाहिजे. सध्यांच्या शिक्षणक्रमांत या विषयाकडे अगदींच दुर्लक्ष केलेलें नाहीं. कारण या प्रदर्शनांतीलच वस्तु आपणांस असें सांगतील कीं, बुद्धिमत्तेची व स्मरणशक्तीची वाढ करण्याबरोबरच मुलींच्या हातांनाही कलाकुसरीचे सुंदर जिन्नस तयार करण्याचें शिक्षण

देण्याचीही कांहीं तरतूद सध्या झालेली आहे, रचनासौंदर्याकडे स्त्रियांचा कल पुरुषांपेक्षां साहाजिकच अधिक असतो. या त्यांच्या नैसर्गिक शक्तींची योग्य जोपासना व वाढ करणें जरूर आहे. आपण सध्य. सभों-वार नजर टाकली असतां आपणांस असें दिसून येईल कीं, आधिभौतिक गोष्टींनींच जगाचें लक्ष मुख्यतः वेधून घेतलें आहे. परंतु मनुष्यमात्राच्या आत्म्याची तृष्णा केवळ या आधिभौतिक शास्त्रांच्या व संपत्तीच्या वाढीनेंच हमखास तृप्त होते असें नाहीं. आपल्या भरतखंडाचा इतिहास पाहिला तर आध्यात्मिक विषयासच अधिक महत्त्व देणारे आहेत व जगाला आध्या-त्मिक ज्ञान देणें हेंच यापुढील हिंदुस्थानचें पवित्रतम कर्तव्य आहे असेंही कित्येक मंडळी मानतात. पाश्चात्य व पौर्वात्य अशा या दोन्ही भिन्न संस्कृतींचा सुंदर संगम घडावा असेंही कोणास वाटतें. सौंदर्य व मोहकता हे गुण म्हटले म्हणजे अध्यात्माचेंच बहिरंग असून आध्यात्मिक वियेचेंच अंशभूत आहेत हें आपण लक्षांत घेऊन सौंदर्यवर्धनाच्या कल्पनेस उत्तेजन दिलें पाहिजे.

राणीसाहेबांचें वरील आशयाचें भाषण झाल्यावर मि. के. जी. जोशी यांनीं प्रदर्शनास देणग्या दिलेल्या गृहस्थांचीं नांवें वाचून दाखविलीं. मोर-संस्थानचे अधिपति श्रीमंत बाबासाहेब पंतसचिव यांनीं १०० रुपयांची देणगी दिली असल्याचें जाहीर करण्यांत आलें.

शिक्षणखात्याचे डायरेक्टर मि. लोरी यांनीं श्री. सौ. राणीसाहेबांचे आभार मानल्यावर सर्व निमंत्रित मंडळींना हारतुरे, अत्तरगुलाब वांटण्यांत आले. कांहीं प्रमुख स्त्रियांसमवेत सौ. राणीसाहेब या प्रदर्शन पाहावयास गेल्या. ९। वाजतां राणीसाहेब आणि प्रमुख निमंत्रित मंडळी यांचा फोटो काढ-ण्यांत आल्यावर हा समारंभ आटोपला.

---

# मुलींच्या हस्तकौशल्याचें प्रदर्शन.

## कौन्सिल हॉलमधील व्यवस्थित मांडणी.

सांगली संस्थानच्या श्री. सौ. राणीसाहेब यांच्या हस्तें शुक्रवार ता. ८ रोजीं उघडण्यांत आलेलें हें कौन्सिल हॉलमधील प्रदर्शन रोज सकाळीं ८ ते

१० आणि सायंकाळीं ४ ते ७ पर्यंत उघडें असतें. तें ता. १५ अखेरपर्यंत उघडें राहणार आहे. प्रवेशफी फक्त ४ आणे होती. शिवाय विद्यार्थ्यांना तर दोनच आणे फी आहे. पुण्यांतील आणि इतर गांवांतील शेंकडों मंडळी हें प्रदर्शन पाहावयास येत आहेत. प्रेक्षकांच्या गर्दीतून मार्ग काढणें अगदीं मुष्किलीचें होतें. प्रदर्शनांतील वस्तु प्रत्येक प्रेक्षकाला संथपणानें पाहातां याव्यात यासंबंधाची खबरदारी तेथील स्वयंसेविकांकडून योग्य तऱ्हेनें घेण्यांत येते. प्रदर्शनाची मांडणीहि फारच सोयीस्कर आणि मनोवेधक अशी करण्यांत आलेली आहे. प्रदर्शनांतील वस्तूंची संपूर्ण माहिती प्रेक्षकांना समजावून देण्याचें काम पुण्यांतील मुलींच्या शाळांतील अध्यापिकांच्याकडे सोंपविण्यांत आलें आहे. तें काम सर्व स्वयंसेविका मोठ्या आनंदानें व तत्परतेनें करतात. प्रदर्शनाच्या सेक्रेटरी मिस् नवलकर याही त्या ठिकाणीं सदोदित हजर असतात. प्रत्येक प्रेक्षकाला जास्तींतजास्त माहिती मिळावी या उद्देशानें प्रदर्शनामधील प्रत्येक स्वयंसेवक आणि इतर अध्यापक वर्ग शक्य ती खटपट करीतच असतो. शेंकडों स्त्रीपुरुषांचा जमाव प्रदर्शनांतील प्रत्येक वस्तु मोठ्या कौतुकानें बघत असल्याचें दिसतें, लहान मुली आणि मुलें तर क्षणोक्षणीं वाढत्या आनंदानें प्रदर्शन बघतांना दिसतात. हें प्रदर्शन इतकें मनोवेधक आहे कीं, मुलामुलींना तेथून लवकर बाहेर पडावें असें वाटतच नाहीं.

प्रदर्शनाचे आवारांत शिरतांच पुण्यांतील ट्रे. कॉलेजच्या प्रॅ. स्कूलमधील एका विद्यार्थिनीनें तयार केलेला पंचवटीचा मनोरम देखावा दृष्टीस पडतो.

" सृष्टिनिरीक्षण ' नांवाच्या विभागांत प्राणी, वनस्पति आणि सृष्टींतील स्वाभाविक देखावे स्वतः बघून त्या सर्वांची स्मरणशक्तीच्या साहाय्यानें चित्रें काढलेलीं आढळतात. त्याचप्रमाणें त्या चित्रांच्या माहितीची नोंद केलेल्या वह्याही त्या ठिकाणीं ठेवण्यांत आलेल्या आहेत. त्याचप्रमाणें अस्मानांतील ताऱ्यांच्या गति दर्शविणारे आणि हवामानाच्या फेरबदलाची कल्पना करून देणारे असे नकाशेही मुलींनीं तयार केले आहेत; शिवाय रेशमाच्या किड्यांविषयींची सर्व माहिती आणि नमुने या विभागांत पाहावयास मिळतात.

" इतिहास " नांवाचे विभागांत इंग्लंडच्या इतिहासाचा काल दर्शविणारीं अशीं हातानें काढलेलीं चित्रें ठेविलीं आहेत. त्या चित्रांत प्राचीन, मध्य

आणि अर्वाचीन असे तीन प्रकार केले आहेत. हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेची वाढ दाखविणारें एक रेषाचित्र उत्तम साधलें आहे. फी[illegible] मधील एका विद्यार्थिनीनें रजपूत घराण्यांतील स्त्रियांच्या जोहाराचें एक चित्र उत्तम रेखाटलें आहे. मुंबईच्या हायस्कूलमधील एका मुलीनें इंग्लंडच्या इतिहासांतील रोमन, सॅक्सन आणि नॉर्मन या वंशांच्या कारकीर्दी दाखविणारें एक उत्तम चित्र ठेविलें आहे.

इतिहासप्रसिद्ध सिंहगडचा किल्ला, त्याचप्रमाणें शनिवार वाड्याचा देखावा आणि मार्केटची छोटी इमारत वगैरे वस्तु फार बघण्यालायक झाल्या आहेत. पोतकामाच्या विभागांत मोराचा पडदा, पक्ष्याचा पडदा, त्याचप्रमाणें पोतीच्या पिशव्या, चिमण्या वगैरे वस्तु चित्ताकर्षक आहेत. सिगारेट पेटीमध्यें असणाऱ्या शिशाच्या कागदाचा हार, कणसांच्या पाचोळ्याचा हार आणि वेळदोड्याच्या फोलपटांचा हार वगैरे विद्यार्थिनींनीं केलेल्या जिनसा निःसंशय पाहाण्यालायक आहेत.

लोंकरीच्या विणकामाच्या विभागांत झबलीं, चोळ्या, पोलकीं फार चांगलीं तयार केलेलीं आहेत. प्राथमिक शाळांच्या लहान विद्यार्थिनींनीं खडू, मेण, माती कागदांचा रांधा वगैरे वस्तूंचीं जीं कामें केलीं आहेत तीं बक्षिसांच्या द्वारें उत्तेजन देण्यालायक आहेत.

मुंबई इलाख्यांतील प्रसिद्ध होणारीं कांहीं मासिकें आणि इतर शालोपयोगी पुस्तकांचे नमुनेही वरचे बाजूस ठेवण्यांत आले आहेत.

येथील स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजमधील एक शिक्षक मि. एम्. के. कारखानीस यांनीं केवळ लहान मुलांना सोपे धडे, प्रथम अर्थ समजावून नंतर वाचतां यावेत या उद्देशानें तयार केलेले अक्षरांचे उत्तम तक्ते वरचे मजल्यावर बघावयास मिळतात. या नवीन पद्धतीमुळें लहान मुलांना अगदीं खेळतां खेळतां सुद्धां अक्षरओळख करून देतां येते. बाराखड्यांची घोकंपट्टी न करितां अगदीं सहजासहजीं मोठ्या गमतीदार रीतीनें केवळ त्यांच्या कल्पनाशक्तीस योग्य ती चालना देऊन त्यांची लिहिण्यावाचण्यांत थोड्याच वेळांत प्रगति करतां यावी असा मि. कारखानीस यांचा हेतु आहे.

# पोंच आणि अभिप्राय.

हिंदुस्तानचा राज्यकारभारः—ले. रा. गणपत महादेव घुले. किं. १० आणे पृ. १२८ ( द्वादशपत्री ) या लहानशा पुस्तकांत रा. घुले यांनीं सोप्या भाषेंत हिंदुस्तानच्या राज्यकारभाराची माहिती दिली आहे. माहिती थोडक्यांत दिली असल्यामुळें व बारीक सारीक गोष्टींचा पाल्हाळ केलेला नसल्यामुळें हें पुस्तक प्राथमिक शाळांतील वरचे वर्ग, ट्रेनिंग कॉलेजें व हायस्कुलांतील पहिले चार वर्ग या विद्यार्थ्यांना पुष्कळ उपयोगीं पडेल. पुढील आवृत्तींत हिंदुस्तानचा राजकीय नकाशा जोडल्यास विद्यार्थ्यांना त्याचा चांगला उपयोग होईल.

महाराष्ट्र डायरीः—इ. स. १९२७. अनाथ विद्यार्थी गृहानें प्रसिद्ध केलेली ही डायरी देशी कागदावर छापलेली आहे व उपयुक्त माहितीनें भरलेली आहे. डायरीचें बाइंडिंग व छपाई हीं सुरेख आहेत. डायरीचा खर्च वजा जातां राहिलेला नफा अनाथ विद्यालयाच्या उपयोगाला लागणार आहे. स्वार्थ व परोपकार हीं दोन्हीही ही डायरी विकत घेतल्यानें साधतात. किं. ६ आणे कापडी, बाइंडिंग. प्रकाशक अनाथ विद्यार्थी गृह, कसबा पेठ पुणें.

महाराष्ट्र स्त्रीगीतः—यांत स्त्रियांचीं ८० गाणीं यांच्या हार्मोनियमवरील नोटेशनसुद्धां दिलीं आहेत. यांपैकीं बहुतेक गाणीं जुनीं आहेत. सध्यां ज्या हिंदुस्थानी चाली आपल्या इकडे प्रचलित होत चालल्या त्यांवर स्त्रियांस गाण्यास योग्य अशीं नवीन गाणीं रा. मुळे व रा. नरसिंह चिंतामण केळकर यांनीं रचिलीं आहेत. प्रत्येक गाण्यानंतर तें कसें म्हणावयाचें, त्या गाण्यांत विशेष काय आहे व त्यांतील सुंदर भाग कोणता हें दाखविण्याकरितां स्पष्टीकरण दिलेलें आहे. गाण्याची निवड चांगली केलेली आहे. कांहीं थोडीं शृंगारपर गाणीं गाळून त्यांऐवजीं दुसरीं घातलीं असतीं तर बरें झालें असतें. स्त्रियांचीं जुनीं गाणीं गोड ताल सुरावर बसविलेलीं आहेत व त्यांतील रचनाही सुंदर आहे, ही गोष्ट लेखकांनीं ठिकठिकाणीं दाखविली आहे. रा. मुळे यांचा संग्रह मोठा आकर्षक झाला आहे. पुस्तकाची छपाई व बाह्यस्वरूपही आकर्षक आहे. लेखक रा. कृष्णराव गणेश मुळे, किंमत १॥ रु.

परागंदाः—लेखक डॉक्टर केतकर पुणें. डॉक्टर केतकर यांच्या या कादंबरीवर जोराची विरुद्ध टीका बरीच झालेली आहे. या कादंबरींत अमेरिकेंत कायम वस्ती करून राहिलेलीं हिंदी कुटुंबें व तेथें अभ्यास करीत असलेला हिंदी विद्यार्थी यांचा आयुष्यक्रम, विचार, आचार, भावना, महत्त्वाकांक्षा व ध्येय, त्यांची स्वदेशासंबंधानें असलेली वृत्ति हीं दाखविण्याचा डॉक्टर साहेबांनीं प्रयत्न केलेला आहे. ही कादंबरी अगदीं घाईनें लिहिली असल्यामुळें हिच्यांत सुसंबद्ध संविधानक दृष्टीस पडत नाहीं. बोजड भाषा व अशुद्धें यांचीही रेलचेल दृष्टीस पडते. अमेरिकेंतील विद्यार्थ्यांचा आयुष्यक्रम अप्रत्यक्ष रीत्या या कादंबरींत दाखविला आहे. तो वाचून आपलीं मुलें अमेरिकेंत धाडावीं कीं नाहीं याविषयीं हिंदी पालक साशंक होतील. लाला गजपतराय हें लाला लजपतराय यांचें चित्र आहे हें वाचकांना तेव्हांच ओळखतें. विद्यमान थोर पुरुषांना कादंबरींत घालून त्यांच्या ध्येयाविषयीं व विचाराविषयीं आपल्याच मनाप्रमाणें चिकित्सा करणें हें श्रेयस्कर नाहीं असें आम्हांस वाटतें. अमेरिकेंतील कुटुंब व्यवस्थेसंबंधानें, तेथील सुगृहिणीबद्दल अनेक हिंदी गृहस्थांनीं स्तुतिपर उद्गार काढलेले आहेत. नमुनेदार अमेरिकन गृहस्थितीचें चित्र डाक्टर साहेबांनीं रेखाटलें असतें तर अमेरिकन लोकांसंबंधानें निष्कारण गैरसमज झाला नसता. प्रत्येक देशांत चांगलें व वाईट असावयाचेंच. अमेरिकेपासून हिंदुस्ताननें घेण्याजोगे गुण डॉक्टर साहेबांनीं दाखविले असते तर बरें झालें असतें. कादंबरींतील पाश्चात्य श्रृंगारही हिंदी वाचकाला चमत्कारिक वाटेल. डॉक्टर साहेबांचें हें पुस्तक कादंबरी या दृष्टीनें नसलें तरी नवीन कल्पना, नवीन देखावे, नवी विचारसरणी या दृष्टीनें प्रौढ वाचकांना मनोरंजक वाटेल.

•

सुलभ शास्त्रीयज्ञानः—भाग २ रा. लेखक रा. का. प्र. पुराणिक. मराठी ६ व्या व ७ व्या पुस्तकांतील शास्त्रीय धडे स्पष्ट कळण्याकरितां हें पुस्तक लिहिलें आहे. लेखकानें दिलेली माहिती शास्त्रशुद्ध आहे व ती सोप्या भाषेंत दिली आहे. स्पष्टीकरणाकरितां दिलेल्या आकृति धड्यांत न देतां प्रारंभीं एकत्र दिल्यामुळें प्रयोगाची माहिती वाचतांना या आकृतींचा उपयोग करणें फार कठीण

पडेल. पुढील आवृत्तींत या आकृति जेथल्या तेथें जोडण्याची लेखकानें व्यवस्था करावी. आकृति आहेत त्यांपेक्षां जास्त मोठ्या काढल्या असत्या, तर उपकरणाचे निरनिराळे भाग व त्यांचें कार्य हीं वाचकांचे लक्षांत सहज आलीं असतीं. सदरहू पुस्तकाचा उपयोग प्राथमिक शाळांतील शिक्षकांस होईल. किं. ७ आणे.

**मुलांचें अंकगणितः**—भाग ३ रा लेखक म. गो. मोडक एम्. ए. व द. ज. गोखले बी. ए. या लेखकांचें हें पुस्तक चौथ्या इयत्ते-करितां लिहिलेलें आहे. यांत अपूर्णांक, म. सा. विभाजक, ल. सा. विभाज्य, सम व व्यस्त त्रैराशिक, पंचराशिक व सरळ व्याज इतकीं प्रकरणें आलीं आहेत. उदाहरणें सोपीं व व्यवहारांतील दिलीं आहेत. व्याख्यांचा अट्टहास न धरल्यामुळें विवेचनपद्धति नीरस व क्लिष्ट झालेली नाहीं. व्यवहाराकडे लक्ष देऊन कृत्रिम व कठीण उदाहरणें न देण्याची काळजी घेतलेली आहे. पंचराशिकाचीं उदाहरणें दोन त्रैराशिकांनीं प्रारंभीं सोडविल्यास मुलांना पंचराशिकाची पद्धति चांगली समजते. पान ७४ वरील ८ वें उदाहरण व पान ७९ वरील ९ वें उदाहरण यांसारखीं सम त्रैराशिकानेंच चांगलीं समजतात. तीं व्यस्त प्रमाणांत केलीं असतां मुलांचा घोटाळा होण्याचा संभव आहे. हें पुस्तक ४ थ्या इयत्तेंतील विद्यार्थ्यांना योग्य व उपयोगी आहे. पृष्ठसंख्या १०४ किंमत ५ आणे

**शालोपयोगी अंकगणित** भाग १ ला. लेखक रा. गजानन. महादेव देशमुख. बी. ए. बी. एस सी.

हें अंकगणित २ ऱ्या इयत्तेकरितां लिहिलें आहे. संख्यावाचन व लेखन, बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार एवढा भाग हा पुस्तकांत आला आहे. प्रथम कांहीं उदाहरणें सोडवून दाखवावयाचीं नंतर तोंडी व लेखी उदाहरणें द्यावयाचीं असा क्रम ठेविला आहे या तोंडी उदाहरणांच्या योगानें मुलांना बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार करण्याची पद्धति चांगली लक्षांत येईल. प्रथम सोपीं व नंतर अवघड असा उदाहरणांचा अनुक्रम काळ-जीपूर्वक ठेविला आहे. उदाहरणें मुलांच्या दररोजच्या अगदीं परिचयाच्या व्यवहारांचीं असल्यामुळें तीं मुलांना कंटाळवाणी वाटणार नाहींत. नेहमींच्या अंकगणितांत शतंपासून ते कोटीपर्यंतचें संख्यालेखन व वाचन

एकाच भागांत दिलेलें असतें, पण रा. देशमुख यांनीं या विषयाचे चार निरनिराळे भाग करून ते योग्य ठिकाणीं दिले आहेत. संख्यालेखनावरही चांगलीं उदाहरणें दिलीं आहेत. वजाबाकी ही पृथक्करण पद्धतीनें घेतली असल्यानें मुलांना हातच्याची खरी कल्पना येईल. यापुढील पुस्तकांतील दुसरी विशेष गोष्ट म्हटली म्हणजे भागाकाराच्या दोन्हीही प्रकारचीं उदाहरणें ही होय. उत्तम व मोकळी छपाई व सोपी विवेचनपद्धति, मोठा व स्वच्छ टाईप, जाड कागद, भरपूर उदाहरणें या सर्वांचे योगानें हें पुस्तक लहान मुलांना योग्य असें झालें आहे. पृष्ठसंख्या ९६ असतांनाही पुस्तकाची किंमत २॥ आणे ठेविली आहे. प्रकाशक नवीन किताबखाना पुणें.

**अंकगणित भाग २.** लेखक. रा. गजानन महादेव देशमुख. हा भाग तिसऱ्या इयत्तेकरितां लिहिलेला आहे. पूर्वींच्या भागाप्रमाणेंच यांतील विवेचनपद्धति मुलांना समजेल अशी सोपी आहे. या भागांत तिसऱ्या इयत्तेला नेमलेल्या विषयापेक्षां व्यवहारी अपूर्णांकाचें लेखन व वाचन हा भाग जास्त घातला आहे व आकृतीच्या साहाय्यानें व्यवहारी अपूर्णांकाचीं उदाहरणें करून दाखविलीं आहेत. पृथक्करणपद्धति व आपल्या नेहमींच्या पद्धतींतिल मेळ दाखविण्याकरितां एक स्वतंत्र भाग घातला आहे. एकमानपद्धतीचें महत्व जाणून तिच्यावर बरेच उदाहरणसंग्रह दिले आहेत. व्यस्त प्रमाणाचीं उदाहरणें एकमान पद्धतीनें कशीं सोडवावीं हें विस्तारानें दाखविलें आहे. पूर्वींच्या भागाप्रमाणेंच या भागाची छपाई मोकळी व ठळक आहे. कागदही मोहरेदार वापरला आहे. ११२ पानांच्या पुस्तकाची किंमत अवघी सव्वा तीन आणे ठेविली आहे. प्रकाशक किताबखाना पुणें.

**बाळ विज्ञानः**—लेखक रा. केशव विश्वनाथ घामणकर शिक्षक म्यु. मराठी शाळा चिंचपोकळी मुंबई.

‘ मानवी आयुष्याची क्षणभंगुरता नजरेस यावी, ’ व ‘ मुलांची शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक उन्नति व्हावी तसेंच तदंगभूत शौर्य, ऐक्य, धर्मनिष्ठा, पवित्र आचरण, देशभक्ति, राष्ट्रसेवा, समाजदोषनिवारण हे गुण मुलांचे आंगीं यावे या उच्च हेतूनें हें उजळणीचें व वाचनाचें पुस्तक लेखकानें लिहिलें आहे. यांत मूळाक्षरें, उजळणी,

१८०० जोडाक्षरयुक्त शब्द, संख्या, इंग्रजी महिने, हिंदू सण व स्मृतिदिन दिलेले आहेत. पुस्तकांत कांहीं गोष्टी दिलेल्या आहेत. त्यांतील भाषेचे दोन नमुने खालीं दिले आहेत. 'एक दारुबाज दुःख करीत वृक्षाखालीं बसला होता. तो दिवस शिवजयंती तृतीया होता. शिवरायाचा निःपक्षपातीपणा, जशास तसें वागणें वगैरे गुणानुवाद करीत शेजारचे सभागृहांतून मंडळी बाहेर पडली. तें पाहून झाला एवढा अधःपात पुरे असें म्हणून तो दारूबाज दुःखित अंतःकरणानें परत गेला.'

'स्वामींची अगाध विद्वत्ता, पवित्र आचरण, अत्यंत निरिच्छपणा, स्पष्ट भाषण वगैरे अलौकिक गुणांमुळें त्यांची कीर्ति फारच पसरली.'

लेखकाचें ध्येय उच्च नसल्यामुळें आपण शिशुवर्गाकरितां लिहीत आहों याची त्यास अगदीं विस्मृति झाली.

आधीं शब्द, नंतर जोडाक्षरें असलेले शब्द, नंतर गोष्टी, नंतर मुलांना अक्षरांची ओळख होण्याकरितां चित्रें असा या पुस्तकाचा चमत्कारिक अनुक्रम आहे. किं, २॥ आणे.

**लहान मुलांचे खेळः**—लेखक य. गो. मोडक बी. ए. या पुस्तकांत मुलांना योग्य अशा ६० खेळांचें वर्णन आहेत. यांतील पुष्कळ खेळ वर्गांत किंवा शाळेपुढील लहानशा मोकळ्या जागेंत खेळतां येतील. मुलांचें मनोरंजन व्हावें, त्यांना जुटीनें व शिस्तीनें वागतां यावें, त्यांना एकाग्रतेची संवय लागावी एवढ्याकरितां खेळांचा अभ्यासक्रमांत समावेश केला आहे. शिक्षकांना मुलांना योग्य अशा खेळांची माहिती नसल्यामुळें ते या मनोरंजक विषयाकडे लक्षच देत नाहींत. रा. मोडक यांच्या पुस्तकानें ही अडचण नाहींशी होईल. या पुस्तकांत ७ ते १३ वर्षांच्या मुलांमुलींना योग्य असे खेळ आहेत. किं. ८ आणे.

वरील पुस्तकें धाडणारांचे आम्ही फार आभारी आहों! कांहीं पुस्तकांवर अभिप्राय देण्यास फार विलंब लागला याजबद्दल आम्ही दिलगीर आहों. —संपादक.

**प्राथमिक भूगोल—पुस्तक २ रें**:—लेखक रा. काळे. अभिप्राय पुढील अंकीं.

---

## वर्गणीदारांस सूचना.

कन्याशिक्षकाचा या वर्षाचा डिसेंबर, जानेवारी व फेब्रुवारी या तीन महिन्यांचा जोड अंक छापण्याचें काम सरू आहे. तो अंक फेब्रुवारी २२ चे सुमारास पाठविला जाईल. ज्यांची या वर्षाची वर्गणी तोंपर्यंत येणार नाहीं त्यांजकडे हा अंक व्ही. पी.नें धाडला जाईल. १९२६ च्या मे महिन्यांत व्ही. पीनें वसूल केलेली वर्गणी मागील सालची होती. आम्ही नेहमीं वर्षाअखेर वर्गणी व्ही. पी.नें वसूल करितों. २२ फेब्रुवारीचे आंत वर्गणी पाठवून देण्याची कृपा करावी म्हणजे व्ही. पी. चा त्रास वांचेल. मागें पडलेले अंक काढून मासिक नियमितपणें काढण्याची व्यवस्था करीत आहों.

**व्यवस्थापक.**

---


टेक्स्ट म्हणून मंजूर झालेलीं. ] **मुलांचें अंकगणित.** [ कमिशन शें. २०.

पुस्तक १ लें. इ. २ करितां किं. ३ आ. पुस्तक २ रें, इ. ३ करितां किं. ३॥ आ. पुस्तक ३ रें, इ. ४ करितां किं. ५ आ. उदाहरण १५० उत्तरांसह मंजुरीकरितां पाठविलें आहे.

लेखक—म. गो. मोडक, एम्. ए. शिक्षक ट्रे. कॉलेज पुणें व द. ज. गोखले बी. ए. हेडमास्तर प्रॅ. स्कूल पुणें.

नवीन पद्धतीनें प्रथमच लिहिलेलीं; कन्याशिक्षक, इन्स्पेक्टिंग ऑफिसर्स वगैरेनीं वाखाणलेलीं, अन्ट्रेन्डशिक्षकांसही मार्गदर्शक उदाहरणें भरपूर.

**नाट्यरूप महाराष्ट्र**:—लेखक—वि. द. घाटे, एम्. ए. बी. टी. शिक्षक ट्रे. कॉलेज पुणें. अस्सल कागद पत्राचे आधारें लिहिलेला. तत्कालिन महाराष्ट्राचें चित्र यथावत् उभें करणारा, संवाद रूपानें लिहिलेला इतिहासप्रवेश ४२. किं. १ रु.

**मिळण्याचें ठिकाण**—पुणें मुंबई येथील प्रसिद्ध बुकसेलर्स विशेषतः ल. ना. गोडबोले लक्ष्मीरोड पुणें. पाचुरे पुराणिक कंपनी माधवबाग मुंबई, अगर मोडक ५०१ शनिवार पुणें.

---

मुंबई व मध्यप्रांत येथील शाळाखात्यानें बक्षिसाकरितां व लायब्ररीकरितां मंजूर केलेलें

संमाह्य ) **हिंदू—सण व व्रतें** ( किं. ६ आणे.

या नावाचें पुस्तक केवळ लहान मुलां—मुलींकरितां लिहिलें आहे. यांत सर्व सणांची व व्रतांची सोपपत्तिक माहिती गोष्टीरूपानें दिली आहे. करितां आजच ८७ चीं तिकिटें पाठवून मागणी करा.

लेखकः—श्री. बा. खांबेटे हेडमास्तर म्यु. मु. सात-रस्ता स्कूल मुं. नं. ११.

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:—१ लेखकाकडे.

२ मुंबईतील प्रसिद्ध बुकसेलर्स.

Registered No. B 1195.

लक्ष्मीबाई प्रधानकृत

# विणकला भाग १ ला.

अलीकडे स्त्रीशिक्षणाचा प्रसार झाल्यापासून त्याचेबरोबरच प्रत्येक सुशिक्षित कुटुंबांत विणकलेचा जारीनें प्रघात सुरू झाला आहे. त्या कलेवर आजपावेतों दोन तीन पुस्तकेंही प्रसिद्ध झालीं, परंतु या कलेचें पूर्ण ज्ञान होण्यास या पुस्तकासारखें पुस्तक झालें नव्हतें. यांत कर्त्रीनें इंग्रजी पुस्तकावरून उत्तम प्रकारचें ज्ञान संपादन करून एकंदर नमुने स्वतः विणून त्यांचे फोटो घेऊन त्या फोटोचे ब्लॉक नेरॉय कंपनीकडून तयार करवून आर्टपेपरवर छापून पुस्तकांत घातले आहेत व त्या त्या आकृतीचें वर्णन छापिलें आहे. यांत पुढीलप्रमाणें तीस प्रकारच्या विणी, गळपटे (दुरंगी साधे, टॉय ३ प्रकारचे), पायमोजे चार प्रकारचे, टोप्या (गंधर्व, सार्धा, गलोतें, रुमी, गांधी, साहेबी, कमळाची, प्रवासी, बॉनेट, थंडीची, प्रवासी चार सुयांची), स्वलीं ८ प्रकारचीं, गंजीफ्रॉक्स, साधे कोट, ओव्हरकोट, झुली, झाली वगैरे विणण्याची माहिती असल्यामुळें ही कला अवगत करून घेण्याला फारच उपयुक्त असें हें पुस्तक झालें आहे. पुस्तकाचे खर्चाचे मानानें किंमतही अल्प म्हणजे फक्त रु. १। ठेविली आहे. ट. ख. व्ही. पी. सह रु. १॥१०

मिळण्याचें ठिकाणः—लक्ष्मण नारायण गोडबोले, बुकसेलर लक्ष्मी-रोड, पुणें सिटी.

---

# पुस्तकांचें नवीन दुकान.

आमचेकडे सर्व तऱ्हेचीं इंग्रजी, मराठी व संस्कृत पुस्तकें मिळतात. स्त्रियांना उपयुक्त अशीं गाण्यांचीं, कहाण्यांची व गोष्टींचीं पुस्तकें आम्ही ठेवितों. आमच्या व्यवहाराबद्दल विद्वानांनीं उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत. व्यापारी व शाळामास्तर यांस भरपूर कमिशन दिलें जातें.

ए. पी. बापट ॲन्ड ब्रदर्स,
बुकसेलर्स आणि पब्लीशर्स,
बुधवार पेठ, पुणें शहर.

33
ता.

# कन्याशिक्षक.

वर्ष ११ वें. ] डिसेंबर ते फेब्रुवारी १९२६ १९२७ [अंक १० ते १२

पुणें एथें 'आर्यभूषण' छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन
यांनीं छापिलें व मिस् आर. नवलकर, बी. ए., लेडी
सुपरिंटेन्डन्ट ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें,
यांनीं पुणें एथें प्रसिद्ध केलें.

वार्षिक वर्गणी
ट. हा. सह १॥ रुपया.

या अंकाची
किंमत ९ आणे.

२५ फेब्रुवारी १९२७.

# कन्याशिक्षक

(डिसेंबर ते फेब्रुआरी.)
१९२६ १९२७


| विषय | | | पानें |
|---|---|---|---|
| अखिल भारतीय स्त्रीशिक्षण परिषद् | ... | ... | २२१–२३६ |
| चिनी लोकांच्या रीतिभाती | ... | ... | २३७–२४२ |
| ससा | ... | ... | २४२–२४५ |
| प्राचीन तक्षशीला | ... | ... | २४६–२४८ |
| सर जगदीशचंद्र बोस | ... | ... | २४९–२५७ |
| हरवलेला चेंडू ( ग. डि. व्ही. मॉडे. ) | ... | ... | २५८ |
| संख्यावाचन व लेखन | ... | ... | २५९–२६४ |
| वाक्यरचना | ... | ... | २६५–२६७ |
| अ. भा. स्त्रीशिक्षण परिषदेचे ठराव | ... | ... | २६७–२६८ |
| बिनमोल साडी ( गोष्ट ) | ... | ... | २६९–२७४ |
| पळरे भोपळ्या टुणुक टुणुक ( गोष्ट. ) | ... | ... | २७५–२७९ |
| खाईन शेवया मटक मटक ( गोष्ट ) | ... | ... | २८०–२८२ |
| कायदे मंडळाकरिता नवीन इमारत. | ... | ... | २८२–२८४ |
| सर्वनाम | ... | ... | २८५–२८६ |
| वादळ ( कविता ) | ... | ... | २८६–२८९ |
| ताऱ्यांचें निरीक्षण | ... | ... | २८९–२९३ |
| सरकारी जाहिराती | ... | ... | २९४–२९६ |
| इतर जाहिराती | | | |

२०९८

# कन्याशिक्षक.

जरि असेल रसज्ञपणा पुरा । जरि परोपकृतीत्र मनोहरा ।
जरि असे चतुरत्व, तरी मुला । शिकविण्यासम छंद नसे भला ॥

वर्ष १२ वें. ] डिसेंबर ते फेब्रुवारी १९२६-२७. [ अंक १० ते १२

## अखिल-भारतीय स्त्रीशिक्षण परिषद.

### पुणें येथील अधिवेशन.

आखिल भारतीय स्त्रीशिक्षण परिषदेच्या पहिल्या अधिवेशनास बुधवार ता. ५ रोजीं दुपारीं चार वाजतां, येथील फर्ग्यूसन कॉलेजच्या अँफीथिएटरांत सुरुवात झाली. परिषदेनिमित्त अँफीथिएटर निशाणें, पताका, आम्रपल्लव वगैरेंनीं सुशोभित करण्यांत आलें होतें. दुपारीं साडेतीन वाजण्याच्या सुमारास परिषदेच्या नियोजित अध्यक्ष बडोद्याच्या महाराणी हर हायनेस श्री.सौ.चिमणाबाईसाहेब गायकवाड यांची स्वारी परिषदेच्या ठिकाणीं येऊन दाखल झाली. परिषदेच्या स्वागताध्यक्ष सांगलीच्या श्री. सौ. राणीसाहेब, व स्वागत मंडळांतील प्रमुख सभासद यांनीं त्यांचें स्वागत केलें. निमंत्रित पुरुष पाहुणे, स्त्री प्रतिनिधि, व फर्ग्यूसन कॉलेजमधील विद्यार्थी यांनीं अँफीथिएटर चिकार भरून गेलें होतें. परिषदेच्या प्रतिनिधींत सर्व धर्मांच्या व जातींच्या प्रमुख सुशिक्षित स्त्रिया प्रामुख्यानें दिसत होत्या:—

प्रथम सेवासदनांतील विद्यार्थिनींनीं ईशस्तुतिपर स्वागतपर पद्यें म्हणून दाखविल्यानंतर, परिषदेच्या ऑनररी आर्गनायझिंग सेक्रेटरी मिसेस काझिन्स यांनीं सहानुभूतीचे संदेश वाचून दाखविले.

स्वागताध्यक्ष सांगली संस्थानच्या राणीसाहेब ह्यांनीं जमलेल्या प्रतिनिधींचें स्वागत केल्यावर त्या म्हणाल्या, “ आपल्या परिषदेच्या अध्यक्षस्थानीं बडोद्याच्या महाराणीसाहेब सौ. चिमणाबाईसाहेब ह्या लाभल्या ही विशेष सुदैवाची गोष्ट होय. स्त्रीशिक्षणाचें पाऊल पुढें पडण्याचे कामीं बडोदें संस्थानचें नांव सर्वतोमुखीं झालें आहे. स्त्रीशिक्षणा-सुद्धां सर्व प्रकारचे शिक्षणाचें निशाण कार्यकर्त्या लोकांनीं पुणें येथेंच फडकत ठेविलें आहे म्हणूनच ह्या परिषदेस हें ठिकाण विशेष योग्य होय. हिंदी स्त्रियांत अद्याप शिक्षणाचा प्रसार फारसा झालेला नाहीं; अशा स्थितींत चाललेल्या प्रयत्नांत आपण भाग घेणें अगदीं जरूर आहे. पूर्ण उदासीनता, उपहास, टीका व आदर, अशा चार अवस्थांतून स्त्रीशिक्षण बाहेर पडलें आहे. स्त्रीशिक्षणाचे कार्यांत लक्ष घालणाऱ्यांनीं स्त्रियांच्या गरजा व लायकी ह्यांकडे लक्ष पुरवून शिक्षणाची योजना केली नाहीं हें अगदीं स्वाभाविकच होय. बायकांच्या गरजा बायकानांच कळतात. म्हणून स्त्रीशिक्षणाचे बाबतींत पुरुषांकडून होणाऱ्या प्रयत्नांस स्त्रियांच्या प्रयत्नाची जोड असणें जरूर आहे. शिक्षणासंबंधीं धोरण आणि कार्यक्रम ह्यांचीं मूलभूततत्त्वें कोणतीं हें आंखून देण्याचें काम स्त्रियांनीं स्वतांच शिरावर घ्यावें इतकी प्रगति आतां झालेली आहे. हिंदी संस्कृति, परं-परा व हिंदी स्त्रियांच्या जीवनक्रमांत घेण्यासारख्या म्हणून ज्या कांहीं उत्कृष्ट गोष्टी आहेत त्या पुढील कोणत्याही योजनेंत कायम राखल्याच पाहिजेत. शारीरिक, भावनामय, मानसिक, नागरिक आणि धार्मिक अशा पांच दिशांनीं स्त्रीवर्गाची उन्नति घडवून आणण्याची योजना मला मान्य आहे. हें स्वरूप शिक्षणाच्या कोणत्याही योजनेंत आवश्यक आहे अशी माझी समजूत आहे. ”

## श्री. सौ. बडोद्याच्या महाराणीसाहेब यांचें भाषण.

प्रथम—अखिल भारतीय स्त्री-परिषदेचे प्रतिनिधींनो व भगिनींनो,

आज आपण एका उदात्त कार्यांत भाग घेण्यासाठीं जमलों आहोंत.

भविष्यकालावर लक्ष ठेवून या प्रसंगाचा जबाबदार रीतीनें आपण उपयोग केला तर हा प्रसंग इतिहासांत महत्त्वाचा असा गणला जाईल. हिंदी संस्कृतीचें पुनरुज्जीवन होत आहे, ज्याला हिंदी पुनरुद्धार असें म्हणतां येईल त्याचा उदय होऊं लागला आहे. अशा वेळीं एका महान् राष्ट्राच्या पुनर्जन्माच्या मूलभूत गोष्टींची चर्चा करण्यासाठीं आपण एकत्र आलों आहोंत. आपल्या राष्ट्राच्या भावी मातांचें शिक्षण व सर्वसाधारण हितसंवर्धन यांस अत्यंत जरूर असणाऱ्या गोष्टींचा खल आपणांस करावयाचा आहे.

## परिषदेचें महत्त्व.

मैत्रिणींनो, सर्व हिंदुस्तानांतील स्त्रीजात पहिल्या प्रथमच अशा प्रकारच्या परिषदेंत एकत्रित झाली आहे ही गोष्टच त्या जातींत राष्ट्रीयत्वाची भावना प्रदर्शित करण्याची शक्ति निर्माण झाली आहे, याची द्योतक आहे, हें आपणांस जाहीर केलें पाहिजे. मातां-विषयीं अभिमान बाळगणाऱ्या प्रत्येक पुरुषानें व प्रत्येक समजूतदार स्त्रीनें पाठिंबा दिला पाहिजे, अशा एका चळवळीचा पाया आपण आज घालूं या. आपल्या डोळ्यांसमोर जें ध्येय आपण ठेविलें आहे तें साध्य कसें करून घ्यावयाचें, साधनें कोणतीं उपयोगांत आणावयाचीं वगैरे गोष्टींचा या परिषदेनें निवाडा करावयाला पाहिजे. असली परिषद् म्हणजे कार्यास उद्युक्त होण्याचा एक इषारा आहे. आपणांस मागें ओढूं पाहाणाऱ्यांस हें एक आव्हान आहे. गुलामगिरी व अंधकार यांवर स्वातंत्र्य व प्रकाश यांचा विजय मिळविण्याकरितां सहकार्य करण्यास एक उत्तेजन आहे !

आजच्या प्रसंगाचें महत्त्व किती आहे आणि ज्या चळवळींत आपण आपल्या मगदुराप्रमाणें पडणार तिचा परिणाम किती खोल व दूरवर होणारा आहे याची जाणीव मला आहेच आहे; तथापि या प्रसंगीं अध्यक्षस्थान स्वीकारून आपल्या तद्विषयक विचारास वळण लावण्याची

जबाबदारी पत्करण्यास मी किती अयोग्य आहें या गोष्टीचीही जाणीव मला अधिक तीव्रतेनें वाटते. पण पुष्कळ वर्षें मीं हिंदी स्त्रियांच्या-संबंधींच्या प्रश्नांचा विचार केलेला असल्यामुळें आपलें आमंत्रण नाकारणें मला अशक्य झालें आणि शेवटीं हें कार्य मीं शिरांवर घेतलें. तें कोणत्याही स्त्रीला अभिमान वाटणारें असें कर्तव्य आहे ह्मणूनच अंगीकृत कार्यास मीं अगदींच नालायक ठरूं नये एवढीच माझी प्रार्थना आहे.

## मातेचा प्रभाव

ही पहिली परिषद पुण्यास भरत आहे याबद्दल पुण्याचें, आणि विशेषेंकरून स्त्रीशिक्षणांत पुढाकार घेणाऱ्यांचें मी अभिनंदन करतें. या शहराची पूर्वपरंपरा, तसेंच त्याची आधुनिक संस्कृति व बौद्धिक तेजस्विता यांच्यापासून आपल्या परिषदेस बहुमोल मदत होईल याविषयीं शंका नाहीं. एकट्या महाराष्ट्रासच काय, पण सर्व हिंदुस्तानास शिवाजीमहाराजांच्या वीरशालित्वापासून केवढें उद्दीपन प्राप्त झालें आहे याचें अशा वेळीं स्मरण झाल्यावांचून राहात नाहीं! त्याग केलेल्या परंतु आपल्या उच्चतम कर्तव्याच्या जाणीवेची ज्योत अंतःकरणांत सदैव तेवत असलेल्या आपल्या आईच्या प्रेमळ कृपाछत्राखालीं शिवाजीमहाराजांस जी शिकवण मिळाली तिचा परिणाम या वीरश्रेष्ठाच्या स्वभावावर व कर्तबगारीवर किती झाला असेल याचा विचार मनास स्पर्श केल्याखेरीज राहात नाहीं!! महाराजांस शारीरिक जन्म दिल्यानंतर जिजाबाईनें आपणांस त्यांच्या महानुभावी कार्यक्षमतेला जन्म देण्याच्या अधिक कठीण अशा कार्यास वाहून घेतलें. स्त्री-जात केवळ निरोगी देहांस प्रसविणारी नसून, निरोगी आत्म्यांसही निर्माण करणारी असली पाहिजे. त्यांच्या स्वतःच्या हिताकरितां आणि सर्व सामान्य कल्याणाकरितां “ निरामये शरीरे निरामयैवात्मा ” या म्हणींत संचित केलेल्या अर्थाची स्त्री–जात एक मूर्तिमंत प्रतिमा झाली पाहिजे.

अर्थात् सर्व समाज निरोगी असेल तरच शरीर व मन निरोगी राहाणार. स्त्रीविषयक प्रश्नांचा ज्यांनीं कळकळीनें विचार केला आहे त्यांची खात्री पटली असली पाहिजे कीं, मुख्य मुख्य बहुतेक प्रश्न समाजांतील स्त्रियांचा दर्जा व त्या दर्जाविषयींच्या खोट्या कल्पनांमुळें उत्पन्न झालेल्या चालीरीति यांच्याशीं जखडलेले आहेत. दुसऱ्या कोणत्याही जातींत अगर देशांत स्त्रीत्वाचें ध्येय जितकें श्रेष्ठ सांगितलें आहे तितकें श्रेष्ठ हिंदुधर्मांत देखील निर्दिष्ट केलेलें आहे, हें तपशीलवार दाखवून देण्याची आवश्यकता नाहीं; स्वातंत्र्याची पताका हातांत घेऊन सुधारणेच्या कार्यास प्रारंभ करण्याच्या उद्देशानें आपण जमलों आहोंत.

कोणत्या सामाजिक रूढींत ताबडतोब बदल व्हायायास पाहिजे त्याचा आपण प्रथम विचार करूं. त्या रूढी अशा आहेत कीं, सर्व बाजूंनीं आपणांस त्या सुधारण्याच्या बाबतींत मदत झालीच पाहिजे. या कार्यांत आपणां स्त्रियांची स्थिति अशी आहे कीं, त्यांनीं पाऊल अगोदर उचललें पाहिजे, पुरुष आपल्या मागें येण्यास तयार आहेतच. 'जसा रोग तसें औषध' या न्यायानें आपण उपायांची मागणी करूं.

## बालविवाह.

बालविवाहाच्या चालीचाच प्रश्न आपण अगोदर घेऊं. स्त्री-शिक्षणाच्या सार्वत्रिक फैलावाचा जर सर्वांत मोठा कोणी शत्रु असेल तर हा बालविवाह होय. शरिराची कोणत्याही तऱ्हेची खरीखुरी पूर्ण वाढ झालेली नाहीं, स्वतःला कांहीं स्वतंत्रजीवित आहे याची कल्पना आलेली नाहीं, अशा अप्रबुद्ध कोमल वयांत एखाद्या तिच्यासारख्याच लहान वयाच्या नवऱ्याशीं लहान मुलीचें लग्न करून दिलें जातें. तो नवरा मुलगाही ह्या बालविवाहाच्याच तडाख्यांत सांपडलेला. अशा स्थितींत लग्न हें एक पोरखेळ ठरल्यास आश्चर्य कसलें? कांहीं वेळां या बालनवरीचें एकाद्या घोडनवऱ्याशीं लग्न केलें जातें. मग काय विचारतां? त्याला त्या मुलीबद्दल जरूर तो आदर असत नाहीं किंवा

तिच्या मनांत आपणाविषयींही आदरबुद्धि ती उत्पन्न करूं शकत नाहीं. केवळ मूल म्हणून खेळण्याबागडण्याची वयोमर्यादा नुकतीच ओलांडली आहे अशा या लहान मुलीस तिच्या इच्छेविरुद्ध मातृपद घ्यावें लागतें. या बालमाता आपल्या अर्भकांना धडधाकट शरीरसंपत्ति कोठून कमावून देणार ? पराक्रमी पुरुष उत्पन्न करण्याकरितां जें एक नैतिक शिक्षण आईनेंच द्यावें लागतें तें तरी ह्या मुली कशा देणार ? आपल्या मुलीची जोपासना करून प्रेमळ स्त्रिया व माता तरी ह्यांच्याकडून कशा पैदा होणार ? स्वतःचेंच सुखी शैशव व तारुण्य गमावून बसलेल्या या बालमातांना उच्च संस्कृतीची गोडी व सुखें माहीत नसलीं तर त्यांत आश्चर्य नाहीं ! त्या बिचारीला बाल्यावस्था व मातृपद यांखेरीज त्यांचेमधील सुखी व महत्त्वाची तारुण्यावस्थेची कल्पनाही नसते ! स्वतःच्या भरदार सुखाला अगर आपल्या मुलांच्या सुशिक्षणाला लागणाऱ्या जरूरीच्या गुणांचाहि तिच्याजवळ जवळ जवळ पूर्ण अभावच असतो. जर आपल्याला सामर्थ्यवान व पराक्रमी पुरुष व कन्या राष्ट्रांत उत्पन्न व्हाव्या अशी खरोखर आकांक्षा असेल, तर शरिरानें समर्थ व प्रौढ अशा माता आपण उत्पन्न केल्या पाहिजेत. व ही गोष्ट सिद्ध व्हावी म्हणून मुलींची वाढ पूर्ण झाल्याखेरीज त्यांचीं लग्नें होऊं देतां उपयोगी नाहीं. अठरा वर्षांची वयोमर्यादा न घातल्यास हें उद्दिष्ट पार पडणें शक्य नाहीं. बालविवाहाच्या या दुष्ट चालीमुळें राष्ट्राचें किती नुकसान होत आहे याची नुसती कल्पना केली तरी सतीच्या चालीपेक्षांही ही भयंकर चाल आहे अशी खात्री होईल. कायद्यानें सतीची चाल बंद केली त्यापेक्षांही ही बालविवाह पद्धति अधिक तातडीनें कायद्यानें बंद करणें जरूर आहे. सतीला भयंकर यातना सोसाव्या लागत, पण त्या अल्प काळच टिकणाऱ्या होत्या. परंतु, बालविवाहाच्या दुष्ट चालीमुळेंच अवर्णनीय अशा दुःखाच्या अग्नीनें साऱ्या आयुष्याचीच होळी होते व सुखाची राखरांगोळी बनते याचा विचार व्हावयास नको काय ?

## संमति वय.

संमति-वयाची मर्यादा कायद्यानेंच कमींत कमी सोळा ही ठेविली पाहिजे. पुष्कळ सामाजिक परिषदांतून या विषयाला अग्रस्थान दिलें जातें ही संतोषाची गोष्ट होय. सर हरिसिंग गौर यांनीं या बाबतींत मोठी कामगिरी केली आहे. त्यांच्या कामगिरीबद्दल सर्व हिंदी स्त्रीवर्ग त्यांचा सदैव ऋणीच राहील. असेंब्लीच्या पुढील बैठकींत सर हरिसिंग संमतिवयाची मर्यादा लग्नाच्या अगोदर अगर नंतरहि सोळा वर्षे मुक्रर करावी म्हणून ठराव आणणार आहेत. या त्यांच्या ठरावाला आपण या सभेंत स्वतंत्र ठराव करून आपला पूर्ण पाठिंबा दिला पाहिजे. नुसता हा ठराव करूनहि भागावयाचें नाहीं. हिंदुस्तान-सरकारला व असेंब्लीला हा सर हरिसिंगांचा ठराव मान्य करणें भाग पडावें म्हणून सर्व देशभर आपण जोराची चळवळ केली पाहिजे. ही गोष्ट घडवून आणण्याकरितां आपण जितके प्रयत्न कराल तितके थोडेच आहेत. आपणाला लोकांचीं मनें वळविलीं पाहिजेत. या व असल्याच दुसऱ्या सुधारणा घडवून आणण्याकरितां, याच कामास वाहिलेल्या अशा संस्था निर्माण केल्या पाहिजेत. कौन्सिलांतून पाठविलेल्या आपल्या प्रतिनिधींच्या मागें सारखा लकडा लावून ठराव पास करून घेतला पाहिजे व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करवून घेतली पाहिजे. राष्ट्र सुशिक्षित व सुसंस्कृत करण्याच्या आपल्या सर्व प्रयत्नांचें यशापयश आपल्या विवाहाच्या चालींतील सुधारणांवर अवलंबून आहे असें माझें मत आहे. म्हणून माझी या परिषदेस आग्रहाची शिफारस आहे कीं, आपल्या विचारविनिमयांत आपण या प्रश्नास अग्रस्थान दिलें पाहिजे.

## पडद्याची चाल.

पडद्याची चाल मोडून टाकावी असें आमचें आग्रहाचें सांगणें आहे. पूर्वींच्या काळीं स्त्रियांच्या संरक्षणार्थ ही चाल पडली, पण तसला संकटकाळ आतां गेला असल्यानें ही गोषाची चाल म्हणजे आरोग्याल

व सुखाला विघ्नच होऊन बसलें आहे ! पडद्याच्या चालीमुळें शरीर व मन खुरटें होतें व इतरही दोष उद्भवतात. पण त्यांचें वर्णन करण्याची जरूरी नाहीं. सामाजिक उन्नतीला स्त्रियांनीं हातभार लावावा, आणि आपल्या बायकांना जें कर्तव्य करण्याला व जी जबाबदारी शिरावर घेण्याला तयार करावयाचें त्यांची जाणीव आधीं स्वतः त्यांना असली पाहिजे, हें आपल्यास मान्य असल्यास पडद्याची पद्धति नष्ट झालीच पाहिजे. स्त्रियांना विचारस्वतंत्रता आणि जीवन आनंदमय करणाऱ्या विविध गोष्टींची आवड यांचा लाभ मिळावयाचा असल्यास पडदा दूर झालाच पाहिजे. पडदानशीन स्त्री म्हणजे पिंजऱ्यांत कोंडलेली मैना ! तिला ज्ञानाचें द्वार खुलें नसल्यानें ती अज्ञानांत गटंगळ्या खात असते आणि पाळींव प्राण्याप्रमाणें तिची वाढ व उन्नति पाळणारांच्या लहरींवर अवलंबून असते. झनान्यांत ज्ञानरवीच्या किरणांचा प्रवेश होऊं शकत नाहीं. तिची इच्छा, आवडानिवड कांहींही न पाहतां तिचा विवाह करून टाकण्यांत येतो. मुलगी ह्मणजे गरीब गाय, तिला पालकानें खाटकाच्या स्वाधीन केलें तरी आपल्या मानेवर सुरी ठेवणाऱ्याचे हात ती अज्ञानानें चाटीत असते ! असल्या घनघोर अज्ञानांधकारांतून आपणांस स्त्रीजातीला वर काढावयाचें आहे. राजकीय स्वातंत्र्यासाठीं आमचे सन्मान्य राष्ट्रभक्त आपल्या हाडांचीं काडें करीत असून सामाजिक उन्नतीचें कार्य त्यांनीं बाजूस सारलें आहे. अशा राष्ट्रभक्तांना शेलेच्या शब्दांत असें विचारावें लागतें कीं, ‘ स्त्रिया गुलाम राहिल्या तर पुरुष स्वतंत्र होतील काय? ’ स्त्रियांच्या उन्नतीशिवाय झालेली राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रगति ही एकांगी व डळमळीत अशीच असणार.

ही दुःस्थिति आपण नाहींशी करूं शकणार नाहीं काय? आमच्या भगिनींना गोषांतील अंधारकोठडींतून ज्ञानाच्या व सुसंस्कृतीच्या प्रकाशांत आपण आणूं शकणार नाहीं काय? हें सत्कार्य कसें घडवून आणावें या प्रश्नाचें निश्चित उत्तर या परिषदेनें दिलें पाहिजे. तुर्कस्था-

नांतील स्त्रियांनीं आपलें बंधविमोचन करून घेतलें; आह्मीही तसेंच करून घेऊं शकूं. आमच्या पायांतल्या या शृंखला तोडा आणि आह्मांस या अज्ञानयुगांतल्या दुष्ट चालीच्या तडाक्यांतून सोडवा, असा आमच्या बालिकांचा आक्रोश आमच्या कानीं पडत आहे. भरतखंडांतील सर्व स्त्रीजात एक विचारानें आपलें हें गाऱ्हाणें वेशीवर बांधील तर हिंदुस्तान सरकार आणि हिंदी संस्तानाधिपति हे आपल्या साहाय्यास येतील. पण लोकमत जागृत करण्याची जबाबदारी आमच्यावर आहे. आम्हीं लोकमताचा एवढा प्रचंड ओघ आपल्या बाजूस वळविला पाहिजे कीं, त्याला विरोध करणारे मूठभर लोक या ओघाच्या सपाट्यांत वाहून गेले पाहिजेत.

स्त्रियांची गुलामगिरींतून मुक्तता करून उन्नति घडवून आणण्याविषयीं सर्व देशभर जागृति झाल्याचीं सुचिन्हें दिसत असलेलीं पाहून आनंद वाटतो. गेल्या एक दोन वर्षांत स्त्रियांनीं अनेक क्षेत्रांत शीघ्र प्रगति केलेली आहे. त्यांना म्युनिसिपालिट्यांत मत देण्याचा व निवडून येण्याचा हक्क मिळाला आहे. कौन्सिल निवडणुकींत मतदानाचा अधिकार त्यांना प्राप्त झाला असून कित्येक प्रांतांत स्त्रिया स्वतः उमेदवार राहूं शकतात. स्त्रियांच्या सामाजिक दर्जासंबंधानें पंजाबप्रांत सर्वांत मागासलेला मानला जातो; पण त्या प्रांतानेंही एक स्त्री-सभासद कौन्सिलांत पाठवून इतर प्रांतांना उदाहरण घालून दिलें आहे. मद्रास प्रांतांतही डॉ. मुथुलक्ष्मी अम्मल यांची प्रांतिक कौन्सिलांत यंदाच नेमणूक करण्यांत आली आहे.

## स्त्रीशिक्षणाची सद्यःस्थिति.

संपत्तिविषय, स्त्रियांचें संरक्षण, उद्योगधंद्यांतील स्त्रियांचा दर्जा आणि इतर कामें या संबंधानें कायद्यांतही पुष्कळ महत्त्वाची प्रगति झाली आहे. कायदा, वैद्यक, वाङ्मय व इतर प्रकारच्या विद्या यांतही कित्येक स्त्रियांनीं चांगलें नांव कमावलें आहे. पण कांहीं स्त्रियांस उच्च प्रतीचें शिक्षण संपादन केल्याबद्दल लौकिक मिळवितां आला असला तरी तेवढ्यावरून देशांतील सर्व स्त्रीसमाज सुशिक्षित झाला असें म्हणतां येणार नाहीं.

हिंदुस्तानांत स्त्री–शिक्षणाची प्रगति किती घडून आली आहे हें आंकड्यांवरून ठरविणें अधिक प्रशस्त होय. खालील कोष्टकावरून पुरुष व स्त्रिया यांच्या साक्षरतेची ( दर हजारीं ) नीट कल्पना येईल.

| | पुरुष | स्त्रिया | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ हिंदुस्तान | १३९ | २१ | १ काश्मीर | ४६ | ३ |
| २ म्हैसूर | १४३ | २२ | २ बिहार | ९६ | ६ |
| ३ मुंबई इलाखा | १५७ | २७ | ३ मध्य हिंदुस्तान | ६५ | ७ |
| ४ बडोदे | २४० | ४७ | ४ हैद्राबाद | ५७ | ८ |
| ५ कोचीन | ३१७ | ११५ | ५ मध्यप्रांत | ८७ | ९ |
| ६ त्रावणकोर | ३८० | १७३ | | | |

एकंदरींत स्त्री–शिक्षणाची प्रगति तितकी समाधानकारक नसली तरी साक्षरतेच्या आंकड्यांचा आणखी एका प्रकारानें विचार केल्यास तो बराच आशाजनक वाटतो. कारण १० ते १५, १५ ते २० वर्षें वयाच्या मुलींत शिक्षणाचा प्रसार अधिक प्रमाणांत आहे. त्या पुढील पिढीच्या लवकरच होणाऱ्या माता होत आणि त्यांची संख्या वाढत आहे यावरून स्त्री-शिक्षणाकडे समाजाचें लक्ष अधिक आहे असें निर्विवाद सिद्ध होतें. हिंदुस्थानांतील स्त्रिया हजारीं २१ या प्रमाणांत साक्षर आहेत तर १० ते १५ वर्षें वयापर्यंतच्या मुलींचें साक्षरतेचें प्रमाण हजारीं २८, व १५ ते २० वर्षें वयापर्यंतच्या मुलींत हें प्रमाण हजारीं ३६ आहे.

इंग्रजी शिक्षणाचे आंकडे फारच निराशाजनक आहेत. १० हजार स्त्रियांत १२ स्त्रियांना दुय्यम इंग्रजी शिक्षण मिळालें आहे. दुय्यम इंग्रजी शिक्षणांतील स्त्रियांच्या या मंदगतीमुळें जे महत्त्वाचे प्रश्न सुचतात त्यांचाच आजच्या परिषदेंत आपणांस विचार करावयाचा आहे.

या प्रश्नांचे निर्णय आपणांस देणें अवघड नाहीं व त्यासंबंधीं ठरावही पास करितां येणार नाहींत असें नाहीं. तथापि त्याप्रमाणें सुधारणा घडून येणें हें कालावधीचें व खर्चाचें काम आहे, यांत शंका नाहीं. खाजगी प्रयत्नानें कांहीं काम होईल, परंतु तें ‘ दर्यामे खसखस’ इतक्या बेताचेंच होणार. स्त्री–शिक्षणाची योग्य ती कल्पना समाजास

असणें व स्त्री-शिक्षणप्रसाराचा तगादा सारखा सुरू ठेवणं भाग आहेच. तथापि त्याच्या खऱ्या प्रसाराची जबाबदारी विद्याखात्याचा कारभार ज्यांच्याकडे आहे त्यांजवरच येऊन पडते. सरकारचे वरिष्ठ अधिकारी व हिंदी संस्थानिक यांस या कार्याविषयीं सहानुभूति वाटते व त्यास त्यांची मदतही मिळेल यांत संदेह नाहीं. पंजाबचे गव्हर्नर सर माल्कम हेले यांनीं स्त्री-शिक्षणास शक्य त्या सवलती देण्याचें कबूल केलें आहे, एवढें सांगितलें असतां वरिष्ठ अधिकाऱ्यांचें या बाबतींतील धोरण सहज लक्षांत येणार आहे.

## स्त्रियांची शरीरसंपत्ति

हिंदी स्त्रियांची शरीरसंपत्ति खालावत आहे ही गोष्ट जनतेच्या नजरेस अलीकडेच आली आहे. स्त्रियांनीं व्यायामानें शरीर सुधारावें असें सांगणें सोपें आहे; पण तो व्यायाम कोणत्या प्रकारचा असावा हें ठरविणें मात्र कठीण आहे. स्त्रियांची शरीररचना व मनोरचना यांचें ज्ञान वेगवेगळ्या व्यायामाचे परिणाम काय होतात याचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्यानेंच प्राप्त होणार आहे. हा भाग तपशिलाचा असून तिकडे परिषदेंतील सभासदांनीं लक्ष पुरवावें इतकेंच मी सध्यां सुचवितें. शारीरिक व्यायामापासून शरिरास नुसती मजबुतीच नव्हे तर त्यांत एक प्रकारचा जोम,स्वातंत्र्याची आवड व आनंद हींही उत्पन्न झालीं पाहिजेत.

स्त्रिया व पुरुष यांस एकत्र शिक्षण देण्यासंबंधानें बरेच गैरसमज उद्भवले आहेत. स्त्रिया व पुरुष यांची ताटातूट करणें निसर्गाविरुद्ध आहे ही गोष्ट प्रारंभीं लक्षांत घेतली पाहिजे. स्त्रिया व पुरुष यांचे एकमेकांच्या गुणधर्मासंबंधानें या ताटातुटीमुळें भलभलते समज होतात. एका कुटुंबांतील मुलगे व मुली हीं एकत्र लहानाचीं मोठीं होतात व एकमेकांबरोबर खेळतात. जो नियम कुटुंबास तोच शाळेसही लागू. हा भाग लहान वयांतला झाला. पण प्रौढ वयांत वेगळीच अडचण उत्पन्न होते. मुलगे व मुली यांच्या वाढीचें प्रमाण वेगळें पडतें. मुली मुलांपेक्षां मानसिक व शारीरिक बाबतींत झपाट्यानें पुढें जातात. या वयापासून उभयतांच्या कार्यांत फरक पडावयाचा असल्यामुळें कांहीं काल त्यांची ताटातूटच करणें आवश्यक होय. स्त्रियांच्या

ठिकाणीं निसर्गतःच भिन्न असे गुणधर्म व उत्कटपणा सांठविला असून त्यांजकडे दुर्लक्ष करणें अगर तो दडपून टाकणें इष्ट नाहीं. स्त्रियांची कार्यक्षमता व सद्गुण यांची जोपासना करणें हें स्त्रीशिक्षणांतील मुख्य कर्तव्य आहे. यासाठीं स्त्रियांकरितां शाळा व कॉलेजें वेगळींच पाहिजेत. त्या शिक्षणसंस्थाचें लक्ष नुसता ठराविक अभ्यास स्त्रियांकडून करून घेण्यावर न राहतां स्त्रियांचे नैसर्गिक गुण व शील यांचें संवर्धन कसें होईल इकडेहि तें असलें पाहिजे.

## कठीण पण अशक्य नव्हे.

या बाबतींत या परिषदेपुढें प्रथमदर्शनीं एक मोठी अडचण येईल असें मला वाटतें. ती अशी कीं, आज ज्या स्त्रिया स्त्रीशिक्षणाच्या प्रश्नांत मन घालीत आहेत, त्यांचें स्वतःचें शिक्षण पुरुषांनीं घालून दिलेल्या पद्धतीनें झालेलें आहे. हल्लींहि आपल्या मुलींच्या शाळांतून व विश्वविद्यालयांतूनहि तीच पद्धत चालू आहे. या प्रकारच्या मुलींच्या शिक्षणानें उत्पन्न केलेल्या पूर्वग्रहांपासून मुक्त होऊन स्वतंत्र विचार करण्याची पात्रता आणणें ही सर्वांत मोठी अडचण होय. तुम्ही स्वतः घेतलेल्या शिक्षणाची विशिष्ट पद्धति व सद्यःपरिस्थिति यांनीं आपल्या स्वतंत्र विवेचक बुद्धीला ग्रासन टाकूं न देतां आपली विशिष्ट व स्वतंत्र दृष्टि बनवावी असें माझें तुम्हांला आग्रहपूर्वक सांगणें आहे. हें कठीण आहे खरें, पण तें अशक्य आहे असें मात्र समजूं नका.

मुली व स्त्रिया यांच्या शिक्षणांतील अनेक धंद्यांत येणाऱ्या अडचणींना तोंड द्या असें मी आग्रहपूर्वक सांगतें. स्वास्थ्य, संरक्षण, गृहव्यवस्था, बालसंगोपन, सौंदर्याचें मर्म जाणण्याचें शिक्षण, आणि संगीत व चित्रकला यांचा अभ्यास इत्यादि गोष्टींचें ज्ञान मुलींना असावें अशा प्रकारचे मामुली ठरीव सिद्धान्त पुनः पुन्हा उच्चारण्याची वेळ आतां गेली आहे. या गोष्टींबद्दलची मागणी उत्तरोत्तर अधिक तीव्रतेनें होऊन त्यांची चळवळ चोहोंकडे जोरानें करविणें हें आवश्यक आहे हें खरें. पण असा नुसता पुनः पुन्हा उच्चार करण्यानें भागण्यासारखें नाहीं. या बाबतींत स्पष्ट व तपशीलवार योजना पुढें आल्या पाहिजेत. हिंदी आयुष्याचें ध्येय व त्याची सद्यःपरिस्थिति यांत वरील

गोष्टी कोणत्या प्रकारें अंतर्भूत होतात याचा नीट अभ्यास करणें जरूर आहे. उदाहरणार्थ, पाश्चिमात्य देशांतील परिस्थितीस लागू पडणारें, तेथें उपयुक्त असणारें गृहव्यवस्थेचें ध्येय जसेंच्या तसें इकडे लागू करण्यानें फायद्यापेक्षां नुकसानच अधिक होईल. सुधारणेच्या चळवळींतलि प्रमुख हिंदी स्त्रियांच्या उद्धाराच्या या चळवळीचा प्रथम उपक्रम करणाऱ्या तुमच्यासारख्या स्त्रियांनीं, केवळ काय करावें, याबद्दल बोलत न बसतां, हा अभ्यास स्वतःच हातीं घेऊन, त्याला जरूर तीं पुस्तकें लिहून काढलीं पाहिजेत.. असें केल्याशिवाय या ठिकाणीं होणारी आपली चर्चा बहुतांशीं निष्फळच ठरेल. या तपशिलाच्या प्रश्नाकडे आतां आपण लक्ष दिलें पाहिजे. आणि हा तपशीलही सर्व बाजूनें भिन्न आहे. मुलगे व मुली, पुरुष व स्त्रिया यांचें आपण कोणत्या प्रकारें शीलसंवर्धन करूं शकलों असतों, याचा विचार केल्यास असें आढळून येईल कीं, प्रत्येक बाजूला लागणारीं पुस्तकेंही भिन्न भिन्न प्रकारचीं असलीं पाहिजेत. त्याच प्रमाणें इतर बाबतींतही मूलतः भेद आहे हें आपण ओळखावयास नको काय? पुरुष व स्त्रिया यांना एकाच प्रकारचें संगीत आवडतें काय व तसें होणें इष्ट आहे काय? इतिहासाचे जे भाग पुरुषांना उद्बोधक वाटतात तेच स्त्रियांसही उद्बोधक वाटणें शक्य आहे काय? का इतिहासांत पुरुषांचे दृष्टीनें एका गोष्टीस विशेष महत्त्व व स्त्रियांचे दृष्टीनें दुसऱ्या गोष्टीस महत्त्व अशी स्थिति आहे? अशा प्रकारच्या सूचनांवर टीका होईल त्यास भितां कामा नये. स्त्रियांच्या विशिष्ट गुणाचा विकास न करणारी प्रचलित शिक्षण-पद्धति मोडावयाची असेल व त्यासाठीं आज अतिशयोक्तीची जरूरी असेल तर, ती करण्यासही आपण भिऊं नये.

## सर्वांना हवेसें धोरण.

या अखिल-भारतीय परिषदेची पूर्व तयारी करण्यासाठीं ज्या सभा भरल्या त्यांतलि बहुतेकांनीं मुलें व मुली यांना सर्वत्र सक्तीचें शिक्षण द्यावें अशी शिफारस केली आहे. अशा तऱ्हेची सक्ति ब्रिटिश मुलुखांतलि कांहीं भागांत नुकतीच प्रचलित झाली असून कांहीं संस्थानांतून ती बऱ्याच पूर्वीपासून प्रचारांत आहे. सक्तीच्या आवश्यकतेबद्दल शंका

घेण्याचा काळ आतां गेला आहे. यामुळें या परिषदेला विचार करावयाचा तो सक्तीच्या आवश्यकतेसंबंधीं नसून, सर्वांना हवेसें वाटणारें हें धोरण अमलांत आणण्याचे मार्गांतील अडचणी दूर करावयाचा विचार आहे. हें धोरण यशस्वी करावयाचें तर या बाबतींत स्त्रियांमधून सतत व सक्रिय चळवळ चालविली पाहिजे. स्त्रियांच्या—एका मध्यवर्ती संस्थांच्या धोरणानें कार्य करणाऱ्या स्त्रियांच्या—स्थानिक संस्थामार्फत या बाबतींत बरेंच कार्य होऊं शकेल असें मला वाटतें.

आमच्या या म्हणण्याची सत्यता अमान्य करणारे फार थोडे आहेत. स्त्रियांसाठीं खऱ्या शिक्षणाचा प्रसार सर्वत्र व्हावा अशीच सर्वांची इच्छा; पण असें असतांही पालकांच्या व शिक्षण—कार्यांत पडणाऱ्यांच्या मनांत यासंबंधीं साशंकतेची छाया पसरलेली आहे. आम्ही ज्या शिक्षणयोजना सुचवितों त्यांच्या आर्थिक उपयुक्ततेविषयीं ते शंका प्रदर्शित करतात. हा आर्थिक प्रश्न खरा आहे. हिंदुस्तानांत पुरुष व मुलें यांच्या शिक्षणाचे बाबतींतही मॅट्रिक व बी. ए. पदवीच्या परीक्षेस लागणाऱ्या शिक्षणाहून भिन्न असें धंद्याचें व पेशाचें विशिष्ट शिक्षण देण्याच्या प्रश्नाचा विचार नुकताच सुरू होत आहे. नवीन धर्तीचीं स्वतंत्र विश्वविद्यालयें स्थापण्याच्या कारणांपैकीं हें एक मुख्य कारण आहे. पण स्त्रियांचें शिक्षण आर्थिक दृष्ट्या उपयुक्त होण्यास तें पुरुषांच्या शिक्षणाच्या पद्धतीनेंच दिलें पाहिजे अशी समजूत असल्यामुळें, स्त्रियांच्या शिक्षणपद्धतींतील सुधारणेस आळा घालण्याची किंवा विरोधहि करण्याची प्रवृत्ति दिसत आहे ही दुःखाची गोष्ट होय. ही प्रवृत्ति चुकीची आहे, असें दाखवून दिल्याशिवाय, मीं दिग्दर्शित केलेल्या धोरणाची प्रगति होणें शक्य नाहीं. पण आपण ही प्रवृत्ति चुकीची आहे हें दाखवून देऊं. तें आपण केलेंच पाहिजे. हा या परिषदेपासून एक प्रत्यक्ष फायदा आहे. मुलींचें शिक्षण जर भिन्न पद्धतीनें व्हावयाचें तर त्यांना शिकविणाऱ्यांचें शिक्षणही भिन्न पद्धतीनेंच व्हावयास पाहिजे. लेडी आयर्विन यांना हिंदी स्त्रियांच्या उन्नतीस हातभार लावावयाचा असेल तर स्त्री—शिक्षकिणींसाठीं एक खरें कार्यक्षम असें ट्रेनिंग कॉलेज काढण्याचे कामीं त्यांनीं आपल्या वजनाचा उपयोग करावा. या कॉलेजांतून हिंदी स्त्रिया व मुली

यांच्या शिक्षणाचें पुनरुज्जीवन व पुनर्घटना करण्याच्या कामीं समर्थ अशा स्त्रिया तयार झाल्या पाहिजेत.

आपल्या धर्मानें निर्दिष्ट केलेल्या, इतिहासानें मूर्तिमंत उभे केलेल्या, व आपल्या या परिषदेनें ठरविलेल्या ध्येयानें प्रेरित केलेलें वरील पद्धतीचें एक ट्रेनिंग कॉलेज आपण काढूं शकलों, तर आपण आपल्या प्रगतीच्या मार्गावर एक पाऊल पुढें टाकल्यासारखें होणारं आहे. आपण असेंही दाखवूं या, कीं केवळ स्त्रियांनाच योग्य व त्याच उत्तम तऱ्हेनें करूं शकतील, असे पुष्कळ उद्योग व पुष्कळ धंदे आहेत. स्त्रियांना पुरुषी थाटाचें व घाटाचें शिक्षण दिल्यानें होणारे दुष्परिणाम आपण टाळले पाहिजेत. जे धंदे व उद्योग पुरुषच उत्तम तऱ्हेनें करूं शकतील अशा धंद्यांत व उद्योगांत आपण त्यांच्याशीं स्पर्धा करण्यांत अर्थ नाहीं. तसें करणें योग्यही नाहीं व तो मामला आपल्या हातून पारही पडणार नाहीं. ह्मणून वरील विचारसरणीच अमलांत आणणें युक्त आहे.

## कायद्यांत दुरुस्ती झाली पाहिजे.

या परिषदेनें स्त्री-शिक्षणावरील आर्थिक विचारांना अनिष्ट वळण लागूं देतां कामा नये. पण आम्हीं स्वतःलाच असें विचारून पाहावें कीं, अर्थशास्त्रदृष्ट्या स्त्रियांची स्थिति काय आहे याविषयीं आपले विचार आपण धैर्यानें बोलून दाखविणें, आणि ती सुधारण्याचा प्रयत्न करणें जरूर आहे कीं नाहीं? या देशांत स्त्रियांना मतदानाचा हक्क कांहीं अंशीं मिळाला आहे. राजकीय संस्थांतून स्त्रिया सभासद होत आहेत. अर्थात् स्त्रियांना आपल्या हक्कानें मिळकतही धारण करतां आली पाहिजे आणि कुटुंबांतील मिळकतींत त्यांना योग्य हिस्सा असला पाहिजे. नवरा रागीट किंवा लहरी निघाला म्हणून तो मेल्याबरोबर भिकाऱ्याप्रमाणें अन्नवस्त्रापेक्षां स्त्रीला कांहीं अधिक अधिकार उरूं नये, आणि इतरांनीं त्यांची सर्व मिळकत घेऊन भोगावी आणि मग त्यानें यांच्याकरितां कांहीं केलें नसलें तरी चालेल, हा किती मोठा अन्याय आहे, हें शब्दांनीं व्यक्त करवत नाहीं. स्वतः स्त्रीकडे दोष नसून, तिची आणि नवऱ्याची फारकत झाली नसेल तर त्याच्या मिळकतीपैकीं, कांहीं ठराविक हिस्सा स्त्रीला मिळावा, असा कायदा होणें जरूर आहे.

मिळकत, काडीमोड, मुलांवरील ताबा आणि इतर अशाच अनेक गोष्टी यांसंबंधानें विवाहित स्त्रियांचे कायदेशीर हक्क आणि त्यांचें अधिष्ठान या सर्वांचा पद्धतशीर विचार होऊन सचना केल्या गेल्या पाहिजेत. आमच्या या परिषदेनें या विचारांच्या पूर्वतयारीकरितां एखादी लहानशी. कमिटी नेमली तर तें योग्य होईल.

प्रस्तुत परिषदेंत आम्ही एकंदर स्त्रीवर्गासंबंधाचा विचार करीत आहों. त्यांतील विशिष्ट उपवर्गासंबंधानें नाहीं. पण असा एक लहानसा स्त्रियांचा वर्ग आहे कीं, त्यांच्यासंबंधानें कांहीं थोडें बोलणें जरूर आहे, हा वर्ग म्हणजे हिंदुस्थानांतील राजघराण्यांतील राण्या, महाराण्या यांचा. पूर्वकालीं यांना स्वातंत्र्य व शिक्षण या दोहोंची जोड होती. मुंबईच्या एका पत्रांत कोणा एकीनें करुणोद्गारानें या वर्गाची स्थिति वर्णिली आहे. कदाचित् लेखकच स्वतः या वर्गापैकीं असेल मात्र. मला किंवा तुम्हांला ती कोण आहे, हें माहीत नाहीं. वर्तमानपत्राचा आश्रय करून अशा रीतीनें तिला आपली करुणकहाणी सांगावी लागली याबद्दल मला खेद होतो. तथापि अशा रीतीनें कां होईना, या वर्गातील स्त्रियांच्या दुःखाला वाचा फुटूं लागली आहे, ही गोष्ट बरीच म्हणावयाची. एतद्विषयक सुधारणांविषयीं, आतां आमच्या परिषदेनें आपले स्पष्ट विचार जाहीर करावे. स्त्रीप्रतिनिधींनो, हिंदी स्त्रीजातीच्या या कार्यात आपण सहभागी व सहकारी आहों. आपण असा निश्चय करूं या कीं, आपल्या परिषदेंतील चर्चेचा निर्णय उच्च बुद्धिमत्तेचा असाच होईल. आपल्या कार्याविषयीं दृढविश्वास आणि दुर्दम अशा प्रकारची सात्त्विक आशा बाळगून आपण आपल्या चर्चेस प्रारंभ करूं. हिंदी स्त्रीजातीच्या हिता-करितां किंबहुना सर्व देशाच्या हिताकरितां एक होण्यास तुम्हीं सर्वांनीं एकमुखी मागणी केली पाहिजे. त्याशिवाय कार्यसिद्धि होणार नाहीं. स्वातंत्र्यसुख आणि शांती यांचें संशोधन ही एक पुण्यकारक यात्राच होय आणि तिची पताका हातीं घेण्याची वेळ हिंदुस्तानांत सर्व स्त्रियांना आतां आली आहे.

---

टीप—या परिषदेनें पास केलेले ठराव पुढें दिले आहेत.

# चिनी लोकांच्या रीतिभाती.

( पुढील लेख मिस् सॉयर यांनीं कन्याशिक्षकाकरितां हांगकांगहून लिहून धाडला. मिस् सॉयर या चीनमध्यें शिक्षणाचें कार्य करीत आहेत. त्यांना निकट परिचयामुळें चिनी समाजाची चांगली माहिती झाली आहे, यामुळें त्यांना या विषयावर साहजिकच उत्कृष्ट लिहितां येईल. मूळ लेख इंग्रजींत आहे, त्याचें हें भाषांतर आहे. याच विषयावर आणखी तीन चार लेख त्या लिहिणार आहेत. —संपादक. )

सध्यां शास्त्रीय शोधामुळें दूर देशाचा प्रवासही सुखांत, थोडक्या खर्चांत व सहज करितां येतो, यामुळें बहुतेक देशांची एकमेकांनीं चांगली माहिती झाली आहे. यामुळें वाचकांना नवीन माहिती देणें ही गोष्ट फारशी शक्य नाहीं, म्हणून माझे लेख त्यांना कंटाळवाणे व नीरस वाटतील अशी मला धास्ती वाटत आहे.

मी हांगकांग व कौलून एथें गेलीं चार वर्षें घालविलीं आहेत आणि म्हणून या मासिकाच्या संपादकांनीं मला या विषयावर लिहिण्याचा आग्रह केला. एकाद्या देशांतील लोकांच्या रीतिभातीसंबंधानें कितीतरी लिहितां येईल, कारण हा विषयच फार व्यापक आहे. मी प्रस्तुतच्या लेखांत चिनी लोकांच्या कांहीं थोडक्या चाली व करमणुकी यांसंबंधानें लिहिणार आहें.

चिनी कुटुंबाच्या आयुष्यक्रमांतील अत्यंत महत्त्वाचा दिवस म्हटला म्हणजे वर्षप्रतिपदा किंवा नव्या वर्षाचा पहिला दिवस हा होय. स्त्रिया, पुरुष व मुलें या सर्वांनाच हा दिवस अतिशय आनंदाचा व महत्त्वाचा वाटतो. चिनी लोकांची वर्षप्रतिपदा फेब्रुवारी महिन्याच्या सुमारास येते. वृद्ध आणि तरुण, श्रीमंत आणि गरीब, स्त्रिया आणि पुरुष, मुलें व मुली सारख्याच उत्सुकतेनें या सणाची वाट पाहात असतात. हा सण येण्याच्या

आधीं १०।१२ दिवसांपासून तयारीला सुरुवात होते. यावेळीं आपलें घर स्वच्छ व सुशोभित करण्यास प्रत्येक गृहिणी झटत असते. या सणाचे वेळीं व अगोदर कांहीं दिवस लोकांना आपलीं घरें, अंगणें, रस्ते व आपल्या घरांतील सामान स्वच्छ करावें लागतें; म्हणून हांकांकांगची म्युनिसिपालिटी त्या दिवसांत पाण्याचे नळ नेहमींपेक्षां जास्त तास मोकळे ठेवते. या दिवसा-करिता अनेक प्रकारचीं पक्वान्नें करण्यांत चिनी गृहिणी आधींच कांहीं दिवस गढून जातात. प्रतिपदेच्या आधल्या दिवशीं संध्याकाळीं प्रत्येक कुटुंबांत मेजवानीचा बेत असतो. यावेळीं कुटुंबांतील माणसें परस्परांना व आप्तेष्टांना देणग्या देतात. जेवणाचे वेळीं फटाके उडवितात व देवांना व पूर्वजांना नैवेद्य दाखवितात. या दिवशीं धार्मिक चिनी स्त्रिया रात्रीं बिलकूल झोप घेत नाहींत. सर्व रात्र पूजाविधि व फटाकडे उडविण्याचें काम चालू असतें. प्रतिपदेच्या दिवशीं काम करावयाचें नसतें, यामुळें सर्व कामें आदल्या रात्रींच स्त्रिया उरकतात. वेणीफणी देखील त्या या रात्रींच करतात. प्रतिपदेच्या दिवशीं पहांटेच लहान मंडळी उठून वडील मंडळीस नमस्कार करण्यास व त्यांचे आशीर्वाद घेण्यास जातात. चाकर मंडळी आपल्या धन्यास नमस्कार करून त्याचें कुशल चिंतितात. या दिवशीं कोणीही स्त्री किंवा पुरुष आपल्या ओळखीच्या एकाद्या घरीं गेला कीं घरची मंडळी चांदीची किंवा लाकडाची रंगित डबी त्याचे पुढें करितात. या डबींत खडीसाखर व कलिंगडाच्या बिया असतात. कुटुंबांतील मुख्य स्त्री पाहुण्याला बिया व खडीसाखर घेण्याची विनंती करिते व नंतर 'आपणाला हें नवीन वर्ष सुखाचें जावो, आपणांस या वर्षीं विपुल धनधान्य मिळो' असें अभिष्ट चिंतन करिते. नंतर ती पाहु-ण्याला चहाचा पेला व तांबड्या खजुराच्या दोन आंठ्या देते. खजूर हा शुभदायक मानतात व प्रतिपदेच्या दिवशीं तो खाल्ल्यानें संपत्ति व ऐश्वर्य वाढतें असा चिनी लोकांचा समज आहे. चिनी पति व पत्नी आपल्या घरीं आलेल्या आप्तेष्टाच्या मुलांना व नोकराचाकरांना

चांदीचीं नाणीं तांबड्या कागदांत गुंडाळून देतात. या दिवशीं प्रत्येक-जण सुंदर पोशाक करितो व श्रीमंताच्या ललना बहुमोल हिऱ्याचे अलंकार अंगावर घालतात. या दिवशीं सर्व लोकांना सुटी असते, यामुळें सर्व दुकानें व कारखाने बंद असतात. सर्वजण या सणाचे दिवशीं विश्रांति घेतात व हा दिवस आनंदात घालवितात.

चिनी लोकांचा दुसरा महत्त्वाचा सण म्हटला म्हणजे चिंग-मिंग हा होय. हा सण २२ दिसेंबर नंतर १०६ दिवसांनीं येतो. एका स्वामिभक्त चिनी प्रधानाच्या स्मरणार्थ चिनी लोक हा सण पाळ-तात. या प्रधानानें आपल्या अल्पवयी राजाला त्याच्या सावत्र आईच्या कारास्थानापासून सोडविलें. या मुलाला ठार मारून स्वतांच्या मुलाला गादीवर बसवावें अशी या राणीची फार इच्छा होती, म्हणून तिनें सावत्र मुलाचा जीव घेण्याकरितां अनेक युक्त्या योजल्या. पण प्रधा-नाच्या शहाणपणामुळें व स्वामिनिष्ठेमुळें त्या फुकट गेल्या. प्रधानानें आपल्या धन्याचे सुरक्षिततेकरितां त्याला दूर देशीं नेलें. तेथें अनेक संकटांत व विपत्तींत त्याचें रक्षण केलें व राणीचा मुलगा वारल्यानंतर पुन्हा आपल्या धन्यास त्याचे गादीवर बसविलें. राजा गादीवर बस-ल्यावर त्याला या जुन्या सेवकाची विस्मृति पडली. तेव्हां हा प्रधान आपल्या आईसह दूर एका डोंगरावर राहाण्यास गेला. पुढें राजाला पश्चात्ताप झाला व आपल्या जुन्या सेवकाला आपणाजवळ बोलवावें अशी इच्छा झाली. राजानें त्याला बोलावणें पाठविलें, पण आपण आपला एकांतवास सोडून पुन्हा राजदरबारांत येण्याची आपली इच्छा नाहीं असें त्यानें राजास कळविलें. राजानें परोपरीनें त्याची विनंती केली, पण प्रधानानें परत दरबारांत जाण्याचें साफ नाकारलें. हा त्याचा निश्चय पाहून राजाही हट्टास पेटला. त्यानें त्या प्रधानाच्या घरास आग लावून देण्याचा आपल्या चाकरास हुकूम केला. राजाला वाटलें कीं, प्रधानाचें घर जळलें कीं प्रधान मग आपणांकडे सहज येईल. पण

राजाची कल्पना पूर्णपणें चुकली. घराला आग लागल्यावर प्रधान त्या घरांत तसाच बसून राहिला. आपल्या जागेपासून यत्किंचितही हालला नाहीं. शेवटीं आगींत त्याचा देह जळून त्याची रक्षा झाली. राजाला ही बातमी कळतांच त्याला आपल्या कृत्याबद्दल अत्यंत दुःख झालें. त्या दिवशीं व नंतर पुढें दरवर्षीं त्याच तिथीला आपल्या राज्यांतील लोकांनीं विस्तव पेटवूं नये, कोणतीही आनंदाची गोष्ट करूं नये व हा दिवस अशुभ आहे असें समजून तो घालवावा असा जाहिरनामा त्या राजानें काढला. कांहीं काल गेल्यानंतर लोकांना या प्रधानाच्या करुणकहाणीची विस्मृति झाली. आतां या दिवशीं चिनी लोक आपल्या पूर्वजांच्या थडग्यांचें दर्शन घेतात. या दिवशीं आपल्या पूर्वजांच्या थडग्यांच्या दर्शनार्थ जाणाऱ्या हजारों कुटुंबांच्या माणसांनीं आगगाड्या,ट्राम व नावा भरून चाललेल्या असतात. प्रत्येक कुटुंबाचे बरोबर त्या दिवसाच्या फराळाची बेगमी असते. मंडळी आपल्या पूर्वजांच्या थडग्यांचे जागीं पोहोंचल्यावर तो दिवस तेथेंच आनंदांत घालवितात. आणलेल्या सर्व सामुग्रीचा पूर्वजांस नैवेद्य दाखवितात. दारूचे तीन पेले भूमीवर सांडून आपल्या पूर्वजांचें ते तर्पण करितात. थडग्यापुढें ऊद, कापूर, चंदन वगैरे सुवासिक पदार्थ जाळतात आणि या थडग्याचें दर्शन देऊन त्यांची संभावना झाली हें दाखविण्याकरितां त्याजवर लाल कागद ठेवितात व ते कागद उडूं नयेत म्हणून त्यांजवर धोंडा किंवा मातीचें ढेकूळ ठेवितात. संध्याकाळीं मंडळी घरीं परत जातात व दुसऱ्या दिवशीं आपल्या इष्टमित्रांना बोलावून त्यांना मेजवानी देतात. या दिवशीं जे जेवावयाला येत नाहींत, त्यांचे घरीं वाढण वाढन पाठवून देतात.

चिनी लोकांना कांहींतरी करमणूक अवश्य पाहिजे. तिजशिवाय त्यांना चैन पडत नाहीं. चिनी लोकांत जुगारीचा नाद लहानापासून थोरापर्यंत

असतो. आपणाजवळ जें कांहीं असेल तें पैजेला लावून मुलें, मुली, तरुण, तरुणी, वृद्ध स्त्रिया व वृद्ध पुरुष जुगार खेळत असतात. हा खेळ खेळण्यांत ते रात्रच्या रात्र घालवितात. पहांटे चार वाजेतोंपर्यंत जुगार खेळणारी मंडळी कितीतरी दृष्टीस पडतात. जुगार बहुतेक पत्यांनींच खेळतात, लहान मुलेंही वाळूचे खडे लावून पत्यांनीं रस्त्यांत जुगार खेळत असतात. जुगार खेळण्याकरितां म्युनिसिपल अगर सरकारी परवानगी दिलेले अड्डे असतात. मी या अड्ड्यांत कधींही न गेल्यामुळें त्यांचें वर्णन करणें मला शक्य नाहीं.

या जुगारीचा गीफा नांवाचा एक प्रकारचा मजेचा खेळ आहे. एक मनुष्य एकाद्या जनावराच्या अगर पक्ष्याच्या वर्णनपर एकादी कविता म्हणतो. या कवितेंत त्या जनावराचें अगर पक्ष्याचें नांव नसतें, पण वर्तमान असतें. या जनावराचे अगर पक्ष्याचे नांवावर पैज लावलेली असते. नांव बरोबर सांगितलें तर पैज जिंकली असें होतें, नांव बरोबर न आल्यास पैज हरली असें होतें.

नाटकें व सिनेमा हीं चिनी लोकांच्या मनोरंजनाचीं दोन साधनें होत प्रत्येक शहरांत नाटकगृहें व सिनेमागृहें पुष्कळ असतात व तीं, प्रेक्षकांनीं दररोज चिकार भरतात. नाटक मंडळींत पुरुषांच्या व स्त्रियांच्या अशा निरनिराळ्या मंडळ्या असतात. स्त्री, पुरुषांची मिश्रमंडळी चिनांत नसते. पुरुष स्त्रियांची भूमिका इतकी सुंदर घेतात कीं स्त्रीची भूमिका करणारा पुरुष आहे, स्त्री नाहीं हें कळणें देखील पुष्कळ वेळां कठिण जातें. एकच नाटक कधीं कधीं तीन तीन चार चार दिवस चाललेलें असतें.

चिनी समाजांत एकत्र जमण्याचे प्रसंग म्हणजे भोजनें, हे होत. चिनी लोकांची आदरातिथ्याबद्दल फार ख्याति आहे. भोजनप्रसंगाकरितां कधींकधीं चिनी गृहस्थ शेंकडों रुपये खर्च करितात. भोजनाला शेंकडों

आप्तेष्टांना व मित्रांना आमंत्रण देतात. भोजनें बहुतेक हॉटेलांत होतात. या हॉटेलाचा मालक भोजनाची व वाढण्याची सर्व व्यवस्था ठेवितो. भोजनाची तयारी मोठ्या व्यवस्थेशीर रीतीनें केलेली असते. यावेळीं पक्वान्नांची गर्दी असते. जेवणाचे वेळीं गायकांचें गायन व वादन चाललेलें असतें. चिनी लोकांमध्यें युरोपियन लोकांची नाचाची पद्धत ही हळूहळू सुरू झाली आहे. शहरांतून हे नाचाचे समारंभ सर्व साधारण होत चालले आहेत.

पूर्वीं चिनी लोकांना उघड्या हवेंतील मर्दानी खेळ आवडत नसत आणि ते विश्रांतीचा वेळ घरांत बसूनच घालवीत. पण अलीकडे क्रिकेट, फूटबाल यांसारखे खेळ चिनी लोकांना फार आवडूं लागले आहेत. चिनी तरुण मंडळी अमेरिका, इंग्लंड वगैरे देशांत शिकावयास जातात व तेथें त्यांना या खेळांची गोडी लागते व ते देशांत परत आल्यावरही हे खेळ आनंदानें खेळतात.

---

## ससा.

ससा हा प्राणी पुष्कळांनीं पाहिला आहे. पुष्कळ श्रीमंत लोक हौसेनें घरीं ससे बाळगतात. हा प्राणी जंगलांत राहातो. हा जबर पळणारा असल्यानें पुष्कळ शिकारी लोक कुत्रे बरोबर घेऊन याची शिकार करितात. कधीं कधीं तर गंमत म्हणून शिकारी कुत्र्यांच्या पुढें पकडलेले ससे ३०।३५ हात अंतरावर सोडून कुत्र्यांकडून त्यांस पकडून त्यांचे लचके तोडवितात ! अशा रीतीनें अंगावर शहारा आणणारा हा एक करमणुकीचा विषय आहे.

हे प्राणी जंगलें, शेतें वगैरे भागांत जमिनीच्या आंत घरें करून राहातात. यांचीं घरें म्हणजे बिळें जमिनीच्या पोटांत लांबच लांब पसरलेलीं असून त्यांत हजारों ससे सहज राहूं शकतात. या बिळाचें बाहेरील तोंड

सहा इंचांहून मोठें नसतें; पण परस्परांना समोरा समोर गांठ पडल्यास ओलांडून जातां यावें म्हणून हीं बिळें मधून मधून फूट रुंदीचीं ठेवलेलीं असतात. या बिळांना पुढील व मागील दार असतें पण हीं दोन्हां दारें एक-मेकांपासून पुष्कळच दूर असतात. हीं दारें—बिळांचीं तोंडें—सहसा दुसऱ्या-च्या अगर शत्रूच्या नजरेस येऊं नयेत म्हणून झुडुपांनीं झाकलेल्या जागेंत असतात. भुयारांच्या या दोन दारांशिवाय प्रसंगविशेषीं उपयोग होण्यासाठीं मधूनच बाहेर पडण्यास कांहीं वाटा राखून ठेविलेल्या असून त्यांचा त्यांना संकटाचे वेळीं चांगला उपयोग होतो.

यांच्या या भुयारांत लहान पिलें ठेवण्यसाठीं आंत नेहमींच्या रहदारीच्या मार्गापासून अलग अशा कांहीं जागा उकरून ठेविलेल्या असतात व बाहेर जातांना शत्रू आंत आल्यास त्याला या जागांचा मागमूस लागूं नये म्हणून यांच्या तोंडावर माती सरकवून देण्याची व्यवस्था करतात. यांचे मुख्य शत्रु म्हटले म्हणजे कोल्हे व रानमांजरें हे होत. याशिवाय माणसें शिकार करतात ते निराळे. वर सांगितल्याप्रमाणें यांच्या भुयारांचीं तोंडें अरुंद असलीं तरी कधीं कधीं त्यांचा शत्रु आंत प्रवेश करतो व अशा बिळांत ससा शिरल्यास अचानक शत्रूच्या हातीं सांपडतो. अशा प्रसंगीं सुटका होण्यासाठीं त्याची काय धांदल उडत असेल याची कल्पनाच केली पाहिजे. तेथून मागें सरकून वळतां आल्यास त्याचें भाग्यच म्हटलें पाहिजे.

एकदां एक शेतकरी आपल्या शेतांत जमीन उकरीत असतां त्याला एक बीळ लागलें. तें कसलें बीळ म्हणून तो उकरीत गेला. उकरतां उकरतां एके ठिकाणीं त्या बिळांत अगदीं लहान, अंगावर किंचित् लव असलेलीं अशीं सशाचीं पांच पिलें आढळलीं. पण तीं त्यानें तेथून न उचलतां तशींच तेथें झांकून ठेवण्याची व्यवस्था केली. दुसऱ्या दिवशीं पाहातो तों तीं तेथून सशांनीं दुसरीकडे नेण्याची व्यवस्था केली असें त्यास दिसलें. ससे हे शेतांची नासधूस करतात. शेतकऱ्यांचें फार नुकसान होतें म्हणून हे प्राणी हातीं लागल्यास शेतकरी यांना बिलकूल क्षमा न करितां यमलोकाचा रस्ता दाखवितात. आस्ट्रेलियासारख्या देशांत शेतांना सशांपासून विल-क्षण उपद्रव झाला आहे. तेथें त्यांपासून शेतांचें रक्षण करण्यास तारांचीं

कुंपणें उभारण्यासाठीं शेतकऱ्यांना हजारों रुपये खर्च करावे लागले आहेत.

हा भाग जर बाजूस ठेवला तर ससा हा दिसण्यांत फार गोजिरवाणा प्राणी आहे, याला घरीं बाळगलेला पाहाण्यापेक्षां त्याच्या स्वाभाविक स्थितींतच त्याला पाहाणें हें फार आनंददायक असतें. संध्याकाळ होत चालली म्हणजे एखाद्या डोंगरकडडीला यांच्या स्वाऱ्या आपापल्या बिळां-मधून हळू हळू बाहेर पडूं लागतात, मग त्यांच्या खेळास सुरुवात होते. शिकारी लोकांना अशा गोष्टी पाहावयास सांपडतात. एकदां एक शिकारी जंगलांत संध्याकाळीं एका झाडाजवळ बसला होता. इतक्यांत त्याजपासून कांहीं हातांवर सप् सप् असा आवाज त्याला ऐकूं आला. तेव्हां तो न्याहा-ळून पाहूं लागला, तों त्याला गवतापलीकडे पाठमोरा बसलेला एक ससा भसाभस जमीन उकरीत असतांना दिसला. तो पुढील पायांनीं जमीन उकरून मागील दोन पायांनीं ती माती मागें फेंकीत होता. अशा रीतीनें त्याचें काम जारीनें चालू होतें. उकरण्याचें काम चालू असतां पुढें खडक लागला त्यामुळें त्याचा नाइलाज होऊन त्याला आपलें काम थांबवावें लागलें व तो तसाच मागें सरकला व वळला तों काय? त्याची व शिकाऱ्याची दृष्टादृष्ट झाली! एक सेकंद दृष्टादृष्ट झाली असेल नसेल तोंच तो ससा बंदुकीच्या गोळीसारखा एका निमिषांत फाडकर उडी मारून जवळच्या बिळांत शिरून पार नाहींसा झाला. पुढील पायांपेक्षां त्याचे मागील पाय लांब व बळकट असल्यानें त्यांचा त्याला पळण्याचे कामीं अतिशय उपयोग होतो.

ससा हा पांढरा अगर बांड्या रंगाचा असतो. याच्या आंगाबरोबर बारीक लव असून तींतून जास्त लांब असे केस बाहेर येऊन त्यांचें चांगलें जाड आच्छादन बनतें व यामधूनही आणखी लांब पण विरळ असें केस वर येतात. अशा रीतीनें त्याच्या कातडीवर केसांचें तिहेरी आच्छादन असतें व त्यानें त्याचें थंडीपासून चांगलें रक्षण होतें.

सशाला तोंडाच्या आकाराच्या मानानें कान जरा जास्त लांब असतात पण त्यामुळें त्याची सौंदर्यहानी न होतां तें उलट वाढतें. लांबचा कानोसा घेण्यास त्याला या कानांची फार मदत होते. या प्राण्याला पळण्याशिवाय स्वतःचें रक्षण करण्याचें दुसरें साधन नसल्यानें तर अशा प्रकारच्या

कानाची फारच आवश्यकता आहे. त्यामुळें त्याला झुडुपांतील अत्यंत बारीक आवाजसुद्धां ऐकूं येऊन शत्रूंपासून आपलें रक्षण करतां येतें.'

एखादा पदार्थ खात असतांना त्याचें सुरकुतणारें व हालणारें नाक, मागें पुढें व बाजूस हालणारा त्याचा खालचा जबडा पाहिला म्हणजे पाहणारास मोठें कौतुक वाटतें.

पदार्थ चावण्यासाठीं व तोडण्यासाठीं त्याला पुढील बाजूस खालीं आणि वर असे २।२ दांत असतात. या दांतांसंबंधीं लक्षांत ठेवण्याची गोष्ट म्हटली म्हणजे ते एकसारखे वाढत असतात. पदार्थ खात असतांना एकमेकांवर घासून ते थोडे झिजतात म्हणून बरें, नाहीं तर एकसारखे वाढणारे दांत हे त्या प्राण्याच्या जिवावर एक संकटच आहे. जर सशाचा एखादा दांत पडला तर त्याच्या समोरील बाजूचा दांत वाढूं लागून समोरच्या दांताच्या जागेपर्यंत वाढत जातो व त्या जागीं शिरून घट्ट बसतो. असा दांत वाढला म्हणजे त्या प्राण्याचे खाण्यापिण्याचे व्यापार बंद होऊन त्यास मरण येतें. खातांना त्याचे ओठ दांतांत सांपडूं नयेत म्हणून सृष्टिदेवतेनें त्याचा वरील ओठ चिरलेला आहे. ही त्यांतल्यात्यांत एक सोयच म्हणावयाची. ससा झाडाची कोंवळी साल, टर्निप, गाजरें, रताळीं, विलायती गवत वगैरे पदार्थ खातो.

सशाचे डोळे सुंदर व पाणीदार असतात. ते चांगले मोठे असून ज्ञाताला धरून मऊ लागतात. ते लाल असून माणकाप्रमाणें चमकतात. ते ईश्वरानें त्याच्या डोक्याच्या एका बाजूस बसविले असल्यानें त्याला आपल्यापेक्षां पुष्कळच जास्त गोष्टी एकदम दिसूं शकतात. त्याच्या डोळ्यांना तिसरी एक पापणी असते तीमुळें जमीन उकरीत असतांना उडणारी धूळ त्याच्या डोळ्यांत शिरत नाहीं.

त्याचें नाक मोठें तीक्ष्ण आहे व त्यामुळें डोळ्यांनीं पाहाण्यापूर्वींच त्याला आपल्या शत्रूच्या हालचालींचा सुगावा लागतो. सशाला भीति वाटल्याबरोबर तो आपले कान टवकारून व बारीक शेपूट आंगाभोंवतीं इकडून तिकडे हालवीत टणाटण उड्या मारीत पळूं लागला म्हणजे त्याज

पासून इतर सशांसही इशारत मिळते व जो तो आपल्या बिळाचा रस्ता सुधारतो.

मागील दोन पायांवर बसून व कान उभारून ससा जेव्हां पुढील पायानें आपलें तोंड साफ करीत बसतो त्यावेळीं त्याची आकृति फारच मोहक दिसते.

अशा प्रकारचा हा प्राणी प्रत्यक्ष पाहून, त्याचें निरीक्षण केल्यास तुम्हांस स्वतःला याचपासंबंधानें किती तरी माहिती मिळवितां येऊन वरील हकीगत वाचून होणाऱ्या आनंदापेक्षां खात्रीनें शतपट जास्त आनंद होईल यांत शंका नाहीं.

---

# प्राचीन तक्षशिला.

जमिनींत गडप झालेल्या प्राचीन शहरांपैकीं तक्षशिला नांवाचें शहर पुराणवस्तुसंशोधन खात्यानें जमिनींतून उकरून काढलें आहे. त्यांतील निरनिराळ्या वस्तूंवरून त्यावेळच्या हिंदुस्तानच्या प्राचीन इतिहासावर नवीन प्रकाश पडेल.

प्राचीन ग्रंथांशिवाय त्यावेळचा विश्वसनीय इतिहास मिळण्यास दुसरें खात्रीलायक साधन उपलब्ध नसल्यानें हिंदुस्तानानच्या प्राचीन इतिहासासंबंधीं भरपूर माहिती मिळत नाहीं. तथापि विद्वान् लोकांनीं शक्य तितकी माहिती गोळा करून प्राचीन इतिहासाची सुसंगत जुळणी केली आहे. हल्लींप्रमाणें पूर्वीं हिंदुस्थानांत इतिहास लिहून ठेवण्याची पद्धति नसल्यानें राजतरंगिणीसारख्या काव्यमय ग्रंथांचाच इतिहासाप्रमाणें उपयोग करून घ्यावा लागला आहे. पण पुराणवस्तु संशोधन—खात्याच्या प्रयत्नानें जमिनींतून प्राचीन शहरें उकरून काढण्याचें काम जारीनें सुरू झाल्यापासून पुष्कळशा जुन्या वस्तु वगैरे सांपडल्या; त्यामुळें त्यावेळचा इतिहास समजण्यास बरीच मदत होत चालली आहे.

अलीकडे सिंध प्रांतांतही असें एक प्राचीन शहर खणून काढलें असून तेथें जमिनींत गडप झालेल्या तत्कालीन पुष्कळ वस्तु सांपडल्या आहेत त्यांवरून त्यावेळींसुद्धां हिंदुस्तानानें सुधारणेच्या बाबतींत जगाच्यापुढें किती आघाडी मारिली होती हें स्पष्ट दिसतें. या खात्यास पूर्वीचें पाटलिपुत्र ऊर्फ पाटणा शहर खणून काढण्यास लागणाऱ्या पैशाची मदत सरकारनें मंजूर केली आहे.

हल्लीं नुकतेंच या खात्यानें जें तक्षशिला शहर खणून काढलें आहे त्या-बद्दल थोडीशी माहिती खालीं दिली आहे.

हें शहर पंजाब प्रांतांत झेलम व सिंधू या नद्यांच्या दरम्यान रावळ-पिंडीच्या वायव्येस २० मैलांवर वसलें होतें. हिमालयावरील मरी नामक हवा खाण्याच्या ठिकाणापासून हें फारसें दूर नाहीं. हें शहर सुमारें १२०० वर्षें अस्तित्वांत होतें. या काळांत या शहरांत नऊ वेळां फेरबदल कर-ण्यांत आला; पण या शहरानें आपली मूळची जागा तीन ठिकाणींच बदलली असें दिसतें. या शहराचा विस्तार सुमारें ३० मैल होता असें म्हणतात.

युरोपांतील मॅसिडोनिया प्रांताचा राजा अलेक्झांडर–दी–ग्रेट ऊर्फ शिकंदर यानें हिंदुस्तानावर इ. स. पूर्वी ३२७ च्या सुमारास स्वारी केली होती त्यावेळीं या प्रदेशांतील अंभी नामक राजानें शिकंदर यास पोरस राजाच्या वेळीं मदत केली होती. या वेळेपासून हिंदुस्तानाबाहेरील लोकांच्या स्वाऱ्या हिंदुस्तानावर सुरू झाल्या. त्यांनीं जे इतिहास लिहून ठेविले आहेत त्यांवरून व बाहेरील देशच्या प्रवाशांच्या वर्णनांवरून त्या वेळेनंतरचा इतिहास जास्त खात्रीलायक मिळूं शकतो.

हल्लीं उकरून काढलेल्या शहरांत शिकंदरच्या वेळचीं नाणीं सांपडलीं आहेत. या नाण्यांवर एके बाजूस शिकंदरचा मुखवटा असून दुसऱ्या बाजूस ग्रीक पौराणिक देवता 'झुअस' हिचें चित्र आहे. या शिवाय हिंदुस्तानांत त्या वेळीं उपयोगांत असणारीं पुष्कळशीं इतर नाणींही सांप-डलीं असून तीं तिकोनी, चौकोनी, पंचकोनी व लांबट अशा निरनिराळ्या आकाराचीं आहेत व त्यांवर दांडगा व वर्तुळें यांचे ठसे मारिले आहेत.

शिवाजीच्या वेळचा दाडचा असलेला शिवराई पैसा ज्यांनीं पाहिला असेल त्यांना या नाण्यांची कल्पना येईल. यांपैकीं कांहीं नाणीं इतकीं लहान आहेत कीं तीं प्रचारांत असतांना कशीं हरवत नसत याचें आश्चर्य वाटतें.

या नाण्यांशिवाय तांब्याचीं लहान मोठीं व निरनिराळ्या आकारांचीं भांडीं सांपडलीं आहेत. तांब्याच्या भांड्यांप्रमाणेंच त्या वेळचीं रांजणाच्या आकाराचीं लहान मोठीं मातीचीं भांडीं सांपडलीं असून त्या रांजणांच्या कांठांवर नक्षीकाम केलेलें आहे.

या सामानांत कांहीं कर्णभूषणें सांपडलीं असून एक सुंदर रत्नखचित माळ सांपडली आहे. एक 'दीपदान' सांपडलें आहे. त्यावर दाखविलेली चिमणी, आंतील बाजूस काढलेलीं बेडूक, मासा वगैरे चित्रें यांवरून पृथ्वी, आप, तेज, वायु या कल्पना लक्षांत येण्याची योजना असावी असें दिसतें.

या उकरलेल्या दोन शहरांपैकीं एकाची मांडणी फार अव्यवस्थित दिसते. रस्ते वेडेवांकडे व अरुंद, घरें कच्च्या विटांनीं बांधलेलीं. मध्यें चौक राखून त्या भोंवतालीं राहाण्याच्या जागा बांधलेल्या अशी एकाची मांडणी आहे. पण दुसऱ्या शहरांत रस्ते सरळ असून मांडणी जास्त पद्धतशीर दिसते.

बुद्धकालीन नालंद, वल्लभी, उज्जयिनी या शहरांप्रमाणेंच तक्षशिला हें शहर विद्या व कला यांचें एकेवेळीं आगर होतें. हल्लीं सांपडलेल्या व सांपडत असलेल्या वस्तूंच्या योगानें वरील गोष्टींच्या सत्यतेबद्दल खातरी होईल.

या प्राचीन वस्तुसंशोधनानें हिंदुस्तानचा प्राचीन इतिहास जास्त स्पष्ट होत जाऊन येथील लोकांच्या कर्तृत्वाची जगाला ओळख पटत जाईल, पण हिंदुस्तानच्या लोकांना त्यामुळें आपल्या प्राचीन वैभवाची साक्ष पटून भावी काळ जास्त उज्ज्वल करण्याची स्फूर्ति उत्पन्न होईल तरच या कामीं होणाऱ्या खर्चाचें योग्य चीज झालें असें म्हणतां येईल.

# सर जगदीशचंद्र बोस.

चालू विसावें शतक भौतिक शास्त्रांतील शोधांचें आहे, असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. या शोधांमुळें दिवसेंदिवस मनुष्याची प्रगति फार झपाट्यानें होत आहे. शंभरवर्षांपूर्वींचे लोक व आजचे लोक यांच्या आचारविचारांत जमीनअस्मानचें अंतर पडलें आहे. इंग्लंड, अमेरिका हीं स्थळें हिंदुस्तानापासून चार आठ दिवसांच्या टप्प्यावरचीं होऊं पाहात आहेत. एवढा दूरचा हिमालय, पण त्याची यात्रा सुखानें एक दोन दिवसांत करतां येईल असा आज अंदाज करण्यास हरकत नाहीं. दुपारीं दिल्लीला व्हाइसरायांनीं केलेलें भाषण त्याच दिवशीं सायंकाळीं तीन तासांचे आंत वर्तमानपत्रांत समग्र छापलेलें मुंबईच्या लोकांना आज वाचावयास मिळत आहे. याप्रमाणें आज शेंकडों चमत्कार भौतिकशास्त्रांतील वाढत्या ज्ञानामुळें जगांत घडून येत आहेत. असे आठ दहा दिवस जात नाहींत कीं, एकादा लहान मोठा शोध लागलेला ऐकावयास सांपडत नाहीं! इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, फ्रान्स वगैरे पाश्चिमात्य राष्ट्रांचे प्रयत्न या बाबतींत अहर्निश चालू आहेत, व त्यांचेंच अनुकरण इतर राष्ट्रें ही करीत आहेत. जें राष्ट्र भौतिकशास्त्रांतील ज्ञानांत मागें पडेल तें कायमचें मागें पडल्यासारखें होईल. भौतिकशास्त्रांतील ज्ञानाची लाट आज सर्व जगभर पसरली आहे, कित्येक निद्रिस्त राष्ट्रें खडबडून जागीं झालीं आहेत, व कित्येक जागीं होत आहेत. अशा या लाटेंत आपला हिंदुस्तान देश मागें राहाणें शक्य नाहीं, व मागें राहण्याची त्याची इच्छा ही नाहीं, असें स्पष्ट दिसतें. इंग्लिश लोकांसारख्या सुधारलेल्या व प्रगतिमान लोकांचा राज्यकर्ते या नात्यानें हिंदुस्तानाशीं संबंध आल्यामुळें गेल्या शंभर वर्षांत आपले आचारविचार पुष्कळ बदलले आहेत. जग हें क्षणभंगुर आहे, दोन दिवसांची माया आहे, तेव्हां जगाची सुधारणा करून काय करावयाची? आहे या स्थितींतच मनुष्यानें दिवस कंठावेत अशा प्रकारची दुबळी मनोवृत्ति नाहींशी होत चालली आहे, हें सुचिन्ह आहे. सर जगदीशचंद्र बोस व सर पी. सी. रॉय यांसारखे थोर शास्त्रज्ञ सर्व जगाला आदरणीय झाले आहेत, ही गोष्ट बदललेल्या मनूची दर्शक आहे. हे दोन्हीही

शास्त्रज्ञ बंगालमधील आहेत. त्यांपैकीं सर जगदीशचंद्र बोस यांनीं अलीकडे वनस्पतिशास्त्रांत अगदीं क्रांतिकारक शोध लावल्यामुळें त्यांची सर्व जगभर मोठी कीर्ति झाली आहे. या थोर शास्त्रज्ञानें वनस्पतीसंबंधानें कोणते महत्त्वाचे शोध लावले आहेत, ते या लेखांत देण्याचा विचार आहे.

मनुष्य, पशुपक्षी, कृमिकीटक वगैरे जीवसृष्टि; उद्भिज्जसृष्टि; व दगडमाती, पाणी, लोखंड, सोनें, अंतराळांत चमकणारे गोल वगैरे जडसृष्टि असे सामान्यतः दृश्य सृष्टीचे तीन विभाग करण्याचा परिपाठ आहे. कोणताही प्राणी, वनस्पति व दगड हे तीन वर्गांतील तीन पदार्थ आपल्या साध्या डोळयांना एकमेकांपासून अगदीं भिन्न दिसतात. दगड तर राहोच, परंतु प्राणी व वनस्पति यांमध्यें कांहीं साधर्म्य आहे अशी आपली कल्पना होत नाहीं व तें अगदीं स्वाभाविक आहे. प्राणी म्हटला म्हणजे त्याला जीव व शरीर हीं असतात, व त्याच्या शरिरांत मेंदु, मज्जारज्जु, निरानिराळीं इंद्रियें, हृदय, रक्ताभिसरण वगैरे गोष्टी या असावयाच्याच. प्राण्याला सुखदुःखादि भावना असतात; त्याला बरें वाईट कळतें; त्याला शत्रुमित्र ओळखतां येतात; तो संकटापासून दूर सरण्याचा प्रयत्न करितो; सुखाला मिठी मारतो; लज्जा, भीति, नम्रता, क्रौर्य, सहानुभूति वगैरे मनोविकार त्याच्या ठिकाणीं जागृत असतात व शेवटीं त्याला मृत्यु येतो, वगैरे अनेक गोष्टी प्राण्यासंबंधानें आपणांस स्वतांच्या अनुभवानें परिचित असतात. तसें वनस्पतीसंबंधानें म्हणतां येत नाहीं. दगडापेक्षां वनस्पति भिन्न दिसली तरी तिचें प्राण्याशीं साधर्म्य आहे, असें म्हणतां येत नाहीं. त्यापेक्षां जडाशींच वनस्पतीचें साधर्म्य आहे असें आजपर्यंत झालेल्या पाश्चात्य वनस्पतीशास्त्रज्ञांचें म्हणणें होतें. कल्पनेच्या साम्राज्यांत भराऱ्या मारतांना कालीदास, भवभूति, वर्डस्वर्थ वगैरे कविरत्नें वृक्षवनस्पतींशीं किंवा लताकुसुमादिकांशीं प्रेमाचें कितीही हितगुज करोत परंतु काव्यसृष्टींतील तें मनोराज्य शास्त्रीय दृष्टीला पटण्यासारखें नव्हतें. शास्त्रज्ञाला प्रत्यक्ष पुरावा पाहिजे, तेथें कल्पनेचें काम नाहीं. सबब वनस्पतिसृष्टि निर्जीव आहे, व जीवशरिरांत ज्या गोष्टी प्रमुखत्वानें असतात त्या अर्थातच वनस्पतींमध्ये नाहींत, असा ठाम सिद्धांत आजपर्यंत झालेल्या शास्त्रज्ञांचा असे. परंतु हा सिद्धांत सर्वशेळ चुकीचा आहे, असें सर जगदीशचंद्र बोस यांनीं सप्रयोग सिद्ध करून दाखविलें आहे. जीवसृष्टि व

वनस्पतिसृष्टि यांमध्यें पुष्कळ साधर्म्य आहे. वनस्पतीला जीव आहे, हृदय आहे, तिच्यामध्यें ज्ञानतंतूंचें कार्य दिसून येतें, तिला मृत्यु आहे वगैरे गोष्टी त्यांनीं प्रत्यक्ष सिद्ध करून दाखविल्या आहेत. यामुळें प्राणी व वनस्पति यामध्यें साम्य आहे, वनस्पति ही जड कोटींत जाणार नाहीं, असा हा नवीन सिद्धांत आहे. फार झालें तर प्राणी हा वनस्पतीची सुधारून वाढविलेली आवृत्ति आहे, असें म्हणावें. पण झाडें प्राण्यांचे भाऊबंद आहेत, ही गोष्ट आतां नाकारतां येणें शक्य नाहीं. या अद्भुत शोधामुळें जगांतील शास्त्रज्ञांमध्यें मोठी खळबळ उडून गेली आहे. सर्व जगाचे डोळे आज त्यांच्या या शोधाकडे लागले आहेत, व चोहोंकडून सर्व लोक आज त्यांजवर स्तुतीचा वर्षाव करीत आहेत. पाश्चिमात्य राष्ट्रांतील वर्तमानपत्रें व मासिकें यांमधून त्यांचे फोटो झळकत आहेत, व त्यांनीं लावलेल्या शोधांचीं वर्णनें येत आहेत. युरोप खंडांतून निरनिराळ्या भाषांतून त्यांच्या ग्रंथांचीं भाषांतरें होत आहेत.

वनस्पतींवर निरनिराळे प्रयोग करून अनेक महत्त्वाचे शोध लावण्याचे कामांत सर जगदीशचंद्र बोस यांनीं आज तीस वर्षे अव्याहत प्रयत्न चालविला आहे. वनस्पतीवर प्रयोग करतांना त्यांच्या मार्गांत प्रथम मोठी अडचण उत्पन्न झाली ती ही कीं, प्रचलित असलेलीं मोठ्या 'पॉवरचीं' सूक्ष्मदर्शक यंत्रें वनस्पतींच्या अंतरभागांतील सूक्ष्म व्यापारांचें निरीक्षण करण्याचे कामीं निरुपयोगी ठरलीं. प्राण्यांचीं इंद्रियें आपल्या साध्या डोळ्यांना स्पष्ट दिसतात, व डोळ्यांना न दिसणाऱ्या गोष्टी सूक्ष्मदर्शक यंत्राचे योगानें प्रतीत होतात. परंतु वनस्पतीची गोष्ट अशी नाहीं. वनस्पतीची आंतररचना अत्यंत नाजूक व पराकाष्ठेची सूक्ष्म असते. तसेंच तिचे निरनिराळे व्यापार अंतर भागांत खूप खोल अशा ठिकाणीं चाललेले असतात. या सर्वांचें निरीक्षण करण्याचे कामीं प्रचलित सूक्ष्मदर्शक यंत्रें निरुपयोगी ठरलीं. परंतु सर जगदीशचंद्रबोस कुशाग्रबुद्धीचे व कल्पक पुरुष असल्यामुळें त्यांनीं या मोठ्या अडचणींतून पार पडण्याकरितां स्वतां निरनिराळीं यंत्रें बनविलीं. त्यांनीं बनविलेल्या सूक्ष्मदर्शक यंत्रांतून अत्यंत सूक्ष्म पदार्थ किंवा त्याचा पराकाष्ठेचा सूक्ष्म व्यापार पांच कोट पटींपर्यंत मोठा दिसतो. तसेंच या यंत्राची रचनाही सिनेमांतील यंत्रासारखी केलेली आहे. या यंत्राच्या

साहाय्यानें वनस्पतींतील सूक्ष्म व्यापारांचें प्रतिबिंब समोर पडल्यावर मोठ्या प्रमाणांत पडतें, व त्यामुळें प्रेक्षकाला आपल्या साध्या डोळ्यांनीं हे सर्व व्यापार पाहावयास सांपडतात. या यंत्राच्या योगानें फार मोठें अज्ञात जग मनुष्यांच्या दृष्टीच्या टप्प्यांत आलें आहे, व त्यामुळें आणखीही अनेक शोध लागण्याचा संभव आहे.

जड वस्तूवर एकादा प्रयोग केला असतां त्यामध्यें दिसून येणारी प्रतिक्रिया किंवा हालचाल व कोणत्याही प्राण्यावर प्रयोग केला असतां त्यामध्यें दिसून येणारी प्रतिक्रिया किंवा हालचाल परस्परांहून भिन्न आहेत. प्राण्याची हालचाल मृत्यु होतांच थांबते ही त्याची कसोटी आहे. आतां या कसोटीप्रमाणें वनस्पतींची हालचाल थांबली व तिला मृत्यु आला असें जर सप्रयोग दाखवितां आलें, तर वनस्पतीला प्राण आहे असें आपोआपच सिद्ध होतें. ऊन पाण्यांत वनस्पति ठेविली, व त्या पाण्याचें उष्णतामान हलकें हलकें वाढवीत सेंटिग्रेड उष्णता मापकांतील पारा ६० अंशावर जाईपर्यंत वाढविलें म्हणजे अपूर्व चमत्कार दिसतो. मृत्युकालीं प्राण्याला भयंकर वेदना होऊन तो शेवटच्या क्षणाला अचके देतो, त्याप्रमाणें वनस्पति अचका देते, व त्याच वेळीं विद्युत् प्रकाशाची मोठी चमक दृष्टीस पडते. अशा रीतीनें वनस्पतीचा मृत्यु प्रत्यक्ष पाहातां येतो, व पुढें तिची सर्व हालचाल थांबते.

मनुष्य प्राण्याच्या शरिरांत मेंदू, मज्जारज्जु, ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें, हृदय, धमन्या, शिरा असे निरनिराळे भाग दृष्टीस पडतात. शरिरावर एकादी बाह्य क्रिया झाल्याबरोबर ती बातमी ज्ञानेंद्रियांचे मार्फत मेंदूला कळते व मेंदूचा हुकूम कर्मेंद्रियांमार्फत बजावला जातो. तसेंच हृदय हें रक्ताभिसरण घडवून आणणारें पंपासारखें यंत्र आहे. धमन्यांवाटे सर्व शरिराला शुद्ध रक्ताचा पुरवठा होतो, व शरिरांतील अशुद्ध रक्त शिरांवाटे फुप्फुसांकडे शुद्ध करण्याकरितां येतें. आतां प्राण्याशीं वनस्पतींचें साम्य सिद्ध करावयाचें झाल्यास मज्जारज्जु, हृदय वगैरे भाग व त्यांच्या क्रिया या स्पष्ट दिसल्या पाहिजेत, व त्या तशा आहेत ही गोष्ट सर जगदीशचंद्र बोस यांनीं सप्रमाण सिद्ध केली आहे. प्राण्याच्या शरिरांत दूरच्या दोन भागांत दोन प्रकारांनीं

ढ्ळणवळण चालू असतें. १ द्रव्याचें स्थलांतर व २ गतिप्रसार. हे दोन्ही प्रकार एकमेकांपासून अत्यंत भिन्न आहेत. शिवाय एकाची क्रिया मंद, तर दुसऱ्याची अति जलद होते. एका गांवाहून दुसऱ्या गांवास पत्र पाठविणें व तार करणें यांमध्यें जो कालाचा फरक आहे, तोच या दोन क्रियांमध्यें आहे. रक्ताभिसरण हें पहिल्या क्रियेचें उदाहरण, तर साप पाहिला असतां भीति वाटून सर्व अंगाला कंप सुटणें हें दुसऱ्या क्रियेचें उदाहरण होय. वनस्पतीमध्यें द्रव्याचें स्थलांतर होतें, पण गतीचा प्रसार ही दुसरी क्रिया नाहीं, म्हणजे मज्जारज्जूचें अथवा ज्ञानतंतूचें कार्य वनस्पतींमध्यें नाहीं, असें आजपर्यंतच्या शास्त्रज्ञांचें म्हणणें होतें. वनस्पतीला चाकूनें जखम केली तर वसस्पतीमध्यें क्षोभ किंवा उद्दीपन झालेलें दिसून येतें, व तो क्षोभ किंवा तें उद्दीपन खोडांतील रस खालून वर ज्या मार्गानें चोहोंकडे पसरतो, त्याच मार्गानें हळू हळू पसरतें. अर्थात् हें जडाचें कार्य आहे, ज्ञानतंतूंचें नव्हे असें शास्त्रज्ञ म्हणत असत; परंतु हा सिद्धांत चुकीचा आहे, असें बोस यांनीं प्रत्यक्ष सिद्ध केलें आहे. वनस्पतीला चाकूनें जखम न करितां अत्यंत सूक्ष्म असा विजेचा धक्का दिला तर वनस्पतीच्या सर्व शरीरांत तत्काल क्षोभ उत्पन्न होतो, व त्याची गति दर सेकंदास ४०० मिलि-मिटर इतकी जलद असते. तसेंच लाजाळू वनस्पतीच्या अगदीं शेंड्याला असलेल्या पानाच्या टोंकावर हैड्रोक्लोरिक ॲसिडचा नुसता एक थेंब टाकला, तर सर्व वनस्पतींत तत्काळ उद्दीपन झालेलें दिसतें, व हें उद्दीपन वरून खालपर्यंत होत जातें. खालून वर जाणाऱ्या रसाशीं याचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं. शहरांतून पाण्याचे नळ टाकलेले असतात, त्यांपैकीं एकाद्यावर जर क्लोरोफॉर्मचा प्रयोग केला, किंवा विषांत भिजविलेलें फडकें नळीला गुंडाळलें, तर आंत वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहावर कांहींही परिणाम होत नाहीं. परंतु तेच प्रयोग वनस्पतीवर केले असतां वनस्पतीमध्यें चालत असलेलें ज्ञानतंतूंचें कार्य थांबतें, असें उघड दिसून येतें.

वनस्पतीमध्यें रस खोडांतून शेंड्यापर्यंत वर जातो कसा अथवा त्याला ही गति कोठून मिळते, याचें शास्त्रज्ञांना आजपावेतों मोठें कोडें पडलें होतें. परंतु वनस्पतीमध्यें 'प्रेरकरज्जु' आहे, तो हृदयाचें व धमन्यांचें कार्य करतो, व त्यामुळें रसाला गति मिळते, असें बोस यांनीं सिद्ध केलें आहे.

कॉफीसारख्या उत्तेजित पेयाचा वनस्पतीला डोस दिला असतां प्रेरकरज्जूचें कार्य जलद चालू होतें. उलट पक्षीं, विषाचा डोस दिल्यास प्रेरकरज्जूचें कार्य थांबून, रस वाहाण्याचाही थांबतो, व वनस्पतीला मृत्यु येतो. या सर्व गोष्टी प्रयोग चालू असतां पडद्यावर स्पष्ट दिसतात. यावरून वनस्पतीला हृदय आहे हें सिद्ध होतें. आतां तें लांबट आकाराचें आहे असें दिसतें, परंतु प्राण्यामध्यें सुद्धां अगदीं खालच्या कोटींतील प्राण्यांचें हृदय लांबट आकाराचें असलेलें दिसून येतें. दुसरी गोष्ट प्राण्याच्या हृदयावर उत्तेजित द्रव्यें व विषारी पदार्थ यांचे जे बरे वाईट परिणाम दिसून येतात, तेच परिणाम त्या द्रव्यांच्या योगानें वनस्पतीमधील प्रेरकरज्जूवर झालेले स्पष्ट दिसतात. सबब प्राण्याच्या हृदयाशीं या प्रेरकरज्जूचें साम्य आहे हें सिद्ध होतें. याप्रमाणें प्रयोग चालविले असतांना वनस्पतीमध्यें खालून वर जो रस जातो, त्याचा वेग काय असावा हें ठरविण्याकडे बोस याची दृष्टि वळली. मनुष्याच्या शरिरांत हृदयक्रियेवर रक्ताभिसरण अवलंबून असतें. त्याप्रमाणें ज्याला आपण वनस्पतीचें हृदय म्हटलें त्या प्रेरकरज्जूवर रसाचा वेग अवलंबून असला पाहिजे, असें त्यांच्या शोधकबुद्धीनें जाणलें. क्षितिज समांतर पातळींत असलेलें झाडाचें पान हा त्याचा हात आहे अशी त्यांनीं कल्पना केली, व वनस्पतीवर प्रयोग केला असतां या पानावर काय परिणाम होतो, हें पाहाण्याकरितां त्यांनीं प्रयोग केले. वनस्पतीला ब्रोमाइड ऑफ पोटॅशियमचा डोस दिला असतां पान गळाठून जातें व लोंबूं लागतें. उलट कॉफीचा डोस दिला असतां तें तरतरीत होतें व त्याचा शेंडा ताठ उभा राहातो. मृत्युवश होत असतांना व जीवनकला प्राप्त होतांना क्रमानें कशी स्थिति पालटत जाते, हें सूक्ष्मदर्शक यंत्राच्या योगानें पडद्यावर स्पष्ट दिसतें.

या सर्वांत अत्यंत महत्वाचा प्रयोग म्हटला म्हणजे वनस्पतीच्या हृदयाचे ठोके मोजण्याचा होय. हा अत्यंत अद्भुत असा प्रयोग सर जगदीशचंद्र बोस यांनीं केला, व तो यशस्वी झाला. वनस्पतीचें हृदय म्हणजे प्रेरकरज्जु. हा तिच्या अंतर भागांत खोल ठिकाणीं दडलेला व पराकाष्ठेचा सूक्ष्म असा भाग आहे. त्यांचे ठोके मोजणें याला अद्भुत प्रयोग कोण म्हणणार नाहीं? रस खालून वर जातांना प्रेरकरज्जु त्याला ढकलतो तेव्हां रस वर जात असतांना, एखाद्या विशिष्ट ठिकाणीं रस आला असतांना त्या ठिकाणीं प्रसरण

क्रिया दिसेल, व रस पुढें ढकलतां क्षणींच तो भाग आकुंचन पावेल. परंतु ह्या क्रिया पराकाष्ठेच्या सूक्ष्म असल्यामुळें हा प्रयोग करण्याकरितां एक अलौकिक यंत्र बोस यांनीं बनविलें. त्या यंत्रांत मेलेली वनस्पति ठेविली असतां यंत्रावर कांहींही परिणाम होत नाहीं, व हृदयक्रिया बंद दिसते. परंतु लाजाळू नांवाची जिवंत वनस्पति यंत्रांत ठेवतांक्षणींच अद्भुत चमत्कार पडद्यावर दिसूं लागतो. प्रत्येक सेकंदाला घंटा होण्याची व्यवस्था यंत्रांत केलेली आहे. बहुतेक पांच सेकंदाला हृदयाचा ठोका पडतो, असें दिसून येतें. वनस्पतीवर विषाचें इंजक्शन केलें म्हणजे पांच सेकंदांच्या आंत विष सर्व अंगांत पसरलेलें दिसतें, व हृदयाची क्रिया बंद होऊं लागते. वनस्पतीचे प्राण गोळा होत आहेत व तिला मृत्यूच्या भयंकर वेदना होत आहेत, या गोष्टी पडद्यावर प्रकाश बिंदु डाव्या बाजूकडे हलके हलके सरतांना स्पष्ट दिसतात. मृत्यूच्या शेवटच्या वेदना होत असतांना प्राण्याची जी हृदय-द्रावक स्थिति दिसते, तशी या ठिकाणीं पाहावयास सांपडते. वनस्पतीचा मृत्यूशीं होत असलेला झगडा प्रत्यक्ष पाहावयास मिळतो, व प्रेक्षकांचें अंतःकरण करुणरसानें व्याप्त होतें, व वेदना पाहाणें नकोत असेंही त्याला वाटतें. परंतु अशा या आणीबाणीच्या प्रसंगीं व वनस्पतीचा आतां खास मृत्यु होणार असें दिसूं लागतांच तिला जर तीव्र अशा उत्तेजित द्रव्याचा डोस दिला म्हणजे काय अपूर्व चमत्कार दिसतो! प्रकाशबिंदु पडद्यावर पूर्वीं डाव्याबाजूकडे जात होता, तो आतां उजवीकडे जात असलेला दिसूं लागतो. हृदयाची क्रिया वाढूं लागते; थोड्याच वेळांत वनस्पतीला तरतरी प्राप्त होते, व तिच्या हृदयाची क्रिया पूर्ववत चालू होते. याप्रमाणें वनस्पतीचा प्राण वांचलेला पाहून प्रेक्षकांना आनंदाच्या उकळ्या फुटतात.

मनुष्याच्या हृदयावर निरनिराळ्या द्रव्याचे जे बरे वाईट परिणाम होतात, तेच वनस्पतीच्या हृदयावर किंवा प्रेरकरज्जूवर होतात असें सप्रयोग सिद्ध झालें. या सर्व प्रयोगांवरून वनस्पतीचें प्राण्याशीं साधर्म्य आहे, हा सिद्धांत सिद्ध होतो, व या सिद्धांताचे उलट असणारे आजपर्यंत झालेले सिद्धांत चुकीचे ठरतात, असें सर जगदीशचंद्र बोस यांनीं सिद्ध केलें आहे.

सर जगदीशचंद्र बोस यांनीं नुकतीच युरोपखंडांत सफर करून तिकडील मोठमोठ्या शास्त्रज्ञासमोर आपले अलौकिक प्रयोग करून दाखविले, व त्यांजकडून धन्यवाद मिळविले. हे प्रयोग करण्याकरितां स्वतां शोधून काढलेलीं यंत्रें किंचित् सुद्धां धक्का न लागेल अशा अतिशय काळजीपूर्वक रीतीनें त्यांना सात हजार मैलांवर न्यावीं लागलीं. इंग्लंडमध्यें असतांना ऑक्सफोर्ड, केंब्रीज, लंडन येथील विश्वविद्यालयांत, तसेंच इतर अनेक संस्थांमध्यें त्यांचीं सप्रयोग व्याख्यानें झालीं. त्यांमध्यें ऑक्सफोर्ड येथील ब्रिटिश असोसिएशनपुढें दिलेलें व्याख्यान फार महत्त्वाचें झालें. त्यावेळीं अनेक शास्त्रज्ञ, पार्लमेंटचे सभासद वगैरे थोर मंडळी तेथें आली होती. तें व्याख्यान झाल्याबरोबर त्याबद्दलच्या तारा बिनतारी तारायंत्रानें सर्व जगभर फडकल्या, व दुसरे दिवशीं सकाळीं प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्रांतून त्या संबंधीं जिकडे तिकडे लेख झळकले. बेलजमचे राजे गुदस्तां या देशांत आले होते, त्यावेळीं त्यांनीं बोस यांची संस्था पाहून त्यांचें अभिनंदन केलें होतें, व आपल्या देशांत येऊन व्याख्यानें देण्यासंबंधानें बोस यांना आमंत्रण दिलें होतें, म्हणून बोस यांनीं बेलजममधील विश्वविद्यालयामध्यें व्याख्यानें दिलीं. त्यांच्या प्रयोगाला लागणाऱ्या वनस्पति तेथील राजवाड्यांतील बागेंत अगोदरच लावून ठेविल्या होत्या. व्याख्यानाचे प्रसंगीं बेलजमचा राजा, राणी, दरबारची मंडळी व अनेक शास्त्रज्ञ विद्वान् मंडळी हजर होती.

बेलजमप्रमाणेंच फ्रान्समध्येंही अनेक संस्थांपुढें त्यांचीं व्याख्यानें झालीं. शेवटीं जिनीवा येथें राष्ट्रसंघाची बैठक भरली होती, त्या ठिकाणीं सर्व जगांतील थोर थोर शास्त्रज्ञ, बडेबडे मुत्सद्दी वगैरे अनेक विद्वान् मंडळी जमली होती. या संधीचा फायदा घेऊन या विद्वत्समुहासमोर बोस यांनीं आपलीं सप्रयोग व्याख्यानें दिलीं; आणि या विद्वान् मंडळीकडून धन्यवाद मिळवून आपल्या कीर्तीचा कळस चढविला. सर बोस हल्लीं आपल्या देशास परत आले आहेत, व त्यांचे याच बाबतींत आणखी पुढें प्रयोग चालू आहेत. थोडे दिवसांपूर्वीं आपले व्हाइसराय लॉर्ड अर्विन, लेडी अर्विन यांनीं स्वीडनचे युवराज व युवराज्ञी यांसह बोस यांचे संस्थेस भेट दिली व तेथील प्रयोग पाहून त्यांनीं समाधान व्यक्त केलें. गेल्या नाताळांत लाहोर एथें ' सायन्स कॉंग्रेसचें ' अधिवेशन झालें, त्यावेळीं सर जगदीशचंद्र बोस

यांनीं अध्यक्षस्थान सुशोभित केलें होतें. त्यांप्रसंगीं पंजाबचे गव्हर्नर सर माल्कम हेले यांनीं सुंदर भाषण करून सर जगदीशचंद्र यांचा योग्य शब्दांत गौरव केला. तसेंच लाहोर येथें विश्वविद्यालयांत त्यांचें सप्रयोग व्याख्यान झालें. त्यावेळीं प्राण्याच्या हृदयाप्रमाणेंच वनस्पतीच्या हृदयामध्यें चेतना वाढविण्याचे कामीं कोब्र्याच्या विषाचा उपयोग होतो हें त्यांनीं दाखविलें.

याप्रमाणें सर जगदीशचंद्र बोस यांच्या शोधाचें रहस्य आहे. ते नवीन नवीन यंत्रें शोधून काढीत आहेत, व आणखी अलौकिक शोध लागण्याचा पुष्कळ संभव आहे, अशी त्यांची महत्वाकांक्षा आहे. डार्विन व त्याचा विकासवाद किंवा उत्क्रांतिवाद सर्वांना माहीत आहे. मनुष्यप्राणी हा माकडापासून उत्क्रांत झाला आहे असें डार्विनचें म्हणणें आहे, परंतु बोस यांच्या शोधाची मजल त्यापुढें आहे. टाइम्स ऑफ इंडियानें एका लेखांत म्हटल्याप्रमाणें आतां माकडापासून मनुष्य प्राणी उत्क्रांत झाला आहे असें न म्हणतां माकडें ज्या झाडांवर खेळतात, बागडतात, त्या झाडांपासून उत्क्रांति होत होत मनुष्य पृथ्वीवर उत्पन्न झाला आहे असें म्हणण्याची पाळी आली आहे. रात्रीं नभोमंडळांत विहार करणारा चंद्रमा आपल्या अमृत किरणांनीं वनस्पतींचें पोषण करतो, अशी कवींची कल्पना आहे, म्हणूनच चंद्राला औषधीपति असें म्हणतात. सर जगदीशचंद्र बोस यांनींही आपल्या नांवाप्रमाणें निर्जीव मानलेल्या वनस्पतींवर आपल्या शोधरूपी अमृत किरणांचा वर्षाव करून त्यांना निर्जीव कोटींतून काढून सजीव कोटींत आणून बसविलें व आपलें नांव खरें करून दाखविलें, हाही योगायोग मोठा मनोरंजक आहे.

मनुष्यें हीं हालतीं झाडें आहेत, तर झाडें हीं स्थिर उभे राहाणारे मनुष्य प्राणी आहेत, असें आतां मानण्यास हरकत नाहीं असे उद्गार मोठमोठ्या विद्वानांच्या तोंडून निघूं लागले आहेत. शेवटीं अशा या थोर शास्त्रज्ञाला परमेश्वरानें पुष्कळ आयुष्य द्यावें, व त्यानें आणखी अपूर्व शोध लावून जगाच्या ज्ञानांत व हिंदुस्थानच्या कीर्तींत भर घालावी अशी इच्छा प्रदर्शित करून हा बराच लांबलेला लेख आतां पुरा करूं या.

# मुलांकरितां गोष्ट

## हरवलेला चेंडू.

वसंत व बाबू असे दोन भाऊ भाऊ होते. ते घराजवळील बागेंत क्रिकेटचा खेळ खेळत होते. वसंतानें खेळतां खेळतां एक जो टोला मारला त्यासरसा त्यांचा तो लाल, गुळगुळीत चेंडू कोठें दिसेनासा झाला! वसंत टोला मारून धांवा काढण्याच्या गर्दींत होता व बाबू 'चेंडू हरवला. चेंडू नाहीं.' असें ओरडत इकडे पहा, तिकडे पहा, अशा शोधांत गुंग होता. नंतर दोघांनीं तो चेंडू शोधण्यास सुरुवात केली. परंतु चेंडू अशा एका गमतीच्या ठिकाणीं जाऊन बसला होता कीं, त्यांना तो सांपडणें अशक्य होतें. शेवटीं, पाहतां पाहतां, ते थकले. जेवावयाची वेळ झाली म्हणून घरीं गेले. दुसरे दिवशीं दुपारीं पुन्हा ते चेंडूचा शोध करूं लागले, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं, कंटाळून बागेंतील माळ्याच्या पाळलेल्या कोंबड्या होत्या त्यांची गंमत पाहून घरीं जावें असें त्यांनीं ठरविलें. तेथें एक मोठी कोंबडी आपलीं पिसें पसरून त्यांखालीं अंडीं उबवीत होती. वसंतास वाटलें कीं, येथें बरीचशीं अंडीं दिसतात त्यांतील एकादें अंडें घेतल्यास कोंबडी काय करते तें पाहावें. असें मनांत आणून एका लांब काठीनें त्यानें एक अंडें काढण्याचा प्रयत्न केला. तों ती अंगावर येऊं लागली. इतक्यांत बाबूचे दृष्टीस कांहीं लालसर दिसलें. तो तें काय असावें या जिज्ञासेनें वसंतास त्या कोंबडीस पुन्हा एकदां चिवडण्याबद्दल सुचवूं लागला. वसंतानें पुन्हा अंडें घेण्याचा प्रयत्न करतांच कोंबडी उडाली, तों तिचे पोटाखालीं बाबूस त्यांचा चेंडू दिसला व त्यास जें हसूं आलें तें सांगण्याची सोय नाहीं. वसंतालाही तें कळलें व दोघांनाही मनापासून आनंद झाला. बाबू निघतां निघतां त्या माळ्यास सांगतो, 'तुमच्या कोंबडीनें घातलेलें हें अंडें पहा! या अंड्यांतून तुमचे कोंबडीस काय मिळणार होतें, परमेश्वर जाणे!'

# संख्यावाचन व लेखन.

शिशुवर्गांत अंक व पाढे शिकत असतांना आणि वस्तूंच्या साहाय्यानें उदाहरणें सोडवीत असतांना मुलांना एकक, दशक व शतक यांची चांगली कल्पना येते. एका दशकांत दहा सुटे अथवा एकक असतात, १० सुट्यांचा एक दशक होतो, दशकांचा अंक प्रथम लिहितात मग सुट्यांचा अंक लिहितात, या गोष्टी त्यांना या वर्गांतच चांगल्या कळूं लागतात. ४१ यांत ४ दशक व १ सुटा आहे, १४ यांत १ दशक व ४ सुटे आहेत, ७६ यांत ७ दशक आहेत व ६ सुटे आहेत व ६७ यांत ६ दशक व ७ सुटे आहेत या गोष्टींशीं वस्तूंच्या साहाय्यानें त्यांचा चांगला परिचय झाल्यामुळें अंकांची किंमत त्यांच्या स्थानावर अवलंबन असते हें न सांगतांच त्यांच्या मनांत ठसतें. १ शतकाचे दहा दशक होतात व १० दशकांचा १ शतक होतो, हीही कल्पना वस्तूंच्या साहाय्यानें उदाहरणें केल्यानें मुलांच्या मनांत बिंबते. संख्येप्रमाणें जुड्या व काड्या मुलांकडून मांडून घेतल्यामुळें व पुढें ठेविलेल्या शतकाच्या व दशकाच्या जुड्या व सुट्या काड्या पाहून ती संख्या मांडण्याची संवय झाल्यामुळें, शतक व दशक यांतील संबंध व त्यांचीं स्थानें यांच्याशीं त्यांचा निकट परिचय होतो व अंकांची किंमत त्यांच्या स्थानावर अवलंबून असते, ही पूर्वीं मिळालेली कल्पना अधिक दृढ होते. वस्तूंच्या साहाय्यानें जीं मुलें अंक शिकतात त्यांना सांगितलेली संख्या मांडण्यास किंवा संख्येची किंमत कळण्यास मुळींच त्रास पडत नाहीं. शतकापर्यंत ३ स्थानांच्या संख्या मांडण्यास व वाचण्यास मुलें ज्या पद्धतीनें शिकतात, त्याच पद्धतीनें त्यांना पुढील स्थानांच्या संख्या मांडण्यास व वाचण्यास शिकविलें पाहिजे.

पुष्कळ शाळांतून मुलें पहिल्या किंवा दुसऱ्या इयत्तेंत आल्याबरोबर त्यांना एकदम अब्जापर्यंत संख्या लिहिण्यास व वाचण्यास शिकवि-

तात. अशा प्रकारें शिकविलेलें संख्यालेखन व वाचन मुलांना अत्यंत नीरस व कंटाळवाणें वाटतें. मुलें जरी कांहीं दिवसांनीं या संख्या न चुकतां मांडूं लागतात व वाचूं लागतात, तरी त्यांना त्या संख्यांची खरी कल्पना बिलकूल होत नाहीं. अशा प्रकारें शिकविणें हें शिक्षणशास्त्रदृष्ट्या चुकीचें आहे.

मुलांना संख्यांची ओळख हळू हळू करून दिली पाहिजे. शिशुवर्गांत मुलांना शतकाची कल्पना येते. यानंतरची पायरी म्हटली म्हणजे त्यांना सहस्राची कल्पना देणें ही होय.

मुलांना शतकाच्या १० जुड्या एकत्र बांधून दाखवाव्या व अशा प्रकारें १० शतकांच्या एकत्र केलेल्या समुदायाला सहस्र (हजार) म्हणतात ही गोष्ट त्यांचे मनावर बिंबवावी. ९९९ म्हणजे ९ शतक, ९ दशक व ९ सुट्या काड्या होत, हें मुलांकडून काढून घ्यावें व त्यांनीं टेबलावर ९ शतकाच्या जुड्या, ९ दशकाच्या जुड्या व ९ सुट्या काड्या

| श. | द. | सु |
|---|---|---|
| ९ | ९ | ९ |

ठेवाव्या व फळ्यावर हा अंक लिहावा. मुलांना टेबलावरील सुट्या काड्यांत एक सुटी काडी मिळविण्यास सांगावें व फळ्यावरील ९९९ या आंकड्याखालीं त्यांनीं मिळवावयाचा १ हा अंक लिहावा. आपणांजवळ सुट्या काड्या ९ आहेत. यांत आणखी १ सुटी काडी घातली कीं आपणांजवळ १० सुट्या काड्या होतील. १० सुट्या काड्यांचा आपण एक दशक बांधू व तो आपणांजवळ असलेल्या ९ दशकांत मिळवूं. सुटी काडी आपणांजवळ राहिली नाहीं हें दाखविण्याकरितां फळ्यावरील बेरजेंत

| श | द. | सु |
|---|---|---|
| ९ | ९ | ९ |
| | | १ |
| | | ० |

सुट्याचे ठिकाणीं ० मांडूं. आपणांजवळ मूळचे ९ दशक आहेत. त्यांत हा नवीन आलेला दशक मिळविला म्हणजे एकंदर १० दशक होतील. १० दशकांचा एक शतक होतो म्हणून आपण या दहा दशकांची जुडी बांधू व ती शतकाचे जुडीखालीं ठेवूं. आतां आपणांजवळ दशक

उरला नाहीं हें दाखविण्याकरितां बेरजेंत आपण शून्य मांडूं. आपणांजवळ आरंभीं शतकाच्या ९ जुड्या होत्या व त्यांत आपण नवीन आलेली १ जुडी मिळवूं. आतां आपणांजवळ शतकाच्या एकंदर १० जुड्या होतील. दहा शतकाचा १ सहस्र होतो. म्हणून आपण १० शतकांच्या जुड्या एकत्र बांधू. आतां आपणांजवळ शतकाची जुडी राहिली नाहीं हें दाखविण्याकरितां बेरजेंत आपण शून्य देऊं व सहस्राचे स्थानांत १ हा अंक मांडूं.

| स | श | द | ए |
|---|---|---|---|
| | ९ | ९ | ९ |
| | | | १ |
| १ | ० | ० | ० |

एका सहस्रांत एकावर तीन शून्यें कां येतात याची आतां मुलांना चांगली कल्पना येईल व सहस्राचें स्थान शतच्या मागें कां असतें हीही गोष्ट त्यांना स्पष्ट कळेल.

एका सहस्राचे दहा शतक होतात व दहा शतकांचा एक सहस्र होतो ही कल्पना दृढ करण्याकरितां मुलांना कांहीं तोंडी उदाहरणें सांगावीं. नमुन्याकरितां कांहीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत.

(१) एका करंडींत ८ शें फुलें आहेत. दुसऱ्या करंडींत २ शें फुलें आहेत, तर दोन्ही करंड्यांत एकंदर फुलें किती आहेत ?

(२) एका थैलींत ६ शें रुपये आहेत. दुसऱ्या थैलींत ५ शें रुपये आहेत. तिसऱ्या थैलींत ७ शें रुपये आहेत, तर तिन्ही थैल्यांमिळून एकंदर रुपये किती ?

(३) एका गवताचे गंजींत ९ शें पेंढ्या होत्या, दुसरींत ८ शें व तिसऱ्या गंजींत ६ शें होत्या. तिन्ही गंजीं मिळून गवत किती होतें ?

पहिल्या उदाहरणाचें उत्तर ११ शें फुलें येईल. १० शेंचा १ सहस्र होतो. व बाकी १ शें राहातो, म्हणून मुलांनीं उत्तर १ स १ शें असें मांडावें व अशीं कांहीं उदाहरणें केलीं कीं ११०० असेंच नुसतें उत्तर मांडण्याची मुलांना संवय लावावी.

सहस्र मोडून शतक करण्याचीं पुढें दिल्याप्रमाणें कांहीं तोंडी उदाहरणें मुलांकडून करून घ्यावीं.

(१) शंभर रुपयांची १ नोट याप्रमाणें तीन हजार रुपयांच्या किती नोटा मिळतील ?

(२) दोनशें पुस्तकांचा एक गठ्ठा याप्रमाणें चार हजार पुस्तकांचे किती गठ्ठे होतील ?

(३) एका गाडींत तीनशें पेंढ्या कडबा मावतो तर सहा हजार कडबा नेण्यास किती गाड्या लागतील ?

(४) तीनशें मण्यांची एक माळ होते, तर ९ हजार मण्यांच्या किती माळा होतील ?

मुलांना सहस्राच्या संख्या लिहिण्यास व वाचण्यास सांगाव्या. संख्यालेखनाचीं व वाचनाचीं हीं उदाहरणें वस्तुस्थितीला धरून व मुलांच्या परिचित गोष्टींच्या संबंधाचीं असावीं. नाहीं तर त्यांत मुलांचें लक्ष लागणार नाहीं. नमुन्याकरितां कांहीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत.

पुढील उदाहरणांत दिलेल्या संख्या लिहून दाखवा.

(१) कागदाच्या तीन रिमांत एक हजार चारशें चाळीस कागद असतात.

(२) जुन्नरची वस्ती सात हजार सहाशें बेचाळीस आहे.

(३) गेल्या पौर्णिमेस जेजूरीस पांच हजार चारशें पंचेचाळीस माणसें यात्रेस आलीं होतीं.

(४) या गांवचा सारा चार हजार तिनशें पंचावन रुपये आहे.

(५) आपल्या जिल्ह्याचे कलेक्टरला दरमहा एक हजार सातशें पन्नास रुपये पगार आहे.

पुढील उदाहरणांत दिलेल्या संख्या वाचून दाखवा.

(१) एका गवताचे गंजींत ३५१२ पेंढ्या होत्या.

(२) सिंहगडची उंची २५०० फूट आहे.

(३) तीन आंब्यांचे झाडांवरील फळें काढिलीं तीं १७२३ भरलीं.

(४) गंगा नदीची लांबी १५०० मैल आहे. आपल्या भीमा नदीची लांबी ४४१ मैल आहे.

(५) पुणें जिल्ह्यांत पार्शी लोकांची वस्ती ३१२५ आहे.

सहस्राची कल्पना मुलांना चांगली स्पष्ट कळल्याशिवाय दश सहस्राची कल्पना देऊं नये. या कामीं घाई करितां कामा नये. आतांपर्यंत मुलांचा पुढील कल्पनांशीं चांगला परिचय झालेला असतो.

१० सुटे झाले कीं त्यांचा एक दशक होतो.
१० दशक झाले कीं त्यांचा एक शतक होतो.
१० शतक झाले कीं त्यांचा एक सहस्र होतो.

याप्रमाणेंच १० सहस्र झाले कीं त्यांचा एक दशसहस्र होतो, हें कळण्यास त्यांस कठीण जाणार नाहीं. २१ सहस्र यांत २ दशसहस्र व १ सहस्र आहे, ६३ सहस्र यांत ६ दश सहस्र व ३ सहस्र आहेत, ८९ सहस्र म्हणजे ८ दशसहस्र व ९ सहस्र अशा प्रकारचीं उदाहरणें मुलांकडून करून घ्यावीं. दशसहस्र व सहस्र सांगतांना आपण दशसहस्रांचा उच्चार करीत नाहीं ही गोष्ट मुलांचे दृष्टीस आणावी.

सहा दश सहस्र व एक हजार असें न म्हणतां आपण ६१ हजार किंवा एकसष्ट सहस्र म्हणतों:—चार दश सहस्र व सात हजार असें न

म्हणतां आपण सत्तेचाळीस सहस्र असें म्हणतों. सात दश सहस्र व नऊ सहस्र असें न म्हणतां आपण एकूणऐंशीं हजार असें म्हणतो. ११ स. असें मांडलें कीं स्वाभाविकपणेंच १ दशसहस्र योग्य स्थानीं मांडले जातात. ४९ स. असें मांडलें कीं ४ दशसहस्र योग्य स्थानीं मांडले जातात, ही गोष्ट मुलांच्या लक्षांत आली कीं दश सहस्रापर्यंत संख्या मांडण्यास व वाचण्यास पंचाईत पडणार नाहीं. बेरीज व वजाबाकी शिकवितं असतां हळू हळू दशसहस्र व लक्ष यांची कल्पना मुलांना द्यावी.

वर सहस्र कसा शिकवावा याचें विवेचन केलें आहे त्यावरून लक्षाची कल्पना कशी द्यावी हें सहज लक्षांत येईल. दुसऱ्या इयत्तेंत कोटीपर्यंत मुलांना संख्यावाचन व संख्यालेखन शिकवावयाचें असतें. पहिले सात आठ महिने मुलांना लक्षापर्यंत बेरजा, वजाबाक्या आणि गुणाकार करण्याची संवय लावावी. नंतर दशलक्ष व कोटि यांची कल्पना द्यावी. दुसऱ्या इयत्तेंत मुलांना जिल्ह्याचा भूगोल करावयाचा असतो. या भूगोलाच्या माहितीसंबंधानें संख्या लेखनाचीं व वाचनाचीं किती तरी उदाहरणें बनवितां येतील. जिल्ह्याची लोकसंख्या, जिल्ह्यांतील निरनिराळ्या धर्मांचे लोक, लिहितां वाचतां येणारे लोक, जिल्ह्याचा वसूल, जिल्ह्यांतील शाळांत शिकणारीं मुलें, शिक्षणावर होणारा खर्च, म्युनिसिपालिटीचें उत्पन्न, वगैरे अनेक गोष्टींसंबंधानें माहिती देणारीं अनेक उदाहरणें शिक्षकाला बनवितां येतील.

# वाक्यरचना.

चवथ्या व पांचव्या इयत्तेंत पुढें दिलेल्या पाठाप्रमाणें वाक्यरचनेचा एकादा पाठ मधून मधून घेतल्यास तो मुलांना मनोरंजक वाटेल व वाक्यांतील प्रत्येक शब्दाचें अर्थदृष्ट्या कसें महत्त्व असतें याची त्यांना चांगली कल्पना येईल. या धड्यांनीं वाक्यपृथक्करण कळण्यालाही मदत होईल.

अशा प्रकारच्या पाठाच्या प्रारंभीं शिक्षकानें एकादें अगदीं लहान व साधें वाक्य घ्यावें व तें मुलांच्या साहाय्यानें हळू हळू वाढवावें म्हणजे मुलांना साधें वाक्य कसें वाढवितां येतें याची चांगली कल्पना येईल. मग मुलांना कांहीं वाक्यें देऊन त्यांना तीं वाढविण्यास सांगावें.

शिक्षकानें प्रथम ' मुलगा गेला, ' या वाक्यासारखें एक अगदीं साधें व लहान वाक्य फळ्यावर लिहावें व हें वाक्य आपणांस वाढवावयाचें आहे असें मुलांना सांगावें व मग प्रश्न विचारण्यास सुरुवात करावी. " मुलगा गेला, " या वाक्यांत मुलगा कोठें गेला हें आपणास सांगितलें नाहीं. तो कोठें गेला हें कोणी मला सांगेल काय, असें विचारल्यावर मुलें तो गांवाला गेला, बागेंत गेला, शाळेंत गेला, रानांत गेला, अशीं अनेक उत्तरें देतील. यापैकीं एक उत्तर घेऊन त्यावर वाक्याची पुढील जुळणी करावी. बाकीच्या मुलांना त्यांचीं उत्तरें बरोबर आहेत, पण आपण सध्यां हेंच उत्तर घेऊं असें सांगावें. सर्व मुलांचीं उत्तरें घेऊन वाक्य वाढविणें शक्य नसतें यामुळें एकच उत्तर स्वीकारावें लागतें. शिक्षकानें याप्रमाणें वाढविलेलें वाक्य मागील वाक्याचे खालीं लिहावें.

मुलगा गेला

मुलगा गांवाला गेला.

'हा मुलगा कोणाचा हें आपणांस सांगितलेलें नाहीं. तें आपण प्रथम पाहूं या,' असें शिक्षकानें सांगताच मुलें गोविंदरावाचा, रामरावाचा, अशीं अनेक उत्तरें देतील. यांपैकीं कोणतें तरी एक उत्तर घ्यावें व हे 'रामराव' कोण असा प्रश्न विचारावा व मुलांनीं सांगितल्याप्रमाणें तयार झालेलें नवीन वाक्य मागील दोन वाक्यांच्या खालीं लिहावें.

मुलगा गेला.
मुलगा गांवाला गेला.

आपल्या गांवचे पाटील रामराव यांचा मुलगा गांवाला गेला.

यानंतर या मुलाचें नांव काय होतें, तो थोरला मधला किंवा धाकटा मुलगा होता हें मुलांना विचारावें व नंतर तयार झालेलें नवीन वाक्य मागील वाक्यांखालीं लिहावें.

आपल्या गांवच्या रामराव पाटलाचा थोरला मुलगा शंकर हा गांवास गेला.

मग तो कधीं गांवाला गेला, आगगाडीनें गेला, मोटारनें गेला, बैलगाडीनें गेला किंवा पायीं गेला हें प्रश्न विचारून काढून घ्यावें व अशा प्रकारें वाढविलेलें नवीन वाक्य मागील वाक्यांचे खालीं लिहावें.

आपल्या गांवच्या रामराव पाटलाचा थोरला मुलगा शंकर हा काल संध्याकाळीं पांच वाजतां आगगाडीनें गांवाला गेला. हें एवढें आपणांला कळलें, पण तो कशाकरितां गेला हें आपणांस कळलें नाहीं. तें कोण सांगेल काय? हें विचारल्यावर मुलें जीं उत्तरें देतील त्यांपैकीं चांगलें कोणतें हें मुलांना विचारून तें वाढविलेलें वाक्य फळ्यावर लिहावें व पुन्हा तीं सर्व वाक्यें मुलांकडून वाचून घ्यावीं म्हणजे मूळचें लहान वाक्य एक सारखें कसें वाढत गेलें आहे. हें मुलांच्या लक्षांत येईल.

मुलगा गेला.
मुलगा गांवाला गेला.

आपल्या गांवच्या रामराव पाटलाचा मुलगा गांवाला गेला. आपल्या गांवच्या रामराव पाटलाचा थोरला मुलगा शंकर हा गांवाला गेला.

आपल्या गांवच्या रामराव पाटलाचा थोरला मुलगा शंकर हा काल संध्याकाळीं पांच वाजतां आगगाडीनें गांवाला गेला.

आपल्या गांवच्या रामराव पाटलाचा थोरला मुलगा शंकर हा अभ्यास करण्याकरितां काल संध्याकाळीं पांच वाजतां आगगाडीनें गांवाला गेला.

अशा प्रकारें वाढवितां येतील अशीं कांहीं वाक्यें नमुन्याकरितां पुढें दिलीं आहेत.

सूर्य पाहिला.

घोडा उधळला.

मुलगी पडली.

गुरें निघालीं.

---

# अ. भा. स्त्रीशिक्षण परिषदेचे ठराव.

१ मुलांमुलींच्या शिक्षणक्रमांत त्यांची शारीरिक, मानसिक, धार्मिक वगैरे वाढ होण्याची योजना करण्यांत यावी व त्यांच्या शिक्षणक्रमांत परिस्थित्यनुरूप फरक करण्यांत यावा.

२ आध्यात्मिक ध्येयानुरोधानें नैतिक शिक्षणाचा कार्यक्रम ठरविण्यांत यावा व तें शिक्षण सर्व शाळांतून व कॉलेजांतून सक्तीचें करण्यांत यावें.

३ मुलांना व मुलींना शारीरिक शिक्षण सक्तीचें करावें व सदर शिक्षण मुलांमुलींस आवडेल अशी त्याची योजना असावी.

४ मातृपदाचें ध्येय व गृहसौख्य वाढविण्याच्या शिक्षणास शिक्षण-क्रमांत प्राधान्य मिळावें.

५ मुलांमुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचें असावें व त्याजसाठीं त्यांना उपयुक्त अशीं स्वतंत्र क्रमिक पुस्तकें तयार करावींत. मुलांवर शिक्षणाची सक्ती करतांना आर्थिक बाब आड येऊं देऊं नये.

६ प्राथमिक शिक्षणांत हस्तव्यवसायाचा अंतर्भाव असावा व तें शिक्षण मुलांमुलींना योग्य वळण लावणारें व त्यांच्या गरजा भागविण्यास उपयोगीं पडणारें असावें.

७ मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा सोळा वर्षांच्या आंत असूं नये, व असे विवाह घडवून आणणारे कायद्यानें गुन्हेगार समजण्यांत यावेत. डॉ. गौर यांच्या बिलाला पाठिंबा देण्यांत यावा व ले. असेंब्लीकडे या विषयाची तरफदारी करण्यासाठीं स्त्रियांचें एक शिष्टमंडळ पाठविण्यांत यावें.

# बिनमोल साडी.

—:०:—

एक होती राजकन्या, तिचें नांव मनोरमा होतें. एके दिवशीं मनोरमा सकाळीं बागेंत इकडे तिकडे हिंडत होती. सूर्याचे सोनेरी किरण झाडांवर पडले होते. निरनिराळ्या रंगाचीं फुलें उमललीं होतीं. पांखरें गोड गाणीं गात होतीं. जिकडे तिकडे आनंदी आनंद होता. मनोरमाही आनंदांत होती, व गाणें म्हणत बागेंत हिंडत होती. इतक्यांत एक शिपाई राजकन्येजवळ आला, व त्यानें एक लखोटा तिच्या हातांत टाकला. तो लखोटा सोनेरी होता, व त्याच्यावर सुंदर वेलबुट्टी काढलेली होती. राजकन्येनें तो लखोटा फोडला, व आंतील पत्र पाहिलें तों तेंही सोनेरी अक्षरांत छापलेलें होतें. तें वाचतांक्षणीं राजकन्येला अतिशय आनंद झाला. तो कांहीं तिच्या पोटांत मावेना! त्या आनंदाच्या भरांत भराभर जिन्याच्या दोन दोन पायऱ्यांवरून उड्या मारीत मारीत ती राजवाड्याच्या थेट गच्चीवर गेली. तेथें एक खोली होती, व त्या खोलींत एक देवी होती. मनोरमा देवीला म्हणाली, "मदन या नांवाचा एक अत्यंत सुंदर राजपुत्र या शहरांत आला आहे. त्यानें या मेजवानीकरितां पुष्कळ राजकन्यांना बोलावलं आहे. तसें त्यानं मलाही बोलावलं आहे. या जमलेल्या राजकन्यांमधून जी त्याला पसंत पडेल तिच्याशीं तो लग्न करणार. तर मी या मेजवानीला जाणार. पण मी साडी कोणती नेसूं? काळी, निळी, लाल, अंजिरी का सोनसळी? अंगावर साधा शालू घेऊं कीं बुट्टीचा शालू घेऊं? दागिने कोणते घालूं? कमरपट्टा घालूं का बिंदीबिजवरा बांधूं? का पायांत पैंजण घालूं, का गळ्यांत मोत्याचा कंठा घालूं? काय काय करूं असं मला झालं आहे. मला किनई कांहीं सुचत नाहीं. तर काय करूं तें मला सांग." हें ऐकून देवी हसून म्हणाली, "इतका डौल करण्याची कांहीं गरज नाहीं. तो राजपुत्र

मला माहीत आहे. त्याला बाजारी माल अंगावर घातलेला मुळींच आवडत नाहीं. स्वतां हातानें विणलेली साडी मुलगी नेसून आली तर ती त्याला जास्त आवडेल." मनोरमा म्हणाली, 'देवी, ही माझी अंगावरील साडी मीं स्वतां सूत कातून विणली आहे. पण इश्श, मला नाहीं ती आवडत! सूत कुठं बारीक, तर कुठं जाडं व सतरा गाठी! तसेंच विणतांना धागे आडवे तिडवे गेलेले! मला नको हा सुतडा! साडी कशी नामी नामी पाहिजे.' तेव्हां देवी म्हणाली, 'बरें तर. मी तुला गुलाबाच्या पाकळ्यांची एक गुलाबी साडी तयार करून देतें. पण मला बागेंतून पाकळ्या आणून दे.' तें ऐकतांच मनोरमा म्हणली, 'तें काम माझं! आतां हव्या तेवढ्या पाकळ्या घेऊन येतें.' असें म्हणून मनोरमा पाकळ्या वेचण्याकरितां हातांत एक मोठी परडी घेऊन बागेंत गेली. बागेंत गुलाबाच्या पाकळ्यांचा जमिनीवर सडा झाला होता. राजकन्या भराभर पाकळ्या वेचावयास लागली. इतक्यांत गुलाबाचें एक फूल म्हणालें, 'हे दयाळू राजकन्ये, हे सुरवंट आम्हांला फार त्रास देतात. हे आम्हांला नेहमीं गुदगुल्या करतात. आमचं काळीज किती नाजूक व सोनेरी पण त्याला हे डसतात. तर आम्हांला त्यांच्या जाचापासून सोडव.' राजकन्येला पाकळ्या वेचण्याची तर गर्दी झाली होती. पण फुलांचें दुःख तिला पहावेना. ती चार पांच तास खपली, व सगळे सुरवंट तिनें आपल्या परडींत गोळा केले. तितक्यांत माळी राजकन्येजवळ आला, व म्हणाला, 'सरकार, द्या ते सुरवंट मजकडे. मी ते मारून टाकतों.' तें ऐकतांच मनोरमा म्हणाली, 'छे, छे! काय हें तूं भयंकर बोलतास! नको रे बाबा, मी त्यांना लांब सोडून देतें. या गरिबांनीं रे आपलं काय केलं! आपला जीव तसा त्यांचा जीव!' पुढें त्या सुरवंटांना घेऊन ती राजकन्या लांब लांब एका कुरणांत गेली, व तेथें त्यांना धक्का न लावतां तिनें ते सुरवंट गवतांत सोडले. परंतु इतक्या वेळांत कांहीं सुरवंट तिच्या त्या साडीवर चढले,

होते ! आतां आपलें काम झालें. वेळही फार झाला. तर लवकर बागेंत जाऊन पाकळ्या वेचल्या पाहिजेत असें राजकन्येच्या मनांत आलें, व आतां पाऊल टाकणार तों जवळच्या एका बिळांतून एक ससा टुण् टुण् उड्या मारीत तिच्यापुढें आला व तिला म्हणाला, 'हे दयाळू राजकन्ये, माझ्यावर एक उपकार कर. हें पहा मी या बिळांत राहातों. तेथें माझीं पिलें आहेत. मला व माझ्या बाळांना खायाला घरांत कांहीं नाहीं कांहीं आणावयास मी बाहेर जाईन तर तो पाहा जवळच कुत्रा माझ्या बाळांना मारून खाण्याकरितां कसा टपून बसला आहे. घरीं राहावं तर उपाशीं मरायची पाळी, बाहेर पडावं तर हा राक्षस माझीं पिलं खाईल. यासाठीं मी कांहीं तरी खायाला घेऊन येईपर्यंत तं माझ्या लाडक्यांना संभाळ. ' राजकन्येला विचारच पडला. राहातां येईना व जातां येईना ! राहावं तर वेळ फार झालेला ! पाकळ्या वेचायच्या केव्हां, साडी तयार व्हायची केव्हां व मेजवानीला जायचं केव्हां ! बरं न राहावं तर गरीब बिचारे प्राणी मरणार ! शेवटीं मनोरमा त्या सशाला म्हणाली, 'तूं जा. मी येथें तुझ्या पिलांना संभाळतें.' असें म्हणून ती त्या कुरणांत ओलसर जागीं त्या पिलांचें राखण करीत बसली. बऱ्याच वेळानें ससा परत आला, व मनोरमा तेथून निघाली. संध्याकाळचे पांच वाजले. वेळ थोडा राहिला म्हणून राजकन्या अगदीं लगबग लगबग निघाली. कुरणांतून ती बाहेर पडली. तेव्हां तिला एक झोपडी लागली. त्या झोपडींत एका गरीब शेतकऱ्याचें कुटुंब राहात असे. राजकन्या त्या झोपडीवरून जात असतांना आंतून शेतकऱ्याची बायको बाहेर आली, व अगदीं केविलवाणें तोंड करून म्हणाली, 'हे दयाळू राजकन्ये, मला थोडी मदत कर! काय ग माझी फजीती ! मुलांनीं रडून रडून पुरं केलं ! नवरा घरीं नाहीं. मी स्वयपांक करीत होतें, सगळं अन्न तयार झालं होतं, पण आमच्या पोटांत जायाचं नव्हतं ! आमच्या घरांत मुंगसं फार झालीं आहेत !

चुलीच्यावर माळ्यावर अर्धे अधिक कोळशाचं पोतं ठेवलं होतं, त्याला मुंगसांचा धक्का लागून तें खालीं पडलं व त्यांतील कोळसे व धूळ सगळी अन्नांत मिसळली ! नवरा आतां कामावरून घरीं येईल. मग मी त्याला खायाला काय घालूं! माझ्या बाळांचं अंग धुळीनं अगदीं काळं झालं आहे! व तीं झोपेला आलीं आहेत !' त्या बाईचें बोलणें ऐकून राजकन्येला फार दया आली; व जरी तिला फार वेळ झाला होता तरी ' बाई, मी तुह्मांला मदत करतें' असें ह्मणून ती झोपडींत गेली. तों आंत जिकडे तिकडे धूळच धूळ ! मुलं रडतात, वांसरं हंबरतात, घरांत धुराचा कोंडमारा ! अशी एकच तारांबळ झालेली ! राजकन्येनें प्रथम मुलांस उगें केलें, त्यांचीं तोंडं धुतलीं व त्यांना गाणीं गाऊन निजवलं, व आणखी त्या बाईला थोडी मदत करून तिनं तिचा निरोप घेतला. आतां सूर्य मावळण्याची वेळ आली होती, म्हणून ती सारखी धावपळ करीत बागेंत आली. पण आतां काळोख पडायला लागला. ती अगदीं हिरमुष्टी झाली. कशाच्या पाकळ्या, कशाची साडी, कसली मेजवानी न कसलं काय ! आतां आपलं जेवून निजावं झालं ! असें मनांत आणून ती राजवाड्याच्या पायऱ्या चढायला लागली, इतक्यांत तिचा लाडका ससा राजवाड्यांतून पळून बाहेर चालला आहे, असं तिनं पाहिलं, तेव्हां धरण्याकरितां ती त्याचे मागें धावली. ससा पुढें व राजकन्या मागें अशी धावपळ सुरू झाली. या बोळांतून त्या बोळांत, या गल्लींतून त्या गल्लींत, या पेठेंतून त्या पेठेंत असं धावतां धावतां शेवटीं तो ससा एका मोठ्या वाड्यांत शिरला. तशी मनोरमाही त्याच्या मागोमाग आंत गेली. तों काय चमत्कार ! ज्या मेजवानीला म्हणून जायचं त्याचे ठिकाणीं मनोरमा नकळत आली. अहाहा काय तो थाट ! केवढा मोठा तो दिवाणखाना ! काय ते सुंदर गालिचे ! तसेंच ते गजनीचे पडदे ! जिकडे तिकडे थाटमाट व हंड्या झुंबरांचा लखलखाट ! त्या दिवाणखान्यांत सुंदर चित्रें ठेवलीं होतीं ! बाहेर बागेंत पाण्याचीं

कारंजीं उडत होतीं ! चांदणें टिपूर पडलें होतें! जाई, जुई, मोगरा, व चमेली यांचे मंडप फुलले होते! मोर नाचत होते ! मैना गात होत्या, बाहेरून वाळ्याचे पडदे सोडले होते! अत्तराचा घमघमाट सुटला होता! शंभर सवाशें राजकन्या तेथें आल्या होत्या ! काय त्यांचा थाटमाट ! त्यांचीं तीं निरनिराळ्या रंगांचीं जरीचीं पातळं ! अंगावर भरगची शालू ! हिऱ्या माणकांचे दागिने ! पायांतील नुपुरांचा रुमझुम आवाज ! वारा घेण्याकरितां हातांत पिसांचे पंखे ! त्यांचें चालणें काय, बोलणें काय, पाहाणें काय, नटणें काय, मुरडणें काय, सगळा कांहीं थाट होता. अशा या थाटमाटांत आपली मनोरमा येऊन धडकली. पण केवढा चमत्कार ह्मणून सांगूं. उंबऱ्याच्या आंत आलेली पाहातांच तो मदन राजपुत्र तिच्या जवळ गेला व तिला ह्मणाला, 'मनोरमा, ये. अशी सिंहासनावर मजजवळ येऊन बस' असें म्हणून त्यानें आपला हात तिच्या हातांत घालण्याकरितां पुढें केला. तें पाहातांच राजकन्या अगदीं कावरी बावरी झाली ! काय करावें हें तिला सुचेना ! 'माझा पोशाख.................' अशी कांहींशी ती घुटमळली. तसें राजपुत्र म्हणाला, 'छे छे छे, या पोशाखाला मोल नाहीं! ये, लाजूं नकोस, या सिंहासनावर मजजवळ बस!' हें ऐकतांच त्या राजपुत्राची आई त्याच्यावर एकदम उसळली, व म्हणाली 'मदन, तूं हें काय करतोस? काय ती मुलगी न काय तो पोशाख ! अंगावर मणभर वजनाचा सुतडा ! त्याला सतरा भोकं पडलेलीं ! चिखल लागलेला ! त्यावरचे ते सुरवंट तर पाहा ! खंडीभर अंगावर मळ ! डोकं तर खायाला उठलंय ! पायांतला जोडा फाटलेला ! वाहवारे वाहवा ! काय पण अवतार ! या पाहा कशा नक्षत्रासारख्या मुली एथें आल्या आहेत. हिरा टाकून देऊन तुला गारगोटीरे कशी आवडली ! खुळारे खुळा !' तें ऐकतांच राजपुत्र म्हणाला, या राजकन्येचाच पोशाख मला फार आवडला. ही मनोरमा सद्गुणांची खरोखर पुतळी आहे ! मुलांना ही हवीशी वाटते. पांखरें प्रेमानें हिच्या अंगा-

खांद्यावर नाचतात. सशासारखे प्राणी हिच्या मांडीवर बसून झोप घेतात. सुरवंटासारख्या किडयांना तर हिच्यावांचून करमत नाहीं, म्हणून ते तिच्या साडीवर बसून राहिले आहेत. फुलांना तर ही आपला जीव कीं प्राण समजते. राजकन्येनें स्वतां हातांनीं विणलेली साडी तर उभ्या जगांत सांपडायची नाहीं. अशी ही सौंदर्याची खाण, सद्गुणाची पुतळी, हिला गारगोटी म्हणावयाचें ? छे, छे, छे. मनोरमा ये, तूं आज माझी राणी झालीस.' असें म्हणन त्यानें तिच्या हातांत हार घातला, व तिला आपल्याजवळ बसविलें. झालें. तेथें इतर जमलेल्या राजकन्या फार खट्टू झाल्या. त्यांचा सगळा दिमाख वायां गेला, व एका मागून एक सर्वजणी चालत्या झाल्या. शेवटीं मदन म्हणाला, 'मनोरमा, ही तुझी साडी लोकांनीं पाहावी म्हणून मी कांचेच्या कपाटांत जपून ठेवणार आहें.' तसें मनोरमा म्हणाली, 'छे, छे ! निदान परटाकडून धुवून आणून तरी ठेवावी.' तेव्हां राजपुत्र म्हणाला, 'छे ! अशी ठेवण्यांतच शहाणपणा आहे. साडीकडे नजर टाकतांच तुझे उपकार स्पष्ट दिसले पाहिजेत. या साडीसारखी सुंदर साडी नाहीं. तिचें मोल होणार नाहीं. इतर साडया तिच्यावरून ओवाळून टाकाव्या.'

पुढें मदन व मनोरमा यांचें लग्न झालें, व त्यांनीं आपले दिवस आनंदांत घालविले.

---

# लहान मुलांकरितां गोष्टी.

——:०:——

## पळ रे भोपळ्या टुणुक् टुणुक्.

एक होती म्हातारी. ती होती भारी गरीब. ती भारी काम करी, पण तिला पोटभर खावयाला मिळत नसे. तिची एक मोठी मुलगी होती. एक दिवस म्हातारीला कांहीं खावयाला मिळालें नाहीं, तेव्हां ती मनात म्हणाली,

‘ मी मुलीकडे जाईन,
सात आठ दिवस राहीन,
शिरापुरी खाईन,
धष्टपुष्ट होईन,
मग परत येईन. ’

मग ती मुलीच्या गावास जाण्यास निघाली. ती दूर रानात गेली. तेथें तिला भेटला एक लांडगा. तो तिला म्हणाला, ‘म्हातारे, म्हातारे, मला लागली आहे भूक, मी तुला खातों. ’ म्हातारी त्याला म्हणाली, ‘ मला खाऊन तुझी भूक जाणार नाहीं. मला मांस मुळींच नाहीं. माझीं हाडें आणि कातडें खाऊन तुझें पोट दुखेल.

मी मुलीकडे जाईन,
सात आठ दिवस राहीन,
शिरापुरी खाईन,
धष्टपुष्ट होईन,

मग परत येईन,
मग तूं मला खा.'

लांडगा म्हणाला, 'जा तर. सात आठ दिवसांत परत ये, विसरूं नको. मी एथें तुझी वाट पाहतों.'

म्हातारी तेथून निघाली. ती पुढें गेली. पुढच्या रानांत तिला अस्वल भेटलें. अस्वलाला भारी भूक लागली होती. अस्वल म्हातारीला म्हणालें, 'म्हातारे, म्हातारे, मला लागली आहे भूक. मी तुला खातों.' म्हातारी त्याला म्हणाली, 'मला खाऊन तुझी भूक भागणार नाहीं. मला मांस मुळींच नाहीं. माझीं हाडें व मांस खाऊन तुझें पोट मात्र दुखेल.

मी मुलीकडे जाईन,
सात आठ दिवस राहीन,
शिरापुरी खाईन,
धष्टपुष्ट होईन,
मग परत येईन,
मग तूं मला खा.''

अस्वल म्हणालें, 'जा, तर. सात आठ दिवसांत परत ये विसरूं नको. मी तुझी एथेंच वाट पाहातों.'

म्हातारी तेथून निघाली, ती पुढें गेली. पुढच्या रानात तिला वाघ भेटला. वाघाला भारी भूक लागली होती. वाघ म्हातारीला म्हणाला, 'म्हातारे, म्हातारे, मला लागली आहे भूक. मी तुला खातों.' म्हातारी त्याला म्हणाली, 'मला खाऊन तुझी

भूक भागणार नाहीं. मला मात्र मुलीच नाहीं. माझीं हाडें वें मांस खाऊन तुझें पोट मात्र दुखेल.

मी मुलीकडे जाईन,
सात आठ दिवस राहीन,
शिरापुरी खाईन,
धष्टपुष्ट होईन,
मग परत येईन,
मग तूं मला खा.'

वाघ म्हणाला, 'जा तर. सात आठ दिवसांत परत ये, विसरूं नको. मी तुझी एथें वाट पाहातों.'

म्हातारी तेथून निघाली. ती मुलीच्या घरीं गेली. ती तेथें सात आठ दिवस राहिली. तिनें शिरापुरी खाल्ली. ती धष्टपुष्ट झाली. ती परत घरीं निघाली. ती मुलीला म्हणाली, 'बाळ, वाटेंत वाघ माझी वाट पाहात आहे. अस्वल माझी वाट पाहात आहे. लांडगा माझी वाट पाहात आहे. वाघ मला खाणार आहे. अस्वल मला खाणार आहे. लांडगा मला खाणार आहे. आता तुझी माझी गांठ पुन्हा पडणार नाहीं.' मुलगी म्हणाली 'आई' भिऊं नकोस. या वाळलेल्या कडू भोपळ्यांत तूं बस. हा पळत पळत घरीं जाईल. यांत बसलीस म्हणजे तूं कोणाला दिसणार नाहींस.'

म्हातारी भोपळ्यांत बसली. भोपळा टुणुक् टुणुक् पळूं लागला. तो रानांत आला. तेथें वाटेजवळच वाघ होता. त्याला वाटलें 'म्हातारी आंत लपली असेल. तो म्हणाला, 'म्हातारे म्हातारे, थांब थांब. मला तुला खाऊं दे.' म्हातारी आंतून बोलली, 'कुठली

म्हातारी कोणास ठाऊक ! पळरे भोपळ्या टुणुक् टुणुक्. ' मग भोपळा खूप पळत चालला व वाघ त्याचे मागें लागला.

पुढच्या रानात अस्वल म्हातारीची वाट पाहात होतें. त्यानें तो भोपळा पळतांना पाहिला. त्याला वाटलें म्हातारी भोपळ्यात असेल. तें म्हणालें, ' म्हातारे, म्हातारे, बरी आलीस. आता मी तुला खातों.' म्हातारी भोपळ्यांतून म्हाणाली, ' कुठली म्हातारी, कोणाला ठाऊक । पळरे भोपळ्या टुणुक् टुणुक्.–' तो भोपळा अस्वलाच्या हातून निसटला तो खूप पळत चालला व अस्वल त्याच्या मागें लागलें. पुढें भोपळा, मागें अस्वल व त्याच्या मागें वाघ असे ते एकसारखे पळत चालले.

पुढच्या रानांत लांडगा म्हातारीची वाट पाहात होता. त्यानें तो भोपळा पाहिला. त्याला वाटलें भोपळ्यांत म्हातारी बसली असेल. तो म्हणाला, " म्हातारे, म्हातारे, आतां थांब, मी तुला खातों." पण म्हातारी म्हणाली, " कुठली म्हातारी, कोणास ठाऊक. चलरे भोपळ्या टुणुक् टुणुक्." पण लांडगा होता लबाड. त्यानें तो भोपळा चटकन धरला. मग म्हातारी भोपळ्यांतून बाहेर पडली. इतक्यांत अस्वल तेथें आलें. त्याचे मागोमाग वाघही तेथें आला. म्हातारीनें पाहिलें कीं, आतां युक्ति योजिली पाहिजे, नाहींतर हे तिघे आपणाला खातील. ती तिघांना ह्मणाली, ' बाबांनो, तुम्ही तर आतां मला खाणार. पण माझें डोकें कोण खाईल ?' वाघ म्हणाला ' मी खाईन. ' अस्वल म्हणालें ' मी खाईन. ' कोल्हा म्हणाला ' मी खाईन. ' म्हातारी म्हणाली, ' माझें डोकें कोणी खावयाचें याचा विचार ठरवा मग मला मारा. ' हें ऐकून तिघेही ' मी डोकें घेईन, मी डोकें घेईन ' म्हणून आपसांत मारामारी करूं लागले. त्यांची मारामारी

चाललेली पाहून म्हातारी भोपळ्यांत बसली व हळूंच भोपळ्यास म्हणाली,

' लडूं दे या तिघांला
चल रे भोपळ्या घराला.'

लवकरच म्हातारी सुखरूप घरीं पोहोंचली. वाघ अस्वल व लांडगा भांडून भांडून दमले व रानांत निघून गेले.

---

# खाईन शेवया मटक मटक

एक होती म्हातारी. तिनें केल्या शेवया आणि बसली उन्हांत त्या वाळवीत. तेथें आला एक कावळा. त्याला वाटलें कीं, आपण त्यांतल्या थोड्या शेवया खाव्या. त्यानें शेवयांत चोंच घातली ती म्हातारीनें पाहिली. म्हातारीनें कावळ्याला हुसकावून लावलें. ती म्हणाली, ' कावळ्या, कावळ्या, तुझी चोंच घाणेरडी आहे. चोंच धुवून ये. मग शेवया खा.' कावळा, म्हणाला, 'चोंच धुण्यास पाणी कोठें आहे?' म्हातारी म्हणाली, ' विहिरीवर जा व तोंड धू. ' मग कावळा विहिरीवर गेला व म्हणाला,

" विहिरीबाई विहिरीबाई, मला पाणी दे.
पाणी घेऊन चोंच धुईन.
चोंच धुवून शेवया खाईन "

विहीर म्हणाली, " घागर आण व पाणी काढ." मग कावळा कुंभाराकडे गेला व तो कुंभाराला म्हणाला,

"कुंभारदादा, कुंभारदादा, मला घागर दे.
मी घागर घेऊन पाणी काढीन.
पाणी काढून चोंच धुईन.
चोंच धुवून शेवया खाईन."

कुंभार म्हणाला, "माती आण म्हणजे मी घागर देईन." मग कावळा शेताकडे गेला व म्हणाला,

"शेतदादा, शेतदादा, मला माती दे.
मी माती देऊन घागर घेईन.
घागर घेऊन पाणी काढीन.
पाणी काढून चोंच धुईन.
चोंच धुवून शेवया खाईन."

पण शेत म्हणालें, "शेतकऱ्याला बोलाव म्हणजे तो माती काढील." मग कावळा शेतकऱ्याकडे गेला व म्हणाला,

"शेतकरीदादा, शेतकरीदादा, मला माती खणून दे.
माती देऊन घागर घेईन.
घागर घेऊन पाणी काढीन.
पाणी काढून चोंच धुईन.
चोंच धुवून शेवया खाईन."

पण शेतकरी म्हणाला, "मला भूक लागली आहे. मला दूध देशील, तर मी माती खणून देईन." मग कावळा गाईकडे गेला व म्हणाला,

"गाई, गाई, मला दूध दे.
दूध देऊन माती घेईन.
माती देऊन घागर घेईन.
घागर घेऊन पाणी काढीन.
पाणी काढून चोंच धुईन,
चोंच धुवून शेवया खाईन."

पण गाय म्हणाली, "आधीं मला चारा आण मग मी तुला दूध देईन." मग कावळा डोंगराकडे गेला व म्हणाला,

"डोंगरा, डोंगरा, चारा दे.
चारा देऊन दूध घेईन.
दूध देऊन माती घेईन.
माती देऊन घागर घेईन.
घागर घेऊन पाणी काढीन.
पाणी काढून चोंच धुईन.
चोंच धुवून शेवया खाईन."

पण डोंगर म्हणाला, "गवत कापायला विळा आण." मग कावळा लोहाराकडे गेला, व म्हणाला,

"लोहारा, लोहारा, विळा दे.
विळा घेऊन चारा कापीन,
चारा देऊन दूध घेईन.
दूध देऊन माती घेईन.
माती देऊन घागर घेईन.
घागर घेऊन पाणी काढीन.

पाणी काढून चोंच धुईन.
चोंच धुवून शेवया खाईन."

मग लोहारानें त्याला विळा दिला व तो विळा चोंचींत घेऊन कावळा उडाला. विळ्याला फार धार होती. ती लागली त्याच्या मानेला. कावळ्याला झाली जखम. तो बसला झाडावर रडत.

इतक्यांत म्हातारीनें आपल्या शेवया वाळविल्या व त्या घरांत नेऊन ठेवल्या!

---

# कायदे-मंडळाकरितां नवीन इमारत.

## दिल्ली येथील समारंभ.

---

### बादशहांचा संदेश.

नव्या दिल्लींत नवीन बांधलेल्या कायदे मंडळाची इमारत उघडण्याचा समारंभ ता. १८ रोजीं व्हाइसरॉयसाहेब ना. लॉर्ड अर्विन यांच्या हस्तें मोठ्या थाटानें झाला. या समारंभाकरितां असेंब्ली हॉलसमोर एक विस्तृत ॲंफीथिएटर बांधण्यांत आलें होतें व आंतील बाजूस एक मोठा भरजरी शामियाना लावून त्याखालीं सोन्याचीं दोन सिंहासनें मांडण्यांत आलीं होतीं. सर्व इमारत उत्तम प्रकारें शृंगारण्यांत आली होती. संस्थानिक, असेंब्लीचे व कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद, मोठमोठे सरकारी अधिकारी वगैरेंचा मोठा समाज साडेदहा वाजण्याच्या आंत समारंभासाठीं जमून राहिला होता. ना. लॉर्ड अर्विन हे लेडी अर्विन यांच्यासह दरबारी लवाजम्यानिशीं समारंभासाठीं येण्याकरितां

व्हाइसरीगल लॉजवरून निघतांच त्यांच्या स्वागतासाठीं ३१ तोफांची सलामी देण्यांत आली. रस्त्याच्या दोहों बाजूंस लष्करी पलटणी उभ्या करण्यांत आल्या होत्या.

सर बी. एन्. मित्र ( व्हाइसरॉयसाहेब यांच्या कार्यकारी कौन्सिलचे सभासद व पब्लिक वर्क्स खात्याचे प्रमुख ) यांनीं व दिल्लीच्या चीफ कमिशनरांनीं ना. लॉर्ड व लेडी अर्विन यांचें स्वागत केलें व कौन्सिल हाऊस बांधणाऱ्या प्रमुख अधिकाऱ्यांची व इंजिनिअरांची व्हाइसरॉयसाहेबांना ओळख करून दिली. याप्रमाणें प्रास्तविक कार्यक्रम झाल्यावर ना. सर बी. एन. मित्र यांनीं इमारत उघडण्याविषयीं व्हाइसरॉय साहेबांना विनंती केली.

ही विनंती करतांना सर बी. एन्. मित्र यांनीं बरेंच मोठें भाषण करून या इमारतीचें एकंदर स्वरूप व महत्त्व वर्णन केलें व सर हर्बर्ट बेकर व इतर प्रमुख इंजिनियर व शिल्पशास्त्रज्ञ यांच्या कामगिरीची प्रशंसा केली. या इमारतीच्या पायाचा दगड सहा वर्षांपूर्वी म्हणजे ता. १२ फेब्रुवारी १९२१ रोजीं कनॉटचे ड्यूकसाहेब यांच्या हस्तें बसविण्यांत आला. या इमारतींत ले. असेंब्ली, कौन्सिल ऑफ स्टेट व प्रिन्सेस चेंबर यांच्याकरितां तीन स्वतंत्र मोठाले हॉल असून असेंब्लीचा हॉल सर्वांत मोठा आहे; व या सर्वांच्या संयुक्त उपयोगाकरितां म्हणूनही एक विस्तृत हॉल बांधण्यांत आला असून त्याशिवाय निरनिराळ्या कमिट्या भरण्याकरितां दिवाणखाने, अधिकाऱ्यांच्या ऑफिसांकरितां जागा व इतर व्यवस्थाही केलेली आहे. हिंदुस्तानच्या सर्वांत प्रमुख अशा प्रातिनिधिक संस्थांचें निवासस्थान या दृष्टीनें तर या देशाच्या राजकीय इतिहासांत या इमारतीचें महत्त्व चिरंतन कायम राहील असें सांगून सर बी. एन्. मित्र यांनीं ही इमारत उघडण्याविषयीं व्हाइसरॉय साहेबांना विनंती केली.

## बादशहांचा संदेश.

लॉर्ड अर्विन यांनीं या समारंभानिमित्त आपलें भाषण करण्यापूर्वी पंचम जॉर्ज बादशहांकडून आलेला संदेश सर्वांना वाचून दाखविला. या

संदेशांत बादशहा म्हणतात कीं, " पंधरा वर्षांपूर्वी दिल्ली येथें आम्हीं जें जाहीर भाषण केलें त्यांत सध्यां होत असलेल्या स्थित्यंतरापासून हिंदुस्थानाला सुख व भरभराट यांचा लाभ होवो अशी आशा व्यक्त केली होती. त्यावेळीं ज्या कामाची सुरवात करण्यांत आली होती, त्यांतील एका प्रमुख भागाचें काम पूर्ण झालें आहे. ही इमारत उघडण्याच्या समारंभाशीं संलग्न होण्यास आम्हांस फार आनंद वाटत आहे. दिल्लीच्या नवीन राजधानींत अनेक नवीन महत्त्वाच्या संस्थांची व अभिनव राष्ट्रीय जीवनाची प्राणप्रतिष्ठा होत आहे.

या नवीन इमारतीमुळें हिंदी राष्ट्राच्या लौकिकांत भर पडेल व येथें येणारे राजेरजवाडे व हिंदी जनतेचे प्रतिनिधि यांनीं बंधुप्रेम व समाजसेवा या कार्यांना स्फूर्ति मिळत राहील अशी आम्हांस आशा आहे. कारण या गुणांवरच आमच्या प्रजाजनांची सुखशांती अधिष्ठित असणार. उघडावयाच्या कौन्सिल हाउसमध्यें सुविचार व न्याय अखंड नांदोत व हिंदी राष्ट्राची सेवा करण्यासाठीं या ठिकाणीं यापुढें जी मंडळी येतील त्या सर्वांवर ईश्वराची कृपा असो असें आम्ही इच्छितों."

ना. लॉर्ड अर्विन यांनीं बादशहांचा वरील आशयाचा संदेश वाचून दाखविल्यानंतर समयानुरूप भाषण करून आतांपर्यंत हिंदी राजकारणांत घडलेल्या स्थित्यंतरांचा थोडक्यांत उल्लेख केला व जबाबदारीची राज्यपद्धति हिंदी लोकांना देण्याचें जें ध्येय १९१७ सालीं जाहीर करण्यांत आलें त्याचें एक स्पष्ट निदर्शक या दृष्टीनें या समारंभाचें महत्त्व किती आहे हें सांगितलें.

नंतर व्हाइसरॉयसाहेबांनीं सोन्याच्या किल्लीनें दरवाजाचें कुलूप काढलें व कौन्सिल हाउस उघडल्याचें जाहीर केलें. नंतर त्यांनीं लेडी अर्विन व सर बी. एन. मित्र, पतियाळाचे महाराज, सर हेन्री मॉन्क्रीफ स्मिथ, मि. व्ही. जे. पटेल, सर हर्बर्ट बेकर वगैरे मंडळीसमवेत असेंब्ली हॉल व इतर भाग यांची पाहाणी केली.

—ज्ञानप्रकाश.

# सर्वनाम.

सर्वनाम शिकवून झाल्यावर मुलांना पुढें दिल्याप्रमाणें प्रश्न सोडविण्यास देतां येतील. एक प्रश्न फळ्यावर लिहावा. तो मुलांनीं आपल्या वहींत लिहून घ्यावा व त्याचे खालीं त्यांनीं उत्तर लिहावें. एका प्रश्नाचें उत्तर तपासल्यावर दुसरा प्रश्न लिहिण्यास घ्यावा. झालेल्या भागाची उजळणी घ्यावी व मुलांना मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग करण्याची संधि द्यावी हा या प्रश्नांचा उद्देश आहे.

## प्रश्न १ ला.

रामा गुरुजीला म्हणाला, 'गुरुजी रामा गांवाला जाणार आहे. तेथें रामाला दोन दिवस लागतील, म्हणून रामाला दोन दिवसांची रजा द्या. तिसऱ्या दिवशीं रामा शाळेंत येईल.' या वाक्यांत रामा शब्द पुनः पुन्हा आला आहे तो कानाला बरोबर लागत नाहीं, म्हणून हें वाक्य पुढें दिल्याप्रमाणें लिहितात. रामा गुरुजीस म्हणाला, 'गुरुजी, मी गांवाला जाणार आहें, तेथें मला दोन दिवस लागतील म्हणून मला दोन दिवसांची रजा द्या. तिसऱ्या दिवशीं मी शाळेंत येईन.' सर्वनाम हें नामाचा उच्चार पुन्हा पुन्हा होऊं नये म्हणून येतें व त्याला स्वतांचा अर्थ नसतो. पुढील वाक्यांत पुन्हा पुन्हा येणाऱ्या नामाबद्दल सर्वनामें घाला.

( १ ) गोविंदा रामाला म्हणाला 'गोविंदा रामाचे घरीं येईल. मग गोविंदा रामाला उदाहरण समजावून देईल व मग गोविंदा रामाला गोष्ट वाचून दाखवील.'

( २ ) मुलें शिक्षकाला म्हणालीं, 'गुरुजीनें मुलांना उद्यां सुटी दिली म्हणजे मुलें गुरुजीबरोबर सहलीला जातील.'

( ३ ) रामा कृष्णाला म्हणाला, 'कृष्णानें गोविंदाची संगति धरूं

नये. कारण गोविंदा वाईट मुलगा आहे. तो कृष्णाला बिघडवील.. जर कृष्णानें रामाची संगती धरली, तर रामा कृष्णाबरोबर बोलणार नाहीं.'

प्रश्न २ रा.

नामाचा उच्चार पुन्हा पुन्हा होऊं नये म्हणून त्याजबद्दल सर्वनाम घालतात. ज्या नामाबद्दल सर्वनाम घालतात तें नाम सांगितल्याशिवाय या सर्वनामाचा अर्थ आपणांस कळत नाहीं. 'मी तुझा चेंडू पाहिला नाहीं.' या वाक्यावरून आपणांला अर्थ कळणार नाहीं. हें वाक्य, सदु गोविंदाला म्हणाला, 'मी तुझा चेंडू पाहिला नाहीं,' असें दिलें ह्मणजे अर्थ स्पष्ट कळेल. अशाच प्रकारें पुढील वाक्यें पुरीं करा.

(१) मी तुजबरोबर खेळणार नाहीं, कारण तूं नीट खेळत नाहींस.
(२) पाहिजे तर हें घे अगर तें घे.
(३) माझी वही पाहून तूं उदाहरणें करूं नको.

प्रश्न ३ रा.

नामाचा उच्चार वारंवार होऊं नये, म्हणून आपण सर्वनामें घालतों. यमूनें बागेंत फुलें तोडलीं. यापुढील हकिकत सांगतांना आपण सर्वनामांचा उपयोग करितों. जसें, तिनें तीं परडींत ठेविलीं मग तिनें घरीं जाऊन त्यांचा हार केला व देवाला वाहिला. पुढें एक वाक्य दिलें आहे. त्याच्या पुढील वाक्यें द्या व त्यांत सर्वनामें घाला.

१ यमूचा एक सुंदर पोपट आहे.
२ रामानें एक भोवरा विकत घेतला.
३ रामराव आपल्या मुलीला घेऊन बाजारांत गेले.

प्रश्न ४ था.

सर्वनाम हें नामाबद्दल येतें. ज्या नामाबद्दल सर्वनाम घातलें आहे

तें नाम कळल्याशिवाय त्या सर्वनामाचा अर्थ कळत नाहीं. तुम्ही वाक्यें बनवा व त्यांत खालील सर्वनामें घाला.

मी, तुं, तो, जो, हा, आम्ही, ते, तीं, त्या. एका वाक्यांत दोन किंवा तीन सर्वनामें यावीं.

---

## बादळ.

( भजगोविंद भजगोपालं या चालीवर )

कडक ऊन हें आज पडतसे
उष्मा त्यानें फार होतसे
वारा पडला बंद मुळीं तो
जीव घाबरा किति हा होतो १

हुं चुं न कोठें होय मुळीं तें
पक्षि शांतही झाडावर ते
झाडाखालीं गाई बसती
डोळे मिटुनी स्वस्थ राहती २

निळा चांदवा आकाशाचा
वास न तेथें मुळीं ढगाचा
शांत दिसे हें नभ बहु वरतीं
दिसते धरणी शांत खालतीं ३

क्षितिजावरती डोकावुनि ही
मेघांची बघ माला पाही
हळूहळू ही वरतीं येते
पशुपक्ष्यांचीं रूपें घेते ४

निजलेला हा वारा उठला
कसा लागला पळावयाला

सों सों सों सों गर्जत येतो.
धूळ उडवुनी नभ हें भरितो ५

झाडाखालीं पालें पडलीं
वाळुनि वाळुनि शुष्क जाहलीं
धांवत जातीं वायूसंगें
भर भर भर भर कैशीं वेगें ६

वायू लागे फिरावया हा
गर गर गिरक्या घेत किती हा
लोट धुळीचा आकाशीं ने
त्यांत खेळती पिलेंहि पानें ७

सोसाट्याचा वारा सुटला
जोरानें हा हलवी तरुला
शाखा तरुच्या तुटुनी पडती
पानें दाहि दिशांना पळती ८

गांवामध्यें वारा शिरतो
अनर्थ बहु हा उडवुनि देतो
द्वारें खिडक्या धडधड वाजवी
घरावरिल ते पत्रे उडवी ९

धूळ फेकुनी डोळे भरवी
टोप्या छत्र्या पगड्या उडवी
दुकानांत ने लोट धुळीचा
कचरा तेथ तो मार्गींचा १०

कृष्ण घनांनीं नभ हें भरलें
सूर्यबिंब तें मागें लपलें
प्रदेश सारा धुळिनें भरला
कशी गर्जना करितो वारा ११

चमचमाट हा दिसे विजांचा
गडगडाट हो नभिं मेघांचा

थय थय थय थय विजा नाचती
गड गड गड गड मेघ गर्जती १२

आला आला पाउस आला
थेंब लागले पडावयाला
टप टप टप टप कसे वाजती
धांवत धावत येत खालतीं १३

पाउस जोराचा हा आला
वारा करितो साह्य तयाला
धों धों धों धों पाउस पडतो
पाण्याचा जणुं मारा होतो १४

जलमय झाले मार्गहि सगळे
पाणि चहुंकडे वाहुं लागलें
लोटामागुनि लोट येउनी
प्रवाह वाहाति रस्त्यामधुनी १५

लखलखाट हा वरति विजांचा
गडगडाट तो नभिं मेघांचा
सोसाटा हा वहु वायूचा
मार तसा हा पर्जन्याचा १६

भिउनी गेलें जग हें सगळें
अनर्थ आतां काय कोसळे
वायू पाणी अग्नी यांचा
खेळ चालला भीषण साचा १७

कडकड कडकड झाडें करती
धड धड धड धड भिंती पडती
रस्त्यावरतीं पाणी आलें
घरामधें हें कसें पसरलें १८

× × ×

वायूचा हा जोरही सरला
हळू हळू हा वाहुं लागला

मेघ तसे हे दमुनी गेले
दूर पहा हे जाउं लागले १९

मेघांच्या या फटीमधोनी
सूर्य दिसे हा हसतो गगनीं
हळू हळू हे मेघही गेले
संपवोनियां कामहि अपुलें २०

वृक्ष डोलती लताहि हसती
पक्षी सारे गाउं लागती
जग हें सौंदर्यानें नटलें
जीवन त्याला नवीन आलें २१

---

## ताऱ्यांचें निरीक्षण

मुलींच्या सहाव्या इयत्तेंत त्यांना मुख्य थोड्या ताऱ्यांचें, नक्षत्रांचें व राशींचें निरीक्षण करावयाचें असतें. मुख्य असे थोडे तारे व राशी त्यांना ओळखतां याव्या व त्यांच्या साहाय्यानें पुढें स्वतां इतर पुस्तकें वाचून त्यांना आणखी तारे व राशी ओळखतां याव्या हाच या निरीक्षणाचा उद्देश आहे.

सूर्य ज्या मार्गानें आकाशांतून पृथ्वीसभोंवतीं फिरताना दिसतो व ज्या मार्गांतून चंद्र, गुरु, शुक्र, शनि, मंगळ हे प्रदक्षिणा करतात त्या आकाशमार्गाला क्रान्तिवृत्त म्हणतात. हें क्रान्तिवृत्त फार महत्त्वाचें आहे. कारण, मेष, वृषभ, मिथुन वगैरे १२ राशी व अश्विनी, भरणी, कृत्तिका वगैरे २७ नक्षत्रें याच क्रान्तिवृत्तांत आहेत.

राशी म्हणजे काय, नक्षत्रें कशाला म्हणतात वगैरे सर्व माहिती या ठिकाणीं देण्याचा हेतु नाहीं. शिक्षकानें दीक्षित यांचें 'रात्रीच्या दोन

मर्टका मौजं' हें पुस्तक वाचल्यास त्याला ही सारी माहिती मिळेल. आकाशांतील ताऱ्यांच्या, त्यांच्या तेजावरून प्रती ठरविल्या आहेत. अत्यंत देदीप्यमान ताऱ्यांना पहिल्या प्रतीचे तारे म्हणतात. नुसत्या डोळ्यानें साधारण पाहाणाराला चवथ्या प्रतीपर्यंतचे तारे सहज ओळखतां येतात. मुलींना पुढील तारे ओळखतां आले म्हणजे पुरें होईल.

| ताऱ्याचें नांव | प्रत | केव्हां पाहातां येईल. |
|---|---|---|
| ध्रुव | २ री | वाटेल तेव्हां |
| ब्रह्महृदय | १ ली | माघ, फाल्गुन, चैत्र, वैशाख, संध्याकाळीं. |
| अभिजित् | १ ली | चैत्र, वैशाख, रात्रीं ८।९ वाजतां माघ, फाल्गुन, उजाडतां. |
| रोहिणी | १ ली | मार्गशीर्ष ते चैत्र संध्याकाळीं. |
| (२तारे) मृग | १ ली | ,, ,, |
| व्याध | १ ली | ,, ,, |
| अगस्त्य | १ ली | माघ, फाल्गुन, चैत्र संध्याकाळीं. |
| पुनर्वसु (एक तारा) | १ ली | ,, ,, |
| चित्रा | १ ली | चैत्र, वैशाख, संध्याकाळीं. |
| स्वाति | १ ली | ,, ,, |
| (मधला तारा) श्रवण | १ ली | माघ फाल्गुन उजाडतां. |
| नरतुरंगम दोन तारे | १ ली | चैत्र, वैशाख, रात्रीं ८।९ वाजतां. |
| स्वस्तिक | १ ली | ,, ,, |

माघ, फाल्गुन व चैत्र हे महिने ताऱ्यांचे निरीक्षणास फार चांगले असतात.

ध्रुवाचा तारा थेट उत्तरेकडे तोंड करून उभें राहिलें असतां आपल्या डाव्या डोळ्यासमोर उत्तर क्षितिजाचे वर थोडासा आलेला दिसेल. त्याच जागीं तो नेहमीं असल्यानें तो तेव्हांच ओळखतां येईल. या महिन्यांत ( माघांत ) सूर्य अस्तास गेल्यावर व अंधार पडल्यावर उंच जागीं अगर मैदानांत उभें राहिलें असतां बरेच महत्त्वाचे तारे दृष्टीस पडतील. पश्चिमेकडे तोंड करून उभें राहिलें असतां पश्चिम क्षितिजाचे जरा वर अत्यंत तेजस्वी ग्रह जो गुरु तो अस्ताचलाकडे मावळण्यास जात असलेला दिसेल. पश्चिमेकडे तोंड करून उभें राहावें नंतर वर तोंड करून थेट आपल्या डोक्यावरील आकाशाकडे नजर टाकावी. आकाशाचे अगदीं मध्यमार्गी अगर त्याच्या जरासा पश्चिमेस रोहिणीचा लाल तारा दृष्टीस पडेल. साधारणपणें इंग्रजी एन् अक्षराच्या आकृतीच्या टोंकास हा तारा दिसेल. याच्या पश्चिमेस जरा अंतरावर पाहिलें असतां दुसरा लाल तसाच तारा दिसेल; पण याचा प्रकाश शांत असतो. तो इतर ताऱ्यांप्रमाणें लखलख करीत नाहीं. यावरून हा ग्रह आहे ही गोष्ट तेव्हांच लक्षांत येईल. हा गोल मंगळ होय. रोहिणीच्या उत्तरेस पाहिलें असतां आणखी एक लाल तारा दृष्टीस पडतो. हा ब्रह्महृदय होय. रोहिणी, मंगळ व ब्रह्महृदय मिळून झालेला त्रिकोण सहज ओळखतां येईल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | उत्तर | | |
| | | *ब्रह्महृदय | | |
| पश्चिम | •मंगळ | *रोहिणी | | पूर्व |
| | | दक्षिण | | |

पूर्वेकडे तोंड वळविलें असतां आपल्या डोक्याचे वर पण जरा दक्षिणेकडे मृग नक्षत्र दिसेल. त्याच्या पूर्वेला जवळच सर्व ताऱ्यांत अत्यंत

तेजस्वी असा व्याधाचा तारा झळकत असतो. व्याधाचे ताऱ्यापासून दक्षिणेस एक रेषा ओढली असतां दक्षिण क्षितिजावर झळकत असलेला निळसर असा अगस्त्याचा तारा दृष्टीस पडेल. व्याधाचे पूर्वेला पुनर्वसूचा चकचकीत तारा दृष्टीस पडतो. पूर्वक्षितिजावर बरेंच वर आलेलें धराचे आकाराचें मघा नक्षत्रही दृष्टीस पडेल. एवढीं नक्षत्रें शिक्षकाला निश्चित कळलीं कीं दीक्षित यांच्या पुस्तकांत शेवटीं असलेल्या नकाशांचे साहाय्यानें त्याला बाकीचे तारे व नक्षत्रें सहज ओळखतां येतील

राशींपैकीं पुढील मुख्य राशी मुलींना ओळखतां याव्या.

| राशीचें नांव | दिसण्याची वेळ व इतर थोडी माहिती. |
|---|---|
| सप्तर्षि | फाल्गुन, चैत्र, वैशाख या महिन्यांत संध्याकाळीं व सकाळीं आकार. पतंगासारखा. |
| देवयानी | मार्गशीर्ष, पौष, व माघ या महिन्यांत संध्याकाळीं. आकार खुर्चीसारखा. |
| नरतुरंगम | वैशाख महिन्यांत ८।९ वाजतां दक्षिणेस. |
| स्वातिक | ” ” ” ” क्षितिजाचे थोडे वर. `*` `* *` `*` हा आकार. |

पुढील नक्षत्रें एकदां पाहिलीं कीं सहज लक्षांत राहतील.

| नक्षत्रांचें नांव | केव्हां पाहतां येईल. |
|---|---|
| कृतिका | सध्यां रोहिणीचे पश्चिमेस कृत्तिकेचा पुंज चांगला दिसतो. |
| मृग | मार्गशीर्ष ते चैत्र, ( संध्याकाळीं ) |
| पुनर्वसु | माघ ते वैशाख ( संध्याकाळीं ) एक चौकोन `* *` `* *` |
| पूर्वा भाद्रपदा व उत्तरा भाद्रपदा | मार्गशीर्ष व पौष संध्याकाळीं. मोठा चौकोन `* *` `*` |

# मुलींची व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षा.

( मराठी व उर्दू )

## मुंबई भाग.

तारीख १ आक्टोबर सन १९२५ चें मुंबई सरकारचें गॅझेट भाग १ ला पानें २५४४ ते २५४८ यांत प्रसिद्ध झालेली शाळाखात्याची सरकारी जाहिरात नंबर २६३६ तारीख १८ आगष्ट सन १९२५ ची बाहुकूम मुलींची व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षा मुंबई भागाच्या सर्व जिल्ह्यांत सोमवार तारीख २५ एप्रिल सन १९२७ रोजीं व पुढील दिवशीं खालीं दिलेल्या ठिकाणीं ( सेंटरला ) होईल.

| जिल्हा | सेंटरचें नांव |
|---|---|
| १ मुंबई शहर | १ गिरगांव ( मराठी ) |
| | २ टँक स्ट्रीट ( उर्दू ) |
| २ ठाणें जिल्हा | ठाणें |
| ३ कुलाबा जिल्हा | १ अलिबाग |
| ४ रत्नागिरी जिल्हा | १ रत्नागिरी |
| | २ मालवण |
| ५ नाशिक | १ नाशिक |
| | २ मालेगांव |

२ प्रत्येक सेंटरला परीक्षा स्थानिक परीक्षाकमिटीकडून घेतली जाईल आणि मुंबई येथील मराठी शाळांचे डेप्युटी ए. इनस्पेक्टर, मुंबई येथील उर्दू शाळांचे डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर, ठाणें, रत्नागिरी, व नाशिक येथील सरकारी हायस्कूलचे हेडमास्तर, कुलाब्याचे डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर आणि रत्नागिरी व नाशिक येथील सीनियर असिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर्स हे अनुक्रमें गिरगांव, टँकस्ट्रीट, ठाणें. रत्नागिरी, नाशिक, अलिबाग, मालवण व मालेगांव या ठिकाणीं स्थानिक परिक्षाकमिट्यांचे अध्यक्ष आहेत.

३ परीक्षेला परवानगी मिळण्याकरितां करावयाचे अर्ज ठराविक नमुन्यांत केले पाहिजेत. हे नमुने जिल्ह्याचे डे. ए. इन्स्पेक्टर्स अगर सीनियर असि. डे. ए. इन्स्पे-क्टर्स यांच्याकडे फुकट मिळतील.

या अर्जांत आपणास कोणत्या विशिष्ट सेंटरला बसावयाचें व कोणत्या मार्गातून परीक्षा द्यावयाची यांचा उल्लेख करावा व ते अर्ज तारीख १ मार्च सन १९२७ ला अगर त्या पूर्वी पोंहोंचतील अशा बेतानें त्या सेंटरला अध्यक्षाकडे पाठवावे.

४ परीक्षेकरितां फी घेतली जाणार नाही.

५ वयाची सूट नाही.

६ परीक्षेला लागणाऱ्या पुस्तकांची नांवें तारीख ८ माहे आक्टोबर सन १९२६ चे मुंबई सरकारचें गॅझेट भाग २ रा पान १८२० मध्यें प्रसिद्ध झाली आहेत

७ मुसलमान मुलांकरितां उर्दू व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षा ठाणें, कुलाबा, रत्नागिरी व नाशिक या जिल्ह्यांत वर सांगितलेल्या सेंटर्सना व मुंबईस टँक स्ट्रीट सेंटरला घेतली जाईल.

एज्युकेशनल इन्स्पेक्टर, मुंबई भाग यांचें ऑफिस.
ता. २० जानेवारी सन १९२७.

जे. एस. कादरी,
एज्युकेशन इन्स्पेक्टर मुंबई इलाखा.

---

# मुलींची व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षा

ता. १ आक्टोबर १९२५ चें मुंबई सरकारचें गॅझेट भाग १ ला पानें २५४४ ते २५४८ यांत प्रसिद्ध झालेली शाळा खात्याची सरकारी जाहिरात नं. २६३७ ता. १८ आगष्ट १९२५ बरहुकूम मुलींची व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षा मध्यभागांतील सर्व जिल्ह्यांत सोमवार ता. २५ एप्रील १९२७ रोजीं व पुढील दिवशीं होईल. या भागांत अहमदनगर, धुळें, जळगांव, पुणें, सातारा व सोलापूर हे परीक्षेचे सेंटर आहेत.

( २ ) प्रत्येक सेंटरला परीक्षा स्थानिकपरीक्षा कमिटीकडून घेतली जाईल. पुणें एथें प्रिन्सिपाल ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन व सातारा, सोलापूर, जळगांव व धुळें या ठिकाणच्या स्थानिक कमिट्यांचे हायस्कूलचे हेडमास्तर हे अध्यक्ष नेमले आहेत. अहमदनगर येथें अँग्लो व्हर्न्याक्युलर मुलींच्या मिडलस्कूलच्या हेडमिस्ट्रेस या स्थानिक कमिटीच्या अध्यक्ष आहेत.

( ३ ) उमेदवारांनीं या परीक्षेस बसण्यासंबंधीं अर्ज ठराविक छापील नमुन्यावर आपापल्या जिल्ह्याच्या स्थानिक कमिटीच्या अध्यक्षाकडे १ मार्च १९२७ रोजीं अगर त्यापूर्वीं पोहोंचतील अशा बेतानें पाठवावे. अर्जांचे नमुने त्या त्या जिल्हा कमिटीच्या अध्यक्षाकडे फुकट मिळतील.

( ४ ) परीक्षेस बसण्याबद्दल फी आकारली जाणार नाहीं.

( ५ ) परीक्षेंत लागणाऱ्या पुस्तकांची यादी १ आक्टोबर १९२६ रोजीं प्रसिद्ध झालेल्या मुंबई सरकारचे गॅझेट भाग २ रा पान १७९९ मध्यें दिलेली आहे.

( ६ ) मुसलमान मुलींची उर्दू व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षा वर दिलेल्या ठिकाणींच होईल.

के. जी. पुंडलिक.
ए. इ. मध्यभाग पुणें.

पुणें ता. १८ जानेवारी १९२७.

## सरकारी जाहिराती.

१

१९२६ सालीं झालेली व १९२७ मध्यें होणारी मुलींची देशभाषेंतील शेवटची परीक्षा यांच्यामध्यें फार थोडा अवधि असल्यामुळें सरकारची मान्यता गृहीत धरून इतिहास हाही एक ऐच्छिक विषय समजण्यांत यावा असें ठरविण्यांत आलें आहे; यास अनुसरून १९२७ च्या परीक्षेंत उमेदवारांनीं इतिहास, सृष्टिनिरीक्षण, चित्रकला व गायन यांतील कोणताही एक विषय ऐच्छिक म्हणून घेतला पाहिजे. पाहिजे तर त्यांस यांतील दोन विषयहि घेतां येतील.

पुणें ता. १०।२।२२. } वि. वि. साठये.
एज्यु. इन्स्पेक्टर मध्यभाग याकरितां.

संख्या, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, व भागाकार,
हा गणिताचा मुख्य अवघड व तात्त्विक भाग सोपे लहान व क्रमवार ४७ धडे पाडून ट्रेनिंग कॉलेजमध्यें मी शिकवितों तसा स्पष्ट करून समजावून देणारे.

किं. ०५ ] सुबोध अंकगणित [ तिकिटें
ट. ह. ०१ ] पाठवा

ट्रेनिंगसाठीं टेक्स्ट व शिक्षकांच्या लायब्ररीस मंजूर आहे. उदा० संग्रह जोडलेल्या प्रतीस ०१ अधिक २५ प्रतींस २५ % कमी.

ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणें. } रा. स. जोशी.
B. A. S. T. C. D

# मुंबई इलाख्यांतील मुलींच्या हस्तकौशल्याचे प्रदर्शनांत मिळालेलीं बक्षिसें व शिफारसपत्रें.

(हें प्रदर्शन ता. ८ ते १५ आक्टोबर सन १९२६ पावेतों एथील कौन्सिल हॉलमध्यें भरलें होतें. ह्याबद्दलची माहिती आणि चेअरमन व अध्यक्ष ह्यांचीं भाषणें गेल्या अंकांत दिलेलीं आहेत. प्रदर्शन कमेटीनें आपली बक्षिसांची व शिफारसपत्रांची यादी इंग्रजी भाषेंत प्रसिद्ध केलीच आहे. ती यादी प्राथमिक शाळेंतील स्त्रीशिक्षकांस पाहातां येणार नाहीं. त्यांनीं ह्या प्रदर्शनांत भाग घेतलेला असल्यामुळें बक्षिसांचा निकाल कोणत्या रीतीनें झाला, कोणत्या वस्तूंस बक्षिसें मिळालीं हें समजणें महत्त्वाचें आहे. ह्यासाठीं आम्हीं ती यादी मराठींत छापली आहे. तिचा योग्य तो उपयोग प्राथमिक शाळेंतील शिक्षक करून घेतील अशी आशा आहे.)

## शिवण

### बक्षिसें.

फ्रेडा आगांझा–पिशवी—कॉन्व्हेंट ऑफ जीझस आणि मेरी पुणें. हिराबाई पद्मजी बक्षीस रुपये ६

धनकुवर चिमणलाल–पिशवी—प्रॅक्टिसिंग स्कूल वनिता विश्राम ट्रेनिंग कॉलेज मुंबई. बक्षीस रुपये ५

आक्र कौलगुड–पिशवी—प्रॅक्टिसिंग स्कूल ट्रे. कॉ. फॉर वुइमेन पुणें. ,, रुपये ४

पिलूदी जव्हेरी–झबलें—एम्. एम्. शेट मुलींची शाळा मुंबई ,, रुपये ७

एडिथ उबाठे–झबलें—प्रॅक्टिसिंग स्कूल यू. एफ्. सी. मिशन पुणें. एस. एन्. जोशी बक्षीस रुपये ५

पिरोज एस् दारूवाला–जाकीट—वनिता विश्राम ट्रे. कॉलेज, मुंबई बक्षीस रुपये १०

सत्ताबाई गुळवाडी–जाकीट—सेवासदन पुणें के. एस्. परांजपे बक्षीस रुपये ५

मार्गारेट ओस–पिनॅफोर—सेंट जोसेफ कॉन्व्हेंट, वांद्रें बक्षीस रुपये ५

लिली वेअरकापट–पिनॅफोर—ए. आय. होम ॲन्ड टेलर हायस्कूल पुणें बक्षीस रुपये ४

जी ऑलीव्हीकरा–झगा—मौन्ट मेरी कॉन्व्हेंट, वांद्रें बक्षीस रुपये ८

फेनी कामा–झगा—सेन्ट हेलीना स्कूल, पुणें बक्षीस रुपये ७

जी. आल्व्होरेस–ट्यूनिक—सेन्ट टेरेसा हायस्कूल गिरगांव मुंबई बक्षीस रुपये ७

एल्. अलॉयसिस्–ट्यूनिक—क्लेअर रोड कॉन्व्हेंट हायस्कूल मुंबई एस्. एम्. सोनवणी बक्षीस रुपये ५

टेहीमिना उनवाला—वनिता विश्राम मुंबई एल्. आर. करळे बक्षीस रुपये ५

मनी मोतीभाई—महालक्ष्मी ट्रे. कॉलेज अहमदाबाद आर. ए. व्ही. पाटील बक्षीस रुपये ५

मेरी ब्राउन मेमेरियल ट्रे. कॉलेज बोरसद बक्षीस रुपये ७

जाला एस्. राजा—एम्. एम्. शेट मुलींची शाळा मुंबई जी. व्ही. मालाडकर बक्षीस रुपये ५

## उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या

एम्. एस्. बलसारा–रेशीम काम—ॲलेन एच्. मेहता ॲन्ड पिरोज जे बनाजी बी. एम्. डब्ल्यू व्ही.एल्. हायस्कूल भडोच

शिवणाची स्कीम–हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स् पुणें

" –ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें

हेझेल ॲमोर –ट्यूनिक—सेन्ट जोसेफ कान्व्हेंट मुंबई

सिसीलिया रीगो –पिनॅफोर—मौन्ट मेरी कान्व्हेंट वांद्रे

## शिफारसपत्र मिळालेल्या

जाकीट ( साधें ) ट्रेनिंग कॉलेज बोरसद

शोभिवंत गिरद्या–ॲलेन एच् मेहेता ॲन्ड पिरोज जे बनाजी बी. एम. डब्ल्यू. व्ही. एल्. हायस्कूल भडोच

## कशीदा

### बक्षिसें.

बच्यूबाई दलाल–चालीबाई म्युनिसिपल गुजराथी मुलींची शाळा मुंबई बक्षीस रुपये १०

पुट्टम्मा कट्टीवट्टी–कशीदा—मुलींची शाळा कित्तूर बाई भिकाजी पी. बोमनजी जि. बेळगांव बक्षीस रुपये २५

हिरेमठ – " —टेनिंग कॉलेज फॉर वुइमेन धारवाड एल्. आर. गोखले बक्षीस रुपये ५

हिराबाई भरूचा–रेशमी कशीदा—बी. वाच्छा ॲकेडेमी पार्शी जी. एस्. असोसिएशन हायस्कूल मुंबई बक्षीस रुपये १०

एम्. भरूचा–सोनेरी, रुपेरी व रेशमी कशीदा— जोतीप्रसाद दौलतराम
पार्शी जी. एस्. असोसिएशन हायस्कूल मुंबई बक्षीस रु. ११

दिनबाई कॉन्ट्रॅक्टर–सोनेरी, रुपेरी व रेशमी कशीदा–वनिता विश्राम आनंदीबाई गोडबोले
ट्रेनिंग कॉलेज मुंबई बक्षीस रुपये ५

ममताबाई–ड्रॉनथ्रेड वर्क—मुक्तीसदन केडगांव बाई सकिनाबाई एच्.
प्रेमजी बक्षीस रु. १५

सोनी वार्पो– ,, — ,, ,, रुपये ७

चंपावती त्रिभुवनदास–जाडा कशीदा—बाई वालीबाई म्युनिसि- व्ही. एल्. ठुबे
पल मुलींची शाळा मुंबई बक्षीस रुपये १०

आईमाई मिस्त्री–जाडा कशीदा—व्ही. एल. ट्यूटोरियल जी. जी. पाषाणकर
कॉलेज ग्रॅन्टरोट मुंबई बक्षीस रुपये ५

एम्. एल्. अझवेरो } बारीक कशीदा—मौंट मेरी कान्व्हेंट वांद्रें
व्ही. जी ॲलवेस– } स्पेशल बक्षीस रु. १०

एल् ॲग्वीअर–बारीक कशीदा—मौन्ट मेरी कॉन्व्हेंट वांद्रें एन्. वी. वाघ
बक्षीस रुपये १०

कंकु कारे–बारीक कशीदा—मुक्तीसदन केडगांव पी. सी. पाटील बक्षीस रुपये ५

एसूबाई सांब्री–कशीदा—म्युनिसिपल मुलींची शाळा बेळगांव सरदार मुजुमदार
बक्षीस रुपये १०

## उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या

चिनवा मयाकर–कशीदा—ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन धारवाड

कुसुम पाटील–सोनेरी कशीदा—लो. बो. स्कूल दुधगांव जि. सातारा

शांताबाई–कशीदा—मुलींची शाळा जमखिंडी

शंकराणा हुबेरेटी–कशीदा—मुलींची शाळा हुबळी

दौलतबाई मूळशंकर–सोनेरी कशीदा—मुलींची शाळा किकास्ट्रीट मुंबई

माईसी पेरीरा–बारीक रेशमी कशीदा—मौन्ट मेरी कॉन्व्हेंट वांद्रें

हिरा पाटील–बारीक रेशमी कशीदा—मुलींची शाळा पोयबावडी, मुंबई
कशीदा व पेंटिंग—मौन्ट मेरी कॉन्व्हेंट वांद्रें

शिरीन एंजिनियर–रेशमी कशीदा—यंग लेडीज हायस्कूल मुंबई

प्राणकुवर–सोनेरी व रेशमी कशीदा—ट्रेनिंग कॉलेज बडोदें
—काठियावाडी कशीदा— ,, ,,

—काठियावाडी कशीदा व पेटीकोट—मेरीब्राउन ट्रेनिंग कॉलेज बोरसद
—पांढरा कशीदा—झेड्. बी. एम्. मिशन मुलींची शाळा मनमाड
ताई वंजारी—कशीदा, चोळी— „ „ „
रूथ जोजफ— टी. कोझी—ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें
रहिमतबी—सोनेरी कशीदा—खांडिया स्ट्रीट म्युनिसिपल मुलींची शाळा मुंबई
एस्. एम्. इंजिनियर—सोनेरा कशीदा—यंग लेडीज हायस्कूल मुंबई
जेन सिंग—ड्रॉन थ्रेडवर्क (हातरुमाल)—मुक्तीसदन केडगांव
मालू — „ — „ „

## शिफारसपत्र मिळालेल्या

कमला गौरीशंकर—सोनेरी कशीदा—ट्रेनिंग कॉलेज बोरसद
दयाबाई अबदुल हुसेन—सोनेरी कशीदा—उर्दू स्कूल जेकब स्ट्रीट मुंबई
इंदू पाटील—सोनेरी व रेशमी कशीदा—पोयबावडी मुलींची शाळा मुंबई
—कशीदा—मुलींची शाळा किन्नूर जि. बेळगांव
— „ —मुलींची शाळा मुरगोड
शिव जिंगाना विरंबट—कशीदा—म्युनिसिपल मुलींची शाळा मालेगांव जि. नाशिक
धनसुख परेखी—सोनेरी कशीदा—मुलींची शाळा चिखली जि. सुरत
बाबलीबाई पितळे— „ —सेवासदन मुंबई
शांताबाई मिटकर—मोराची फ्रेम व रेशमी कशीदा— सेवासदन पुणें
खतीजा इब्राहिम हसन—कशीदा—खांडिया स्ट्रीट मुलींची शाळा मुंबई

## विणकाम ( सुईचें )

### बक्षिसें.

एम्. डीसिल्व्हा—वीणकाम—मौन्ट मेरी कॉन्व्हेंट वांद्रें — एल्. बी. कोकाटे बक्षीस रुपये १०
विनी. डी. कॉझ्रास—वीणकाम—क्रेअर रोड कॉन्व्हेंट मुंबई — बक्षीस रुपये ६
मोना. डी. कुन्हा— „ —सेन्ट थेरेसा स्कूल मुंबई — बक्षीस रुपये ६

## उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या

एलिजाबेध डेव्हिड—वीणकामाचा सेट—प्रॅक्टिसिंग स्कूल ट्रे. कॉलेज फॉर वुइमेन पुणें

## लेस करणें

### बक्षिसें

फ्रेनी कामा—लेस—सेन्ट हेलीना स्कूल पुणें — बाई सकीनाबाई एच्. प्रेमजी बक्षीस रु. १०

एम्. आलीव्हियर्स–लेस—मौन्ट मेरी कॉन्व्हेंट वांद्रें बक्षीस रुपये ७

कुवरजा ,, —मेरी ब्राउन—ट्रेनिंग कॉलेज बोरसद बक्षीस रुपये ७

### अति उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या

फुलमणी–क्रोशेट लेस—ट्रेनिंग कॉलेज बोरसद

### उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या

सुलोचना करदीकर–लेस—अमेरिकन मिशन मुलींची शाळा नगर

विद्यार्थिनी इयत्ता ४, ५ आणि ६–क्रोशेट स्क्वेअर—सेन्ट अँन्ड्रयू स्कूल नाशिक

### शिफारसपत्र मिळालेल्या

—एक सुईचें काम—भांगरवाडी मुलींची शाळा लोणावळें

ताराबाई पाथरे–क्रोशेट कव्हर—हेडमिस्ट्रेस मुलींची शाळा देवगड

## मण्याचें काम

### बक्षिसें.

गंगूबाई परदेशी—ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें बक्षीस रु. ७

यमुनाबाई पोतदार— ,, बक्षीस रु. ५

खोरशेद कपाडिया—पार्शी असोसिएशन मुलींची शाळा मुंबई बक्षीस रु. ३

### उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या

बबीबाई पिचर— ट्रेनिंग कॉलेज फॅार वुइमेन पुणें

न्यूनीशाहा इब्राहिम–खांडिया स्ट्रीट मुलींची शाळा मुंबई

दहींबेन टिकमभाई–तोरण—श्री. बी. व्ही. इंडियन मुलींची शाळा बोरसद

## मुलींचे हस्तव्यवसाय

### बक्षिसें.

संगवा कल्लूर–कागद काम—ट्रेनिंग कॉलेज फॅार वुइमेन धारवाड जी. एम्. काळभोर बक्षीस रुपये १०

कुसुम वाघचावरे–अंक शिकविणें—यू. एफ्. सी. मिशन टी. सी. डब्ल्यू. पुणें बक्षीस रुपये १०

आनंदी साळवे–भाषेचा तक्ता—यू. एफ्. सी. मिशन ट्रेनिंग कॉलेज पुणें बक्षीस रु. १०

मार्गारेट धुळा – ,, —ट्रेनिंग कॉलेज बोरसद. रमाबाई भिडे ,, रुपये ५

भागीरथीबाई तेरदळ– ,, —ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन धारवाड बक्षीस रु. ७

**अति उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या**

वाचनाची पद्धत—ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें

**उत्तम शिफारस मिळालेल्या**

कार्डबोर्डाचें काम—सेन्ट मेरी टेनिंग कॉलेज पुणें

प्लॅस्टिक मटीरियल—यू. एफ्. सी. मिशन ट्रेनिंग कॉलेज पुणें

वर्ष २ रें—मातीकाम—ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन बोरसद

आनंदी लक्ष्मण—अंक शिकविणें— ,, ,, ,,

मालन सूर्यवंशी— ,, —यू. एफ्. सी. मिशन ट्रेनिंग कॉलेज पुणें

भाषेचा तक्ता—,, ,, ,,

,, —ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन धारवाड

—हिंदुस्तानांतील पिकांचा नकाशा— ,,

—अंकांचा सेट—सेन्ट मेरी ट्रेनिंग कॉलेज पुणें

—भूगोलविषयक चित्रें—यू. एफ्. सी. मिशन ट्रेनिंग कॉलेज पुणें

कागदकामाची योजना—सेन्ट मोनिका ट्रेनिंग कॉलेज अहमदनगर

**टोपल्या करणें**

राधा अभिमन्यु, झुमरी गंगाराम } वेताची पेटी—इंडस्ट्रियल स्कूल सोलापूर बक्षीस रु. १५

पद्दम्मा नायडू—वेताची पिशवी आणि टोपली—सेवासदन पुणें बक्षीस रु. ५

पार्वती यानकांची—गवताची टोपली—ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन धारवाड ,, ७

विराबा दोडामणी— ,, — ,, ,, ,, ५

यमुनाबाई पोतदार—गवताची टोपली—ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें ,, ५

यशोदाबाई चांदोरकर—पिशवी— ,, ,, ,, ,, ७

क्लॅरिस सेल्कर्क— ,, —कॅथेड्रल मुलींचें हायस्कूल मुंबई ,, ५

**अति उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या**

कोंडू ढोकरे—वेतकाम—प्रॅक्टिसिंग स्कूल ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें

केळीच्या सोपटाचें काम—आंधळ्यांची शाळा मुक्ती मिशन केडगांव

दौलत मूळशंकर—वेताचें सामान—म्युनिसिपल मुलींची शाळा किकास्ट्रीट मुंबई

**उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या**

वेणू गुप्ते, वेणू आपटे } —सूटकेस—एस्. एन्. डी. टी. कन्याशाळा पुणें

गवतकाम ( तीन भांडीं )—पार्शी गर्ल्स स्कूल असोसिएशन मुंबई

## शिफारसपत्र मिळालेल्या

वेतकाम—-होम एज्युकेशन क्लासेस सेवासदन मुंबई

# खेळणीं

## बक्षिसें.

लीला जयकर—गवताची झोपडी—लॅमिंग्टन रोड स्कूल मुंबई सरदार बिवलकर बक्षीस रु. ८

हिराबाई भगवंतराव—आगपेट्यांचें बनविलेलें स्टेशन—लॉर्ड हारिस स्कूल मुंबई ब. रु.७

विविएनी पॅटर्सन—कापडी बाहुली—रेल्वेस्कूल कल्याण एन्. सी.केळकर बक्षीस रु. ५

विरावा ब्यालाल—ज्वारीच्या भेंडाचा रथ—ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन धारवाड सरदार बिवलकर बक्षीस रुपये १०

कुनी बाळू—बाहुली—इंडस्ट्रियल स्कूल सोलापूर तात्याबा एन्. शिंदे बक्षीस रुपये ५

गोदूबाई ओ ले—विजेची ट्रॅमगाडी—म्युनिसिपल मुलींची शाळा नवीवाडी मुंबई सरदार देशपांडे बक्षीस रुपये ५

## अति उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या

गोठ्यांतील देखावा—(कार्डबोर्डचें काम)—सेंट इसाबेल स्कूल मजगाव मुंबई

—घर—इंडस्ट्रियल सेटलमेंट स्कूल विजापूर

—पीटर पॅनची बाग—क्याथेड्रल स्कूल मुंबई

ज्वारीचा भेंडा व कार्डबोर्ड यांनीं बनविलेली शाळा—प्रॅक्टिसिंग स्कूल ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें

पार्वतीबाई—मेणाचे किडे—मु ींची शाळा जमखिंडी

सी. भरुचा—वेताचें सामान—म्युनिसिपल स्कूल बंगाली मुंबई

## उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या

ॲलन मुकादम—गवताची झोपडी—ट्यूटोरियल स्कूल मुंबई.

—सिगारेटच्या पेटींचें केलेलें सामान—सेंट इसाबेल स्कूल मुंबई.

प्राण्यांचे कापडी नमुने—ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन धारवाड.

आगपेट्यांचें खेळणें—सेन्ट अॅन्ड्रूज ए. व्ही. स्कूल पुणें

कागदी फुलें—कान्व्हेन्ट ऑफ जीझस अॅन्ड मेरी पुणें

झोपडी—नवी वाडी म्युनिसिपल मुलींची शाळा मुंबई

कार्डबोर्डचें घर—म्युनिसिपल स्कूल नंबर ९ पुणें

शाळेचा नमुना—उर्दू मुलींची शाळा याकूब स्ट्रीट मुंबई

कापसाचा कसा—जी. आय. पी. रेल्वेस्कूल कल्याण

कापडी हत्ती—प्रॅक्टिसिंग स्कूल यू. एफ. सी. मिशन पुणें

चिकण मातीचें घर—सेन्ट जॉन स्कूल पुणें

कार्डबोर्डचीं लोकरीचीं, व गवताचीं खेळणीं—ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन धारवाड

बाहुलीची टी पार्टी—( कार्डबोर्ड व चिकणमातींनीं बनविलेली. ) प्रॅक्टिसिंगस्कूल. यू. एफ. सी. मिशन पुणें

सुशोभितकाम—दस्तूर हायस्कूल पुणें

कार्डबोर्डचा मे पोल—टेलर हायस्कूल पूणें

आजाऱ्यांची खोली—कॉन्व्हेन्ट ऑफ जीझस ॲन्ड मेरी पुणें

गुणाबाई वाघमारे—जोडे—सेवासदन पुणें

खेळणीं—सर कावसजी जहांगीर रेडेमनी स्कूल मुंबई

ज्वारीच्या भेंडाचा केलेला पंखा—ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन धारवाड

इयत्ता ४ थी—हाताची खुर्ची—सेन्ट अँड्र्यूज स्कूल नाशिक

शिशुवर्गातील मुलांचें वीणकाम— ,, ,, ,,

ऑइलक्लॉथची पिशवी—सर. जे. जे. प्रायमरी स्कूल परेळ

अंक शिकविण्याचें साहित्य— ,, ,, ,,

खेळण्याचा सेट—गोकुळदास तेजपाळ हायस्कूल हार्नबी रोड मुंबई

महरबाई इराणी—ताजमहाल—मेरवानजीशेट स्कूल मुंबई

कॅलेंडर आणि घड्याळ—पेरिन इराणी प्रायमरी स्कूल मुंबई

लिली डीसोझा—मॉडेल—सेन्ट थेरेसा स्कूल वांद्रें

**शिफारसपत्र मिळालेल्या**

फातमाबी हबीबुल्लाखान—कार्डबोर्डचें घड्याळ—उर्दू मुलींची शाळा खांडियास्ट्रीट मुंबइ

कृत्रिम फुलें—पार्शी गर्ल्स स्कूल असोसिएशन मुंबई

चिकणमाती आणि कार्डबोर्डची झोपडी—म्युनिसिपल मुलींची शाळा लॅमिंग्टन रोड मुंबई

श्रीशिवालय (कार्डबोर्डचा नमुना)—चंदारामजी हायस्कूल मुंबई

## प्लॅस्टिक मटीरियल

### बक्षिसें

इंदिरा पोंक्षे—चिकण मातीची पानसुपारी वगैरे—लो. बो. मुलींची शाळा भुसावळ बक्षीस रु. १०

छबीबाई जैन—कागदाच्या लगद्याचीं भांडीं—लो. बो. मुलींची शाळा ,, रु. ८
धरणगांव जि. पूर्वखानदेश

डॉन थॉमसन—फळांचें दुकान—क्याथेड्रल गर्ल्स हायस्कूल मुंबई ,, रु. ५

( बारा वर्षांहून लहान )

**अति उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या**

लीला चव्हाण—कागदाच्या लगद्याचें भांडें—ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें

मातीचे नमुने—प्रॅक्टिसिंग स्कूल यु. एफ्. सी. मिशन पुणें

**उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या**

वर्ष १ लें—चिकण मातीचें काम—ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें

सखू पोवार—मातीचा आंबा—म्युनिसिपल स्कूल नंबर ९ पुणें

## भूगोल

### बक्षिसें.

जी. अंबूटा—नकाशे—सेन्ट इसाबेल स्कूल मौन्टरोड मुंबई बक्षीस रु. १०

परव्हीज इंजिनियर—नकाशे—सेन्ट थेरेसा हायस्कूल गिरगांव मुंबई बक्षीस रु. ८

आर काझी—नकाशे—सेन्ट इसाबेल स्कूल मौन्ट रोड मुंबई. बक्षीस रु. ६

गुलशर संजाना—उठावाचा नकाशा—क्याथेड्रल हायस्कूल मुंबई. बक्षीस रु. ६

कृष्णाबाई मोहरीर— ,, —लो. बो. मुलीची शाळा भडगांव
जि. पूर्वखानदेश बक्षीस रु. ६

पनामा कालव्याचा नकाशा—कॉन्व्हेंट आफ जीझस ॲन्ड मेरी क्रेअररोड मुंबई. स्टाकब्रिज मेडल

हिंदुस्तानचे नकाशे—हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स पुणें. रावबहादूर खरे मेडल

**अति उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या**

मुंबईचा नमुना—सेंट कोलंबा प्रायमरी स्कूल मुंबई.

**उत्तम शिफारस पत्र मिळालेल्या**

नकाशाचा सेंट—सेटलमेंट स्कूल विजापूर

उठावाचे नकाशे—क्याथेड्रल हायस्कूल मुंबई

,, —प्रॅक्टिसिंग स्कूल ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें.

,, —क्याथेड्रल मुलींचें हायस्कूल मुंबई

संगम (देखावा)—ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें.

नकाशे —महालक्ष्मी ट्रेनिंग कॉलेज अहमदाबाद

,, —ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन धारवाड

,, —वनिता विश्राम ट्रेनिंग कॉलेज मुंबई

तहरू रोमर—नकाशाचें पुस्तक—कान्व्हेंट ऑफ जीझर अँड मेरी पुणें.

नकाशे —कॉन्व्हेंट हायस्कूल क्रेअर रोड मुंबई.

सिरिल डीन }
लेस्ली डीन } मॉडिल—कान्व्हेंट गर्ल्स स्कूल लोअर माहीम दादर

### शिफारसपत्र मिळालेल्या

कोभामच्या आस्ट्रेलियाला जाण्याच्या रस्त्याचा नकाशा. कॉन्व्हेन्ट ऑफ जीझस ॲन्ड मेरी परेळ मुंबई.

## इतिहास

### बक्षिसें

ॲडिलेड डॅनिएल—इतिहास विषयक नकाशांचा सेट—कॉन्व्हेंट ऑफ जीझस ॲन्ड मेरी मुंबई. बक्षीस रु. १०

ग्रेस कांबळे— ,, —सेंट अँड्र्यूज स्कूल पुणें. बक्षीस रु. ८

पिरोज सकारवर—,, —ए. व्ही. स्कूल धारवाड ,, ७

लीना पेरीरा— ,, —सेंट थेरेसा कॉन्व्हेंट स्कूल सांताक्रूज ,, ७

उमाबाई वोटणकर—इतिहासविषयक नमुने—म्युनिसिपल स्कूल नंबर १ पुणें. ,, ८

कमला मुळे— ,, —हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स पुणें. ,, ८

### उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या

तक्ते—महाराणी हायस्कूल बडोदें

पोर्ट फोलिओ—कॉन्व्हेंट ऑफ् जीझस ॲन्ड मेरी पुणें.

विद्यार्थिनींचें सामुदायिक काम—वनिता विश्राम ट्रेनिंग कॉलेज मुंबई.

वर्ग ३ रें—इतिहासविषयक तक्ते—ए. एफ्. सी. एम. टी. सी. डब्ल्यू. पुणें.

—रामायणांतील देखावा—प्रॅक्टिसिंग स्कूल ट्रे. कॉ. फॉर वुइमेन पुणें.

इयत्ता ७ व ८—युरोपचे नकाशे—कॉन्व्हेंट ऑफ् जीझस ॲन्ड मेरी पुणें.

## सृष्टिनिरीक्षण

### बक्षिसें

फिलामिनी फरनँडिज—लहान मुलींचें काम—सेन्ट थेरेसा कान्व्हेंट स्कूल, सांताक्रूज. बक्षीस रु. १०

ब्लँचे डी मेनेसे—रेल्वे स्कूल हुबळी ,, ,, ८

शरणाबाई झंपले—पक्षी आणि झाडें यांच्या जीवनक्रमाचें पुस्तक, टेनिंग फॉर वुइमेन पुणें — सेट भिकमजी बचेराज बक्षीस रु. १०

खारुन्निसा अमिनशा—झाडांचे दाबून तयार केलेले नमुने—ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन अहमदाबाद — बक्षीस रु. ५

कुसूम वाघचावरे—पक्ष्यांचा जीवनक्रम—यू. एफ. सी. मिशन टी. सी. डब्ल्यू, पुणें — बक्षीस रु. ८

कृष्णाबाई एकमकर— ,, —ट्रेनिंग कॉ. फॉर वुइमेन पुणें — बक्षीस रु. ६

आनंदी लक्ष्मण—नेचर स्टडी नोटबुक—मेरी ब्राऊन ट्रे का. बोरसद — बक्षीस रु. ६

चिन्नवा मयाकर— ,, —ट्रेनिंग कॉलेज धारवाड — बक्षीस रु. ६

हेपसी जेकब—तक्त्यांचा सेट—ट्रे. कॉलेज फॉर वुइमेन अहमदाबाद — बक्षीस रु ८

रूथबाई जोसेफ— ,, — ,, — पुणें — बक्षीस रु. ५

## अति उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या

मोड मूळ वगैरे दाखविणारे तक्ते—मौन्ट कार्मेल इ. टी. स्कूल अहमदाबाद

इयत्ता ६ वी—तक्ते—कान्व्हेंट ऑफ जीझस ॲन्ड मेरी, परेळ, पुणें

निरीक्षणाच्या चित्रांचा सेट—सेंट मेरी ट्रे. कॉलेज पुणें.

## उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या

निरीक्षणावरील धड्यांची स्कीम व चित्रें-हेडमिस्ट्रेस नवीवाडी म्युनिसिपलस्कूल नं. २ मुंबई

यमू चौधरी—चंद्राच्या कलांचा तक्ता—सेन्ट कोलंबा हायस्कुल मुंबई

एस्तर किहीमकर—कापसाच्या झाडाचा तक्ता—महाराणी हायस्कूल बडोदें

लीझी अन्नूभाई—प्रॅक्टिसिंग स्कूल टी. सी. डब्ल्यू बोरसद

एडना मेरज—निरीक्षणाची वही—कान्व्हेंट आफ जीझस ॲन्ड मेरी पुणें

कृष्णाबाई पूर्णपात्रे—बागेची वही—ट्रे. कॉलेज फॉर वुइमेन पुणें

शरणाबाई झंपले ,, ,,

शांता मुनशी—पक्षी—यू. एफ्. सी. मिशन टी. सी. डब्ल्यू. पुणें

शांताबाई मलुष्टे—पक्षी—ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें

इयत्ता ३—माशीचा तक्ता—क्याथेड्रल गर्ल स्कूल मुंबई

नेचर स्टडी सिनेमा—यू. एफ्. सी. मिशन टी. सी. डब्ल्यू पुणें.

बीज, मोड वगैरेचा तक्ता—सेवासदन मुंबई,

बेडकाची अवस्था दाखविणारा तक्ता—प्रॅक्टिसिंगस्कूल ट्रे. कॉ. फॅार वुइमेन पुणें

वर्ष १ लें—हवेचा तक्ता—ट्रे. कॉलेज फॅार वुइमेन पुणें

ठकी राजाराम—पारसांचा तक्ता—झेड बी. एम्. मिशन गर्ल्स स्कूल मनमाड
निरनिराळ्या वनस्पतींचीं फळें व फुलें दाखविणारा तक्ता—प्रॅक्टिसिंग स्कूल ट्रे. कॉ. फॉ. वुइमेन पुणें

पेन्सिलीचे व रंगाचे तक्ते—बार्नेस हायस्कूल देवळाली

इयत्ता ५ वी— ,, —कॉन्व्हेंट ऑफ् जीझस ॲन्ड मेरी पुणें
झाडांचा जीवनक्रम—सेंट हिल्डा स्कूल पंचहौद पुणें
निरीक्षणाचीं चित्रें—सेंट मेरी स्कूल पुणें
बीज प्रसाराचा तक्ता—महालक्ष्मी ट्रे. कॉलेज अहमदाबाद
,, —ट्रे. कॉलेज फॉर वुइमेन पुणें
चार्लोटी स्मिथ— —कान्व्हेंट ऑफ् जीझस ॲन्ड मेरी पुणें

## शिफारसपत्र मिळालेल्या

सुंदरा नाडकर्णी—रोजच्या निरीक्षणाची वही—प्रॅक्टिसिंगस्कूल ट्रे. कॉ. फॉ. वु. पुणें
निरीक्षणाचा तक्ता—सेंट मेरी स्कूल पुणें
निरीक्षणाचीं पांच पुस्तकें—मौंट मेरी कान्व्हेंट वांद्रें
उष्णतेचा तक्ता—मौंट कार्मेल अहमदाबाद
इयत्ता १ ली—हवेचा तक्ता—कॉन्व्हेंट ऑफ जीझस ॲंड मेरी पुणें
,, —झाडांच्या जीवनक्रमाचीं पुस्तकें—यू. एफ्. सी. प्रायमरी स्कूल, स्टेव्हली रोड, पुणें

## आरोग्यमार्ग

### बक्षिसें.

मालती रामटेक— अमेरिकन मिशन मुलींचें हायस्कूल अहमदनगर. बक्षीस रुपये ६

मनूबाई बरगे—तक्ता— ट्रे. कॉलेज फॉर वुइमेन, पुणें. बक्षीस रु. ६

## शिफारसपत्र मिळालेल्या

रूथबाई जोसेफ—तक्ते—ट्रे. कॉ. फॉर वुइमेन, पुणें
,, —हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स, पुणें
,, —महाराणी हायस्कूल, बडोदें.
बँडेज करण्याचा कोर्स—ट्रे. कॉ. फॉर वुइमेन, धारवाड.

## हस्ताक्षर

### बक्षिसें.

एडा आलब्लेस—इंग्लिश अक्षर—सेंट हेलेना स्कूल, पुणें ,, रु. ५
फिलिस कॅकेट— ,, —ब्रार्नेस स्कूल, देवळाली. ,, ४
एलसी निसेन— ,, — ,, ,, ,, ,, ३
एम् रेमिडिओ— ,, —सेन्ट इसाबेल स्कूल, माउन्ट रोड मुंबई. ,, रु. ३
मार्गरेट ओस— ,, —सेन्ट जोसेफ कॉन्व्हेंट, वांद्रें ,, ५
दुर्गा कुकडे—बाळबोध अक्षर—एस. एन. डी. टी. कन्याशाळा पुणें सौ. सरस्वतीबाई खरे मेडल
इंदिराबाई चव्हाण—हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स पुणें. बी. बी. वाळवेकर. बक्षीस रु. ५
सुमती म्हात्रे— ,, —सेंट कोलंबा गर्ल्स स्कूल मुंबई बक्षीस रु. ४
ल्युसी बार्से— ,, —मिशन स्कूल मनमाड ,, ,, ३,
कृष्णा कोमचट्टी—मोडी अक्षर—प्रॅक्टिसिंग स्कूल, ट्रे. कॉ. फॉर, वुइमेन, पुणें. पी. बी.तडसरे, बक्षीस रु. ५
तारा पंधे—मोडी अक्षर—प्रॅक्टिसिंग स्कूल. ट्रे कॉ. फॉर वुइमेन पुणें डी. एन्. धमाल बक्षीस रुपये ४
सरस्वतीबाई जाधव ,, —हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स पुणें ,, ,, ३
इंदिरा पी. दवावाला—गुजराथी अक्षर—चंदारामजी हायस्कूल, मुंबई. ए. सी. पटेल बक्षीस रु. १०
गडजेवा हिरीमारगोडावा—कानडी अक्षर—प्रॅक्टिसिंग स्कूल ट्रे. कॉ. फॉर वुइमेन धारवाड ,, ५
रंगवा तेलगार— ,, ,, ,, ,, ,, ,, ४
०लीला यादगिरी— ,, प्रायमरी स्कूल धारवाड ,, ,, ३

### उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या

एमि. पटेल—कानडी अक्षर—ए. व्ही गर्ल्स स्कूल. धारवाड.

## ड्राइंग

### बक्षिसें

लक्ष्मीबाई पारकर—डिझाइन ( वय १६ चे वर ) शाळा हिंगणे. बक्षीस रु. १०
बेरील कोडी— ,, कॉन्व्हेंट स्कूल, पांचगणी. बक्षीस रु. ५

| | | | |
|---|---|---|---|
| जार्टी परेरा— | ,, | ( वय १५ चे वर ) सेंट जोसेफ कान्व्हेंट, पांचगणी | बक्षीस रु. १० |
| एम. डीसिल्व्हा— | ,, | ( वय १३ हून कमी ) माउंट रोड, मुंबई | बक्षीस रु. ५ |
| फ्लॉरेन्स डंकन— | ,, | ,, सेंट पीटर्स स्कूल, खंडाळा | ,, ,, ३ |
| एफी ब्रॅगन्झा— | ,, | ( वय १२ हून कमी ) कान्व्हेंट स्कूल दादर, मुंबई, | ,, ,, ५ |
| मेहरा इराणी— | ,, | ( वय १० हून कमी ) मेरवानजी शेट स्कूल मुंबई | ,, ,, ३ |
| नोरा पेरेरा— | ,, | ,, भुलेश्वर कॉन्व्हेंट, मुंबई | ,, ,, ३ |
| मलावा बार्गिऑड—आब्जेक्ट | | ( वय १६ चे वर )ट्रे. कॉ. फॉर वुइमेन धारवाड | ,, ,, ६ |
| शेरा बापुजी— | ,, | ,, दस्तूर हायस्कूल, पुणें | ,, ,, ५ |
| मीटा ग्लॅसी— | | —सेंट मेरीस्कूल, पुणें | ,, ,, १० |
| एमी लॅझार— | ,, | —टेलर हायस्कूल, पुणें | ,, ,, ५ |
| लिली डिसोझा—आब्जेक्ट | | ( वय १५ हून कमी ) सेन्ट टेरेसा स्कूल मुंबई | ,, रु. ६ |
| धनबाई वेसुना— | ,, | ,, पार्शी गर्ल्स स्कूल असोसिएशन, मुंबई | ,, रु. ५ |
| शांता सोंडें— | ,, | ( वय १३ हून कमी ) हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स पुणें | ,, रु. ५ |
| पुंडलीक— | ,, | ,, ए. व्ही. गर्ल्स स्कूल धारवाड | ,, रु. ४ |
| मेरी फारेस्ट— | ,, | ( ,, १२ ,, ) सेंट जोसेफ कान्व्हेंट वांद्रें | ,, रु. ५ |
| एमी— ,, — | | ,, ए. व्ही, स्कूल धारवाड | ,, रु. ३ |
| अडा हॉर्न | —नेचर— | ( वय १६ चे वर ) सेंट पीटर्स गर्ल्स स्कूल खंडाळा | ,, रु. ७ |
| हिराबाई नामनाईक— | ,, | ,, ट्रे. कॉ. फॉर वुइमेन,पुणें | ,, रु. ६ |
| मीटा ग्लकी— | ,, | ,, सेंट मेरी स्कूल, पुणें | ,, रु. ५ |
| तिरावा बेड्डिगट्टी | ,, | ,, ट्रे. कॉ. फॉर वुइमेन धारवाड | रु. ४ |
| बारोंरा स्मिथ | | ( वय १५ हून कमी ) टेलर हायस्कूल पुणें | रु. ६ |
| लीना पिंटो | ,, | ,, मौन्ट मेरी कान्व्हेंट वांद्रें. बी. बी. तुवेंकर | बक्षीस रु. ५ |

| | | | |
|---|---|---|---|
| जेसी. सालढाणा | ,, ( वय १३ हून कमी ) | ,, | बक्षीस रु. ५ |
| शिला लारेन्स– ' | ,, ( वय १२ हून कमी ) सेंट टेरेसा स्कूल सांताक्रूज | ,, | रु. ५ |
| बेट्टी मनॅरो– | ,,– ( ,, ) सेंट मेरी स्कूल पुणें | ,, | रु. ४ |
| लीलावतीबाई पटेल– | ,,– ( ,, ) सेन्ट टेरेसा कान्व्हेंट स्कूल सांताक्रूज | ,, | रु. ४ |

## उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या

चिन्नवा सालेमस–आब्जेक्ट– ए. व्ही. स्कूल धारवाड
बी. रेझारिओ– ,,–सेंट इसाबेलास्कूल मौंट रोड मुंबई
रूथबाइ जोजेफ–नेचर–ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें
ग्रेसी मिचेल–,,–सेन्ट जोसेफ कान्व्हेंट वांद्रें
सावित्री नाडगीर–,,–ट्रे. कॉ. फॉर वुइमेन धारवाड
रोज पिंटो–डिझाइन–क्रेअर रोड कॉन्व्हेंट स्कूल मुंबई
ॲग्नेस रॉड्रिग्ज–नेचर–मौंट मेरी कॉन्व्हेंटस्कूल वांद्रें
सुशीला तालीम–ऑब्जेक्ट—सेंट कोलंबा स्कूल मुंबई
जे. कॉकमन–पीस—बार्नेस हायस्कूल देवळाली
सिरीन खोदादाद इराणी–नेचर—सर जे. जे. पी. बी. प्रायमरी स्कूल धोबीतलाव मुंबई
मिलीसेंट बी–आब्जेक्ट—जीझस ॲंड मेरी कॉन्व्हेंट पुणें
जेसिका निर्मळ–नेचर—यू. एफ. सी. मिशन टी. सी. डब्ल्यू. पुणें
लीली पाल–नेचर—सेंट हिल्डा स्कूल पंचहौद मिशन पुणें
इरीस फ्रास्ट–ऑब्जेक्ट—टेलर हायस्कूल पुणें
होमी श्रॉफ–रंगवलेली साडी—यंग लेडीज ट्रेनिंग कॉलेज मुंबई
शांता धुमाळ–पेंटिंग—पोयबावडी गर्ल्स हायस्कूल मुंबई
जे. डी. लिमा–ऑब्जेक्ट—कॉन्व्हेंट ऑफ जीझस ॲन्ड मेरी पुणें
एच्. आसबोर्न–पीस—क्याथेड्रल हायस्कूल मुंबई

## शिफारसपत्र मिळालेल्या

एच्. आसबोर्न–डिझाइन—क्याथेड्रल हायस्कूल मुंबई
कमला धोंगडा– ,, —ए. व्ही. गर्ल्स स्कूल अहमदनगर
मेरी मॅकडोन–नेचर—सेंट जोसेफ कॉन्व्हेंट हायस्कूल पांचगणी
एफी ॲगान्झा–आब्जेक्ट—कॉन्व्हेंट स्कूल दादर मुंबई

मोया साउथोर्पे—नेचर—सेंट जासेफ कॉन्व्हेंट हायस्कूल पांचगणी
गुलन टाटा—वाटर कलर स्केच—महालक्ष्मी ट्रे. कॉलेज अहमदाबाद
पी. सीक्वेरिया—ऑब्जेक्ट—कॉन्व्हेंट ऑफ जीझस अँन्ड मेरी पुणें
आयूव्ही. इरविन—नेचर— ,, ,, ,,
एम्. कॉलवॅन—नेचर— ,, ,, ,,
मालती रामटेके—डिझाइन—अमेरिकन मिशन गर्ल्स हायस्कूल अहमदनगर
बारबरा स्मिथ—ऑब्जेक्ट—टेलर हायस्कूल पुणें
माणक कोचरेकर—नेचर—प्रॅक्टिसिंग स्कूल ट्रे. कॉलेज फॉर वुइमेन पुणें

## औद्योगिक विभाग

**बक्षिसें.**

| | | | |
|---|---|---|---|
| मालन साळवे—विणकाम—साडी—सेंट मोनिका इंडस्ट्रियल स्कूल नगर | | | बी. जी. भगत बक्षीस रु. १५ |
| सरस्वतीबाई घोडके—विणकाम—साडी—सेवासदन पुणें. | | | बक्षीस रु. १० |
| शांताबाई शिंदे<br>शांताबाई जाधव | शर्टिंग | ,, | ,, रु. १५ |
| गीताबाई शेंडगे<br>शांताबाई जाधव | खादी | ,, | ,, रु. १५ |
| कमला नाडकर्णी—नवार पुजी— | | ,, | ,, रु. १५ |

**अति उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या**

लक्ष्मी—मराठा पहारेकरी— होम क्लास जमखिंडी
चंद्रिकाबाई आल्हाट— सेंट मोनिका स्कूल अहमदनगर
पी. आपोलोनिया आणि क्रॅरिसा— मौंट मेरी कॉन्व्हेंट वांद्रें

**उत्तम शिफारसपत्र मिळालेल्या**

दोराचें काम— आंधळ्याची शाळा—मुक्ती मिशन केडगांव.
माधुरी भगवानदासन— लोकरीची चटई—चंदारामजी हायस्कूल मुंबई.
बुकबाइंडिंग— महाराणी हायस्कुल बडोदें
ॲलिअन आर मुकादम— वारप्लेट—मास्टर ट्युटोरियल हायस्कूल मुंबई.
मनोरमा एम् मकासरे—कागदाच्या रांध्याचें काम—सेंट मोनिका ट्रेनिंग स्कूल अहमदनगर

अंकगणितावरील पुस्तकांमध्यें

# विलक्षण क्रान्ति

म्हणजेच

रा० म. का. कारखानीस, शिक्षक, फीमेल ट्रेनिंग कॉलेज. —— रा० य. ग. फफे, शिक्षक, मेल ट्रेनिंग कॉलेज.

आणि

रा० व्यं. त्रिं. चांफेकर,

गणित विषयाचे अनुभवी अध्यापक, व

व्हा. प्रिन्सिपॉल, ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणें.

या गणितज्ञांच्या खास देखरेखीखालीं

आरोग्यशास्त्रकर्ते रा० ग. मा. देशमुख

यांनीं तयार केलेलें

( शालोपयोगी )

पृष्ठें ११२. ) **सोपें अंकगणित** ( किंमत २॥ आणे.

(उदाहरणें ५८८. पैकीं, सोडविलेलीं ४२, तोंडीं १५२ व लेखी ३९४)

भाग पहिला.

( मराठी इयत्ता २ री करिता )

हें अभूतपूर्व पुस्तक होय!

## यांतील विशेष.

१. लहान मुलांकरितां लिहिलेलीं पुस्तकें **मोठ्या टाईपांत** असावीं, या नियमाप्रमाणें सदर पुस्तकांत **मोठा टाईप** व **ठळक आंकडे** वापरले आहेत.

२. सदरहू पुस्तकांत उपपत्तीचा भाग स्वतंत्र असा बिलकुल दिलेला नाहीं. तथापि प्रत्येक रीतीची स्पष्ट समजूत होईल अशी मांडणी केली आहे.

३. सुरवातीला नमुना म्हणून बरींच उदाहरणें सोडवून दाखविलीं आहेत. नंतर त्याच प्रकारचीं प्रथम बरीचशीं **तोंडीं** व नंतर **लेखी** उदाहरणें खालीं दिलीं आहेत.

४ सर्व उदाहरणें **व्यवहाराला धरूनच** रचलेलीं आहेत. अशक्य कोटीं-

नवीन किताबखाना, पुणें सिटी.

तर्ली उदाहरणें घेतर्ली नाहींत. अगोदर सोपीं उदाहरणें घेऊन मग हळूहळू कठीण उदाहरणें दिलीं आहेत.

५. उदाहरणांची **भाषा** लहान मुलांना कळेल अशी अगदीं **साधी** व **सोपी** आहे. त्यांना कळणार नाहीं असा एकही शब्द वापरला नाहीं.

६. हा विषय खेडेगांवांतील तसेंच शहरांतील मुलांना शिकावयाचा असतो. म्हणून दोघांच्या पाहाण्यांतले किंवा ऐकण्यांतले जेवढे व्यवहार असतील तेवढेच घेतलेले आहेत.

७. उदाहरणांमध्यें **विविधता** असल्यामुळें तीं मुलांना कंटाळवाणीं वाटणार नाहींत.

## निवडक असे दोनच अभिप्राय पहा !

**१ मराठी शिक्षक** ( अंक आक्टोबर-नोव्हेंबर १९२६ ).

"......प्रस्तुत पुस्तक हें खरोखरच सार्थनाम असून तें लहान मुलांकरितां
"लिहिलेलें आहे, ही गोष्ट त्यांतील विषयाची मांडणी, उदाहरणें व छपाई
"ही पाहिल्याबरोबर **चटकन** पटते......

**२ रा. रा. एस्. आर्. तावडे, एम्., ए. टी. ईडी.**

ॲड्० ऑफिसर, स्कूल बोर्ड, डि. लो. बोर्ड, सातारा, हे लिहितात:—

'......तुमचें पुस्तक काळजीपूर्वक वाचून पाहिलें. तें अत्यंत उपयुक्त
"झालें आहे. विषयाची मांडणी मुलांना सहज समजेल अशी सोपी आहे
"व उदाहरणेंही मुलांच्या भोंवतालीं चालणाऱ्या दररोजच्या व्यवहारांतला
"घडूनच आहेत. (पत्र ता० २०-११-२६.)

पृष्ठें ११२ किं० ०।३।० ) **सोपें अंकगणित** ( उदाहरण ५००

**भाग २ रा.**

**( इयत्ता ३ री करितां )**

हा भाग लिहितांना पहिल्या भागाचेंच धोरण अक्षरशः संभाळण्याची खबरदारी घेतली आहे. मराठी तिसऱ्या इयत्तेकरितां नेमलेला सर्व भाग दिलेला असून शिवाय सरकारच्या शिक्षणाच्या अभ्यासक्रमाप्रमाणें **व्यवहारी अपूर्णांकांची वाचणी व मांडणी** हें प्रकरण जास्त घातलें आहे व त्याचा उपयोग लक्ष्यांत येण्याकरितां मजेदार व सोपीं उदाहरणें आकृतींच्या साहाय्यानें सोडवून दाखविलीं आहेत. **एकमान पद्धतीनें** व्यस्त प्रमाणांचीं उदाहरणें मुलांना चांगलीं समजावीं म्हणून हा भाग अधिक खुलासेवार दिला आहे. **(अंकगणितांवर कमिशन २० टक्के.)**

**भाग ३ व ४ छापत असून लवकरच प्रसिद्ध होतील.**

**नवीन किताबखाना, पुणें सिटी.**

व्हरनॅक्युलर फायनल परीक्षेस नेमलेलें

( शालोपयोगी )

# आ रो ग्य शा स्त्र

**भाग १–किं. ८१०.** **भाग २ रा किं. ८४.**

( लेखक. **रा० ग. म. देशमुख** ) व्हरनॅक्युलर फायनल परीक्षेच्या " **आरोग्य** " या विषयासाठीं हेंच उत्तम पुस्तक अशी तज्ज्ञांसह सर्वांची खात्री झाल्याकारणानें मुंबईसरकारानें ग्याझीट ता. ३१।७।१९२४ मध्यें न. ३१४१ अन्वयें **सदर पुस्तक व्हरनॅक्युलर फायनल परीक्षेस नेमल्याचें जाहीर केलें आहे.** या संबंधीं सरक्युलरें डेप्युटींचे मार्फत सर्व शाळांस गेलीं आहेतच. तरी ज्यांनीं ज्यांनीं अद्याप हें पुस्तक शाळांत सुरू केलें नसेल, त्यांनीं त्यांनीं ताबडतोब सुरू करावें अशी आमची सूचना आहे. या **आरोग्यशास्त्राचीं** सर्व भाषांत भाषांतरें झालीं आहेत.

**उर्दू इल्मोसहत** किं. १ रु. ( कामिशन १५ टक्के ).

रा. देशमुख यांच्या वरील पुस्तकामुळें आरोग्य हा विषय विशेष विस्तृत रीतीनें अभ्यासक्रमांत आल्यामुळें या विषयाची थोडक्यांत सुलभ व मनोरंजक रीतीनें माहिती करून देणारें असें एकादें छोटेंसें व सुटसुटीत पुस्तक खालच्या वर्गांत म्हणजे मुलींच्या ३–४ व मुलांच्या ४–५ या इयत्तांत उपयोगांत आणण्याजोगें असावें, अशी सूचना अनेक अनुभवी शिक्षकांनीं केल्यावरून **रा० ग. म. देशमुख यांनीं**

**अगदीं नवीन धर्तीवर**

चित्रें २० किंमत ८३ ] **आरोग्यप्रवेश.** [ पृष्ठें ५२ टाइप मोठा.

हें पुस्तक लिहिलें आहे, व तें खालच्या इयत्तांत

**चालविण्यास सरकारनें मंजूरही केलें आहे.**

यांत मोठ्या पुस्तकांतील सर्व विषय संक्षिप्त रीतीनें आले असून शाळाखात्यानें प्राथमिक शाळांकरितां आंखलेल्या कोर्सप्रमाणें हें पुस्तक लिहिलें आहे. पारिभाषिक शब्द बहुतेक नाहींतच. भाषा अगदीं लहान मुलांस समजेल अशी सोपी, विवेचन मनोरंजक आणि सचित्र या सर्व गोष्टीमुळें मराठी पांच इयत्तांपर्यंत " आरोग्यावर " कोणतें पुस्तक लावावें ही काळजीच उरली नाहीं. ( कामिशन १५ टक्के. )

**नवीन किताबखाना, पुणें सिटी.** ~३

## रा. यशवंत गणेश फफे यांनीं लिहिलेलीं पुस्तकें

शालेय

सुधारलेली आवृत्ति. **पद्यार्थमंजरी.** किंमत १२ आणे.

**क्रमिक १–७ पुस्तकांतील संपूर्ण पद्यांचें सुबोध विवेचन.**

हें एकच पुस्तक कोणतीही इयत्ता शिकवितांना शिक्षकांस बहुमोल मदत करील व त्यांच्या पद्यविषयक सर्व शंकांचें निरसन करील. शाळांतलि वरच्या इयत्तांतले विद्यार्थी, व्ह. फा. चे उमेदवार आणि विशेषतः ट्रेनिंग स्कुलें व कॉलेजें यांतील विद्यार्थी, यांस हें पुस्तक अत्यंत उपयुक्त झालें आहे. कमि. २० टक्के.

**शाळांसाठीं मंजूर झालेलें या जातींचें हें एकच पुस्तक होय.**

---

(शालेय)

## व्युत्पत्तिदीपिका.

(इयत्ता ६ व ७ करितां)

**नवी आवृत्ति ! टाईप मोठा ! कागद, छपाई व बांधणी सुंदर !!**

भाषेंत मूळ शब्द थोडे असून साधित शब्दच फार असतात. म्हणून साधित शब्द बनण्याच्या प्रकारांचें उत्तम ज्ञान संपादणें हाच भाषेचा राजमार्ग होय. **व्युत्पत्ति म्हणजे मुख्यत्वें शब्दांची साधनिकाच;** केवळ अपभ्रंश नव्हे. शब्दांचें खरें रूप व खरा अर्थ कळून त्यांची वाक्यांत समर्पक योजना करतां यावी हा व्युत्पत्ति शिकण्याचा उद्देश होय व तो साध्य होईल अशीच या पुस्तकाची रचना आहे. **किंमत ५ आणे. शिवाय कमि० २० टक्के.**

---

**सरकारनें पहिल्या इयत्तेकरितां मंजूर केलेलें.**

# मोडी वाचनपाठ पुस्तक १लें.

बाळबोधवरून मोडी मूळाक्षरांचें सुलभपणें ज्ञान करून देण्याची नवी गमतीची रीति. **उत्तम वळणदार अक्षर, सुंदर चित्रें, अत्यंत स्वच्छ छपाई** आणि सोपे, चटकदार धडे इत्यादि गुणांनीं हें पुस्तक अपूर्व झालें आहे. पुस्तक पाहिल्यावर हेंच सर्वांगसुंदर पुस्तक सुरू करावें असें प्रत्येकास वाटेल! किंमत दोन आणे. कामिशन भरपूर !

**याच मालेंतील दुसरें, तिसरें व चौथें पुस्तक लवकरच तयार होईल !**

# महाराष्ट्राचा शालेय इतिहास

**मराठी इयत्ता ४ करितां.**

**किंमत ०—३—०, कमिशन २७ टक्के.**

**या आवृत्तींतील विशेषः—भाषेचा चटकदारपणा कायम राखून ती शक्य तितकी सोपी केली आहे. या पुस्तकांतील आणखी विशेष असेः—**

१ अगदीं आजवरच्या माहितीनें निश्चित झालेला साधार इतिहास.

२ एकेका तासांत होतील अशा ५० पाठांत विभागलेला, तरी सर्व विषय सुसंगत.

३ सोपी पण चटकदार भाषा आणि स्फूर्तिदायक वर्णनें यांच्या योगानें पुस्तक विद्यार्थ्यांस प्रिय व्हावें आणि त्यांचे अंतःकरणांत आपल्या थोर पूर्वजांविषयीं अभिमान व आदर उत्पन्न होऊन त्यांच्या उज्ज्वल गुणांचें बीजारोपण व्हावें, अशी योजना.

४ स्वच्छ कागद, सुंदर छपाई, सुबक बांधणी, **ऐतिहासिक पुरुषांचीं चित्रें आणि उपयुक्त लहानमोठे नकाशे** यांच्या योगानें अंतरंगाइतकेंच पुस्तकाचें बाहिरंगही मोहक.

प्रसिद्ध इतिहाससंशोधक **रा. आबा चांदोरकर** यांचा अभिप्रायः—

" एकंदरींत पुस्तक उत्तमच झालें आहे. मुलांच्या मनावर महाराष्ट्राच्या सौभाग्याचा ठसा उत्कृष्ट वठेल. श्री० थोरले शिवाजीमहाराज, त्यांचें स्वराज्य, त्यांची हिंदुपदपातशाही, तिचे त्यांच्यानंतरचे पूजक व संरक्षक यांचा आत्मीयभाव म्हणजे मराठा मनाला जें वाटेल, तेंच यांत दृग्गोचर झालें आहे. "

**" हिंदुस्थानाचा शालेय इतिहास "**
**एप्रिलमध्यें तयार होईल !**

**सरकारनें शाळांसाठीं मंजूर केलेलें.**

## शुद्धलेखनशिक्षण.

शुद्धलेखन कसें शिकवावें, मुलांकडून कोणत्या चुका विशेष घडतात व त्याच हटकून कां होतात, त्या कशा निवाराव्या आणि इयत्तावार शुद्धलेखन कसें शिकवावें, या सर्व गोष्टींचा विचार ज्यांत सुबोधपणें केलेला आहे असें हें एकच पुस्तक आहे. **पृष्ठ ३२. किं० ०२६३ कमिशन ३३ टक्के.**

**नवीन किताबखाना, पुणें सिटी.**

# बालबोध-बालपुस्तक.

**बत्तीस पृष्ठांत नव्वद सुंदर चित्रें !! किं० १॥ आणा. कमि. २० टक्के !**

बालवर्गास '**लहान मुलांचें पुस्तक**' अगदींच अपुरें पडतें, ही उणीव
**शाळांत चालविण्यास मंजूर झालेल्या**
या नवीन पुस्तकानें दूर झाली आहे. यांतील विशेष गोष्टी अशा:—

१ अक्षरांचे गट वाचनाच्या दृष्टीनें नवीन तत्त्वावर केले आहेत. सर्व गट समान चार चार अक्षरांचे असून प्रत्येक नवा गट मागील गटावरून साधला आहे.

२ दर अक्षरास चित्र मुलांच्या ओळखीचें—परिचित वस्तूचें—योजिलें आहे. आणि **चित्रांतच अक्षर दिसेल अशी विशेष कौशल्याची** योजना केली आहे. यामुळें चित्र पाहतां पाहतां अक्षराचा आकार आपोआप मनावर बिंबणार आहे.

३ **प्रत्येक अक्षर लहान मोठ्या पांच आकारांत थाटलें आहे.** यामुळेंही अक्षराची ओळख पटण्यास मोठी मदत झाली आहे.

४ आकार, इकार इ. समजून देण्याचें काम नित्य परिचयांतील वस्तूंच्या तीन चार सुंदर चित्रांच्या द्वारा केलें असून या प्रत्येकाखालीं मुलांस मनोरंजक होईल असा एकेक धडा दिला आहे.

५ वाचनाचे संवयीसाठीं आणखी मनोरंजक धडे व सोप्या कविता दिल्या आहेत.

# मुलांसाठीं पाठांतर.

**संग्राहक—धोंडो सखाराम कुलकर्णी**, शिक्षक, प्रॅ. स्कूल, ट्रे. कॉ. पुणे.

लहानपणीं मुलांची पाठशक्ति चांगली असते. तिचा या पाठांतर करण्याच्या चालीमुळें योग्य उपयोग करून घेतां येतो. शिवाय संस्कृत शब्दप्रचुर असें पद्यवाङ्मय पाठ करून घेतल्यामुळें वाणीस एकप्रकारची कवाईत मिळून ती सुसंस्कृत होते. या दृष्टीनें रा. कुलकर्णी यांनीं या पुस्तकाची रचना केली आहे. प्रथम ईश्वरस्तुतिपर निवडक श्लोक आधीं देऊन नंतर गणपतीची, रामाची, कृष्णाची व सुप्रसिद्ध घनःशामसुंदराची भूपाळी दिली आहे. नंतर दोनचार आरत्या देऊन लहान मुलांस पाठ होतील असे निवडक संस्कृत श्लोक, सूर्यास नमस्कार, धर्मतत्त्वें, राष्ट्रगीतें, व इतर माहिती अशी दिली आहे. सारांश, हें पुस्तक प्रत्येक शिक्षकानें मुलांकडून पाठ करवून घ्यावेंच असें झालें आहे. किंमत २॥ आणे, कमिशन भरपूर.

**नवीन किताबखाना, पुणे सिटी.**

रा. रावजी मोरेश्वर देवकुळे यांचीं पुस्तकें.

**तोंडचे हिशेब भाग १ ला:—** प्राथमिक शाळांतील मुलां-मुलींची इयत्ता २—५ करितां.

या पुस्तकांत शिक्षणाचे सोईकरितां चार भाग केले असून त्यांचा अनुक्रम खालीलप्रमाणें आहे. [१] बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, यांवरील हिशेब. [२] किंमत दाखविणाऱ्या परिमाणांचीं कोष्टकें व हिशेबाच्या सोईसाठीं दुसरें इच्छित रूप देण्याचे व तोंडानें सहज करितां येण्यासारखे आडाखे. [ ३ ] वजनी परिमाणांविषयींच्या तोंडी हिशेबांच्या आडाख्यांच्या चाली. [ ४ ] कैली परिमाणांचे तोंडी हिशेबाचे आडाखे. [ ५ ] कालदर्शक परिमाणांच्या चाली वगैरे व व्यवहारांत हरवडी उपयोगीं पडणारे असे सर्व प्रकारचे हिशेब मुलांच्याकरितां फारच सोईचे आहेत. **किंमत ०१०३.**

**तोंडचे हिशेब भाग २ रा:—** मराठी चौथी व पांचवी या इयत्तांसाठीं सरकारनें मंजूर केलेलें.

या पुस्तकांत शिक्षणोपयोगी व व्यवहारांत हरघडी जरूर असलेली माहिती खालीलप्रमाणें आहे. (१) मोठाल्या बेरजा, वजाबाक्या, गुणाकार, भागाकार तोंडानें करितां येण्याकरितां विशेष प्रकारच्या चाली. ( २ ) गुणोत्तर व कसर यांवरील चाली व आडाखे. (३) सरळव्याजाच्या तोंडी हिशेबाच्या चाली व त्यांवरील हिशेब व उपपत्ति आणि सूचना. विशेषतः व्यापारांत उपयोगी पडणारे अनेक हिशेब दिलेले आहेत. **किं. ०४.**

**महत्त्वमापन.** क्षेत्रफळ व घनफळ या विषयांमध्यें क्षेत्रमापन व घनमापन या दोनच गोष्टी येतात असें नाहीं तर रेषामापन ही देखील ह्या विषयांतील एक आवश्यक गोष्ट आहे. म्हणून पदार्थांची लांबी, रुंदी इत्यादिक रेषा, पदार्थांनीं पृष्ठ आणि पदार्थानें व्यापिलेला अवकाश हीं तिन्हीं मोजण्याच्या कांहीं रीति सांगणें व त्यांची व्यवहारांत योजना करणें हा प्रस्तुत ग्रंथाचा मुख्य विषय आहे. विद्यार्थ्यांच्या सोईकरितां जरूर त्या खालीलप्रमाणें गोष्टी दिल्या आहेत. [ १ ] तसू, हात, काठी इत्यादिक मराठी रेषापरिमाणें व त्यांवरून ठरलेलीं क्षेत्रपरिमाणें व घनपरिमाणें, तसेंच त्यांचे इंग्रजी परिमाणाशीं संबंध दाखवून त्यांवरील नवीन प्रश्नही दिलेले आहेत. [ २ ] सरूप त्रिकोणांविषयीं एक दोन कृत्यें, वर्तुलांत परस्परांस छेदणाऱ्या रेषांसंबंधानें एक कृत्य व शंकूचें पृष्ठफल काढण्याचें कृत्य हींही या ग्रंथांत दिलेलीं आहेत. **किंमत ८ आणे,** कमिशन १५ टक्के.

# किंमतींत विलक्षण क्रान्ति !

क० रा० चिंतामण गंगाधर गोगटे कृत

( शालोपयोगी )

## हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास.

**टाईप मोठा, पृष्ठें सुमारें ३२०, चित्रें ६० चे वर.**

मोठ्या परिश्रमानें तयार केलेया व विद्याखात्याच्या पूर्ण कसोटीस उतरलेल्या **कै०गोगटे** यांच्या शालोपयोगी हिंदुस्तानच्या संक्षिप्त इतिहासांत आजपर्यंतची माहिती असणें जरूर आहे, अशाबद्दल बऱ्याच अनुभविक शिक्षकांकडून सूचना आल्यावरून येथील ट्रेनिंग कॉलेजांतील विद्वान व अनुभविक शिक्षक **रा. जोशी** यांजकडून सन १९०१ पासून आजपर्यंतचा सर्व भाग लिहून या इतिहासास जोडला आहे. या पुस्तकांत अज्ञातकालापासून इ. स. १००० वर्षांपर्यंत हिंदुस्तानच्या सर्व प्राचीन इतिहासाची उपोद्घातरूपानें दिलेली माहिती ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थ्यांस उपयोगाची आहे. पुढें मुसलमानी अंमल, मराठी अंमल व ब्रिटिश अंमल असे तीन भाग करून त्यांत सर्व अर्वाचीन इतिहास दिला आहे. तसेंच या इतिहासांत प्राचीन व अर्वाचीन असे दोन हिंदुस्तानचे नकाशे जोडले आहेत. या पुस्तकांत **विशेष गोष्ट** ही कीं, मराठी चौथ्या इयत्तेच्या अभ्यासक्रमांत जो महाराष्ट्र देशाचा इतिहास नेमिला आहे तो याच्या दुसऱ्या भागांत मराठ्यांचा इतिहास ह्मणून विशेष विस्तृत रीतीनें दिलेला आहे. यामुळें हें पुस्तक चौथ्या इयत्तेंतील मुलांसही उपयोगी झालेलें आहे. अशा रीतीनें एकाच पुस्तकानें इयत्ता ४ ते ७ पर्यंत मुलांचें काम भागणार आहे. शेवटीं राजवंशावळींत सर्व गव्हर्नर जनरल यांचे कारकीर्दीसह स्मरणीय गोष्टींचे काल, युद्धें वगैरे सनांसह दिलीं आहेत. मूळ पुस्तकाचे पूर्वीं एकंदर चौदा पाठ होते ते आतां सोळा केले, आहेत. जे नवीन पाठ जोडले आहेत, त्यांत सन १९०० पासून १९२१ पर्यंतचा सर्व इतिहास विस्तृत रीतीनें आलेला असून व्ह. फा. परीक्षेस जाणाऱ्या विद्यार्थ्यांस अत्यंत उपयुक्त असें हें पुस्तक झालेलें आहे. हें पुस्तक **टेक्स्टबुक** म्हणून मंजूर आहे.

**ध्यानांत ठेवा. (किंमत १२ आणे.) कमिशन १५ टके.**

नवीन किताबखाना, पुणें सिटी.

## कै० चिं० गं० गोगटे यांचीं इतर पुस्तकें.

| | |
|---|---|
| १ छत्रपति शाहू-महाराज १०८ | २ महाराष्ट्रांतील किल्ले ०१० |
| ३ औरंगजेब बादशहाचें चरित्र ०८ | ४ बाळाजी विश्वनाथ- पेशवे यांचें चरित्र ०४ |
| ५ नानासाहेब पेशवे चरित्र १०१२ | |

---

## रा० ब० सीताराम विश्वनाथ पटवर्धनकृत

# मोडी वाचनमाला.

| | |
|---|---|
| प्रायमर ........०—१—९ | दुसरें सुधारलेलें......०—४—० |
| पहिलें [सुधारलेलें] ०— ३—० | तिसरें सुधारलेलें......०—६—० |

हीं सर्व पुस्तकें मोहरेदार कागदावर आणि नवीन ब्लाक करून छापलीं आहेत. यामुळें इतर कोणत्याही मोडी पुस्तकांपेक्षां योग्यतेनें कमी नाहींत.

---

## रा. रा. हरि कृष्ण दामले यांचीं

### सरकारनें मंजूर केलेलीं मुलांचे हातांत देण्यायोग्य पुस्तकें.

| | | | |
|---|---|---|---|
| शिक्षणसार | ०७ | नीतिबोध | ०६ |
| नऊ रत्नें | ०२ | मुलांस नवी देणगी | ०२ |
| गलिव्हरचा वृत्तांत भाग १ | ०५ | थोरांच्या आख्यायिका | ०१०६ |
| " भाग २।३ प्र० | ०५ | सुबोध गोष्टी भाग १ | ०२ |
| " भाग ४ | ०६ | " भाग २ | ०२ |
| सायंकाळची करमणूक | ०६ | " भाग ३ | ०२ |
| डॉ. स्विफ्ट याचें चरित्र | ०३ | पार्वतीप्रकोप. | ०१ |
| इसापनीति भाग १।२ प्र० | ०६ | इसापनीति भाग १।२ एकत्र | ०१४ |

---

## शेतकी व प्राथमिक शाळांकरितां,

प्रो. वा. ग. देशपांडे कृत. **कीटक-शास्त्र.** (पृष्ठें ९९ चित्रें. ६१ किं०८

प्राथमिक शाळा व ट्रेनिंग कॉलेजें यांमधून सृष्टिनिरीक्षण या सदराखालीं कीटकांविषयीं माहिती दिली जाते; परंतु या विषयासंबंधीं सुसंबद्ध आणि शास्त्रीय परिभाषा वगळून सोप्या भाषेंत लिहिलेलें पुस्तकच नव्हतें! ही अडचण वरील पुस्तकानें दूर केली आहे. शेतकी विषयच्या अभ्यासक्रमास धरून शेवटीं तीन चार प्रकरणें जोडलीं असल्यामुळें शेतकी व प्राथमिक शाळा आणि ट्रेनिंग कॉलेजें यांस हें पुस्तक अत्यंत उपयोगाचें आहे.

**नवीन किताबखाना, पुणें सिटी.**

## कोणाचें कसेंही मत असलें तरी

पुष्कळ शाळांतील विद्यार्थ्यांस शब्दार्थांच्या पुस्तकांची मदत घेणें सद्यः-स्थितींत अपरिहार्य आहे, तेव्हां निदान तीं पुस्तकें **निर्दोष व उपयुक्त** व्हावीं, आणि त्यांच्या उपयोगापासून दुष्परिणाम होण्याची भीति न राहावी, म्हणून येथील **ट्रेनिंग कॉलेजांतील** सुप्रसिद्ध अनुभवी शिक्षक

### रा. यशवंत गणेश फफे

**यांचे खास देखरेखीखालीं विद्वान् शिक्षकांकडून**

# कन्यावाचन--

# पद्यार्थमंजरी

### पुस्तक १ ल व २ रें,

व

# गद्यपद्यार्थमंजरी

### इयत्ता २ ते ७.

हीं पुस्तकें आम्हीं तयार करविलीं आहेत, यांतील विशेष गोष्टी अशा:—

(१) गद्याच्या प्रत्येक धड्याविषयीं जिज्ञासा व कुतूहल उत्पन्न होईल, अशा रीतीनें प्रारंभीं त्या धड्यांतील मुख्य कल्पना दिली आहे.

(२) अवघड शब्दांचा अर्थ अवयवार्थाला धरून त्या वाक्यांत लागू पडेल अशा रीतीनें दिला आहे.

(३) सामासिक शब्दांतील प्रत्येक पदाचा अर्थ, समास, विशेष शब्दाची अर्थपोषक व मनोरंजक व्युत्पत्ति आणि अवघड व्याकरण सांगितलें आहे. धड्यांतील वाक्संप्रदाय, म्हणी व अवघड वाक्यें यांचेंही सुबोध स्पष्टीकरण केलें आहे.

(४) पद्यांच्या स्पष्टीकरणांत प्रत्येक कवीची व काव्याची माहिती देऊन त्या उताऱ्याचा गोषवारा प्रारंभीं दिला आहे आणि पुढें प्रत्येक कवितेंतील अन्वय व अर्थ दिला असून त्यापूर्वीं ह्या कवितेंतील मुख्य कल्पना दिली आहे.



नवीन किताबखाना, पुणें सिटी.

(५) क्रमिक पुस्तकांत ज्या लेखकांचे उतारे घेतले आहेत, त्यांचीं चरित्रें, भाषाशैली व ते ग्रंथ अगर कथानकें यांविषयीं माहिती दिली असून तीमुळें उताऱ्यांतील मर्म समजण्यास मोठी मदत झाली आहे. तसेंच क्रमिक पुस्तकांत ज्यांचा उल्लेख आला आहे, त्या इतर व्यक्ति, ग्रंथ, प्रसंग व स्थळें यांचीही आवश्यक माहिती थोडक्यांत दिली आहे आणि धड्यांतील विषय-ज्ञानासंबंधानेंही जरूर त्या उपयुक्त माहितीची भर घातली आहे.

सारांश, वर्गांत झालेल्या धड्यांची घरीं उजळणी करण्याकरितां मुलांना हीं पुस्तकें अत्यंत मूल्यवान् तर आहेतच, परंतु—

**शिक्षकांना सुद्धां अध्यापनाचे कामीं यांपासून फार मदत होणार आहे.**

हीं पुस्तकें मुलांचें हातीं असल्यानें फायदा होईल असें आम्हांस वाटतें, म्हणून "**मुलांनीं खाजगी उपयोगाकरितां हीं पुस्तकें वापरल्यास चालतील**" अशा तऱ्हेची शिफारस केल्यास आम्ही फार आभारी होऊं.

**महत्वाची सूचनाः—**कांहीं दुकानदार हीं **अर्थमंजरीचीं** पुस्तकें मिळत नाहींत वगैरे अनेक सबबी सांगून इतर अर्थाचीं पुस्तकें व मंजरीच्या धर्तीवर लिहिलेलीं चोपडीं ग्राहकांच्या गळ्यांत बांधतात, असें आमच्या नजरेस आलें आहे. म्हणून आमची अशी सूचना आहे कीं, मागणी करतांना **गद्यपद्यार्थमंजरीच पाठवा; इतर पाठवूं नका. असें स्पष्ट लिहा.** हीं पुस्तकें सर्व ठिकाणच्या बुकसेलरांकडे मिळतील अशी व्यवस्था केलेली आहे, तथापि मागणी करून नच मिळाल्यास—

**म्यानेजर, नवीन किताबखाना पुणें, यांस लिहा.**

**कन्यावाचन गद्यपद्यार्थमंजरीच्या किंमती.**

**भाग पहिला—किंमत ०४०६ भाग २ रा—किंमत ०४०६**

**दोन्ही भाग एकत्र ०८.**

**गद्यपद्यार्थमंजरीच्या किंमती.**

| | | | |
|---|---|---|---|
| **इयत्ता** | **२......०२** | **इयत्ता** | **५......०१** |
| **इयत्ता** | **३......०३** | **इयत्ता** | **६......०७** |
| **इयत्ता** | **४......०४** | **इयत्ता** | **७ ...०१०** |

**भरपूर कमिशन.**

शाळांतून चालविण्यास मंजूर झालेलें नवीन टेक्स्टबुक.

# भूमितीचीं--मूलतत्त्वें--भाग पहिला.

( पहिलें आणि दुसरें पुस्तक.)

**महाराष्ट्रांतील एक प्रख्यात गणितशास्त्रज्ञ रा. शिवराम गणपत पवार,** यांनीं हें पुस्तक तयार केलें आहे. युक्लीडची सिद्धांतमालिका विद्यार्थ्यांस अवघड पडत असे म्हणून ती बदलून पण अनुमानपद्धतीमध्यें किंचित्सुद्धां कमीपणा येऊं न देतां थोडक्यांत आणि सुलभ अशी सिद्धांतमालिका या पुस्तकांत तयार करण्यांत आली आहे. यामुळें या पुस्तकाच्या योगानें भूमितीच्या विषयांतील कठीणपणा समूळ नाहींसा झाला आहे. या पुस्तकांत जी शुद्ध अनुमानपद्धति आणि पृथक्करणपद्धति दिली आहे ती लागू करून भूमितिविषयक कोणतेही प्रश्न सोडवितां येतील. इतकेंच नव्हे तर, अंकगणिताचे प्रश्न सोडविण्यासही हीच पद्धति उत्तम उपयोगीं पडेल. ही पद्धति एकदां विद्यार्थ्यांस समजली, म्हणजे त्यांची तर्कशक्ति जागृत व निर्दोष होऊन ती त्यांस सर्व विषयांत व सर्व व्यवहारांत अत्यंत उपयोगीं पडेल.

**सारांश**— व्ह. फा. परीक्षेत भूमिति व गणित या विषयांत उत्तम यश येण्यास सहावी व सातवी ह्या इयत्तांत याच पुस्तकाचा उपयोग करणें हें एक उत्कृष्ट साधन आहे. यास्तव सर्व शिक्षकांनीं या सर्वोत्तम व सुगम अशा नवीन पुस्तकाचा आपल्या विद्यार्थ्यांस लाभ करून द्यावा. किं० ०।१२ कमिशन भरपूर.

**मराठी पांचव्या इयत्तेकरितां सरकारनें मंजूर केलेलें**

**किंमत ०।१०.] व्यावहारिक अंकगणित. [ कमिशन १५ टक्के.**

**भाग दुसरा.**

**लेखक--ह. कृ. कुलकर्णी.**

शिक्षक, नू. म. वि. हायस्कूल, पुणें.

जुन्या पद्धतीप्रमाणें अंकगणित विषय शिकविण्यांत येत असल्याकारणानें यांत्रिक पद्धतीप्रमाणें मुलें फक्त उदाहरणांचीं उत्तरें काढण्यापलीकडे त्यांतील व्यवहार डोक्यांत घेत नाहींत. म्हणून तीं या विषयांत कच्चीं राहातात. गणित विषयाचा व्यवहारांत उपयोग होत असतो ही भावना दृढमूल न झाल्याकारणानें ही उणीव विद्यार्थ्यांत राहाते. ती नाहींशी व्हावी, व या विषयाचा अभ्यास करितां करितां व्यवहारांतील शेंकडों घडामोडी मुलांच्या लक्ष्यांत याव्या, या हेतूनें प्रस्तु पुस्तक तयार केलें आहे.

 नवीन किताबखाना, पुणें सिटी.

व्हर्नाक्युलर फायनल परीक्षा खात्रीनें पास करून देणारा
व अतिशय उपयोगी.

॥१२ किंमत } **प्रश्नोत्तरसंग्रह.** { किंमत ॥१२

**लेखक--रा. नित्सुरे व घाटे; शिक्षक, ट्रेनिंग कॉलेज, धुळें.**

ह्या पुस्तकांत **व्ह. फा. परीक्षेस** नेमिलेल्या **इतिहास, भूगोल, गणित विषय, मराठी भाषा,** ( गद्यपद्यासह ) **व्याकरण, व्युत्पत्ति, छंदःशास्त्र, निबंधलेखन, पदार्थविज्ञान, आरोग्यशास्त्र** इत्यादि विषयांवरील अलीकडील दहा बारा वर्षांतील परिक्षेंत पडलेले **प्रश्न उत्तरांसह** संग्रहित केलेले आहेत. विशेष हा कीं, उत्तरें परीक्षेंत जशीं लिहावयास पाहिजेत तशीं पद्धतशीर लिहून दाखविलीं आहेत.

परीक्षेकरितां सपाटून अभ्यास करूनही अनेक वेळां पद्धतशीर उत्तरें वेळेवर लिहितां न आल्यामुळें बरेचसे विद्यार्थी नापास होतात असा हल्लींचा अनुभव येतो. याबाबत विद्यार्थ्यांस मदत व्हावी, तसेंच परीक्षेंत पडणाऱ्या कठीण प्रश्नांचीं उत्तरें व्यवस्थेशीर लिहितां यावीं, ही कला या पुस्तकांत विशद करून दाखविली आहे. म्हणून या पुस्तकाच्या साहाय्यानें नापास होण्याची भीति राहाणार नाहीं. परीक्षेच्या तयारी करितां इतर अनेक पुस्तकें घेण्यापेक्षां हें एकच पुस्तक विद्यार्थ्यांस भरपूर मदत करील. १९२७ मार्च्य अखेर पुस्तक मागविणारांस टपाल माफ.

# गोसावी यांचीं परीक्षोपयोगीं पुस्तकें.

**१ परीक्षेच्या तयारीचें प्रश्नोत्तर भूवर्णन**—हें अप्रतिम पुस्तक इयत्ता ६, ७ चे व्ह. फा. परीक्षेच्या तयारीस उपयोगी आहे. अकरा आवृत्ति हां हां म्हणतां खपल्या. ह्यावरून २ महिन्यांत परीक्षेची तयारी होते. किं. ॥५.

**२ हिंदुस्थानचा सोपा इतिहास**—हा व्ह. फा. परीक्षेच्या तयारीस अत्यंत उपयोगी आहे. मंद बुद्धीच्या मुलांचीही २ महिन्यांत ह्यावरून तयारी होते. ११ आवृत्ति जलद खपल्या. असा सोपा दुसरा इतिहास नाहीं. किं. ॥७.

**३ व्याकरणशिक्षक**—ह्यांत सर्व व्याकरणाचें सार आलें असल्यामुळें हें वाचल्यावर ७ वीच्या भाषेंत नापासाची धास्तीच नको; किं. ॥४.

**४ निबंधरत्नावलिः**—ही इयत्ता ६, ७ व व्ह. फा. प्रवेशपरीक्षा यांना अत्यंत उपयोगी आहे. ह्यांत कोणत्याही निबंधाचे मुद्दे कसे पाडावे, निबंध कसा लिहावा, हें सांगून उत्तम ३६ निबंध व रिपोर्ट लिहून दाखविले आहेत. किं. ॥१०.

५ **प्रश्नोत्तर आरोग्यशास्त्र**:—हें इयत्ता ५, ६, ७, व व्ह. फा. परीक्षेच्या तयारीस फारच योग्य आहे. यांत हवापाणी, व्यायाम, प्लेग, कॉलरा, क्षय, तात्कालिक उपाय इ. सर्व माहिती प्रश्नोत्तर असल्यानें फार सोपी झाली आहे किं. ॰५.

६ **प्रश्नोत्तर सृष्टिशास्त्र**:—हें व्ह. फा. परीक्षेस फार उपयोगी आहे. यांत सातव्या पुस्तकांतील सृष्टिशास्त्राच्या २३ धडयांचें प्रश्नोत्तर स्पष्टीकरण आहे. किं. ॰५.

७ **गणिताचा राजमार्ग**:—हें व्ह. फा. परीक्षेस फार उपयोगी आहे. यांत व्ह. फा. परीक्षेच्या सर्व प्रकरणांतील ३०० उदाहरणें सोडवून दाखविलीं आहेत. हें घेतल्यावर गणितांत नापासाची धास्तीच नको ! किं. ॰१४

८ **भाषेचा राजमार्ग** अथवा **गद्यपद्यार्थविज्ञान**:—हें व्ह. फा. ट्रेनिंग वर्ष १।२च्या परीक्षांस फारच उपयोगी आहे. यांत क्रमिक सातव्या पुस्तकांतील धडयांतील शब्दांचे अर्थ, व्युत्पत्ति, वाक्यार्थ, धडयांतलि विषयावर प्रश्नोत्तरें, कविचरित्रें, समास, व्याकरण अन्वयार्थ इ. माहिती सांगोपांग आहे. किं. ॰१४.

९ **हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेचा तक्ता**:—व्ह फा. च्या उपयोगी. यांत नवीन पद्धतीची राज्यव्यवस्था वंशवृक्षपद्धतीनें दिली आहे किं. ॰३.

१० **आशियाचा सोपा भूगोल**—इयत्ता ५ साठीं किं. ॰१॰६, ११ **युरोपखंडाचा सोपा भूगोल**—मुद्दाम इयत्ता ६ साठीं. किं ॰२; १२ **मुसलमानी अमलाचा सोपा इतिहास**—इयत्ता ५ साठीं किं. ॰२॰६. १३ **शुद्धलेखन**—हें इयत्ता २ ते ७ च्या उपयोगीं आहे. ह्यानें लवकर शुद्धलेखन सुधारतें. किं. ॰२; १६ महाराष्ट्राचा सोपा इतिहास—हा महाराष्ट्रांतील चौथीच्या उपयोगी आहे. किं. ॰३.

## रा. महादेव काशीनाथ कारखानीस

### शिक्षक, ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन यांचीं पुस्तकें.

### शिशुवर्गाकरितां

# मनोरंजक सोपे पाठ.

बालवर्ग व इयत्ता १ ली करितां जोडाक्षर विरहित पुस्तक, गमतीच्या गोष्टी, सुबक चित्रें, मोठा टाईप, सोप्या चालीवर लहान लहान कविता यामुळे हें पुस्तक मुलांस फारच आवडेल! **किंमत ॰४. कमिशन २० टक्के.**

नवीन पुस्तक !

# शिशुपाठमाला.

या पुस्तकांत गटांचीच पद्धत स्वीकारून चित्रांच्या साहाय्यानें मुलांस अक्षरओळख होतांच वाचनास सुरवात कशी करितां येईल हें दाखविलें आहे. अगदीं प्रारंभापासून मुलांना मनोरंजक वाटतील असे सोपे धडे यांत दिले आहेत. बोजड व कृत्रिम वाक्यें या पुस्तकांत मुळींच नाहींत. पुस्तकाचा **आकार मोठा, टाईप ठळक, चित्रें भरपूर व सुबक,** मनोरंजक धडे, सोपीं व मनोहर गाणीं यांमुळें सध्यांच्या मराठी प्रायमरच्या ऐवजीं **हेंच पुस्तक वर्गांत वाचावें,** असें प्रत्येकास वाटेल. **किंमत ०।२०६.**

## खास शिक्षकवर्गाकरितां बहुमोल पुस्तकें.

# अध्यापन.

शिक्षणपद्धतीच्या पुस्तकांत नुसतीं सामान्य तत्त्वें सूत्रवजा दिलीं असतां त्यांचा फारसा उपयोग होत नाहीं म्हणून मुंबई इलाख्यांतील प्राथमिक शाळांचा अभ्यासक्रम दृष्टीसमोर ठेवून प्रत्येक विषय शिकविण्याच्या पद्धती-संबंधानें फार विस्तारपूर्वक साध्या भाषेत विवेचन केलें आहे. **किंमत २ रु.**

# अंकगणित कसें शिकवावें.

यासंबंधानें " **मराठी शिक्षक** " म्हणतो:– " शिक्षकाचे उपयोगा-साठींच या विषयावर लिहिलेलें इतकें चांगलें पुस्तक अद्यापि आमचे पाह-ण्यांत आलें नाहीं." **किंमत १०।१२.**

# शिक्षक व शिक्षण.

प्रत्येक पालक, शिक्षक व शिक्षक होऊं इच्छिणारा यानें हें पुस्तक अवश्य वाचावें. **किंमत १०८.**

**मुलांकरितां कविता:**—या कविता मुलांस फार आवडतील. बाल-स्वभावाचा अभ्यास करणाऱ्या लेखकानें मुलांकरितां पुस्तक लिहिलें असतां तें कसें होतें, याचें हें पुस्तक उदाहरण आहे. **किंमत ०८.**

**वाक्यरचना व निबंधाची पूर्व तयारी:**—वाक्यरचना हा विषय मुलांस अत्यंत आनंदकारक वाटतो. प्राथमिक शाळांतून हा विषय इयत्तावार कसा शिकवावा याचें या पुस्तकांत सुबोध विवेचन केलें आहे. **किंमत ०६.**

नवीन किताबखाना, पुणें सिटी.

व्हर्नाक्युलर फायनल परीक्षेच्या विद्यार्थ्यांकरितां
शास्त्रीय विषयावरील भरपूर माहितीचें पुस्तक.

किंमत ०८. ] **सृष्टि-शास्त्र-प्रकाश.** [ किंमत ०८.

लेखक—**केशव महादेव जोशी.** शास्त्रीय-शिक्षणकर्ते
हेडमास्तर, शाळा नारायणगांव जि० पुणें.

**व्ह. फा. परीक्षा** व शेतकी अभ्यासक्रमाचे व्ह. फा. चे वर्ग यांतील विद्यार्थ्यांस क्रमिक पुस्तकांतील शास्त्रीय धड्यांची माहिती असावी लागते. ही माहिती यथासांग मिळण्यासाठीं शास्त्रीय उपकरणें दरएक शाळेंत असावीं लागतात. परंतु बऱ्याच शाळांतून उपकरणांचा अभाव असल्यानें शिक्षकांकडून परीक्षेस जाणाऱ्या विद्यार्थ्यांस निरनिराळ्या शास्त्रांचें ज्ञान व त्यांची माहिती पूर्णपणें होत नाहीं आणि त्यामुळें बरेच विद्यार्थ्यांस परीक्षेंत यश येत नाहीं. [illegible]बत बरेच शिक्षक विद्यार्थ्यांस स्वतंत्र टिपणें काढून देतात, परंतु त्यांचा [illegible]सा उपयोग होत नाहीं. या सर्व अडचणींचा विचार करून **रा. जोशी** [illegible] पुस्तक मुद्दाम लिहिलें आहे.

[illegible] पद्धतीची [illegible]त क्रमिक पुस्तकांतील ३ ते ७ मधील सर्व शास्त्रीय धड्यांच्या अनुसंधान व इतर अनेक पुस्तकांच्या आधारानें बरीचशी माहिती मिळवून ग्रथित केली असून विषय सुबोध व्हावा म्हणून ठिकठिकाणीं **बरींच चित्रें व आकृतीही** घातल्या आहेत. शिवाय सर्व शास्त्रीयप्रश्नांचीं संगतवार उत्तरें लिहून दाखविलीं असल्यानें शिक्षकांस व विद्यार्थ्यांस हें पुस्तक फारच प्रिय झालें आहे. या पुस्तकांतील विषय—**उष्णता, प्रकाश, ध्वनि, विद्युत, यंत्रशास्त्र, रसायन, आणि खगोल-भूगोल** इत्यादि.

१९२७ मार्च अखेर पुस्तक मागविणारांस टपाल खर्च माफ.

# इकडे लक्ष्य द्या !

**या जाहिरातींत नमूद केलेलीं पुस्तकें व इतर सर्व जातींचीं पुस्तकें विकण्याकरितां एजंट पाहिजेत. विशेष खुलाशासाठीं खालील पत्त्यावर लिहा.**

**म्यानेजर, नवीन किताबखाना, पुणें सिटी.**

( श्री. न. चिं. केळकर यांची मार्मिक प्रस्तावना. )

# महाराष्ट्र स्त्रीगीत.

**सरकारनें शाळाखात्यांत मंजूर केलें.**

या पुस्तकांत स्त्रियांच्या पाठांतरांतील जुनीं देवादिकांचीं, व कवि कवयित्री यांनीं रचलेलीं नवीं मोहक लोकप्रिय चालींचीं गाणीं, नोटेशन, चित्रें, यांसह असल्यामुळें तें अत्यंत प्रिय झालें आहे. किं. १॥ रु. (पत्ता–किताबखाना पुणें. परचुरे पुराणिक मं. माधवबाग मुंबई.)

कृष्णराव गणेश मुळे.

---

टेक्स्ट म्हणून मंजूर झालेलीं. ] **मुलांचें अंकगणित.** [ कमिशन रो. २०.

**पुस्तक** १ लें. इ. २ करितां किं. ३ आ. **पुस्तक** २ रें, इ. ३ करितां किं. ३॥ आ. **पुस्तक** ३ रें, इ. ४ करितां किं. ५ आ. उदाहरण ९५० उत्तरांसह मंजुरीकरितां पाठविलें आहे.

लेखक—म. गो. मोडक, एम्. ए. शिक्षक ट्रे. कॉलेज पुणें व द. ज. असता बी. ए. हेडमास्तर प्रॅ. स्कूल पुणें.

नवीन पद्धतीनें प्रथमच लिहिलेलीं, कन्याशिक्षक, इन्स्पेक्टिंग ऑफिसर्स यांनीं वाखाणलेलीं, अन्ट्रेन्ड शिक्षकांसही मार्गदर्शक उदाहरणें भरपूर.

**नाट्यरूप महाराष्ट्र**—लेखक—वि. द. घाटे, एम्. ए. बी. टी. शिक्षक ट्रे. कॉलेज पुणें. अस्सल कागद पत्रांचे आधारें लिहिलेला. तत्कालिन महाराष्ट्राचें चित्र यथावत् उभें करणारा, संवाद रूपानें लिहिलेला. इतिहासप्रवेश ४२. किं. १ रु.

**मिळण्याचें ठिकाण:**—पुणें मुंबई येथील प्रसिद्ध बुकसेलर्स विशेषतः ल. ना. गोडबोले लक्ष्मीरोड पुणें. परचुरे पुराणिक कंपनी माधवबाग मुंबई, अगर मोडक ५०१ शनिवार पुणें.

---

**मुंबई व मध्यप्रांत येथील शाळाखात्यानें बक्षिसाकरितां व लायब्ररीकरितां मंजूर केलेलें**

संग्राह्य ) **हिंदु–सण व व्रतें** ( किं. ६ आणे.

या नांवाचें पुस्तक केवळ लहान मुलां–मुलींकरितां लिहिलें आहे. यांत सर्व सणांची व व्रतांची सोपपत्तिक माहिती गोष्टीरूपानें दिली आहे. करितां आजच ८७ चीं तिकिटें पाठवून मागणी करा.

लेखक:—प. बा. खांबेटे हेडमास्तर म्यु. मु. सात-रस्ता स्कूल मुं. नं. ११.

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:—१ लेखकाकडे.

२ मुंबईतील प्रसिद्ध बुकसेलर्स.

**Registered No. B 1195.**

लक्ष्मीबाई प्रधानकृत

# विणकला भाग १ ला.

अलीकडे स्त्रीशिक्षणाचा प्रसार झाल्यापासून त्याचेबरोबरच प्रत्येक सुशिक्षित कुटुंबांत विणकलेचा जारीनें प्रघात सुरू झाला आहे. त्या कलेवर आजपावेतों दोन तीन पुस्तकेंही प्रसिद्ध झालीं, परंतु या कलेचें पूर्ण ज्ञान होण्यास या पुस्तकासारखें पुस्तक झालें नव्हतें. यांत कर्त्रीनें इंग्रजी पुस्तकावरून उत्तम प्रकारचें ज्ञान संपादन करून एकंदर नमुने स्वतः विणून त्यांचे फोटो घेऊन त्या फोटोचे ब्लॉक नेरॉय कंपनीकडून तयार करवून आर्टपेपरवर छापून पुस्तकांत घातले आहेत व त्या त्या आकृतीचें वर्णन छापिलें आहे. यांत पुढीलप्रमाणें तीस प्रकारच्या विणी, गळपट्टे (दुरंगी साधे, टॉय ३ प्रकारचे), पायमोजे चार प्रकारचे, टोप्या (गंधर्व, साधी, गळोतें, रुमी, गांधी, साहेबी, कमळाची, प्रवासी, बॉनेट, थंडीची, प्रवासी चार सुयांची), झबलीं ८ प्रकारचीं, गंजीफ्रॉक्स, साधे कोट, ओव्हरकोट, झुलां, शाली वगैरे विणण्याची माहिती असल्यामुळें ही कला अवगत करून घेण्याला फारच उपयुक्त असें हें पुस्तक झालें आहे. पुस्तकाचे खर्चाचे मानानें किंमतही अल्प म्हणजे फक्त रु. १। ठेविली आहे. ट. ख. व्ही. पी. सह रु. १॥१०

मिळण्याचें ठिकाणः—लक्ष्मण नारायण गोडबोले, बुकसेलर लक्ष्मी-रोड, पुणें सिटी.

---

# पुस्तकांचें नवीन दुकान.

आमचेकडे सर्व तऱ्हेचीं इंग्रजी, मराठी व संस्कृत पुस्तकें मिळतात. स्त्रियांना उपयुक्त अशीं गाण्यांचीं, कहाण्यांचीं व गोष्टींचीं पुस्तकें आम्ही ठेवितों. आमच्या व्यवहाराबद्दल विद्वानांनीं उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत. व्यापारी व [illegible] यांत भरपूर कमिशन दिलें जातें.

ह. पी. बापट ॲन्ड ब्रदर्स,
बुकसेलर्स आणि पब्लिशर्स,
बुधवार पेठ, पुणें शहर.

---

[illegible]
[illegible]
[illegible]